
# माणूस

दिवाळी ८८
२५ रुपये

एका
कॉलेजची
जन्मकहाणी



**जातवान**
धर्मांतरावर आधारित
एक दीर्घकथा
- राजन खान

" असं वाटतं,
तो सुटून येईल.
मग आम्ही
विवाहितांचं
जीवन जगू....
घर उभं करू...."
विन्नी मंडेला



**अजून थोडा प्रकाश!**
- महाकवी गटे






Pratibha LIC 203/88 Ma

# राजहंस प्रकाशन

## एक होता कार्व्हर

**वीणा गवाणकर – ४० रु./–**

सरळ, सुबोध मराठी तुम्ही लिहिलं आहे. कार्व्हरचं चरित्र तर अद्भुतच आहे. पण तुम्ही ते मराठीतून सुरेख सांगितलं आहे. 'सांगितलं आहे', असं मी मुद्दाम म्हणतो. माणसं लिहितात– पण लिहिणं हे सांगणं आहे हे विसरतात. तुमचं प्रास्ताविकही हृद्य आहे.

**–पु. ल. देशपांडे**

वैराण मुलुखाचे सुजलाम् सुफलाम् भूमीत रूपांतर करणारा थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी चरित्र.

## भ्रम आणि निरास

**डॉ. नरेंद्र दाभोळकर – ३० रु./–**

बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म अशा अनेक गोष्टींचे शास्त्रशुद्ध विवेचन. आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील प्रत्यक्ष अनुभव कथन.

## तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय

**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर – २० रु./–**

पाण्यानं आग का विझते ?
डोळ्यानं दिसणारं खरं की डोक्यात वाटणारं, कळणारं खरं ?
रस्त्यावरचा गारुडी नोटेचा नंबर अचूक कसा सांगतो ?
पृथ्वीच्या पोटात काय दडलंय ?
गावच्या जत्रेत ठेवलेलं नुसतंच मुंडकं कस बोलतं ?
या व अशा अनेक चमत्कारांचा सोपा सरळ उलगडा करणारं– विद्यार्थ्यांना हसत-खेळत विज्ञानयुगाच्या सहलीला नेणारं पुस्तक.

## वयात येताना

**सौ. मंगला गोडबोले**

**डॉ. वैजयंती खानविलकर – २५ रु./–**

वयात येतानाचे दिवस हा मुलीच्या आयुष्यातला सगळ्यात नाजूक काळ. त्यावेळी तिच्या शरीरात होणारे बदल, मनाची हळुवार अवस्था, समाजाच्या तिच्याकडून असणाऱ्या अपेक्षा या सर्वच बाबतीत तिला खूपसे प्रश्न पडतात. या सर्व बाबतीत तिला मार्गदर्शन हवंसं वाटतं. असं मार्गदर्शन व दृष्टिकोन देणारं हे पुस्तक.

## आपली मुलं

**शोभा भागवत – २० रु./–**

माझं मूल म्हणजे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. ते सगळं मी सांगेन तसं कसं वागेल ? मुलांचं निरीक्षण करणं, त्यांच्याशी संवाद साधणं, बरंचसं देणं आणि ग्रेसफुली घेणंसुद्धा–आपली मुलं वाढवताना पालकांना ही अन् अशी कितीतरी कौशल्यं जमायला हवीत.

## अंधश्रद्धा प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम

**डॉ. नरेंद्र दाभोळकर**

**प्रा. प. रा. आर्डे – २० रु./–**

संमोहित करून एखाद्या स्त्रीला अनैतिक कारणासाठी फसवता येईल ?
झपाटलेली व्यक्ती जन्मात न शिकलेली भाषा बोलते तरी कशी?
मंत्रसामर्थ्याने चमत्कार घडू शकतात ?
भानामती घडते तरी कशी ?
यांसारख्या सतत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांचा वैज्ञानिक दृष्टीने घेतलेला वेचक मागोवा.

**१०२५, सदाशिव पेठ, नागनाथ पार, पुणे ३०**

## श्री शारदा सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : ४७।१ तावरे कॉलनी, अजय अपार्टमेंट,
पुणे ४११ ००९.

**सुरक्षित जमा कक्षासहित**

फोन : ४४४६४६ । ४४००९५

**शाखा**

१. पुणे-सातारा रोड, ( मुख्य शाखा )
६९२-अ-२अ सलुजा चेंबर्स, पुणे ४११ ०३७. फोन : ४२१९४७

२. पाषाण शाखा, 'गंगौघ', १७८ पाषाण, पुणे ८ फोन : ५५९६३

३. सदाशिव पेठ शाखा व योजना कार्यालय, सुरक्षित जमा कक्षासहित
१२०९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०. फोन : ४३५६८५

४. शनिवार पेठ शाखा, २६९।२७० शनिवार पेठ, 'देवी हाऊटस्'
पुणे ४११ ०३०. फोन : ४३७३६६

५. बिबवेवाडी शाखा, स. न. ५७३ प्लॉट नं. ९, संध्यादीप सोसायटी,
पुणे ४११ ०३७. फोन : ४२१०३७

## दि फिनिक्स लायब्ररी

७२७ सदाशिव पोस्टासमोर
पुणे ४११ ०३०

- T. V. चे कार्यक्रम 'मोडी ऑकर'
- वृत्तपत्र व नियतकालिकात जहिराती व भडक वर्णनंच अधिक !
- प्रवासात धकाधकी व जोखीम फार ! ( S. T. मध्ये तर जीवच धोक्यात )
- फिरायला जावं तर बकालीपणा !
- प्यावं तर प्रकृतीला बिघाड व आर्थिक नुकसान !
- हॉटेलमध्ये जावं तर E. Coli !

या सर्वांपेक्षा वाचनच सोयीस्कर !
अवांतर वाचनासारखं रिलॅक्सेशन नाही !!
म्हणूनच आम्ही म्हणतो,
"अनमोल आनंद हवा असेल जर घरच्याघरी
तुमची पाऊले आपोआप वळतील
फिनिक्सच्या दारी !"

भारताच्या पश्चिमी क्षेत्रातील एक अग्रेसर व सार्वजनिक उद्योगातील सुप्रसिद्ध कंपन्यांपैकी एक अशी आर.सी.एफ. ही भारत सरकारच्या मालकीची व १९७८ सालापासून सतत सफलतेच्या दिशेने आगेकूच करणारी यशस्वी कंपनी आहे.

समृद्धिचे यशस्वी दशक ओलांडणाऱ्या या खतोद्योगाने आपल्या ट्रॉम्बे व थळ खत कारखान्यातून अधिक उत्पादनाबरोबरच उद्योगवृद्धी, कृषिसेवा, कर्मचारीविकास, प्रदूषण नियंत्रण व सामाजिक बांधिलकी यातून अनेक समाजोपयोगी कार्यक्रमांना चालना दिली आहे.

# हार्दिक शुभेच्छा

आर सी एफ

## राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स लि.

(भारत सरकारचा उपक्रम)

प्रियदर्शिनी, इस्टर्न एक्स्प्रेस हाय वे, सायन, मुंबई ४०० ०२२.
टेलेक्स-७२२५०/७१२२८ तार- राष्ट्रीय
सुफला १५:१५:१५, सुफला २०:२०:०

उज्ज्वला युरिया व औद्योगिक रसायनांचे अग्रेसर निर्माते.

**आर.सी.एफ.- कृषि व उद्योग विकासासाठी समर्पित**

Sai-RCF-52

# माणूस

## दिवाळी ८८





वर्ष : अठ्ठाविसावे

अंक : दुसरा

किंमत : पंचवीस रुपये

पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

फोन ४४३४५९


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.


ही दिवाळी व नवे वर्ष
वाचकांना, जाहिरातदारांना, लेखकमित्रांना
आनंदाचे व सुखसमृद्धाचे जावो.

–संपादक.


**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**सहाय्यक**

दिलीप माजगावकर

**या अंकाचे संपादन सहाय्य**

अविनाश कोल्हे

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**

राजीव देशपांडे

**व्यंगचित्रे**

अभिमन्यु कुलकर्णी
प्रशांत कुलकर्णी


**दीर्घकथा**


राजनखान
जातवान १६

शर्मिला गाडगीळ
कुणास्तव कुणीतरी ७८


**लेख**


गीता साने
हुंडाविरोधी कॉन्फरन्स ५

मनोहर माधव अळतेकर
एका कॉलेजची जन्मकहाणी ४६

मुरलीधर सायनेकर
अजून थोडा प्रकाश ६६

वसंत आबाजी डहाके
मारा साद : एक आधुनिक अभिजात नाट्यकृतो १२२

भाऊ पाध्ये
महंमूद १३२


**प्रवासलेख**


शरद कुलकर्णी १३९


**चरित्रकथा**


वीणा गवाणकर
मी परत येईन ९४

सतीश कामत
श्री भगवान उवाच ९




# आगरकर स्मृती

आगरकरांनी काढलेल्या ' सुधारक ' पत्राची शताब्दी नुकतीच साजरी झाली. यानिमित्ताने ठिकठिकाणी जी भाषणे झाली, लेख प्रसिद्ध झाले त्यात एक सूर सर्वत्र होता; आगरकरांचा सुधारणावाद टिळकांच्या स्वराज्य-वादापुढे टिकला नाही; आगरकरांना विरोध खूप झाला; समाजाने त्यांची उपेक्षा केली; त्यांचा छळ झाला; त्यांची प्रेतयात्रा काढण्यापर्यंत विरोधकांची मजल गेली; एकूण आगरकरांना अपयश आले; त्यांचा सुधारणावाद पराभूत झाला. पण असे निराशाजनक चित्र रंगवणे एकूण कालपट पाहता कितपत बरोबर आहे ? स्त्री शिक्षणापासून पोषाखापर्यंत ज्या ज्या सुधारणांचा आगरकरानी पुरस्कार केला त्या सुधारणा समाजाकडून स्वीकारल्या गेलेल्या आहेत. वेग अपेक्षापेक्षा थोडा कमी पडला हे मान्य करूनही, गेल्या शंभर वर्षातली ही प्रगती नाकारणे हा आगरकरावर अन्यायच नाही का ? आज पूर्वीप्रमाणे बालविवाची समस्या आपल्यासमोर उभी नाही; हुडा निदान उघडपणे तरी दिला–घेतला जाण्याचे प्रमाण खूपच कमी झालेले आहे. स्त्रिया केवळ सुशिक्षित झाल्या असे नाही; त्या अनेक क्षेत्रात पुरुषांशी बरोबरी करीत आहेत. अस्पृश्यता जेवढी आगरकरांच्या काळात तीव्र होती तेवढी तीव्रता आता जाणवत तरी नाही. शहरातून तर ती बऱ्याच प्रमाणात नाहिशी झालेली आहे, केशवपन, सती या चाली जवळजवळ नामशेषच झाल्या आहेत. राजस्थानातील देवरालासारख्या घटना अगदी तुरळकपणे घडतात. केवळ आगरकराच्या लिखाणामुळे हे सर्व घडून आले असे नाही. अनेक सुधारक देशभर होऊन गेले. त्या सर्वांच्या त्यागाला, निर्भयतेला हे फळ आले आहे. या फलनिष्पत्तीत आगरकराचा बहुमोल वाटा आहे. त्याचा सुधारणावाद पराभूत झाला असे एकांगी प्रतिपादन त्याच्या कर्तृत्वाचा अवमान आहे. बरं, र. धों. कर्व्यांप्रमाणे ते शेवटपर्यंत अगदी एकाकी पडले असेही नाही. फर्ग्युसन कॉलेजचे ते प्रिन्सिपॉल होते. त्या काळात हे स्थान, हे पद उंचीचे, भूषणावहच मानले जात होते. समाजाकडून जर आगरकराचा सारखा छळ होत असता तर हे मानाचे पद शेवटपर्यंत त्यांच्याकडे राहणे अवघडच झाले असते. प्रेतयात्रेचे उदाहरण नेहमी दिले जाते. पण हा काही उपद्व्यापी मंडळींचा व्रात्यपणा होता हे आता तरी सर्वांना माहित झालेले आहे. प्रेतयात्रा सगळ्या सुधारकांच्या घरावरून नेली गेली; त्यात आगरकरांचे घरही आले. पण हा काही आगरकरांना जीवनच अवघड करून टाकणारा, मानहानी–वित्तहानीचा गंभीर प्रकार नव्हता. खुद्द आगरकरांनीही या प्रसगाला अवास्तव महत्त्व दिलेले दिसत नाही. त्याचे अभिमानी मात्र वेळी–अवेळी हा प्रसंग उगाळत असतात. एकूण भिन्न मत असलेल्या व्यक्तीचा छळ करण्याची परंपरा आपल्याकडे कमीच आहे. आगरकरांचे दारिद्र्य हाही एक असाच विषय. पूर्ववयात त्याना दारिद्र्य भोगावे लागले हे अगदी खरे; पण ' केसरी 'चे सपादक म्हणून, पुढे कॉलेजचे प्राचार्य म्हणून त्यांना जे काही वेतन मिळत असेल ते त्याच्या प्राथमिक गरजा भागवणारे निश्चितच असणार. ' सुधारक ' ही सुमारे २० वर्षे चालू होता. म्हणजे त्याची मते, त्यांचे विचार समाजासमोर शेवटपर्यंत मोकळेपणाने ते मांडू शकत होते. रानडे, गोखले, हरी नारायण आपटे या त्या काळातल्या नामवत मंडळीचा त्यांना पाठिंबा होता व महाराष्ट्रभर त्याचा चाहतावर्ग तयार झालेला होता. टिळक व आगरकर यांच्यातील संघर्षाला गडकऱ्यांसारख्या थोर नाटककाराने नक्षत्रांच्या शर्यती म्हटले होते. म्हणजे समाजात जेवढा टिळकांना मान होता तेवढा आगरकरांनाही दिला जात होता. आजचा शहरी सुशिक्षित मध्यमवर्ग ही आगरकरांची निर्मिती आहे. आगरकराचा सुधारणावाद पराभूत असता तर त्यानी काढलेल्या ' सुधारक ' पत्राची शताब्दी साजरी करण्याची बुद्धी आपल्याला कशी झाली असती ?


¤

मंदिरांसमोरच्या रांगा वाढताहेत. धर्म ही अफूची गोळी मानणाऱ्या मार्क्सवादी राजवटीतही धर्माला अधिकृत स्थान दिले जात आहे. रशियन ऑर्थोडॉक्स चर्चची सहस्त्राब्दी नुकतीच रशियामध्ये मोठ्या प्रमाणावर साजरी झाली. जगभर धर्माचा पुर्नविचार सुरू आहे. नवी पिढी धर्माकडे आकृष्ट होत आहे. हा सारा आगरकरी बुद्धीवादाचा पराभव मानायचा का ? पराभवापेक्षा मर्यादा मानणे अधिक सयुक्तिक ठरेल. बुद्धीवाद अंतःकरणापर्यंत पोचू शकत नाही. ऐहिकाप्रमाणेच माणसाला पारमार्थिकाचीही भूक आहे. ही गरज धर्म काही प्रमाणात पूर्ण करू शकतो. एखादी व्यक्ती, फार तर मुठभर माणसे केवळ बुद्धीवादावर जगू शकतात. सामाजिक जीवन मात्र एखाद्या श्रद्धेशिवाय उभे राहू शकत नाही. आगरकर सत्यशोधक असल्याने त्यानी बुद्धिवादाच्या मर्यादा नक्कीच मान्य केल्या असत्या. लोकहितवादी जसे नंतरच्या काळात बदलले तसे आगरकरांच्याबावतीत कशावरून झाले नसते ?

—श्री. ग. मा.

# गडगीच्या मोमीन मुसलमानांची हुंडाविरोधी कॉन्फरन्स

● गीता साने ●



**मा**झे परिचित श्री. गुलाम रसूलजींनी, फेब्रुआरी (१९८८) च्या अखेर म्हटले, ‘हमारे गांव के लोक दहेजविरोधी कॉंफरन्स मार्चमें कर रहे हैं. आप को उस मीटिंग में जाना होगा.’

मी थोडी आश्चर्यात बुडले. मुस्लिम समाजाची सामाजिक प्रश्नांवर चळवळ क्वचितच ऐकू येते. म्हणूनच मी जिज्ञासेने गुलाम रसूलजींना विचारले,

‘कहा जाना है. आपका गांव है कहां ?’

त्यांनी बरीच माहिती दिली पण माझ्या डोक्यात जो प्रकाश पडला तो एवढाच की त्यांचे खेडे गडगी, गिरिडी जिल्ह्यात असून, धनबादपासून २०० किलोमिटर पक्की सडक आहे. सडक गाँवा ब्लॉकच्या गाँवा गावापाशी संपते. नंतर २५ किलोमिटर अंतरावर गडगीची वस्ती वसलेली आहे. हा भाग महाराष्ट्राच्या विंध्य–सातपुडा ह्या प्रदेशा-प्रमाणे उबड-खाबड. पाऊलवाटेने गडगीला जावे लागते. डोंगराळ भाग असल्याने मार्गात तीन–चार ओढेही पार करावे लागतात. त्यांच्यावर पूल नाहीत. पाऊस पडून ह्या ओढ्यांना जीभ आली म्हणजे इथली वाह-तूक तासन्तास बंद होते आणि बाहेरच्या जगाशी गडगीचा सबंध पूर्णपणे तुटतो.

आमचे हे बोलणे झाल्यावर दोन–तीन दिवसांनी श्री. गुलाम रसूल काही तरुणांना घेऊन आले. श्री. गुलाम रसूल धनबादच्या वुडलंड हॉटेलमध्ये काम करतात तर हे युवक हॉटेलच्याच धंद्यात पण कलकत्त्याला असतात. ही सर्व मंडळी गडगीची रहिवासी आहेत.

ह्या युवकांनी मला सांगितले की त्यांनी कलकत्त्याला साउथ बिहार, गिरिडोह वेल्-फेअर सोसायटी संघटित केली आणि कलकत्त्याच्या कल्याण खात्याने नॉनट्रेडिंग कॉर्पोरेशन ह्या सदरात तिला मंजुरी दिली. रजिस्ट्रेशनही झालेले आहे. सोसायटीचा उद्देश सर्वांनी मिळून विविध सामाजिक समस्यांचा विचार करणे हा आहे. त्या सोसायटीमध्ये शहरी जीवन आणि गडगीच्या मागास गावठी प्रदेशामधले ग्रामीण जीवन ह्यांचीही चर्चा होत राहिली. या सोसायटीचे अध्यक्ष श्री. अब्दुल बारी आणि सेक्रेटरी श्री. महंमद मुस्लिम हे दोघेही कलकत्त्याला नोकरी करतात; आणि दोघेही गडगीचे रहाणारे आहेत.

ह्या सोसायटीच्या युवकांच्या प्रयत्नाने, आपला प्रदेश गिरिडोह जिल्ह्यातील, गांवा ब्लॉकमधील गडगी ह्या आपल्या खेड्यातही त्यांनी सोसायटीची शाखा १९८६ मध्ये स्थापन केली. आता बिहारमध्ये तिचे रजिस्ट्रेशन व्हावे म्हणून अर्ज केलेला आहे आणि रजिस्ट्रेशन होऊन सोसायटीच्या ऑफिस बेअरर्सची निवडणूक होईपर्यंत कलकत्याचेच अबदुल बारीसाहेब आणि महंमद मुस्लिमसाहेब हे अनुक्रमे अध्यक्ष आणि सेक्रेटरीचे काम करतील.

सोसायटीमध्ये ह्या इलाख्यातील ६४ गावांचे मुसलमान सामील आहेत. ही सारी खेडी मुख्यत्वे मोमीन मुसलमानांची आहेत. मोमीन म्हणजे विणकर. एके काळी इथे कपडा विणला जात असे. भारतीय कपडा उद्योग, गिरण्यांनी घेतल्यावर विणकरांचा धंदा बसला. आज गडगीमध्ये हातमाग पहावयासही मिळत नाही आणि बेकार झालेली नवीन पिढी पोटामागे खेड्यांच्या बाहेर पडली. ह्या प्रक्रियेत गडगीचे तरुण कलकत्त्याला पोचले आहेत. ह्या परिवर्तनात जुन्या सामाजिक व्यवस्थेची घडी पूर्णपणे विस्कटली आणि नवीन समस्या समाजाच्या पुढे उभ्या राहिल्या.


सोसायटी ज्या अनेक समस्यांवर विचार करते, त्यात अलीकडे सगळ्या समाजाला ग्रासून राहिलेला हुंड्याचा व तलाकचा भस्मासूर भयानक स्वरूप घेऊन उभा आहे आणि त्याचाच विचार करण्यासाठी ही कॉन्फरन्स बोलावलेली होती.

हुंड्याच्या भस्मासुराने हिंदू समाजदेखील सध्या भयभीत आहे. तथापि हुंड्याच्या चालीचा संघटित विरोध करण्यासाठी अजून कुठे प्रयत्न होताना दिसत नाहीत; आणि म्हणूनच माझ्या जिज्ञासेला धार चढली.

गुलाम रसूलजी म्हणाले, मुलीच्या विवाहात संसार उभा करायला उपयोगी असणारे काही सामान आणि कपडे, भांडी, तसेच मिठाई, ह्यांचीही देवाण–घेवाण हिंदू–मुसलमान दोन्ही समाजांत होई; पण आता प्रचंड पैसा द्यावा लागतो जो आईबापांना डोईजड होतो.

साउथ बिहार गिरिडी सोसायटी संघटित झाल्यावर कलकत्ता आणि गडगीच्या युवकांनी २५।४।८७ ला गडगी येथे एक कॉन्फरन्स बोलावली आणि त्यावेळी हुंडा व तलाक ह्यांचा प्रश्न विचारात घेतला गेला. तसेच कॉन्फरन्समध्ये एक कमिटी निवडली. १९।५।८७ ला पुन्हा सर्व ६४ गावांची बिरादारीची पंचायत (चौरासी) बोलावण्यात आली. ह्या सभेत निर्णय झाला की वराला वधूपक्षाकडून एक सायकल, एक रिस्ट वॉच आणि कपडे द्यावेत. वराकडून वरातीबरोबर २५ पर्यंत वराती नेता यावेत. ह्याशिवाय वराकडून, वधूला दोन साड्या, वधूच्या आईला तीन साड्या व १२ किलो मिठाई दिली जावी. ह्याशिवाय शाळेला (मदरसा) रु. २५.०० मशिदीला रु. २५.००, निकाहचे रु. २५.०० आणि लग्नाची नावे रजिस्टरमध्ये नोंदण्यासाठी रु. २५.०० अशा रकमा दान म्हणून दिल्या जाव्यात. मेहेरची रक्कम रु. ५००१.०० निश्चित करण्यात आली.

त्यानंतर सभेत निर्णय झाला की, जो कोणी १) या निर्णयाविरुद्ध काम करील



त्याच्यावर बिरादारी बहिष्कार घालील.

२) या 'मानवतेच्या लुटारू' च्या गळयात, त्याबद्दल लिहिलेली पाटी घालून त्याची धिंड गावा-गावातून काढण्यात यावी.

३) जो कोणी मध्यस्थ पैसा देईल किंवा देववील, तो पकडला गेल्यास त्यालाही हीच शिक्षा व्हावी.

४) सवटनेच्या विरुद्ध छोटे-छोटे गांववाले जाऊन काम करतील तर ते पुड समजले जातील

मुसलमान समाजातील ह्या आदोलनाचा परिणाम इतर जातीवरही– त्यात चाभाराचा भरणा सर्वाधिक आहे. झावा यानी एक मोठा जुलूस काढून हुंड्यावद्दलचे मोमीन चौरासीचे नियम, आपल्या पचायतीतही लागू केलेले आहेत. ही पंचायत त्या भागातील १९ खेड्यामध्ये कार्य करते.

*ह्या व्यवस्थेवर अमल झाला म्हणजे* कलकत्याच्या office ला ताबडतोब खबर करावी लागेल.

या मीटिंगनतर वरील निर्णयावर अमल सुरू झाला. त्याची काही उदाहरणे–

(१) एका माणसाचे एका मुलीवर प्रेम जडले मुलीला दिवस गेल्यावर, त्याचे लग्न करून देण्यात आले लग्न झाल्यावर मुलगा कुठे पळून गेला, तेव्हा चौरासी (पंचायत) ने मुलाच्या वापाकडून रु. ५००१.०० मेहेरचे देववले ह्या मुलीला कन्यारत्न झाले. ह्या तान्हीसाठी होणारा सर्व खर्च मुलाचा बाप देईल. हा खर्च किती असावा हे चौरासी ठरवील. पैसा मुलाच्या बापाने न दिल्यास त्याच्यावर बहिष्कार घालण्यात येईल.

(२) केस न. २ पत्थरगाव, गावाचे हबीब मिया यानी आपली कन्या, चदौरी गावच्या छोटू मियाला दिली. लग्नाच्या वेळी मुलगी वयात आलेली नव्हती. मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर हबीब मिया तिला माहेरी म्हणून घेऊन गेला, तो तिला परत पाठवीना. *बिरादरीच्या हुकुमाने हबीबमियाने* मुलीला सासरी पाठवण्याचे कबूल केले. आपसांत तडजोड झाल्यावर केस फाइल करण्यात आली.

(३) बिरादरीकडे अर्ज आला तो असा की, 'आमच्या लग्नाला ६ वर्षे होऊन गेली आहेत. लग्न झाले तेव्हा मुलगी अल्पवयीन होती. तरीदेखील ती सासरी राहू लागली. मुलगी अठरा वर्षांची झाल्यावर बाप तिला माहेरी घेऊन आला आणि नतर त्याने जावयाविरुद्ध गडगी कोर्टात केस केली की मुलाने दुसरे लग्न केले असून दोन बायकाना पोसण्याची ऐपत नवऱ्यामध्ये नाही. बिरादरीने दोन्ही पक्षांना दोषी ठरवले, कारण नवऱ्याने पहिली स्त्री हयात असताना दुसरे लग्न केले, आणि बापाने चौरासीला न विचारता तो सरळ कोर्टात गेला. तेव्हा मुलीचा बाप आणि नवरा दोघानाही दंड केला. त्याचप्रमाणे मुलाला दोन्ही बायका पोसण्याची ऐपत नसल्याने त्याने एकीला तलाक द्यावा असे ठरले त्यासाठी तिच्या बापाला रु. ५१.०० प्रवासखर्च देऊन गडगीला बोलावण्यात आले आणि आपल्या मुलीला बरोबर आणल्याबद्दल कळवण्यात आले. त्यानंतर दोन्ही पक्षांना आदेश देण्यात *आला की त्यानी एकत्र बसून आपसात* ठरवावे म्हणजे पुढील कोर्टाच्या तारखेला केस कोर्टातून काढून घेता येईल.

(४) अर्जी (चौरासीला) हबीब मिया रहाणार गांवा, याने लग्न केल्याला सात वर्षे झालेली आहेत आणि चार वर्षांपासून मुलगी नादतही आहे. आता हबीब दुसरे लग्न करतो आहे. त्याला लग्नाला मनाई करण्यात यावी.

हबीबकडून उत्तर आले की, 'मुलीला काही रोग असल्याने तिला गिरिडीच्या सरकारी दवाखान्यातील लेडी डॉक्टरला दाखवण्यात आले. डॉक्टरबाईंनी मुलीला मूल होण्याचा सभव नाही असे आपले मत दिले आहे. मुलीने त्यानंतर दुसऱ्या लग्नाला संमती दिलेली आहे तरी मला त्रास दिला जाऊ नये.

ही केस मी गडगीला असताना त्याच दिवशीच्या सभेमध्ये चौरासीने घेतली. त्यावेळी हबीब आणि त्याची पत्नी दोघेही सभेत बोलावलेले होते. पत्नीला तेथेच *स्त्रियानी वस्तुस्थिती काय आहे,* ह्याची विचारणा केली. पत्नीने 'गोष्ट खरी आहे' असे सांगितल्यावर केस बद करण्यात आली.

या सर्व केसेसवरून सोसायटीचे काम महत्त्वाचे आहे आणि कोर्ट कचेऱ्यांच्या वाऱ्या आणि त्याचा दोन्ही पक्षाना होणारा त्रास, जाच खर्च आणि मनस्ताप ह्यापासून दोन्ही बाजूना मुक्त करणारे आहे.

मी गडगीला गेले ती सभा गडगीला १३-३-८८ ला झाली. सभेसाठी भरपूर प्रचार करण्यात आलेला होता. गडगीसारख्या २००-३०० घराच्या एका कसब्यात दीड ते दोन हजार लोक हजर होते. गावाच्या बाहेर मोकळया जागेत शामियाना घातलेला होता. सभेला येणारे लोक दुरून दुरून येणारे होते आणि गडगीला हॉटेल किंवा 'धावा' उपलब्ध नव्हता. त्यामुळे लोकाच्या जेवणाची व्यवस्था चौरासीनेच केली. पुरी भाजी आणि वरण असा स्वैपाक स्वैपाकी ठेवून करवलेला होता सभेत झालेली केस वरती नंमूद झालेलीच आहे. मला त्या सभेत बोलायचे होते, तेव्हा मी १९६१ च्या हुंडाविरोधी कायद्याची माहिती दिली व अखेर सागितले की, अशा विवाहामध्ये कायदा आणि कोर्ट हे अंतिम शस्त्र आहे. असे विवाद *आपसात करून मिटवणे सर्वांच्याच फायद्याचे* आहे.

सभा सपल्यावर मी विछान्यावर येऊन पडले. मला गुजराथच्या लोकअदालतीची आठवण झाली. चौरासी पुरेशी शक्तिशाली सघटना असल्यामुळे केसेस इथेच संपवल्या जातात, कोर्टात जाण्यासाठी कोणालाही परवानगी मिळत नाही. चौरासीचा निर्णय मान्य न केल्यास सक्त सजा देण्यात येते. ५०० रुपयाचा दंड द्यावा लागतो. घेतलेली हुड्याची रक्कम वधूपक्षाला परत करावी लागते.. 'ह्या रकमा, दहा हजारापासून एक लाखापर्यंत, परत करवल्या गेल्या आहेत.' असे श्री. गुलाम रसूल ह्यांनी सागितले. ह्याशिवाय मुलाच्या तोंडाला काजळ फासून त्याची गाढवावरून धिंड काढण्यात येते.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी गडगीच्या घरोघरी गेले आणि पडदानशीन स्त्रियाच्या भेटी घेतल्या घरे जुन्या तऱ्हेची आहेत. बाहेरच्या एका खोलीत पुरुषाची बैठक होती. *आतमध्ये अस्ताव्यस्त पसरत गेलेल्या* आणि अखेर चक्रव्यूह करणाऱ्या खोल्या होत्या.

कुठल्याही एका खोलीत पोचले म्हणजे भोवतालच्या खोल्यातल्या स्त्रिया एकत्र होत. त्या मला म्हणाल्या, 'हे सारे घर एका कुटुबाचे आहे. आता सगळ्यांचे वेगळचार

झालेले असून, तुम्हाला सर्वत्र चुली सापडतील.' ह्या स्त्रियांनी मला सांगितले की, 'हम रात के मीटिंगमे आयी थीं.' मी हसत विचारले, 'मग शेजारच्या वडाच्या छायेत लपून का बसला होतात ?'

'आम्ही बाहेर येऊन बसू शकतो.'

'तुमच्या 'पडद्या'चे काय ?'

'पुरुष परवानगी देतील तर आम्ही पडदा करणार नाही' पण पुरुष परवानगी देतील तेव्हा ना ?'

'मुलगी पहाण्याची पद्धतही त्यांना पसंत होती का ?'

'नाही.'

–मुलीला जनानखान्यात बोलावतात. नंतर तिच्यात काही व्यंग असल्यास कसून तपासणी होते. अखेर 'शरीरावर कुठे डाग–विग असल्यास दिसून यावा' म्हणून कपडे काढून मुलगी पाहिली जाते.

'कपडे काढून ?' मी आश्चर्याने विचारले.

'हां. कपडे निकालकर.' एका युवतीने थोडे रुसून सांगितले. तथापि स्त्रियांचा ह्या चालीला फारसा विरोध दिसला नाही. 'आम्ही सगळ्या बायका–बायकाच तर असतो' असा त्यांचा भावार्थ दिसला.

गडगीच्या स्त्रिया बंधनात पडलेल्या आहेत. ही बंधने समाजाची आहेत. ती सैल होताच त्या मुक्त होतात. ज्यांचे नवरे कलकत्त्याला नोकरीत आहेत. त्यांच्या स्त्रिया पतीबरोबर कलकत्त्याला चार दिवस थोडा अदल बदल म्हणून जातात. त्या कलकत्त्याला पडदा करीत नाहीत. आपल्या नवऱ्याबरोबर त्या मोकळेपणाने हिंडतात, सर्वत्र जातात येतात. गडगीला परतल्यावर मात्र पुन्हा पडदाबंद होतात. कलकत्त्याला राहून आलेल्या स्त्रियांना तेथील जीवन, मुक्त म्हणून आवडते.

दुसरे दिवशी मी धनबादला परत आले; पण माझे मन कित्येक दिवस गडगीच्या स्त्रियाभोवती फिरत होते. तसेच चौरासीच्या उपयुक्ततेचाही विचार करीत होते.

चौरासीसारख्या संस्था, आमच्या कल्पनेमधल्या कौटुंबिक कोर्टाचे प्रात्यक्षिक म्हणता येईल. अशा पंचायती किंवा कोर्टे, लोकांचा कोर्टात जाण्यायेण्याचा वेळ आणि खर्च ही दोन्ही वाचवतात. ह्याशिवाय आजच्या न्यायव्यवस्थेत होणारा मनस्ताप व काळजी ह्यातूनही माणूस मोठ्या प्रमाणात सुटतो.

कोर्टाचे अस्ताव्यस्त वाढत जाणारे काम आवाक्यात येऊ लागते आणि 'केस तर करूया. हरलो तरी प्रतिवादीला काही महिने झटके तर खावे लागतील' अशासारख्या विचारांची समूळ उचलबांगडी होते.

ह्या फायद्यांचा विचार करता चौरासीसारख्या लोक-पंचायतींच्या प्रयोगांना प्रोत्साहन देणे समाजहिताचे आहे, आणि खऱ्या लोकशाहीचे ते प्रतीकही ठरणार आहे, हेही स्पष्ट आहे.



# श्रीभगवान उवाच

कृष्ण म्हणे अर्जुना
काय झाले आज पुन्हा
खळ लोचनी नसे अश्रूंना
कारणे कोणत्या ॥

दिवसामागून दिवस गेले
ऋतू-मासही किती उलटले
परी मला ना कुणी भेटले
कुशल कथाया ॥

काय झाले मज सांग झडकरी
उदासीनता का तुझ्या चर्येवरी
संकोच न जरा मनी धरी
सागण्या सत्य ॥

मीच नाही का सखा तुझा खरा
बंधू द्रौपदीचा शील रक्षणारा
भय-चिंतेचा न लागो वारा
सान्निध्यात माझिया ॥

## श्रीअर्जुन उवाच

उमगे मलाही देवा तुझी शक्ती
तुझ्या ठायीच सदा माझी भक्ती
रणांगणावरी सांगूनी युक्ती
तारले तूचि ॥

तुझ्याविण कोण आम्हा आधार
घेतला तूच आमच्या जीवनाचा भार
कोण करील भवसागर पार
गुरुविण तुजसम ॥

पण आता काही विपरित घडे
धुंदीत बुडती जन हे बापुडे
म्हणून देवा घालाया साकडे
आलो येथ ॥

अवनीवरी एक खंडप्राय देश
सर्व धर्म-पंथांना मुक्त प्रवेश
लोकशाही मूल्यांचा तेथे उद्‌घोष
नित्य चाले ॥

'भारत' नावाने लोक ओळखती
म्हणे पुरातन यांची संस्कृती
म्हणे दुनियेला मार्ग दाखवती
तत्त्वज्ञानी येथले ॥

निपजला तेथे नेता महान
कोट्यवधी जनतेचा म्हणे पंचप्राण
तरुण, तल्लख, आकर्षक जाण
महापुरुष हा ॥

माता याची मोठी कर्तबगार नारी
म्हणे तिच्यामुळेच आला सत्तेवरी
भिस्त याच्यावर साऱ्यांची भारी
संकटे निवारण्या ॥

लागला त्याला एकच ध्यास
आधुनिकतेचा मोठा हव्यास
एकविसाव्या शतकाचा करू प्रवास
म्हणे जना ॥

त्याच्यामागे सारे धावू लागले
इशाऱ्यावर त्याच्या जगू लागले
पुढच्यांना हाका देती मागले
थांबण्या थोडे ॥

वळूनी परी कोण तिकडे पाहील
भिती साऱ्यांना तो निघून जाईल
न धावणारा तसाच राहील
शतकात मागल्या ॥

आणले त्याने एक खोके चौकोनी
घातली लोकावर त्याची संमोहिनी
दर्शन घेण्याला याचे दूरदूरुनी
जमती सारे ॥

खोक्यावर सदा याचे रूप दिसे
आंग्ल भाषेत बोले काहीसे
हात हलवून हळूच हसे
भाबड्या जिवांना ॥

एक दिनी या खोक्यावर देख
दशरथ-पुत्र आणि जनकाची लेक
अवतरले साक्षात कर जोडी प्रत्येक
वंदाया तयांना ॥

श्रीराम-लंकेशाचे घनघोर युद्ध
दानव-मर्कटेही किती झाली विद्ध
हरपूनी पाहती स्त्री, आबालवृद्ध
अग्निदिव्य भू-कन्येचे ॥

आता तर देवा कमालच झाली
आमच्याच जीवनाची कथा सुरू केली
शंतनू-मत्स्यगंधेची प्रीतीची बोली
खोक्यावरी सांगती ॥

येणार ही कथा आपल्यापर्यंत
त्याविण का होईल सुफळ सुखांत
दंग झालेत जन, जरी खाण्याची भ्रांत
कित्येकांना नित्यनेमे ॥

राजकारणाचे मात्र वेगळेच चित्र
शत्रू कालचे झाले आज मित्र
युत्या, फाटाफूटही दिसे सर्वत्र
ग्रासले देशा ॥

म्हणती आम्ही शिकला आहे धडा
तोडण्यापेक्षा नवे मित्र जोडा
एकत्र राहून जुने पाप फेडा
संदेश या घडीचा ॥

बुद्धी नसताही जो सत्तेवर आला
देशाची नाडी कुठे कळे त्याला
टोळी जमवूनी घालतोय घाला
भविष्यावरी देशाच्या ॥

परकीयांसंगे याने मिळवले हात
भ्रष्ट विचार, भ्रष्ट आचारात
आणली खरी याने संक्रांत
ऐक्यावरी देशाच्या ॥

चला सारे मिळूनी खेचू त्याला खाली
आपल्या जिवावर त्याने मजा खूप केली
पापांची याच्या आता हद्द झाली
ओळखा सत्वरी ॥

जनता आमची साथी, तेच आमचं दल
जाणला आहे आम्ही तिच्या मनीचा कल
नेता आमच्याकडे निष्कलंक, कुशल
मानती सारे ॥

देईल तोच बघा चोरा पकडून
हाकारे आमचे चोहोकडून
नको मनी द्वंद्व, नका बसू अडून
क्षुद्र भावे ॥

परी एकत्र येताच अपशकून झाला
यांच्यातला कोणी बाजूला गेला
सुरवात झाली ढकलाढकलीला
पदावरून एकमेका ॥

कोणी दलामध्ये, कोणी पाठीशी दुरुन
मनी दुजा भाव जरी एकी बाहेरून
भिन्न विचार अन्य हिशेब करून
जमले हे देख ॥

कसे व्हावे देवा देशाचे या भले
नेतेगण जेथे ऐसे लाभले
फसवणे जनतेला कैसे शोभले
वर्षोवर्षे ॥

## श्रीभगवान उवाच

कळला कौंतेया तुझ्या कथनाचा अर्थ
नको काळ आता दवडण्या व्यर्थ
ओढवेल तेथे ना तरी अनर्थ
जाणसी तूही ॥

एकेकाळी जेथे राज्य आम्ही केले
सुख-समृद्धीचे पाट वाहिले
कथन ऐकूनी उद्विग्न झाले
चित्त माझे ॥

## श्रीअर्जुन उवाच

आता परी देवा तुम्ही करणार काय
सुवर्णनगरी तुमची जरी बुडूनी जाय
पहात रहावे होऊनी असहाय
जनतेसम तेथल्या ॥

## श्रीभगवान उवाच

अनुचित पंडुसुता तुझी ही दृष्टी
एवढ्यासाठीच का निर्मिली सृष्टी
सत्य, शिव, सौंदर्याची केली आम्ही वृष्टी
कारणे हेचि ॥


चल तेथे आपण पुन्हा जन्म घेऊ
परित्राण साधूंचे, मंत्र पुन्हा देऊ
दल यादवांचे स्थापून येऊ
उपाय हाचि ॥

जेथे योगेश्वर, जेथे पार्थ धनुर्धर
ओढवे प्रसंग कितीही दुर्धर
यश त्यांची दासी ज्यांचा निर्धार
इतिहास हाचि ॥


—सतीश कामत

# तुमचे उपग्रह – आमचे ग्रह

भारतीय वैज्ञानिकांचे ग्रह कसे आहेत माहिती नाही. पण त्याचे उपग्रह वाईट असावेत असा आमचा ग्रह झाला आहे ! – **प्रशांत कुलकर्णी**




मला वाटलंच ! गेल्या खेपेला बजावून सुद्धा तुम्ही यावेळीही उड्डाणाअगोदर नारळ फोडायचा विसरलात ना ?




अगदी किरकोळ काम आहे. तिथं फक्त लिहायचं
'पुन्हा अपयश ही यशाची दुसरी पायरी आहे – पंतप्रधान १९८८'




घाबरू नकोस गं ! मी स्वतःच हे तयार केलंय !
थोडं उडून त्या बादलीत पडेल !!





# अशी कुलुपे....












# अशा किल्ल्या....



नाजुक प्रश्नावरील नेहमीची सरकारी —
— आणि गुरुकिल्ली



20 व्या शतकातील आखिल मानव-निर्मीत सुखसोयींची —
ON
— आणि त्यांच्यापासुन सुटकेची किल्ली

# अशी कुलुपे....



प्ले बॉय मासिकाचा फोटो स्टुडिओ


हुदिनीचा टेबल ड्रॉवर


भारतीय आयात धोरण
इतर कंपन्या
रिलायन्स


लक्ष्मण

# अशा किल्ल्या....


'मेड फॉर इच आदर' शेजारी
स्त्रीमुक्तीवादी
नरीमन पॉईंटवरील ऑफिसची–
– आणि त्यात काम करणाऱ्या
अतिमहत्वाकांक्षी अधिकाऱ्यांची–

आणि एक दिवस अचानक
सारा देश दणाणला.
मोठी लाट फुटल्यागत
एकच विषय सारीकडं फुटला :
पैशाच्या लालुचीवर धर्मांतर...

राजन खान

# जातवान





ठणाणा बोंबलत आणि जीव घेऊन धावत रंग्या महारवाड्यात शिरला, 'आरं पळाऽपळाऽऽ...जीव वाचवा अपापला...पळा रं पळाऽ ऽ...'

तिन्हीसांजेला त्याचं असं घसा फोडून बोंबलणं ऐकून, दिवसभर पोटासाठी धावता धावता थकूनभागून नुकतीच निवांत होऊ पहाणारी सारी लोकं मनातनं चरकली. रंग्याची बोंब लोकांचे कान फाडत मनापर्यंत भडली. सर्वांनी आपापले कान टवकारले.

रंग्या महारवाड्याच्या मधल्या पटांगणात पोहोचून, तिथंच थांबून असेलनसेल त्या

दमान ओरडतच होता, 'पळा रं पळा... जीव वाचवा... जीव वाचवा... सार गावकरी जमवाजमव करून म्हाराना माराया हिकडच याया लागल्यात... सान्या म्हारवाड्याला ठोकून काढू म्हन्त्यात... गावकरी लई चिडल्यात... थाबू नका र हित... पळा र पळाऽ ऽ ऽ'

मग मात्र कुणीच थांबलं नाही सान्यानी आपापली खोपट सोडली आणि ते मधल्या पटांगणात धावले

थोड्याच वेळात रग्याभोवती गर्दी जमली. प्रत्येकजण काय झाल, काय झालं म्हणून विचारू लागला एकाच वेळेस सारेजण विचारू लागल्याने सारा कालवा माजला रग्या काय म्हणतोय कुणालाच कळेना. सर्वांच्या कलकलाटात रग्याचा आवाज गडप झाला

शेवटी अमलूला राहावेना, तो जोरात किंचाळला, 'आर गपा, तिच्या बायला तिच्या... त्येच ऐका आदी...'

सारे तोंड दाबल्यागत गप्प झाले

मग अमलून विचारल, 'काय झाल रग्या, जरा बैजवार साग'

रग्या धापा टाकत म्हणाला, 'आर बैजवार सागाया वखत न्हाय. आदी जीव वाचवा आपापला हितन पळा कुठतरी. लपायच पगा सार गावकरी चिडल्यात आपल्यावर...'

'पर का ?'

'कायतरी आदूलन फिंदूलन झाल म्हनी कुठतरी. तवा सारी लोक म्हारामागान्ला मारून टाकत्यात...'

'तुला र कस कळल ?'

'आर म्या पंचातीचा शिपाई हाय पचातीत बैठक झाली म्या सार ऐकल गपचीत. आन् धावत तुमास्नी सांगाया आलो. जीव प्यारा आसल त पळा. न्हायत मराल...'

'का ? त्याच्या काय बापाची पेंड लाग. लीया का कुनालाबी माराया ?' तरण्या रगीचा दिला म्हणाला.

तसा रंग्याचा पोरगाही आवाज वाढवून ओरडला, 'आमीबी काय मेल्या आयचं दूद प्याल्यालो न्हाई. आमीबी लढू त्याच्यासग...'

मग सान्याच तरण्याना जोर आला-लढायची भाषा उच्चारली जाऊ लागली.

रंग्या हादरला. काकुळतीला येत म्हणाला, 'आस काय करू नका रं बाबानू... ते लई हाईत. आपुन थोड तुकड करत्याल रं आपल... मारून टाकत्याल. मोलाम्हागाचा जीव धोक्यात घालू नका र...'

पण रग्याला जाणवल, आपलं कुणीच ऐकत नाही तो अमलूकडं वळला, 'अमलूदा, जरा तूच साग ह्या पोरास्नी...'

अमलू विचारात गढल्यासारखा झाला होता. त्यान काहीतरी निर्णय घेतला असावा. तो घाईघाईत म्हणाला, 'परसंग लई बाका हाय आपुन कमी पडू रग्या म्हन्तूया तस करा. पळा. जावा.' बोलता बोलताच अमलू तिथून पळत सुटला

आणि मग सारेचजण धावाधाव करू लागले पोरलेकर रडू-ओरडू लागली. आयाबाया किंचाळू लागल्या. म्हातारेकोतारे छाती पिटून घेऊ लागले. जो तो स्वतःचा जीव बचावण्यासाठी वाट फुटेल तिकडं पळू लागला एकच कल्लोळ उठला कुणालाच कुणाचा मेळ राहिला नाही

लढण्याची भाषा करणारानी सान्याना अडवण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना कुणीच जुमानलं नाही. शेवटी त्यांनीही ओळखलं की, आपण एकटेच पडू तेव्हा त्याचीही धावाधाव सुरू झाली.

अजिबात चालता न येणारे, खुरडत चालणारे, आजारीपाजारी, खंगलेले असे बरेच म्हातारे होते महारवाड्यात. गोंधळ कसला चाललाय हे त्याच्या लक्षात आलं नाही, पण आपलीच पोरंबाळ, लेकीसुना आपल्याला सोडून पळतायत म्हटल्यावर काहीतरी जीवावर बेतणारं झालंय हे त्यांनी जाणलं आणि मग तेही पळण्यासाठी धडपडू लागले.

त्यातल्या काहीना साधं जागेवरून हलताही येईना. काहीजण तसेच ढुगणावर सरकत खुरडत खुरडत पळण्याचा प्रयत्न करू लागले. पडू लागले. उठू लागले. पुन्हा पडू लागले. ज्याना तेही जमेना ते नुस्तेच रडू ओरडू लागले.

स्वतःचा जीव वाचवण्याच्या नादात काही आयानी आपली कच्ची-बच्ची तिथंच सोडली होती. त्याना हा गोंधळ कळणच शक्य नव्हतं. पण गोंधळाला घाबरून तीही किंचाळत होती. आयांना शोधत होती.

गावाकडून जमावाच्या आरोळ्याचे आवाज ऐकू येऊ लागले आणि थोड्याच वेळात काही म्हातारे कोतारे, काही कच्ची बच्ची लेकरं सोडली तर सारा महारवाडा ओस पडला या उरलेल्याना बाकीची माणसं स्वतःच्या जीवाला जपण्यापुढ विसरून पळून गेली होती

आता महारवाड्यात फक्त बालपण आणि म्हातारपण याचं जास्त बळ नसलेल, जोश नसलेल रडण-ओरडण, एकात एक मिसळून ऐकू येत होतं तेवढीच जाग होती बाकीचे कुत्र्यामाजरासहित परागंदा झाले होते.

¤

थोड्याच वेळात महारवाड्यावर गावकऱ्याची धाड पडली. प्रत्येकाच्या हातात लाठ्याकाठ्या दिसत होत्या. प्रत्येकाचा चेहरा खवळलेला दिसत होता. तोंडातून शिव्यागाळीबरोबर हाणामारीच्या जोरदार डरकाळ्याही गळत होत्या

महारांना शोधण्यात आल म्हातारे कोतारे आणि लहान पोराशिवाय कुणीच सापडले नाही. गावकरी आणखीनच खवळले. मग सापडलेल्यानाच बेदम चोपण्यात आलं लाठ्याकाठ्या, लाथाबुक्क्यानी ठोकण्यात आल

कुणीतरी शक्कल काढली, 'खोपटं पेटवून द्या साल्याची...'

आणि मग थोड्याच वेळात उभा महारवाडा पेटला खोपट भुरभूर जळू लागली. खवळलेल्या लोकानी महारवाड्यात उरलेल्या महारांना आगीत ढकलून दिलं. बच्चे आणि म्हातारे किंचाळत राहिले पण ते किंचाळण जमावाच्या गोंधळात कुणालाच ऐकू गेल नाही

थोड्या वेळानं जळणारांचे आवाज थडावले. पण आगीतून त्याच्या जळणाऱ्या हाडामासाचा 'चर्रचर्र' आवाज बराच वेळ येत राहिला मासाळी दुर्गंधी उठत राहिली.

खोपट नि खोपट, असेल नसेल ते सामान माणसं पेटवून गावकरी अघोरी समाधानात आरडत ओरडत गावाकड परतले.

त्यावेळी वाढत्या रात्रीबरोबर थंडीचा कडाकाही वाढला होता आणि महारवाडा शेकोटीसारखा दिसत होता.

¤

महारवाड्यातून पळून आलेले काही जण

गावापासून अगदी दूर माळावरच्या खडोबाच्या पडीक देवळात दडून बसले होते. काही जण दडायला दुसरीकडे गेले होते. काही जणाचा तपासच नव्हता. कोण जगलं, कोण मेलं याची खबर नव्हती.

या देवळाचा आसरा घेऊन तीन दिवस झाले होते

महारवाड्याकडूनही काहीच खबरबात नव्हती. कुणाकुणाच कायकाय झाल काहीच कळाल नव्हत अजूनही जीवाला धोका होण्याची शक्यता असल्यामुळं कुणी महार-वाड्याकड फिरकून, पाहून यायला मागत नव्हतं. देऊळ सोडण्याची एवढ्यातच कुणाची तयारी नव्हती.

सारे गपचीप, मलूल बसून होते सोबत आलेले म्हातारे ग्लानीनं पडून होते पोरटोरं आयाच्या कुशीतनं झोपून होती. झोपून होती की बेशुद्ध होती हेही कळत नव्हत आया गळाठून गेल्यागत बसल्या होत्या पोरांना पाजायची सुद्धा त्याची तयारी नव्हती. स्तनामधनं दूधच उरल नव्हत. सर्वांच्याच पोटात तीन दिवसात काहीच गेल नव्हतं.

इथं आल्या आल्या तरणी पोर, तालु-क्याला जाऊन पोलिसात कळवू म्हणत होती. पण वयस्करानी त्याला विरोध केला होता. पोलिस गावकऱ्यांचीच बाजू घेतील आणि नतर आपल्यालाच सारा त्रास होईल असं त्याच मत पडलं.

आता ती पोरही भकास चेहऱ्यान गप्प बसून होती.

यानतर काय, हा मोठा प्रश्न होता उत्तर नीटसं कुणालाच सुचत नव्हतं.

¤

उघड्याबोडक्या माळावर दुपार भगभगत होती. अमलू देवळापुढच्या अर्धवट ढासळ-लेल्या दीपमाळेच्या पायापुरत्या सावलीत एकटाच बसला होता. बाकीचे देवळात होते. तरणी पोरं माळावरच कुठं तरी काही मिळतय का ते पहायला गेली होती.

अमलू दीपमाळेवर डोकं टेकवून विचार करत होता, की हे अस कुठवर चालायच ?

तिकडं कुठं कसलं तरी आदोलन पेटलं म्हणे. महारामागानी उठाव केला. त्या आंदोलनाची कुणकुण महारवाड्याला आधीच लागली होती. आणि ते ऐकून प्रत्येकाला धक्काच बसला होता. महारमाग उठाव करू शकतात हे इथल्या महाराना पटायलाच तयार नव्हत

त्यानंतर कळत गेल की, उठावाचा बदला म्हणून गावोगावी महारवाडे, मागवाडे पेटवून देण्यात येतायत. आयाबहिणी सर्वां-देखत नागवण्यात येतायत सर्वांची कोंडी करण्यात येतेय. माणसं जाळण्यात येतायत...

ही नुसतीच ऐकीव माहिती होती. आपल्या गावात तसं काही होईल असं कुणा-लाच वाटत नव्हत. कारण या गावातल्या एकाही महाराचा उठावाशी सबध नव्हता. आपल्याला काही भीती नाही अशा खात्रीत प्रत्येकजण होता.

पण तीन दिवसांपूर्वी ती खात्री फोल ठरली. इथंही घेणदेणं नसताना महारवाड्या-वर हल्ला करण्यात आला. रग्यान त्यादिवशी खबर आणल्याप्रमाणे त्या आदोलनात इथल्या महारवाड्यालाही दोषी धरण्यात आलं. महाराना पळताभुई थोडी करण्यात आली

बरं झालं, रग्यानं त्या दिवशी धावत येऊन सर्वांना सावध केलं आणि लोकाना पळून जाता आल. जर साराच्या सारा महारवाडा लोकांच्या हातात सापडता तर... बापरे ! काय झालं असत, सागता येत नाही...

गेली कित्येक वर्षे हेच भोगतोय महार-वाडा. सुख आणि आनद या दुर्मिळ, ऐति-हासिक बाबी झाल्यायत. महाराच्या गेल्या कित्येक पिढ्याना सुखाचा श्वास माहीत नाही. हाल आणि छळ याशिवाय महारानी काही भोगलच नाही. माणस म्हणून जन्माला येऊनसुद्धा माणस म्हणून ही महार कधी जगलीच नाहीत. तसं त्याना जगू देण्यात आलेलं नाही.

महाराची जागा नेहमी गावकुसाबाहेरच राहिली. गावात उजळ माथ्यानं शिरायची परवानगी त्याना नाकारण्यात आली. विटाळ आणि शिवाशिवीचा *बाऊ दाखवण्यात आला.* साध्या पाण्याच्या घोटालाही त्याना मोह-ताज करण्यात आल. पाणी ही मोठ्यांच्या बापाची मालमत्ता असल्यागत मोठे वागले. रस्त्यावरून जाताना काटयाच्या फादोट्या आणि गळ्यात मडक असले अलकार घेऊनच जावं लागायचं.

महारानी फक्त गुलामी केली. लोकांची मेलेली गुरढोर ओढली. गावाचा कचरा साफ केला मोठ्यांनी सागितलेली कसलीही घाण कामं खाली माना घालून केली. गुला-मानाही एक विशेष दर्जा असतो. वेगळी वागणूक असते. त्याच्याहीपेक्षा नीचपणानं वागवण्यात आल महारांना. कधी काही वर तोडान मागण्याचा प्रयत्न केलाच तर नुस-तेच फटके मिळाले. मुस्कटदाबी करण्यात आली. पोटं नीट अशी कधी भरताच आली नाहीत. भुका नेहमीच पेटलेल्या राहिल्या. महाराच्या आयाबहिणीची पोट भरलीही, पण ती मोठ्यानी केलेल्या बलात्कारातून राहिलेल्या गर्भामुळं. पण तेवढच आया-बहिणीना मनसोक्त भोगून, वर धाकदडप-शाहीन गप्प बसवण्यापेक्षा जास्त किंमत मिळाली नाही. महाराचा विटाळ मानणा-ऱ्याना या आयाबहिणी भोगताना कधी विटाळ झाला नाही.

एकदर महारांना माणसं म्हणून जगता आलेलच नाही. तरी महारं जगतायतच. एक लाजिरवाणी, जीवघेणी, तुच्छ जिंदगी. का जगतायत हा सवाल आहे. पण त्यानी जगू नये का हाही एक सवाल आहे का जगू नये त्यानी ? तीही माणसंच नाहीत का ? असेही आणखी उत्तर असूनही मिळायची तयारी नसलेले सवाल आहेत.

आम्हाला माणस म्हणून जगू द्या, माण-साचा दर्जा द्या, अस म्हणून कुठतरी आदो-लन पेटवण्यात आलय, अस रंग्या सांगत होता. तर ते आंदोलनही म्हणे दडपण्यात येतय. आणि सर्वांनीच महारामागाना ठेचून काढण्याचा विचार चालवलाय. खलास कर-ण्याचा बेत चालवलाय. एका माणसानं दुसऱ्या माणसाकड आम्हाला माणूस म्हणून जगू द्या अस सागण, मागण, जगण्याच्या भिकेची याचना करण हे कुठल्या माणुसकीत बसत? या मोठ्याना महार फक्त कष्टाची काम करायला, भोगायला, माना मोडायला, हुकमाचे ताबेदार *म्हायला* हवी आहेत. पण माणूस म्हणून जगायला नको...

माग पुढारी आला होता. साऱ्या महारा-मागाना जमवून बरच काही सागितल त्यानं. आपण एकजुटीन लढा उभारू, भाडू. जिवाची पर्वा न करता लढू. आपले हक्क मागू... असं बरच घसा ताणून ओरडून सागितलं. पण हे हक्क कसे मागायचे, लढा

कसा उभारायचा हे काही सांगितलं नाही बिचाऱ्यान. फक्त हक्क मागू एवढच म्हणाला आणि कपड्याची कडक खळ सांभाळत निघून गेला पुन्हा काही तोंड दाखवलं नाही त्यान

आम्ही आपले अजूनही हालच भोगतो आहोत. जळतो–मरतो आहोत. यापरती दुसरी गती नाही. महाराच्या खोपटात जन्माला आल की, सटवाई कपाळावर हालाचा, न संपणाऱ्या छळाचा पाढा लिहून जात असावी. त्या छळाना सीमा नाही, मर्यादा नाही

अजूनही आम्हाला ध्यादिवसा आमच्या खोपट्यातन बाहेर काढून बेदम ठोकण्यात येतय हातपाय तोडण्यात येतायत डोळे फोडण्यात येतायत गळे चिरण्यात येतायत आमच्या नजरेसमोर आमच्या लेकीबाळींची आब्रू लुटण्यात येतेय आमच्या कोवळ्या पोरीवर एकावेळेस वीसवीस जण बलात्कार करतायत. इज्जतीच्या अगदी धज्ज्या उडवल्या जातायत. आम्हाला पोटाला काहीच मिळू दिल जात नाही आमची लेकरं अन्नपाण्याविना तडफडून मरतायत...सारे सारे हाल आहेत. तेही माणसान माणसावर केलेले.

याला काहीच इलाज नाही का ? आम्हाला कुणी वालीच नाही का ? आम्ही माणूस म्हणून जगू शकत नाही का ?... आम्हाला आधार, आसरा, संरक्षण नाहीच का ?...का... ?...का ?...का ?...याला, काला काहीच उत्तर नाही का ?...

विचार करून अमलूच टाळक फाटायची वेळ आली. प्रश्नाचे अणकुचीदार दगड त्याच्या मेंदूवर बरसू लागले. त्यात पोटाचा रिकामा, उपाशी खड्डा आतून कलकलू लागला. घसा कोरडा झाला आवंढा गिळता येईना...हातपाय थडथड उडू लागले...

तो जीव खाऊन तटकन् उठला. ताठ उभा राहिला आणि माध्यान्हीच्या तळपत्या सूर्याकडं पाहू लागला. पण डोळे सूर्याचं तेज सहन करू शकले नाहीत. नजर आपोआप झुकली. डोळ्यासमोर काळीकाळी वर्तुळं फिरू लागली

त्या वर्तुळामधूनच अचानक अमलूच्या नजरेन दूरवरची कसलीतरी हालचाल टिपली गावाकडच्या बाजून देवळाच्या दिशेन कुणीतरी येत होत. येणारी आकृती एकटीच होती. पण ओळखीची वाटत नव्हती.

अमलून तोंड माग वळवून देवळातल्यांना इशारा केला, 'कुनी तरी येतय रं सावध ऱ्हा...'

देवळातले श्वास रोखले गेले.

¤

ती आकृती जवळ आल्यावर अमलूनं ओळखलं. तो सत्तार होता!

सत्तार गावात शिंप्याचा धंदा करायचा पण धंद्याकड जरा कमीच लक्ष असायचं त्याचं त्यापेक्षा इतर उचापती, गावचं राजकारण या गोष्टीची जास्त आवड होती त्याला. विशेष म्हणजे जातीचा पक्का मुसलमान होता तो. धर्माची निशाणी म्हणून छोटीशी बोकडदाढीही राखली होती त्यान.

अमलूच जसं त्याच्याशी मित्रत्व नव्हतं, तसच शत्रुत्वही नव्हतं संबंध यथातथाच होते. एकमेकांची ओळख होती. पण एकमेकाकड जाण्यायेण्याइतपत नाही

सत्तार इकड कशाला येतोय हे अमलूला कळेना तो निश्चित कशासाठी येतोय हे माहीत नसल्यामुळ त्यान देवळातल्याना सावध रहाण्याचा इशारा केला होता. काही धोका आहे असं वाटलं असतं तर अमलूच्या इशाऱ्यावर सर्वजण देवळाच्या मागच्या खिडारान मागच्यामाग पळून गेले असते. अमलू एकटा अदाज घेण्यासाठी तसाच दीपमाळेच्या आधारान उभा राहिला

अमलूनं सत्तारच्या माग दूरवर नजर दौडवली. दुसरं कुणी त्याच्या पाठोपाठ येतय का पाहिल कुणीच नव्हत मग अमलून आपली सशयित नजर सत्तारवर रोखली. सारे मिळून एकट्या सत्तारला सहज कच्चे खाऊ शकतो याची त्याला थोडी खात्री आली. त्यामुळं त्याची भीती कमी झाली. तो नेहमीसारखा झाला आणि हळूहळू सरकत दीपमाळेच्या पायाशी बसला.

सत्तार जवळ आला. आवाजाच्या अंदाजात येताच सत्तारनं हात उंचावून अमलूला सलाम केला, 'सलाम अमलूभाय...'

अमलू थोडावेळ गप्पच राहिला. मग कोरड्या आवाजात म्हणाला,

'सलाम...'

'मला वाटलच व्हतं...तुमी लोक हितंच असनार म्हनून...'

'का ?'

'न्हाय...' अमलूच्या अगदी समोर येत सत्तार म्हणाला, 'म्या आपला एक अदाज केला...'

'कसला ?'

'हेच की, तुमी हित असल्याचा...'

सत्तार अमलूच्या समोरच दीपमाळेच्या अपुऱ्या सावलीत कसाबसा टेकला. अमलूनं अग चोरलं. त्याला कळेचना की, हा स्वतःचा धंदापाणी सोडून एवढ्या आडवाजूच्या माळरानावर का आलाय ते

तेवढ्यात सत्तारच म्हणाला, 'म्या तुमास्नीच भेटाया आलो...'

'आं का ?'

'सागतो, सागतो...' त्यानं खिशात हात घातला. बिडी बडल, काडेपेटी बाहेर काढली, 'आदी बिडी घ्या...'

अमलू थोडावेळ तसाच स्थिर.

'घ्या...' सत्तारनं बिडी अगदीच पुढं धरली अमलूला नाही म्हणवेना. त्यानं बिडी घेतली सत्तारन स्वत च्याही जरड ओठांत एक बिडी दाबली. आणि फरंकन् काडी ओढ़न, एकाच काडीवर दोघांच्या बिड्या पेटवल्या. एकदोन जोरदार झुरके मारले. फकाफका धूर सोडला. तीन दिवसाच्या निखळ उपाशी अमलूला बिडीचे झुरके जरा बरे वाटले. वरून तापलेल्या उन्हातही तो दमादमानं बिडी ओढू लागला.

सत्तारन स्वतःची बिडी दोन बोटाच्या बेचक्यात अडकवून अमलूसमोर धरली. आणि अचानक बोलला, 'ह्या बिड्या जळाया किती देर लागते...'

'म्हजी ?'

'वखत, वखत किती लागतो...'

अमलू बावचळला. इथं बिड्या जळण्याचा काय संबंध ?

स्वत ची बिडी अमलूसमोर नाचवत सत्तारन पुन्हा विचारलं, 'सागा की, किती वखत लागतो ?'

'लागत आसंल चारदोन मिलटं...'

'ह. चार आन् दोन मिलटं म्हजी मिळून झाली सहा मिल्ट... झाली का न्हाय...?'

'तर सागायच म्हजी, त्या लोकानी तुमची ख्वापटं होच्यापरासबी कमी वखतात जाळ्ळी...' सत्तारनं चुटकी वाजवत बिडी-

वरची राख झाडली.

अमलू हादरला. कधी सत्तारचं तोंड तर कधी त्याच्या हातातली जळती बिडी पहात राहिला.

सत्तारच म्हणाला, 'गवताच कस्तान जाळळ्यागत तुमची खोपटं जाळ्ळी बगा लोकानी...'

'काय ?'

'न्हय, खर तेच सागतूया तुमी पघायला न्हाय गेले ?'

अमलून नकारार्थी मान हलवली.

'जाऊन पघा राखच्या ढिगान्याशिवा काय बी उरलं न्हाय तिथ. सापडतील ती मान्संबी ढकलून ढकलून जाळ्ळी. शेरडा-बकराचा तर नुस्ता कोळसा झाला. शिलकीला काय ठिवलच न्हायी...'

अमलूच्या तोंडाचा आपोआप आँ वासला हृदय लक्कन हालल त्याच

'अवो म्या खर तेच सागतूय लई खराब हालत झाली म्हारवाड्याची. तुमी लोक पळालं म्हणून बरं, न्हायत तुमचबी कोळसच झाल असत. होत्याच न्हवत झाल असत ..'

अमलू शहारला. दोन्ही हात उचलून त्यान आपल डोक आवळून धरलं काय बोलावं सुचेनाच त्याला.

सत्तारच बोलत होता, 'देशोधडीला लावल बगा त्यानी तुमाला परत जर तुमी लोक गावात शिरले तर म्हन जीव घेऊ एकेकाचा...'

'खर ...?'

'देवाची कसम...' सत्तारन स्वत.च्या गळयाच कातड चिमटीत पकडल. अमलूचे हातपात थरथरू लागले.

'ह्ये काय खर न्हाय राव, काय घेन्यान्-देन्याचं ही लोक तुमास्नी तरास देत्यात बगा. असा काय गुन्हा केलाय तुमी लोकानी आ? काय गुन्हा केलाय का ?'

जवाब दिल्यागत अमलून नकारार्थी मान हलवली.

'मग का तरास देत्यात तुमास्नी ? का देत्यात ?'

'काय कळना...'

'कस कळनार ? आर जवा कायच गुन्हा न्हाय त कसं कळणार... पर अमलूभाई, 'ही आपल्याला काय पसत न्हायी बरका...' सत्तारन आपली मान उडवली

अमलू घुम्यागत बसून राहिला

'तुमा लोकाच जगन मुश्किल हाय बगा... ही लोक तुमास्नी जगू देनार न्हायीत...'

'आत्ता र...'

'त्येच इचाराया हितवर आलो न्हव का म्या !' सत्तारन तिथं येण्याच कारण उघड केलं, 'आत्ता फुडं काय करनार तुमी लोक ?'

अमलू विचारात पडला, खरंच काय करायच पुढं ? कस जगायच आपण ?

सत्तारन बिडीचं थोटूक शेजारच्या दगडा-वर चुरगाळलं आणि तो सागू लागला, 'ती लोक तुमाला नीट जगू देत्याल अस न्हाय वाटत बाबा तुमच्या रगताचीच तहान लागलीया त्यान्ला कुठवर तुमी लोक आसच पिचत न्हानार रं अमलू ? आरं, तुमी एकाच जातीची मान्स ना ? आन तुमच्याच जातीत तुमाला किमत न्हायी आर, मान्साला मानूस म्हणून जगू देत न्हायी ती काय जात म्हनावी का ? तुमालाबी त्याच्यागत हातपाय हायत, नाकडोळ हायत तरीबी ह्यो परका भाव का र ? का तुमच्यामाग ह्येंची साडेसाती लागलीया...

'न्हायत आमची जात बग, कदी दिसल तुला आमच्या जातीच्या एका मान्सानं दुसऱ्या मान्साचा गळा धरलाय म्हनून ? कदी एकमेकाची घर जाळल्याली पघतली तू ?...'

'न्हाय...'

'आमच्यात कंदी आपल्याच मान्सास्नी वाळीत घातल्याल पधीतल तू ?'

'न्हाय...'

'आमच्यात शिवाशिव, इटाळ दिसला तुला...'

'न्हाय...'

'आरं हायच तशी आमची जात श्यानी. कशी एकीन न्हाती सुखान नादती. कुनाची खिटखिट न्हाय. झिगझिग न्हाय. खावोपिवो मजा करो. बास, जातभेद न्हाय न् काय न्हाय. सारे सारखेच. कुनी खालचा न्हाय. कुनी वरचा न्हाय. कस्स ?'

'खर हाय.'

'हाय ना ? मंग ! आर मुसुलमान मन्त्यात आमाला...'

सत्तार अमलूला हळूहळू एकेरीवर सबोधू लागला होता. अमलूही एकेरीवर आला. त्यान हळूच विचारल, 'आरं पर म्या ऐकलया की तुमच्यात बी दोन भाग हाईत म्हनं...?'

अमलूच्या अशा प्रश्नावर सत्तार थोडा चमकला. पण स्वत ला सावरत म्हणाला, 'हा... हा... दोन भाग हाईत र. पर ते धर्माचं न्हाईत धर्म एकच हाय. दोन भाग हाईत त्ये...' पण पुढ सत्तारला काय बोलाव त्ये नीट सुचलच नाही.

त्यान पटकन पुन्हा खिशात हात घालून बिड्या उपसल्या. अमलूपुढ एक धरली स्वत च्या तोंडात एक कोबली. बिड्या पेटल्या. धूर सुटला आणि या वेळात सावरून घेतलेला सत्तार स्वतःच समर्थन केल्यासारख म्हणाला, 'हाईत म्हना आमच्यातबी दोन भाग न्हाय अस न्हाई पर त्येच्यात तरी भाडण झाल्याली तू ऐकल्यात का ?...'

'न्हाई...'

सत्तारला पुन्हा उत्साह आला, पण मनातन मात्र तो थोडा मागच सरकला होता

त्यानही ऐकल होत की, मुसलमानाचे दोन भाग आहेत म्हणून एक शिया, एक सुन्नी या दोन्ही भागातून जळता विस्तव जात नाही. दोघाचे धर्मनियम वेगवेगळे आहेत अशी त्याला ऐकून बरीच माहिती होती सत्तार स्वत सुन्नी होता, पण अजून-पर्यंत त्यान एकदाही शियाचा एकही माणूस पाहिलेला नव्हता ते कुठ रहातात, कसे रहा-तात वगैरे माहिती त्याला अजिवात नव्हती.

या माळरानावर सत्तार ज्या कामासाठी आला होता, त्या कामात अमलू असा काही प्रश्न मधेच उपटून काढील अशी त्याला आधी कल्पना नव्हती. अमलूला आपण बोल-ण्यात गुंडाळू शकतो असा सत्तारला अजूनही विश्वास वाटत होता, पण अमलूचा प्रश्न त्याला स्वत लाच डाचू लागला.

त्यान मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला आपल ज्ञान खूपच कच्च आहे याची त्याला जाणीव झाली. आपण हे कालच मिर्झासाहेबाना विचारायला पाहिजे होतं अस वाटलं त्याला. पण हाच प्रश्न समोर येईल अशी काय त्याला माहिती होती ? तो फक्त मिर्झासाहेबानी जेवढ सागितल, त्याचीच तयारी करून आला होता अमलूला भेटायला...

□

काल मिर्झासाहेब आले होते गावात. जोहरच्या नमाजच्या वेळेस जमातसमोर त्यानी आपल्या धर्माबद्दल तकरीर केली होती त्यानी साऱ्या जमातला आपल्या मुसलमान धर्मावर दुसरे धर्म हल्ले कसे करतात, आपल्या धर्माला खलास करायला कसे पहातात, हे पटवून देण्याचा प्रयत्न केला, आपला धर्म धोक्यात असल्याच सांगितलं.

त्याची तकरीर ऐकून सारी जमात हादरली होती. जमातला ही माहिती नवीनच होती.

हे गाव छोटस होत गावात मुसलमानाची घरही थोडीशीच होती. दुसऱ्या जातिधर्माच्या लोकाची घर मात्र बरीच होती. तरीही सार कस सुखान चालल होत. शाततेन चालल होत मुसलमान वेगळे आहेत अस इतराना वाटत नव्हत आणि इतरही वेगळे आहेत असं मुसलमानाना वाटत नव्हत कुणाची कसलीच भाडण नव्हती एकमेकाबद्दल तक्रार नव्हती सारं एकोप्यान चालल होत गावकी सहकार्यान चालली होतो

पण काल मिर्झासाहेबाची मशिदीत तकरीर झाली आणि गावातल्या मुसलमानाना वेगळयाच गोष्टी ऐकायला मिळाल्या त्या ऐकून सर्व जमातवाले अवाक् झाले अगदी

तरीही पजगाना नमाजी असलेल्या जब्बार काझीन मिर्झासाहेबांना आडव लावण्याचा प्रयत्न केलाच होता, 'पन मौलानासाब, हमकू तो ऐसा किदरच दिखता नय, हिंदू मुसलमानके उदर किदर झगडे हुतेय सो सुनेय हमने, पन हमारे गावमें ऐसा कुच हता नय. होनेवालाबी नय, सब लोक ह्या भाईभाई के जैशे–हैते...'

जब्बारचं बोलण ऐकून मिर्झासाहेब थोडे चिडल्यासारखे झाले. पण तरीही शातपणे म्हणाले, 'क्या नाम फर्माया आपने ?'

'आँ ?'

'मै पूछ रहा हू, आपका नाम क्या है ?'

'जब्बार काझी...'

'क्या काम करते है आप ?'

'गावके बकरे काटता मै मुलानी है मै ह्या का... '

'हा, [तो जब्बारभाई, आपने यह गाव कितनी दफा छोडा है, यानेके मै पूछ रहा हू आपने कितनी दुनिया देखी है ?'

'गाव छोडनेकी जरूरतच नय पडी देखो अब्बीतक जनम व्हयपाशे मै इस तालुकेके बाहेर नय पडेला...' जब्बार भोळेपणान म्हणाला पण त्याच म्हणणं खरं होत गाव सोडून बाहेर जायची त्याला आजपर्यंत गरजच पडली नव्हती गेलाच कधी तर बाजारहाटासाठी तालुक्याच्या गावी जाऊन येत होता फक्त

'तो जब्बारभाई...' मिर्झासाहेब आपली अर्धी काळी, अर्धी पाढरी दाढी कुरवाळत आणि घट्ट फुगलेली गर्दन वरखाली नाचवत म्हणाले, 'मैने आपसे जियादा दुनिया देखी है। पूरा हिंदोस्ताँ घुम आया हू मै, और अब भी घुम रहा हूं और अबतक सात बार हजका सवाब पाया है मैने, परवरदिगारने चाहा तो अगले रमजानमे आठवी बार हजको जानेवाला हूं...'

ऐकणाराचे डोळे विस्फारले. सात वेळा हजला जाऊन आला हा माणूस ? कमाल आहे ?

लोकाचा आश्चर्याचा भर ओसरण्याच्या आतच मिर्झासाहेबानी आपला खर्जातला आवाज पुन्हा टाकला, 'और मै असलमें मौलवी हू। लोगोको दिनी तालीम देना मेरा काम है। मै दुनियाके हर मुल्कमें घुमता हू। वहाँके मुसलमानोसे मिलता हू। सारी दुनियाकी खबेर मुझतक आ पहुचती है। और इन खबरोसे मै समझ सकता हू की, आज मुसलमानोकी हालत क्या है, कैसी है...' एवढ बोलून मिर्झासाहेबानी पेटवून द्यायची असल्यागत जमातलाच विचारल, 'अब आपही बताईये जमातवालो, की जिन्होने कभी अपना गाव तक छोडा नही, उन जब्बार भाईसाहबको दीनके बारे में जियादा मालूमात है या मुझे ?

मिर्झासाहेबानी असा सरळच सवाल टाकल्यावर सारे जण जब्बारवर खवळले. सर्वांनाच मिर्झासाहेबाची बाजू पटली.

केवढा मोठा माणूस मिर्झासाहेब ! जो जग फिरून आलाय, सात वेळा हजला जाऊन आलाय. मुसलमानांना सुधारण्यासाठी हा वणवण फिरतोय...

आणि अशा मोठ्या माणसाला या जब्बारन, ज्यान कधी गाव सोडलेल नाही, ज्याला बकरी कापण्याशिवाय दुसर काही माहीत नाही, अशा जब्बारन आडव लावाव? या गावातल्या जमातची इज्जत घालवावी ?

सारेजण जब्बारवर उखडलेच. त्याला वेअक्कल आणि अडाणी म्हणू लागले. एका-दोघानी, तुला जास्त कळत का मिर्झासाहेबाना जास्त कळत, असही विचारल. तू पजगाना नमाजी कसला, ढोंगी आहेस, असही म्हणून घेतल

सारी जमात एका बाजूला आणि एकटा जब्बार एका बाजूला पडले. जब्बारच तोंडच उतरलं त्यानं मान खाली घातली.

बाकीचे आपल घोडं दामटतच राहिले. त्या साऱ्याना मिर्झासाहेबाच मोठेपण मान्य झाल कितीही केल तरी जब्बार एक खेड्यातला अडाणभोट माणूस मिर्झासाहेब म्हणजे मौलवी जग फिरून आलेले सात वेळेला हजला जाऊन आठव्या वेळेची तयारी करणारे. असा माणूस काय साधासुधा असणार? या जब्बारला काही कळतच नाही कुणाशी कस बोलाव याची अक्कल नाही वर तोडान सागतोय कसा, म्हणे या गावात सर्वजण भावाभावासारखे रहातात ... अरे येडचा त्याना जास्त समजत, का तुला ? कुठही उचलली जीभ लावली टाळ्याला...

जमातमधली एकतर्फी भाडाभाडी मिर्झासाहेब मद हसत तसेच पहात राहिले.

जमातच्या मुख्य असलेल्या उस्मानचिचानं शेवटी मिर्झासाहेबाना सागितलं, 'मौलानासाब, तुम जब्बारके तरफ ध्यान मत देव. उसकू कुच समजता नय...'

पण मिर्झासाहेब दयाळू आवाजात म्हणाले, 'नही, जब्बारभाईपर गुस्सा होनेकी जरूरत नही उन्हें दुनियाकी आजकी हालत मालूम होती तो वे ऐसी बाते न करते दुनियामें सब तरफ मुसलमानोंको दबाने की, पीछे रखने की कोशिशे जारी है. जब्बारभाई भी देखे अनदेखेपनमें दब गये है. लेकिन वे हमारे भाई है सच्चे भाई. दुनियाका हर मुसलमान एक दुसरेका सच्चा भाई है. और जब एक भाई कोई छोटी बडी गलती कर लेता है तब दुसरे भाईका फर्ज है की भाईकी गलती मुआफ करे उसे समझाये और अपने नजदीक ले...'

मिर्झासाहेबाचं बोलण ऐकून जमातवाल्यांच्या हृदयात आदराच भरतं आलं. खरच, खूप मोठा माणूस आहे हा. तेवढच त्याच मनही मोठं आहे. जब्बारन आडवं

लावल तरी या माणसाला राग आला नाही. याला म्हणतात माणूस जब्बारचाही चेहरा खुलला. खट्टूपणा सपला.

मिर्झासाहेबांनी आपला विषय पुढ लावून धरला, 'तो, अभी अभी जब्बारभाई जो कुछ कह रहे थे की, हमारे गावमें सब धरमो मे भाई भाई का रिश्ता है,' वगैरा वगैरा... ये सब झूट है. ये भाईचारेका सिर्फ दिखावा हैं. असली भाईचारा नही. हर मुसलमानके लिए दुसरे जातीके लोगोके दिलोमें नफरत है नफरतके सिवा कुछ नही. यही उनके दिलोमें छुपी नफरत एक दिन हम सब मुसलमानोको डुबो देगी. हम कहीके न रहेंगे...'

अचानक मिर्झासाहेबाचा सूर दाटून आला 'हम सब मुसलमानोको खतरा है मेरे भाईयो. इस्लाम खतरेमें है दुसरे धरमोके लोग इस्लाम का नाम इस दुनियासे मिटाना चाहते है खत्म कर देना चाहते है हमारे दीनको...'

पुन्हा आपला आवाज त्यानी करारी केला, 'लेकिन हम ऐसा नही होने देंगे हम काफिरोका सामना करेंगे. मुकाबला करेंगे... खून बहायेंगे लेकिन इस्लामको बचायेंगे...'

थोडा वेळ ते थावले. या गावढ्या गावातल्या हादरलेल्या जमातवाल्याचे चेहरे न्याहाळत राहिले थोडा वेळ पूर्ण मशिदीत सन्नाटा दाटून राहिला. प्रत्येकजण श्वास रोखून, फाटल्या डोळ्यांनी मिर्झासाहेबाचं तोड पहात होता

मग सन्नाटा फाडत मिर्झासाहेबाचा आवाज पुन्हा घुमला, 'आज इस्लामकी आवादी बहोत कम है. और काफिर जियादा है. उनकी तादात बहोत है वे हमें दिलमें आये तब काटके रख सकते है. मार सकते है...'

साऱ्या जमातीच्या अगावर शहारे उठले खरच असं होईल ? बापरे ! मग ?

मशिदीच्या एका कोपऱ्यात बसलेल्या सत्तारनं हळूच विचारल, 'ऐसा नय हुना करके क्या करने मंगता मौलानासाव ?'

मिर्झासाहेब डाव टाकल्यागत म्हणाले, 'है, इसके लिये भी बहोतसे रास्ते है...'

'कोनसे ?'

. 'बताता हू, बताता हू. पहले मैं आपसे एक सवाल पूछता हूं उसका जवाव आप लोग बरावर दे...'

सर्वांची उत्सुकता ताणली गेली

'समझ लो की एक गाव है और उस गावमे दो टोलीयां है. एक टोलीमे सत्तर लोग है और दुसरे टोलीमें तीस लोग है. एक दिन ये दोनो टोलीयाँ आपसमे लडनेके लिये आमनेसामने खडी हो जाती है. अब बताओ की, जब लडाई शुरू हो जावे तो दोनोमेसे कौनसी टोली जीतेगी ?'

प्रश्न सोपा असल्यान बऱ्याच जणानी एकदमच लहान् पोरासारख उत्तर दिल, 'सत्तर आदम्यानकी टोली जितिगी.'

'हां, वराबर कहा अपने...'

ज्यानी ज्यानी उत्तर दिल होत, त्याच्या तोंडावर समाधान झळकल

मिर्झासाहेब आपली उजवी तर्जनी नाचवीत म्हणाले. 'सत्तर लोगोवाली टोली जीतेगी... आज अपने यहां भी ऐसीही हालत है. दुसरे धरमोके लोग यहा बडी तादातमें है. लेकिन मुसलमान बहोत कम. दुसरे धरमोके सत्तर होवे तो मुसलमान सिर्फ तीस है ऐसे हालातमें कोई छोटी टोली, बडे टोलीसे कैसे टक्कर ले सकती है ? नही ले सकती... इसके लिये चाहिये की, दोनो टोलीयाँ एक जैसी हो, बराबर हो. दोनो टोलीयोमें पचास–पचास तो लोग होही... या ऐसा सोचिये की, अपनी, मुसलमानोकी टोली बडी हो. मजबूत हो. तब कही जाकर, हम यहा डटकर काफिरोका सामना कर सकते है चैनसे जी सकते हैं... हमारा खतरा टल सकता है. इसके लिये यहा मुसलमानोकी आबादी बढनी चाहिये. आज तीस है तो कल पचास होने चाहिए...'

सर्वांपुढ प्रश्नचिन्ह निर्माण झाल की, आत्ता ही आवादी कशी वाढणार ? एवढी आवादी एकदम कशी पैदा करायची ? आज तीस असलेली लोक उद्या पन्नास कशी करायची ?

पण एक बात खरी की, मिर्झासाहेबाचं वोलणं सर्वांना पटल एकदम पटल एवढ्या मोठ्या माणसाच बोलण पटलंच पाहिजे. न पटून कस चालेल ? आवादी वाढलीच पाहिजे... पण कशी ?

उस्मानभाईन पुन्हा विचारल, 'पन कैशी बडनेकी आवादी ?'

'बताता हूं, वह भी बताता हूं...' मिर्झासाहेव हाताच्या पज्यानी सर्वांना थाबवत असल्यागत करून म्हणाले, 'आवादी बढना तो वैसे मुस्किल वात है. फिर भी हम कोशीश तो जरूर कर सकते हैं... अभी अभी मैंने कहा था की अपने सामने सत्तर लोगोकी टोली है इस टोलीकी आजकी हालत ऐसी है की, यह लोग आपसमेही लड-झगड रहे हैं. इन लोगोमे झगडा ऊंचनिच का है अपने आपको ऊचे समझनेवाले इस टोलीमे पचास लोग है. और, नीच, पिछडे समझे जानेवाले लोग बीस है. इन लोगोमे आपसी मेल नही हैं. ये पचास लोग बाकी बीस लोगोको हमेशा अपने दवावमें रखना चाहते है. चाहे डरा धमकाकर. चाहे मार काटकर इससे वे बीस लोग बहोत नाराज है. दुखी है. वे अपने आपको बेसहारा समझते है क्यों न हम इन बेसहारा लोगोको सहारा दे आसरा दे वे जो बीस लोग है उनको अपनी तरफ करलें...'

सर्वांना आश्चर्य वाटलं.

मिर्झासाहेब आणखी सोप्यात म्हणाले, 'वे बीस लोग हमारी टोलीमे आ जाये तो कितने होगें हम ?... पचास होगे. हमभी पचास. सामनेवालेभी पचास. तब जाकर दोनोकी बराबरी होगी ..'

लोकांच्या तरीही लक्षात येईना...

मिर्झासाहेब आणखी सोप्यात शिरले, 'आजकल तुम्हारे इलाखोमें हिंदू हिंदुओके जोरोके झगडे चल रहें है...बडे जातवाले हिंदू, छोटे जातवालोपर तकलिफोकी बौछारे कर रहे है, अपनेसे अलग समझ रहे है उन्हें, उनके घरवार जला रहे हैं. वगैरा, वगैरा... हम उन्ही छोटे जातवालोंको हमारे नजदीक करेंगे, अपनायेंगे. उन्हे सहारा देंगे. अपने भाई बनायेंगे. वे लोग अनाज और इन्सानियत, दोनोके भूखे है हम उनकी यह जरुरतें पूरी करेंगे. उनको इस्लाममें जगह देंगे मुसलमान बनायेंगे...'

सर्व जमातवाले हादरले. हा वेगळाच प्रकार कळत होता सर्वांना. कोपऱ्यातला सत्तार अनाहूतपणे पुढे सरकला.

लोकाच हादरण लक्षात घेऊन मिर्झासाहेब म्हणाले, 'यह कोई अचरज की बात नही. पूरी दुनियायें यह चल रहा हैं. बहोतसे लोग इस्लाममें आ रहे हैं. जो लोग अपने धरमोसे दुःखी हैं उन्हें इस्लाम साथ दे रहा

हैं. और क्यों न दे ? हमारी आबादी और धरमोंके मुकाबले में बढना आज बहोत लाजीमी और जरुरती हो गया है.

लोग इस्लाममें आ रहे हैं, क्योंकि आज दुनियामें सबसे अच्छा, सच्चा, इमानदार दीन इस्लामही है. इस्लाम के रुकूक याने कानून सबसे ऊंचे हैं. मैं आपको बता दूं की, आज दुनियामें हर मुल्कके कानून और कायदे इस्लामके कुरानेशरीफ और हादीसके मुताबीक बनाये गये हैं, हर मुल्क कुरानेशरीफके आसरेपर चलता है. इतना इस्लाम उंचा है. इसलिये बहोतसे लोग इस्लाम मंजूर कर लेते हैं.

जहां इस्लाम नहीं पहुंचा वहां खिरिश्चन पादरी पहुंच जाते हैं. और इन दुखी लोगोंको लालच से अपने धरममें खिचते हैं... हमभी वहीं कर रहे हैं. इसमें नई बात नहीं है...'

'पन वो लोक कैसे आयिंगे अपने तरफ...' उस्मानचिचा.

'आं, हां, वे लोग नहीं आयेंगे अपनी तरफ...'

'फिर ?'

'हम लोग उनकी तरफ जायेंगे. उन्हें समझायेंगे. लालच दिखायेंगे. उन्हे अनाज देंगे. कपडा देंगे. रहने के लिए जगह देंगे. आसरा देंगे. जो जो जरुरतें होंगी, वो वो देंगे. और सबसे बडी बात यह है की, हम उन्हें इन्सानके नामसे दुनियामें जिनेका मौका देंगे. उन्हे नीचसे ऊंचा उठायेंगे...'

थोडावेळ मशिदीत शांतता पसरली. मिर्झासाहेबांना वाटलं की, या खेडवळ मुसलमानांच्या लक्षात अजूनही ही गोष्ट नीटशी आलेली नाही.

'देखो, मैं सिधीसी बातमें बताता हूं... तुम्हारे गांवके हिंदुओंमें झगडे हो रहे है. ऊंचे लोग, नीचेवालोंको दबोच रहे हैं. एक-दोन दिन पहलेही यहांपर धेडोंके घर जलाये ग़ये हैं. कुछ आदमी भी मार दिये गये. कुछ लोग डरकर भाग गये हैं. हमें उन्हें ढूंढना चाहिये. उनकी तरफ दोस्तीका हाथ बढाना चाहिये. और धीरेसे उनके कानोंमें इस्लाममें आनेकी शिफारिश करनी चाहिये. वे डरे घबराये लोग झटसे हां कह देंगे. उन्हें इस्लाममें लेने का अगला इंतजाम मैं करूंगा. मौका एक बारही आता है. दुबारा नहीं. लोहा गरम है तब तक हतौडा मार दो...'



'ये हुयींगा ऐसा लगता नय मौलानासाब...' स्वतः उस्मानचिचानं पहिल्यांदा विरोध केला.

'क्यों ?' मिर्झासाहेबांच्या भिवया ताणल्या गेल्या.

'कोनसाबी आदमी लगेच अपना धरम छोडनेकू तय्यार नय हुता...'

हे खरं होतं. कुठलाही माणूस लगेच आपला धर्म सोडायला तयार होत नाही.

मिर्झासाहेब थोडे वैतागले, 'मेरी अबतककी बातोंपर आप पानी फेर रहे हो उस्मानभाई. मैंने आपको अभी बताया था क़ी, ये लोग डरे हुये हैं, उन्हें आसरेकी जरूरत है. वे अपनीही कौमसे अपनेही धरमसे सख्त नाराज हैं. हमें इसी बात का फायदा उठाना है. उनके दिलका डर निकालना है. उन्हें आसरा देना है... यह बात थोडी मुश्किल है यह मैंभी मानता हूं. लेकिन थोडा पैसा फेको और थोडे इन्सानियतके अल्फाज मुंहपर दे मारो, तो दुनिया की कोईभी मुश्किल दूर हो सकती है...'

मशिदीच्या छताला टांगलेल्या झुंबरावर पंख साफ करत बसलेली एक चिमणी अचानक उडाली आणि चिवचिवत बाहेर पडली. मशिदीत थोडा वेळ नेहमीचा सन्नाटा. एवढी माणसं एकत्र येऊनसुद्धा सन्नाटा.

'देखो...' पुन्हा मिर्झासाहेब, 'दुसरी कौमका कोईभी शख्स् इस्लाममे आनेके लिए वैसेही आना चाहे तो ठीकही है. लेकिन वह न माने तो उसे कुछ लालच दिखाया जा सकता है, जैसेके पैसा, मकान वगैरा, वगैरा... पैसा गरिबोंकी कमजोरी होती है, हम वह पैसा भी दे सकते है. इस्लाममें आनेवाले शख्स्को हम उसका भाव दे सकते हैं... तुममें से कोईभी इन लोगोंसे मिलकर उन्हे समझाकर इस्लाममे आनेके लिये राजी कर सकता है. ऐसा इन जमातमें कौन है ? जो हमारा साथ दे, इस्लाम का साथ दे...

जो कोई ऐसा होगा, हम उसकाबी भला कर देंगे...कोई है ऐसा...?'

सारेजण एकमेकाकडे पाहू लागले कोण करणार हे काम ? दुसऱ्या लोकाना आपल्या धर्मात आणावं हे तस अजूनही बहुतेकाना पटत नव्हत. सारेजण तसेच घुम्यागत बसून होते.

मिर्झासाहेबानी पुन्हा डिवचले, 'भाईयो, इस्लाम खतरेमे है, अपना दीन बचाना हो तो यह करना जरुरती है... यह काम करके आप इस्लामकी जान बचा सकते है आपके इस जमातमें ऐसा कोई नही जो इस्लामकी मदद करे ? अपने पैगबरोने चाहा था की इस्लाम बढे तुममें कोईभी ऐसा नही, जो पैगबरोकी चाहतोकी मदद करें...?'

एवढा वेळ सत्तार चुळबुळत होता. त्यान झटकन हात वर केला, 'मैं हय...'

मिर्झासाहेबाच्या तोडावर समाधान पसरले, सर्वांनी वळून सत्तारकड पाहिले मिर्झासाहेब कौतुकान म्हणाले, 'है, आपके भी जमातमें एक असली मुसलमान है...'

त्याच्या बोलण्यात बाकीच्याना जोडा मारला गेला. बऱ्याच जणाच्या लक्षात तो आला नाही सत्तारची छाती थोडी फुगली.

'आपसे मैं अकेलेमे बात करना चाहूंगा' मिर्झासाहेबानी सागितल आणि आपली तकरीर सपवली

मग सर्वांनी मिळून अल्लाजवळ या कामात यश देण्यासाठी दुवा मागितली

सारी जमात उठून गरगरत्या टाळक्यान आणि गभीर तोडान मशिदीबाहेर पडली. बाहेर पडून आपापल्या उद्योगाना लागली.

माग मशिदीत फक्त तिघच उरले एक मिर्झासाहेब, दुसरा सत्तार आणि तिसरे इथले, या मशिदीचे मौलाना अबुबकरसाहेब.

'हमें तुमपर नाज है...' मिर्झासाहेबांनी सत्तारच्या पाठीवर थोपटल. सत्तारला अभिमान वाटला

मग सरळच मिर्झासाहेबानी विषयाला हात घातला. 'हमें यह काम जल्दसे जल्द कर देना चाहियें, हम अपनी कौममें आनेवाले हर आदमीके पिछे कुछ ना कुछ रकम जरूर देंगे। तुम्हे भी थोडा बहुत कुछ मिल जायेगा । जितने भी आदमी तुम इस्लाममें ला सको, लावो । हमारे पास पैसोकी कमी नही है । अपनी आबादी जितने जल्दी हो सके बढानी है। तुम उन लोगोंके पास जाकर जल्दीसे पटानेका देखो । कही ऐसा न हो कि ये मिशनरी पादरी हमारे पहले यहाँ पहुचकर बीचमेही फादा मार दे । मै जैसे गावगाव घुमकर आबादी बढा रहा हू वैसे ये पादरी भी अपनी ख्रिश्चन आबादी बढाने के लिए घूम रहे हैं । उनके पहले हमे कुछ कर दिखाना है...'

बराच वेळ मिर्झासाहेब सविस्तर योजना सत्तारच्या कानात ओतत होते आणि काही वेळापूर्वी हे मिर्झासाहेब कोण कुठले हे माहीत नसलेला सत्तार पाऊसवाल्या बैला-सारखी त्याच्या प्रत्येक म्हणण्यावर मान डोलवत होता मौलाना अबुबकर नुसते थड प्रेक्षकागत बसून होते

जेव्हा सत्तार मशिदीच्या बाहेर पडला तेव्हा मनान भारावल्यासारखा झाला होता काही तरी करून दाखवायचच अशा उमेदीनं बाहेर पडला होता

आणि माग मौलवी मिर्झासाहेब, मौलाना अबुबकरला हसतच टाळी देत होते

सत्तारनं त्या दिवसाची संपूर्ण रात्र विचाराना आणि योजना आखण्याला वाहून टाकली आणि सकाळ होताच परागंदा असलेल्या महारांना शोधण्यासाठी निश्चयानं पाऊल टाकलं...

¤

सत्तारन बिडी चुरगाळली. थोडा वेळ अमलूच तोड न्याहाळल अमलू वाटतो तेवढा भोळा नाही हे जाणलं आणि मग डोकं झटकत म्हणाला, 'त्ये सोड बहाद्दरा, धरमातल्या दोन भागाच सोड. तुमच साग, काय हाल हाईत तुमच ?'

'सारं हालच हाईत...' अमलू कडू तोंडान म्हणाला.

'हा, आमचं मातर तस न्हाय आमी मानसं म्हनून जगतो साऱ्यास्नी आपल भाईबद समजतो तसं तुमच्यात हाय का ?'

'न्हाय...'

'मग ! आरं जातच लई बाईट तुमची. म्हारामांगांना छळून घेती नुस्ती मान्साला मानूस म्हनून वळखत न्हायी. कुनीबी उठावं आन म्हारामागाच्या बोकांडी नाचाव... खरं का न्हाय ?'

सत्तारनं अमलूच्या तोडाजवळ तोड आणल, आणि आवाज हळू केला, 'मी तुला सागतो अमलू, तुमी लोक जर आमच्या जातीत अस्ताना, तर आज तुमच्या अगाला हात लावायची कुनाची टाप न्हवती पर तुमी मुसलमान न्हायी ना म्हणूनच हयं एवढ घडतय...'

'आँ...'

'न्हायत काय ! इच्यार कर, आज जर तुमी मुसलमान अस्ता तर ह्यो एवढा छळ भोगावा लागला अस्ता का? तुमची घर जळली अस्ती का ? तुमाला आस रानूमाळ भटकावं लागल अस्त का ? आस तीन तीन दिस उपाशीतपाशी न्हाव लागल का ?...'

अमलू दातखीळ बसल्यागत गप्प राहिला फक्त

सत्तारन स्वत च स्वत च्या प्रश्नाची उत्तर दिली, 'न्हाय अमलू न्हाय... तुमी जर मुसलमान अस्ता ना हयं समद झाल नस्त. साऱ्यानी तुमास्नी मान्सं म्हणूनच वळाखल आस्त आपल भाईबदच समाजल आस्तं. तुमी मानानं जगले आस्ते कामधदा करून पोटभर खाऊन सुखी न्हायले आस्ते. कुनाचा छळ न्हाय आन कुनाच हाल न्हायीत सगळ एकसारख एकसमान... कस्स ?'

अमलू डोळे फाकून पहात राहिला

'पन तुमच्या जातीची मान्स, मान्स कसली सैतान म्हन, तुमालाच कष्ट बी करू देत न्हायीत आन पोटभर खाऊबी देत न्हायीत आर हयेला काय जात म्हन्त्यात का? आ?... न्हाय, माजा मुद्द्या पटत आसल तरच व्हय म्हन...'

अमलूच व्हय नाही आणि न्हाय नाही.

सत्तारनच बोलण धरून ठेवल, 'म्या सागतो अमलू आज तुमाला आदाराची, आसऱ्याची लई गरज हाय तुमची लोकं कमी हाईत आमचीबी लोक कमी हायत पर आमाला काय भीती न्हाई. तुमचं मातर काय खर न्हाय तुमच्याच जातीची जादा अस-ल्याली मान्स तुमच्यावर काटा धरत्यात. तुमाला मारत्यात. अशा वख्ताला तुमास्नी कुनातरी दोस्ताची गरज हाय. कुनाच्या तरी मदतीची गरज हाय.'

अमलूच्या लक्षातच येत नव्हत सत्तारला काय म्हणायचय ते त्याला आता राहावलं नाही त्यान सरळच विचारल, 'आरं, म्हना-यचय तरी काय तुला ?'

'सागतो... घे बिडी घे...'

'नग, तोंडाला कोरड पडली...'

'बर राहू दे... तर सागत काय व्हतो? हा, काल आमच मिर्जासाहेब आल व्हत...'

'मिर्जासाहेब?'

'व्हय, मिर्जासाहेब! लई मोठी आसामी. सात येळा हाजला जाऊन आल्यात...'

'हाजला?'

'व्हय, तुमा लोकात कस काशीला जात्यात तस आमचबी एक देवस्थान हाय. मक्का म्हन्त्यात त्याला तिथ जाऊन आल की हाजला जावून आल म्हन्त्यात.'

'बर मग?'

'ते म्हनल, हिंदूच्या मोठ्या लोकानी ल्हान ठरवलेल्या लोकास्नी आपुन, म्हंजी मुसलमानानी जवळ करायच त्येन्ला आपल भाऊ म्हनायच. त्येन्ला आदार द्यायच त्यान्ला लागल त्ये पुरवायच, घरदार, कापडचोपड, अन्नधान्य, पैसाआडका, आन त्यान्ला मान्सात आनून मानसागत जगवायच...'

'खरं?'

'व्हय तुमा लोकान्ला आमच्यात घ्यायचा इच्यार हाय त्येचा तुमालाबी हिंदूच भ्या हाय आन आमालाबी भ्या हाय तवा दोगानीबी एकजागी येवून बाकीच्याचा सामना करायचा... बग अमलू तुमी आमी जर एकजागी आलो तर... आपल्याला कुनाच भ्या न्हाय तुमची घर जळनार न्हायीत तुमी आमी हित सुखान, मानान जगू, पर हृयं व्हाया तुमीआमी एकजागी आल पायजे...'

'कस?'

'ज्याला कुनाला मानूस म्हणून जगावस वाटतय, त्येन मुसलमान व्हाया पायजे.'

'काऽऽय?' अमलू किंचाळला त्यान डोळ्याच्या बाहुल्या सत्तारवर स्थिर केल्या. सत्तार मनातनं चरकला

'रागवू नगस अमलू, आमची काय बळजबरी न्हाय हृयो सारा खुशीचा मामला हाय ज्येला मान्सावानी जगायचय त्येन आमच्याकड याव, ज्येला नको त्येन जावं काय बळजोरी न्हायी पर थोडा इच्यार कर...'

'छ्या छ्या, हृयं काय जमायचं न्हाय...' अमलून आपला रोठ पंजा हलवला स्वत:ची जात सोडून परजातीत जाण्याचा विचार त्याला कसासाच वाटला.

'माजा काय आग्रव न्हाय. धर, बिडी घ...' मघाशी काढलेली बिडी त्यानं अमलूच्या हातात कोंबली अमलूनही नकळत ती घेतली सत्तार काडेपेटी काढत म्हणाला, 'पर इच्यार कर कुठवर आस हाल काडणार तुमी लोक? कुठवर आस सडकी, कुजकी जिंदगी जगनार? मुसलमान झाले तुमी तर शांतपनी जगता ईल मान्सावानी जगता ईल, इच्यार कर...' त्यान फर्रकन काडी पेटवली. 'एवडच सागाया आल्तो म्या जातो आता कदीबी येवून भेट, न्हायतर मानूस पाठव, मदतीचा हात तयार हाय...' त्यान अमलूच्या तोंडातल्या बिडीला काडी लावली आणि तो उठलाच 'जातो...' म्हणत सत्तार लगालगा गावाच्या दिशेन पावल टाकू लागला. अमलू त्याची दूर जाणारी पाठ पहात राहिला

त्या वेळेस त्याच्या तोंडातल्या श्वासोच्छ्वासाबरोबर दाताखालची बिडी आपोआप फुलत, मुर्झत राहिली

□

अमलून खंडोबाच्या देवळात बैठक घेतली


॥ दीपावली अभिष्टचिंतन ॥

आमचे असंख्य ठेवीदार, खातेदार, सभासद आणि हितचिंतक याना **दीपावली व नववर्षानिमित्त**

**॥ हार्दिक शुभेच्छा ॥**

# पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, पुणे

मुख्य कार्यालय : ८५५, बुधवार पेठ, लक्ष्मी पथ, पुणे ४११ ००२.

फोन नंबर : ४४५९१५ तारेचा पत्ता : सेन्को बँक

प्रशासकीय कार्यालय : प्लॉट न. ई १, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७.

फोन नबर : ४४२६२४, ४४२६२५

विस्तारित प्रशासकीय कार्यालय : लेबर फेडरेशन बिल्डिंग, प्रतापगड रस्ता, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७.

| | | |
|---|---|---|
| **शशिकांत सं. धुमाळ** | **नारायणराव म. हिंगे** | **अशोकराव ना. मोहोळ, आमदार** |
| प्रभारी व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाची व जिव्हाळ्याची एक अग्रगण्य जिल्हा बँक**

आणि सर्वांना सत्तारच्या येवून जाण्याच कारण सागितलं, 'त्यो म्हन्तोय, तुमी मुसलमान व्हा तुमाला आसरा देतो. मदत करतो. वाटल्यास पैसवी देतो...'

थोडा वेळ प्रत्येकजण गप्पच बसला. कुणी तसं विचार करायच्या मनस्थितीत नव्हतच.

मग अमलूनच पुन्हा विचारल, 'मग काय करायच?'

तसा ताज्या म्हातारा खवळलाच. 'त्या सत्तारला सोताचं प्वाट भरता येतया का नीट... ?'

'आरं पैसाबिसा काय त्यो देनार न्हाय...'

'मग ?'

'कुनीतरी दुसराच साह्येब हाय म्हनं. मदत करनारी खरी दुसरीच लोकं हाईत. त्येनी सत्तारला आपल्याकड फकस्त इचाराय धाडलं व्हत...'

'लाज वाटती का म्हनावं. आरं, पैका दिऊन कुटं मान्सं इकत मिळत्यात का ?'

'हितं पैश्याला लई किंमत न्हाय नाना...'

'मग...?'

'आपल्या जीवास्नी किंमत हाय. शातपनी, मान्सावानी जगायचं आसल त म्हनी मुसुनमान व्हा...आपुन जर मुसुनमान झालो तर आपल्याला कुनाच भ्या न्हायी...'

'आपुन न्हाय बा आपली जात सोडनार... 'ताज्या अभिमानानं म्हणाला, 'आरं, आपल्या जातीतच खरी शान हाय. जातीत जलम घेतला त्यो कश्यापायी ? आस जात सोडायला ? छ्या, आपल्याला न्हाय जमायच ह्ये. आपुन जातीतच केस पिकावलं आता जातीतच मरनार...'

'हा, बरूबर हाय...' पाचसहा जणानी ताज्याचं बोलणं उचलून धरल.

'काय बरूबर हाय ?...' एका बाजूनं रंग्या उसळला.

'ह्येच, सार सोडावं मान्सान, पर आपली जात सोडू न्हायी.' ताज्यानं आपला काळपट, लुकडा हात पसरला.

'हां, आपली जात सोडू न्हाय...' रंग्या खवळून उभा राहिला, 'आपल्या आयाभैनी मातर सोडाव्या दुसऱ्याखाली निजवायला. आपली लाज सोडावी. आपली भूक सोडावी. आपली तडफडून मरनारी पोरं सोडावी आन फकस्त जातीला धरून बसावं.'

ताज्या म्हातारा त्याला अडवल्यागत म्हणाला, 'आर पोरा, ह्ये सारं आपल भोग हाईत. भोगायलाच पायजेत. गेल्या जल्मीचं पाप ह्या जल्मी भोगतूय आपुन. पापं फिटल्याबिगार भोगवी सुटायच न्हाईत...'

'रवा भोगत असचील नाना. आमी का भोगावं ? ह्या वान्या बामनानी काय गेल्या जल्मी पापं केली नस्त्याल ? आमचा छळ करनं, तरास देनं ह्ये काय पाप न्हाय ? मग त्येस्नी का न्हाय लागत ह्यो भोगवटा ? आमास्नीच का ? अशी कंची पापं केली आमी ? का म्हार म्हनून जल्माला आलो ह्येच पाप झाल ?'

'पंचातीत शिपाई झाला म्हनून लई अक्कल फुटली का रं तुला ?' ताज्याही खवळला

'व्हय, अक्कलच फुटली, तवाच बोलतूया...' रंग्यान अस सुनावताच म्हारवाड्यात सर्वांत वयस्कर असलेला ताज्या काय बोलाव हे न सुचून नुसतीच आपली पिकलेली दाढी खाजवत राहिआ.

तोवर दिलानं बोलण हातात घेतलं, 'कुटवर आसं सहन करायचं, ह्ये तूच सांग नाना...'

'जवर आपल्या करमात आसंल तवर भोगायच...'

'ह्ये करम कदी खलास व्हायाचं आपल?'

'व्हईल कंदीतरी, जवा देवाच्या मनात ईल तवा...'

'देव ? हूं... एवढं दिस कुटं बसलाय तुजा देव ? सारी एकाच देवाची लेकरं न्हवं का ? मग देव ह्ये आसं खालचं वरच का करत बसलाय रं ? त्याला काय आमचं हाल दिसनात व्हय ? आं ?...'

'दिस्त्यात रं. पर त्यो आपली परीक्षा पघतोय... जवा वखत ईल तवा आपल्याला न्याव मिळलच...'

'अहं...' दिलानं जोरात मान हलवली, 'त्यो वखत येनार न्हायी नाना. तुझा देव फकस्त आमची परीक्षाच पघत ऱ्हानार आरं ह्यो आमचा देव न्हायी. ह्यो वान्याबामनांचा देव. त्येंचीच बाजू घेनार, त्येंची घर भरणार. तुझा देव हरामी हाय नाना, ज्येंच्याकडनं निवद मिळतो त्येंचच भलं करतो त्यो...'

'गप बस, तोडाला ईल त्ये भकू नको...'

'का ? कडू वाटतय व्हय ? आर तुज्या ह्या देवाच्या मनात काय येनार न्हाय. ह्ये आसच चालनार, ह्यात फरक न्हाय पडणार. नाना, तुज्या आज्या-पज्यानी ह्येच भोगलं. तू बी ह्येच भोगल. आमीबी ह्येच भोगतूय. आमची नातवड-पतवडंबी ह्येच भोगनार... फरक न्हायच अज्याबात. आन कसलं करम घिऊन बसलायस... ? सार खोट हाय ह्ये.'

ज्यानं विषय फोडला तो अमलू एवढा वेळ नुसताच गप्प बसला होता. बाकीचेही नुसत ऐकण्याच काम करत होते.

हा वाद संपणार नाही हे अमलूच्या लक्षात आल आणि त्यान हात उचावत दोघाना गप्प केलं, 'ही भांडाभांड बास झाली. फुडं काय करायच सागा...'

सारेजण गंभीर झाले. विचारात गढले. आयाबायासुद्धा डोक्याला हात लावून बसल्या.

काय करायच पुढ ?

बऱ्याच वेळान ताज्या म्हातारा म्हणाला, 'आपुन गावात परत जावू. गावकऱ्याची माफी मागू...'

'पर माफी मागल्यागत आपुन काय केलंय ?' अमलूनंच विचारल.

'काय का केल्यालं नसाना. त्ये लोक आपलं धनी हायत. अन्नदाते हायत. त्येंच्याबिगार कुटं जाणार आपुन ? आपल्याला त्येस्नीच धरून ऱ्हायलं पायजेल. आरं कितीबी क्येलं तरी ह्ये आपल्याच जातीची लोक हायत. आपल्याला ह्येंच्यातच जगायमरायचय. एकाच देवाच्या अगातनं ही सारी लोक बाहेर पडल्यात. फरक एवढाच की बामनं देवाच्या डोक्यातनं बाह्येर पडली. आपुन देवाच्या पायातनं बाह्येर पडलो. पर आखिरीला देवाचं आंग एकच ना...'

'मंग आपल्याला ही लोकं देवाच्या पायाला हात का लावू देत नाहीत र नाना ? देवळात का येऊ देत न्हाईत ? जी लोकं देवाच्या पायातनं निगाली त्येंचा इटाळ होतो व्हय ? देवबी इटाळ मानतू का ? आरं ह्ये लोक रोज त्याच देवाच्या पाया पडत्यात ना ? मग ह्येंना त्या पायाचा इटाळ का होत नाही ?...' रंग्याच्या पोरानं धडाका लावला.

'आरं आर आपलं देव येगळ, त्येंचं येगळ हाईत. आपुन मरीआय, म्हसोबाला

पूजतो, त्ये...' एक म्हातारा मधेच बोलायला गेला. पण अमलून त्याला काटल, 'ए ऽ हृये देवदेव बास झालं, फुड काय करायच सांगा.'

'म्या पहुचलच सागितलया...' ताज्या पुन्हा बोलला, 'आपल्याला गावकऱ्यास्नी सोडून चालायच न्हायी. त्येंच्यातच आपल्याला जगायचंय मरायचया...'

'व्हय, व्हय. खर हाय...' एकदोघांनी पटल्यासारख्या माना हलवल्या

तसा रंग्या पुन्हा उसळला, 'न्हाय, आमाला न्हाय जगाय-मरायचं हृयेंच्यात...'

'मग काय मुसुनमान व्हतो का?' ताज्यान खिजवल

'व्हय.'

साऱ्याना दणकाच बसला एकदम. रग्या एवढया सरळसरळ जात बदलायची भाषा करील अस कुणालाच वाटल नव्हत. अमलूही थोडा चाट पडला.

थोडा सुन्नतेनंतर अचानक गोधळ सुरू झाला सर्वजण एकाचवेळी जीभ उगवल्यागत बोलू लागले बरेचजण रग्याकड विचित्र नजरेनं पाहू लागले. काही तरणी पोर कौतुकान पाहू लागली.

एवढया गोधळातच गावात झाडू मारणाऱ्या पिलाबाईन रग्याच्या बायकोला विचारल, 'काय म्हन्तूय तुजा न्हवरा, ऐकल न्हवं...?'

'व्हय, ऐकल की...' रग्याची बायको ठसक्यात म्हणाली.

'मग, काय करनार तू?'

'कश्याच?'

'जात बदलायच?'

'जिकड न्हवरा, तिकडं म्या...'

पिलाबाईचे डोळेच फाटले.

अमलू एकटाच गप्प होता. बाकीच्यांचा गोधळ चालूच होता.

'काय पर आक्रीत? पोर पैशापायी जात बदलायला निघाली काय खर न्हाय...'

'तुमी नका बदलू आपापली जात. पर तुमास्नी माहृचतीच आसल, त्येंनी आपली खवापट जाळधाच. आन त्यातमदी...बकऱ्या कोंबडयासहित चारदोन मान्साची राखुडी झाल्याच...'

'माह्यतय आमास्नी पर एवढयासाठी जात सोडायची तयारी न्हाय आमची...'

'बरं, पर गावात जाऊन काय करनार तुमी लोक? आसंल नसल त्ये सारं त्येंनी जाळून टाकलया. मग अशा हालतीत न्हानार कुट तुमी लोक? खानार काय? लेनार काय?...'

'आर ही काय पयली येळ न्हाय. आस कैक बाऱ्या भोगलया आमी ह्ये, आन पुन्यादा नव्यानं उभ केलया...' एकदोन म्हातारे म्हणाले.

'आन त्यातच सारी जवानी बर्बाद केली, व्हय का न्हाय?' तरण्यानी विचारलं, 'पर मागलं सोडा, आत्ताच बोला. आमालाबी काय जात सोडायची हौस न्हायी आली पर जिथ जातीतच काय आब उरला न्हाय तिथ न्हावून काय उपेग? जातीबाहेर गेल त मान्सावानी तरी न्हाया मिळल. फकस्त तुमी काय करनार बोला?...'

'जाऊन गावकऱ्याच्या हातापाया पडू त्ये धनी हायत आपल. आपल्याला त्येनी आज तोडलं त उदया जवळवी करत्याल'

'आर इसरा आता. उदया कदीच उगवत न्हाय. सार गावकरी म्हारोडयाच्या जीवाव टपल्यात, कवा तुकड करत्याल सागता येत न्हायी...'

'आस न्हाय व्हायच...'

'न्हाय व्हायच ना, मग तुमची तुमी झक मारा...'

'तुमी दुसर काय करनार?'

'आमी आमची जात बदलनार...'

'आमी तुमास्नी वाळीत टाकू. तुमचं भाऊबद तुटत्याल...'

'तुमी दुसरं काय करनार? त्येनी तुमास्नी वाळीत टाकायचं, तुमी आमास्नी टाका, च्यायला...'

'बगा इच्यार करा, लई म्हाग पडल...'

'पर्वा न्हाय...'

आणि मग तिथे हजर असणारांमधे सरळ सरळ दोन तट पडले. जात बदलणाराचा एक तट. जात न बदलणाराचा दुसरा तट. बायका गप्प होत्या. अमलून स्वतःबद्दल अजून काहीच निर्णय दिला नव्हता.

रग्या अमलूकड वळला, 'अमलूदादा, तुजा इच्यार साग सपष्ट...'

अमलू सावरून बसत म्हणाला, 'म्यावी जात बदलायचा इच्यार करतूय...'

तोच असं म्हटल्यावर पुन्हा एकदा जोरदार गोधळ उसळला पोटातल्या भुका आणि म्हारवाडा जळाल्याच दुःखही विसरले सर्वजण

¤

सध्याकाळी धुदलक्या अंधारातच रंग्या गुपचुप गावातल्या मशिदीशेजारच्या इमामआळीत शिरला मोठया कबरीसारख्या चुन्यान रगवलेल्या सत्तारच्या घरासमोर उभा राहिला. आणि त्यान दबक्या आवाजात हाळी दिली, 'सत्तारभाई, आर सत्तारभाई...'

सत्तार बाहेर आला, 'कोनय?'

'म्या... रग्या...'

'आर, ये ये रंग्या, म्या वाटच पघत व्हतो कुनीतरी येन्याची, ये घरात ये...'

सत्तारनं रंग्याला घरात घेतल. चटईवर स्वत शेजारी बसवल रग्या चोरासारखा बसला

सत्तारनं चुलीच्या घराकड तोड केलं, 'इन्याकी मा, जरा दो कप च्या रख चुल्लेपर...'

'भला...' इन्याच्या माचा आतून आवाज आला

'ह्या वक्ताला च्या कश्याला?' रग्या संकोचला.

'आर आसूदे तीन दिसाचा उपाशी हायस तू... हा, बोल कसा आला गावात...?'

'लपत छपत आलो...'

'काय म्हन्त्यात तुमचं लोक?'

'दुपारी इच्यार झाला आमचा...'

'हं...'

'बरीच लोक तयार हाईत...'

'खर?'

'व्हय...'

'किती...'

'तसं काय सागता यनार न्हाय. पर देवळात असल्यातल निम्म तरी तयार हाईत. आनिक हिकडतिकडं जे पागल्यात त्येंस्नी पन इच्याराया पायजेल...'

चिमणीच्या उजेडात सत्तारच्या डोळ्यात समाधान चकाकलेलं स्पष्ट दिसलं रग्याला.

'मंग म्या निगतो...'

'थाब मर्दा, आता संगच निगू... तीन दिसाची उपाशी हायत सारीजन त्येंच्या

खान्यापिन्याचा काय बदुवस कराया नको न्हय... तवर तू च्या घे मग जरा सामसूम झाल्यावर निगू...'

इन्याच्या मान इन्याच्या हातून पाठवलेला चहा आला. घाईतच चहा घेतला सत्तारनं आणि तो उठला, 'तू वस मी आलोच...'

सत्तार चुलीच्या घरात शिरला, म्हणाला, 'इन्याकी मा, आचिगेनचिगे उत्ते आट्टेके रोटघा बना. आन आचिगा उसका सालना वना. साठ सत्तर आदमी खानेवालेय...'

आणि मग सत्तार लगबगीन घरावाहेर पडला. इमामआळीतल्या प्रत्येक घरात शिरून निरोप पोहोचवू लागला.

इमाम आळीतल्या प्रत्येक घरातल्या बायका जोरात सैपाकाच्या तयारीला लागल्या.

¤

गर्द अंधार पडला गावात सामसूम झाली तेव्हा सत्तार, रग्या आणि त्यांच्याबरोबर इमामआळीतले आणखी एकदोन जण माळा-वरच्या खंडोवाच्या देवळाकड आले रंग्याच्या डोक्यावर भाकऱ्यांची भलीमोठी टोपली होती एकाच्या डोक्यावर कालवणाचा हडा, दुसऱ्याच्या डोक्यावर पाण्याचा हडा सत्तारच्या हातात बरीच ताटं.

देवळात शिरल्या शिरल्या सत्तारन सोवत आणलेला कंदील पेटवून सर्वांच्या मधे ठेवला आणि सर्वांपुढ ताट ठेवली सत्तारन आणि त्याच्याबरोबर आलेल्या दोघानी वाढण्याची काम घेतली डाळीच खळगट ताटाताटात ओतण्यात आलं वर भाकरी ठेवण्यात आल्या

तीन दिवस कोरभराचही दर्शन नसलेल्या साऱ्यानीच ताटावर आडवा हात सोडला कुणालाच भान राहिल नाही. पण एकटा ताज्या मात्र वेगळा राहिला त्यान भाकरीला साधा हात लावायलाही नकार दिला 'माजा जीव गेला तरी चालल. पर म्या एक घासबी खानार न्हाय...'

तोवर बाकीच्या सर्वांनी खायला सुरुवात केली होती ताज्या अचानकच असा उलटल्या-मुळं त्याची बाजू घेणारांची अडचण झाली काहीनी तसंच दडपून जेवण सुरू ठेवलं. काहीनी मनात नसतानाही ताज्यासाठी आपली उष्टावलेली ताटं दूर सारली, 'आमीवी खानार न्हाय...'

सत्तारनं ताज्याला समजावण्याचा प्रयत्न केला, 'आर, तुज्यावर न्हाय बळजोरी करत मी जात बदलायची. पर भाकर त खाशील का न्हाय ?'

'न्हाय...'

'आर तुजा राग आमच्यावर, भाकरी मायवर कश्याला ?'

'मला खायच न्हाय' निग्रहान ताज्या म्हणाला

'तुज्यामुळं बाकीच्याच हात आखाड-ल्यात...'

'ज्येला खायचय त्येनं खाव म्या काय कुनाचा हात धरल्याला न्हाय...'

'आर आस करू नको.'

'म्या खानार न्हाय.'

सर्वांनी आग्रह केला. पण न खाणारानी मानल नाही मग त्याचा नाद सोडून बाकीचे सारे भाकऱ्या चापू लागले सत्तार वाढत राहिला आणि न खाणारे एका कोपऱ्यात धुमसत बसून राहिले

वाढायच सपल्यावर सत्तार अमलूच्या शेजारी टेकला आणि अमलूच्या कानात विचारता झाला, 'किती जन हाईत र, मुसुलमान व्हनार...?'

'लई जन हाईत...'

'मला पक्का आकडा साग म्हजी तस वर कळवायला बर...'

अमलून एकदा मधल्या टिमटिमत्या कंदिलाच्या उजेडात सर्वांची तोंड न्याहाळ-ण्याचा प्रयत्न केला आणि मग सर्वांपुढ सरळ सवाल टाकला, 'कोन कोन तयार हाय जात सोडायला'

बऱ्याच जणानी एकमेकाकड पाहिल प्रत्येकाच्या तोंडावर 'काय कराव'च प्रश्न-चिन्ह दिसलं.

मग अचानक रग्यान हात वर केला 'म्या तयार हाय...'

पाठोपाठ बरेच हात वर उठले. उष्टावलेले हात.

सत्तार मोजू लागला, 'एक, दोन... पाच... दहा... बारा... पचवीस... अठ्ठावीस... तीस... तीस जन... तोस जन पक्के ना ?'

'आजूनबी काहीजन येत्याल...'

सत्तारन समाधानात आपली बोकडदाढी कुरवाळली. जेवण उरकत आली होती ढेकराचे आवाज उठत होते. आणि अचानक सत्तारच्या लक्षात एक गोष्ट आली, अमलूच्या सख्ख्या, धाकट्या भावान हात वर केला नव्हता एक वेळ भावाच सोडा, पण अमलूच्या बायकोनही हात वर केला नव्हता रग्याच्या आख्ख्या घरान हात वर केला होता इतरही चारपाच बायकानी हात उचावले होते. पण अमलूच्या मुलाशिवाय एकानही हात उचावण्याचा त्रास घेतला नव्हता. सत्तारला ती गोष्ट खटकली त्यानं ते अमलूच्या लक्षात आणून दिलं.

अमलूलाही आश्चर्य वाटल. तो खात्री देत म्हणाला, 'भावाच म्या सागत न्हाय. पर बायकू माज्या सब्दाबाहीर न्हायी ती बी ईल...'

'म्या येनार न्हाय...' अमलूची बायको ताड्कन म्हणाली, 'तुमास्नी काय करायचं आसल त्यं करा पर म्या जात बदलनार न्हायी...'

अमलूची शीरच तडकली, 'का ग, तुला मधीच रोग आला ?'

'व्हय...'

'हिच्चीभन, कशी बदलत नाहीस म्याबी पघतोच .दादला हाय तुजा म्या...'

'माजा दादला म्हार हाय, मुसुनमान न्हायी...'

'हिच्यायला...' म्हणत अमलू उठू लागला, तस त्याला धरून पुन्हा बसवत सत्तार म्हणाला, 'आर जावू दे, आमी तुला नवी बाईल देऊ...'

'ए मुड्या...' अमलूची बायको सत्तार-वर उखडली, 'लोकाच्या सौसाराच वाटुळं कराया निगालायस व्हय रं ?'

'तूच जवा न्हवऱ्याला सोडाया निगालीस, तवा...'

'तुला दावल मसान...' अमलूची बायको हातातल्या बागडचा माग सारून उठली, जात न बदलणारेही चिडले. तेही उठले. सत्तारच्या दिशेन पुढ झाले सत्तार हादरला.

तसा अमलू गरजला, 'एकानवी जागा सोडायच काम न्हाय. आमच्यामधी कुनी बोलायची गरज न्हाय न्हायतर हितं दगा हुयील...'

सारे जागीच थाबले.

रग्या बोलला, 'ज्येच खाल्लं, त्येच्यावर उलटता व्हय र...?'

‘खायला घालून ह्यो आमाला बाटवायला निगाला व्हय...?’ एक म्हातारा पिसाळला.

‘तू गप रं ए शिगान्ना...’ अमलूनं आवाज टाकला.

मग सारेच गप्प झाले. आपापल्या जागेवर बसले.

अमलूनं बायकोला पुन्हा विचारलं, ‘तू येनार का न्हाय ?’

‘न्हाय...’ ती ठामपणे म्हणाली.

‘फुडं कुत्रंबी इच्चारायचं न्हाय तुला...’

‘ना इच्यारुंदे...’

काही कळायच्या आतच अमलू तिरमिरत उठला. बायकोवर धावला. आणि तिच्या थोतरीत खाडकन् एक ठणकावली त्यानं. ती बोंबलायला लागली. अमलूनं पुन्हा हात उचलला. पण तोवर सत्तार, रंग्या यांनी उठून त्याला धरलं. आवरलं.

ताज्या अचानकच उठला; जात बदलणारांकडं हात उडवत म्हणाला, ‘तुमचा आमचा संबंद तुटला आजपासून. तुमी आमास्नी म्येले आन आमी तुमास्नी म्येलो. आमी गावात चाल्लो. तुमी तुमची जात बदला न्हायत कायबी झक मारा...’

‘आरं ज्जा, उडत गेला तुमी...’ अमलूनं उडवलंच.

‘जातोच... चला रं...’ म्हणत ताज्या देवळाबाहेर पडू लागला. सत्तारनं पुढं होऊन त्याला अडवण्याचा प्रयत्न केला, ‘आरं थांब ताज्या नाना...’

‘सर रं ए शिंदळीच्या...’ म्हणत म्हाताऱ्या ताज्यानं सत्तारला धक्का दिला. सत्तार मागं धडपडला.

ताज्या बाहेर पडला. त्याच्यामागं जात न बदलणारे उठून चालू लागले. अमलूची बायकोही फाटका पदर सावरत बाहेर पडली. सत्तार नुसताच पहात राहिला.

शेवटी तिथं फक्त जात बदलणारेच उरले. त्यातल्या कुणाच्या आयाबहिणी बाहेर गेल्या होत्या. कुणाचे बापभाऊ गेले होते. कुणाची मुलं गेली होती. कुणाच्या बायका गेल्या होत्या, तर कुणाचे नवरे गेले होते...अमलूचा पोरगा आणि रंग्याचं सारं घर तिथंच होतं. ताज्या म्हाताऱ्याची कुंवारपणीच आई झालेली नातही तिथंच होती.

देवळात थोडा तणाव आला होता. कसंतरीच वाटत होतं. उष्टी ताटं जागेवरच पडली होती. आणि सत्तार अमलूकडं, ‘आत्ता रे काय ?’ च्या नजरेनं पाहात होता.

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे संपादक शंकर सारडा आपल्या पत्रात लिहितात :


विश्वास पाटील यांच्या ‘पानिपत’ या कादंबरीचे आपण पाठवलेले हस्तलिखित वाचले.

युद्ध हा महाकाव्याचा विषय.

युद्धाचे हे महाकाव्यसदृश्य प्रलयंकार रूप ‘पानिपत’ या कादंबरीत विश्वासार्ह पातळीवर प्रकट होते. मराठीत पहिल्यांदाच म्हणावे इतक्या ताकदीने, आणि संपूर्ण भारताचा तत्कालीन राजकीय पट उलगडून दाखवते.

‘स्वामी’नंतरची हीच एक अशी ऐतिहासिक कादंबरी – की जी छोट्या मोठ्या तपशिलांबाबतही ऐतिहासिक कागदपत्रांचा घट्ट आधार घेते. पन्नासांवर व्यक्तिरेखा असूनही प्रत्येक व्यक्ती स्वत:चे रंगरुप घेऊन ठाम उभी राहते.

एतद्देशीय आणि परकीय यांच्यातील हा तुल्यबळ रणसंग्राम कौरव-पांडव युद्धासारखा घनघोर, भाऊसाहेबांना हे उमगले; पण त्यांच्या सरदारदरकदारांना नाही. त्या दुर्दैवी इतिहासाचे विस्मरण होऊ देणे आत्मघातकीपणाचे आहे हे भान ही कादंबरी देते. म्हणूनच प्रत्येक मराठी माणसाच्या घरात ती जायला हवी.




**लेखक : विश्वास पाटील**

रवींद्र मेस्त्री यांच्या अभिजात कुंचल्यातून उतरलेले अप्रतिम मुखपृष्ठ

पृष्ठे : सुमारे ८००, प्रसिद्धी : दिवाळी

किंमत : रु. १५०/– (टपाल खर्च ५ रु. वेगळा)

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड, चितळे पथ कॉर्नर, दादर, मुंबई ४०० ०२८.

ताण हलका करून हवेत हात उडवत अमलू म्हणाला, 'जावदे त्याच्यामायला. कळल त्येंनावी एक दिस, आन झक मारत येत्याल आपल्याकडं त्येंचा इच्यार न्हाय करायचा आजपासून. गेलं त्याल लावीत... काड, विडी काड...'

आणि मग बिड्याच्या धुरात देवळातल्या तीस जणाच्या कुजबूज, गप्पा सुरू झाल्या सोबत सत्तार होता.

त्यावेळेस त्याच्याच रक्ताची माणसं गावाच्या दिशेनं पाय टाकत माळरान तुडवत होती. सर्वांत पुढं ताज्या म्हातारा होता.

¤

रात्र उताराला लागत होती. सार गाव शात होतं

अचानक काही कुत्री भुकू लागली. आणि काही माणसं पुढं येणाऱ्या कुत्र्यांना 'हाड, हाड' करत गावाच्या मध्याकड सरकू लागली. जसजशी ती पुढं सरकत राहिली तसतशी कुत्री आणखी आणखी भुकू लागली. पण झोप घेणाऱ्या गावावर याचा तसा काही परिणाम झाला नाही

सर्वजण गावाच्या मधे असणाऱ्या सहादू पाटलाच्या वाड्यासमोर थांबले तो भला-थोरला वाडा भयकर थंड वाटत होता

सर्वांत पुढं असलेल्या ताज्यानं जोरजोरात हाका मारायला सुरुवात केली, 'पाटील... अवो ऽ ऽ पाटील...'

त्याच्या हाकाना कुत्र्याच्या भुंकण्याची साथ होती.

त्यानं पुन्हा हाका मारल्या. आसपासची एकदोन घरं आतल्या आत जागी झाली. पण बाहेर कुणीच आलं नाही

ताज्यानं पुन्हा हाका दिल्या.

तेव्हा पाटलाच्या गड्यानं मोठ्या दारातला छोटा दिंडीदरवाजा उघडून डोक बाहेर काढलं, 'कोन हाय ?'

'आमी हाओत जी...'

'आमी कोन ?'

'म्हारं...'

महारं म्हटल्यावर गडी दार पुन्हा लावून घेऊ लागला. तसा ताज्या धाईधाईनं म्हणाला, 'पाटलास्नी निरोप सागा, आमच लई इशेष काम हाय...'

'हां, म्या सांगतो पर तुमी थावा वाईच...' म्हणत गड्यानं दार लावून घेतलंच. एवढंच नाही तर मोठ्या दाराचा अडसरही चाचपून पाहिला.

गड्यान आत जाऊन कसबसं पाटलांना झोपेतनं उठवल. पाटील नाराजीनच उठले. 'आरं ड्वाप येऊ द्या की थोडीशीक...'

'मालक, बाहीर म्हारं आल्यात...'

'आँ ?' पाटील खाड्कन सावध झाले.

'कोन आल्यात म्हन्तो ?' त्यानीच पुन्हा विचारलं.

'म्हार.'

हे लोक एवढ्या रात्री आपल्या दारात म्हटल्यावर पाटलांच्या मनात भीती चमकून गेली. 'आयला, काय बदला घ्याया आली का काय म्हनाव ही म्हारं ?' असं स्वत.शी पुटपुटत त्यानी गड्याला विचारलं, 'कश्या-पायी आल्यात ?'

'काय तरी इशेष काम हाय म्हन्यात...'

'आत्ता ? ह्येन्लाबी इशेष कामं पडाया लागली का ? कोन कोन हाईत रं...'

'ताज्या म्हार आन आनीक बरीच जन हाईत...'

'कुऱ्हाडी, काट्या हायत का ?'

'न्हाय बा, तसल काय दिसलं न्हाय...'

'दिसाया काट्याकुऱ्हाडी काय मिरवत आन्त्याल व्हय रं ती लोक? लपवून आनल्या असतील...'

'तस काय वाटत न्हाय त्येंच्यावरूवर बायकावी हाईत. मनात काय काळंबेर असत तर बायकास्नी गावाच्या मधी आनायची काय गरज व्हती ?'

पाटलाना पटल. पण ते थोडावेळ विचा-रात पडलेच. त्यानी समोरच्या भिंतीवर टागलेल्या बंदुकीकड पाहिलं. आणि मग गड्याला सागितल, 'सकाळच याया साग त्येस्नी...'

गडी गेला.

पाटलांना आठवल, ताज्या महाराची नात त्यांच्या शेतात मजुरीला यायची.

बारातेराची असेल तेव्हा ती नुकतीच बोडल्यावर आली होती ती. पण दिसायची बरीच नटखट पाटलाच्या थोरल्या, लग्न झालेल्या पोराची तिच्यावर नजर गेली. आणि एकदा त्यान तिला अडवलीच. आणि तिच्यावर मनसोक्त बलात्कार केला

ती रडतभेकत राहिली. पण पाटलाच्या पोरानं तिला दम दिला, 'गप न्हा. ह्ये कुनाला सागू नगस. न्हायतर तुज्यासहीत साऱ्या म्हाराचे गळे चिरून ठेवीन...'

ती पोर भेदरून गप्प राहिली. आणि मग त्या पोराच्या इशाऱ्यावर पाहिजे तशी नाचू लागली. तो म्हणेल तेव्हा हूं, चू न करता त्याची वासना भागवू लागली.

त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. एवढ्या लहान वयातही ती गरोदर राहिली. सर्वांच्याच लक्षात ती गोष्ट आली. सारीकडे बोंब माजली

ताज्यानं याबाबतीत ओरडण्याचा प्रयत्न केला तर पाटलांनी आवाजच दाबला त्याचा. ताज्याच्या पोरान धाडसान पाटलांच्या वाड्यासमोर उभ राहून पाटलाना आव्हान दिलं. तर त्या रात्रीच ताज्याचा पोरगा अचानक गायब झाला. लापता झाला. कुठं गेला कुणालाच कळलं नाही. गावात कुजबूज माजली. कुणी म्हणायच, तो वेडा होऊन परागदा झाला कुणी अगदी हळू आवाजात म्हणायचं, त्याला पाटलानं जीव्व मारला

ताज्याच्या नरड्यावर बदुकीची नळी ठेवून ताज्यालाही सांगण्यात आलं, तू जर गप्प बसलास तर बरं नाहीतर महार-वाड्याची धडगत नाही.

नेहमीच्या सवयीनुसार ताज्या गप्प बबला. महारवाडाही फक्त अस्वस्थपणे थड राहिला. ताज्याच्या नातीन एका पोराला जन्म दिला. त्या पोराच्या गळ्याला नख लावायचही कुणाला सुचलं नाही. पाटलाच पाप ताज्याच्या घरात वाढू लागलं.

पण ताज्याचा कर्तासवरता मुलगा गायब झाल्यान ताज्याचा आधारच तुटला. खाण्या-पिण्याचे हाल होऊ लागले आणि शेवटी त्याची नात इवल्याशा बाळाला पाठीवर बाधून पुन्हा पाटलाच्याच शेतात मजुरीला जाऊ लागली

ते प्रकरण तस निवलं होतं. पण आपल्या नातीची नासवण आणि पोराच अचानक गायब होणं ताज्या मनातन विसरला नसेल अस पाटलांना वाटल कदाचित त्याचाच बदला घ्यायला तो आला असावा.

त्यात आता मधे हे आदोलन उठलं महारवाडा जाळण्यात आला. गावातल्या प्रतिष्ठितानी आणि आचार्यांनी एकमतान तो निर्णय घेतला. पण महारवाडा जाळा-यची शेवटची आज्ञा स्वत. पाटलानी दिली

होती. ही गोष्ट ताज्याला कळली असण्याची शक्यता होती आणि त्याचाही बदला महारांना घ्यायचा असावा.

□

चारपाच दिवसांपूर्वी विठ्ठलाच्या देवळात बैठक झाली होती. गावातले पाटील, सरपंच, शास्त्रीबुवा, शितोळे मास्तर असे ठराविक प्रतिष्ठित हजर होते. या बैठकीचे खास पाहुणे म्हणून आचार्य आले होते. त्यांच्या संपूर्ण अंगावर भगवे कपडे होते. गळ्यात रुद्राक्षाची माळ आणि खांद्यांवर रामनामाची शाल होती. त्यांचा आवाजही चांगला कणखर होता. तोंडावर सात्विक, शांत, संतपणाचा भाव आणि डोळ्यांत तेज.

त्यांच्या या दिसण्याचीच बैठकीतल्यांवर छाप पडली होती.

त्यांनी बोलायला उभं राहिल्यावर पहिल्यांदा सर्व प्रतिष्ठितांना नम्रपणे, झुकून, हात जोडून नमस्कार केला. मग स्वतःची ओळख सांगितली, ' मी आपल्या हिंदुधर्माचा एक निष्ठावान पाईक. त्या हिंदुधर्माचा, ज्याचा इतिहास अखिल जगतात श्रेष्ठ गणला जातो, ज्याची संस्कृती सर्वोच्च समजली जाते, जो शुद्ध आणि निर्मळ समजला जातो अशा या हिंदुधर्माचा मी पाईक...' थोडावेळ ते स्वतःच्या पाईकपणाबद्दलच सांगत राहिले.

आणि अचानकच त्यांच्या तोंडावर करुणता उतरली, दीनपणा आला, ' काय दिवस आलेत पहा. ही आपली भरतभूमी. आपली मायभूमी. जिथं देवदेवतांनी जन्म घेतला ती पवित्र, पावन भूमी. या भूमीवर जगणारा आपला हिंदु धर्म. आपला मूल धर्म आणि त्याचे आपण सर्वजण पाईक. पण आज आपल्यालाच या भूमीत नीट जगता येत नाही. मी हिंदू आहे असं अभिमानानं सांगता येत नाही. आपणच आपल्या धर्मात परके आणि पारखे होत चाललेले आहोत. जगरहाटी विचित्र झालीय हेच खरं... काल इथं जे गुलाम म्हणून जगले, पायतळी ज्यांची जागा होती, तेच आज शिरजोर होऊन आपले मालक बनू पहातायत. सारी करणीच उलटी झालीय...' ते थोडावेळ थांबले. बैठकीतले शास्त्री सोडले तर एकालाही त्यांचं बोलणं कळलं नसावं असं वाटत होतं. पाटील तर चक्क कानात काड्या घालत डोळे मिटून बसले होते.



मग शाल सावरत आचार्य पुन्हा म्हणाले, ' भगवान श्रीकृष्णानं चातुर्वर्ण्य सांगितला. धर्माचे चार भाग केले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य शूद्र असे ते चार भाग. या चार भागांची कामं वाटून दिली. ब्राह्मणांकडं ज्ञानार्जन, ज्ञानसाधना सोपवली. क्षत्रियांकडे संरक्षणाची व्यवस्था दिली. वैश्यांनी व्यापारउदीम सांभाळावा असं सांगितलं आणि शूद्रांनी वरच्या तिन्ही वर्गाची सेवा चाकरी करावी, त्यांच्याकडून सांगण्यात येतील ती कामं करावी असं सांगितलं... पण मला सांगा, जसं देवांनी सांगितलं तसं आज पाळण्यात येतंय का ? देवांच्या आज्ञेचं पालन होतंय का ? नाही. अजिबात नाही.

'आपल्या हिंदू धर्माला आज अनेक शत्रू निर्माण झालेले आहेत. त्यात इतर धर्मांचा त्रास जरी असला तरी आपल्या धर्माच्या खालच्या गटाकडूनही काही कमी त्रास नाही. आपल्याच आढीतले. काही जण सडलेले आहेत. आणि पूर्ण हिंदुधर्माला सडवायला निघालेले आहेत... बंधूंनो, आपल्यातल्याच काही लोकांकडून आपल्याच धर्माचं खच्चीकरण चालू आहे. ही खच्चीकरणाची प्रक्रिया अशीच चालत राहिली तर एक दिवस आपला धर्म नामशेष झालेला असेल. खलास झालेला असेल...' अचानक आचार्यांचा स्वर कठोर झाला. पाटलांनी काडी कानाबाहेर काढून एकदम डोळे उघडले. आचार्यांना या गोष्टीचं समाधान वाटलं.

पण आपला स्वर खाली न आणता आचार्य सांगू लागले, ' आज आपण जे इथं उजळ माथ्यानं हिंडतोय, ते उद्या कुठं तरी दुबेळक्यात तोंड लपवून बसलेले असू. आपल्याला आपलाच जीव वाचवताना नाकी नऊ येतील...'

पाटील आता रोखून आचार्यांकडे पाहू लागले होते. शितोळे मास्तरांनी एक मांडी मोडून दुसरी मांडी घातली होती.

' आज आपल्याला आपला धर्म वाचवणं खूप आवश्यक झालेय. बाह्य शत्रूंपासून आपण नंतर निपटू शकतो, पण सध्या अंतर्गत शत्रूपासून बचाव करणं महत्त्वाचं झालंय. आपण जागं होणं खूपच आवश्यक आहे. स्वाभिमानाचा फुकाचा आव बाळगणं सोडून टक्क डोळे उघडून डोळसपणे या शत्रूंचा नायनाट करणं गरजेचं आहे...

' सध्या मी याच कामासाठी गावोगाव फिरतो आहे. झोपलेल्या हिंदूंना जागं करण्याचं पवित्र कार्य करीत आहे. त्याच कामा-

साठी मला या गावात याव लागलय आजकाल तुमच्या भागात या दलिताच्या आदोलनानी चागलाच पेट घेतलाय नाही त्या अन्याय्य मागण्यासाठी, आपल्यासारख्या उच्चवर्गीयाना खाली खेचून, नाक टेचण्यासाठी हे आदोलन सुरू झालय आणि आपल सरकारही त्यानाच मदत करतय दलिताच्या बाजून ठराव माडले जातायत, पास केले जातायत...

'हे कालचे आपली चाकरी करणारे लोक, आपले गुलाम, आज आपल्याच डोक्यावर चटणी वाटू पहातायत या दलितानी आपल्यासारख्याच जगण हराम करून टाकलय. याचा बदोवस्त वेळीच केला नाही तर उद्या आपल्यालाच आपल्या इथ गुलाम म्हणून जगावं लागेल हे म्हणतील तसं आपल्याला नाचाव लागेल...' त्यानी बोलता बोलता पाटलाकडे हात केला, 'हे तुमच्या गावचे पाटील आहेत, पण उद्या असतीलच असं नाही उद्या कदाचित याच्या जागेवर एखादा महार, माग माणूस बसलेला दिसेल'

'काय सागताय काय गुर्जी?' पाटलांनी आश्चर्यानं विचारलं

'खर तेच सांगतोय... अस होऊ शकत दिवसच तसे आलेत...'

'अवो पर आमच्या गावातली म्हारमागं आशी न्हाईत'

'आज नसतील पण उद्या होतील या जातीच खूप खतरनाक आहेत गोगलगाय नि पोटात पाय आज हे शात असले तरी उद्या अचानक दगा द्यायला कमी करणार नाहीत त्यात आपले सरकार त्याच्या मदतीला आहे दलिताच्या बाजूचे कायदे बनवण्यात आले आहेत त्याना अनेक सवलती देण्यात आलेल्या आहेत सरकार स्वत:च्या हातानं या लोकाना आपल्या डोक्यावर चढवतय अहो, साधी गोष्ट सागायची म्हणजे याना महार, माग म्हणण मुश्किल झालंय जातिवाचक शब्द उच्चारले म्हणून सरकार शिक्षा देत. आता मी ब्राह्मण आहे ब्राह्मण ही माझी जात आहे मला कुणी ब्राह्मण म्हटल्याचा अजिवात राग येत नाही तसा राग येण्याच कारणच काय? ज्या जातीत तुम्ही जन्माला येता, त्याच जातीच्या नावान तुम्ही ओळखले जाता. त्यात अयोग्य ते काय? पण याच मात्र अस नाही याना जातीवरून काही बोलल की, तो लगेच गुन्हा ठरतो आणि सरकार आपल्याला वाटेल ती शिक्षा देत...'

'पर आमीतर आजूनबी म्हारामागान्ला म्हारमागच म्हन्तो...' एक फेटेवाला माळकरी म्हणाला

'म्हणजे तुमच्या गावात अजून हे दलित उद्धाराच लचाड आलेल दिसत नाही. पण उद्या ते येणारच नाही अस नाही. तुम्हाला थोडा उशिरा का होईना पण या गोष्टीचा त्रास होणारच... माझ्यासमोर घडलेल एक साध उदाहरण सागतो, म्हणजे हे दलित किती बनेल झालेत हे लक्षात येईल तुमच्या.

'एका गावात एका दुकानदाराकड काही महाराच खात होतं. पाहिजे त्या वेळेस पाहिजे ते सामान उधारीवर घेऊन जायचे हे लोक. अस वर्ष-दीडवर्ष चालल या काळात या महारानी एकही पैसा दिला नाही दुकानदाराला दुकानदार अगदी विश्वासावर सामान देत राहिला. पण तो तरी नुसत्या उधारीवर किती सामान देत राहाणार? सर्वांची मिळून दहापधरा हजाराची उधारी झाली होती दुकानदाराची दिवाळ निघायची वेळ आली शेवटी त्यानं या लोकामाग उधारीचा तगादा सुरू केला... माझे पैसे द्या म्हणू लागला, तर या महारांनी काय कराव...?'

आचार्यांनी बैठकीला विचारल पण एकानंही तोड उघडल नाही. शेवटी आचार्यांनीच उत्तर दिल,

'तुम्हाला सांगतो, या महारानी दुकानदाराविरुद्ध कोर्टात खोटीच केस लावली की, हा दुकानदार आम्हाला महार म्हणाला. आमच्या जातीचं नाव उच्चारून आमच्या भावना दुखावल्या झाल, दुकानदार अडकला आज पाचसहा वर्षं झाली या गोष्टीला दुकानदार अजूनही कोर्टात खेटे घालतोय आधीच तो उधारीच्या दहापधरा हजाराना बुडाला होता वर आता कोर्टापायी वीसपंचवीस हजाराचा खड्डा पडलाय त्याला. आणखी हा खड्डा किती वाढेल सागता येत नाही तो दुकानदार कोर्टाला ओरडून सागतोय, की मी अस काही म्हणालो नाही. माझे उधारीचे पैसे थकलेत म्हणून मी फक्त पैसे मागितले... पण कोर्ट आणि सरकार त्याच ऐकायलाच तयार नाहीत...'

'चीभन, एवडी माजली ही म्हार...?' पाटील

'होय... अशा बऱ्याच घटना घडतायत. सरकार याचीच बाजू घेतय... उद्या जर तुमची पाटीलकी याच्या हातात गेली तर आश्चर्य वाटू नये आणि मुळात अल्पसख्याकाना अधिकाराची पदं देण्यात यावीत अशीही तरतूद कायद्यात आहे...'

पाटील डोक खाजवू लागले शितोळे मास्तरानी बोलण्याची सधी उचलली, 'झालय अस खरं. पण या जाती काय आमी पाडल्या काय? या तर देवादिकानी पाडलेल्या जाती आहेत ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणं जाती पाडल्या गेल्या त्या त्या जातीनीच माणस ओळखू येऊ लागली अहो, आज जर याना महार, माग, चाभार म्हणायच नाही तर मग म्हणायचं काय? दलित म्हणायचं का नुसतं? मग या दलितादलितातही भेद आहेतच की त्याच्या जातीची नाव न घेता जर याच्याबद्दल बोलायचं ठरल तर कस बोलणार? साध उदाहरण घ्या, चपला शिवायच्या असल्या किंवा, दोर वळून घ्यायचा असला तर दलितान किंवा हरिजनान दोर वळला, चपला शिवल्या अस म्हणायचं का? तुम्हीच सागा गुरुजी...'

मास्तरानी आपल्यालाच विचाराव हे आचार्यांना आवडल नाही पण त्यानी वरवर होकारार्थी मान हलवली.

शितोळे मास्तरानी उत्साहान बोलण चालू ठेवलं 'पूर्वी अस नव्हत बघा. हे दलितफलित शब्द जन्मालाही आले नव्हते. प्रत्येकजण आपापल्या पायरीनं जगत होता. पण गाधीजीचा जन्म झाला आणि सारा खेळखडोबा सुरू झाला त्याना काय कळवळा आला कुणास ठाऊक, पण त्यानी या लोकाना उचलून धरल हरीचे जन म्हणून कौतुक करू लागले आणि तेव्हापासूनच हे लोक माजले...'

'पण आज तेच लोक तरी कुठं त्या गाधीजीना मानतायत...?' शास्त्रीबुवा मधे पडले 'आंबेडकराची आणि गाधीची बोलणी फिसकटली तेव्हापासून हेच लोक गाधीना शिव्या मोजू लागले... आज एकाही हरिजनाला गाधीबद्दल आदर वाटत नाही...'

'आणि उच्चवर्णीयाना तर तो आधीपासूनच वाटत नाही...' शितोळे मास्तर

विनोद झाल्यागत हसले

आचार्य मनातून चिडले होते. नकळत ते या बोलण्यातून वेगळे पडले होते शालीच टोक उचलत, त्यानं डोळे पुसत त्यानी बोलणं ताब्यात घेतल. 'जाऊ द्या, या बैठकीचा तो विषय नाही...आपल्याला या दलिताच्या डोईजडपणावर काय उपाय काढता येतील ते पहायला हवं आपला खरा धर्म कसा टिकवता येईल ते पहायला हव... आज जर आपण गप्प राहिलो तर आपला भविष्यकाळ निश्चितच अंधारमय आहे हे तुमच्या भागात पेटलेल आदोलन काही दिवसातच साऱ्या देशभर फैलावेल. त्यात तुमच्याआमच्यासारख्याचा बळी जाईल आणि उद्या इथ सार महारामांगाचं राज्य दिसेल हे अस होण्याआधी आपणच काही-तरी करण आवश्यक आहे आपण हातात काही बागड्या भरलेल्या नाहीत हे दाखवण आवश्यक आहे... तरच आपण, आपला देश, आपली सस्कृती जिवंत रहाण शक्य आहे...'

'काय करायच तुमी बोला...' पाटीलकी जाण्याचा किडा डोक्यात वळवळू लागलेले पाटील म्हणाले, 'आमी बगतोच एकेकाकड सायला गधंच लावतो...'

'हा. हा. जरा धीरानं पाटील...' आचार्यांनी सागितल 'घाई केली तर उगीच काही बिलामत येईल...आपण दोन दिवसां-नंतर त्याच्यावर विचार करू...' म्हणत आचार्यांनी ती बैठक बरखास्त केली

दोन दिवसानी पुन्हा बैठक बसली तेव्हा आचार्य तिथं नव्हते कुठ गेले कुणालाच माहीत नव्हत पण त्याचा निरोप शास्त्री-बुवानी पाटलासाठी आणला होता. तो त्यानी पाटलाच्या कानात सागितला आणि पाटलानी मोठ्यानं डरकाळी फोडली, 'चला रं ह्येच्या मायला, पेटवून द्या म्हारवाडा. लई माजल्यात भोसडीच साऱ्यास्नीच जाळून टाका चला...'

त्याची ही डरकाळी नेमकी रग्यान ऐकली होती आणि तो म्हारवाड्याकडं धावत सुटला होता.

थोड्याच वेळात पाटलाच्या हुकुमावरून गावकरी जमले होते आणि ऐन सांजवेळी महारवाड्याची होळी करण्यात आली होती

बरेच महार पळून गेले होते आज तेच ऐन मध्यानरात्रीचे पाटलाच्या दारात आले होते त्यांना वाटत होतं ते बदला घ्यायलाच आलेले आहेत.

पाटील मनातनं थोड हबकलेच होते

आसपासची काही घरंही जागली होती पण एकाचीही बाहेर पडायची हिम्मत नव्हती म्हारं एवढ्या रात्रीची गावात शिरतात म्हटल्यावर निश्चितच काहीतरी धोका आहे असं प्रत्येकाला वाटत होत आणि जागलेला प्रत्येकजण आपण त्या दिवशी किती खोपटं पेटवली याचा हिशोब करू लागला होता.

¤

गडी परत आला.

'मालक, त्ये म्हन्त्यात लईच इशेष काम हाय मुसुलमानानी कायतरी आफत आन-लीया जात बदलायची...'

'तिच्यायला...' म्हणत पाटील ताड्कन उठले समोरच्या भिंतीजवळ गेले टागलेली बदूक काढली बदुकीमुळ त्याच्या अगात वेगळाच जोम आला, 'ही लोकं चिकटा-यलाच बगत्यात. कायतरी येगळाच डाव दिस्तूय तसं काय आसंल त गोळ्याच घालतो एकेकाला...'

एका हातात उगारल्यासारखी बंदूक धरून पाटील दमदार पावलं टाकत बाहेर आले. बाहेरचं मोठं दार उघडण्यात आलं गड्यानं पुढं होऊन कंदिलाचा प्रकाश आले-ल्यांच्या तोंडावर टाकला. पाटलानी सर्वांवर बंदूक रोखली आणि चापावर बोट ठेवत दरडावलं, 'काय काम हाय ताज्या ?'

'मालक... मालक... जातीवर आफत आलीया, सारं जातभाई जात बदलायची म्हन्त्यात...'

'जात बदलायची ?'

'व्हय मालक, सत्तारन फूस लावली साऱ्यान्ला अमलूसुदिक जात बदलून मुसुल-मान व्हाया निगालाय...'

'का ?'

'आपल्या जातीत काय दम न्हायला न्हाई म्हन्तूय त्यो...' ताज्याला आपल्या जातीचीच माणसं त्रास देतात हे पाटलासमोर सागणं योग्य वाटलं नाही त्यामुळ त्यान वेगळच उत्तर दिल.

'कितीजन बदलनार हाईत जात ?'

'तीसचाळीस जन हायती...'

'सारीच का बदलत न्हाईत !' पाटलाना खात्री झाली की, ताज्याच आपल्याकड खरच वेगळ काम आहे. बदला वगैरे बाता त्याच्या डोक्यात नाहीत. त्यामुळ त्यानी बदूक खाली घेत कपाळावर आठी चढवत विचारल

ताज्या गोंधळला, 'मालक, परत्येकाला सोताची जात प्यारी आस्ती आमी आमची जात कशी सोडायची ?'

'आरं सोडायची, त्यात इशेष काय ?' पाटील सहज म्हणाले.

'आस कस म्हन्ता मालक...'

पाटील वैतागले, 'ते सोड, माज्याकडं कश्यापायी आलाय त्ये साग...'

ताज्या हात जोडत झुकला 'मालक, तुमी गावच पाटील, गावाचं धनी, बाप हायसा आमच, तुमीच आपल्या लेकरानवर ध्यान ठिवायचं... तुमी त्येस्नी समजावा, त्येस्नी जात बदलू दिऊ नका...'

'मला काय घ्येनंय र ताज्या ?... ज्याचा त्यो मनाचा राजा काय झक मारा-यची, ती तुमची तुमी मारा, मधीच मला का उगी वैताग... ?'

पाटील अस बोलतायत म्हटल्यावर ताज्या बावचळून गेला 'आसं म्हनू नका मालक, त्या पोरास्नी आवरा आपल्या जातीच नाक खाली जाईल...'

पाटील उखडलेच 'त्येची साळा मला शिकवू नगस मला जात कळती. आर तुमाला कोन किमत देतय का ? आ ? तुमचा इच्यारबी करत न्हायी कुनी जा, काय करायचं आसल त्ये तुमच तुमी करा. म्हारवाडा मेला म्हून गावाला सुतक पडनार न्हाई आन एक ध्यानात ठेव, कवावी उठून पाटलाकड जाया, पाटील म्हजी गावाची दाढी उपटनारा न्हावी न्हव. मला माजी कामं हाईत जावा...'

ताज्याच तोंड उतरलं एकदम. पाटील बदूक खाद्यावर आडवी टाकून वाड्यात शिरले वाड्याचा भलामोठा दरवाजा लावून घेण्यात आला

ताज्या आणि त्याच्याबरोबर आलेले इतर बेवारस असल्यागत महारवाड्याकडं चालू लागले

¤

सत्तारन सकाळीच तालुक्याच्या गावी निरोप पाठवला होता त्याप्रमाणे दुपार ढळणीला लागताना, धुराळा उडवीत आणि

वाट काढीत तालुक्याच्या गावी जीपा आल्या. गावाच्या बाहेरूनच माळरान ओलांडून, खंडोबाच्या देवळापुढं उभ्या राहिल्या. सत्तार देवळातच होता. तो पहिल्यादा बाहेर आला. त्याच्या पाठोपाठ अमलू वगैरे.

जीपांमधून बरेच जण उतरले. दाढीवाले बऱ्याच जणाच्या कपाळावर नमाजीचे काळसर, तावूस घट्टे दिसत होते. काही जणांच्या नाकांच्या शेंड्यावरसुद्धा तसेच घट्टे होते. बहुतेकानी शेरवान्या आणि चुस्त पायजामे घातले होते. काहीनी लुंग्या आणि झब्बे प्रत्येकाच्या अंगाचा गर्द अत्तराचा घमघमाट सुटला होता

आलेल्यातल्या प्रमुख दाढीवाल्यानं विचारलं, 'कितने लोग हैं... ?'

सत्तारनं माहिती दिली. 'तीसजने हय सब, औरतान् छोकऱ्या मिलाके... आन एक छोटा बच्चा...'

त्या प्रमुखान मान हलवली. 'हा, बिठा दो गाडीमें सबको...'

न्यायला आलेल्या मिर्झासाहेबाच्या चेल्यासमवेत जेव्हा सर्वजण गाड्यातून बसले, तेव्हा अमलू आणि त्याच्या साथीदाराच्या मनात आदराचं भरत आल या माणसानी आपल्याला माणूस म्हणून शेजारी बसवून घेतल याचंच सर्वांना अप्रूप वाटत होतं

गाड्या पुन्हा माग वळून तालुक्याच्या गावाकड धावू लागल्या गावाकड कुणी वळलच नाही.

तालुक्याच्या गावी मुसलमान मोहल्यातल्या एका मोठ्या वाड्यात सर्वांची उतरण्याची सोय करण्यात आली. स्त्रियाची वेगळी व्यवस्था करण्यात आली. सर्वांना न्हाऊमाखू घालण्यात आल. स्त्रियाना साड्या, चोळ्या, बुरखे आणि पुरुषाना पायजामे, कुर्ते, टोप्या देण्यात आल्या सर्वांच्या अंगभर अत्तर चोपडण्यात आली. डोळ्यांतून सुरम्याच्या काड्या ओढण्यात आल्या. सर्वजण आपली ही नवी रूप पाहून हरखून गेले. रुबाबदार आणि वेगळवेगळच वाटल सर्वांना. काहीजण तर एवढ्या सरजामानं अवघडून गेले.

संध्याकाळ दाटली

सत्तारनं सांगितलं, 'तुमी हितच थावा. आमी नमाजीला जावून येतो...काय लागऋंसवरलं त हितल्या गड्यास्नी सागा...'

मग तिथ असलेले सारे मुसलमान नमाजीसाठी निघून गेले.

रंग्या अमलूच्या कानाला लागला, 'आर आपल्या बाया कुटशीक हाईत? आल्यापास्न त्येचा तपास न्हायी...'

'कुनास दकल...'

रंग्यानं मग एका म्हाताऱ्या गड्याला गाठलं, 'आमच्या बाया कुटंयत वो?'

त्या गड्याला त्याचं बोलणं नीट कळल नसावं त्यान प्रश्नार्थक नजर केली रंग्याच्या लक्षात आलं, याला आपली भाषा कळत नाही मग त्यानं वेगळ्याच भाषेत विचारलं, 'वो... आमच्या, हमऱ्या बाया किदर-हाय? बाया... बाया...' त्यानं हातानं हवेतच बाईचा आकार काढला. तेव्हा कुठं म्हाताऱ्याच्या लक्षात आलं, 'हां... 'हां... औरतें? है, अन्दर जनानखानेमें...'

'चलो, दावो मेरेकू...' रंग्यानं आतल्या दिशेनं एक पाऊल पुढं टाकल, तसं त्याला अडवत म्हातारा म्हणाला, 'अं, हं, वहाँ मर्द नही जा सकते. आप उनसे नहीं मिल सकते। आप यहींपर बैठे रहिए...'

रंग्या चरफडत मागं वळला, 'आयला ह्ये काय लफडं हाय, आमच्याच बायकास्नी आमी भेटायचं न्हाय व्हय?...'

बाकीचे काहीच बोलले नाहीत.

कुणी तरी गड्यानं ताज्याच्या नातीचं रांगतं पोरगं आणून रंग्याजवळ सोडलं. मग रंग्या त्यालाच खेळवत बसला.

¤

नमाज झाली असावी. कारण वाड्यात बरीच माणसं जमू लागली. मिर्झासाहेबही आले. बुरखे पाघरलेल्या किंवा चादरी ओढलेल्या बऱ्याच मुस्लिम स्त्रियाही येऊन जनानखान्यात शिरू लागल्या.

नंतर काही वेळातच धर्मांतराच्या समारंभाला सुरुवात झाली

वाड्याच्या भल्यामोठ्या दिवाणखान्यात सर्व जण जमले होते दिवे झगमगत होते खाली गाद्या अंथरल्या होत्या. तक्के, लोड ठेवण्यात आले होते मिर्झासाहेब एका भिंतीच्या कडेला बसले होते. त्याच्याशेजारी एक-दोन आणखी थोर माणसं त्याच्या समोरच धर्मांतर करणारे पुरुष. त्याच्या मागं गर्दी करून, प्रेक्षक किंवा साक्षीदार म्हणून आलेले मुसलमान पुरुष. मिर्झासाहेबांच्या डाव्या हाताला छतापासून खालपर्यंत एक झिरझिरीत पडदा सोडला होता. त्यातन आरपार दिसत होत. पडद्याशेजारी धर्मांतर करणाऱ्या स्त्रिया, ताज्याच्या नातीच्या मांडीवर तिच पोरगं. त्याच्यामागं मुसलमान स्त्रिया...

गंभीर, भरीव वातावरण पसरल होतं. अत्तरांचा घमघमाट सुटला होता त्यातच मिर्झासाहेबासमोर पेटवलेल्या सुगंधी ऊदाचा धूर मिसळत होता. प्रेक्षक म्हणून जमलेले मुसलमान एकमेकांत खुसफुसत, खेळातल्या बाहुल्याकड पहावं तसं धर्मांतर करणाऱ्या लोकाकडं पहात होते धर्मांतर करणारे सकोचून खाली माना घालून बसले होते. जमलेले प्रतिष्ठित मुल्लामौलवी एकमेकाच्या कानात कुजबुजत होते.

अचानक मिर्झासाहेबांनी विचारलं, 'अरे भई, आ गये सब लोग...'

'हा... हां... सब आ गये हैं...' एक दोन आवाज उठले

'शुरू किया जाय?'

'हां... हा... आप शुरू कीजिये...' पुन्हा काही आवाज.

सर्वजण सावरून बसले. मिर्झासाहेबानी माडी मोडून पालथी मारली. शेरवानीचा गळा चाचपून नीट केला. खाकरले...

धर्मांतर करणाराची हृदय धडधडू लागली. बाकीचेही उत्सुकतेने पाहू लागले, कारण प्रसग दुर्मिळच.

मिर्झासाहेबाचा गंभीर आवाज उमटला, 'बिस्मिल्लाहिर्रहमानिर्रहिम...' त्याच्यापुढ त्यानी कुराणातली एक आयत म्हटली आणि नतर सागितलं, 'मुसलमानोंको दिनको इस्लाम कहते है। इस्लाम का मतलब सरको झुकाना है अल्लाह के सामने, सिर्फ अल्लाह के सामने...' मग मिर्झासाहेबानी इस्लाम काय आहे याच्यावर छोटस भाषण दिलं.

भाषण सपल्यावर त्यानी सागितल, 'अब फातिहा दी जायेगी...'

सर्व मुसलमानानी हाताच्या ओंजळी केल्या. सत्तारन अमलूला हाताच्या ओजळीचा इशारा केला. अमलून तशी ओजळ केली. त्याच पाहून दुसऱ्यानी तसच केल. पडद्याआड एक-दोन मुसलमान बायकांनी इतर जणीना ओजळ कशी पसरावयाची ते सागितलं.

मग फातिहाला सुरुवात झाली. मिर्झासाहेब गभीर आवाजात सूरे म्हण लागले,

'बिस्मिल्लाहिर्रहमानी र्रहिम, अल्हमदुलिल्ला हे रब्बिल आलमीन...' मग मधेच मिर्झासाहेब थांबले, सर्वजण एका सुरातच दरूद म्हणू लागले, मग ते थांबले. पुन्हा मिर्झासाहेब सुरे म्हणू लागले, नंतर आवाज बंद करून फक्त ओठातच काहीतरी पुटपुटत राहिले आणि मग विशिष्ट वेळानंतर सर्व मुसलमानांनी स्वत:च्या ओंजळी स्वत:च्या चेहऱ्यावरून फिरवल्या. अमलू आणि त्याच्या साथीदारांनीही तसंच केलं. पडद्यामागे बायकांनीही तसंच केलं. पण धर्मांतर करणारांपैकी एकालाही हे काय चाललंय, काय म्हटलं जातंय अजिबात कळलं नाही.

पुन्हा मिर्झासाहेब बोलू लागले, 'इस्लामकी बुनियाद पांच रुक्नोंपर हैं, रुक्न यानी उसूल. इसमें पहला रुक्न है कलमा, दूसरा नमाज, तिसरा रोजा, चौथा जकात और पांचवा है हज्ज... इस्लामपर ईमान लाने के लिए इन रुक्नोंकी सख्त जरुरत है. अब हम सबसे पहले कलमें कहेंगे, मेरे पिछे आप...' त्यांनी धर्मांतर करणारांकडं हात केला आणि मधल्या पडद्याकडेही इशारा केला, 'मेरे पिछे कलमे कहोगे... अंदर की मुसलमान ओरतें इन इमान लानेवाली औरतोंको समझा दें की वे मेरे पिछे कलमे कहेंगी...'

अमलूला आणि त्याच्या साथीदारांना काही कळलंच नाही. तेवढ्यात सत्तार मोठ्या आवाजात म्हणाला, 'त्ये जसजसं म्हन्त्याल तसतसं तुमीबी त्येंच्या पाटनं म्हना...' अमलूनं मान डोलवली. आतल्या बायकांनीही ते ऐकलं.

मिर्झासाहेब म्हणू लागले,

'बिस्मिल्ला...'

'बिस्मिल्ला...' जात बदलणारे एका सुरात म्हणाले. आतल्या बायकाही तसंच म्हणाल्या.

'हिर्रहिमा...'

'हिर्रहिमा...'

'निर्रहिम...'

'निर्रहिम...'

'अव्वल कलमें...'

'अव्वल कलमें...'

आणि मग हे पाठांतर पाच कलमे म्हणून होईपर्यंत चाललं. आपण काय म्हणतोय ते कळत नसलं तरी प्रत्येकजण मिर्झासाहेबांच्या पाठोपाठ तसंच म्हणण्याचा प्रयत्न करत होता. चुकतमाकत कलमे म्हणत होता.

कलमे म्हणून झाले तेव्हा मिर्झासाहेबांनी जाहीर केलं, 'अब यह लोग मुसलमान हो गये...'

जमलेल्या प्रेक्षकांनी टाळ्या वाजवल्या.

आणि मग मिर्झासाहेबांच्या हस्ते सर्वांना हार घालण्यात आले. पडद्याआड स्त्रियांना गजरे देण्यात आले. इतरांना फुलं दिली गेली. हार घालताना प्रत्येकाला मिर्झासाहेबांनी त्यांची नवी नावं सुनावली. बायकांचीही नवीन नावं जाहीर करण्यात आली. कुणाला अब्दुल करीम करण्यात आलं होतं तर कुणाला मुहम्मद गफार. कुणाला सायराबानो करण्यात आलं होतं तर कुणाला हाफिजाबेगम. अमलूचं नामकरण इब्राहीम लतीफ करण्यात आलं होतं तर त्याच्या पोराचं जमील. रंग्याला सय्यद हुस्सेन नाव देण्यात आलं.

बहुतेकांना आपली नावंही लवकर कळली नाहीत. काहींना तर स्वत:ची नावंही उच्चारता येईनात.

मिर्झासाहेबाच्या चोपड्यात सर्वांची नावं उर्दूत टिपण्यात आली. आंगठ्यांच्या निशाण्या घेण्यात आल्या.

मग दुवा म्हणण्यात आल्या. त्यात सर्वांची नवी नावं गुंफून दुवा म्हटल्या गेल्या आणि अल्लाजवळ सर्वांच्या सुखाची, सन्मार्गाची मागणी करण्यात आली.


सर्वांना मिठाई वाटण्यात आली.

जमलेल्या सर्वांनी एकमेकांशी हातमिळवणी केली. गळाभेटी झाल्या.

आणि धर्मांतराचा मुख्य सोहळा संपला.

नंतर अस्सल तुपातल्या मटनाच्या पुलावाची जेवणं झाली. एकेका ताटात चारचार-पाचपाच जण एकत्रच जेवायला बसले. प्रत्येक ताटात एकेका धर्मांतर करणाराला सामील करून घेण्यात आलं. खुद्द मिर्झासाहेबांच्या ताटातच अमलू जेवायला बसला.

प्रेक्षक ढेकरा देत आणि सुवासिक पानं चावत परतत होते तेव्हा अमलू आणि त्याचे साथीदार अगदी भारावलेल्या मन:स्थितीत



अवघडून बसले होते. एवढी माणुसकी, अदब, आपुलकी त्याना आयुष्यात पहिल्यादा मिळत होती

¤

रात्री सर्वांची मुक्कामाची सोय तिथंच करण्यात आली होती.

बरीच रात्र झाल्यावर सत्तार अमलूजवळ येऊन बसला. एकाच हातात दोन बिड्या घेऊन त्या त्यानं एकाच वेळी पेटवल्या एक बिडी अमलूला देत विचारल, 'कसं वाटतंया आता... ?'

'बरं वाटतंय...'

'कशी वाटली आमची जात ?'

'चांगली हाय, पर कार सत्तार, आमच्या बायकापोराचं काय व्हनार र ?'

'काय व्हनार म्हजी ?'

'आर म्या मुसलमान झालो, पर माझी बाईल...'

अमलू कसला विचार करतोय हे सत्तारच्या लक्षात आल. 'हा, हां, आलं ध्येनात. आत्ता, तिचा इच्यार सोड...'

'का ?' अमलूला थोडं आश्चर्य वाटल.

'आमी तुमचं नव लगीन लावून दिऊ...'

'ह्या, कायतरीच काय ! माजी बाईल काय म्हनल...'

'सागितल ना, आत्ता मागल सार सोडून द्येयाच, आत्ता तुमी मुसुलमानागत वागायच. तू मुसुलमान झालायस म्हनल्यावर तुला चार बायका करता येत्याल...'

'चार बायकास्नी काय करायचं ? हित एकीच भागवताना जीव मेटाकुटीला येतूय, आन चौगीच काय करायच ? माजी आपली एकच बरी. माज्या बायकूचा माज्यावर लई जीव हाय रं... लई चागली हाय विचारी.' अमलूला बायकोचा उमाळा आला.

सत्तार निरस स्वरात म्हणाला, 'आत्ता तिच नशीव तिच्याबरुवर. ती दुसऱ्या धरमाची राह्यली. तू दुसऱ्या धरमाचा झाला संबंद सुटला तुमचा...'

'आस कस हुईल ? म्या लगीन केलया तिच्यासंगं...' अमलू थोडासा उसळला.

'त्ये दुसऱ्या धरमापरमानं. मुसुलमानात त्या धरमाच्या रिवाजाला काय किंमत न्हाय. आत्ता त्ये चालायचं न्हाय. तू इच्यार सोड तिचा. आन नव लगीन कर. आमी नव्या लग्नाची येवस्ता करून देतो वाटल्यास. बोल हाय तयार ?'

अमलू गप्प राहिला. हे विचित्र वाटल त्याला बराच वेळ विचार करत राहिला तो आणि मग बोटाखाली बिडी चिरडून विझवत त्यान विचारल, 'आन समजा, मला तीच बायको पायजो आसल त ?'

'त तिलाबी मुसुलमान व्हाया लागल...'

'आन ती न्हाय झाली त ?'

'त तिचा नाद सोडाया लागल'

अमलू पुन्हा गप्प झाला.

सत्तारच म्हणाला, 'ती तशीबी जात न बदलता तुज्यासग ऱ्हाया लागली तरी काय वाईट ऱ्हायी पर मला न्हाय वाटत ती तुज्यासग ऱ्हाईल म्हनून...'

'आर बायकू हाय माजी. ऱ्हाईलच माज्यासग...'

सत्तार कंटाळल्या आवाजात म्हणाला, 'बर, त्ये जाऊदे, सकाळी सारीजन तयारीत ऱ्हावा. ऊदया सगळ्या मर्दाच्यांची खत्ना करायचीया...'

'म्हजी ?'

सत्तारन डाव्या हाताच्या तर्जनीवर उजव्या हाताच्या तर्जनीन आपटून छाटल्याची खूण केली, 'सुन्ता करायची.'

'बापरे, म्हजी कापून टाकायच ?'

'न्हायर, फकस्त फुडल कातड मागं बादून टाकायच म्हजी मग तुमी खरे मुसुलमान झाले...'

'आरंपर, मरायबिरायची येळ...'

'न्हायबा. आमी कुट मेलो. आमचीबी झाली न्हव...'

अमलून एकदम बारीक आवाजात विचारल, 'फकस्त पुर्षांचीच करनार व्हय ?'

'मग ?'

'न्हाय, बायका मान्साच कस ?'

सत्तार खो खो हसत सुटला. अमल गोंधळला.

'कारं हसाया काय झालं ?'

'आरं काय खुळ्यागत इच्यारतूयास तू...' सत्तार हसतच म्हणाला, 'त्येस्नी ह्ये कुटं आसतं ?' त्यानं मनगट हलवल.

तरीही अमलूच्या लक्षात आल नाही. त्यान पुन्हा विचारलच, 'आरं पर, बायकाचीबी सुन्ता करत अस्त्यालच ना ?'

सत्तार बराच वेळ मग हसत राहिला. अमल त्याचं तोड पहात राहिला.

अचानक हसू थाबवून सत्तार म्हणाला, 'आर हा, सागायच ऱ्हायलंच...'

'काय ?'

'सुन्ता झाली की मग तुमा सर्वास्नी पैसं मिळत्याल आन काय भाडीकुंडीबी मिळत्याल...'

'खर ?'

'व्हय. आन एक ध्यानात ठेव, तुमाला जे पैस मिळत्याल त्यातल परत्येकानं पाचशे-पाचशे माज्याकड द्यायाच बरं का !'

'का ?'

'आर आमची दलाली न्हाय का त्येंच्या-मंदी आमी एवड क्येल त्याला काय फळ नको का ? चारपाचजन हाईत तुमाला मुसलमान करनार. त्येंच्यातल्या परत्येकाला कमीतकमी शभरशंभर त रुपयं मिळालं पायजेत, खर का न्हाय ?'

अमलू गोंधळलेल्या नजरेन त्याच्याकडं पहात राहिला फक्त

बऱ्याच वेळान त्यानं विचारलं, 'सुन्ता झाल्याव मग काय करायच ?'

'मग आपल्या गावाला जावून ऱ्हायच'

'आर पर गावकरी ऱ्हावू देत्याल का आमास्नी...?'

'त्येचा बाप ऱ्हावू दील आत्ता काय तुमास्नी कसली डर नाही. तुमच्या केसालाबी ढका लागला तर सारं जगातल मुसलमान तुमच्या पाटीशी उभ ऱ्हात्याल...तुमी कदीबी आवाज द्या, सार तुमच्यासाठी धावत येत्याल...'

'खर ?'

'अल्ला कसम...'

'पर गावात जावून खायाच काय र आमी...'

हळूहळू सारी येवस्ता हुईल रं...

'आन आमची घरं ?'

'ती बी मिळत्याल की बादून...बरं झोप आत्ता म्या जातो. सकाळी तयार ऱ्हावा...'

सत्तार गेला आणि अमलू विचार करत पडून राहिला.

¤

सकाळी सर्वांच्या अंघोळी झाल्यावर प्रत्येकाला एकएक लुगी देण्यात आली. सर्वांनी लुंग्या गुडाळल्या.

सत्तारन सर्वांना एका मोठ्या खोलीत आणलं. तिथ आधी बरेच मुसलमान येऊन

बसले होते. स्त्रिया कुठच दिसत नव्हत्या. एक खलिफा आपला सारा जामानिमा घेऊन बसला होता.

सत्तारन विचारल, 'कोन बस्तय आदी ?'

सर्वजण एकमेकाकड पाहू लागले त्याना बुचकळ्यात पडलेलं पाहून सत्तारच म्हणाला, 'अमलू तूच बस आदी...'

'कुट ?'

'खलिपासमूर...' सत्तारनं त्या मुसलमान न्हाव्याकडं बोट दाखवल.

'त्यो तर न्हावी दिस्तूया...'

'व्हय...'

'ह्यो कशी सुन्ता करणार ?'

'त्यो सादासुदा न्हावी न्हाई. खलिपा म्हन्त्यात त्येला...'

अमलू सत्तारच्या कानाला लागला, 'त्यो हितच सार उरकनार का ?'

'व्हय !'

'आरं पर हितं एवडी लोक हाईत...'

'त्यास्नी काय लाजायच आपलीच हाईत ती..'

'माजा पोरगा, पुतन्याबी हाय की...'

एवडं लाजून कस चालल ? मर्दच हाईत न्हव त्ये...'

कसाबसा अमलू खलिफासमोर बसला. लगेच चार मुसलमान पुढे झाले. दोघानी त्याचे हात दाबून धरले उरलेल्या दोघानी त्याच्या तगड्या फाकून धरल्या. त्याला अर्धवट झोपवण्यात आल मागच्या दोघांच्या अगावर अमलू रेलला. त्याची लुगी वर सरकवण्यात आली अमलूला लाज वाटून त्यान डोळे घट्ट मिटून घेतले. पण इतर सर्वजण डोळे वासून तो प्रकार पहात होते.

खलिफान आपला वस्तरा वगैरे साहित्य बाहेर काढल. आणि आपल्या कार्याला सुरुवात केली.

'आईऽऽगऽऽ' अस बोंबलत अमलूचे डोळे आपोआप उघडले गेले, तेव्हा खलिफानं वस्तऱ्यान कापाकापी सुरू केली होती. असह्य वेदना सुरू झाल्या. थोडा वेळ कण्हत कुथत अमलू सर्व प्रकार पहात राहिला. पण नतर तो बेशुद्ध पडला.

खलिफाच काम सपल्यावर अमलूला चौघानी हळूवारपणे उचलून दुसऱ्या खोलीत नेऊन निजवल.

आणि दुसऱ्या एकाला धरून खलिफासमोर बसवण्यात आलं.

असा खत्नाचा कार्यक्रम बराच वेळ चालला

¤

खत्ना केलेल्याच्या जखमा वाळायला एक आठवडा लागला. सर्वजण लुग्या धरून चोवीस तास पडून रहायचे सेवेला बरेच गडी असायचे. खाणपिण भरपूर मिळत होत. हा आठवडा तसा ऐषआरामाचा गेला. जन्मात मिळालं नसेल अस सुख मिळालं प्रत्येकाला फक्त खत्ना केलेल्या जागेच्या वेदना सोडल्या तर कसलच दुःख नव्हतं अमलूला आपल्या नातेवाईकाची मधूनमधून आठवण यायची, पण डोक शिणायला लागल की, 'बघता येईल पुढ', अस म्हणून त्याचे विचार तो सोडून द्यायचा.

सध्याकाळी सत्तार येऊन सागून गेला, 'उद्या गावाकड निगायचया...'

कुणीच थोडा वेळ काही बोललं नाही. सर्वांपुढे गावात जाऊन काय करायच हा प्रश्न होता.

नतर अमलूनं विचारलं, 'आमच्यासंग आलेल्या बायका कुटं दिसनात रं ?'

सत्तार पान खाऊन किटलेले दात दाखवत म्हणाला, 'आरं आता त्या मुसुलमान झाल्या. मुसुलमानाच्या बायका काय उडग्यानवानी गावभर हिंडत न्हाईत गोषात न्हात्यात उंद्या ज्याच्या ज्याच्या बायकानी जात बदलली त्याच्या त्याच्या सगतीनं त्याच्या बायका गावाकड जात्याल...'

'दोन न्हात्याधुत्या पोरीबी व्हत्या न्हवं ?'

'त्याच्या शाद्या लावून दिल्या आमी लोकानी...'

'काय ?'

'व्हय, चागल्या कमावत्या पोरांसग त्याच्या शाद्या लावून दिल्या देवरामाच्या पोरीचा नवरा अड्याचा धंदा करतो. त ताज्याच्या नातीचा नवरा तरकारी इकतो. चागल्या घरात पडल्या बिचाऱ्या ताज्याच्या नातीचा नवरा जरा वयस्कर हाय त्येच आदीच एक लगीन झालय म्हना. पर ताज्याच्या नातीनं पाटलाचं प्वार काडल तरी बी त्यो शादी लावाया तयार झाला ह्येच लई उपकार झाल...'

'आन तिच त्ये प्वार ?'

'त्येची येवस्ता आमी बेवारस पोराच्या साळत केली. चागला शिकल, वाडल तिथं त्यो...'

'आरं पर आमास्नी खबर ना बात...', देवरामनं विचारल. त्यानही सर्व कुटुबासह जात बदलली होती. त्यात त्याची वयात आलेली पोरगीसुद्धा होती. आपल्या पोरीच लग्न आपल्याला न विचारताच झाल हे ऐकून तो थोडा चिडलाच

सत्तार शातपणे म्हणाला, 'त्यात काय सागायचया ? आरं पोरी खपल्या ते उपकार समजा. आजकाल पोरी खपवताना नाकात दम येतूय देज द्याया लागतो, जेवनं घालाया लागत्यात, त्ये सारं टळल. आन पोरी आपसूक खपल्या आन त्यात तुमची हालतबी अशी छाटल्याली. म्हनलं, तुमाला उगी दगदग नग. काय ? मंग काजीसमूर न्हेऊन लावून दिल्या शाद्या. आत्ता तुमचं बोला. तुमच्यापैकी कुनाकुनाला शाद्या करायच्यात. माज्याकडं नाव देऊन ठिवा म्या फुडली येवस्था करून ठेवतो...' सत्तार बाजारात बोलाव तस बोलला.

बऱ्याच तरुण मडळीनी स्वत.च्या नावाची उमेदवारी सत्तारकड नोदवली. अमलूच्या पोरानंही नाव दिल. मोठी माणस मात्र गप्प बसली.

सत्तार जाता जाता म्हणाला, 'फुडल्या चारदोन म्हयन्यात शाद्याची येवस्ता करू... उद्या गावाकड निगायची तैयारी करा.'

दुसऱ्या दिवशी सकाळीच सत्तार पैसे घेऊन खोलीत आला प्रत्येकाच्या हातावर त्यान दोन दोन हजार रुपये ठेवले. 'ह्ये तुमच्या खर्चाला. ह्येच कायबी करा. धदा करा, घरं बाधा. मागनबी थोडं थोडं पैसं मिळत्याल.'

एवढे एक गठ्ठा पैसे एकदम पाहून सर्वांचे डोळे चमकले बापजन्मी एवढे पैसे त्यातल्या कुणीच पाहिले नव्हते. प्रत्येकजण मनातल्या मनात पुढं काय काय करता येईल याच्या योजना आखू लागला. देवराम, रंग्यासारखी माणस खूष होती कारण त्याच्या घरातल्या प्रत्येकामागं दोन दोन हजाराप्रमाणे बरेच पैसे मिळाले होते. जे एकेकटेच आले होते ते मनातच आपल्या घरातल्या जात न बदलणाराना शिव्या मोजत होते.

लग्न लावून देण्यात आलेल्या दोन पोरी

सोडून बाकी सर्वांना नव्या भाड्याकुड्याच्या बोचक्यांसह गाड्यातनं कोंबण्यात आल बायका बुरखे घालून बसल्या होत्या गाड्यानी गावाची वाट धरली

सत्तार त्या वेळेस जाम खुशीत होता, स्वत ला मिळालेल्या भरमसाट दलालीवर. दोन्हीकडून खायला मिळालं होत त्याला, जात बदलून देणाराकडूनही आणि घेणाराकडून, आणि त्या खुशीतच तो विचार करत होता, आपल्यासारख्या एका खेड्यातला फडतूस माणूस जर धंद्यात एवढं खाऊ शकतो तर स्वत. मिर्झासाहेब किती खात असतील ? त्याच्यावरचे किती खात असतील ?...

¤

गावात जोरदार स्वागत झाल सर्वांच सारं गाव, गावातल्या प्रत्येक जातीची माणस वेशीत येवून उभी होती. सर्वांनाच येणाराबद्दल उत्सुकता होती. मुसलमान आपल्या जातभाईंच हारतुरे घेऊन स्वागत करायला आले होते हिंदू कालचे महार आज मुसलमान झाल्यावर कसे दिसतात ते पहायला आले होते. या सर्वांच्या माग थोडा आब जपून महार उभे होते. मनातून आपल्या जात बदलणाऱ्या भाऊबंदावर वैतागलेले, चिडलेले. नजरातून तिरस्कार

सर्वजण वेशीतच गाड्यातून पायउतार झाले. हिंदू डोळे फाडून फाडून नव्या मुसलमानाकड पाहू लागले काही प्रतिक्रियाही उमटल्या,

'विकल भडव्यांनी स्वत ला...'

'चला, बर झालं, जातीतली पिडा गेली...'

'पण आता गावकीच्या कामाचा प्रश्न आहे...'

'दुसरी महारं आहेतच की...'

'पण त्यानीही जात बदलली तर ?'

'काय विघडतय ? नाहीतरी आज हे दलितफलित सारे माजलेतच आपोआप टळतायत ते काय वाईट आहे !'

'गावकीची काम तशी क्षुल्लकच आहेत'

जुन्या मुसलमानाचे नव्या मुसलमानाशी सलाम झडले. गळाभेटी झाल्या हारतुरे झाले. आणि मग नव्या मुसलमानाची गावभर मिरवणूक काढण्यात आली.

त्यावेळी महार एका बाजूला उभे राहून जोरजोरात शिव्याशाप देत होते अमलूची बायको रडत-आरडत होती हातवारे करत होती सारे जागीच थावले होते. त्यातल्या एकाचीही गर्दीला चिरून, लोकाना शिवत आपल्या जुन्या माणसापर्यंत पोहोचायची हिम्मत होत नव्हती ते फक्त जागेवरच उभे राहून आरडाओरडा करत होते मिरवणुकीच्या गोंधळात कुणाचच लक्ष त्याच्याकड जात नव्हत अमलू, रम्याच लक्ष गेलं थोडावेळ, पण त्याना गर्दीच्या जखडबंदीतून आपल्या माणसाकड जाताच येईना

मिरवणूक पुढं सरकू लागली. मुसलमान गर्जना करू लागले, 'नारे ऽऽऽ तकबी ऽऽ र, अल्ला ऽऽ ऽ्हकब ऽऽ र...'

महार वेशीजवळूनच परस्परच आपल्या मर्यादा लक्षात घेऊन महारवाड्याकड निघून गेले मिरवणुकीत जाण्याचा त्याना अधिकार नव्हता आणि त्यातल्या कुणाची त्यात जाण्याची इच्छाही नव्हती. काहीजणाना मात्र आपण जात न बदलल्याचं वाईट वाटून गेल. बाकीचे आरडतओरडतच महारवाड्यात आले.

नव्या मुसलमानाना मिरवणुकीन गावच्या मशिदीत आणण्यात आलं स्त्रियाना मात्र मशिदीच्या मौलानाच्या घरी पोहोचवण्यात आल बाकी गर्दीच्या बाहेरच थाबली.

जोहरच्या नमाजची वेळ झाली होती. सत्तार आणि मौलानाच्या सागण्यावरून सर्वांनी वजुहू उरकली वजुहू कशी करायची ते त्यानीच शिकवल नमाज सुरू होण्याआधी सत्तारन हळूच प्रत्येकाला सागितल, 'नमाज पढताना बाकीचे जस करतील तसच तुमीवी करा...'

नमाज सुरू झाली. आणि नवे मुसलमान जुन्या मुसलमानाच पाहून उठबस, झुकूवाकू लागले इतर मुसलमान ओठातल्या ओठात नमाजाचे मत्र पुटपुटत राहिले नवे मुसलमान मात्र वावचळून ते करतील तस करत राहिले.

नमाज झाल्यावर मौलाना अबुबकरच्या हस्ते प्रत्येक नव्या मुसलमानाला एक एक कुराणाची प्रत देण्यात आली आणि सागण्यात आलं, हे जपून हाताळा, बेअदवी करू नका. हा आपल्या धर्माचा सर्वांत पवित्र ग्रथ आहे...आणि रोज कमीतकमी दोन वेळची तरी नमाज पढा.

मशिदीच्या मुसाफिरखान्यातच प्रत्येकाची रहाण्याची तात्पुरती सोय करण्यात आली. महारवाड्याच्या कडेलाच नव्या मुसलमानासाठी नव्या झोपड्या बाधायच ठरल. सत्तारनं प्रत्येकाकडून झोपड्यासाठी पैसे काढले. झोपड्या पूर्ण होईपर्यंत मुसाफिरखान्यातच आसरा घेण्याच ठरल खाण्यापिण्याची सोय साऱ्या मुसलमानानी सामुदायिक रीतीन करायच ठरल

विचारविनिमय करून सर्वजण पागले.

¤

त्याच सध्याकाळी चारपाचजण जाऊन सत्तारला भेटले. आम्हालाही जात बदलायची म्हणू लागले सत्तारन लगेच त्याना तालुक्याच्या गावी पाठवण्याची व्यवस्था केली.

ताज्या, अमलूची बायको आणि इतर अनेक तसेच कडक राहिले

¤

दुसऱ्या दिवशी नवे मुसलमान आपल्या बुरख्यातल्या बायकाना घेऊन आपल्या भाऊबदाना भेटायला महारवाड्यात शिरले सत्तारनच त्याना भेटून येण्याची सूचना केली होती. त्याला वाटल होत, या भेटीमुळं जात बदलणारे आणखीही काही मासे गळाला लागतील आणि आपल्याला दलाली मिळेल.

सारा महारवाडा खाक झाला होता. त्या जळालेल्या राखेवरच काहीनी आपला तुटकाफुटका आसरा उभारला होता काहीजण तसेच वाऱ्यावर रहात होते.

सारं पाहून अमलूच्या पोटात तुटायला झाल.

ते महारवाड्यात शिरताच सारी लोक त्याच्याभोवती जमली आधी कुणी काही बोलेचना सर्वजण फक्त एकमेकाकडं टकाटका पहात राहिले. अनोळखी असल्यागत किंवा सारच बोलून सपल्यागत. ताज्याच्या नजरेत तिरस्कार भरला होता. नवे मुसलमान पराक्रम गाजवून आल्यागत पहात होते पण प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्न उमटत होता, पुढं काय ? एकाच ठिकाणी जवळजवळची नाती, वेगवेगळ्या जातीत कशी नादणार ? ती नाती पूर्ण तुटली म्हणावी का ? की पुन्हा जुळण्याची शक्यता आहे ? पण कशी जुळणार ?...

बराच वेळ नुसता गप्पपणात गेला. बहु-

तेकजण नव्या मुसलमानाच्या पूर्ण बुरख्यातल्या बायकाकड पहात होते त्या गर्दीत त्या बायका कशातरीच, वेगळ्याच वाटत होत्या.

शेवटी न राहून एक बाई म्हणालीच, 'अग बय्या! ह्ये ग कसल सोग भूतावानी? कोन हाईत ही लोक?'

अमल्नं बोलणाऱ्या स्त्रीकड पाहिलं. तिच्या बोलण्यातला तिरकसपणा लक्षात येऊनही तो शातपणे म्हणाला, 'अग तारे, ही बायामान्सं हायती. तुजी भनबी हाय बग ह्येच्यात...'

'आस्सं का! ...' तारी ठसक्यात म्हणाली, 'मंग ह्ये सोग कश्यापायी अंगावर? पयली तर भटकभवानीवानी हिंडायची गावभर...'

'आत्ता ती मुसुलमानीन झालीया. त्या जातीत आसंच आस्तं...'

'मंग गावातल्या मुसुनमानाच्या बायका का घालून हिंडत न्हायीत रं? त्या त मस उजळ माथ्यान फिरत्यात...'

'नवनवं आसंच वागाव लागत...'

'हात् तुमचा मुडदा बशिवला...' म्हणत तारीनं शिव्याची बरसात सुरू केली. तसा इतरानाही चेव आला तोड मोकाट सुटली. ताज्या म्हाताराही ओरडू लागला. अमलूची बायको त्याच्यासमोर येऊन हातवारे करत त्याला शिव्या घालू लागली, 'भाड्याला जातीचा पुरला न्हाय म्हून परजातीचा ग वचकाया गेला...'

अमलूनं तिची बडबड बराच वेळ ऐकून घेतली. पण शेवटी त्याची नस सटकलीच. खाड्कन त्यान तिच्या मुस्काडात एक ठेवून दिली. ती धडपडली. ताज्या मधे पडला.

'ए बाटग्या, तिला मारायच काम न्हाय.'

'ताज्यानाना, तू मधी पडू नगस. ती माझी बाईल हाय...'

ताज्या गुरकत म्हणाला, 'व्हती. आता न्हाय जवा तू म्हार व्हतास तवा ती तुझी बाईल व्हती. आता न्हाय. तुज तिच नातं सपल'

'ह्ये तू मला सागणारा कोण?'

'म्या न्हाय सागत. तूच इच्यार तिला. ती सोताच सागतीया...'

'अमलू बायकोकडं वळला, 'व्हय ग ये भवाने?'

त्याची बायको किंचाळली, 'व्हय र व्हय भाड्या. तू माजा न्हवरा न्हाय आन म्या तुजी बाईल न्हाय. तू मला मेला...'

'तुज्या मायला...' अमलू खवळून तिच्यावर धावला.

तसा ताज्या आडवा आला, 'हा, हा, गप न्हाय. तिला जर हात लावला ना त तुजी धडगत न्हाय...'

'काय वाकड करनार माज?'

'लई वटवट करू नगस...'

'जार...' म्हणत अमलून ताज्याला जोरात बाजूला ढकलल. ताज्या खाली आपटला तसे इतर खवळले. लाठ्या-काठ्या उपसण्यात आल्या. कुणी तरी ओरडलं, 'हाना आयघाल्याना...'

आणि मग जोराच रणकदन माजल. चोपाचोपी सुरू झाली. डोकी फुटू लागली. हातपाय मोडू लागले. बायकाही अपुरे पदर खोवून मैदानात उतरल्या. बुरखे, नवे कपडे फाडण्यात आले. झिंज्या उपटण्यात आल्या.

ताज्याच्या म्हाताऱ्या फासळ्यांवर कुणाच्या तरी लाठीचा जोरदार तडाखा बसला. सहन न होऊन त्यान दम तोडला. नव्या मुसलमानातल्या एका पोराच्या कवटीची दोन भकलं झाली. तेही लगेच मेल. बरेच जण बेशुद्ध झाले

नंतर दमूनभागून उरलेले गप्प झाले. कण्हत कुंथत राहिले. मग थोड्या वेळानं दोन्ही प्रेताभोवती जमून एकत्रच रडारड करू लागले सुतकी वातावरण पसरलं

गावातल तिकड कुणीच फिरकल नाही पण गावात बोलवा झालीच, आपसात लढून मरतात ते बरंच आहे.

¤

साजावताना महारवाड्यावर अचानक पोलिसाची धाड पडली. कुणी कळवल कुणास ठाऊक, पण तालुक्याच्या गावाहून पोलिसाच्या गाड्या आल्या आणि धूळ उडवत महारवाड्यात शिरल्या. तिथ हजर असलेल्यांना ताब्यात घेण्यात आल. पाटलाना बोलावण्यात आले. पच तयार करण्यात आले. सार गाव लोटल त्याच्या मागोमाग. मजा पहायला

मेलेल्याच्या प्रेताचे पंचनामे सुरू झाले. तेव्हा उदास, विस्कटलेल्या अवतारात बसलेल्या अमलूला आपल्या शेजारीच सत्तार येऊन उभा असल्याच जाणवल त्याच्या मनात चीड उभरली. चिडूनच पण सयमित आवाजात अमलू कुजबुजला, 'काय राव, एवडी भाडन झाल्ती हित, तुमी लोक आत्ता आला व्हय?'

'मग?'

'तू तर म्हनला व्हता की भाडनबिडनं झाली तर आमी मदी पडू म्हून... चागला सबुद पाळला राव!'

सत्तारही कुजबुजला, 'ह्ये बग अमलू, तुमच्या आपसातल्या भांडनात आमी कसं पडनार? दुसर कुनी आल आस्त तर आमी भाडनात पडलो असतो पर ह्यो सारा मामला तुमच्या-तुमच्यातला पडला. आमी काय करनार?'

अमलू चरफडला मनातच.

सत्तारच म्हणाला, 'काय काळजी करू नगस. म्या मिर्जासाह्येबास्नी सार कळवलया'

तेवढ्यात अमलूला एका फौजदारान जवळ बोलावलं. सत्तार पुटपुटला, 'खर खरं त्ये सागून टाक...'

अमलू फौजदारासमोर जाऊन उभा राहिला. फौजदार नवीन दिसत होता. त्याच्या तोडावर भलताच उत्साह नाचत होता.

फौजदारान विचारलं, 'भाडणं कशावरून झाली?'

अमलू मलूल आवाजात म्हणाला, 'आपापसात थोडा वाद झाला साह्येब. आमी काय लोकानी जात बदलली. काय म्हारांना त्ये भावल न्हाय त्यामदनंच तटा झाला...'

फौजदाराला आश्चर्याचा धक्काच बसला. 'तुम्ही जात बदलली? म्हणजे धर्मांतर?'

'व्हय.'

'काय?'

अमलून गावकऱ्यावरून नजर फिरवली. थोडा वेळ सागाव की नाही या विचारात पडला आणि मग धाडकन म्हणाला, 'गावकरी लई तरास देत्यात आमाला. मान्सावानी वागवत न्हायत. मागल्या हप्त्यात आख्खा म्हारवाडा जाळ्ला आमचा कायजनं जीवत जाळून मारली मग वैतागून आमी लोक मुसुलमान झालो...'

फौजदार अचानक पाटलाकड वळला. आणि गरजला, 'काय पाटील, इथं गावकरी जाळपोळ करतात, माणस मारतात,

एवढं मोठ धर्मांतर होतं याची आम्हाला खबरबातही असू नये ? काय करत असता गावात तुम्ही ? पोलिस पाटील कशाला झाले तुम्ही ?'

पाटलांना फौजदारानं साऱ्या गावासमोर आपल्यावर दरडवाव, आपल्याला जाब विचारावा हे अजिबात आवडलं नाही. मनात संताप संताप झाला त्यांचा पण वरून एकदम थंड स्वरात ते म्हणाले, 'न्हाय साह्येब, ही म्हारं कायबी सागत्यात. गेल्या हप्त्यात काय जाळपोळ झाली ती म्हाराच्यात आपापसात भाडणं झाली म्हून. गावकऱ्यानी कायबी केल न्हाय. मुसुलमानानी हेस्नी पैस चारलं आन जातीत घेतल ह्येच्यात दोन तट पडल आन झाली जाळपोळ, मारामाऱ्या... ह्येत गावकऱ्याचा काय समद न्हाय हीच लोक लय माजल्यात...'

'काय रे खरय का हे ?' फौजदारान अमलूला विचारल.

'न्हाय साह्येब... आमी गरीब मान्सं...' अमलून तोड उघडल, तेवढयात पाटील मधेच फौजदाराला म्हणाले, 'साह्येब, जरा हिकडं या...'

पाटलानी फौजदाराला बाजूला नेल आणि हळूच पुटपुटले, 'साह्येब. तुमी नवीन दिस्ताय खात्यात ?'

'का ?'

'ह्येच्यामागच सार साह्येब मला चागल वळखायचं–'

'मग ?'

'तुमी फौजदार व्हन्यासाटी ज्यो पैसा भरलाया त्योबी आजून वसूल झाल्याला नसल ?'

'म्हणजे...'

'न्हाय, त्यो पैसा वसूल व्हईपतूर तरी इमानदारीत नोकरी करा...'

'मला शिकवताय ?' फौजदार उखडला.

पाटील गर्द आवाजात म्हणाले, 'साह्येब, फुलगेकर पाटील माह्यत आस्तील तुमास्नी ...?'

'कोण हे ?'

'आपलं ह्ये हो, पोलिस खात्याच मत्री...'

'त्याच काय इथ !'

'न्हाई म्हनल, त्ये माज्या भनीच्या सासुरवाडीकडन जवळच्या नात्यातलं ह्याईत...'

'मग ?'

'मग काय न्हाय, पर मला न्हाय वाटत तुमच्यावानी चांगला, तरुण साह्येब उगीपागी घरी बसावा म्हून...'

'म्हणजे ?'

'म्हंजी ह्येच आपल, एक निरोप धाडला फुलगेकराला तर मोटमोटचा, जुन्या साह्येब लोकाची सुट्टी व्हती तुमी त अजून नव हाईत...' पाटील बारीक पण विखारी हसले.

'मला दम देताय ?'

'न्हाय, दम न्हाय. खर त्ये सागतुय अस हाय बगा...' पाटलानी पजा दाखवला

फौजदार घामेजला त्याला गर्दीकड परत आणत पाटील म्हणाले, 'जेवून जायचं साह्येब, वाड्यावर बोकड पाडाया सागतो.'

फौजदार घाम पुसतच खुर्चीत येऊन बसला थोडा वेळ गप्पच बसला सारे त्याच्याकड उत्सुकतेनं पहात राहिले

एक वयस्कर, अनुभवी जमादार पाटलाच्यात आणि फौजदारात काय बोलणं झाल असावं ते अदाजानच ओळखून फौजदाराच्या कानाला लागला, 'साहेब, पाटील म्हणतात तसं करा. उगीच बिलामत घेऊ नका... हे लोक खतरनाक आहेत...'

फौजदार ताडकन उठला आणि ओरडला, 'पकडा ह्या हरामखोराना...'

मग साराच नूर पालटला. नव्या मुसलमानाना आणि महारांना कैद करून गाड्यातून कोंबण्यात आल. गाड्या तालुक्याच्या गावी धाडण्यात आल्या.

फौजदार त्या वेळेस हसत खेळत पाटलाबरोबर गप्पा मारत त्याच्या मोठ्या वाड्यात बसले होते त्याच्या शेजारीच प्रतिष्ठिताच्या गर्दीत आपले पानाचे दात दाखवत सत्तारही बसला होता.

¤

आचार्यांच्या घरासमोर जीप थाबली. मिर्झासाहेब दाढी कुरवाळत खाली उतरले. सावधगिरीन इकड तिकड पहात ते त्या भल्यामोठ्या घरात शिरले. नोकरान मोठ्या अदबीनं त्याना दिवाणखान्यात आणून बसवल आणि आत जाऊन मिर्झासाहेब आल्याची सूचना दिली तसे आचार्य लगबगीन बाहेर आले, 'नमस्कार मिर्झासाहेब, एवढ्या मोठ्या माणसाचे पाय आज आमच्या घराला लागले. भाग्य आहे आमचं.' आचार्य हात जोडून विनयान म्हणाले

मिर्झासाहेबानी उठून त्याना गळाभेट दिली. त्याच्या पाठीवर थोपटल. खूप जुने मित्र भेटल्यासारख दृश्य होत ते...

'अरे, खूप दिवस तुम्ही दिसलेच नाहीत, भेटलेही नाहीत.'

'आचार्यजी, ये दिनों कामही कुछ ऐसे है, फुरसतही नही मिलती. आज भी आपके तरफ एक छोटासा काम लेके आया हू...'

'कामाचं नतर पाहू, पहले कुछ ठडा, गरम...'

'क्यो तकलीफ कर रहे हो...'

'तकलीफ नाही तुम्ही सागा...'

'ठडा चलेगा कुछ...'

आचार्यांनी नोकराला सरबत आणण्याची सूचना केली आणि सागितल, 'हे बघ, आत कुणालाही येऊ देऊ नकोस...'

नोकर गेला तस आचार्यांनी विचारल, 'ह बोला, काय विशेष...'

'आपके कानोंतक आयाही होगा की, एक गांवके कुछ लोगोने इस्लाम मजूर किया है...'

'म्हणजे धर्मांतर केल ?'

'हा.'

'उडत उडत आलीय माझ्यापर्यंत ती बातमी. पण अजून तरी तिची तशी कुणीच दखल घेतलेली नाही. दलितानी आदोलन सुरू केल्याची बातमी वाचली, ऐकली, पण त्याना जिवत जाळण्यात आल्याच, गावोगावी त्याच्यावर अत्याचार सुरू झाल्याच कुठच ऐकल, वाचल नाही, तसच हे धर्मांतराच... जेवढ्याना ते माहीतय तेवढ्याना ते विशेष वाटल नाही. मलाही काहीच वाटल नाही. अजूनतरी मी त्याचा गभीरपणे विचार केलेला नाही...'

'हा, इसलिएही मैं आपके पास आया हू...'

'म्हणजे ?'

'यानी के इस बात की दखल तुम लो, न लो पर दुनियाको समझना चाहिए की कुछ लोग मुसलमान हो गये है अखबारोमे ये बात छप जानी चाहिए...'

मिर्झासाहेब इकड तिकड पाहून पुढं झुकले आणि खाजगी आवाजात सागू लागले, 'इस बात की ओर किसीने खयाल नही

दिया की, अपने जातीके कुछ लोक दुसरी जातीमें जा रहे है, इसका मुझे अफसोस हुआ...'

'यात अफसोसची काय बात आहे ? तुम्हाला तर उलट खुशी झाली पाहिजे की तुमच्या धर्मांची सख्या वाढतेय म्हणून आणि आम्हालाही खुशी आहे की आमची घाण नकळत दूर होतेय...'

'यह बात नाही भाईसाहब, खुशी मुझको हुई जरूर, लेकिन उतनी नही जितनी पिछली बार दक्खिनमें कुछ लोगोने अपना इमान इस्लामपर लाया था. और उसके बाद पुरे देशमे धडल्लेसे शोर हुआ था देशके हर मुहमे, हर अखबारमे एकही बात थी, पैसोके लालच मे लोगोने अपनी असली जात छोड दी वह खुशी कुछ और थी. आज वह खुशी मुझको नही मिल रही है...'

'क्यो ?'

'अरे भई, आप समजते क्यो नही ? जिस चीजमें तिखापन न हो वह खानेमें क्या मजा ? हिंदुओके कुछ लोगोने अपनी जात छोड, इस्लाम का सहारा लिया, तब भी सब लोग चूप रहे यह मुझसे नही देखा जाता कुछ होहल्ला होना चाहिए । शोर जोर होना चाहिए । हिंदु और मुस्लिमो में जो कडवाहट बढ रही है, वह इस बात से और बढनी चाहिए। हमले होने चाहिए । जलजलासा आ जाना चाहिए । तब कुछ मजा आता है । हमारे कहने पर लोग आपस में झगड उठते है । तब देश की सरकार बेचैन हो जाती हैं । डावाडोल हो जाती है । और फिर झगडे छुडानेके लिए हमारी मदद मागती है। हमारे आगे झुक जाती है । हमारी कीमत अपने आप बढती है । '

आचार्यांच्या तोडावर हसू पसरल, 'समझ गया, यानी आप अपनी कुर्सियोकी बात कर रहे है...'

'हा भई, ठीक कहा आपने. यहाँ हिंदू और मुसलमान भाईचारेसे रहने लगे । उनमे आवभगत होने लगी । झगडे फसाद बद हो गये। लोक एक दुजे के दुष्मन न रहें तो हमारे तुम्हारे पेट कैसे पलेंगे ? मिर्झासाहब और आचार्यजी की किमत ही क्या रहेगी इस देशमे ? हम जो आज लोगोपर राज कर रहें है, लोगो को अपने इशारो पर नचा रहे है, वह राज, वह नचाना एक दिन मे खत्म हो जायेगा । हम कहीके न रहेंगे । कुत्तेभी हमसे दूर भागेंगे । अपनी मिर्झा-आचार्य की कुर्सी बाअदब रखनी हो तो यह करना बहुत जरुरी है । क्यो समझे की नही आप ?' मिर्झासाहेबानी एक डोळा बारीक केला

'हा, हा, पूर्णपणे समजलो, धर्मांतराचं *कारण लावून धरून पूर्ण देश पेटवून* द्यायचा...'

'हा तो इसी काम के लिए आपको ये रुपये दिये जा रहे है...'

'हु...'

'जिस गावमे लोगोने जात बदली है । उसमे आपका कोई चेला होगा ही...?'

'जी, आहे, तुम्ही जसे प्रत्येक गावात आपल्या धर्माचे कोलीत नाचवणारे चेले तयार करून ठेवलेत, तसेच आमच्या धर्माचेही चेले आहेतच आपण फक्त कोलीत द्यायच काम करायच की, चेले मंडळी निघालीच गाव पेटवत आपण धर्ममार्तंडानी फक्त तमाशा पहात रहायचा मग... काय?'

दोघेही खळखळून हसले

'कौन है आपका चेला इस गावमे ?'

'आहे एक शास्त्री म्हणून त्याला निरोप पाठवतोच मी तो बरोब्बर आग लावून देईल आणि देशभर आग लावायचं काम मी करतोच, काय ?'

दोघ खळखळून हसले पुन्हा

मिर्झासाहेब हसत म्हणाले, 'ठीक है तो मैं चलता हूं । इस हगामे के बाद फिर मुलाकात होगी । खुदा हाफिज...'

'नमस्कार...' आचार्यांनी हात जोडले.

मिर्झासाहेब निघून गेले, आचार्य नोटा कुरवाळत राहिले

¤

मिर्झासाहेब पोलिसठाण्यात शिरले.

फौजदारानं उठून खाडकन् सलाम ठोकला. मिर्झासाहेब समोरच्या खुर्चीत बसत म्हणाले, 'शायद आपको कमिश्नर साहब का सदेसा आया होगा ।'

'हा, हा, आत्ताच आला होता. त्यानी सर्व सागितल मला...'

'क्या कहा ?

'हेच, सर्वांना सोडून द्या म्हणून...'

'फिर, छोड दिया उन लोगोको ?'

'नाही. साहेबानी तुम्ही स्वत च इथ येत असल्याचं सागितल म्हटल, तुम्ही येईपर्यत वाट पहावी...'

'ठीक किया अब उन लोगोको हमारे सामने ले आओ...' मिर्झासाहेबानी आज्ञा केली.

फौजदारान हवालदाराना आज्ञा सोडली

थोडयाच वेळात महारवाडयात पकडलेल्या *सर्वांना मिर्झासाहेबासमोर* हजर करण्यात आल

मिर्झासाहेबानी सर्वांसमोर छोटंस भाषण झोडल, 'देखो भई, आप लोग हिंदू हो और ये हमारे साथ आये हुये मुसलमान है । मुझे कबुल है इन्होने अपनी जात बदल ली है इसका आपको गुस्सा आया होगा । लेकिन इसका मतलब यह नही की आप आपसमें झगडा करे ।

आपको भाईभाई जैसे रहना चाहिए. आप हिंदू हो या मुसलमान, आखिर इन्सान ही हो न ? अ ? और यह मत भूलो की आज ये लोग मुसलमान हो गये है तो कल आपकेही भाईबहन थे आज भी आपके भाईबहनही हैं झगडे फसादसे कोई फायदा नही...'

तर्जनीन छातीवर ठोकून घेत मिर्झासाहेब गरजले, 'आज आप लोगोने इतना होहल्ला करने के बाद भी मैंने आप लोगोको पुलिससे बचा लिया है, हिरासतसे छुडा लिया हैं बहुतसी कोशिशें करके ये झझट दबा दिया है ..'

सर्वांच्या नजरेत त्याच्याबद्दल आदर भरून आला

'आज, मैं न होता तो यह पुलिस...' त्यानी फौजदाराकड बोट केलं तो मख्खच. '...आपको कही का न रखती मेरी वजहसे आप छूट रहे हो और इसलिए मैं तमन्ना करूगा की इसके बाद आप भाईचारे से रहे. दगाफसाद न करे...'

ज्याना त्याच बोलणं कळल त्यानी माना डोलावल्या बाकीचे गप्पच राहिले

'अब आप लोग जा सकते हो ..' मिर्झासाहेबानी सागितल, तसे सर्वजण कोडवाडयातन गुरं बाहेर पडल्यागत ठाण्यातनं बाहेर पडले

मिर्झासाहेब फौजदाराकड वळले, 'आपतक आपकी बख्शिशी पहुच जायेगी ..'

फौजदारान हसून सलाम ठोकला

ठाण्यातन बाहेर पडलेले कैदी गावाची वाट धरून चालू लागले होते. आत्ता त्याच्यासाठी कुठल्याच गाड्या नव्हत्या.

मधेच देवराम म्हणाला, 'आपलं मिर्जासाहेब व्हतं म्हून सुटलो, न्हायतं काय सांगता येत न्हवत...'

एक नवा मुसलमान पुटपुटला, 'कळल का आपुन मुसुलमान झाल्याचा फायदा जर म्हारच न्हायलो आस्तो त ?'

महारापैकी कुणीच काही बोलल नाही.

मग पुढचा सारा प्रवास घुम्यागत झाला. कुणीच कुणाशी बोलल नाही आजारी मेंढराचा कळप चालल्यागत सर्वजण चालत राहिले.

¤

शास्त्रीजी घाईघाईत आपल जाडजूड शरीर साभाळत पाटलाच्या वाड्यात शिरले. पाटील सोप्यातच पान चावत बसले होते. शास्त्रीजींनी चालण्याच्या श्रमान लागलेल्या धापा टाकत पाटलाना नमस्कार केला.

थोडस सावरून बसत पाटलानी ऐसपैस रामराम केला आणि विचारल, 'शास्त्रीबुवा, आज कशी वाट धावली तुमास्नी आमच्या घरची ?'

शास्त्रीजी पाटलाशेजारी येऊन दमानं टेकत म्हणाले, 'जेव्हा आपल्याच धर्माचे लोक वाटा चुकू लागले, तेव्हा आम्हालाही वाट बदलून आपल्याकडे यावे लागले...'

'काय झाल ?'

'अहो, तुम्ही प्रत्यक्ष सर्व डोळ्यानी पहात असूनही आम्हालाच विचारताय काय झाले म्हणून ? कमाल आहे !'

पाटलाच्या भव्य कपाळावर आठ्या पडल्या, 'बैजवार सागा शास्त्रीबुवा. ही रामायनी भाषा न्हाय ध्यानात येत...'

शास्त्रीजींनी काही बोलण्याऐवजी गड्यान आणून दिलेला पाण्याचा ताब्या तोंडाला लावला. नंतर त्याच ताब्यातलं थोड पाणी हातावर घेऊन स्वत च्या टकलावर फिरवल. थोडा थंडावा आला. मग ते म्हणाले, 'अहो, आपल्या गावातल्या महारानी धर्म बदलला एवढे तरी कळले ना ?...'

'व्हय, कळलं की. हप्ता झाला. पर त्यात इक्त इशेष काय घडल ?'

'तुम्हाला विशेष वाटत नाही ? कमाल आहे ! अहो, अश्यान आपला हिंदू धर्म टिकायचा कसा ?'

'म्हजी ?'

'म्हणजे असे बघा, तुमचा धर्म कुठला ?'

'श्यान्नव कुळी आस्सल मराठा हाय मी.'

'पण तुमचा मूळ धर्म कुठला ?'

'मराठा.'

शास्त्रीजींनी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला. पण तरीही शांत सुरात त्यांनी समजावलं, 'अहो, मराठा ही एक जात झाली आपल्या धर्माची. आपला मूळ धर्म हिंदू. हिंदूच्या बऱ्याच जाती आहेत जशी ब्राह्मण ही एक जात झाली, तशी मराठा ही सुद्धा एक जातच. आपल्या धर्माचे चार मुख्य वर्ग आहेत, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र. पण हे सर्व वर्ग एकाच धर्माचे. क्षुद्रांमध्ये महार, माग आदि पोटजाती आहेत पण शेवटी तेही हिंदूच ना ?'

'आता त्ये आमास्नी काय ठावं ? पर त्यो धरम कसा टिकनार न्हाय त्ये सांगा...'

'हं, मी तेच सांगतोय. तर असे पहा, ह्या मुसलमानानी जर सर्व महारमागांना आपल्या धर्मात ओढून घेतले तर आपल्या धर्माची लोकसंख्या कमी नाही का होणार ?'

'हं.' पाटलांनी डोकं हलवलं

'आधीच आपल्या येथे मुसलमान खूप झालेत, त्यात आणखी शूद्र त्यांच्यात शिरले तर त्याची सख्या हिंदूपेक्षा जास्त होईल आणि मग हे सर्व जुने-नवे मुसलमान एकत्र येऊन उरलेल्या मूठभर हिंदूंची कत्तल करतील '

'आयला ! खर का काय ?'

'हो नाही तर काय ? मुसलमान ही खतरनाक जमात आहे. हिंदूंवर त्यांचा पहिल्यापासून काटा आहे हिंदूंना छाटायची ते कुठलीही सधी सोडत नाहीत. हे धर्मांतरही त्यातलाच एक प्रकार आहे, हे धर्मांतराचे बीज जर असेच वाढत गेले तर तुमच्याआमच्या पुढच्या जीवनाचे काही खरे नाही. अहो, काही दिवसानी तर हे लोक आपल्यालाही बाटवायला बसलेत.'

'म्हजी ?'

'म्हणजे आपल्यालाही मुसलमान बनवतील हे लोक ' शास्त्रीनी एका हातानं दुसरा *हात कापून दाखवला.*

'च्यायला, आमालाबी मुसुलमान बनावत्यात...' पाटील खवळले, 'आरं काय बापाची पेंड हाय का म्हनावं, आ ? म्हारंमागं पुरत न्हायत का तुमास्नी ?'

'महारामागाना तरी का धर्मांतर करू द्यायचे ? एका अर्थाने तेही आपले भाऊच आहेत...'

पाटलाना धक्का बसला, 'म्हारंमांगं आपलं भाऊ ? ह्या, कायतरीच काय ?'

'अहो, असतील ते शूद्र, पण हिंदूच आहेत ना ? आपणही हिंदू, तेही हिंदू त्यामुळे भाऊच आपले ते आणि मग मला सागा, आपल्या भावानेच जर जात बदलली तर ते आपण असे गप्प राहून पहायचे का ?'

'जर त्ये आपल भाऊच हाय तर मंग गावकीची कसलीबी कामं का करत्याल व त्ये ? आपुन मार मजेत गावात न्हातो, पर त्ये गावकुसाबाह्येर का न्हात्यात ? लाबच कशाला, मागल्या हप्त्यात आपुन म्हारवाडा पेटावला, ह्ये काय भावपनाचे लक्षान म्हनायच का ?'

शास्त्रीजी थोडे डुचमळले.

पाटलानी लावून धरल, 'त्ये गुरुजी आल तवा भर बैठकीत ठरलं की ह्या म्हारामागास्नी ठेचायचं म्हून. तवा तुमीबी व्हता की. तुमच्याच सागन्यावरन म्हारवाडा जाळ्ळा...'

पाटलाना अडवत शास्त्री म्हणाले, 'अहो, हळू बोला, कुणी ऐकेल...'

'ऐकाना तिच्यामायला ! आपल्याला काय भ्याव हाय...' पाटील तसेच जोरदार आवाजात म्हणाले, 'त तवा तुमी येगळ सागता, आत्ता म्हन्ता की त्ये आपलं भाव म्हून, ह्ये चक्कार कसं जमायच ओ ?'

शास्त्रीनी स्वत ला सावरल, 'अहो पाटील, त्या लोकाच्या नशिबातच ते लिहिलेले आहे. त्याचा छळ व्हावा, हाल व्हावेत अशी प्रत्यक्ष देवादिकाची इच्छा आहे. ही गावकीची वगैरे कामे त्याना आपण दिलेली नाहीत. तीही देवानीच दिलेली आहे...'

'कशी काय ?'

'जो माणूस पूर्वजन्मात खूप पापे करतो, वाईट वागतो त्याला देवाकडून पुढचा जन्म महारमागाचा मिळतो. त्या जन्मात त्याला पूर्वजन्मीच्या पापाची फळे भोगावी लागतात. *प्रायश्चित्त घ्यावे लागते. गावकीची* घाणेरडी कामे करावी लागतात. अत्याचार, छळ सहन करावे लागतात. आपण फक्त अत्याचार,

करणारे दुवे असतो खरा अत्याचार देव करत असतो, आपल्या हातून. कर्ताकरविता तो असतो आपण फक्त निमित्तमात्र हे लोक गेल्या जन्माच्या पापाची सजा भोगत असतात. देवानी ती सजा देण्याचे काम आपल्यासारख्यावर सोपवलेले असते जर त्याना अशी सजा मिळाली नाही तर ते माजण्याची, आपल्या वरचढ होण्याची भीती असते. म्हणून मधूनमधून त्याना दापात ठेवण्यासाठी असे करणे आवश्यक असते... पण म्हणून काही ते आपले भाऊ नाहीत असे म्हणता येणार नाही. आपण त्याना थोडावेळ आपले वाटा चुकलेले भाऊ म्हणू मग वाटा चुकणाऱ्या भावाना थोडे कडकपणे, दड देऊन सरळ वाटेवर आणणं आपले कर्तव्य नाही का ?'

पाटलाचच डोक गरगरू लागल शास्त्रीच बोलणच त्याना कळेना. त्यानी कसबस विचारल, 'यापायी काय करायच म्हन्ता ?'

शास्त्री हसले. आपण पाटलाना थकवल्याच समाधानी हसू हसले, 'या दोघानाही नीट धडा शिकवायचा जात बदलणारानाही आणि न बदलणारानाही... या आपल्या भावाना वठणीवर आणायचे...'

'कस ?'

आणि मग शास्त्रीजीनी पाटलाच्या कानात तोंड घातल. त्यानी त्यावेळेस वरून जशा आज्ञा आल्या तशा त्या पाटलाच्या कानात ओतायला सुरुवात केली.

पाटील नदीवेलागत मान हलवत राहिले. एका दगडात दोन पक्षी मारण्याची योजना होती ती

¤

आणि एक दिवस अचानक सारा देश दणाणला मोठी लाट फुटल्यागत एकच विषय सारीकडं फुटला : पैशाच्या लालुचीवर धर्मांतर.

देशभर खळबळ माजली. आधीच दलित आदोलन, विद्यार्थी आदोलन, अमुक आंदोलन, तमुक आदोलन अशा निरनिराळया आंदोलनात देश केविलवाणेपणान आदोलत होता. पोखरून गेला होता. सरकार ती आदोलन कशीबशी दडपत होत. खुर्च्या गदगदू लागल्या होत्या. त्यात हे धर्मांतराच प्रकरण उद्भवल, खालपासून वरपर्यंत सर्वचजण बोंब मारू लागले. विरोधी पक्षानी राजीनाम्याचीच मागणी केली. पण सत्ताधारी लेचेपेचे नव्हते, त्यानी विरोधी पक्षाना माहिती पुरवली . पूर्ण गावान धर्मांतर केल ही बातमी खोटी असून, फक्त दोनच जणानी धर्मांतर केलय. ही लोकशाही आहे इथ कुणीही धर्मांतर करू शकतो. घटनेन व्यक्तीला दिलेला तो नैतिक अधिकार आहे

एकदर सत्ताधारी विरोधी नेत्याना पुरून उरले

गाव एका रात्रीत प्रसिद्धीला आल निरनिराळे लोक गावाला भेटी देऊ लागले. लोकाच्या मुलाखती घेऊ लागले. निरनिराळया वर्तमानपत्राच्या निरनिराळया पत्रकारानी आपापल्या वर्तमानपत्राना निरनिराळी माहिती पुरवली. पूर्ण गावान धर्मांतर केल इथपासून, एकानही धर्मांतर केल नाही इथपर्यंत कशाही आडव्यातिडव्या बातम्या येऊ लागल्या आणि सामान्य जनता खर काय, या प्रश्नात गोंधळून गेली.

देशभर वादविवाद झडू लागले, चर्चा, परिसवादात परिकल्पनाची आतषबाजी होऊ लागली विद्वान मत माडू लागले. वेडीवाकडी मत माडून स्वतःच विचारवंतत्व सिद्ध करू लागले. झालेल धर्मांतर राहिल बाजूलाच, 'किती योग्य, किती अयोग्य,' असल्या नेहमीच्या रटाळ चर्चा घडू लागल्या.

नेतेमंडळीनी व्यासपीठं काबीज केली. धर्ममार्तंड ठणाणा करू लागले, 'इस्लाम खतरेमे', 'हिंदू धर्म विनाशाकडे', असल्या घोषणा होऊ लागल्या. पत्रक निघाली वाटेल तशी माहिती छापण्यात येऊ लागली मोर्चे निघाले

आणि आपापले धर्म धोक्यात असल्याच्या भीतीपायी सामान्य जनता एक दुसऱ्याचे गळे घोटायला सिद्ध झाली हल्ले होऊ लागले जातीय दगलीची आग पेटली त्यात धर्मांध पुढारी इधन ओतू लागले. लोकाच्या मौती होऊ लागल्या गुड माजले निरपराध बळी पडू लागले लोकाची मन नासून गेली पद्धतशीरपणे नासवली गेली

धर्मांतराचा नगारा वेगवेगळया सुरात बरेच दिवस वाजत राहिला.

आणि एक दिवस अचानक तो वाजायचा बद झाला सारा गोंधळ थावला सद्दी सपल्यागत झालं. सर्व आवाज बद झाले त्या गावाकड वाढलेली रहदारी थडावली

पण या सर्वांची ज्याला ज्याला झळ पोहोचली त्याच्या मनात कुठतरी त्या झळीच दु ख सलत राहिल.

याउप्पर सार मृतवत झाल

¤

नवे मुसलमान आपल्या नव्या झोपडयातन रहायला आले. नवी मिळालेली भाडीकुडी आणि मिळालेल्या पैशावर त्याचं ससार सुरू झाले

शेजारी महारवाडयानही आपली खोपटी कशीबशी उभारली होती. त्याचेही ससार सुरू झाले होते. दोन्हीकड तशी गरिबीच होती नव्या मुसलमानाना पाचवेळा इमानदारीत नमाजीला जाण्याशिवाय दुसरा उद्योग नव्हता तसा छोटामोठा रोजगार मिळत होता पण असून नसल्यासारखा सत्तारुन कायम रोजगार मिळवून देण्याच कबूल केल होत पण अजून पक्क काहीच ठरल नव्हत काही महार आणि नवे मुसलमान मिळून मिसळून वागू लागले होते पण काहीजण आपापल्या ठिकाणी ताठर होते.

अमलूला वाटल होत, बायको एक ना एक दिवस चालत आपल्याकड येईल पण ती अडेलतट्टूागत वागत होती अमलूकड ढूकूनही पहात नव्हती त्याच्या पोरानही आपल्या बाईला समजावल होत, पण तिन मानल नव्हतं. नव्या मुसलमानातल कुणी समोर गेल की ती बोट मोडायची. पच्कन थुकायची. प्रत्यक्ष नवऱ्याशी दुष्मनी दावा धरल्यागत वागायची पण अमलूला विश्वास वाटायचा, तिला आपल्याशिवाय कोण आहे ? निश्चितच एक दिवस ती राग सोडून आपल्याकड येईल

असेच दिवस चालले होते

पण मधेच अचानक लफड उद्भवल.

रग्याच्या तरण्या पोरान मौलाना अबुबकरच्या तरण्या पोरीशी सूत जमवल.

जवानीच्या जोशात सार घडल. नजरानजर झाली आणि अबुबकरच्या गोऱ्या चिट्टया पोरीला, रग्याच्या काळयासावळया राकट पोरान मोहून टाकल प्रेम जमल.

जात बदलली तेव्हा तात्पुरती सोय म्हणून साऱ्या बायकाना मौलानाच्या घरी आसरा देण्यात आला होता रग्याची बायकोही त्यात होती तिला भेटायला पोरग कधी कधी मौलानाच्या घरी जायच त्या काळात हे प्रेम जमल झटक्यात वाढलंसुद्धा

मौलाना दिवसभर मशिदीत असायचे फक्त जेवायला आणि झोपायला घरी यायचे ते. त्याना आठ पोर. त्या पोराची उसाभर करताना त्याच्या बायकोला इकड तिकडं पहायला वेळ मिळायचा नाही. याचाच फायदा मोठ्या पोरीन घेतला व ती प्रेमात पडली भेटी सुरू झाल्या

आणि एक दिवस जितक्या झटकन हे प्रकरण सुरू झाल तितक्याच झटकन ते फुटल. गावभर झालं. मौलानाच्या कानावर आल ते गगाने काळेनिळे झाले

जुन्या मुसलमानाच्या पोरानी रग्याच्या

पोराला मशिदीसमोर धरून वेदम चोपलं

रग्या आणि अमलूही खवळले. त्यानी सत्तारला गाठल अमलून धडक्यात विचारल 'काय राव, आपल्या आपल्यात अश्या मारामाऱ्या करायच्या का ?

'का ?'

'रग्याच्या पोराला मारल...'

'मग काय चुकल ?'

'आरं आमीवी मुसुलमान, तुमीवी मुसुलमान. आन आपल्यातल्याच पोराला मारायच म्हजी काय खरय का ?'

'मग काय त्येला डोक्यावर धिऊन त्येंची मिरवणूक काडायची का ?' सत्तारन तिरस्कारानं विचारल, 'मान्सान आपली जागा वळखून कायवी करायला नको का ?'

'जागा वळखून म्हंजी ?'

'आरं तुमी कोन, मौलाना कोन, काय भेद कळतो का न्हाय ?'

'भेद ?'

'न्हाय त काय ? मौलाना किती उच जातीच, तुमी खालच्या जातीचं. तरीवी पोरानं त्याच्या घरात हात घातला. आपली पायरी सोडली मग त्येला ठोकायच न्हाय त काय करायचं ?'

अमलू, रग्याला धक्का बसला 'मुसुलमानातबी जाती हाईत व्हय ?'

'मग तुम्हास्नी काय वाटल ? उचनिच सारीकडच हाय मुसलमानात वी हाय सय्यदशेख येगळे, तावोळीमन्यार येगळे, आन तुमी बाटगे मुसुलमान येगळे...'

'आमी बाटगे व्हय ?' अमलू चिडला

'न्हायत काय खरे मुसुलमान म्हनायचे का ?' सत्तारन हेटाळल.

'तूच त म्हनला व्हता, मुसुलमानात समदे सारखेच असत्यात म्हून...'

'समदे सारखेच असत्यात, पर त्यें रोटी हेवारात. वेटी हेवार कसा सारखा असल वरं ? परत्येक जागी खालच वरच आस्तच की. बाकी समदीकड समदे मुसुलमान सारखेच. पर लगीनबिगीन असल्या कामात खालच वर येतच की खानदान, घराण काय पाह्या नको का ?'.

'आम्या त आस ठरवून आल्तो व्हतो की, मौलानासावच्या पोरीला माज्या पोरासाठी मागनी घालावी.' रग्या बोलला.

सत्तारच्या आवाजात, डोळ्यान किळस भरून आली, 'छ्या, कायतरी काय वोलता? तुमी कुटं, त्ये कुटं ! सोनाची जागा येवड्याचतच इसरला काय व्हय तुमी ? आरं तुमाला जातीत घेतल म्हजी तुमी कश्याबी उड्या मारायच्या व्हय ? काय लाजलज्जा? ह्ये माज्याकडं वोलला त्यें बोलला, दुसरीकडं कुट वोलू नका जीव जाईस्तव ठोकत्याल तुमाला...जावा तुमी'

सव समान असलेल्या धर्मांचे भेद मनात विववत अमलू, रग्या उठले आणि तोड पाडून महारवाड्याकड चालू लागले

¤

मध्यतरी थड पडलेल्या आदोलनान पुन्हा जोर धरला. आणि गावातल्या विठ्ठलाच्या देवळात पुन्हा बैठक झाली.

त्याच सध्याकाळी अचानक महारवाड्यावर गावकऱ्याचा हल्ला झाला मागच्या वेळेस रग्यान आधीच सूचना आणल्यामुळ बऱ्याच जणाना पळता आल होत. पण या वेळेस सूचना मिळालीच नाही. कुणाला पळताच आल नाही

गावकऱ्यानी नव्या मुसलमानाच्या वस्तीकड ढुकूनही पाहिलं नाही. फक्त महारवाड्यालाच घेरा घातला सारे महार आयतेच तावडीत सापडले.

मग सुरू झाला अत्याचाराचा जीवघेणा खेळ.

बाहेरचा कोलाहल ऐकून नवे मुसलमान झोपड्या सोडून बाहेर आले, आणि आपल्याच आयावहिणी, भाऊबापावरचे अत्याचार स्तंभित होऊन पहात राहिले

समोर कशीवशी उभारलेली खोपट पेटवून देण्यात आली होती लाठ्याकाठ्या बरसत होत्या. दिसेल त्या महाराला चेचवण्यात येत होत. आगीत ढकलण्यात येत होत. बायकांना फरपटत आणून त्याच्या लुगड्याना हात घालण्यात येत होते कोवळी पोर किडामुगीगत चिरडण्यात येत होती. पळून जायला सधीच नव्हती आरोळ्या, किंकाळ्या, रडारडीचे भेसूर आवाज उठत होते...

आणि समोरच मुसलमान झालेले त्याचे भाऊबद बधिर होऊन पहात होते काही नवे मुसलमान आपल्यावर हल्ला होईल म्हणून पळण्याच्या बेतात होते.

अचानक अमलूच लक्ष एका बाजूला गेल पाचसहा धटिंगण त्याच्या बायकोला धरून फरपटत मधल्या पटागणात आणत होते एकानं तिच्या झिज्या धरल्या होत्या. बाकीचे हातपाय ओढत होते एकजण तिच अपुर लुगड फाडत होता.

आणि ती वेदनानी, भीतीन जीव वाचवण्यासाठी आर्त किंचाळत होती 'सोडा, सोडा' ओरडत होती. भयानक रडत होती पण त्या धटिंगणाना दया येत नव्हती.

अमलूला रहावल नाही. तो जीव खाऊन धावला तिच्याकड, 'सोडा रं सोडा तिला' म्हणत तो त्या पाचसहा जणावर झपाटला त्याना झोबू लागला अमलूचा पोरगाही मधे पडला मग बाकीचे नवे मुसलमानही मधे पडले पण हल्लेखोर सख्येन जास्त होते

अमलू ओरडून पोराला म्हणाला, 'लवकर सत्तारकड जा आन त्याला यायला साग...'

पोरग साऱ्याच्या गराड्यातून निसटल, गावात शिरल त्यान सत्तारला गाठल, आणि धापा टाकत, रडत सागितल, 'सत्तारचाचा, लवकर चला, म्हारवाड्यात गावकरी शिरल्यात. म्हाराना मारत्यात, त्येंना मदत करा. चला...'

सत्तार थडपणे म्हणाला, 'गावकऱ्यानी तुमाला काय केल न्हाय ना ?'

'आमाला काय केल न्हाय. पर आमच्या भाऊबदाना...'

'त्येंच सोड त्येचा तुमचा काय सवद न्हाय त्ये म्हार हायत, तुमी मुसुलमान...'

'अवो पर माज्या आयलाबी धरलीया त्येंनी...'

'तुजी आयबी म्हारीनच हाय ना...?'

'पर माजी आय हाय ती'

'असाना का आमाला त्येंच घेनदेन न्हाय आमी फकस्त जातभाईना मदत करतो भायेरच्याना न्हायी...तुमीबी मदी पडू नगा गावकरी न् म्हार, त्येंच त्यें बगून घेत्याल...

'अवो पर माजी आय...'

'सागितल ना, आपल्याला काय घेन न्हाय म्हून...' सत्तार चिडून म्हणाला

पोरान एकदाच तिरस्कारान सत्तारकड पाहिल. आणि उलटपावली ते महारवाड्याकड धावत सुटल.

महारवाड्यात पोहोचल तेव्हा अमलू त्याला एकीकड बेहोष पडलेला दिसला त्याच्या साऱ्या अगावर रक्त माखलेलं दिसत होत आणि दुसऱ्या बाजूला त्याच्या आईला खूपजण एकाचवेळी छळत असलेले दिसले. ते लोक तिचे पाहिजे तसे हाल करत होते. तिचा भोग घेत होते. आणि ती मधे छटपटत होती क्षीणपणे रडत होती

पोरग धावल त्या गुडावर झेपावल. पण त्याची ताकद अपुरी पडली


एकदर साऱ्या महाराची आणि नव्या मुसलमानाची ताकदच अपुरी पडली प्रचड समुदायातल्या गावकऱ्यासमोर त्याच काहीच चालल नाही.

¤

महारावरोबर नव्या मुसलमानानाही बेचिराख करण्यात आल .

¤

जेव्हा गावात हा गोधळ माजला होता, त्याचवेळेस मिर्झासाहेबाच्या घरी मोठी मेजवानी रगली होती. आणि आचार्य मधून मधून म्हणत होते, 'वाह्व्वा ! वाह्व्वा '




मातीच्या दिव्यांना आली प्रकाशाची फुले
रातीच्याही हाती आता आनंदाची फळे
सुखशांती समृद्धीचे दान सर्वा लाभो नित्य
सरो काळोखाची माया उरो प्रकाशाचे सत्य

**लंगर विडी**


**आमचे अन्य लोकप्रिय ब्रँडस् :**
शंकर गोविंद घोडा कंदील सिंह हिंद लाईट
बॉम्बेलंगर मेंगलोरलंगर स्वामी छोकरा दुर्ग गुलझार परी गरूड
झुलामोहिनी इत्यादी.

निर्माते: **ठाकूर सावदेकर आणि कंपनी लि.पुणे ४२**
३७७, गुरूवार पेठ, पुणे ४११ ०४२ फोन: ३२३३७/३२७१० तार: 'धुम्रपान'

PROGRAF

# एका कॉलेजची जन्मकहाणी

**● मनोहर माधव अळतेकर ●**



१५ जून १९६८ रोजी तळेगाव–दाभाडे, तालुका मावळ, जिल्हा पुणे येथे ‘ इंद्रायणी महाविद्यालय ’ सुरू झाले. डिसेंबर १९६५ मध्ये कॉलेज काढण्यासाठी ‘ इंद्रायणी विद्यामंदिर ’ ही संस्था स्थापन करण्यात आली. सुमारे तीन वर्षांच्या महत्प्रयासानंतर कॉलेजचा प्रारंभ झाला. संस्थेचा एक संस्थापक सभासद, कार्यवाह आणि कॉलेजचा प्राचार्य म्हणून कॉलेज काढताना आणि चालविताना मला प्रत्येक गोष्टीत भाग घ्यावा लागला. त्या इंद्रायणी महाविद्यालयाची ही जन्मकथा आहे.


¤

कॉलेज का काढले ? कारण वैयक्तिक होते, सामान्य होते व आता इतक्या वर्षांनंतर विचार केला की, कॉलेज काढण्याच्या दृष्टीने ते फारच तोकडे होते हे जाणवते. मी १९५१ ते १९६८ ही सुमारे १७ वर्षे विल्सन कॉलेजमध्ये मराठी विभागात अध्यापक होतो. १९५९ मध्ये विभागप्रमुख प्रा. वा. ल. कुलकर्णी नवीन होऊ घातलेल्या मराठवाडा विद्यापीठात गेले. मी विभागप्रमुख होईन असे मला वाटले होते; पण मला प्रमुख केले नाही. आपल्यावर मोठा अन्याय झाला अशी माझी व काही मित्रांची समजूत झाली. अशावेळी माणूस विसरला नाही तरी जमवून घेतो. ते कठीण वाटले तर दुसऱ्या कॉलेजात नोकरी धरतो, कधी दुसराच उद्योग पत्करतो. पण कॉलेज काढण्याच्या भानगडीत पडत नाही. माझेही तसेच झाले असते. पण माझ्यावर झालेल्या अन्यायाचा पाढा मी माझे मित्र–एक उद्योजक डॉ. रमेश दोशी ह्यांच्याकडे दोनचारदा वाचला. एक दिवस रमेशभाई, ‘ मग तुम्ही कॉलेजच का काढत नाही ? दोन लाख रुपये अगदी हातात आहेत.’ असे म्हणाले. त्या काळी महाराष्ट्रात शास्त्र सोडून कला व वाणिज्य महाविद्यालये दरवर्षी मोठ्या संख्येने निघत होती. कॉलेज काढण्याच्या कल्पनेचा जन्म हा असा झाला. पहिली काही वर्षे कॉलेजचे स्वरूप व त्याला पडलेल्या मर्यादा ह्या जन्मकारणातच सापडतात. सर्व प्रकारची मदत करणारी लहानमोठी माणसे अखंड मिळाली पण मी सोडल्यास काम करणाऱ्या माणसांची वाण नेहमीच होती.

¤

कॉलेज काढण्यासाठी (व नंतर ते चालविण्यासाठी) अनेकांच्या सहकार्याने मी काय केले नाही ? अनेक उद्योग केले किंवा करावे लागले. कामशेटजवळील नायगावला कॉलेजच्या ग्रामीण विकास अभ्यासक्रमासाठी ‘ उत्तम ’ (का म्हणतात कुणास टाऊक ?) शेती

दोन वर्षे केली, कॉलेजला लागणारा पैसा २२ एकर जमीन विकत घेऊन, विकसित करून, प्लॉटस् पाडून, विकून अशा रीतीने तो लाखांनी उभा केला आणि ज्याला ' मध्यम ' म्हणतात तो व्यापारही केला. त्या निमित्ताने सरकारचे महसूल खाते हा काय चमत्कार आहे, दप्तर दिरंगाई म्हणजे काय, कारकुनी तिढा कसा असतो, ह्याचा पक्का पडताळा पटला. जमिनीच्या भानगडींना तोड नाही. जमिनीचे वय जसे वाढत जाते तशा तिच्या भानगडीही वाढतात आणि त्याचा देवालाही थांग लागत नाही तर माणसाची आणि त्यात माझ्या-सारख्या निर्व्याज माणसाची काय कथा ? सरकारकडून कॉलेजसाठी १५ एकर जागा मिळाली. अगोदर प्राध्यापक होतो त्याचा कॉलेज



काढल्यावर प्राचार्य झालो. म्हणजे 'अधम' नोकरी मागील अंकावरून पुढे चालूच राहिली. ब्राह्मणांची जन्मजात दीक्षा 'भिक्षा मागणे' ही शेवटपर्यंत केली. माणसाचे नको ते आणि नको तितके नमुने भेटले. काही थोड्या माणसांनी अपेक्षा नव्हती इतकी मदत केली. त्यांच्या सहवासात आयुष्याची काही वेगळीच परिमाणे बघावयास व अनुभवावयास मिळाली. त्यामुळे 'वाटेवर काटे वेचीत चाललो,' अशी बऱ्याचवेळा अवस्था असतानाही 'वाटले जसा फुलाफुलांत चाललो' असाही साक्षात्कार अधून मधून झाला. ह्या सगळ्या गोष्टी विल्सन कॉलेजमध्ये प्राध्यापक एके प्राध्यापक हा पाढा वर्षानुवर्षे म्हणत बसलो असतो तर मला लाभल्या नसत्या. ओढवून घेतलेल्या कटकटीमध्येसुद्धा एक काव्य असते.

□

विल्सन कॉलेजमधला साधा प्रश्न. विभागप्रमुख झालो काय आणि न झालो काय, आकाश काही जमिनीवर कोसळून पडणार नव्हते— किंवा माझी नोकरीही जाणार नव्हती. पण अभिमान म्हणा, अहंकार म्हणा दुखावला. त्यात इकडची तिकडची भर पडली. एक दिवस माझे मित्र डॉ. रमेश दोशी ह्यांनी कॉलेज काढायचा जंतू माझ्या डोक्यात सोडला, त्याने चांगलेच मूळ धरले. असंतुष्ट मनोभूमीत ह्या कल्पनेचा रमेशभाईच्या दोन लाख रुपयांच्या खतपाण्यामुळे झपाट्याने विस्तार झाला. दरिद्री माणसाचे मनोरथ उपजताक्षणी मरतात पण तसे झाले नाही.

□

कॉलेज काढण्यासाठी अगोदर एक संस्था स्थापन करावी लागते



' मराठी माणसाची कुवत शंभर रुपयांचीच आहे. '
—आचार्य अत्रे

असे समजल्यावर मी पुण्याला डेरेदाखल झालो. कारण पुण्यात लोकसंख्येपेक्षा संस्थांची आणि संस्थांपेक्षा त्यांच्या पाट्यांची संख्या जास्त आहे असे मला ठाऊक होते. एक अध्यक्ष, दोनतीन उपाध्यक्ष, कार्यवाह, खजिनदार आणि काही सभासद असले की संस्था काढता येते अशी मौखिक माहिती मिळवून मी मुंबईला परतलो. वडिलांच्या— मा. दा. अळतेकर — यांच्या पुण्याईने समाजातील वजनदार आणि नामवंत माणसे मी ओळखत होतो आणि त्याहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती माणसे मला ओळखत होती. प्रथम मी माझा मोर्चा आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांच्याकडे वळविला. 'काय काम काढलेस ?' आचार्यांनी आपल्या मेघगर्जनेसमान आवाजात विचारले, 'कॉलेज काढावे असा विचार आहे.' 'काय म्हणालास ?' अत्र्यांनी जोरात पुन्हा विचारले. दहा हजार वर्षांत असे अलौकिक आणि अनपेक्षित वाक्य साहेबांनी ऐकले नसावे ! मी शांतपणे वाक्य पुन्हा उच्चारले. 'कॉलेज काढायचे म्हणजे पानपट्टीचे दुकान काढायचे असे वाटते की काय तुला ? पैसा कोठून आणणार ?' रमेशभाईचे नाव आणि त्यांच्या मुठीत तयार असलेले दोन लाख रुपये मी सांगितले. 'हे पहा, मराठी माणसाची सरासरी कुवत १०० रु. देण्याची आहे, अधिक नाही. आम्ही शाळा चालवत होतो तेव्हाची कुवत फक्त ५ रुपये होती.' माझ्या शब्दांवर अत्र्यांनी कितपत विश्वास ठेवला ठाऊक नाही, पण दिवंगत मित्राचा मुलगा काहीतरी करतो आहे, मदत केली पाहिजे ह्या भावनेने बहुधा संकल्पित संस्थेचे संस्थापक सभासद व उपाध्यक्ष होण्याचे अत्र्यांनी मान्य केले. रमेशभाईच्या झाकल्या मुठीतील दोन लाखांच्या बळावर डॉ. ग. स. महाजनी, डॉ. बी. जी. वाड, श्री. ना. स. श्रीखंडे, श्री. ए. टी. पाटील श्री. वसंतराव वैद्य, श्री. विवेक क्षीरसागर आणि मावळचे त्यावेळचे आमदार मामासाहेब मोहोळ व बनारस हिंदू विद्यापीठाचे डॉ. एन्. एन्. गोडबोले असे आणखी सभासद मिळविले. संस्थापक सभासदाची वर्गणी ५०० रुपये होती. त्यामुळे मला संस्थेसाठी कराव्या लागणाऱ्या किरकोळ खर्चाची सोय झाली. प्रवास व वाहन खर्चास अधिक पैसे लागले तर रमेशभाई देत होते. विल्सन कॉलेजची नोकरी आणि पगार अद्याप चालूच होता. त्यामुळे घरची चूल खोळंबत नव्हती.

रमेशभाईच्या दोन लाखांच्या आश्वासनावर संस्थापक सभासद म्हणून इतके लोक मिळविले हे खरे; पण त्याला आणखीही काही कारणे होती. श्री. विवेक क्षीरसागर हे लहान म्हणजे शाळेत असताना मुंबईला आमचे शेजारी होते. आमच्या दोघांच्या कुटुंबाचा खूप घरोबा होता. पुढे एम्. कॉम. झाल्यावर ते अमेरिकेला गेले. M.B.A होऊन आले. १९६० च्या सुमाराला त्यांच्या वडिलांनी तळेगावला अनेक एकर जागा घेतली होती. तळेगावला कॉलेज काढण्यास हेही एक कारण होते. रमेशभाई, क्षीरसागर व मी असे पहिले तीन सभासद होतो. डॉ. ग. स. महाजनी हे माझे सर्वांत मोठे साडू. त्यामुळे सभासद होण्यास त्यांची समती तात्काळ मिळाली. डॉ. महाजनींच्यामुळे मुंबईचे प्रसिद्ध डॉक्टर बी. जी. वाड व हायकोर्टातील वकील दादासाहेब श्रीखंडे ह्यांचा लाभ झाला. श्रीखंड्यांच्यामुळे त्यांचे हायकोर्टातील सहकारी, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते श्री. ए. टी. पाटील सभासद झाले. पुढे ह्या दोघांनी आमच्या संस्थेची घटना तयार केली. विवेक क्षीरसागरांचे वडील हे बनारस हिंदू विद्यापीठा-

तील रसायन शास्त्राचे (औद्योगिक) प्रसिद्ध प्राध्यापक डॉ. एन्. एन्. गोडबोले ह्यांचे शिष्य. गोडबोले त्यावेळी पुण्यात बंगला बांधून तेथे निवृत्त जीवन कंठीत होते. माझ्या वडिलांना–प्रोफेसर मा. दा. अळतेकर ह्यांना प्रत्यक्ष किंवा लेखक, वक्ते व प्राध्यापक म्हणून हे सर्वजण ओळखत होते.

स्वस्तिक रबर कारखान्याचे संस्थापक व कार्यकारी संचालक श्री. वसंतराव वैद्य हे केवळ योगायोगाने सभासद झाले. माझी व त्यांची ओळख नव्हती. मी त्यांचे नाव वाचले व ऐकले होते. माझे नाव त्यांना ठाऊक असण्याचे कारणच नव्हते. डॉ. महाजनींच्या मुलाचे लग्न १९६५ मध्ये पुण्यात झाले. वधूपक्षाकडील गणेशराव ओगले म्हणजे पु. ल. देशपांडे ह्यांनी 'व्यक्ती आणि वल्ली' ह्या पुस्तकात रंगविलेल्या 'नारायणाचा' दुसरा अवतार! त्यामुळे माझे लक्ष ओगल्यांच्या व त्यांच्या धावपळीकडे वेधले. ओळख झाली. गप्पा झाल्या. महाजनींचे कॉलेजमधील विद्यार्थी म्हणून वसंतराव वैद्य व पत्नी जयश्रीबाई वैद्य लग्नाला हजर होत्या. वसंतराव व ओगले हे दोघे सांगलीचे व शाळेपासूनचे जिवलग मित्र! आपला मित्र मोठा कारखानदार झाला ह्याचा व वैद्यांच्या मोकळ्या व उदार स्वभावाचा ओगल्यांना साहजिकच मोठा अभिमान होता. वसंतरावांचे–ओगल्यांच्या शब्दात 'वसंता'चे–गुणगान हा त्यांचा नित्याचा आवडता विषय होता. ह्या लग्नातच एक घटना अशी घडली की वसंतरावांच्या उमदेपणाचा व कार्यतत्परतेचा मला अनुभव आला. असा मोठा माणस आपल्या कॉलेजला मिळाला तर बरे होईल असे वाटले.

त्याचे असे झाले– महाजनींचा मुलगा डॉ. अरुण हा १४ मार्च १९६५ ला लग्न झाल्याबरोबर चार दिवसांनीच जेथून आला तिकडे म्हणजे इंग्लंडला परत जाणार होता. पण प्रयाणापूर्वी मुंबईतील एखाद्या उत्तम हॉटेलात पत्नीसह राहण्याची त्याला तीव्र इच्छा होती. पण त्याचवेळी परदेशी प्रवाशांचा मोसम जोरात चालू होता. एकाही दर्जेदार हॉटेलात एकही खोली, कितीही चौकशी व प्रयत्न केले तरी उपलब्ध नव्हती. सर्वांनी हात टेकले. पुण्यातील एका बड्या कारखानदाराच्या दोन–तीन खोल्या एका अलिशान हॉटेलात कायमच्या घेऊन ठेवल्या आहेत हे मला आठवले. एक खोली कारखान्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना भेटायला गेलो होतो तेव्हा पाहिली होती. त्याची आठवण मी महाजनींना करून दिली. दोन्ही घरांचा अनेक वर्षांचा संबंध होता. आमंत्रण देण्यास आम्ही दोघे गेलो. साहेब परगावी गेले होते, बाईसाहेब होत्या. आमंत्रण दिले व खोलीची अडचण सांगून विनंती केली. पण काही इकडच्या तिकडच्या अडचणी गोड शब्दांत सांगून आमच्या लग्नाच्या अक्षतांना वाटाण्याच्या अक्षतांची परतफेड मिळाली. ऐन लग्नसमारंभ चालू असताना हाच विषय वरपित्याच्या डोक्यात घोळत होता. वसंतराव वैद्य मांडवात समोर दिसल्याबरोबर त्यांना साकडे घालण्यात आले. 'आज संध्याकाळपर्यंत नक्की कळवतो,' असे वैद्यांनी आपल्या गुरूंना सांगितले. त्याप्रमाणे मुंबईत व्यवस्था झाली. रेडिओ क्लबवर दोन दिवस मुक्काम करून वर इंग्लंडला रवाना झाला. कॉलेज निघाल्यानंतर स्वस्तिक कारखान्यातील बरेचसे लहानमोठे अधिकारी माझ्या ओळखीचे झाले. त्यात मुंबईच्या कार्यालयाचे प्रमुख श्री. रसाळ हेही होते. एकदा कशावरून तरी विषय निघाला तेव्हा रसाळ मला म्हणाले, 'अहो, ती गोष्ट मला पक्की आठवते. दुपारी वसंतरावांचा, काही झाले तरी हॉटेलात खोली मिळाली पाहिजे म्हणून फोन आला. खूप धावपळ केली पण खोली मिळेना. म्हणून वसंतरावांचे, रेडिओ क्लबचे पैसे देऊन आजीव सदस्य म्हणून नाव नोंदवले. प्रत्येक आजीव सदस्याला केव्हाही राहण्यास खोली व सर्व प्रकारच्या सोई मिळतात, दोन दिवसांचा खर्च येईल तेवढे पैसे भरले आणि खोली मिळवली.' खोली मिळाली हे मला लग्नाच्या दिवशी कळले पण कशी मिळवावी लागली हे बरेच नंतर कळले.

लग्नाच्या वेळीच कॉलेज काढताना वैद्यांची मदत मिळाली तर बरेच काम होईल, असे मला वाटले. लग्नाचे सूप वाजल्यावर मी ओगल्यांना त्यांच्या घरी भेटलो आणि कॉलेज काढण्याची कल्पना सांगितली. वैद्यांना ह्यासंबंधी बोला म्हणून विनंती केली. वसंतराव वैद्यांच्याकडे माझा प्रवेश झाला तो व वसंतराव वैद्यांचा आमच्या इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेत प्रवेश झाला त्याला केवळ निमित्तमात्र नव्हेत तर बऱ्याच अंशी कारण झाले त्यांचे बालमित्र गणेशराव ओगले! अर्थात डॉ. महाजनी, डॉ. गोडबोले, आचार्य अत्रे ह्यांची पुण्याई मागे असल्याने वैद्य संस्थापक सभासद झाले. पुढे ओगले कुटुंबाचा व माझा परिचय वाढत गेला. ओगले हेही छोटे पण स्वतंत्र कारखानदार होते. त्यांना व त्यांच्या पत्नीला नाटकांची, संगीताची फार आवड, नव्हे वेड होते. सौ. ओगले नाटके लिहीत व श्री. ओगले त्यांच्या कारखान्यातील काही नोकरांच्या व काही मित्रांच्या मदतीने स्वतः बसवीत व राज्यस्पर्धेत करून दाखवीत! हौस हा ओगल्यांचा स्थायीभाव होता आणि त्याला गप्पिष्टपणाची जोड होती. शिवाय तऱ्हेतऱ्हेच्या खाद्यपदार्थांतही त्यांना रस होता. त्यामुळे आमचे गोत्र



डॉ. ग. स. महाजनी

जमले. वैद्य व ओगले ह्या सागलीच्या दोन शाळकरी मुलाची मैत्री ही प्रौढपणातही किती उत्कट व निरपेक्ष आहे हे बघणे व ऐकणे म्हणजे कानाना व डोळ्याना सुखसोहळाच असे !

## स्थळसंशोधन

सस्थेसाठी नामवंत माणसे मिळाली. आता कॉलेज कुठे काढायचे ह्यासाठी 'स्थळ' संशोधनास सुरुवात झाली. मुंबईबाहेर आणि पुण्याच्या आसपास कॉलेज काढावे असे नक्की ठरले होते असे का ठरविले ह्याची कारणमीमासा करता येणार नाही. आम्ही सर्वजण मुंबईचे किंवा पुण्याचे असल्यामुळे हा सुवर्णमध्य ठरविला असावा रूळ रस्त्यापासून ५०–६० मैल आत जुन्नरला म्हणा, ओतूरला म्हणा ग्रामीण भागात जाण्याचा विचारही आमच्या मनात आला नव्हता. तसे झाले असते तर वेगळाच इतिहास घडला असता पण आम्ही पुण्यापासून अवघ्या २० मैलावर, तळेगावला कॉलेज काढले आणि मोठ्या डेरेदार वृक्षाखाली छोटे रोपटे वाढविण्याचा प्रयत्न करू लागलो. कॉलेज काढल्यास चालेल की नाही ह्या दृष्टीने आम्ही तळेगावची पहाणी केली, नाही असे नाही आता वाटते. इतर गोष्टींना आम्ही अवास्तव महत्त्व दिले. 'मराठी माणसाच्या मानगुटीवर इतिहासाचे भूत बसले आहे,' ह्या इतिहास सशोधन शेजवलकराच्या विधानास आम्हीही अपवाद नव्हतो इद्रायणी नदी महाराष्ट्रातील सरस्वती, ज्ञानदेव आणि तुकाराम पैसाफंड काचकारखाना, समर्थ *विद्यालय आणि तळेगाव जनरल हॉस्पिटल, अण्णासाहेब* विजापूरकर, इतिहासाचार्य राजवाडे, रियासतकार सरदेसाई, नेत्रविशारद डॉ. भाऊसाहेब सरदेसाई, मराठ्याचे सरसेनापती सरदार दाभाडे ह्याचे तळेगाव, वडगावची लढाई, ह्या शब्दानी व त्याच्याभोवती असणाऱ्या ऐतिहासिक वलयानी कॉलेज काढताना कारण नसताना आमच्यापैकी काहीजण, विशेषत: मी वाजवीपेक्षा जास्त भारावून गेलो होतो. त्यावेळी आम्ही काढलेली (आणि मी लिहिलेली) प्रसिद्धिपत्रके आज वाचली की त्यात शब्दाचे बुडबुडे किती उडवले होते हे लक्षात येते. आता वाटते की ही पत्रके मावळ तालुक्याचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक दृष्टीने विचार करून तयार करावयास पाहिजे होती. सास्कृतिक अश पाहिजे होता पण कितीतरी कमी हवा होता

कॉलेज आम्हाला कुठेतरी काढायचे होते पण तळेगावला त्याची खरोखर गरज होती का ? त्याशिवाय ह्या परिसरातील लोकाचा दैनंदिन व्यवहार अडत होता का ? ह्या सर्वांची माहिती गोळा करून मग निर्णय घेणे हे योग्य झाले असते तळेगाव तसे फसवे होते म्हटले तर ग्रामीण होते म्हटले तर शहरी होते. खुद्द तळेगावची व समोवतालच्या १५–२० मैलाच्या परिसरातील मिळवती लोकसंख्या ही रोज चिंचवड, पिंपरी, भोसरी, हडपसर, मुढवे येथील कारखान्यांत काम करीत होती. पुण्यातील सरकारी व खाजगी कचेऱ्यात कित्येकजण लहानमोठ्या ठिकाणावर होते त्यामुळे शहरातील थोडेसे गुण व बरेचसे वाण आमच्या 'ग्रामीण' भागात भिनले होते फार काय मावळ तालुक्यातील गवळी सकाळच्या लोकल गाड्यानी पुण्याला जातात आणि दुपारी परत आपल्या गावी येतात. त्याच्याही अंगावर ही शहरी सस्कृतीची धूळ रोज उडत असतेच. सुट्टीच्या दिवशी पुणे शहरात फेरफटका व खरेदी करण्याकरिता, नाटक आणि सिनेमा बघण्यासाठी हे चाकरमाने सहकुटुब आणि सहपरिवार लोकल गाड्याना एकच गर्दी करतात तळेगावच्या व आसपासच्या माध्यमिक शाळात आर्थिक परिस्थितीमुळे डावली गेलेली मुले शालात परीक्षा उत्तीर्ण झाल्याबरोबर पहिली धाव घेतात ती पुण्याला ! पुण्याच्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा म्हणून सर्व प्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्या व धडपड ही मुले व त्याचे पालक करतात. तळेगावात कॉलेज काढून ह्या शालात परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलाचा व मुलीचा वेळ, शक्ती व पैसा वाचवावा असा आमचा उदात्त हेतू होता ! पण आमच्या ह्या कल्पनेलाच सर्व मुलाचा व काही पालकाचा सक्त मानसिक विरोध होईल ह्याची आम्हास कल्पना असावयास पाहिजे होती, पण नव्हती. मी तर महानगर मुंबईचाच जन्मजात नागरिक असल्यामुळे सर्वसामान्य ग्रामीण माणसाला शहराचे आकर्षण किती आणि का असते हे मी जेव्हा तळेगावात पक्के एक तप राहिलो तेव्हा लक्षात आले

कॉलेज काढायचे ठरविले त्यावेळी इंग्रजी भाषा न घेता शालात परीक्षा पास होता येत असे. पण महाविद्यालयात प्रवेश मिळत नसे. इग्रजी विषय घेऊन पास होऊन कॉलेजात आलेल्या मुलाचे इग्रजी पाहिले की ते ह्या विषयात कसे उत्तीर्ण झाले हेच कळत नसे. इग्रजी हा विषय घेऊन तळेगाव परिसरात बरेच विद्यार्थी शालात परीक्षेस बसत. पण त्यातले कित्येकजण नेमके इग्रजीतच नापास होत *तळेगावला कॉलेज काढताना इग्रजी विषय न घेणारे आणि घेतला* तरी नापास होणारे विद्यार्थी कसोशीने लक्षात घेतले नव्हते. आमचा दृष्टिकोण इष्टचिंतनाचा होता. इग्रजी विषय घेऊन शालात परीक्षा उत्तीर्ण होणारा पण सर्व सवलती असूनही महाविद्यालयात प्रवेश न घेणारा असाही एक मुलाचा व मुलीचा वर्ग होता. काही मुले घरगुती व्यवसायात पडत तर काही मुलीचे पालक त्याची लग्ने लावून देण्याच्या खटपटीस लागत. कारण ग्रामीण भागातील व त्यातील काही जमातीतील मुलीचे वय व शिक्षण वाढले की अधिक शिकलेला व अधिक वयाचा नवरदेव मिळणे दुरापास्त असे. कॉलेज काढताना त्या परिसरातील शाळामधून शालात परीक्षेला बसणाऱ्या मुलाचे चार पाच वर्षांचे आकडे गोळा केले दरवर्षी विद्यार्थी वाढणार असे अनुमान काढले पण कॉलेज काढल्यावर पहिल्या एकदोन वर्षांतच अनुभव वेगळा येऊ लागला.

कॉलेज काढण्यासाठी मुले पाहिजे होती तशी जमीन आणि इमारत पाहिजे होती. तळेगावात मोठ्या अशा इमारती नव्हत्याच. पण ज्याच्यामुळे तळेगावात आम्ही पाय टेकू शकलो आणि पसरू शकलो ते म्हणजे तळेगाव जनरल हॉस्पिटलचे सस्थापक, प्रख्यात नेत्रविशारद डॉ दिनकर सखाराम ऊर्फ भाऊसाहेब सरदेसाई ! भाऊसाहेबाचा सक्रिय आशीर्वाद नसता तर पुणे विद्यापीठाकडून परवानगी मिळून व पैशाची थोडीफार जुळवाजुळव होऊनही कॉलेज निघू शकले नसते. कोणीही सार्वजनिक हिताचे काम करीत असेल तर त्याला मनोभावे मदत करायची, एखादा खाजगी उद्योग करीत असेल तर त्याला पैसा *द्यावयाचा, काही न करता त्याने बुडवला तरी त्याला* परत द्यायचा हा भाऊसाहेबाचा धर्म होता. काही वर्षांनी एकदा म्हशीच्या व दुधाच्या व्यवसायासाठी आपल्या एका आप्तास ते म्हैस विकत घेऊन


देत असताना मी विचारले, 'भाऊ, दोनदा फसलात तरी परत विकत घेऊन देणार ?' हा पुण्यपुरुष हसला आणि म्हणाला, 'अरे, फसवतात हे मला कळत का नाही ? सगळे कळते. पण कुणाला दारूचे व्यसन असते तर कुणाला बाईचे तर कुणाला जुगाराचे व्यसन असते. मला असे फसवून घेण्याचे व पैसे घालविण्याचे व्यसन आहे.' डॉक्टरसाहेब त्यावेळी जनरल हॉस्पिटलचे तसेच समर्थ विद्यालयाचेही अध्यक्ष होते. जागेचा, परवानगीचा व पैशाचा पत्ता नसताना आचार्य अत्रे, दादासाहेब श्रीखंडे असे इंद्रायणी विद्यामंदिराचे काही संस्थापक सभासद व समर्थ विद्यालयाचे हेडमास्तर, दादासाहेब केतकर, डॉ. सरदेसाई व प्रख्यात वकील दादासाहेब परांजपे असे एके दिवशी शाळेत एकत्र जमलो. शाळेने आम्हाला उत्तम भोजन दिले. चर्चा झाली. पहिली दोन वर्षे कॉलेज शाळेच्या इमारतीतच भरवावे. पुढे त्यांच्या ६४ एकर जमिनीपैकी काही एकर जमीन विकत घेऊन इमारत बांधावी असा विचारविनिमय झाला. पण शाळेच्या व कॉलेजच्या वेळा एकच असणार हे लक्षात आले आणि समर्थ विद्यालयामधून आम्ही जागा शोधण्यासाठी स्टेशनच्या दिशेने पुढे सरकलो.

तळेगाव स्टेशनलगत सरदार दाभाडयांनी दिलेल्या जागेत जनरल हॉस्पिटलच्या इमारती आणि क्षयरोग्यांच्या झोपडया पसरल्या होत्या. पिछाडीला रिक्रिएशन हॉल, सामुदायिक भोजनासाठी बांधलेला हॉल व वीस खोल्या आणि त्याला लागून चार मोठया खोल्या असलेली एक पुरातन धर्मशाळा होती. त्यावेळी हॉल व धर्मशाळा वापरात नव्हती. मागे एक रस्ता सोडून डॉ. सरदेसाई ह्यांनी हॉस्पिटलसाठी कधीकाळी उपयोगी पडेल म्हणून १४ एकर जमिनीचा एक पट्टा केव्हातरी विकत घेऊन ठेवला होता. संकल्पित कॉलेजचे समर्थ विद्यालयात जमत नाही असे पाहून डॉ. मजकुरांनी ह्या १४ एकरांपैकी दोनतीन एकर जमीन विकत देण्याची तयारी दर्शविली होती. जमीन चांगली स्टेशनलगत होती. पण हॉस्पिटलच्या कार्यकारी मंडळाने एका एकरास वीस हजार रुपये किंमत सांगितल्यामुळे आमचे बोलणेच खुंटले. डॉ. सरदेसाई ह्यांनी सभासदांची समजूत घालून किंमत एकराला १० हजार रुपयांपर्यंत खाली आणली. पण आमच्या खिशात दमडा नव्हता. त्यामुळे २० हजार काय आणि १० हजार काय आम्हाला सारखेच होते. पण भाऊसाहेबांना आमचे 'अर्थअभावरहस्य' विशद करून सांगितले नाही.

असेच काही दिवस गेले आणि कोलंबसाला जसा अमेरिकेचा शोध लागला तसा एका सुप्रभाती दादासाहेब परांजपे ह्यांना, धंद्यानिमित्त ७/१२ चे उतारे चाळत असताना डॉ. सरदेसाई ह्यांच्या नावावर चाकण रस्त्यावर, स्टेशनपासून सुमारे १५ मिनिटांच्या अंतरावर, कोणे एकेकाळी घेतलेली १० एकर जमीन आहे, असा पत्ता लागला. काही क्षण भाऊसाहेब बुचकळयात पडले. पण मग त्यांना आठवले. २५–३० वर्षांपूर्वी डॉ. पाटील (यांचे चरित्र रोमहर्षक आहे पण ते येथे देण्याचे कारण नाही) ह्यांच्यासमवेत कुक्कुटपालनासाठी २० एकर जमीन चाकण रस्त्यावर त्यांनी खरेदी केली होती. त्यापैकी १० एकर जमीन डॉ. सरदेसाई ह्यांच्या नावावर होती. कामशेतला सुरू केलेले आणि तळेगावात चाललेले आणि संपुष्टात आलेले त्या भागातील हे पहिलेच पोल्ट्री फार्म असावे. पुणे, तळेगाव आणि कामशेत ह्या त्रिस्थळी यात्रेत कामशेतला गेलो असताना मला डॉ. सरदेसाई ह्यांनी २० एकर जमीन उभयतांनी केव्हा घेतली, का घेतली आणि परत कशी सापडली ह्याचा समग्र इतिहास सांगितला. डॉ. पाटील, त्यांच्या रशियन पत्नी नताशा पाटील आणि चिरंजीव डॉ. प्रताप पाटील, जे तळेगावला खाजगी दवाखाना चालवीत होते, त्यांची त्रोटक माहिती सांगितली. 'ही १० एकर जमीन आहे. कॉलेजसाठी त्याचा कसाही उपयोग करा. फुकट देणार नाही पण दरात सवलत देतो आणि पैसे सवडीने द्या,' हे भाऊसाहेबांचे बोलणे ऐकताना मला आनंद झाला. इतके दिवस आम्ही हवेत तरंगत होतो आता आमचे पाय अक्षरशः जमिनीवर टेकत होते.

कॉलेज काढावे म्हणून तळेगावात हिंडू लागलो त्यावेळी दोन दादासाहेब मला भेटले— केतकर आणि परांजपे. केतकर समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक तर परांजपे तळेगांवचे व मावळचे एक ज्येष्ठ वकील. त्यांना प्रतिष्ठा मिळाली होती, पैसा मिळत होता. जेव्हा जावे तेव्हा वकीलसाहेबांच्या माडीत अनेक अशील कागदपत्रे सरसावून बसलेले असत. दादासाहेब ऐकत, प्रश्न विचारत, समोरचा माणूस विषयांतर करायला लागला तर त्यावर डाफरत व त्याला मूळ पदावर आणत. कोर्टाची तारीख केव्हा आहे, किती वाजता यायचे आणि किती पैसे घेऊन यायचे ह्यासंबंधीही स्पष्ट शब्दांत मार्गदर्शन करीत.

दादासाहेब तळेगावचे व मावळ तालुक्याचे केवळ यशस्वी वकील नव्हते. तेवढेच असते तर माझी व त्यांची भेटही झाली नसती. पण दादासाहेब तळेगांव नगर परिषद, समर्थ विद्यालय, जनरल हॉस्पिटल आणि इतर अनेक सार्वजनिक संस्थांत मोक्यात जागी होते. कोणताही सार्वजनिक प्रश्न उपस्थित झाला की दादासाहेबांची हजेरी व त्यांचे मार्गदर्शन ही एक आवश्यक गोष्ट होती. सभा किंवा समारंभ असला की दादासाहेब व्यासपीठावर हटकून असत आणि प्रसंगोचित मार्मिक भाषण करीत. दादासाहेब 'सकाळ' चे नियमित पत्रलेखक होते व कथालेखकही होते. आपल्या धंद्यात भेटलेल्या काही लोकविलक्षण व्यक्तींच्या व प्रसंगांच्या आधारे दादासाहेब कथा लिहीत व दिवाळी अंकांमधून प्रसिद्धही करीत. एकदा कामशेतला



आधारस्तंभ
दादासाहेब परांजपे

म्हणजे नायगावला आमच्या कृषितंत्र निकेतनाच्या शिबिरात मुलांच्यापुढे आपली एक गोष्ट कथन करून त्यांनी सर्वांना शेवटच्या क्षणापर्यंत खिळवून ठेवले होते. जीवनातल्या अनेक अंगांचा अनुभव व तोही डोळसपणे घेतलेला असल्यामुळे दादासाहेबांच्या गप्पा ऐकताना केवळ मनोरंजन होत नसे तर आपण आणखी काही शिकलो असे वाटे. आठवड्यातून एक दिवस हे तळेगावचे म्हणजे वडगावचे (कारण कोर्ट वडगावला आहे) वकील पुण्याच्या कोर्टात हजेरी लावीत. गाडीत भेटले म्हणजे अभिमानाने सांगत की मी पुण्याला जाण्यासाठी दिवसाचे १०० रुपये घेतो. आमच्या जमिनीची व प्लॉटस्ची कामे दादासाहेबच बघत असल्यामुळे मी वडगावच्या कोर्टात जात असे. एकदा असाच गेलो असताना एका खेडवळ अशिलाला त्याच्याच शब्दात म्हणजे अपशब्दात दादासाहेब काहीतरी जोरात सांगत होते. ही बोलीभाषा मी त्यांच्याकडून प्रथम ऐकत होतो. बोलताना मधेच थांबून दादासाहेब हसत मला म्हणाले, 'डॉक्टर, इथे आमचा अवतार हा असा असतो. तिकडे लक्ष देऊ नका. असे बोललो व वागलो नाही तर धंदाच करता येणार नाही.' थोड्या वेळाने अशिलाबरोबरचे बोलणे संपल्यावर आवाज खाली आणून पदाची चाल बदलतात तसे सौम्य शब्द वापरून दादासाहेब माझ्या कामासंबंधी बोलू लागले.

दादासाहेबांच्यात एक फार मोठा गुण होता. काहीजणांना तो अवगुण वाटे. प्रसंगी वाईटपणा घेऊनही दादासाहेब आपले मत आणि विचार ठाम व स्पष्ट मांडत. त्याक्षणी राग येई, वाईट वाटे पण त्या माणसाची भूमिका काय आहे त्याबद्दल तिळभरही संदेह उरत नसे. तळेगाव जनरल हॉस्पिटल व इंद्रायणी विद्यामंदिर ह्या दोन्हीही संस्थांत दादासाहेब होते. एखादा पेचप्रसंग उद्‌भवला की त्यावेळी दोघांनाही योग्य सल्ला देणे हे त्यांचे काम ते चोख बजावीत आणि त्याची पावती म्हणजे दोन्हीही संस्थांतील काही सदस्य, दादासाहेब आपली बाजू नीट मांडीत नाहीत म्हणून काही काळ कुरबुर करीत.

नावाप्रमाणेच दादासाहेबांचे रूपही विसरणे शक्य नाही. अंगयष्टीमधील यष्टीला शोभणारी काठीसारखी उंच, गोरीपान, भेदक डोळ्यांची, काहीशी द्रुत चालणारी त्यांची मूर्ती डोळ्यांसमोर येते.



डॉ. रमेश दोशी

कधी विनोदप्रचुर, कधी व्यवहारी, कधी गंभीर शब्द कानात घुमतात. संस्थेबद्दल व कॉलेजबद्दल लिहिताना दादासाहेब परांजपे ह्यांना वगळणे शक्य नाही. कॉलेज काढताना आणि पुढे चालविताना तळेगावात दादासाहेब परांजपे यांचा मला मोठा आधार होता. काही मदत लागली, सल्ला लागला, एखादा पेच पुढे आला की मी त्यांच्याकडे धाव घेत असे. एकतर ते गावचे वजनदार व माहितगार असामी होते. कॉलेज चालावे ही त्यांची मनापासून इच्छा होती. त्यात त्यांना कसलाही लोभ नव्हता. दादासाहेब तसे काटकसरी पण त्यांनी तळेगांवातील शाळेला एकरकमी ८० हजार रुपये दिल्यामुळे शाळेची प्रशस्त इमारत झाली व संस्थेने 'श्री. दादासाहेब परांजपे विद्यालय' असे तिचे नामकरण केले.

कॉलेजसाठी १० एकर जमीन डॉ. सरदेसाई सवलतीने देणार हे नक्की झाल्यावर कॉलेजसाठी अगदी किमान लागणारे दोन लाख रुपये कोठून आणावयाचे हा प्रश्न पुढे उभा राहिला. मधल्या काळात रमेशभाईंची दोन लाखांची मूठ केव्हाच उघडी पडली होती. 'कॉलेजचा नाद सोडूया. अशा अनेक योजना आपण कागदावर तयार करतो. प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न करतो पण कधी कधी माघार घ्यावी लागते,' असा रास्त व व्यवहारी उपदेश रमेशभाईंनी केला. पण आपण इतक्या लोकांना कॉलेज काढतो म्हणून सांगितले आहे, संस्था स्थापन केली आहे, विल्सन कॉलेजातही कॉलेज काढणार म्हणून नाक वर करून मिरवतो आहोत, त्यामुळे आता माघार घेतली की आपले हसे होणार ह्या भीतीमुळे आणि काही अंशी अहंकारामुळे त्या कोळ्याप्रमाणे पडलो तरी पुन्हा पुन्हा उंच जागी कोळे विणायचा प्रयत्न करीत होतो, तो तसाच करावयाचा असे ठरविले.

## इंद्रायणी विद्यामंदिर

१९६५ च्या अखेरीस 'इंद्रायणी विद्यामंदिर' ही संस्था यथाशास्त्र धर्मदाय संस्था व रजिस्टर्ड सोसायटी म्हणून नोंदविण्यात आली. पहिले अध्यक्ष डॉ बी. जी. वाड होते, खजिनदार डॉ. रमेश दोशी होते, कार्यवाह मी होतो आणि आचार्य अत्रे उपाध्यक्ष होते. आम्ही पदाधिकारी धरून एकंदर ११ संस्थापक सभासद होतो. आमच्या सभा मुंबईलाच होत. मी गोळा केलेली माहिती व प्रगती सांगत असे. चर्चा होई. काही सूचना करण्यात येत. पुढील सभेपर्यंत मी कामशेत–तळेगाव–पुणे असा, विल्सन कॉलेजमधील नोकरी संभाळून, फेरफटका करण्यास मोकळा असे. डॉ. वाडांनी पहिल्या वर्षातच अध्यक्षपद आणि संस्थापक सभासदत्वही सोडले. त्यांना बहुधा आमचा कॉलेज काढण्याचा हा उद्योग मांजराने आपली शेपटी पकडण्यासारखा वाटला असावा! त्यानंतर श्री. वसंतराव वैद्य हे आमच्या संस्थेचे अध्यक्ष झाले. ह्या १५–१६ वर्षात संस्थेत अनेक वादळे झाली, विवाद व मतभेद झाले, खजिनदार तीन झाले, उपाध्यक्ष कालवश झाले, आता कार्यवाहही बदलला. पण वसंतराव वैद्य अध्यक्ष म्हणून मार्च १९८४ पर्यंत कायम होते. अधूनमधून कंटाळतही. राजीनामा देतो म्हणून जाहीर करीत, आपल्याच 'लौकिक' वंगल्यात भरणारी ही शेवटची सभा असा इशारा देत पण खास लोकाग्रहास्तव अध्यक्ष म्हणून राहण्याचे शेवटी मान्य करीत. श्री

वसंतराव वैद्य ह्यांचे मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ नसते तर कॉलेज निघाले नसते आणि संस्था आजपर्यंत चालली नसती. वसंतराव कधी आवाज चढवून बोलणार नाहीत, कोणालाही वायफळ बोलू देणार नाहीत.

डॉ. सरदेसाई ह्यांची १० एकर जमीन फुकट नव्हे पण सवलतीच्या दराने उपलब्ध आहे हे मी सांगितल्यातर सभेत साहजिकच सर्वांना थोडा हुरूप आला. पण 'तंडुलाः प्रस्थमूलः' हे सत्य काही कुठे पळून जात नव्हते, त्यामुळे पैसा गोळा करण्याच्या गतानुगतिक उपायांचा आम्ही अगदी गंभीरपणे विचार करीत होतो. सभासद, तहहयात सभासद, आश्रयदाते अशी वर्गवारी करून थोडाफार पैसा गोळा करावा असे ठरले. त्याप्रमाणे परिचित व्यक्तींच्या याद्या तयार करण्यात आल्या. सगळ्या सभासदांनी प्रयत्न करतो म्हणून तोंड-भरून आश्वासन दिले. पण हात पसरण्याचे काम मलाच करावे लागणार होते. अत्र्यांच्या सरासरी १०० रुपये वकुबाचा नियम विसरलो नसल्यामुळे आमची धाव किती जाणार ह्याची मला जाणीव होती. परत असे शंभर एके शंभर करीत किती वर्षे हिंडावे लागेल व त्यानंतर कॉलेज कधी निघेल ह्याचा विचार तसा त्रास-दायक होता. करमणुकीचा कार्यक्रम, त्यासाठी तिकिटे नेहमीपेक्षा खूपच अधिक दराची विकायची, स्मरणिकेसाठी जाहिराती गोळा करायच्या व अशाप्रकारे सुमारे पन्नास हजार रुपये (१९६६ सालचे) मिळवायचे अशी एक कल्पना होती. पु. ल. देशपांडे आणि मी एका गावचे—पार्ल्याचे आणि एकाच शाळेचे—टिळक विद्यालयाचे ! त्यांचा 'हसविण्याचा धंदा' करावयाचे ठरविले. पण पाच हजार रुपयांच्या-पुढे आमचे जाहिरातीचे घोडे सरकण्यास तयार होईना. १५ ते २५ किंवा ५० रुपयांची तिकिटे खपवायची, ती सुद्धा आपल्या मित्रांत, परिचित आणि आप्तांत म्हणजे तिकिटे घेणार ते आपले अंतःस्थ शत्रू होणार किंवा भविष्यकाळात योग्य संधी साधून त्याच किंवा अधिक किमतीची तिकिटे आपल्या गळ्यात घालणार. काही नकार देणार व काही दिवस आपल्याला खेद होणार. सुदैवाने आमच्या पुढील सभेत ह्या कार्यक्रमाची मजल १०–१५ हजार रुपयांच्यापुढे (हा सुद्धा सादर केलेला अतिशयोक्त आकडा होता) जाणार नाही असे सांगितल्यावर 'दोन लाख कुठे आणि १५ हजार कुठे ?' असा दादासाहेब श्रीखंडे ह्यांनी सवाल केल्यावर आमचे ओढून ताणून आणलेले चंद्रबळसुद्धा संपले व कॉलेज काढण्यासाठी पैसा कसा मिळवावा याची चिंता करण्यास मी पुन्हा मोकळा झालो.

एखाद्या गोष्टीच्या हात धुवून मागे लागले की समोरचा फत्तरसुद्धा पाझरायला लागतो. तळेगावच्या भ्रमंतीत क्षीरसागरांना व मला तेथले तलाठी श्री. गुरव भेटले. आम्ही आमचे कॉलेजपुराण सुरू केल्यावर तळेगावला व तळेगावपासून देहूरोडपर्यंत हजारो एकरांची सरकारी गायराने आहेत. त्यांपैकी एखादे गायरान कॉलेजसाठी मिळू शकेल. आपण योग्य ती माहिती देऊ आणि मदत करू असे आश्वासन ह्या सत्पुरुषाने आम्हा दोघांना दिले. तळेगाव आणि देहूरोड ह्यामध्ये भारतीय लष्कराचा फार मोठा तळ पसरला आहे. एकेकाळी लष्करा-तील बैलांना आणि घोड्यांना १२ महिने गवत लागे. त्याचा पुरवठा ह्या गायरानांमधून होत असे. पण दुसऱ्या महायुद्धानंतर लष्कराची पुनर्रचना होऊन ते बहुतांशी यांत्रिक बनले आणि त्यामुळे ह्या गाय-रानांचे कामच उरले नाही. आता कोणत्या संबंधित अधिकाऱ्यांना भेटायचे, कसे भेटायचे, कोठून ओळखी काढायच्या ह्याबद्दल आमच्या



संस्थेला मनापासून मदत—
मार्गदर्शन करणारे—
वसंतराव वैद्य व सौ. जयश्रीबाई

वाटाघाटी सुरू झाल्या. आमचे मार्गदर्शक तलाठी श्री गुरव होते. त्याना वाट पुसत आम्ही पुढे पावले टाकायचे ठरविले. ह्या सत्कृत्यात आम्हाला आणखी एक मोठे भागीदार मिळाले. शिवाजीपार्कच्या बालमोहन विद्यामदिराचे दादासाहेब रेगे बालमोहन विद्यामदिर व तळेगावचे रामभाऊ परुळेकर विद्यानिकेतन ही दादासाहेबाच्या शैक्षणिक कर्तृत्वाची आणि कारभार कौशल्याची जिवत स्मारके आहेत. नुकतीच बालमोहन विद्यामदिर सुरू होऊन २५ वर्षे झाली होती त्यानिमित्ताने मुबईबाहेर काही तरी वेगळा उपक्रम सुरू केला पाहिजे असे दादासाहेबानी डोक्यात घेतले. त्यामुळे आम्ही दोघेही तळेगावला कॉलेजसाठी आणि शाळेसाठी जागा शोधत हिंडू लागलो. गायरान मिळण्याची शक्यता आहे हे कळल्यावर अगोदर कोणाची गायराने आमच्या दृष्टीने सोईची आणि उपलब्ध आहेत हे नक्की केले. शेवटी चाकण रस्त्यावरील गायरान आमच्या अगदी तोडापर्यंत आले, नव्हे आम्ही आणले पण एक त्रागडे निर्माण झाले. पुणे विद्यापीठाचे म्हणणे कॉलेजच्या इमारतीसाठी लागणारी जागा सस्थेच्या नावावर आहे हे दाखवा तर परवानगी मिळेल. सरकारचा आग्रह विद्यापीठाने कॉलेज काढण्यास परवानगी दिल्याचे पत्र दाखवा म्हणजे तावडतोब जागा देतो. क्षणभर काय करावे काहीच कळेना. सरकारच्या शिक्षणखात्याचे उपसचिव श्री. वसतराव परुळेकर ह्यानी ह्या प्रकरणात पहिल्यापासून लक्ष घातले होते. त्याच्याकडे सचिवालयात ( त्यावेळी मत्रालय झाले नव्हते ) धाव घेतली परुळेकरानी आमचा गजेंद्रमोक्ष केला. अधिक चिकित्सा आणि गाजावाजा न करता शिक्षणखात्याने वरील गायरानातील ७ एकर जमीन ९९ वर्षांच्या मुदतीने इद्रायणी विद्यामदिरास देण्यासाठी शिफारस केली महसूलखात्याचे आणि अर्थखात्याचे अडथळे आम्ही डॉ. महाजन व आचार्य अत्रे ह्याच्या मदतीने ओलाडले आणि कॉलेज काढण्याच्या वेडाखेरीज आणि काही मोठ्या माणसाच्या पाठिंब्याखेरीज जवळ काही नसताना १५ एकर जमीन मिळविली. एक डोगर पार केला, पण किमान दोन लाख रुपये कसे गोळा करायचे ह्या यक्षप्रश्नास अजून उत्तर सापडले नव्हते

तळेगावात त्यावेळी तीन मुख्य उद्योगाची भरभराट होती—गवताचा, कुक्कुट पालनाचा आणि जमिनीचा विकास करून, प्लॉट्स पाडून ते किफायतशीर भावाने विकण्याचा दुसऱ्या महायुद्धानतर मुबई आणि त्यानतर पुणे येथील लोकसख्या भरमसाट वाढल्यामुळे घराचा आणि ती बाधण्यासाठी लागणाऱ्या जमिनीचा भाव आकाशाला भिडला आणि मग तळेगावसारख्या पुण्या—मुबईपासून जवळ, रेल्वे मार्गावर व महामार्गावर असणाऱ्या मागास भागातील प्लॉट्स भराभर विकले जाऊ लागले व थोडीफार घरे उठू लागली पाऊस बेताचा, हवा कोरडी व आरोग्यदायक, पाणी फार कमी पण पुढे नजीकच्या काळात येईल अशी आशा आणि पुण्यामुबईच्या मानाने दर माफक यामुळे मूळ शेतजमिनी बिगरशेती बनू लागल्या आमचे सस्थापक सभासद श्री विवेक क्षीरसागर यानी तळेगावात एक छोटासा कारखाना काढला होता, आणि सुमारे ३० एकर जमिनीत प्लॉट्स पाडून विकण्याचा त्याचा दुसरा उद्योग होता. वीज, पाणी, रस्ते व गटारे ह्यासाठी व मूळ जमिनीच्या खरेदीसाठी केलेला खर्च वजा जाता एका प्लॉट्च्यामागे तितकाच फायदा उरतो असा हिशोब क्षीरसागरांनी मला अनेकदा सांगितला होता आणि आकडेमोड करून पटवून दिला होता. अशा परिस्थितीत कॉलेजसाठी १५ एकर जागा मिळाल्यावर डॉ. सरदेसाई ह्याच्या १० एकर जमिनीचा पैसा मिळविण्यासाठी कसा सदुपयोग करावयाचा हे मतिमद माणसाच्याही लक्षात येणे अवघड नव्हते. सस्थेच्या सर्व सभासदाच्या व हितचितकाच्या ओळखी व वजन भरपूर असल्यामुळे प्लॉट्स खपणार ह्याची आम्हास खात्री होती. वसतराव वैद्य आणि रमेश दोशी ह्याच्या मार्गदर्शनाखाली आम्ही योजना केली, सभेपुढे माडली, समती मिळविली आणि कामास लागलो. बिनबियाची पोपई असते तशी ही आमची बिनपैशाची योजना होती कारण डॉ. सरदेसाई ह्याच्याबरोबर साठेखत करायचे, जमिनीच्या विकासाचा म्हणजे प्लॉट्स, रस्ते आणि गटारे दर्शविलेला नकाशा तळेगाव नगरपरिषद, नगरयोजना आणि जिल्हाधिकारी, पुणे ह्याच्याकडून समत करून घ्यायचा, प्लॉट्सचा नकाशा दाखवून साठेखतापोटी गिऱ्हाइकाकडून आगाऊ पैसे घ्यायचे, त्यामधूनच ज्यांच्याकडून जमीन घेतली त्याना त्यातील काही पैसा द्यायचा, जमिनीच्या विकासासाठी लागणारा खर्च करायचा, आणखी प्लॉट्स विकायचे, त्याचा पैसा मिळवायचा आणि अशाप्रकारे द्रव्यचक्राला गती द्यायची असा आम्ही कार्यक्रम आखला होता. प्रत्येक प्लॉटचे साठेखत करताना कॉलेज काढण्याचा उदात्त हेतू सागून सर्व किंमतीच्या अर्धे पैसे मिळवता येतील आणि शेवटी सर्व व्यवहार पुरा झाला की खर्चवेच वजा जाता तितकाच फायदा उरेल असा आमचा कयास होता हातात खेळता पैसा राहील, कॉलेजचा व इतर सर्व खर्च करता येईल असा आम्ही विचार केला आणि कामाला लागलो. 'आज उधार, उद्या रोख' हे घोषवाक्य व्यवहारात सर्वमान्य होत नाही. त्यामुळे अगदी दहापैकी दहा नसले तरी दोन रुपये हातात असावे लागतात हे प्राथमिक भाडवल आमचे अध्यक्ष वसतराव वैद्य यानी उदारपणे उपलब्ध करून दिले तेव्हा आमचा शिक्षणेतर उद्योग आणि धंदा सुरू झाला


दादासाहेब पराजप्याच्यासमोर आम्ही तिघे— डॉ सरदेसाई, क्षीरसागर, व मी— बसलो आणि १० एकर तुकड्याचे साठेखत केले. पुढील कार्यासाठी भाऊसाहेब सरदेसाई ह्यांच्याकडून अधिकारपत्रे घेतली, थोडे पैसे दिले आणि हातात येतील त्याप्रमाणे पुढील पैसे देऊ असे आम्ही खरेदीदारानी विक्री करणाऱ्यास आश्वासन दिले. सरळ आणि धोपट असा आमचा त्या जमिनीचा एकच व्यवहार झाला. कारण भाऊसाहेबाचा सरळपणा, परोपकारबुद्धी आणि काहीतरी समाजास उपकारक घडावे ही तीव्र इच्छा ! आता मनोरंजक वाटणारा पण त्याक्षणी पोटात भीतीचा गोळा उभा करणारा प्रसग आठवतो काही कारणानी क्षीरसागर आणि मी पराजप्याकडे १० मिनिटे उशिरा गेलो. आम्ही पायऱ्या चढत होतो आणि भाऊसाहेब रागाने पायऱ्या उतरत होते 'हा व्यवहार मी करणार नाही तुम्हाला वेळेची किंमत नाही, मी चाललो ' आम्ही हातापाया पडून भाऊसाहेबाना वर नेले चुकीबद्दल सपशेल माफी मागितली आणि मग त्याचा राग शमला एकीकडे अनतहस्ते देण्याची वृत्ती पण त्याचवेळी प्रत्येक क्षणाचा कृपणाप्रमाणे काटेकोर हिशोब ठेवण्याचा आग्रह ! आणि त्यात काहीही चूक नव्हती ठरलेल्या वेळी हजर असणे हा दिलेला शब्द पाळण्याचा प्राथमिक पाठ आहे. डॉ सर-

देसाई, डॉ. महाजनी, श्री. वसंतराव वैद्य व काही वर्षांनी भेटलेले श्री. मधुकर गोविंद भट यांना भवभूतीचे 'कालोह्ययं निरवधि' हे वचन साफ नामंजूर होते. एक मिनिट लौकर गेले किंवा एक मिनिट उशिरा गेले की वसंतराव त्यांच्या घड्याळाकडे व आपल्याकडे रोखून बघत जाणीव करून देत. फोनवर वाजवीपेक्षा वाक्य–दोन वाक्ये अधिक बोलणे झाले की, 'प्रत्यक्ष भेटा, दुसरे अनेकजण फोनवर खोळंबलेले असतात,' असे निर्वाणीचे बोलून वैद्य फोन बंद करीत. ह्या गोष्टी मी शाळेत शिकलो नव्हतो. कॉलेजात शिकत असताना व शिकवत असतानाही शिकलो नव्हतो.

डॉ.सरदेसाई ह्यांचे पहिले १० एकर घेतल्यावर दिवंगत डॉ. पाटलांची पण आता श्रीमती नताशा पाटील आणि डॉ. प्रताप पाटील हे वारस असलेली १० एकर जमीन घ्यावी आणि दुप्पट पैसे मिळवा-वेत असा विचार क्षीरसागरांच्या व माझ्या मनात आला. जमिनीचा व्यवहार करताना बारीकसारीक मुद्द्यांवर बाईचे आणि आमचे तीव्र मतभेद होऊ लागले. शेवटी डॉ. सरदेसाई ह्यांना एकरी किंमत दिली त्यापेक्षा अधिक देऊन आम्ही पाटलांच्या जमिनीचा व्यवहार पूर्ण केला. ह्या व्यवहारात आम्हाला फार मनस्ताप झाला.

कोणतेही काम ज्याला ते कळते आणि करता येते त्यालाच द्यावे. उत्तेजन देण्यासाठी, होतकरू माणसाला पुढे आणण्यासाठी, चार पैसे वाचविण्यासाठी आपण काही करायला गेलो की नक्की भलतेच होते. त्यापेक्षा थोडा अधिक खर्च झालेला परवडतो. नवख्या न्हाव्याला मडके तासायला देतात, एकदम गिऱ्हाइकाचे डोके त्याच्यापुढे करीत नाहीत. १० एकर आणि पुढे २२ एकर जमिनीचा विकास करताना आम्हाला हाच अनुभव आला. पण अनुभवाची स्वारी वरातीच्या घोड्याप्रमाणे नेहमी उशिरा येते. तोपर्यंत झालेले नुकसान भरून काढता येत नाही. नकाशावर अर्ध्या इंचाची चूक झाली तरी रस्त्यांची व प्लॉट्सची मोजमापे कागदावर एक दिसतात आणि प्रत्यक्ष खरेदी-खत झाल्यावर मोजताना वेगळीच आहेत असे पाचसात वर्षांनी लक्षात येते किंवा संबंधित लोक निषेधाची पत्रे पाठवून किंवा प्रत्यक्ष शिव्या घालून आपल्याला पटवून देतात. आमचे पहिले आर्किटेक्ट पळशीकर आणि गोगटे म्हणून होते. क्षीरसागरांच्या ओळखीचे, होत-करू, हुषार व उत्साही म्हणून त्यांना काम दिले. क्षीरसागरांचा काय किंवा आमचा काय हेतू स्पृहणीय होता, पण व्यवहार्य नव्हता. कारण नकाशातील एक इंचाच्या चुकीने रस्ते व भूखंड प्रत्यक्षात वेडेवाकडे होत. त्यामुळे १९६७ साली मंजूर झालेला प्लॅन पुढे त्यात बदल करून मंजूर करून घ्यावा लागला. पहिला झालेला खर्च, सगळा नसला तरी थोडाफार पाण्यात गेला आणि परत खर्च करावा लागला तो वेगळाच ! तळेगावचे एक प्रतिष्ठित नागरिक श्री. नानासाहेब भालेराव जमिनी विकत घेण्याचा, विकसित करण्याचा व प्लॉटस् पाडून विकण्याचा धंदा करीत. त्यांचा गवताचाही धंदा होता आणि त्याअगोदर ते मिलिटरीचे भाजीपाला व इतर वस्तू पुरविणारे कंत्राट-दार होते. त्यांची मुले आमच्याच कॉलेजात शिकली. ते स्वभावाने मनमिळाऊ व समाजासाठी हातून काहीतरी घडावे ही इच्छा अस-णारे. तळेगावात मी कॉलेज काढण्यासाठी वारंवार जात असे तेव्हा-पासून आमचा परिचय झाला. नानासाहेब भालेरावांनी १९७२ साली आमचा जुना प्लॅन सुधारला व त्याप्रमाणे रस्ते बांधताना व प्लॉटस्ची आखणी करताना त्यांची फार मदत झाली. क्षीरसागरांनी आणि मी आपल्या देखरेखीखाली काम करून घेण्याचा नाद सोडला आणि ती जबाबदारी भालेरावांच्या अनुभवी हातात सोपविली. त्यांचा तो धंदाच असल्यामुळे त्यांनी कामाचे पैसे घेतले पण काम चांगले केले.

काम आहे तिथे चुकारपणा आलाच. मुळात केले असेल त्याच्या कितीतरी पट अधिक काम केले हे दाखविण्याची चलाखी आलीच. जमिनीचा विकास करताना उंचसखल जमीन खणून सारखी करावी लागते, रस्ते तयार करताना दोनतीन प्रकारचे थर द्यावे लागतात. काम ठरल्याप्रमाणे व्हावे म्हणून डोळ्यांत तेल घालून कंत्राटदाराच्या-वर व त्याच्या माणसांच्यावर देखरेख करावी लागते. कधी रागवावे लागते, कधी गोंजारावे लागते आणि अती झाले तर त्यांना निरोप देऊन दुसरी माणसे आणावी लागतात. बहुधा असाच किंवा त्याहूनही वाईट अनुभव येतो, पण अशीच कामे करून घ्यावी लागतात. ह्या सगळ्या डोकेदुखीची जबाबदारी क्षीरसागरांनी आपल्यावर घेतली होती. पण लष्करच्या भाकऱ्या भाजण्याचे एकच काम त्यांना नव्हते. घरचा उद्योगधंदा होता. १९७२ साली परत रस्ते करताना वडारी महाराजांनी प्रत्यक्ष काम किती केले होते, किती खणले होते, किती माल वापरला होता आणि किती फसविले होते आणि पैशाचे किती नुकसान झाले ह्याचा पत्ता लागला. एकतर एकाचवेळी आम्ही मूठ-भर माणसे अनेक कामांच्या पाठीमागे धावत होतो. त्यामुळे एके ठिकाणी ठाम उभे राहून समोरच्या कामाचा फडशा पाडणे शक्य



पुण्यपुरुष – डॉ. भाऊसाहेब सरदेसाई

नव्हते, कधी त्याचे ज्ञानही नव्हते ह्यामुळे आम्हाला काम चुकारपणाचा व फसवणुकीचा एक एक प्रकार आकलन होई आणि तोही तात्काळ नव्हे कालातराने ! 'जेनू काम तेनू थाय' ही गुर्जर म्हण ठाऊक होती पण गोता कसा आणि किती प्रकारे खावा लागतो हे ह्यावेळी कळले. तसेच आपल्या देशात व्यवहारचातुर्य ह्याचा अर्थ दुसऱ्याला फसविणे आणि कोणी फसवत असेल तर त्याचा शोध लावणे असा झाला आहे. कोणतेही काम नेकीने करण्यापेक्षा आणि रास्त फायदा किंवा मोल मिळविण्यापेक्षा चागल्या कामात हिणकस किती आणि कसे बेमालूम मिसळावे ह्यातच आमची शक्ती आणि युक्ती खर्ची पडते. त्याला राष्ट्रीय जीवनातील कोणतेही क्षेत्र अपवाद नाही.

## उद्योग, उत्साह व अज्ञान

उद्योग आणि उत्साह ह्यात आम्ही कमी नव्हतो, पण अज्ञानामुळे नको त्या लहानमोठ्या चुका बेधडकपणे करीत होतो जमीन विकत घेणे, प्लॉटस् पाडून विकणे हे आमच्या सस्थेच्या घटनेत बसत होते, पण त्यासाठी धर्मादाय आयुक्ताची प्रथम परवानगी घ्यावी लागते हे ठाऊक नव्हते पुण्याचे प्रसिद्ध वकील श्री. एस् जी. फडके हे अनेक सस्थाचे कायद्याचे सल्लागार होते. एकदा भेट गो असताना आमच्या उचापती त्यांना समग्र सागितल्या तेव्हा ते चकित झाले व म्हणाले, 'ताबडतोब सर्व कागदपत्रे आणि अर्ज घेऊन मुबईला जा. धर्मादाय आयुक्त श्री. गोडसे ह्याना भेटा आणि आतापर्यंत केलेली सर्व कामे कायदेशीर करून घ्या.' अर्ज फडक्यानीच लिहून दिला मुंबईत आलो. त्यावेळी हुतात्मा स्मारकाजवळ धर्मादाय आयुक्ताचे कार्यालय होते— आता वरळीला आहे. तेथे ११॥–१२ च्या सुमारास गोडश्याच्या दालनात प्रवेश केला. गोडसे स्थानापन्न झाले होते. समोरच्या खुर्च्यांवर दोन माणसे बसली होती गोडसे हे रसीले व सगीताचे दर्दी म्हणून प्रसिद्ध होते. सुप्रसिद्ध गायक व सगीत दिग्दर्शक श्री. जितेंद्र अभिषेकी त्याचे जामात ! चर्चा गाण्यासबधीच चालली होती हळू आवाजात एक गृहस्थ आलापही घेत होते काही वेळाने तिघेही समेवर आले आणि धर्मादाय आयुक्ताचे लक्ष माझ्याकडे गेले 'बसा काय काम घेऊन आलात ?' मी तोड न उघडता अर्ज आणि कागदपत्रे पुढे ठेवली. गोडश्यानी ती चाळली 'कमाल केलीत ! प्राध्यापक शोभता. अहो, मागे घोडा लावून आजपर्यंत गाडी चालवलीतच कशी ?' उत्तर काय देणार कपाळ ? मी ओशाळलो, हसलो आणि ज्याचा अर्थ लागणार नाही असे काही तरी पुटपुटलो. गोडसे बोलत होते, 'जमीन विकत घेण्यासाठी परवानगी घ्यावी लागते किंमत किती द्यायची ते आम्ही ठरवितो. जमिनीच्या विकासाला जो पैसा खर्च कराल आणि नतर प्लॉट्स विकाल त्याला आमची मजुरी लागते आता हे काम तडीस जाईपर्यंत ह्या ऑफिसात दुसऱ्या कोणालाही चुकूनसुद्धा भेटू नका, फाटे मात्र फुटतील' आणि गोडसे साहेबानी आमचा आगाऊ उद्योग महिनाभरात मार्गी लावला ओळखदेख नसताना ह्या भल्या माणसाने आमचे फार मोठे काम केले ! काही माणसे अकारण चागली का वागतात आणि काही माणसे अकारण वाईट का वागतात ह्याचे कोडे मला अजून सुटलेले नाही.

मुद्दाम अडवणूक न करणारे पण चाकोरीबाहेर जाऊन सोडवणूक न करणारे अधिकारीही भेटतात, त्यामुळे वेळ लागतो, थोडी धावपळ करावी लागते पण शेवटी काम होते काही वर्षांनी ह्याच धर्मादाय आयुक्ताच्या कचेरीत मला विस्मयाचा जोरदार धक्का बसला. ११२ पैकी बहुतेक प्लॉटस् विकून किंवा त्याची साठेखते करून झाली होती. एकूण येणाऱ्या आठ लाखापैकी चार ते पाच लाख रुपये गोळा झाले होते. सर्व पैसा जमिनीच्या विकासावर, कॉलेजच्या दैनदिन खर्चावर व इमारतीवर खर्च झाला होता. दुसऱ्याच एका कामाकरिता मी वरळीच्या धर्मादाय आयुक्ताच्या कचेरीत गेलो होतो सबधित अधिकाऱ्याशी इकडच्या तिकडच्या चार गप्पा मारल्या प्लॉटस खपावेत म्हणून आम्ही आकर्षक पत्रके आणि तळेगावचा व प्लॉटसचा नकाशा असलेल्या पुस्तिका कशा काढल्या, प्लॉटस् घेण्याची शक्यता आहे अशा निवडक लोकाच्या याद्या करून त्याना त्या कशा रवाना केल्या, उत्तरे किती आली, प्रत्यक्ष किती लोक येऊन भेटले, मी आणि आमच्यापैकी काही जण किती लोकाना भेटलो ह्याचे समग्र व रसाळ वर्णन मी करीत असताना मला मधेच अडवून तो अधिकारी म्हणाला, 'पण तुम्ही प्लॉटस् विकण्यासबधीची जाहिरात वर्तमानपत्रात दिली होतीत का ?' मी नकारार्थी मान हलवली. 'जाहिरात केल्याशिवाय हा व्यवहार केलातच कसा? झाले गेले गगेला मिळाले असे कधी होत नाही. जे झाले आणि गगेला गेले असे वाटले ते अकस्मात् आपल्या बोकाडी बसते.' 'ह्यावर उपाय काय काढायचा ?' मी हलक्या आवाजात प्रश्न विचारला 'वर्तमानपत्रात सर्व प्लॉटस् विकणे आहेत,' अशी जाहिरात देणे, मी कपाळाला हात लावला. वर्तमानपत्रात नुसती जाहिरात दिली आणि ११२ प्लॉटस् घेतलेल्यापैकी काही जणानी ती वाचली असती की एकच हलकल्लोळ झाला असता फसवणुकीच्या फिर्यादी दाखल झाल्या असत्या आणखी काय काय होऊ शकले असते ह्याचा नुसता विचार केला असता तरी वेड लागले असते. माझी केविलवाणी मुद्रा बघून तोच अधिकारी म्हणाला, 'असे घाबरू नका तुमच्या प्लॉट घेणाऱ्यापैकी कोणीही सहसा वाचणार नाही अशा कोपऱ्यातल्या दोन फालतू वृत्तपत्रात जाहिरात द्या.' त्याप्रमाणे जाहिरात दिली. कोणी वाचली नाही. आमची सस्था कायद्याच्या कचाट्यातून हातीपायी सुखरूप बाहेर पडली

हा जमिनीचा उद्योग करताना आणि आम्ही केलेला उद्योग निस्तरताना महसूल खात्यात कनिष्ठ तलाठ्यापासून ते वरिष्ठ सचिवापर्यंत साखळी कशी असते आणि कोणाला किती व का महत्त्व असते त्याचे मला हळूहळू आकलन होऊ लागले. प्रत्यक्ष हजीर असतो (man on the spot) तोच खरा वजीर असतो हा न्याय या खात्यात अधिकाधिक आढळतो. एखाद्या गावात तलाठी तुमच्या जमिनीची किंवा प्लॉटसची जी नोद करील, जी मोजणी करील व त्याप्रमाणे ७/१२ चा उतारा वहीत लिहील तो उतारा तुम्हाला बऱ्याच फेऱ्या मारायला लावील तेव्हा देईल. त्याच्यात कानामात्रेचा फरक करणे प्रत्यक्ष ब्रह्मदेवाला किंवा चित्रगुप्तालाही शक्य नाही. शाईने केलेली नोद व पेन्सिलीने केलेली नोद हा आणखी एक चकवा तलाठ्याजवळ तयार असतो कशीही का होईना सरकारी दप्तरात आपल्या प्लॉटची वा जमिनीची नोद झाली की आपण खूष होतो. पण पेन्सिलीने केलेली नोद हा गाधर्व विवाह असतो, कायदेशीर

नव्हे. काही वर्षे गेल्यानतर, दरम्यानच्या काळात दोन तीन तलाठी बदलून गेल्यावर कोणातरी असामीने हा जमिनीचा तुकडा माझाच आहे असा दावा केल्यावर, हे विदारक सत्य आपल्या लक्षात येते. अक्षरशः आपल्या पायाखालची जमीन सरकू लागल्याची, विशेष सुखकर नसलेली जाणीव होते आणि अनेक महिने नव्हे अनेक वर्षे आपल्या झोपेचे खोबरे होते. काय घोटाळा आहे म्हणून तलाठ्याकडे धावत जावे तर तो चारदोन वेळा तो भेटतच नाही. कुठल्यातरी गावाला सरकारी कामासाठी गेलेला असतो. निदान सर्कलला नाहीतर मामलेदाराला भेटायला वाजतगाजत जातो. भेटलाच तर, 'वहीत पक्की नोंद अशी आहे. नोंद करणारा तलाठी केव्हाच सेवानिवृत्त झाला.' म्हणून कानावर हात ठेवतो. ह्यानंतर भेटणाऱ्यांपैकी प्रत्येक दुसरा किंवा तिसरा माणूस आपल्याला व्यवहार कसा कळत नाही हे समजावून सांगतो आणि तलाठ्यांच्या धूर्तपणाच्या अनेक खऱ्या-खोट्या 'चित्तचक्षुचमत्कारिक' गोष्टी पेश करतो. हळूहळू सर्कल, प्रांत, मामलेदार, सबरजिस्ट्रार, सक्षम अधिकारी, जिल्हाधिकारी; महसूलविभाग प्रमुख, टेबल अधिकारी, सचिवांचे अनेक प्रकार आणि शेवटी महसूल मंत्री हा शब्दकोश वरवर चाळून होतो. पण एकेकाचा 'नाममहिमा' हा अनुभवानेच कळतो. ह्या सगळ्या सरकारी गोतावळ्यात गोते खाताना, गिरक्या घेताना आणि अधूनमधून योग्य दिशेला प्रगती होताना आपण पानागणिक उत्कंठा वाढविणारी मध्येच निराश करणारी तरी कधी क्षणभर का होईना केल्या ढोर-कामाचा लाभांश मिळाला असे समाधान देणारी एखादी रहस्यकथा वाचतो आहोत की काय असे मला वाटे.

कोणतेही काम सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी असो ते आपल्याला पाहिजे तसे व पाहिजे त्या वेळात करून घेताना वरिष्ठांचा वशिला, पत्र किंवा ओळखपत्र फारसे उपयोगी पडत नाही— असा माझा अनुभव आहे आणि उपयोग झालाच तरी तो एकदाच होतो. रोज आपली गाठ गल्लीशी असते, दिल्लीशी नसते. अगदी लहान किडा झाला तरी त्याला अहंकार असतो, थोडा अधिकार असतो, त्याच्यावर आक्रमण करण्यापेक्षा त्याच्यापुढे नम्र झाले तर तोही सुखावतो व आपला कार्यभाग साधतो. आपल्या काय वर ओळखी आहेत, कोणताही अडचळा आला तरी तो चुटकीसरशी दूर करता येईल असा माझा काही दिवस भ्रम होता. पण उच्चपदस्थ माणसे चहा पाजतात, गोड बोलतात, आश्वासने देतात, टेलिफोन करतात, पत्रे लिहितात पण शेवटी आपला सूळ आपल्यालाच खांद्यावर वागवावा लागतो. क्वचित आधार मिळतो पण तो तेवढ्यापुरता !

काम कसे करतो आणि कुठे अडते हे मी भेट झाली की आमच्या अध्यक्षांना, वसंतराव वैद्यांना सांगत असे. संस्थेचे संस्थापक सभासद व्हावे म्हणून विनंती करण्यास गेलो तेव्हा, 'माझ्याकडून काय अपेक्षा आहेत ?' असे वसंतरावांनी विचारले. 'स्मरणिका काढू. त्याला जाहिराती व मार्गदर्शन मिळावे,' असे मी सांगितले, 'देणग्या मिळवून देण्यात मदत करावी,' अशीही पुस्ती पुढे जोडली. 'ते शक्य नाही. देणग्या मिळवू शकेन पण मला तितक्याच किंवा अधिक प्रति-देणग्या द्याव्या लागतील.' मुद्दा पटला. अक्षरशः तनमनधनाने वैद्य आमच्या संस्थेत व काढलेल्या कॉलेजात गुंतले. कोणतीही गोष्ट हात राखून, अंग चोरून आणि तोंडदेखली करणे हे वैद्य दांपत्याच्या पिंडातच नाही. कितीही उद्योगमग्न असले तरी वसंतराव माझ्या अडचणी ऐकून घेत आणि कुठे चुकले व पुढे कसे वागावे हे तपशीलवार सांगत. त्यांचा एक आवडता सिद्धांत होता. आपला प्रश्न समोरच्या अधिकाऱ्यापुढे उदाहरण घालावे त्याप्रमाणे मांडावा. उत्तर शोधण्याचा तो कसोशीने प्रयत्न करतो. त्याच्या हातात असतील त्या सर्व सवलती देऊन त्रुटी भरून काढतो. आमच्या अध्यक्षांचा हा आदेश प्रत्येकवेळी नसला तरी बरेचवेळा ऐकल्यामुळे काही तिढे सुटले. विद्यापीठात तर उच्चस्तरापेक्षा कारकुनांचा व मध्यम स्तरातील अधिकाऱ्यांचा फार उपयोग झाला. जवळ उत्तर नसताना आलेल्या पत्रांना व प्रश्नांना उत्तरं कशी द्यावी, शब्दांत कसे सापडू नये. कालापहरण कसे करावे हे प्रत्येक क्षेत्रातील मध्यमस्तराने मला शिकविले. हीच माणसे, आपल्या प्रकरणाची मांडणी कशी करायची (presentation), ते लौकर पुढे मांडायचे की विलंब लावायचा हे ठरवितात. कोणताही उद्योग करताना ही फळी शाबूत व संतुष्ट ठेवावी लागते. माझा एक गुण म्हणा, दुर्गुण म्हणा, मला अशावेळी फार उपयोगी पडे. मी काटेकोरपणाने वागत नव्हतो. मोकळेपणाने वागणे हा माझा स्वभावधर्म होता. लहान असो, मोठा असो, गरीब असो, श्रीमंत असो मला खोटा आब आणि अंतर राखून किंवा खोटा आदर व नम्रपणा दाखवून वागता व बोलता येत नव्हते व अजूनही येत नाही. शिक्षकाच्या पेशाला कदाचित बाधक असणाऱ्या वा वाटणाऱ्या माझ्या या मनोवृत्तीचा बहुविध उद्योग करताना, विविध पेशांच्या, प्रवृत्तींच्या व स्तरांच्या व्यक्तींना भेटताना मला फार फायदा झाला.


## घरोघरी दीप उजळे, सौख्याची बरसात करे


दीपावलीच्या आगमनाबरोबरच सौख्याचे व आनंदाचे वातावरण सर्वत्र पसरते. या आनंदात भर टाकण्यासाठी मनपसंत दागिने खरेदी करा. लग्न-मुंजी, सण, वास्तुशांत व इतर कोठल्याही मंगल प्रसंगी आमचे दागिने आपल्या घराची शोभा वाढवतात.

# वामन हरी पेठे

**सोने-चांदी व हिऱ्यांचे पिढ्यां-पिढ्यांचे प्रसिद्ध जवाहिरे**

पेठे बिल्डिंग, जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४०० ००४
फोन : ३५३५२१-२२

पेठे बिल्डिंग, रानडे रोड, दादर, मुंबई ४०० ०२८
फोन : ४३०१५९२, ४३०८५१५ व ४३०७५१६



## भूखंड विक्री

२२ एकर जमीन घेतली म्हणून आणि '५०–१००–२०० रुपये करत आणि किरकोळ देणग्या गोळा करत फिरण्यापेक्षा प्रत्येक प्लॉट-मागे फायदा म्हणून मिळणारे तीन हजार रुपये दिसले, म्हणून हा जमिनीचा धंदा केला. धी दिसले आणि मिळालेही पण त्याबरोबरच अनेकविध क्षेत्रातील अडचणीचा व व्यवहाराचा बडगाही पाठीत बसला हा धदा केला म्हणून १५ जून १९६८ रोजी कॉलेज निघू शकले आणि जवळजवळ १० वर्षे मुलाची संख्या कमी असूनही आणि सरकारचे अनुदान फक्त ३५ टक्के मिळत असतानाही कॉलेज चालू शकले. प्लॉट्सच्या येणाऱ्या या वाहत्या गगेमुळेच कॉलेजचा दैनंदिन खर्च भागला आणि सुमारे १॥ लाखाची कॉलेजची इमारत, अपुरी का असेना पण उभी करता आली.

कायदा हा आंधळा, बहिरा आणि हेकट असतो ह्याचा प्रत्यय ह्यावेळी एकदा आला. सरकारी अधिकारी समंजस असत आणि आमच्यापुढचा पेच सोडवावा अशी त्याची मन.पूर्वक इच्छाही असे. पण कायद्याच्या कलमामुळे त्याचेही हातपाय बाधलेले असत. अत्यत कार्यक्षम व मदत करण्यास सदैव तत्पर असणाऱ्या त्यावेळच्या (१९६८) पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्याच्या चौगुलेसाहेबाच्याकडेच घड-लेला एक प्रसग. १५ एकर जमीन मिळाल्यानतर व कॉलेज सुरू झाल्यावर दुसऱ्या काही कामाबद्दल मी जिल्हाधिकाऱ्याना भेटलो असताना कॉलेजसाठी जमीन विकत घेऊन, प्लॉटस् पाडून, ते विकून पैसा कसा उभा केला हे मी त्याना सागत होतो. चौगुलेसाहेबानी माझे बोलणे ऐकले आणि शातपणे हसून म्हणाले, 'तुमची २२ एकर जागा आहे आणि तीसुद्धा तळेगावात अगदी आम्ही दिलेल्या जागे-समोर चाकण रस्त्यावर आहे, हे अगोदर कळले असते तर तुम्हाला जागा मिळाली नसती, कारण तुमची जागा होती'

'पण कुणाकडेही भीक न मागता धदा केला आणि पैसा उभा केला.'

'ते उत्तम केलेत. त्याबद्दल तुमच्या सस्थेचे अभिनदन करतो. पण कायदा आहे हा असा आहे.' कलेक्टरसाहेबानी विषय संपविला.

कॉलेज काढले आणि १४ वर्षे चालविले, त्याचा आधार हा २२ एकर जमिनीचा केलेला उद्योग होता. रस्ता आम्हाला नवा आणि आडवळणाचा होता. धावपळ झाली, त्रास झाला, अदाज फसले, काही चुकाही झाल्या. पण पैसा मिळाला तसा चटके देणारा आणि चटका लावणारा अनुभवही मिळाला. किती तरी माणसे भेटली आणि त्यातील काही जन्माची जोडली. काही कडू आठवणीही आहेत, पण एका हाताची पाची बोटे सारखी नसतातच !

संस्था स्थापन केली तेव्हा एकरकमी भरघोस देणगी नसताना कॉलेज काढणे अव्यवहार्य होते. रमेश दोशीचे दोन लाख आले नाहीत व वसतराव वैद्याना विचारले तेव्हा 'दोन लाख देणगी मी आणली तर उलट दोन लाख द्यावे लागतील,' असे त्याचे उत्तर होते. एखादी गोष्ट अव्यवहार्य असते पण अशक्य नसते हे आमचे कॉलेज निघाल्याने सिद्ध झाले. या जमिनीच्या विक्रीतून महिन्यात कधी ५ हजार तर कधी १५ हजार रुपये येत असत आणि त्यावेळची नड भागे पण एकरकमी मोठी रक्कम ५० हजार रुपये, एक लाख रुपये कधीच आले नाहीत. महाराष्ट्र सरकारची लॉटरी लागली असती तर किंवा एखादी भरघोस देणगी मिळाली असती तरच ते शक्य होते. आता ह्याच्यापुढची पायरी म्हणजे पुणे विद्यापीठाकडून कॉलेज काढण्यासाठी मान्यता मिळविणे प्रथम वाटले तितके हे काम सोपे नव्हते.

अर्धी–अधिक हयात राजकारणात घालवूनही कसलाही मुखवटा नसणारा माझा फर्ग्युसन कोलेजमधील एक वर्षाचा (१८३८–३९) एफ् वाय् चा वर्गमित्र प्रा. ग. प्र. प्रधान त्यावेळी फर्ग्युसन कॉलेज-मध्ये इंग्रजीचा प्राध्यापक होता व पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीचा एक सभासद होता त्या सुमारास म्हणजे १९६६ मध्ये तो विधान-परिषदेवरही निवडून आला होता. १९६५ च्या अखेरीस संस्था स्थापन झाल्यावर किंवा अगोदर मी प्रधानला गाठले आणि आमची म्हणजे माझी कॉलेज काढण्याची योजना समजावून सागितली. प्रथम त्याला पटली नाही. पण नतर त्याने मला, 'पुणे विद्यापीठात तुझे काय काम असेल ते सर्व मी करीन.' असे आश्वासन दिले आणि अगदी परवापर्यन्त संस्थेचे अगर कॉलेजचे काम मग मी विद्यापीठात असो किंवा सरकारात असो, त्यास मागितली तितकी सर्व मदत केली. बोलावले तेव्हा प्रधान आवर्जून भाषणासाठी व मुलाच्याबरो-बर चर्चा करण्यासाठी तळेगावला व कामशेतला आला माझे काही काम असले की सबधित मन्त्र्याना किंवा अधिकाऱ्याना त्याने लिहि-लेली व मला दिलेली काही पत्रे अजून माझ्याकडे आहेत, कारण मी एखाद्या विशिष्ट पत्राचा उपयोग करण्यापूर्वीच तो मत्री किंवा तो अधिकारी त्या पदावरून अतर्धान पावलेला असायचा! कधी कधी आम्ही दोघे उठून मत्रालयात काम असेल त्याच्याकडे भेटावयास जात असू प्रधानचा आमदार म्हणून एक सात्विक दरारा होता आणि त्याच्या शब्दाला महत्त्व होते

आणखी एका पत्राचा उल्लेख केला पाहिजे हे पत्र प्रधानने मलाच लिहिले होते कॉलेज काढण्याचा सकल्प सोडला तेव्हाचे म्हणजे १९६५ चे हे पत्र आहे. त्यात त्याने मला जिव्हाळ्याचा इशारा दिलेला होता 'तू काहीही कर, वाटेल तितके कष्ट कर, कॉलेज काढ पण कोणत्याही आर्थिक बाबतीत अडकू नकोस. आपण दोघेही मध्यम वर्गातील माणसे आहोत, दोघानाही ससार आहे' पुढे काय झाले ते इथे सागत नाही पण काय झाले ते आठवून दोघेही आज हसतो आणि मी कुठे अडकलो नाही म्हणून परमेश्वराचे आभार मानतो.

पुणे विद्यापीठाकडे कॉलेज काढण्यासबधीचा अर्ज, १५ महिने अगोदर ५०० रुपये भरून करावा लागे (आता ही रक्कम वाढली आहे असे ऐकतो.) त्या अर्जात संस्थेची आर्थिक परिस्थिती, कॉलेज काढणार त्या विभागात कॉलेजची किती निकड आहे, माध्यमिक शाळा किती आहेत, शालात परीक्षेची केंद्रे किती आहेत, इग्रजी विषय घेऊन किती विद्यार्थी बसतात, किती उत्तीर्ण होतात, इमारतीची काय व्यवस्था करणार, सस्थेच्या कार्यकारी मडळात किती शिक्षण-तज्ज्ञ आहेत, समजा आता जागा भाड्याने असेल तर पुढे इमारत बाधण्यासाठी जागा मिळणार आहे का आणि तिचा आकार काय इत्यादी प्रश्नाची माहिती पुरवावी लागते आमच्या कार्यकारी मडळात डॉ. महाजनी, डॉ. गोडबोले, आचार्य अत्रे, वसतराव वैद्य

अशी नावे असल्यामुळे 'नाव मोठे' होते. पण वर दिलेली जी लक्षणे लागतात त्यात आमचे घोडे प्रारंभी तरी फारच लंगडे होते. १९६६ मध्ये एकदा विद्यापीठाच्या बड्या अधिकाऱ्याबरोबर बोलताना कॉलेज काढण्यास किती पैसे लागतात असा विषय निघाला असताना, 'पाच लाख तरी प्रारंभी असावे लागतात,' असे उत्तर मिळाले. आमची आर्थिक अवस्था काय होती ते आधीच आले आहे त्यामुळे काही क्षण मी गांगरलोच. कारण त्यावेळी रमेशभाईंचे दोन लाख रुपये तर नव्हतेच पण सरकारकडून १५ एकर जमीनही मिळालेली नव्हती. फक्त डॉ. सरदेसाई ह्यांची १० एकर जमीन नुकतीच दृष्टिपथात आली होती. आपण पत्त्याचा डाव मांडतो. खेळताना आपल्या हातात अगदी 'नगण्य' पाने येतात पण तरीसुद्धा आपण बोली वाढवत नेतो तसे माझे चालले होते. केव्हातरी आपले सोंग उघडकीला येणार हे भय मनात होतेच. पण मागचा पुढचा विचार न करता जाता येईल तितके पुढे जात होते, रेटत होतो. त्यातही एक कैफ असतो.

१९६५ मध्ये यथाक्रम ५०० रु. भरून विद्यापीठाकडे तळेगावला कॉलेज काढण्यासाठी अर्ज केला. प्रधानसारखे आणखी काही परिचित कार्यकारी मंडळात असल्यामुळे तिथे अर्जाचा विचार होण्यास आणि पुढील कार्यवाही करण्यासाठी समिती नेमण्यास काहीच अडचण आली नाही. पण त्यावेळी संस्थेकडे जागा नव्हती, पैसा नव्हता, इमारत नव्हती त्यामुळे ऐनवेळी विद्यापीठाकडे, 'अजून आमची पूर्ण तयारी नाही, तळेगावला समिती पाठवू नका,' अशी तातडीची तार पाठवावी लागली. परीक्षेसाठी फॉर्म भरावा, पैसे भरावे पण अभ्यासाच्या नावाने 'रामा–शिवा–गोविंदा' असल्यामुळे आयत्यावेळी परीक्षा केंद्राकडे वळू नये, तसे आमचे झाले

ह्या पहिला अर्ज करताना विद्यापीठातील काही अधिकाऱ्यांना आणि नोकरांना भेटावे लागले. त्यावेळी श्री. सरदेशपांडे हे उपकुलसचिव होते. त्यांच्याकडे कॉलेजच्या संलग्नीकरणाचा (affiliation) विभाग होता. त्यांनी मला सर्व माहिती दिली, शक्य ती मदत केली आणि तपशिलासाठी आणि इतर काही लागल्यास आपल्या हाताखालच्या माणसास भेटावयास सांगितले त्याचे नाव श्री भावे, त्यांची ओळख झाली. भावे बोलताना मोकळे, मदत करण्यास तयार, अडचण असेल तर त्यामधून मार्ग कसा काढायचा ते सुचविणार पण हे सगळे करत असताना जी कायद्याची व नियमाची चौकट असेल त्याच्याबाहेर एक इंचसुद्धा जाणार नाहीत. पण आपण तसे जात नाही आहोत हे समोरच्या माणसाला कधी भासवणारही नाहीत. भाव्यांचा हा स्वभाव अगदी पहिल्या भेटीत नव्हे, पण पहिल्या वर्षात माझ्या लक्षात आला. भावे मॅट्रिकच होते पण इतकी वर्षे नोकरी झाल्यामुळे अनेक खात्यांमधून त्यांनी काम केले होते. अनुभव भरपूर होता. कामचुकारपणा नव्हता. त्यामुळे कुठलेही खाते किंवा काम अडले तिथे भाव्यांची नेमणूक करण्यात येत असे. कोर्टातील फिर्याद मग ती विद्यापीठावर किंवा विद्यापीठाने लावलेली असो. सर्व कागदपत्रांसह भाव्यांची मुंबईला, मथुरेला किंवा दिल्लीला ताबडतोब रवानगी करण्यात येत असे शेवटी कोणत्याही विद्यापीठाचा सगळ्यात कठीण, खडतर आणि कसोटीचा असा जो परीक्षा विभाग त्यात भाव्यांची दुय्यम कुलसचिव म्हणून नेमणूक करण्यात आली. भाव्यांच्यामुळे माझा विद्यापीठासंबंधीचा 'सर्वसामान्य ज्ञानाचा' अभ्यास पक्का झाला. भाव्यांना अशाच अनेक अधिकाऱ्यांना विद्वत्‌सभा, विधिसभा आणि इतर असंख्य समित्या ह्यांच्या बैठकी असत. त्यावेळी माहिती पुरवण्यासाठी आणि कामकाजाचा वृत्तांत टिपून घेण्यासाठी हजर रहावे लागे त्यामुळे विद्यापीठातील सर्व वजनदार व्यक्तींचे स्वभाव आणि लागेबांधे हे आपोआपच दिसत आणि कळत. भाव्यांच्याबरोबर गप्पा मारताना ह्या गोष्टी मला समजत, अर्थातच भावे कधीही कोणत्याही समितील किंवा खाजगी संभाषणातील महत्त्वाची व गोपनीय गोष्ट सांगत नसत ह्या गोष्टी भावे काय किंवा परिचित झालेले इतर अधिकारी काय माझ्या कल्पनेवर व तर्कावर सोपवीत. त्यामुळे विद्यापीठातील राजकारण व त्याचे आडवेउभे धागे मला कळू लागले सत्ता आणि थोडाफार पैसा असला की पुढारी असोत किंवा शिक्षक असोत, सारे एकाच माळेचे मणी बनतात. त्याच लवाड्या. तेच डावपेच, प्रतिपक्षाची त्याचा नेमका कमीपणा हेरून कोंडी करणे आणि प्रतिपक्षाला नामोहरम करून आपण राज्य चालविणे ह्यात दोघेही कमी नसतात. पण पुढारी गुरुजींच्यापेक्षा अधिक वस्ताद असतात

## पुन्हा अर्ज

१९६६ साली समितीला आम्ही दारातूनच परत पाठविले. १९६७ सालासाठी परत अर्ज केला. विद्यापीठाने परत समिती नेमली. ह्यावेळी आमची थोडीबहुत तयारी झाली होती. त्यामुळे समितीचे पाय तळेगावला लागले. २२ एकर जमिनीतील बऱ्याच प्लॉट्‌सची साठेखते झाली होती. त्यामुळे एक लाख रुपये हातात होते आणि


Govt. Recognised Valuer
Registered No.
CAT VIII– 730 of 1973
L. No. 31 / Gold / 1985

।। श्री रवळनाथ प्रसन्न ।।


**जगन्नाथ गंगाराम पेडणेकर**

**चोख सोने, चांदी व मोत्यांचे दागिन्यांचे व्यापारी**

९ बी. । १-२, खांडके बिल्डिंग, रा. के. वैद्य रस्ता,
दादर, मुंबई ४०० ०२८.

**सोने चांदी व मोत्यांचे दागिने ऑर्डरप्रमाणे अल्प मुदतीत बनवून दिले जातील.**
**सोने चांदी व मोत्यांचे तयार दागिने हजर स्टॉकमधून मिळतील.**

नजीकच्या भविष्यकाळात ४–५ लाख रुपये तरी हातात येतील हे आम्ही समितीला पटवू शकलो. संस्थेच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची नावे इतकी प्रसिद्ध होती की समितीने कौतुकाने आणि आदराने मान डोलावली. सभासद शिक्षणक्षेत्रात काम करणारे असल्यामुळे त्यांनी माझ्याखेरीज प्रत्यक्ष कार्य करणारे किती आहेत, गावातील कोणत्या संस्था आणि मातबर व्यक्तींचा पाठिंबा आहे. त्याची कसून चौकशी केली. डॉ. सरदेसाई यांचे नाव सांगितले, त्यात तळेगाव जनरल हॉस्पिटल, समर्थ विद्यालय आणि पैसाफंड काचकारखाना ह्या तीन प्रख्यात संस्था आल्या. पहिल्या दोन संस्थांचे भाऊसाहेब अध्यक्ष होते आणि पैसाफंडाशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता. शिवाय डॉ. सरदेसाई ही एक प्राचीन वटवृक्षाप्रमाणे प्रचंड संस्था होती. समिती आली त्या दिवशी डॉक्टरसाहेब माझ्या विनंती-वरून मुद्दाम हजर राहिले होते. त्यावेळी तळेगाव नगरपरिषदेत दादासाहेब परांजपे ह्यांच्या शब्दाला मोठा मान होता आणि त्यांचा आमच्या कॉलेजला केवळ जन्मापासून नव्हे तर कल्पनाधारणेपासून पाठिंबा होता. तसा आमचा लौकिक व विश्वासार्हता चांगली होती. आता माझ्याखेरीज आणि काही प्रमाणात क्षीरसागरांखेरीज प्रसंगी धावपळ करणारा तिसरा माणूस नव्हता. पण अशी माणसे आम्हाला कॉलेज सुरू झाल्यावर मिळतील, आपण विचारलेला प्रश्न आमच्याही डोक्यात आहे असे काही तरी उत्तर देऊन वेळ भागवली. समितीने हा प्रश्न तसाच सोडला आणि दुसराच प्रश्न, ज्यावर १९६७ साली कॉलेज सुरू करण्याचे तारू फुटले, तो उपस्थित केला. तुमच्याकडे कॉलेजची इमारत बांधण्याकरता पाच सात एकर जागा आहे का?




त्या प्रश्नामुळे आम्ही निरुत्तर झालो. 'चाकण रस्त्यावर गायरान आहे, त्यातील काही एकर जमीन आम्हाला लौकरच मिळणार आहे. सरकारकडे आमची खटपट चालू आहे' असे लांबलचक उत्तर आम्ही दिले. पण आमचे उत्तर एकाही सदस्याचे समाधान करू शकले नाही. 'सरकारी जागा मिळवा किंवा कॉलेजला योग्य अशी इमारत तात्पुरती मिळवा म्हणजे कॉलेज काढण्यास संमती देता येईल. वर्षभर आणखी तयारी करा आणि पुन्हा अर्ज करा.' समितीने आम्हाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या. पण त्याचबरोबर काही उपयुक्त सूचनाही केल्या. 'कॉलेजमध्ये शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात पास झाल्याखेरीज प्रवेश मिळत नाही. शहरात अडचण नसते पण ग्रामीण भागात इंग्रजी विषय न घेता पास होण्याचे प्रमाण फार असते. इंग्रजी विषय घेऊन जी मुले बसतात त्यातील बरीच मुले नापास होतात. कॉलेजला किती विद्यार्थी येतील याचा अंदाज घेण्यासाठी शाळांमधून जाऊन आकडे गोळा करा. कॉलेज निघायचे ते गाव शालांत परीक्षेचे केंद्र असावे लागते. भरपूर पैसा असल्याखेरीज कॉलेज काढायच्या भानगडीत पडू नका.' प्रत्येक उपदेश असतो तसाच हाही उपदेश चांगला होता. पण न पटणारा होता.

१९६८ सालासाठी तिसऱ्यांदा अर्ज केला. समिती तीन सदस्यांची होती. पहिल्या समितीचे अध्यक्ष प्राचार्य आचार्य हे आता सदस्य होते आणि जळगावच्या मुळजी जेठा कॉलेजचे प्राचार्य महाजन हे अध्यक्ष होते. सर परशुरामभाऊ कॉलेजचे रसायनशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. घाटे हे तिसरे सदस्य होते. सरकारकडून आम्हाला १५ एकर जागा मिळाली होती, तसे जिल्हाधिकाऱ्यांच्या सहीचे पत्र आमच्याकडे होते. प्लॉट्सचे पैसे आणखी आले होते त्यामुळे दोघाही सदस्यांनी ह्यावर्षी कॉलेजला परवानगी मिळण्यास काही अडचण येणार नाही असे सांगितले.

दुसरे दिवशी उठलो आणि प्राचार्य महाजनांना भेटण्यास डेक्कन जिमखान्यावरील 'शिवदर्शन लॉज' वर गेलो. विद्यापीठाच्या कामा-साठी येणारे बरेच प्राध्यापक आणि प्राचार्य 'शिवदर्शन' मध्येच तळ देत. औपचारिक बोलणे झाल्यावर प्राचार्य महाजन एकदम मुद्द्यावरच आले.

'एक गोष्ट कॉलेज काढण्यास संमती देण्यास आड येणार.'

'कोणती?' मी.

'शालांत परीक्षेचे तळेगावला केंद्र नाही. विद्यापीठाने घालून दिलेल्या कसोट्यांपैकी (Norms) ही एक कसोटी आहे.'

प्राचार्य महाजनांना अधिक न बोलता आणि काही न दर्शविता निरोप घेतला. आणखी एक दिवस त्यांचा मुक्काम पुण्यात होता. तसाच उठलो आणि विद्यापीठात कुलगुरूंच्याकडे— हरिभाऊ पाटस-करांच्याकडे गेलो. प्राचार्य महाजनांनी निदर्शनास आणलेली आणि आम्ही न पाळलेली शालांत परीक्षेच्या केंद्राची कसोटी व त्याची आमची कथा हरिभाऊंना सांगितली. मध्ये फारसे न बोलता, मला न अडवता ती त्यांनी ऐकून घेतली आणि नंतर मला कुलगुरू म्हणाले, 'माझा निरोप महाजनांना सांगा, ह्या कसोटीचा विचार न करता कॉलेजसंबंधीचा वृत्तांत (report) विद्यापीठाला सादर करा, मग पुढे बघता येईल.' मी पाटसकरांचे औपचारिक आभार न मानता तसाच निघालो आणि 'शिवदर्शनात' प्राचार्य महाजनांना भेटलो.

त्यांना कुलगुरूंचा निरोप दिला. 'उद्या सकाळी डॉ. घाटचांना इथे ६.३० ते ७ वाजता घेऊन या म्हणजे आम्ही वृत्तांत तयार करतो, सह्या करतो आणि विद्यापीठाकडे सादर करतो!'

वास्तविक शालांत परीक्षेसाठी केंद्र मिळविणे आमच्या इतर अडथळ्यांपेक्षा फारच सोपे होते. केंद्रासाठी अर्ज स्थानिक शैक्षणिक संस्थेने किंवा शाळेने करणे आवश्यक होते. आम्ही करू शकत नव्हतो. समर्थ विद्यालयाला तुम्ही अर्ज करा, आम्ही पुढचे बघतो असे सांगितले. समर्थ विद्यालयाकडून होकार मिळाला पण त्यांचा अर्ज बोर्डाकडे गेला नाही हे आम्हाला फार उशिराने समजले. त्यामुळे कॉलेजला विद्यापीठाकडून परवानगी मिळविण्यासाठी फार धावपळ व प्रयत्न करावे लागले.

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी सकाळी मी डॉ. घाटचांना घेऊन प्राचार्य महाजनांच्याकडे गेलो. माझ्यादेखतच रिपोर्ट तयार झाला आणि दोन वर्षांनंतर आम्ही आमच्या उद्दिष्टाच्या बरेच जवळ आलो.

त्याच दिवशी दुपारी मी विद्यापीठात फेरी मारली. २ ते २.३० मध्यंतर असे आणि त्यावेळी, आज जिथे उपाहारगृह आहे व शेजारी परीक्षा विभाग आहे त्याच्यासमोर असलेल्या बागेत एका प्रचंड वृक्षाखाली काही सेवक गप्पा मारण्यासाठी व काम करण्याला नवा हुरूप येण्यासाठी एकत्र बसत. भावे, रामदासी, बाबुराव कुलकर्णी, सबनीस अशी काही नावे आठवतात. विश्रांतीचा काळ असला, प्रत्यक्ष काम चालू नसले तरी विषय विद्यापीठाचाच असे. फक्त एकमेकांच्या विभागातील माहितीची व रोमहर्षक कथांची आणि कधी भानगडींची देवाण–घेवाण व्हायची. ह्या अड्डयावर अधूनमधून माझा मुक्काम असे. ह्या सर्वांनी मी नवखा आणि परका म्हणून मला दूर लोटले नाही. त्यामुळे विद्यापीठ विश्वातील अनेक गोष्टी कानावर पडत. माझा उद्योग सर्वांना ठाऊक असल्यामुळे भूमितळावर आसनमांडी ठोकल्यावर, 'पुढे काय घडले वर्तमान?' म्हणून सर्वांच्या प्रश्नार्थक माना माझ्याकडे वळल्या. सविस्तर हकीगत सांगून, 'कॉलेज काढण्यास संमती द्यावी.' असा प्राचार्य महाजनांनी रिपोर्ट दिला आहे असे सांगितले. 'चांगले झाले. हुरळून जाऊ नका. दिल्ली अजून दूर आहे. जागरूक रहा.' असा इशारा सर्वांनी दिला. दोन–चार दिवसांतच त्याचा प्रत्यय आला. एका कर्णपिशाच्चाने मला सांगितले, 'विद्यापीठाच्या कार्यकारिणीतील निर्विवाद बहुमत असलेला गट तळेगांवला कॉलेज निघण्याच्या विरुद्ध आहे.'


विद्यापीठातील राज्यकर्त्या पक्षाचे नेते प्रा. एन्. आर्. कुलकर्णी होते. प्रा. कुलकर्ण्यांचा दबदबा आणि दरारा किती आहे, ह्याचा टीकात्मक उल्लेख करताना 'केसरी'ने एका अग्रलेखात त्यांचा उल्लेख 'शहेनशहा' असा केला होता. प्रा. कुलकर्णी आपल्या विषयात–गणितात पारंगत होतेच पण विद्यापीठ कायद्याच्या सर्व यमनियमांचा त्यांचा अभ्यास गाढा आणि अचूक होता. एकंदर दैनंदिन कारभार कसा असतो व चालतो ह्याचेही त्यांना उत्तम ज्ञान होते. त्यामुळे प्रा. कुलकर्णी ह्यांची भाषणे कधी कधी एकांगी असली तरी त्यातील बारकावे व युक्तिवाद विरुद्ध पक्षालासुद्धा विचार करावयास लावे. प्रा. कुलकर्णी, हे डॉ. महाजनींचे आवडते विद्यार्थी. डॉ. महाजनींमुळेच ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य झाले.

उत्तम शिक्षक म्हणून प्रा. कुलकर्णी ह्यांनी जसा लौकिक मिळविला तसाच त्यांचा फटकळपणा व आक्रमक वृत्ती ह्यामुळे पुणे असो किंवा सांगली असो त्यांचे व्यक्तिमत्त्वच वादळी ठरले. केवळ महाजनींच्याच शब्दामुळे झाले तर प्रा. एन्. आर्. कुलकर्णी ह्यांचे मतपरिवर्तन होईल, आपल्या युक्तिवादामुळे वा विनवणीमुळे होणार नाही ह्याची मला पक्की जाण होती. डॉ. महाजनी त्यावेळी उदेपूर विद्यापीठाचे कुलगुरू होते. म्हणून माझा मोर्चा मी उदेपूरकडे वळवला.

डॉ. महाजनींना मी आजतागायत झालेल्या सर्व घटना विशद करून सांगितल्या. किती प्रगती झाली आहे पण कोणाचे, किती व का अडथळे येण्याची शक्यता आहे तेही सांगितले. थोडीफार चर्चा झाली. डॉ. महाजनींनी काही सूचना केल्या. काही पत्रे दिली. एक प्रा. एन्. आर्. कुलकर्णी ह्यांना लिहिले होते. इकडे तिकडे वेळ न घालवता, मुंबईत न थांबता तडक पुण्याला आलो. प्रा. कुलकर्ण्यांनी आपल्या गुरूचे पत्र वाचले आणि मला हसून म्हणाले, 'आता बोलणेच खुंटले! इतरांचे मी काही सांगू शकत नाही, प्रयत्न करीन पण माझा विरोध तुमच्या कॉलेजला होणार नाही. खरोखर तळेगावला कॉलेज निघू नये असे माझे स्पष्ट मत आहे. फार कॉलेजे झाली. पण बोलण्यात अर्थ नाही. कार्यकारिणीमध्ये कसलाही अडथळा न येता तुमच्या कॉलेजचा रिपोर्ट विद्वत्सभेपुढे जाईल.' आणि तसा तो गेला.

कार्यकारिणीपुढे कॉलेजसंबंधीचा आलेला समितीचा रिपोर्ट हा सहसा अडवायचा नाही, तो विद्वत्सभेपुढे चर्चेसाठी व मतासाठी मांडायचा असा अलिखित नियम आहे, त्याला आमचा अपवाद न केल्यामुळे आम्ही विद्वत्सभेपुढे जाऊन पोचलो इथे खरी कसोटी होती.


स्वच्छता ....
सर्वांच्या आरोग्यासाठी



स्वच्छ अशी सुलभ प्रसाधन गृहे प्रत्येक बस स्थानकावर बांधण्याची योजना कार्यान्वित होत आहे. काही ठिकाणी ती पूर्ण झालेली आहेत.
अत्यल्प शुल्क देऊन त्यांचाच उपयोग करा.

बसगाड्या, बस स्थानके व त्यांचा
परिसर स्वच्छ ठेवण्यास
एस.टी. ला सहकार्य करा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
महाराष्ट्र वाहतूक भवन मुंबई ४०० ००८.

विद्यापीठाचा हा शेवटचा नकारार्थी किंवा होकारार्थी शब्द होता. काहीजण इथेच गारद होत आणि पुरस्कार केलेले सरकारच्या अंतिम समतीसाठी पुढे जात.

१९६८साली पाच गावानी कॉलेज काढण्यास समती मिळावी म्हणून अर्ज केले होते शिरूर–घोडनदी, तळेगाव, पिंपळगाव, मनमाड आणि नेवासे दोन अर्ज पुणे जिल्ह्यामधून, दोन अर्ज नाशिक जिल्ह्यामधून आणि शेवटचा अर्ज नगर जिल्ह्यामधून होता. आम्ही पाच याचक प्रथम विद्वत्सभेच्या दारापर्यंत पोचलो होतो. शैक्षणिक कसोट्यात (Norms) एकेका कसोटीत कमी होतो. तळेगावला शालात परीक्षेचे केंद्र असावे हे योग्यच आहे. पण समजा तसे केंद्र नसेल तर कॉलेज निघणार त्या गावातील व परिसरातील मुले शालात परीक्षेला बसत नाहीत का उत्तीर्ण होत नाहीत? महत्त्व कशाला? किती मुले परीक्षेला बसतात त्याला की परीक्षेला बसल्यामुळे केंद्र नावाची कसोटी निर्माण होते त्याला ? पण १९६८ साली आम्हाला अनुभव आला तो मात्र विपरीत आला.

विद्वत्सभेच्या बैठकीचा दिवस उजाडला दोन अडीच वर्षे केलेल्या कष्टाना प्रतिसाद मिळाला नाही तर पुढे काय करायचे हा प्रश्नच होता. कदाचित् आपल्या आकांक्षेला पूर्णविराम द्यावा लागेल ह्या भानगडीत पडलो नसतो तर बरे झाले असते असे विचार मनात घोंगावत होते. मला वरच्या मजल्यावरून सभेचे काम दिसत होते आणि ऐकू येत होते कुलसचिव पुढे आणि त्याच्यामागून कुलगुरू आले. स्थानापन्न झाले. आमचे पाच अर्ज व त्यावरील वृत्तात सभेला सादर करण्यात आले. कुलगुरू हरिभाऊ पाटसकर ह्यानी ह्या पाच अर्जांना समती द्यावी अशी शिफारस केली. पण त्याचे शेवटचे वाक्य हवेत विरण्यापूर्वीच 'कोणालाच संमती देऊ नये' असे दोघातिघानी उठून प्रतिपादन केले त्यावर चर्चा होईल, उत्तरे–प्रत्युत्तरे होतील असे मला वाटत होते पण तसे काहीच झाले नाही कुलगुरूची शिफारस नामजूर झाली.

## अखेर मंजुरी

रात्री ८ च्या सुमारास कुलगुरूना त्याच्या बगल्यावर भेटलो. बोलण्यासारखे काही नव्हतेच आभार मानले कोणत्याच कॉलेजला परवानगी न दिल्यामुळे कुलगुरू नाराज आणि उदास होते. हरिभाऊ पाटसकर मला म्हणाले, 'मुबईला जा आणि शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरीना भेटा. विद्वत्सभेकडून अन्याय झाला आहे अशी लेखी तक्रार करा माझ्याकडे शिक्षणमंत्री विचारणा करतील मी योग्य ते उत्तर देईन. धीर सोडू नका.' मी निरोप घेतला. रात्रीच्या गाडीने निघून सकाळी मुबईला आलो थेट आमदारनिवासात प्रा. ग प्र प्रधानाकडे धाव घेतली. विधानसभा व विधानपरिषदेचे अधिवेशन चालू होते प्रधानला सगळा वृत्तात सागितला अगदी त्याच दिवशी नाही पण काही दिवसांनी प्रधानने माझी नामदार चौधरीशी भेट घडवून आणली. पण दरम्यान बरेच पाणी वाहून गेले होते. नेवाशाला समती न दिल्यामुळे 'कर्तुम् अकर्तुम्' सत्ता असलेली बरीच माणसे विद्यापीठावर रुष्ट झाली होती. नेवासे येथे ज्ञानदेवानी १३ व्या शतकात 'भावार्थदीपिका' सागितली महाराष्ट्र राज्य सरकारवर व पुणे विद्यापीठावर निर्णय बदलावा म्हणून दबाव येऊ लागला. अगदी त्याचवेळी मी प्रधानबरोबर शिक्षणमत्र्याना विधानभवनात भेटलो. मला फारसे बोलावेच लागले नाही. मधुकरराव चौधरी मला म्हणाले, 'काही काळजी करू नका. पुणे विद्यापीठ मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विद्वत्सभेची खास बैठक घेणार आहे. त्यावेळी नेवाशाबरोबर तुमच्या चारही अर्जांचा आणि समित्यांच्या वृत्तात्ताचा फेरविचार होईल.' शिक्षणमत्र्यानी सागितल्याप्रमाणे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात २३ तारखेस विद्वत्सभेची बैठक झाली आणि महिन्या दीडमहिन्यापूर्वी एक मनमाडचा अपवाद सोडल्यास, इतर घेतलेले चार निर्णय बदलण्यात आले. महाविद्यालये काढण्यास आम्हा चौघाना नेवासे, पिंपळगाव, शिरूर–घोडनदी आणि तळेगाव ह्याना संमती देण्यात आली. मनमाड कॉलेजला फादर फेररचा पाठिंबा होता. धर्मांतराच्या कारवायामुळे लोकमत प्रक्षुब्ध झाले होते. सरकारने देशातून त्याला हद्दपार केले. त्यामुळे त्यावर्षी मनमाड कॉलेजला परवानगी मिळाली नाही. केवळ ज्ञानेश्वर माउलीच्या कृपेमुळे आम्हाला कॉलेज काढण्यास परवानगी मिळाली.

¤

दोनतीन दिवस आनदात आणि आप्तमित्राचे अभिनंदन स्वीकारण्यात गेले. वसतराव वैद्य अमेरिकेला गेले होते महिनाभर तर येणार नव्हते. जाताना वसंतरावानी निक्षून सागितले होते, 'कॉलेज काढण्यास परवानगी मिळाली तरी विद्यापीठाकडे 'पुढीलवर्षी कॉलेज काढतो' अशी मुदतवाढ मागा. कारण मी तेव्हा परदेशात असल्यामुळे पैशाची अडचण येईल' महिनाअखेर विद्यापीठाचे अधिकृत पत्र आले. ४ जून १९६८ ला शालात परीक्षेचा निकाल लागला. १५ जूनला कॉलेज सुरू होणे विद्यापीठाच्या पत्राप्रमाणे आवश्यक होते. आमचा फौजफाटा फक्त चारपाचजणाचा होता. कॉलेजसाठी संमती मिळवण्यास केलेला सर्व आटापिटा मला पोरखेळ वाटू लागला. कारण आता ठराविक वेळेत– १५ जूनच्या आत आम्हाला पैसा, इमारत, विद्यार्थी, प्राध्यापक वगैरे सर्व गोष्टी उभ्या करावयाच्या होत्या आणि विद्यापीठाच्या येणाऱ्या एकसदस्य समितीला दाखवावयाच्या होत्या आणि त्या एक सदस्याकडून अंतिम होकार मिळवायचा होता. आनंद आणि अभिनदन विसरलो आणि कॉलेज काढण्यास मुदत मिळणे शक्य आहे का हे अजमावण्यासाठी पायाला परत चाके बांधली.

पहिली मुलाखत झाली प्रभारी कुलसचिव प्रा. गर्दे ह्याची. कुलसचिव श्री. गोळे हे दोन महिन्यासाठी परदेश दौऱ्यावर गेले होते. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्रविभागाचे प्रमुख प्रा. गर्दे हे त्याचे काम बघत होते. 'मुदतवाढ मिळणार नाही. १५ जूनला कॉलेज सुरू झाले पाहिजे. फार तर एक आठवडा उशिरा सुरू झाले तर चालेल. पण जून महिन्यात सुरू झालेच पाहिजे.' प्रा. गर्दे ह्यानी मला इशारा दिला. नतर कुलगुरू पाटसकरांकडे गेलो. कॉलेज काढण्यास संमती मिळविण्यापूर्वी अडचणी व विरोध दूर करण्यास तयार असणारे सर्वजण, कॉलेज इतक्या अल्पावधीत सुरू करण्यात असणाऱ्या अडचणीचा विचार करण्यास, नव्हे त्या ऐकून घेण्यासही तयार नव्हते! हरिभाऊ पाटसकर मला म्हणाले, 'मुदत मिळणार नाही. परत अर्ज करावा लागेल पुढील वर्षी लोणावळ्याशी सामना आहे हे विसरू नका. पुन्हा परवानगी मिळेल अशी खात्री नाही व्यवहार्य मार्ग

कॉलेज तावडतोब सुरू करणे.' सौम्य प्रकृती हरिभाऊ पाटसकरांनी इतके स्पष्ट सांगितल्यावर माझा 'मुदतीचा ताप' साफ उतरला. पण शेवटचा प्रयत्न म्हणून मी प्रा. नानासाहेब सुरू यांना भेटलो. नानासाहेबांचे बोलणेही मवाळ व मधुर. पण ह्या भेटीत मात्र नानासाहेब म्हणाले, 'काय वाटेल ते करा. भीक मागा, कर्ज काढा नाहीतर चोरी करा. पण १५ जूनला कॉलेज सुरू करा.' सगळीकडून चांगलाच कोंडीत पकडला गेलो. मराठी माणसांचे असे एकमत झालेले मी कधीच पाहिले नव्हते.

प्रथम पैशाची सोय होते का बघावे मग इतर सोंगे आणण्याचा विचार करता येईल; असे मनाशी ठरवून, फोन करून सौ. जयश्रीबाई वैद्य ह्यांना 'लौकिक' वर भेटलो. सुदैवाने स्वस्तिकचे हिशेबनवीस व अर्थसल्लागार श्री. अप्पासाहेब देवधर त्यावेळी हजर होते. 'प्लॉटसचा थोडाफार पैसा हातात असल्यामुळे आणि येत असल्यामुळे बाकीचा खर्च भागेल पण एक लाख रुपये विद्यापीठाकडे अनामत रक्कम ठेवावी लागते त्याची सोय कशी करायची? १५ जूनला कॉलेज सुरू केले नाही तर कधीच सुरू करता येणार नाही आणि वसंतरावांनी तर परदेशी जाताना, 'मी नसताना कॉलेज सुरू करू नका' म्हणून बजावून सांगितले आहे. निदान वसंतरावांना फोन करून बघू या.' मी उभयतांच्यापुढे माझी बाजू मांडली. 'एक लाख रुपये रोख किंवा सरकारी रोखे घेता येतात ना!' देवधरांनी विचारले. मी होकारार्थी मान हलविली. जयश्रीबाई ऐकत होत्या. मग शांतपणे पण निर्धाराने म्हणाल्या, 'फोन करण्याचो गरज नाही.' मी क्षणभर दचकलो. पुढचे वाक्य श्वास रोखून ऐकू लागलो. 'अनामत रकमेच्या एक लाख रुपयांच्या सरकारी रोख्यांची व्यवस्था अप्पासाहेब करतील, काळजी करू नका. लागेल ती मदत मागा पण १५ जूनला कॉलेज सुरू करण्याच्या दृष्टीने कामाला लागा.' कॉलेज निघण्यास सौ. जयश्रीबाईंचा वाटा फार मोठा आहे. निर्णय घेण्यास त्यांनी एक क्षणाचाही विलंब लावला नाही.

पुढे जयश्रीबाईंचा कॉलेजमुळे व इतर अनेक कारणांनी अनेकदा संबंध आला; संभाषण झाले. त्यांची घरचो व संस्था चालविण्याची कार्यपद्धती डोळयांनी पाहिली. केवळ बड्या कारखानदाराची बायको हे विशेषण त्यांना फारच तोकडे पडेल व अन्यायाचे ठरेल. अनेक संस्थांत त्या सक्रिय भाग घेत. पण काहीजणींचे होते तसे आपल्या घराच्या कारखान्याकडे त्यांचे कधीही दुर्लक्ष होत नसे. आल्या अतिथीचे स्वागत व्यवस्थित होई. वसंतराव वैद्यांची वेळाच्या काटेकोरपणाची व अचूक कामाची शिस्त पाळणे हे सोपे नव्हते. बघावे तेव्हा जयश्रीबाईंचा काहीतरी उद्योग चालू असे. स्वस्थ बसल्या आहेत असे मी कधी बघितलेच नाही. वसंतराव वैद्यांचे बोलणे मखमली पण मुद्दा पोलादी. आवाज कधी चढणार नाही. उलट जयश्रीबाई स्पष्ट बोलणार. एक घाव आणि दोन तुकडे करणार! दोघांच्या स्वभावातील साम्यविरोध निरखताना मजा वाटे.

तळेगावला सरकारने दिलेली १५ एकर जमीन होती. पण तुकाराममहाराजांच्याप्रमाणे 'आकाश मंडप। पृथ्वी आसन' करून कॉलेज सुरू करता येत नव्हते. तळेगाव जनरल हॉस्पिटलचा रिक्रिएशन हॉल, डायनिंग हॉल आणि २० खोल्या असलेली धर्मशाळा डोळयांसमोर आली. त्यावेळी रिक्रिएशन हॉल सोडल्यास इतर




इमारती वापरात नव्हत्या हॉस्पिटलमध्ये आणि तेसुद्धा क्षयरोग्याच्या हॉस्पिटलमध्ये कॉलेज काढण्याची कल्पना पटेना पण दुसरी इमारत दिसत नव्हती कामशेटला भाऊसाहेब सरदेसाई ह्याच्याकडे गेलो. सगळी परिस्थिती आणि काही झाले तरी १५ जूनला कॉलेज सुरू झाले पाहिजे ही विद्यापीठाची अट सागितली. एक लाख रुपयाच्या अनामत रकमेची सोय सौ. जयश्रीबाईंनी केली आहे हेही सांगितले तळेगाव जनरल हॉस्पिटलच्या कार्यकारी मडळातील अनेक सभासदाचा कॉलेजला जागा देण्यास विरोध होता धर्मादाय संस्था असल्यामुळे उघड भाडे घेता येत नव्हते. पण खुद्द भाऊसाहेब सरदेसाई, डॉ. साठे, दादासाहेब पराजपे आणि हॉस्पिटलचे एक ट्रस्टी दादासाहेब चितळे ह्यानी निकराचे प्रयत्न केल्यामुळे आणि शेवटपर्यंत नेट लावल्यामुळे तत्त्वत कॉलेजला पाच वर्षांसाठी जागा देण्याचे मान्य झाले. पुढील वाटाघाटी व आर्थिक तपशील ह्या दोन्ही सस्थाच्या अध्यक्षानी एकत्र बसून निश्चित करावा असे ठरले त्याला थोडा कालावधी होता, कारण वसतराव वैद्य परदेशातून परत आले नव्हते.

## प्राध्यापक पाहिजेत

आमच्या कला आणि वाणिज्य शाखाचा एकेक वर्गच पहिल्या वर्षी सुरू होणार होता. काही विषय इग्रजी, मराठी, अर्थशास्त्र यासारखे दोन्हीही शाखाना समान होते. सर्व विषय शिकविण्यासाठी अर्धवेळ शिक्षक पाहिजे होते पुण्यापासून २० मैलावर असलेल्या, नवीन निघत असलेल्या कॉलेजात आगगाडीने जाण्यात येण्यात तीन तास घालवून रोज दीड तास शिकविण्यास किती जणांना उत्साह असेल ह्याबद्दल शकाच होती. आमच्या सुदैवाने डॉ महाजनी ह्यावेळी पुण्यातच होते आम्ही दोघे पुण्याच्या मोठ्या महाविद्यालयात अर्धवेळ शिक्षक मिळविण्यास गेलो प्रत्येक कॉलेजच्या प्राचार्यांचे डॉ महाजनी हे एकेकाळचे प्राचार्य असल्यामुळे त्याना वाकून नमस्कार करण्यापासून प्रारभ होई कल्पना अशी होती की त्याच्याकडे शिकवत असणाऱ्या पूर्णवेळ किंवा अर्धवेळ प्राध्यापकाला तळेगावला आठवड्यातून दोन तीन दिवस शिकविण्यास परवानगी मिळावी. अडचण परवानगीची नव्हती वेळेची होती पुण्याचे व तळेगांवचे वर्ग सकाळीच भरणार होते. कारण कला व वाणिज्य शाखा सकाळीच भरत विज्ञानशाखा दुपारपासून सध्याकाळपर्यंत असे पण त्या प्राध्यापकाचा आम्हाला उपयोग नव्हता. पण एक फायदा झाला. पुण्यातील सर्व प्राचार्यांशी माझ्या ओळखी झाल्या. नवीनच एम् ए. किंवा एम्. कॉम. झालेल्या त्याच्याच होतकरू विद्यार्थ्यांपैकी काहीची नावे त्यानी सुचवली आणि त्यामधून आमचा शिक्षकवर्ग १५ जूनपर्यंत उभा राहिला. ह्याला अपवाद दोघांचा होता. श्री मणेरीकर हे त्यावेळी विद्यापीठात सहाय्यक सचिव होते त्याचे चिरजीव अरुण मणेरीकर अर्थशास्त्र घेऊन आजच्या गरवारे पण त्यावेळच्या एम् ई एस् कॉलेजमधून चागल्याप्रकारे एम्. ए परीक्षा उत्तीर्ण झाले होते. भाव्यानी व इतरानीही माझ्याकडे मणेरीकराची शिफारस केली. 'ह्यापुढे कॉलेज सुरू झाल्यावर तुम्ही सस्थेच्या व कॉलेजच्या सर्व कामाना योग्य न्याय देऊ शकणार नाही ओढाताण होईल हे लक्षात घेऊन शिकवण्याचे काम पहिल्या वर्षी कमी असले तरी अरुण मणेरीकराना पूर्णवेळ घ्या. त्याना विद्यापीठातील कामाची माहिती आहे. रोज विद्यापीठामधूनच ते तळेगावला येतील त्यामुळे ह्या विद्यापीठाच्या आघाडीकडे तुम्हाला फारसे लक्ष द्यावे लागणार नाही,' असा त्याचा युक्तिवाद होता आणि तो आमच्या संस्थेतील सदस्याना पटला. त्याप्रमाणे आमच्या कॉलेजातील पहिली नेमणूक अरुण मणेरीकराची पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून झाली. कॉलेजमध्ये शिकविण्याचा कसलाच पूर्वानुभव नसतानाही, सस्थेचा कार्यवाह म्हणून माझ्या तळेगाव-पुणे, तळेगाव-मुबई फेऱ्या चालणार हा विचार करून मणेरीकराना उपप्राचार्य नेमण्यात आले. त्यासाठी अधिक पगार देण्याचा प्रश्नच नव्हता. कारण शिकवायचे तास कमी होते. फक्त अधिक अधिकार देण्यात आले

सोमेश्वरनगर (सहकारी साखर कारखाना) येथील मु. सा. का. महाविद्यालयाच्या प्राचार्य, इंदिरा गाधी तत्रनिकेतन ह्या मुलीच्यासाठी सोमेश्वरनगरला चालणाऱ्या सस्थेच्या चालिका आणि आता नसलेल्या पण एकेकाळी वधूवर सूचक मंडळ म्हणून उपयुक्त सामाजिक कार्य करीत असणाऱ्या आणि सुसा (सुयोग साधना) च्या चालिका व त्याच नावाच्या मासिकाच्या सपादिका, जनसघाच्या व आता भा. ज. प च्या पुण्यातील कार्यकर्त्या, काही काळ पुणे विद्यापीठाच्या कार्यकारिणीच्या सभासद सौ. सुशीलाबाई आठवले ह्यानी अकस्मात् एका दिवशी आमच्या १५ जूनला सुरू होणाऱ्या कॉलेजमध्ये हिंदीच्या अर्धवेळ प्राध्यापिका म्हणून प्रवेश केला! वैद्य दांपत्याबरोबर माझ्यापेक्षा त्याचे जुने आणि घनिष्ठ सबध असल्यामुळे अर्ज वगैरे करण्याचा प्रश्नच नव्हता. 'सुसा' म्हणजे जयश्रीबाई हे समीकरण त्याकाळी पुण्यात प्रसिद्ध होते. सौ. सुशीलाबाई आठवल्याना सार्वजनिक कामाचा अनुभव होता व त्यास अनुरूप अशी त्याची मनोवृत्ती होती धडाडी, कामाचा उरक, कोणाही लहानमोठ्या असामीला ओळख नसतानाही नि.संकोचपणे भेटून, गोड बोलून काम करून घेण्याची हातोटी, व्यवहारचातुर्य असे अनेक गुण सौ. सुशीलाबाई आठवले ह्याच्यात एकवटले होते.

कॉलेजला प्राचार्य लागतो त्याप्रमाणे कार्यालयप्रमुख लागतो आता आयत्या वेळी आणि तोसुद्धा तळेगावात असा कोण अवतार अवतीर्ण होणार त्याचा मी गंभीरपणे विचार करू लागलो. पूर्वी पार्ल्याला राहणारे व मुबईच्या महानगरपालिकेत काम करून निवृत्त झालेले. श्री. दडवते आपल्या मुलाकडे तळेगावला रहात होते. दादरलाही त्यांचे बिऱ्हाड होते. वर्षभर कॉलेजात काम करावे म्हणून मी दडवत्याकडे शब्द टाकला माझा व माझ्यापेक्षाही वडिलाचा पूर्वपरिचय असल्यामुळे ( कारण ते पूर्वी पार्लेकरच होते. )असल्या कामाचा अनुभव नसतानाही ते कॉलेजमध्ये काम करण्यास तयार झाले दादासाहेब पराजप्याच्या शिफारशीने चावरे नावाचा शिपाई मिळाला त्याच्या अगाध लीला वर्णन कराव्यात तेवढ्या थोड्याच आहेत

¤

अखेर १५ जून १९६८ रोजी सकाळी ४१ विद्यार्थी आले व इतकी वर्षे कल्पनेत असलेले कॉलेज- 'इद्रायणी महाविद्यालय' ( कला आणि वाणिज्य ) म्हणून सुरू झाले मी विल्सन कॉलेजमध्ये प्राध्यापक होतो, कॉलेज काढण्यासाठी 'इद्रायणी विद्यामदिर' ही सस्था स्थापन केली, त्याचा कार्यवाह होतो तो आता प्राचार्य झालो. आणखी एका अनोळखी प्रदेशात मी प्रवेश केला होता.

ज्याच्यासाठी इतका अट्टहास केला, इतकी धावपळ केली ते इद्रायणी महाविद्यालय काढण्याच्या उद्योगात माझे अगभूत सहकारी कोण होते ? विल्सन कॉलेजमध्ये नोकरी करताना, विभागप्रमुखपद न मिळाल्यामुळे असलेला असंतोष, थोडा अहकार, कॉलेज काढण्यासबधीच्या सदिग्ध कल्पना आणि कधीच पूर्ण न झालेले दोन लाख

रुपयांच्या देणगीचे आश्वासन ह्यासह मी अंधाऱ्या दरीत उडी घेतली ! कोणताही व्यवहारी व हिशोबी माणूस असला वेडेपणा करण्यास धजावला नसता. पण कधी कधी असाध्य गोष्टी साध्य होतात त्या असे अविचारी साहस आणि पराकोटीचे सायास ह्यामुळे ! तसा मी मूळचा आळशी ! पुस्तके वाचावीत, समवयस्कांबरोबर, गप्पा माराव्यात, अधूनमधून हिंडावे, भटकावे हा माझा आयुष्यक्रम होता. पण ठिणगी पडली आणि सगळेच पालटले. माझे जन्मापासूनचे, माझ्यातच वास्तव्य करणारे माझे दोन मित्र होते. ही कमाई वडिलार्जित असावी. भटकण्याचे, प्रवासाचे वेड आणि लहानापासून थोरापर्यंत सर्व माणसांत समरस होण्याची हौस ! ह्या दोघा मित्रांचा मात्र कॉलेज काढताना व चालवताना फार उपयोग झाला.

आमच्या संस्थेतील सर्व सभासद अधिकाराने, वयाने व अनुभवाने माझ्यापेक्षा ज्येष्ठ होते. विवेक क्षीरसागर ह्याला अपवाद. हे सर्वजण मदत करण्यासाठी होते काम करण्याची मुख्य जबाबदारी माझी होती. त्यामुळे कॉलेज निघेपर्यंत माझे काम एकांड्या शिलेदारासारखे होते. ह्या अधिकाऱ्याला भेट, ह्या अधिकाऱ्याला भेट, ही माहिती गोळा कर, ती माहिती गोळा कर; पुणे–तळेगाव–कामशेत व वडगाव येथे काम निघाले की फेऱ्या मार हे तर सारखे चालू असे. ह्यावेळी किती तरी विविध स्तरातील माणसे मी बघितली. त्यांना कामानिमित्त भेटलो, कधी संस्थेची कामे झाली, कधी झाली नाहीत सगळ्याच नव्हे पण काही माणसांचा परिचय वाढला व माझे अनुभवविश्व व्यापक व समृद्ध झाले. अगदी शेवटपर्यंत हाच क्रम चालू होता.

कॉलेज सुरू झाले आणि बराच फरक जाणवू लागला. डॉ. भाऊसाहेब सरदेसाई ह्यांनी एकदा बोलताना सहज सांगितलेले सत्य— भाऊसाहेब म्हणाले, ‘ चांगल्या कामासाठी महाराष्ट्रात पैसा आणि मदत कधी कमी पडत नाही. जास्तही मिळत नाही. ’ हा अनुभव मला शेवटपर्यंत येत होता. कॉलेज सुरू झाल्यावर बरोबर काही माणसे घेऊन कारभार सुरू झाला. आणि माझा एकांडेपणा संपला. प्रमुखाला नेहमी जुळवून घ्यावे लागते. प्रसंगी माघार घ्यावी लागते. इतकी भांडी एकत्र आल्यावर स्वभाव-वैशिष्ट्यामुळे आवाज होतात, होणारच ! पहिली दोन वर्षे वर्ग बेताचे होते, प्राध्यापक मोजके, मुले कमी, खर्च कमी व येणारे प्रश्न कमी गुंतागुंतीचे असल्यामुळे मतभेद नव्हते. थोडा अधिकार आला आणि चार-दोन माणसे एकत्र आली की मराठी संस्थांत राजकारण सुरू होते. ह्याला आमची संस्था व कॉलेज अपवाद नव्हते, कधी मतभेद विकोपाला गेले की आमचे अध्यक्ष वसंतराव वैद्य ते मिटविण्याचा प्रयत्न करीत. वैतागत व राजीनामा देण्यास निघत ! एकदा तर मला एकनिष्ठ सहकारी असावा म्हणून त्यांनी माझ्या बायकोला दुय्यम कार्यवाह म्हणून नेमले.

कॉलेजमध्ये मुले कमी असली तरी त्यांचा अभ्यास होता चांगला, परीक्षांचे निकाल चांगले लागत होते, अनेक अभिनव उपक्रम आम्ही आखत होतो, पार पाडत होतो. कधी यश मिळे कधी नाही. देशी खेळात व पळण्यात तर आमची मुले पुणे विद्यापीठात अनेक वर्षे पहिली येत. नेत्रतज्ज्ञ डॉ. मधुकर झंवर त्यावेळी तळेगांव जनरल हॉस्पिटलमध्ये होते. त्यांचे निरपेक्ष मार्गदर्शन फार उपयोगी पडले. त्यांच्यामुळे वजन उचलण्याच्या स्पर्धेत आमच्या मुलांनी सुवर्णपदके पटकावली. अनेक उत्तम विद्वान वक्ते, मोठी माणसे कॉलेजात व्याख्याने देऊन गेली. डॉ. भाऊसाहेब सरदेसाई गेल्यावर त्यांच्यावर खास अंक काढला. तळेगावला मराठी विज्ञान परिषद भरविण्यात पुढाकार घेतला व त्यावेळी ‘ इंद्रायणी ’ नदीवर विशेषांक काढला. नायगाव (कामशेत) येथे ग्रामीण विकास योजनेचे प्रयोग केले. थोडे साधले, बरेच फसले. पण काहीतरी नवे करण्याचा हव्यास कायम होता.



मनोहर माधव अळतेकर : स्वप्न पूर्ण झाले !


ही झाली जमेची बाजू ! पण दुसरी काळी बाजूही होती. कॉलेज निघाल्यावर थोड्याच दिवसांत मी दलालांच्या ‘ दीपावली ’च्या अंकात वसंतराव वैद्य ह्यांचे व्यक्तिचित्र लिहिले. सर्व कौतुकाचाच भाग होता. लिहिल्याबरोबर नेहमीप्रमाणे मी ते तत्त्वज्ञानाचे प्रसिद्ध प्राध्यापक डॉ. गं. ना. लवंदे ह्यांना वाचायला दिले. त्यांनी लेख वाचला नाही. ते मला म्हणाले, ‘ आठदहा वर्षे जाऊ देत. मग तुम्हा दोघांचे एकमेकांबद्दल काय मत असेल ते बघितले पाहिजे. त्यावेळी लिहिशील तो खरा लेख. ’ डॉ. लवंदे ह्यांचे हे मत पुढे खरे ठरले. काही वर्षांनंतर जशी परिस्थिती बदलली तशी आम्ही एकत्र आलेली माणसेही बदललो. हे जे स्थित्यंतर होते त्यालाच जीवन म्हणतात. आणि ते आकलन झाले तर ‘ त्याला जीवन कळले हो ’ असे म्हणायचे !

ह्या झाल्या पुढल्या गोष्टी. कॉलेजच्या जन्माच्यावेळी व पुढेही काही काळ मला ह्यांची कल्पना नव्हती. जन्मकथा मग ती कोणाचीही असो व त्यात कितीही संकटे येवोत ती तशी सरळ असते. रामाची जन्मकथा वेगळी व त्यानंतर घडलेले रामायण वेगळे ! आता कॉलेज काढताना नकटीच्या लग्नाला सतराशे साठ विघ्ने आली, मनस्ताप झाला, धावपळ करावी लागली. पण इंद्रायणी महाविद्यालयाच्या जन्मानंतरची कथा केव्हा कधीही अधिक रोचक, वेधक व उद्‌बोधक असणार हे उघड आहे. पण रामजन्मापूर्वीच समग्र रामचरित्र ठाऊक असणाऱ्या वाल्मीकीप्रमाणे मी द्रष्टा नाही. जन्मकथा म्हणजे समग्र कथा नव्हे !

( **‘ एका कॉलेजची कथा ’ या आगामी पुस्तकामधून** )

मा...९

# अजून थोडा प्रकाश



**ज**र्मन महाकवी गटेचे जागतिक वाङ्‌मयातील स्थान अनेक अर्थांनी एकमेवाद्वितीय स्वरूपाचे आहे. 'विश्वसाहित्याची' कल्पना गटेला गेल्या शतकातच अस्फुट रूपात जाणवू लागली असली तरी या कल्पनेचा विशेष विस्तार झाला तो मात्र विसाव्या शतकातच. युरोपिअन व अमेरिकन विद्यापीठांतून तौलनिक साहित्याभ्यासाचे विभाग जसजसे अधिक समृद्ध होऊ लागले, तसतसे होमर, दान्ते, शेक्सपिअर व गटे इत्यादी प्राचीन व मध्ययुगीन लेखकांचे पुनर्मूल्यन करण्यात विद्वानांना विशेष स्वारस्य वाटू लागले. जागतिक साहित्यात अग्रपूजेचा मान ज्यांना लाभला अशा लेखकांत कालानुक्रमे गटे हा सर्वांत आधुनिक लेखक मानावा लागेल. १९३३ साली गटेला दान्ते व शेक्सपिअर यांच्या मालिकेत स्थान देण्यास नाखूष असणाऱ्या टी. एस्. एलियटना देखील पुढे १९५५ साली गटेला बढती देणे भाग पडले. गटेची वाङ्‌मयीन महत्ता सिद्ध करण्यासाठी त्याची तुलना होमर, दान्ते अथवा शेक्सपिअरशी करण्यात येत असली तरी वास्तविक पाहता गटेच्या प्रतिभेचा आवाका या तीनही लेखकांहून अधिक व्यापक होता. भावकाव्य, काव्यनाट्य व कादंबरी इत्यादी वाङ्‌मयप्रकार तर गटेने लीलया हाताळलेच पण शिवाय त्याच्या प्रतिभेने तत्त्वज्ञान व विज्ञानाच्या अनेक शाखोपशाखांतून अनिरुद्ध संचार केला.

गटेच्या प्रज्ञेचे हे सर्वगामित्व त्याच्या विषयीची सादर–आश्चर्याची भावना वृद्धिंगत करणारे असले तरी गटे वाङ्‌मयाच्या समग्र अभ्यासातील ती एक फार अडचण ठरते. स्वतः गटेला त्याचे शास्त्रीय

*गटेच्या अतिविस्तृत लेखनप्रपंचामागे कोणतेतरी समान सूत्र आहे का?... विविधतेने नटलेल्या विश्वव्यापाराचे एकात्म दर्शन घडविणे हे ते सूत्र आहे. 'अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्' या गीतावचनाची आठवण या संदर्भात झाल्याखेरीज राहत नाही.*

**● मुरलीधर सायनेकर ●**

---

विषयांवरील लेखन (जे १४ खड व्यापते) अनेकदा त्याच्या वाङ्मयीन निर्मितीपेक्षाही अधिक मौलिक स्वरूपाचे वाटत असे. मानवी जीवनाचे व विराट विश्वव्यापाराचे अंतिम रहस्य उलगडण्याचा प्रयत्न विज्ञान, तत्त्वज्ञान व साहित्य या त्रिविध मार्गांनी मानवी बुद्धी करीत असते आणि म्हणून हे तीनही विषय मूलतः अभेदरूप होत अशी गटेची श्रद्धा होती गटेच्या विज्ञानविषयक व तत्त्वज्ञानविषयक विचाराचा परिचय त्याचे वाङ्मय नेटकेपणे समजावून घेण्यास उपकारक ठरतो. गटेचे समग्र वाङ्मय एकूण १३३ खड व्यापते हा आकडा व या वाङ्मयातील वैविध्य तर मनावर दडपण आणणारे आहेच पण शिवाय गटेवर उपलब्ध असणारे अतिप्रचड वाङ्मय ही देखील गटे अभ्यासकापुढील दुसरी समस्या बनते. जर्मन, फ्रेंच व इंग्रजी या तीन भाषात एकाच लेखकावर इतके विपुल लेखन झाल्याचे अन्य उदाहरण क्वचितच असेल.

गटे वाङ्मयाचा अभ्यास करीत असताना उपस्थित होणारा तिसरा महत्त्वाचा अडथळा म्हणजे बहुतेक समीक्षकानी त्याच्या वाङ्मयाच्या सदर्भात केलेला चरित्रात्मक पद्धतीचा वापर. गटेचे आद्य चरित्रकार जी एच् लेविस याच्यापासून थेट आजपर्यंत प्रामुख्याने याच पद्धतीचा वापर केला गेला स्वत.चे साहित्य म्हणजे 'धीरोदात्त कबुलीजबाबाच्या नोंदी होत.' या गटेच्याच उद्गारामुळे चरित्रात्मक पद्धतीचा अतिरेकी वापर समीक्षकानी केला. गटेच्या या विधानाचा शब्दश अर्थ घेतल्याने त्याच्या वाङ्मयातील प्रत्येक तपशिलाचे मूळ त्याच्या चरित्रात शोधण्याची जणू एक स्पर्धाच अभ्यासकात सुरू झाली. १९५३ साली गटे वाङ्मयाच्या चौथ्या खडाला लिहिलेल्या टीपात वुल्फगँग कैसर काहीशा अपराधी स्वरात लिहितात, 'डी मील्शुल्डीगन्' ह्या गटेकृत जोरकस व रगभूमीवर प्रभावी ठरलेल्या सुखातिकेचे सुसंगत चरित्रात्मक स्पष्टीकरण देता येत नाही.' कैसर याच्या या विधानातून चरित्रात्मक स्पष्टीकरणाचे गटे समीक्षकातील ऑब्सेशन लक्षात येते गटेवाङ्मयाला असंख्य चरित्रात्मक सदर्भ आहेत ही गोष्ट खरी असली तरी त्याच्या जीवनातील घटना त्याच्या प्रतिभास्पर्शानतर कित्येकदा आमूलाग्र बदलून त्याच्या साहित्यात दाखल होतात हे अशा अभ्यासकानी पुरेसे लक्षात घेतलेले नाही. 'कन्फेशन' या शब्दाचा गटेला अभिप्रेत असणारा अर्थ एक सच्चा, व्यक्तिगत भावविवश स्वर इतकाच असावा. शिवाय चरित्रात्मक पद्धतीचा वापर करताना एकाच व्यक्तिमत्त्वात कित्येक परस्परविरोधी भासणारी व्यक्तिमत्त्वे सुखेनैव नादू शकतात याची जाणीवही सतत बाळगणे आवश्यक असते. गटेच्या बाबतीत तर हे सत्य प्रकर्षाने जाणवते रोमँटिक, नॉर्डिक, क्लासिकल, आदर्शवादी, नैतिक काही प्रसंगी अनैतिक, स्वातत्र्यवादी, व्यक्तिवादी तर काही प्रसगी सकुचित व्यवहारवादी दृष्टिकोणाचा मिलाफ त्याच्या ठायी झालेला होता, गटे एकाच वेळी कवी, द्रष्टा, तत्त्वज्ञ व सत अशा परस्परावलबी पण तरीही वेगळ्या भूमिका पार पाडत होता आणि बहुतेक प्रसगी अशी कोणती ना कोणती धीरोदात्त व गभीर भूमिका स्वीकारणाऱ्या या कवीच्या स्वभावातील काही छटा मात्र अत्यत हास्यास्पद, पोरकट, असमजस व म्हणूनच विसगत भासतात. स्त्रियाच्या सदर्भातील गटेचे वर्तन तर मनोविकृति–शास्त्राच्या आधाराखेरीज अनाकलनीय वाटण्याचीच शक्यता अधिक आहे

गटेचा व त्याच्या वाङ्मयाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करत असताना मनाला अस्वस्थ करणारी आणखी एक बाब म्हणजे गेल्या १००–१५० वर्षांत गटे या व्यक्तीला प्राप्त झालेले काहीसे दतकथात्मक अथवा माइथॉलॉजिकल रूप. गटेचा गुणगौरव करताना अथवा त्याच्यावर टीका करताना देखील त्याच्याभोवतीचे गूढ, असामान्य, काहीसे अपार्थिव वलय अभ्यासक गृहीतच धरतात. गटेच्या बाबतीत त्याला हे अलौकिकत्व बहाल करताना पुरेशी चिकित्सा झालेली नाही किंबहुना तशी ती करण्याची आवश्यकता देखील कोणाला जाणवलेली नाही असे माझे स्पष्ट मत आहे. उदाहरणार्थ टी. एस्. एलियट याच्या मते गटे हा कवी असण्यापेक्षा खऱ्या अर्थाने एक 'सेज' होता. वरकरणी हे विधान निंदाव्यंजक वाटण्याची शक्यता असली तरी गटेला 'सेज' ठरविणे म्हणजे त्याच्या वाङ्मयाला एक स्वयसिद्ध चिकित्सातीत रूप प्रदान करणे होय असे मला वाटते. इमर्सन, कार्लाइल, विल्यम जेम्स इत्यादी मडळीनी गटेभोवतीचे अलौकिकतेचे, भव्योदात्ततेचे हे वलय वृद्धिगत करण्यास विशेष मदत केली. गटे चरित्रातील व गटे वाङ्मयातील दोषाची चर्चा करताना देखील सतत या दोषाच्या आर्षतेवर भर दिला जातो गटेचे हे व्यक्तिगत माहात्म्य व त्याची ही वाङ्मयीन महत्ता गृहीत धरल्यामुळेच असेल कदाचित, त्याच्या चरित्राचा व त्याच्या वाङ्मयाचा पुरेसा परिचय करून घेण्याची आवश्यकता सर्वसामान्य वाचकाना व कित्येक अभ्यासकांना देखील जाणवत नाही त्यामुळेच गटे म्हणजे 'वर्थर', गटे म्हणजे 'फाउस्ट' अथवा गटे म्हणजे शाकुतल डोक्यावर घेऊन नाचणारा एक महाकवी असली फसवी समीकरणे आपल्याला पुरेशी वाटतात एलियटसारख्या अभ्यासकाचेदेखील गटेवरील लेखन गटे वाङ्मयाच्या मर्यादित परिचयावरच अवलबून आहे.

या साऱ्या अडचणीतून वाट काढत गटे वाङ्मयाचा शक्य तितक्या पूर्वग्रहरहित, स्वागतशील पण विचक्षण दृष्टिकोणातून मागोवा घेऊ लागल्यावर माझ्यासारख्या वाचकाला जाणवणारी एक फार मोठी व्यक्तिगत मर्यादा म्हणजे जर्मन भाषेच्या अज्ञानाची. मराठीत तर माझ्या माहितीप्रमाणे फक्त वर्थर व फाउस्टचा पहिला भाग या

दोनच साहित्यकृतीची भाषांतरे उपलब्ध आहेत पण इग्रजीत देखील गटेच्या सर्व वाङ्मयाचे भाषातर एकतर झालेले नाही, जितके झाले आहे तितके सर्व आपल्याला प्रयत्नपूर्वक देखील उपलब्ध होत नाही व जे इग्रजी भाषातर उपलब्ध होते त्यातील उणिवा मनाला सतत जाणवत रहातात विशेषत: गटेच्या असख्य भावकवितांची भाषातर–दुर्लभता बार्कर फेअरलीसारखे व्यासगी अभ्यासक सतत निदर्शनास आणून देतात 'फाउस्ट'च्या पहिल्या भागाची जी कित्येक भाषातरे इग्रजीत उपलब्ध आहेत, त्याचा तौलनिक अभ्यास करताना गटेच्या जर्मन भाषेचा मूळ डौल, तिची नादमयता, त्या भाषेची आघात प्रवणता व त्या भाषेतील छदोरचना याची जाणीव उत्तमोत्तम गणल्या गेलेल्या इग्रजी भाषातरात देखील किती अस्पष्ट होत जाते याचा अनुभव मी घेतला आहे. ( यासाठी जर्मन भाषा समजत नसूनही मूळ जर्मन 'फाउस्ट'चे वाचन मी मुद्दाम ऐकले आहे ) गटे वाङ्मयाचे पुढील सारे विवेचन या अडचणीची व मर्यादाची जाणीव ठेवूनच केलेले आहे.

### जडण–घडण

कोणत्याही लेखकाच्या वाङ्मयाचा सागोपाग अभ्यास करताना त्याच्या चरित्राचा परिचय एक आरभबिंदू म्हणून उपयुक्त ठरतो गटेसारख्या लेखकाच्या बाबतीत तर हा परिचय वाङ्मयाच्या आकलनाला उपकारकही ठरतो. शिवाय अभ्यासकाला अशा परिचयातून स्थल, काल, परिस्थितीची एक विशिष्ट चौकट प्राप्त होत असल्याने त्याला मनातून थोडे सुरक्षित वाटू लागते

योहान वोल्फगाग् फोन् ग्योएथऽ याचा जन्म जर्मनीतील प्रसिद्ध फ्राकफुर्त शहरात एका मध्यमवर्गीय कुटुबात २८ ऑगस्ट १७४९ रोजी झाला भावी काळातील गटेच्या जीवनविषयक धारणाचे मूळ काही प्रमाणात त्याच्या अनुवशात सापडते गटेच्या वडिलाचे घराण उत्तर जर्मनीतील कठोर नैतिकतावादी व बुद्धिगम्य परपरेशी नातेसबंध सागणारे होते तर त्याचे मातुल घराणे दक्षिण जर्मनीतील कलाप्रेमी, जीवनासक्त परपरेशी सबंधित होते गटेची आई विख्यात जर्मन चित्रकार ब्रूकास क्रानारव ह्याच्या वशातील होती गटेचे वडील व्यवसायाने वकील होते त्याचा व्यक्तिगत ग्रथसग्रह विपुल होता तर आईने केलेला उत्तमोत्तम चित्रकृतीचा सग्रह चोखदळ होता. कॉर्नेलिया नावाची एकमेव बहीण वगळता गटेची इतर सर्व भावंडे अल्प वयातच मृत्यू पावली. 'डीष्टूग उड वाडरहाईट' ( काव्य आणि सत्य) या आपल्या आत्मचरित्रात कॉर्नेलिया बरोबरच्या आपल्या व्यामिश्र भावनिक सबधाचे सूक्ष्मोत्कट दर्शन गटेने घडविले आहे त्याच्या वाङ्मयात इतरत्र आढळणाऱ्या बहीण–भाऊ सबधाच्या तरल चित्रणाचे मूळ त्यात शोधता येते गटेचे बहुतेक शालेय शिक्षण खाजगी शिक्षकाच्या देखरेखीखाली पूर्ण झाले. गटेच्या बालवयातच जर्मनी व फ्रान्स याच्यातील सप्तवार्षिक युद्ध झाले. त्यावेळी फ्रेंच सैनिकानी फ्राकफुर्त शहराला कित्येक दिवस वेढा घातलेला असल्याने गटेच्या बालमनावर फ्रेंच भाषेचे खोल सस्कार झाले. १७६५ मध्ये वयाच्या १६ व्या वर्षी गटे लाइपसिक् विद्यापीठात कायद्याच्या अभ्यासासाठी दाखल झाला त्याआधी १९ वर्षांपूर्वी प्रसिद्ध जर्मनलेखक लेसिंग याच विद्यापीठात शिकत होता. लाइपसिक् विद्यापीठातील तीन वर्षांच्या वास्तव्यानंतर गभीर आजारामुळे गटेला घरी परतावे लागले. या तीन वर्षांत रूढार्थाने गटे जरी कायद्याचा विद्यार्थी होता, तरी त्याचा वावर मात्र साहित्यिक वर्तुळातच अधिक होता फ्रेंच व जर्मन वाङ्मयाचे त्याचे वाचन सतत चालू होते गटेच्या व्यक्तिगत जीवनात तर हा काळ अत्यत महत्त्वाचा होताच, पण शिवाय त्याच सुमारास जर्मन वाङ्मयातील एका रोमँटिक वादळाची चाहूल लागायला सुरुवात झाली होती. जर्मन भाषेतील रोमँटिक संप्रदायात ज्याना पुढे महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले अशा काही वाङ्मयकृती याच सुमारास लिहिल्या जात होत्या.

१७६५ मध्ये ख्रिस्ताच्या जीवनावरील गटेची एक कविता प्रसिद्ध झाली. १७६७ नतरची प्रदीर्घ रुग्णावस्था हे गटेच्या बाबतीत एक प्रच्छन्न वरदानच ठरले याच काळात त्याने किमयाविज्ञान, फलज्योतिष, जादूटोणा व इतर कित्येक गूढविद्याचा बराच अभ्यास केला पुढील काळात 'फाउस्ट'ची व्यक्तिरेखा चितारताना या अभ्यासाचा गटेला खूप उपयोग झाला. वास्तुकलेतील रोकोको सप्रदायाचा फार मोठा प्रभाव गटेच्या कलाविषयक मतावर याच सुमारास पडू लागला होता.

आजारानतर पुढील अभ्यासासाठी गटे स्ट्रासबर्ग विद्यापीठात दाखल झाला. प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ व साहित्यिक हेर्डर याच्याशी त्याचा याच विद्यापीठात प्रथम परिचय झाला स्ट्रासबर्ग विद्यापीठात असतानाच होमर, पिंडार व शेक्सपिअर यासारख्या जगद्विख्यात लेखकाच्या साहित्यकृतीशी गटेने मनोमन जवळीक साधली हेर्डर प्रणीत 'स्टॉर्म अँड स्ट्रेस' चळवळीशी गटे निगडित झाला तोही याच विद्यापीठात. १७७१ च्या सुमारास गटेने जर्मन लोकगीताचा सग्रह प्रसिद्ध केला. रूसोच्या तत्त्वज्ञानाने तो याच काळात विलक्षण प्रभावित झाला. निसर्गप्रेमाचे रूसोचे तत्त्वज्ञान गटेच्या वर्थरमधून पदोपदी प्रगट झालेले दिसते शेक्सपिअरवर जडलेल्या भक्तीचे वर्णन करताना १७७१ मध्ये लिहिलेल्या एका निबधात गटे लिहितो—

'शेक्सपिअरच्या वाङ्मयातील पहिले पान वाचताच मी त्याचा जन्माचा गुलाम झालो. त्याचे पहिले नाटक वाचल्यावरच एखाद्या अध माणसाला अचानक दृष्टिलाभ व्हावा तशी माझी अवस्था झाली. पारपरिक रगभूमीचा आपण तत्काळ त्याग केला पाहिजे असे माझ्या लक्षात आले' स्ट्रासबर्ग विद्यापीठात कायदेशास्त्राचा अभ्यास करत असतानाच गटेने वास्तुशास्त्रातील गॉथिक शैलीचा विशेष विचार केला शरीरशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी विषयावरील मान्यताप्राप्त ग्रथाचे गटेचे वाचन याच काळात चालू होते. १७६५ ते १७७१ या काळातील गटेचे अखड बौद्धिक कुतूहल त्याची सवेदनाशीलता, त्याचा उत्साह, त्याच्या प्रज्ञेचे सर्वगामित्व या गोष्टीनी आपण आश्चर्यचकित झाल्याखेरीज रहात नाही. गटेच्या आयुष्यात जी असख्य प्रेमप्रकरणे झाली, त्यापैकी त्याचे पहिले ज्ञात प्रेमप्रकरणही १७७१ च्या सुमारासच चालू झाले. त्याने कवितालेखनाला देखील मोठ्या जोमाने आरंभ केला तोही याच काळात. गटेचे आद्य चरित्रकार जॉर्ज हेन्री लेविस यानी गटेची तुलना प्रत्येक झाडाकडून रगस्वीकारणाऱ्या सरडयाशी केलेली आहे. स्ट्रासबर्ग विद्यापीठातील गटेच्या बाबतीत तर ही तुलना विशेषच अर्थपूर्ण वाटते.

कायद्याचा पदवीधर झाल्यावर व्हेट्झ्लार येथील जर्मनीच्या सर्वोच्च न्यायालयात गटे वकिली करू लागला. तथापि येथेही त्याचे वाङ्मयप्रेमच अधिक प्रभावी ठरले. 'द सॉरोज ऑफ यंग वेर्थर (१७७४) ह्या त्याच्या जगप्रसिद्ध कादंबरीला कारणीभूत झालेला शार्लट बुफवरील निष्फळ प्रेमाचा अनुभवही त्याला येथेच आला. तेथे असताना एक श्रीमंत मुलीशी त्याचा वाङ्निश्चयही झाला होता. परंतु पुढे तो मोडला.

## प्रतिभेचा बहर

जर्मन वाङ्मयातील रोमँटिक चळवळीत ज्या नाटकाला महत्त्वाचे स्थान देण्यात येते, ते गटेचे 'ग्योटझ फोन बेर्लिशिन्गेन' हे नाटक १७७३ साली प्रसिद्ध झाले. या नाटकाच्या उभारणीत गटेच्या स्ट्रासबर्ग विद्यापीठातील अनुभवाचा फार मोठा वाटा आहे. धर्मसत्ता व राजसत्ता यांच्या विरोधात ठामपणे उभा राहाणारा, सामर्थ्य हेच सत्य असा विश्वास बाळगणारा, स्वातंत्र्यासाठी निधड्या छातीने एकाकी झुंजणारा व दीन दलितांचा वाली असणारा याक्स्टवरच्या किल्ल्यातील ग्योटझ हा उमदा सरदार म्हणजे तत्कालीन तरुण पिढीचे जणू एक श्रद्धास्थानच बनला.

त्यानंतर लगेच म्हणजे १७७४ साली गटेची जगप्रसिद्ध बहुतांश आत्मचरित्रात्मक, पत्ररूप कादंबरी 'डी लायडेन् डेस् हयुंगन् वेर्थर' (जर्मन) 'द सॉरोज् ऑफ यंग वर्थर' प्रकाशित झाली. फार थोड्या कालावधीत या कादंबरीने गटेला केवळ जर्मन साहित्यातच नव्हे तर संपूर्ण युरोपियन साहित्यात असाधारण महत्त्व प्राप्त करून दिले.

१७७५ साली गटेच्या संपूर्ण भावी आयुष्याला आमूलाग्र बदलून टाकणारी एक घटना घडली. व्हायमारच्या ड्यूककडून त्याच्या मंत्रिमंडळात समाविष्ट होण्यासाठी गटेला सन्मानपूर्वक निमंत्रण आले. इटलीच्या प्रवासाची काही वर्षे वगळता १७७५ नंतरचे गटेचे सारे आयुष्य प्रामुख्याने व्हायमारमध्येच व्यतीत झाले. ड्यूकच्या मंत्रिमंडळात गटेने अर्थ, वन, शेती, खाण इत्यादी अनेक खात्यांचा कारभार सांभाळला. व्हायमारमधील राजदरबाराशी संबंधित असणाऱ्या काही स्त्रियांशी त्यांचे प्रेमसंबंध प्रस्थापित झाले. तथापि व्हायमारला गेल्यापासून १७८६ साली दोन वर्षांसाठी इटलीला जाईपर्यंत 'शार्लोट ऽ फोन स्टाइन' या प्रौढ स्त्रीशी जडलेला गटेचा नातेसंबंध अत्यंत व्यामिश्र स्वरुपाचा होता. आधीच सात मुलांची आई असणारी ही स्त्री वयाने गटेहून सात वर्षांनी मोठी होती व्हायमारमधील या १०–११ वर्षांच्या काळात गटेच्या प्रतिभेला जो बहर आला त्याचे भावनिक श्रेय या शार्लोटऽला द्यावे लागते. 'क्लाव्हिगो' हे नाटक गटे व्हायमारला जाण्यापूर्वीच म्हणजे १७७४ साली प्रसिद्ध झाले असले तरी 'स्टेला' 'एग्मोन्ट' 'एफिगेनी' 'टासो' इत्यादी महत्त्वपूर्ण नाटयकृती व असंख्य भावोत्कट कविता वटेने व्हायमारमध्ये याच काळात लिहिल्या. हे सारे लेखन करीत असताना शार्लोट ऽफोन स्टाइन ही त्याची स्फूर्तिदात्री होती. त्याच्या अनेक भावकवितांत ती विविध नात्यांतून डोकावताना दिसते. गटेच्या मते शार्लोटशी असणारे त्याचे नाते जन्मजन्मांतरीचे होते. कित्येकदा तिचा उल्लेख प्रेयसी म्हणून येतो, तर कित्येकदा केवळ एक सखी म्हणून. काही प्रसंगी ती प्रेमळ भगिनीचे रूप धारण करते, तर काही वेळी तिचा उल्लेख पत्नी म्हणूनही येतो. पण यापैकी प्रत्येक नात्यात एक अशरीरी, अपार्थिव, उदात्त प्रेमाचा गटे वारंवार उल्लेख करतो.

१७८६ ते ८८ ही दोन वर्षे गटेचे वास्तव्य इटलीत होते. त्याच्या कलाविषयक मतांना या दोन वर्षांत खूपच सुस्पष्टता आली. १७८९ साली झालेल्या फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपियन जीवनाचे सारे संदर्भ बदलून गेले. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर गटे पुन्हा एकदा इटलीला जाऊन आला. याच सुमारास क्रिस्टिआने–व्हुल्पिउस नावाच्या मुलीबरोबर गटे राहू लागला. १८०६ साली तिच्याशी विवाहबद्ध होण्यापूर्वी त्या मुलीला गटेपासून मुलेदेखील झाली होती. या विवाहपूर्व संबंधांमुळे त्या काळात गटेवर फार टीका झाली. एकूणच व्हुल्पिउस हिच्याशी गटेचे वर्तन समंजसपणाचे नव्हते हे मात्र निश्चित. इटलीच्या दुसऱ्या भेटीनंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे १९७१ साली गटेला ड्यूकने मंत्रिमंडळाच्या जबाबदारीतून मुक्त केले. तेव्हापासून पुढील २६ वर्षे गटे व्हायमार थिएटरचा संचालक म्हणून काम पाहात होता. नाटयकलेशी अनेक नात्यांनी गटेचा संबंध आला. स्वत:च्याच 'एफिगेनी' या नाटकात त्याने एकदा ऑरेस्टशची भूमिकादेखील केली होती व्हायमारला आल्यापासूनच त्याच्या मनात विल्हेम माइस्टर आणि फाउस्टचे कथानकही घोळत होते. १७८५ च्या सुमारास विल्हेम माइस्टरची पहिली सहा प्रकरणे लिहून झाली होती. या प्रकरणात बरेच फेरफार करून १७९६ साली 'विल्हेम माइस्टर्स लेअरयाडर' ही कादंबरी प्रसिद्ध करण्यात आली. ज्या साहित्यकृतीने गटेला सर्वात अधिक जगन्मान्यता प्राप्त करून दिली. त्या 'फाउस्ट' या काव्यनाटयाचा पहिला भाग १७९०च्या सुमारास प्रसिद्ध झाला. १७९४



महाकवी गटे : समृद्ध अनुभवविश्व

साली एका नियतकालिकातील लेखाच्या निमित्ताने गटेचा प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ व लेखक शिलर याच्याशी प्रथम परिचय झाला, हा परिचय उत्तरोत्तर गाढ व परिपक्व स्नेहात परिणत होत गेला. गटे व शिलर याच्यातील पत्रव्यवहाराचे खड दोन प्रगल्भ मनाची वैचारिक व भावनिक जडणघडण व त्याची प्रगती समजावून घेण्याच्या दृष्टीने आजही वाचनीय ठरतात. १८०५ साली शिलरचे निधन होईपर्यंत ही मैत्री अबाधित राहिली. गटेच्या उत्कट व काहीशा भावविवश स्वभावाला सखोल चिंतनाची जोड देण्यात शिलरचा सिंहाचा वाटा होता. शिलरच्या मृत्यूनतर एका फार मोठ्या वैचारिक पोकळीचा अनुभव गटेला उर्वरित आयुष्यात सतत येत राहिला.

१८६० (?) साली येना शहरी नेपोलिअनची व गटेची भेट झाली. त्यावेळी नेपोलिअन म्हणाला, 'हा पहा मनुष्य म्हणवून घेण्यास योग्य असा पुरुष!' नेपोलिअनसारखा सेनापती व राजकारणी गटेला पूर्ण पुरुष मानत होता हे खरे असले तरी वास्तविक पाहाता नेपोलिअनच्या सदर्भातील गटेचे वागणे काहीसे लाचारीचे होते. गटेच्या 'वर्थर'ची तर नेपोलिअनने कित्येक पारायणे केली होती. पुढे सेंट हेलेना बेटावर नेपोलिअनला बदिवासात मृत्यू आला त्यावेळी देखील त्याच्याजवळ 'वर्थर'ची एक प्रत आढळून आली. १८०९ च्या सुमारास गटेची 'वाऽलफेअर वांट शाफ्टन' (इलेक्टिव्ह ॲफिनिटिज्) ही तिसरी कादबरी प्रसिद्ध झाली गटेला उत्तर आयुष्यात जागतिक वाङ्मयाचा ध्यास लागला होता. स्वत.च्या मातृभाषेखेरीज त्याला फ्रेंच, इग्लिश, इटालिअन या भाषा तर अवगत होत्याच पण शिवाय ग्रीक व लॅटिन भाषाही तो जाणत होता. सस्कृत, पर्शियन व चिनी भाषातील वाङ्मयाचाही परिचय करून घेण्याचा त्याने प्रयत्न केला. संगीत, चित्रकला, मूर्तिकला, वास्तुकला इत्यादी ललितकलांतही त्याला गती होती. १८२१ साली 'विल्हेम माइस्टर्स वांडरयाडर' (विल्हेम माइस्टरची भ्रमती) ही त्याची कादंबरी प्रसिद्ध झाली. नित्यनूतन विचाराना व भावनाना शब्दबद्ध करण्याची त्याची धडपड अखेरच्या काळात देखील अविरत चालू होती. दैवी शक्ती लाभलेल्या अनेक लेखनिकाना मी एकाच वेळी सहज मजकूर पुरवू शकेन असे तो म्हणे आपले अनुभवसचित ग्रथनिविष्ट होण्यापूर्वीच मृत्यू आपल्याला गाठणार अशी भीती त्याला वाटू लागली होती. प्रतिभेच्या उत्स्फूर्त रूपाला गटे कल्पनातीत महत्त्व देत असे मध्यरात्री मध्येच जाग आल्यावर मनात अचानक निर्माण होणारी काव्यस्फूर्ती तत्काळ कागदावर उतरवता यावी म्हणून तो लेखनाचे साहित्य नेहमी जवळ ठेवीत असे. या विषयीच्या त्याच्या काही कल्पना हास्यास्पद वाटाव्यात इतक्या अतिरेकी होत्या. उदाहरणार्थ काही प्रसगी तो कागद पुरेसा न उलगडता तसेच लेखन करीत असे. कारण कागद पुरेसा उलगडेपर्यंत प्रतिभेचा स्फुल्लिंग विझून जायला नको.

इ स. १८३१ मध्ये गटेने फाउस्टचा दुसरा भाग लिहून पूर्ण केला. मृत्यूपूर्वी अगदी थोड्या आधी त्याने या भागात काही किरकोळ बदल केले. २२ मार्च १८३२ रोजी व्हायमार येथेच वयाच्या ८३ व्या वर्षी गटेची प्राणज्योत मालवली. मृत्यूसमयीचे त्याचे शब्द होते, 'अजून थोडा प्रकाश', 'तमसो मा ज्योतिर्गमय' या स्वरूपाचे त्याचे हे शब्द त्याच्या सपूर्ण जीवनावरच जणू लख्ख प्रकाश टाकतात. गटे वाङ्मयाचे परिशीलन करताना त्याच्या जीवनचरित्राचा हा स्थूल आराखडा मनात बाळगणे अत्यावश्यक असते

## प्रातिनिधिक शोकांतिका

गटेचा अफाट वाङ्मयीन कर्तृत्वाचा एका निबंधात अल्पाशाने का होईना वेध घेण्याचा प्रयत्न करताना मला 'तितीर्षुर्दुस्तर मोहादुडुपेनास्मि सागरम्' या कालिदास वचनाची आठवण झाल्याखेरीज राहात नाही. गटेच्या जीवनाचे सारसर्वस्व ज्या साहित्यकृतीत विशेषत्वाने समाविष्ट झाले आहे असे मानले जाते अशा साहित्यकृतीत त्याच्या 'द सॉरोज ऑफ यग वर्थर' या कादबरीला अत्यत महत्त्वपूर्ण स्थान आहे १७७४ च्या वसंत ऋतूत फक्त काही आठवड्याच्या कालावधीत गटेने 'वर्थर' लिहून पूर्ण केली असावी. गटेच्या मनात 'वर्थर'चे कथानक इतके तयार होते की ह्या कादबरीचे लेखन काहीशा नेणतेपणे, अबोध मनाच्या पातळीवर झपाटलेल्या अवस्थेत एखाद्या 'स्लीप वॉकर' प्रमाणे झाले असावे. पत्रात्मक लेखनपद्धती हा १८ व्या शतकाचा जणू एक वाङ्मयीन शोध होता. रिचर्डसन व रूसो ह्यांनी या पद्धतीचा वापर गटेच्या आधी केलेला असला तरी या पद्धतीला स्वगतात्मक, आत्मसवादात्मक, उत्कट, गहिरे रूप देण्याचे कार्य गटेने केले. अनेक समीक्षकाच्या मते आजतागायत पत्रात्मक पद्धतीचा इतका नितातसुदर वापर अन्य कोणत्याही लेखकाने केलला नाही. एक प्रकारे आतरिक, आध्यत्मिक जीवन उलगडून दाखविणारी 'वर्थर' ही युरोपातली पहिली कादबरी होय. ही कादबरी भावकाव्यात्मक नाटकाशी अधिक जवळीक साधणारी आहे. 'वर्थर' ही कादबरी युरोपातील व विशेषत जर्मनीतील तत्कालीन बुद्धिवान पण तरीही भावनाप्रधान तरुणाची प्रातिनिधिक शोकातिका चित्रित करते १९ व्या शतकाच्या पहिल्या पंचवीस वर्षांत इंग्लंडमध्ये ज्या रोमँटिक चळवळीचा परमोच्च बिंदू गाठला गेला त्या चळवळीचा जर्मनीतील आरंभ मात्र १७६५ च्या सुमारासच झालेला होता. 'वर्थर'चे रसग्रहण करताना या परपरेचे भान तर राखावे लागतेच पण शिवाय या कादंबरीला गटे चरित्राचा असणारा सततचा सदर्भही मनात बाळगावा लागतो. खेरीज ह्या कादबरीचा विशिष्ट आकृतिबध तत्कालीन सामाजिक परिस्थितीशी असणारा तिचा सबंध व तिच्यातील व्यक्तिचित्राचा मानसशास्त्रीय अभ्यास इत्यादींच्या चर्चेखेरीज या कादबरीचे मोठेपण पुरेसे लक्षात येत नाही.

व्हेट्झ्लार येथे वकिली करीत असताना शार्लटड बुफ नावाच्या एका सुदर तरुणीवर गटे एकतर्फी प्रेम करू लागला. वास्तविक पहाता केस्ट्नर नावाच्या उमद्या तरुणीशी शार्लटडचा वाङ्निश्चय झालेला असल्याची गटेला कल्पना होती. अर्थातच हे प्रेमप्रकरण यशस्वी होण्याची शक्यता नव्हती. विफल प्रेमाच्या या अनुभवातून 'वर्थर'ची कथा जन्माला आली वर्थर या शब्दाचा जर्मन भाषेतील अर्थ 'ए वर्थव्हाइल पर्सन हू मेरिटस रिगार्ड' असा होतो. आत्महत्येचे विचित्र आकर्षण गटेला या काळात सतत वाटत असे. स्वत च्या शस्त्रागारातील एक धारदार खजीर आत्महत्येच्या हेतूने या काळात आपण सतत जवळ बाळगीत असल्याचा उल्लेख गटेने आपल्या आत्मचरित्रात केलेला आहे. अर्थात, आत्महत्त्येसाठी ज्या एका विशिष्ट

प्रकारच्या मानसिक धैर्याची आवश्यकता असते ते आपणापाशी नाही याची जाणीव काही काळानतर गटेला झाली १७७२ मध्ये जेरूसलेम नावाच्या एका तरुणाने प्रेमभगापायी आत्महत्त्या केली. स्वत चा व्यक्तिगत अनुभव, स्वत विषयीच्या अपेक्षा, प्रेमाविषयीच्या व एकूण जीवनाविषयीच्या आत्यतिक रोमॅन्टिक कल्पना व जेरूसलेमची हकीकत या साऱ्याच्या मिश्रणातून ' वर्थर ' या कादबरीने जन्म घेतला.

शहरी जीवनाला कंटाळलेला ' वर्थर ' नावाचा एक भावविवश, निसर्गप्रेमी, कलासक्त तरुण एका छोटया खेडेगावात जाऊन राहातो. तेथून तो आपल्या विल्हेल्म नावाच्या मित्राला पत्रे लिहून आपली वैचारिक व भावनिक आदोलने कळवतो. एका न्यायाधीशाची मुलगी असणाऱ्या, शार्लट नावाच्या, स्वप्नातील परीप्रमाणे सुदर असणाऱ्या तरुणीच्या पहिल्याच भेटीत तो प्रेमात पडतो. अल्बर्ट नावाच्या घरदाज तरुणाशी तिचा विवाह निश्चित झालेला असतो. वर्थरच्या बाजूने प्रेम तर त्या मुलीच्या बाजूने थोडी आपुलकी, थोडी सहानुभूती असा काहीसा प्रकार असतो शार्लटशी आपला विवाह होणे शक्य नाही या जाणिवेच्या दु खातून सुटण्यासाठी वर्थर अन्यत्र नोकरी पत्करतो पण विरहाचे दु ख सहन न झाल्याने तो त्या गावी परततो मधल्या काळात शार्लट अल्बर्टशी विवाहबद्ध झालेली असते. वर्थरने वारवार तिच्या भेटीसाठी जाणे तिला व अल्वर्टला पसत नसते. अखेरीस विफल प्रेमाचे हे दु ख असह्य झाल्याने अल्वर्टचेच पिस्तुल मागवून घेऊन वर्थर आत्महत्या करतो हे या कादबरीचे ढोबळ कथासूत्र होय. भावविशता, काव्यात्मकता, आत्मप्रीती, निसर्गप्रेम, कलासक्तवृत्ती, स्वप्नरजन, दैवी असमाधान, स्त्रीकडे पाहाण्याचा तथाकथित आध्यात्मिक दृष्टिकोण, सौदर्यपूजन इत्यादी रोमॅटिक चित्तवृत्तीचे बहुतेक सारे विशेष या कादबरीत एकवटले असल्याने तत्कालीन तरुणाना या कादंबरीत स्वत चेच वाञ्छित प्रतिबिंब दिसले. अल्पावधीतच ही कादंबरी बेस्ट सेलर ठरली. अनेक भाषात तिची भाषातरे झाली. वर्थरचा लेखक म्हणून सारा युरोप गटेला ओळखू लागला. लेसिंग व हेर्डर यांच्यासारख्या समर्थ लेखकाना जे साध्य झाले नाही ते गटेने प्राप्त करून दाखविले. या कादबरीने जर्मन वाड्मयाला प्रतिष्ठा दिली, आत्मविश्वास दिला.

या कादबरीवर टीका झाली नाही असे नाही. कर्मठ ख्रिश्चनाना वर्थरचे वर्तन अनैतिक वाटले तर बुद्धिवाद्याना ते अनाकलनीय वाटले. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत म्हणजे सुमारे पाऊणशे वर्षे या कादंबरीने युरोपातील भावनाप्रधान तरुणांना अक्षरशः झपाटून टाकले यात सशय नाही. या कादबरीतील वर्थरप्रमाणे पोषाख करून आत्महत्त्येचा मार्ग चोखाळणारे काही तरुणही या काळात निघाले या कादबरीचे दोन भाग असून पहिल्या भागाच्या अखेरीस दु:ख विसरण्यासाठी वर्थर ग्रामातर करतो तर दुसऱ्या भागाच्या अखेरीस दु:खातिशय सहन न झाल्याने तो या जगाचाच निरोप घेतो.

२० व्या शतकातही ही कादंबरी वाचली जात असली तरी व्यक्तिश: मला या कादबरीचे रूप मात्र बहुताशी पोरकट व ऊरबडवे वाटत आले आहे. गटेच्या कादबऱ्याचा विशेष अभ्यास करणारे राइससारखे अभ्यासक या कादबरीतील शोकातिकेची तुलना थेट हॅम्लेटशी करीत असले तरी मला ही तुलना योग्य वाटत नाही. हॅम्लेटसमोर उभी ठाकलेली समस्या अत्यंत जीवघेण्या स्वरूपाची होती. जीवनातील श्रद्धा, पावित्र्य, नैतिकता इत्यादीचा समूळ विध्वस करणारी होती. शिवाय ती समस्या सोडविण्याचा हॅम्लेटने त्याच्या परीने सर्व प्रयत्न केल्याचे जाणवते. याउलट वर्थरमधील शोकातिका मला व्याजरूप वाटते. मनोविकृतिशास्त्राच्या आधारे वर्थरच्या वर्तनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केल्यास असे लक्षात येते की विवाहातून ज्या व्यावहारिक समस्या उद्भवू शकतात त्या पेलण्याची ताकदच वर्थरच्या स्वभावात नव्हती. आपण अत्यत दु:खात आहोत ही जाणीवच अशा व्यक्तीना सुखद वाटते. स्वत च्या नाकर्तेपणाची, भीरूतेची सारी जबाबदारी बाह्य परिस्थितीवर टाकायला वर्थरसारख्या व्यक्ती सदैव उत्सुक असतात सयस्या सुटण्यात अशा व्यक्तीना स्वारस्य नसते. शार्लटने वर्थरला विवाहाची समती दिली असती तर मात्र त्याची खरी पचाईत झाली असती या कादबरीच्या कथानकाला जर्मन भाषेतील अनेक पारपरिक लोकगीतात आधार सापडतो. निराश प्रेमापायी आत्महत्त्या करणाऱ्या प्रेमिकाचे वर्णन या लोकगीतांतून आलेले आहे. तथापि एखाद्या लोकगीतात जी कथा स्वीकारायला आपले मन तयार होते, तीच कथा कादबरीत अतिरजित वाटू लागते लोकगीतातील वृत्त, त्याची नादमयता, त्याची लयबद्धता, ' विलिंग सस्पेन्शन ऑफ डिसबिलिफ 'ला मदत करते या कादंबरीच्या सदर्भात मला जाणवणारे काही आक्षेप मी अभ्यासकाच्या चितनासाठी माडले असले तरी केवळ जर्मन भाषेतीलच नव्हे तर एकूण कादबरी वाङ्मयाच्या इतिहासातील ही कादबरी म्हणजे एक महत्त्वाचा टप्पा आहे हे मात्र नि:सशय आणि म्हणूनच पर्सी लबॉक अथवा इ. एम. फोर्स्टर यासारख्या कादवरी या वाड्मय प्रकाराच्या अभ्यासकानी तिची दखल घेऊ नये याचे आश्चर्य वाटते.

वर्थरच्या यशाने गटेचा लेखनाचा उत्साह शतगुणित झाला. व्हायमारमध्ये ड्यूककडून मिळालेली मान्यता व शार्लोटऽफोन स्टाइन या प्रौढेशी जडलेले त्याचे नातेसंबध या गोष्टी देखील त्याच्या प्रतिभेला पूरक ठरल्या. या काळात त्याने लिहिलेल्या असख्य प्रेमकविता अत्यंत तरल व भावोत्कट असल्याचा निर्वाळा बार्कर फेअर्लीसारखे मर्मग्राही अभ्यासक देतात. तथापि या भावकवितांची भाषातरदुर्लभता हे त्याचे प्रमुख वैशिष्टच होय असे या विद्वानाचे मत असल्यामुळे जर्मन भाषेचा साक्षात परिचय नसणारे माझ्यासारखे वाचक त्या काव्यानदाला मुकतात इंग्रजीत भाषातरित झालेल्या गटेच्या भावकविता वाचल्यावर मला प्रकर्षाने जाणवली ती या कवितातील विविधता व विवशता. एकाच प्रेमभावनेच्या इतक्या विविध छटा एकाच कवीने इतक्या विद्ध एकाग्रतेने शब्दबद्ध केल्याची उदाहरणे अन्यत्र क्वचितच आढळतील. भावनेची तार काही प्रसगी गटे इतकी ताणतो की त्याच्या कवितेतील तो ' पिच् ' सहन करणे कठीण वाटू लागते. अशा प्रकारचे काव्यलेखन करीत असतानाच गटेने विल्हेम माइस्टरच्या लेखनास १७७५ च्या सुमारास केव्हातरी आरभ केला असावा.


१७८५ मध्ये या कादंबरीची पहिली सहा प्रकरणे ' विल्हेम माइस्टर्स थेआट्रालिशऽ झेंडुग ' नावाने तयार झालेली होती. १७८५ पर्यंत लिहून झालेली ही सहा प्रकरणे १९१० साली प्रथम उपलब्ध झाली. ' विल्हेम माइस्टर्स लेअरयाडर ' या कादबरीच्या प्रकाशनानतर (१७९६) हे भाग प्रकाशित करणे गटेला अनावश्यक वाटले असावे.

लेअरयाडर मधील पहिली चार प्रकरणे बहुतांशी झेंडुंगमधील एकूण सहा प्रकरणांवर अवलंबून आहेत. विल्हेम माइस्टर नावाच्या एका सधन, सुखासीन पण कलाप्रेमी तरुणाची जीवनकहाणी या कादंबरीत तपशीलवार आलेली आहे. जीवनात खऱ्या अर्थाने प्रतिष्ठित, स्थिर-स्थावर होईपर्यंतची त्याची अनेक क्षेत्रांतील उमेदवारी या कादंबरीत वर्णिलेली आहे. विल्हेम हे नाव शेक्सपिअरच्या विलयम या नावावरून गटेला सुचले असावे. स्वतः गटेची कलाविषयक अनेक मते, त्याचे विलक्षण नाट्यप्रेम, त्याची सौंदर्यासक्ती, त्याची मधुकरवृत्ती इत्यादी गोष्टींचा प्रत्यय ही कादंबरी वाचताना वारंवार येतो. रोमँटिक वृत्तीची चरमसीमा वर्थरमध्ये आढळते तर १८ व्या व १९ व्या शतकातील संक्रमण काळाची सारी वैशिष्टये ही कादंबरी ग्रथित करते.

### प्रेम व मृत्यू

गटेच्या मते माणसाची नीतिमत्ता ही त्याच्यावर बाहेरून लादलेली नसावी. मुक्त व परिपक्व कृतींच्या साहाय्याने व्यक्तिगत हित व सामाजिक स्वास्थ्य यांतील दरी नाहीशी करता येते. गटेचा वैचारिक प्रवास समजावून घेण्याच्या दृष्टीने वर्थर व लेअरयाडर या दोन कादंबऱ्यांची थोडी तुलना करणे उद्‌बोधक ठरते. १७८७ साली काही फेरफार करून वर्थरची दुसरी आवृत्ती गटेने प्रसिद्ध केली. वर्थरच्या अखेरीस नायक मृत्यूला जवळ करतो तर लेअरयाडरच्या अखेरीस उमेदवारी संपवून तो जीवनाला सामोरा जातो. वर्थर गंभीर व शोकात्म तर लेअरयाडर उपहासगर्भ व मिस्किल. वर्थर एकाकी, आत्मकेंद्रित तर विल्हेम समाजाभिमुख व जनसंपर्कप्रिय. वर्थरच्या अखेरीस नायकाचा मृत्यू होत असल्याने त्यानंतर कथानक पुढे जाण्याचा प्रश्नच नव्हता. लेअरयाडरच्या बाबतीत मात्र तसे नव्हते. जीवनात सुप्रतिष्ठित झाल्यानंतर विल्हेमची उमेदवारी संपलेली असली तरी त्याचा प्रवास पुढे चालूच राहाणार होता. आणि म्हणूनच या पुढील प्रवासाचे वर्णन करणारी 'विल्हेम माइस्टर्स वाँडर याडर' ही कादंबरी १८०७ च्या सुमारास गटेने लिहायला घेतली. तथापि या कादंबरीचे लेखन मध्येच थांबवून १८०९ साली गटेने त्याची 'डी वाडल फेअरवाँट शाफ्टन' (इलेक्टिव्ह ॲफिनिटिज्) ही कादंबरी प्रसिद्ध केली. वर्थरप्रमाणेच या कादंबरीचे कथासूत्र देखील प्रेम व मृत्यू या मानवी जीवनाला व्यापून टाकणाऱ्या दोन विषयांभोवती गुंफलेले आहे. या कादंबरीचे स्वरूप काहीसे कथानकप्रधान आहे. या कादंबरीतील घटनांचा गटेच्या व्यक्तिगत जीवनाशी नातेसंबंध जोडण्याचा क्षीण प्रयत्न काही टीकाकारांनी केलेला आहे.

'विल्हेम माइस्टरची भ्रमंती' या कादंबरीचा पहिला भाग १८२१ साली प्रकाशित झाला, तर ही कादंबरी तिच्या पूर्ण रूपात १८२९ मध्ये प्रसिद्ध झाली. गटेने लिहिलेल्या आधीच्या तीन कादंबऱ्यांहून या कादंबरीचे रूप अगदी निराळे आहे. या ग्रंथाला कादंबरी म्हणून ओळखणे म्हणजे कादंबरी या वाङ्‌मयप्रकाराची संकल्पना फारच

ताणणे होय. वास्तविक पाहाता अनेक कथा, आख्यायिका, वृत्तात, सुभाषितवजा वाक्ये व विविध विषयावरील प्रदीर्घ चिंतन याचा सग्रह येथे आढळतो शिक्षण, राजकारण, सामाजिक नीती, वैद्यकशास्त्र इत्यादी विषयाची विस्तृत चर्चा या कादबरीचा फार मोठा भाग व्यापते. विल्हेल्मची व्यक्तिरेखा आधीच्या कादवरीतूनच घेतलेली असली तरी या व्यक्तिरेखेचा लेअरयाडर मधील ठसठशीतपणा या कादबरीत नाही. ही कादबरी पूर्ण करीत असताना गटेला संध्याछाया भिववू लागल्या होत्या. म्हणूनच असेल कदाचित, असख्य विषयावरील आपले सारभूत विचार या कादवरीत कोबण्याची गटेला घाई झाली असावी परिणामत या कादबरीचा फॉर्म पार बिघडून गेलेला आहे अनेक उपयुक्त गोष्टी ठासून भरलेल्या पण बेढब दिसणाऱ्या एखाद्या होल्डॉलचे रूप तिला प्राप्त झाले आहे. गटेने पूर्ण रूपात फक्त चारच कादबऱ्या लिहिलेल्या असल्या तरी गटेच्या एकूण वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घेताना या कादबऱ्याचा विचार अनेक दृष्टिकोणातून महत्त्वपूर्ण ठरतो. गटेने विपुल कथालेखनही केलेले आहे. कथा व कादवरीलेखनाची त्याची कारकीर्द अत्यत विस्तृत म्हणजे सुमारे ६० वर्षांची आहे. गटेच्या कादबरी लेखनावर बोकॅशिओपासून वाल्क्षॅकपर्यंत व सर्व्हेन्टिसपासून स्टर्न, स्टेन्धॉलपर्यंत अनेक लेखकाचा प्रभाव आढळतो. प्रथम दर्जाचा कादवरीकार होण्याची गटेची आकाक्षा होती. असे असले तरी एक वाङ्मयप्रकार या नात्याने गटे कादवरीला काही प्रमाणात तरी शबलित मानीत असे. ¤

वर्थर लिहून प्रसिद्ध करण्यापूर्वीच गटेने जर्मन भाषेत कित्येक भावकविता, निबध व काही नाटके लिहून प्रसिद्ध केली होती, हे खरे असले तरी उभ्या युरोपला गटे परिचित झाला तो मात्र 'वर्थर'चा लेखक म्हणूनच. गेल्या १००-१५० वर्षांत वर्थरच्या तुलनेत फाउस्टची चर्चा अधिक प्रमाणात झालेली दिसते. तथापि व्हिक्टर लेन्जसारखे गटे वाङ्मयाचे साक्षेपी अभ्यासक गटेचे कादबरी लेखनच त्याच्या नाट्य अथवा काव्य लेखनाहून अधिक मौलिक स्वरूपाचे मानतात- गटेच्या नाटकातून ऐतिहासिक अथवा पौराणिक कल्पनाचे चित्रण आढळते. या उलट त्याच्या कादबऱ्या मात्र समकालीन सामाजिक जीवनाचे चित्रण करतात. गटेच्या व्यक्तिमत्त्वातील बुद्धिगम्य, गभीर, चिंतनशील भागाचा आविष्कार त्याच्या कादबऱ्यातून अधिक स्पष्ट रूपात आढळतो असे काही अभ्यासकाचे ठाम मत आहे. हरमान हेस्स व थॉमस मान यासारखे २० व्या शतकातील श्रेष्ठ जर्मन कादबरी. कार त्यांच्या कादबरी लेखनात गटेचे ऋण नि.सदिग्ध शब्दात मान्य करताना दिसतात.

### नवे नाटक

गटे व शिलर ह्यानी ज्या जर्मन थिएटरसाठी नाट्यलेखन केले त्या थिएटरमध्ये प्रामुख्याने भावविवश, वीररसप्रधान, काही प्रमाणात भडक व उथळ नाट्यकृती लोकप्रिय होत्या अशा रगभूमीवर या दोन नाटककारानी तत्कालीन जर्मन अभिरुचीची फारशी पर्वा न करणारी, ग्रीक नाटककार, शेक्सपीअर व रेसिन यासारख्या परस्परभिन्न आदर्शांवर बेतलेली नाटके सादर केली. लोकाभिरूचीचा अनुनय करण्याच्या त्याच्या या कृतीतून कलाकार या नात्याने त्याची निष्ठा व त्याचे मोठेपण प्रगट होते. 'एफिगेनी' व 'फाउस्ट' यासारख्या नाटकात एकाच वेळी व्यष्टी व समष्टी ह्याच्यात सुसवाद साधू शकेल अशा एका विशाल मानवी सस्कृतीचे अप्रत्यक्ष चित्रण गटेने केलेले आहे आजपर्यंत गटेच्या नाटकाचे रसग्रहण करताना ती गटेची नाटके आहेत या गोष्टीवरच नको इतका भर दिला गेल्याचे जाणवते काव्यात्म नाट्यप्रकारात गटेने घातलेली भर त्यामुळे काहीशी दुर्लक्षित झाली. नवीन काळाची आव्हाने पेलून त्या काळाचे प्रातिनिधिक रूप समर्थपणे सादर करणारी तरल व सूक्ष्म नाटके निर्भरशील वृत्तीने लिहून एक प्रकारे गटेने भावी काळाची चाहूल सूचित केली हे म्हणावे तितके लक्षात घेतले गेलेले दिसत नाही. गटेच्या सर्वच वाङ्मयात एका विद्ध, विव्हल अत.करणाचे आर्त उद्गार प्रगट झालेले दिसतात. या दृष्टिकोणातून त्याचे 'टाउरिस'मधील 'एफिगेनी' हे नाटक विशेषच लक्षणीय आहे. या नाटकातील मूळ कथानक गटेने प्रसिद्ध ग्रीक नाटककार युरिपिडीसकडून घेतलेले आहे. या नाटकाची कथावस्तू गटेच्या मनात प्रदीर्घ काळ घोळत होती. सदर नाटकाचा आराखडा त्याने अनेकदा बदलला. १७८७ साली इटलीतील वास्तव्याच्या काळात त्याने या नाटकाला अतिम रूप दिले. या नाटकाची नायिका एफिगेनी हिच्यावर अवास्तवतेचा, अमानवी भव्यतेचा 'सडेस्कूल अशक्य आदर्शवादाचा' आरोप केला जाण्याची शक्यता गटेला जाणवत होती. 'न देव चरितं चरेत्' या न्यायाने आपली ही नायिका बाजूस सारली जाऊ नये म्हणूनच असेल कदाचित गटेने तिला, 'डॅम्नेब्ली ह्यूमन' म्हणून सबोधिले. युरिपिडीसच्या एफिगेनीपेक्षा गटेची एफिगेनी इतकी वेगळी आहे की शिलरने ह्या नाटकाला 'अन ग्रीक' व 'मॉडर्न' ठरविले. युरिपिडीसच्या कथेत दैवी इच्छा हीच सर्वांत प्रभावी शक्ती ठरते. मानवाचे पतन अथवा त्याचा उद्धार दोन्ही गोष्टी देवाधीन. युरिपिडीसच्या कथेत मानवी इच्छेला धडपडीला, सघर्षाला स्थानच नाही. गटेच्या कथेत कथानकाची सारी सूत्रे ऑलिंपस पर्वतावरून हलविली जात नाहीत. गटेची पात्रे म्हणजे फक्त देव.च्या हर्षामर्षाचे बळी असणारी कळसूत्री बाहुली नाहीत. ती चुकणारी, पतन पावणारी पण तरीही धडपडणारी, मात करू पहाणारी, रक्तामासाची माणसे आहेत. गटेच्या ऑरिस्टसने देखील आपल्या आईची हत्या केलेली आहे. पण ह्या हत्येलाही जणू तो स्वत.च जबाबदार आहे. आईच्या रूपाने जणू ऑरिस्टसने जिजीविषेचीच, जीवनरसाचीच हत्या केलेली आहे. आई हे सृजनाचे, जीवनावरील प्रेमाचे प्रतीक होय. ह्याच कथेला २० व्या शतकात युजीन ओनिलने आणखीही वेगळा आशय प्राप्त करून दिला. ज्याप्रमाणे मेरीच्या रूपाने मातृत्वाचा आदर्श साकार झाला, त्याचप्रमाणे एफिगेनीच्या रूपाने जणू आदर्श भगिनीची परमोत्कट सीमा गटेने शब्दरूप केली एफिगेनी व ऑरिस्टस ही पात्रे चितारताना ग्रीक पुराणातील अपोलो व आर्टेमिस अथवा सूर्य व चद्र ह्या वैश्विक कल्पना गटेसमोर होत्या. चद्राच्या ठायी असणारी जादू, दु खावर फुकर घालण्याची, रोगमुक्त करण्याची शक्ती या साऱ्या गोष्टी एफिगेनीत एकवटलेल्या आहेत एफिगेनीच्या रूपाने गटेची जर्मन मनाची, आदर्श मानवाची सपूर्ण व परिपूर्ण व्यक्तिमत्त्वाची कल्पना साकार झालेली आहे शरीर व आत्मा ह्याच्यातील द्वैत येथे पार मिटून जाते.

## फाउस्ट

वरवर पाहाता ' एफिगेनी ' व ' फाउस्ट ' या दोन साहित्यकृतीत तसे कोणतेच साम्य नसले तरी थोड्या बारकाईने विचार केल्यावर मात्र या दोन अक्षरकृतीतील आतरिक नातेसबध मनात उलगडू लागतो. गटेला सर्वात अधिक प्रसिद्धी मिळवून दिली ती ' फाउस्ट ' या काव्य-नाटचाने. जागतिक साहित्यात त्याला जे अढळपद प्राप्त झाले ते देखील फाउस्टमुळेच ! अनेक समीक्षकाना प्रज्ञा व प्रतिभा याचा मनोज्ञ सगम आढळला तोही ' फाउस्ट ' मध्येच. गटे हा महाकवी, द्रष्टा, सत सारे काही ठरला ते देखील फाउस्टमुळेच. फाउस्ट या काव्यनाटचाचे अनेक अभ्यासकानी केलेले मूल्यमापन मला कित्येक प्रसगी पूर्वग्रह–विभूषित वाटत असले तरी, अनेक दृष्टिकोणातून फाउस्ट या वाङ्मयकृतीची महत्त्वपूर्णता मलादेखील जाणवते हे मात्र निश्चित ! कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास अथवा तिची समीक्षा करताना विश्लेषण, विवरण, वर्गीकरण व मूल्यमापन इत्यादी परस्पर-पूरक परस्परावलबी टप्प्याचा अथवा पायऱ्याचा वापर करावा लागतो. विशिष्ट वाङ्मयीन चळवळीच्या अथवा सप्रदायाच्या सदर्भात ती साहित्यकृती न्याहाळावी लागते. तथापि अत्यत श्रेष्ठ दर्जाच्या साहित्य-कृती सपूर्ण समीक्षा व्यापाराला थिटे, खुजे वाटायला भाग पाडतात. सर्व समीक्षापद्धतीना व्यापून दशागुळे उरण्याचे सामर्थ्य अक्षरकला-ब्रह्मात असते फाउस्ट या काव्यनाटचाच्या सदर्भात काही प्रमाणात तरी हे खरे आहे. गटेचा साहित्यिक पिंड, त्याची वाङ्मयीन अभि-रूची, ग्रीक, मध्ययुगीन व समकालीन जाणिवावर पोसलेली होती. अभिजातवादी, निर्भरशील, रोकोको इत्यादी परंपराना त्याने एकाच वेळी कवेत घेतले होते. जर्मन भाषेतील पारपरिक लोकसाहित्याचा गटेचा अभ्यासही लक्षणीय होता. फाउस्टच्या कथेला १६ व्या शतका-तील एका ऐतिहासिक व्यक्तीचा तर आधार होताच या व्यक्तीने गूढ विद्याचा, तत्त्वज्ञानाचा, किमया विज्ञानाचा अभ्यास केलेला होता. पण हायडेलवर्ग विद्यापीठातील या व्यक्तीवरोबरच फाउस्टमधील बायबलचा, जर्मन लोकगीताचा व मार्लोच्या ' डॉ फॉस्टस् ' चाही आधार होता.

फाउस्टच्या लेखनाला गटेने नेमकी केव्हा सुरुवात केली या विषयीचा नि.सदिग्ध पुरावा उपलब्ध होत नाही. तथापि १७७० च्या सुमारासच त्याच्या मनात फाउस्टचे कथाबीज अकुरित होऊ लागले होते. १७९० साली फाउस्टचा पहिला भाग प्रसिद्ध झाला तर या नाटकाचा दुसरा भाग १८३१ साली म्हणजे पुढे तब्बल ४१ वर्षांनी लिहून पूर्ण झाला. एखादी साहित्यकृती सिद्ध होण्यासाठी ६० वर्षांचा कालावधी लागल्याचे अन्य एकही उदाहरण निदान मला तरी ज्ञात नाही

गटे वाङ्मयाचा अभ्यास करीत असताना फाउस्टला अनन्य साधारण महत्त्व आहे गटेच्या अनुभवविश्वाचे सारसर्वस्व, त्याचे जीवनभाष्य, त्याच्या कलाविषयक जाणिवा इत्यादी साऱ्या गोष्टी फाउस्टमध्ये प्रतिबिंबित झालेल्या आहेत सपूर्ण गटे वाङ्मयाचे मध्यवर्ती विचारसूत्र येथे प्रगट झाले आहे. फाउस्टच्या पहिल्या भागात सौंदर्यवादी, जीवनासक्त, पर्युत्सुक गटेचे दर्शन घडते. तर दुसऱ्या भागात परिणतप्रज्ञ, स्थिरचित्त व प्राप्तार्थ गटे आपल्याला भेटतो.

माणसाच्या ठायी वास करणारी अखड बौद्धिक जिज्ञासा, त्याची ज्ञानलालसा व त्याची स्खलनशीलता याचा पारस्परिक सबध तरी कोणता या प्रश्नाचा शोध फाउस्टमध्ये घेतलेला आहे. जीवनातल्या अशा एखाद्या उत्कट क्षणासाठी फाउस्टचा वेदनामय, आर्त पण तरीही मव्योदात्त आक्रोश होता की जो क्षण सतत टिकावा म्हणून ध्यास घेता येईल. याच स्वरूपाचा आक्रोश युगायुगातून, देशादेशातून ऋषितुल्य महात्म्याच्या अत करणातून उठलेला आढळतो.

तीन देवदूत परमेश्वराच्या महान कर्तृत्वाचे स्तुतिस्तोत्र गात असताना मेफिस्टोफेलिझ् मध्येच हस्तक्षेप करून त्याच्या हे लक्षात आणून देतो की त्याना वाटते तसे पृथ्वीवर सारे काही आलबेल नाही. परमेश्वराने मनुष्य जातीत अनेक दोष असल्याचे मान्य केले. तथापि फाउस्टसारखा त्याचा एकनिष्ठ सेवक सन्मार्गापासून कधीही ढळणार नाही असा दावाही त्याने केला. मेफिस्टोफेलिझ्ने परमेश्वराशी फाउस्टला नीतिभ्रष्ट करण्याची पैज मारली. परमेश्वराला फाउस्टच्या निष्ठेविषयी विश्वास होता तरीही फाउस्टच्या आत्म्यावर ताबा मिळवून त्याची अधोगती घडवून आणणे मेफिस्टोफेलिझ्ला शक्य आहे याचीही त्याला जाणीव होती. मेफिस्टोफेलिझ्ला फाउस्ट हे योग्य लक्ष्यण वाटले. कारण सर्वथैव अप्राप्य असणाऱ्या गोष्टीचा हव्यास फाउस्टने धरला होता मानवी देहाच्या मर्यादेत जेवढे ज्ञान करून घेणे शक्य असते तेवढचा ज्ञानावर समाधान मानायला तो तयार नव्हता. अथांग, अनत विश्वाच्या संदर्भात मानवी अस्तित्वाची नगण्यता त्याला भेडसावत होती. अशा मनःस्थितीत असतानाच फाउस्ट बाहेर फेरफटका करण्यासाठी वॅगनरला घेऊन निघाला. वाटेत त्याने असे लोक पाहिले की ज्याच्या मनाला तत्त्वज्ञानातील कूट प्रश्नानी कधी स्पर्शच केलेला नव्हता. अशा उन्मुक्त वातावरणात फाउस्टला उल्हसित वाटू लागले. त्याचे मनोवितान निरभ्र झाले. फाउस्टला स्वत त वास करणाऱ्या दोन मनांची, दोन आत्म्याची जाणीव झाली. एक आत्मा पार्थिव सृष्टीशी नाते सागणारा, तिच्यात रमणारा तर दुसरा निःश्रेयसाची आकाक्षा धरणारा, अतीत. पाच-भौतिक शरीराला या आत्म्याला धारण करणे कठीण वाटते दैनदिन जीवनात आपले अस्तित्व किती मर्यादित असते याची त्याला जाणीव झाली. स्वत.च्या अस्तित्वाला अमर्याद स्वरूप देणाऱ्या कोणत्याही नव्या जीवनपद्धतीचे स्वागत करायला फाउस्ट उत्सुक झाला स्वत.चा हेतू साध्य करायला हाच क्षण योग्य आहे हे ओळखून मेफिस्टोफेलिझ् पुढे सरसावला. एका श्वानाचे रूप धारण करून मेफिस्टोफेलिझ्ने जीवनाचा अर्थवेध घेऊ इच्छिणाऱ्या फाउस्टचा पाठलाग केला. बायबलच्या वाचनानतर देखील अनेक परस्परविरोधी विचाराचा कल्लोळ फाउस्टच्या मनात दाटलेला असतानाच मेफिस्टोफेलिझ् आपल्या खऱ्या रूपात प्रगट झाला. सुरुवातीच्या काही प्रयत्नांनतर बाह्यतः अभेद्य वाटणारी फाउस्टची नीतिमत्ता ढासळण्यास प्रारभ झाला एका चेटकिणीच्या साहाय्याने फाउस्टला त्याचे तारुण्य परत प्राप्त करून देऊन मेफिस्टोफेलिझ्ने वासनेची ठिणगी त्याच्या मनात पेटविली. ग्रेचेन नावाच्या सुस्वरूप, निरागस तरुणीचा सहवास फाउस्टला मिळेल अशी व्यवस्थाही त्याने केली. मध्यतरीच्या अनेक घटनानंतर ग्रेचेनच्या पवित्र व उदात्त प्रीतीचा अनुभव फाउस्टच्या मनात कृतार्थतेची भावना निर्माण करतो. साफल्याचा हा क्षण

चिरस्थायी व्हावा म्हणून फाउस्ट धडपडेल, असे मेफिस्टोफेलिझ्ला वाटत असते. परतु त्याची ही अपेक्षा फोल ठरते. स्वत च्या अर्भकाची हत्या केल्यावर मुक्तीचा क्षण ग्रेचेन नाकारते. मृत्युदड तिला अधिक सुसह्य वाटतो. यानतरचा कथाभाग गटेने कल्पिताच्या, अवास्तवाच्या पातळीवर नेलेला आहे. हेलेनच्या रूपाने स्वर्गीय सौंदर्याचा जो साक्षात्कार फाउस्टला घडतो तो त्याला अत्यत हवाहवासा वाटणारा असला तरी सौदर्य–दर्शनाचा हा क्षणदेखील जीवनाचा अखड ध्यास होऊ शकत नाही असेच त्याला वाटते संपूर्ण मानवजातीला उपकारक, उपयुक्त असे काही तरी करणे हे त्याचे मूळ ध्येय तो पुन्हा एकदा समोर ठेवतो. गूढ, आश्चर्यकारक शक्तीपासून मुक्त झालेला फाउस्ट निसर्गाला सामोरा जातो. दलदलीचा एक प्रदेश मिळवून फाउस्ट तो सुपीक बनवितो. बऱ्याच वर्षानंतर वृद्ध व अंध झालेल्या फाउस्टच्या असे लक्षात येते की त्याने असा एक विस्तृत प्रदेश निर्माण केलेला आहे की जेथे लोक सतत कोणते ना कोणते उपयुक्त सत्कर्म करण्यात मग्न झालेले असतील सक्रिय पण तरीही मुक्त लोकाच्या सहवासातील फाउस्ट स्वतःला कृतार्थ मानतो. या कृतार्थतेची मौलिकता, तिची महत्ता लक्षात आल्यावर हाच क्षण चिरस्थायी व्हावा असे फाउस्टला वाटते. अहकाराच्या, आत्मकेंद्रिततेच्या शृखलातून मुक्त झालेला फाउस्ट एका विशाल समष्टीचा, एका वैश्विक सृजनाचा, एका व्यापक योजनेचा स्वतःला एक घटक मानू लागतो. ही जाणीव होताच त्याला मानवी जीवन जगण्याच्या योग्यतेचे वाटू लागते. पर्यायाने फाउस्ट पैज हरतो. सुरुवातीच्या करारानुसार आता मेफिस्टोफेलिझ् फाउस्टच्या आत्म्याची मागणी करतो. पण वास्तविक पाहाता एक प्रकारे मेफिस्टोफेलिझ् देखील पैज हरलेला असतो. परमेश्वराचेच म्हणणे बरोबर ठरलेले असते फाउस्टने आयुष्यात अनेक चुका केलेल्या असल्या तरी पावित्र्याचे, सद्वर्तनाचे, श्रद्धेचे, नैतिकतेचे त्याचे भान पूर्णपणे कधीही लोपलेले नसते. स्वतःच्या पराभवाने हताश झालेला मेफिस्टोफेलिझ् फाउस्टच्या आत्म्याचे परमेश्वराच्या दिशेने होणारे उन्नयन रोखण्याचा प्रयत्न करतो. पण त्याचवेळी देवदूत फाउस्टच्या मदतीला धावून येतात फाउस्टला स्वर्गात नेले जाते की जेथे सृजनशील क्रिया हाच स्थायीभाव असतो. ज्या प्रकारच्या आयुष्याची फाउस्टने इच्छा केलेली असते, तेच त्याला मरणोत्तर सतत लाभते

फाउस्टच्या दुसऱ्या भागात काव्य व तत्त्वज्ञान यातील सीमारेषा जवळजवळ पुसली जाते. कपिलमुनीपासून कृष्णमूर्तींपर्यंत आणि सॉक्रेटिसपासून सार्त्रपर्यंत असख्य तत्त्वज्ञानी ज्या एका जीवनरहस्याचा भेद केला त्याच रहस्याचा वेध घेण्याचा प्रयत्न गटेने फाउस्टमध्ये केला आहे जीवनाची सार्थकता नेमकी कशात आहे या प्रश्नाचे उत्तर केवळ तर्कबुद्धीच्या साहाय्याने देता येणार नाही 'नैषा तर्केण मतिरापनेया' याची जाणीव अखेरीस फाउस्टरला झालेली दिसते. तर्क जेथे अप्रतिष्ठित ठरतो तेथे श्रद्धा दिलासा देऊ शकते. श्रद्धामयो ज्यं पुरुष: हे सनातन सत्य हे फाउस्टच्या दुसऱ्या भागात महत्त्वपूर्ण ठरते. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाचा प्रणेता किर्केगार्दच्या मते जीवनातील साऱ्या विसगती, सारे विरोधाभास ज्या शक्तीच्या आधारे लुप्त होतात, त्या शक्तीला श्रद्धा म्हणायचे. प्लेटोपासून आधुनिक तत्त्वज्ञ विल ड्युरांटपर्यंत अनेकानी सद्वर्तनाला, नैतिकतेलाच सपूर्ण तत्त्वज्ञानाचा गाभा मानलेले आहे.

फाउस्टच्या सुरुवातीला गटेने जो प्रारभक लिहिलेला आहे, तो लिहिण्याची कल्पना त्याला कालिदासाचे शाकुतल वाचून सुचली असावी असे मानले जाते. फाउस्टची सुरुवात व त्या नाटकाची समाप्ती या दोन्ही गोष्टी पृथ्वीवर घडत नाहीत. या नाटकाची अपार्थिव चौकट सूचित करण्यासाठी गटेने असे केले असावे

स्पेंगलरसारखे सस्कृतिवेत्ते अथवा सान्तायानासारखे तत्त्वज्ञ यांना फाउस्ट या अक्षरसाहित्यकृतीची देशकाल निरपेक्षता, तिची वैश्विकता व एक प्रकारे तिची आधुनिकता प्रकर्षाने जाणवलेली आहे. थॉमस मानसारख्या अर्वाचीन कादबरीकारावर तर फाउस्टचा सखोल परिणाम झालाच पण शिवाय गेल्या १००–१५० वर्षांत सगीत, चित्रकला व शिल्पकला अशा अन्य ललित कलावरदेखील फाउस्टचा काही प्रमाणात तरी परिणाम झालेला दिसतो. अनेक समीक्षक व साहित्याभ्यासक फाउस्टच्या मनान चिंतनात, त्याच्या रसग्रहणात तल्लीन झालेले दिसतात. एखादी साहित्यकृती जेव्हा तिच्या अभिजाततेने जागतिक वाङ्मयात क्लासिक म्हणून मानाचे स्थान प्राप्त करून घेते तेव्हा तिच्या ठायी एकाच वेळी ज्या अनेक गुणविशेषाचा समुच्चय आढळून येतो त्यापैकी सर्वात लक्षणीय गुण म्हणजे तिचे नित्यनूतनत्व. फाउस्टसारखी वाङ्मयकृती शिलरसारख्या गटेच्या समकालीनाना ज्या कारणासाठी मौलिक वाटली त्यापेक्षा अगदी वेगळ्या कारणांसाठी ती आज आपल्याला महत्त्वपूर्ण वाटू शकते. स्थल, काल व परिस्थिती बदलल्यावर देखील एका सपन्न सदिग्धतेच्या आधारे आपले आवाहकत्व अशा कलाकृती टिकवून ठेवतात. फाउस्ट या काव्यनाट्याला जी आशयघनता प्राप्त झालेली आहे, तिचे मूळ गटेच्या समृद्ध अनुभवविश्वात आहे. अनेक बाबतीत गटे व फाउस्ट याच्यातील साम्य सहज लक्षात येण्याजोगे आहे. गटेप्रमाणेच फाउस्टची प्रज्ञादेखील ज्ञानाच्या अनेक शाखोपशाखातून एक समन्वयात्मक, सश्लेषणात्मक दृष्टिकोणातून लीलया सचार करताना दिसते.

## चैतन्यतत्त्व

विज्ञान, तत्त्वज्ञान व साहित्यशास्त्र या तीनही विषयावर गटेने विपुल लेखन केलेले असले तरी गटेच्या मते हे तीनही विषय एकाच चैतन्यतत्त्वाकडे अगुलिनिर्देश करीत असल्यामुळे त्यातील सीमारेषा अत्यत धूसर असतात. जैविक व भौतिकशास्त्रात कोणताही महत्त्वाचा शोध गटेच्या नावावर नाही हे खरे असले तरी तत्कालीन शास्त्रज्ञाच्या विचारपद्धतीवर गटेचा फार मोठा प्रभाव होता हे मात्र निश्चित. डार्विनच्या सिद्धातातील काही मूलभूत कल्पना बीजरूपाने गटेच्या लेखनात आढळतात. व्हायमार येथे वनखात्याचा कारभार पाहात असताना वनस्पतिशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास गटेने केला. मॉर्फोलॉजी या शास्त्राचा तर गटे हा एकप्रकारे आद्यप्रवर्तक होता. रूढ पद्धतीने विचार केला असता तत्त्वज्ञानात्मक म्हणता येईल अशा ग्रथाची रचना गटेने केलेली नाही. तथापि त्याच्या सर्वच वाङ्मयातून तत्त्वज्ञानाविषयीची त्याची आस्था व्यक्त झालेली आहे. आपल्या विचारपद्धतीवर स्पिनोझाचा विशेष प्रभाव असल्याचे गटेने स्वत.च म्हटले आहे काटच्या तत्त्वज्ञानातील काही प्रमेयाबद्दल गटेला मनोमन

# जीवनात रंग भरण्यासाठी बरंच काही...

# ...जेवणात रंग भरण्यासाठी फक्त केप्र

- मसाले
- लोणची मसाले
- तयार लोणची
- चटण्या
- उपवास उत्पादने

केप्र चवीनें खाणार त्याला केप्र देणार



AD-ACTIVE

आस्था होती. आपले कलाविषयक विचारदेखील सुसगत व सुस्पष्ट रूपात ग्रथनिविष्ट करण्याची काळजी गटेने कधीच घेतली नाही. असे असूनही गटेचे स्फुट विचार त्याची व्यापक व सर्वसमावेशक भूमिका सूचित करतात. सेन्ट बव्हने गटेला सर्व युगातील सर्वश्रेष्ठ समीक्षक ठरविणे अथवा मॅथ्यू अर्नोल्डने त्याला 'सुप्रीम क्रिटिक' ही पदवी बहाल करणे या गोष्टी अतिशयोक्त असल्या तरी काही बाबतीत साहित्यशास्त्रीय विचारात गटेने घातलेली भर अत्यत मोलाची आहे. याबद्दल दुमत होण्याचे कारण नाही. उदाहरणार्थ 'फॉर्म' या संकल्पनेविषयी गटेने माडलेले विचार अत्यत प्रगल्भ स्वरूपाचे आहेत. प्लॉटिनसकडून प्राप्त झालेली आतरिक फॉर्मची कल्पना व मॉर्फोलॉजीमधून सुचलेली फॉर्मेशनची कल्पना याच्या समन्वयातून गटेने आपले फॉर्मविषयक सखोल चिंतन शब्दबद्ध केले. त्याच्या मते 'अस्तित्वाचे सारे अर्थ, त्यातील व्यामिश्रता, त्याचे नित्यनूतनत्व, त्यातील चैतन्य ह्या सर्वांचा सपूर्ण सवात ज्या सकल्पनेतून अभिव्यक्त होतो, त्या सकल्पनेला आपण 'फॉर्म' या नावाने ओळखतो. फॉर्म या सकल्पनेत विशिष्ट क्षणी जाणवणारा फॉर्म तर अभिप्रेत असतोच पण शिवाय त्यात फॉर्मेशनची कल्पनाही अनुस्यूत असते. हे सर्व विचार प्रगट करण्यासाठी जर्मन भाषेत 'गेष्टाल्ट' हा शब्द आहे. गटे देखील हाच शब्द वापरतो गटेच्या फॉर्मविषयक चिंतनात २० व्या शतकातील गेष्टाल्ट सायकॉलॉजीचा व सिमॅटिक टीकापद्धतीचा पायरव ऐकू येतो. काव्यातील छदोबद्ध रचनेविषयीसुद्धा गटेने मर्मग्राही विवेचन केलेले आहे. त्याच्या मते काव्यातील अभिव्यक्ती हा अभिव्यक्तीचा केवळ एक प्रकार नसतो तर तो एक अपरिवर्तनीय प्रकार असतो काव्यातील नादमयता आशयाला एक परिपूर्ण रूप प्राप्त करून देते. अन्य कोणत्याही माध्यमातून जो भावानुकूल आशय व्यक्त होऊच शकत नाही, तोच भावानुकूल आशय काव्याच्या आश्रयाने नादानुसधानाच्या माध्यमातून व्यक्त होतो. वाङ्मय कलेच्या गाभ्यावर प्रकाशझोत टाकणारी गटेची अशी कित्येक मते त्याच्या विविध ग्रंथातून विखुरलेली आहेत शिवाय त्याने त्याच्या अनेक मित्राना लिहिलेल्या विस्तृत पत्रातूनही त्याची साहित्यविषयक मते व्यक्त झालेली आहेत. आजवर गटेची सुमारे १४००० पत्रे उपलब्ध झालेली आहेत. त्याची ही पत्रे व त्याच्या डायऱ्या हे अभ्यासकापुढील एक फार मोठे आव्हान आहे 'गटेच्या साहित्यविषयक मताचा साकल्याने विचार करणे म्हणजे जणू संपूर्ण जागतिक वाङ्मयाचाच धावता आढावा घेणे होय' हे डॉ. वेलेक याचे मत अर्थपूर्ण आहे

## एकात्म दर्शन

अनेक भाष्यकाराना वाट पुसत गटेच्या प्रदीर्घ व प्रचंड वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केल्यावर माझ्या मनात काही प्रश्न उपस्थित होतात. त्यापैकी प्रत्येक प्रश्नाचे समाधानकारक उत्तर सापडेलच असे नाही. तरीसुद्धा प्रश्नाच्या सुविहित मांडणीतही काही उत्तराचे सूचन होत असते काही प्रश्न अनुत्तरित रहाण्यातच त्याची सार्थकता सामावलेली असेल. पहिला प्रश्न असा की गटेच्या या अतिविस्तृत लेखन प्रपचामागे कोणतेतरी समानसूत्र आहे का? माझ्या पुरते तरी या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी आहे. विविधतेने नटलेल्या या विश्वव्यापाराचे एकात्म दर्शन घडविणे हे ते सूत्र होय. 'अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञान विद्धि सात्त्विकम्' या गीतावचनाची आठवण या सदर्भात झाल्याखेरीज रहात नाही. दुसरा प्रश्न असा की इमर्सन अथवा मॅथ्यू अर्नोल्ड याच्यासारख्या विचारवताना गटेच्या वाङ्मयात जी भव्योदात्तता, जीवनभाष्याची जी परमसीमा आढळली तिचे रहस्य कोणते असावे? माझ्या मते उत्स्फूर्तता व चिंतनशीलता याचा जो मिलाफ गटेच्या साहित्यात काही प्रमाणात आढळतो, त्यामुळे अशा विचारवतानी गटेला दर्शनकार ठरविले असावे. विल्यम जेम्स याच्या मते 'गटेच्या रोमारोमातून, रध्रारंध्रातून चैतन्य ओसडून वाहात होते. प्रत्येक तपशील मनात नोंदताना जणू काही आपल्यापाशी भरपूर मोकळा वेळ आहे अशा शात, धीम्या लयीत गटे तो नोदवीत असे. यामुळेच असेल कदाचित त्याच्या मनोयत्राची हालचाल, त्याचा आवाका असामान्य वाटतो' जी एच् लेविस् या गटेच्या प्रसिद्ध चरित्रकाराच्या मते गटेच्या जीवनात सतत जाणवणारी अस्वस्थता एका प्रतिभावताचे उत्स्फूर्त कलात्मक जीवन व अशा जीवनाला रोधू पहाणारे सामाजिक सकेत याच्या सघर्षातून निर्माण झालेली होती. बार्कर फेअरली याच्या मते गटेची थोरवी, त्याची महत्ता त्याच्या ठायी वास करणाऱ्या सृजनशील व संहारक प्रवृत्तीच्या अस्थिर समतोलात सामावलेली होती. येथे उद्धृत केलेल्या गटेच्या वाङ्मयीन महत्तेचा शोध घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या या काही मतातील सत्याश मला मान्य असले तरी विश्वसाहित्यात गटेचा समावेश करण्यासाठी ही स्पष्टीकरणे पुरेशी आहेत असे वाटत नाही होमर, दान्ते व शेक्सपिअर याच्या तुलनेने गटेचे वाङ्मय कितीतरी पटीनी अधिक वैविध्यपूर्ण असले तरी मानवी जीवनाच्या स्वरूपाचा गटेने घेतलेला वेध या लेखकानी घेतलेल्या शोधाइतका तलस्पर्शी आहे असे निदान मला तरी वाटत नाही. विश्वसाहित्यात गटेला जे मानाचे स्थान प्राप्त झाले त्यात त्याच्या वाङ्मयीन कर्तृत्वाच्या जोडीने त्याच्या भाग्याचाही मोठा वाटा आहे असे मला निःसदिग्धपणे म्हणावेसे वाटते.

गेले काही महिने गटेवाङ्मयाचा सलगपणे अभ्यास करताना आणखी एक प्रश्न स्पष्ट रूपाने मनात उभा ठाकला अखेरीस साहित्याची मौलिकता, तिची अर्थपूर्णता नेमकी कोणत्या गोष्टीवर अवलबून असते? कोणत्याही साहित्यकृतीला श्रेष्ठ ठरविताना तिच्या सदर्भात आशयदान, तत्त्वज्ञानगर्भ असे शब्द वापरले जातात. साहित्यकृतीची कलात्मकता जरी तत्त्वज्ञानावर अवलबून नसली तरी तिची श्रेष्ठता जर अतिमत जीवनभाष्यावरच अवलबून असेल तर ही श्रेष्ठता पराश्रयी, परावलबी नाही का? अत्यंत श्रेष्ठ मानल्या गेलेल्या कित्येक वाङ्मयकृतीचा कलात्मक फॉर्म बिघडलेला असूनही त्यातील जीवनभाष्यामुळे त्या महान आहेत असे जर मानायचे असेल तर उपनिषदासारख्या वाङ्मयकृती अशा तथाकथित श्रेष्ठ साहित्यकृतीहून श्रेष्ठतर का मानू नयेत? अखेरीस साहित्य व तत्त्वज्ञान याचे मानवी जीवनातील नेमके स्थान कोणते? त्या स्थानातील सत्ताशास्त्रीय फरक कोणता? एका आघाडीवर साहित्याला विज्ञानाशी मुकाबला करावा लागतो. उपयुक्ततेच्या मुद्द्यावर साहित्य ही लढाई हरते. तद्वत जीवनभाष्याच्या मुद्द्यावर दुसऱ्या आघाडीवर तत्त्वज्ञान हा विषय साहित्यापेक्षा अधिक मौलिक ठरत नाही का? साहित्याचे हे उणेपण कदाचित गटेलाही जाणवले असावे. म्हणूनच तर त्याने तत्त्वज्ञानात्मक व विज्ञानमूलक लेखन करण्याचा प्रयत्न केला नसेल ना? गटेसारख्या जर्मन भाषेतील श्रेष्ठतम व जगन्मान्य लेखकाच्या वाङ्मयाचा मनःपूर्वक अभ्यास करताना अशा प्रश्नाची चर्चा गांभीर्याने व्हायला हवी असे मला वाटते.

# कुणास्तव कुणीतरी

.... त्यानं ती फ्रेम हातात धरली. मूर्खासारखं त्याला काहीच सुचेना. हातात कोरा कागद धरून तो नुसताच अज्ञातात पाहू लागला. वाटलं बोलण्यासारखं काही उरलेलंच नाही. केवळ अस्तित्वा-वरूनच भाऊंना सगळं जाणवतं—उमजतं. आता इथे थांबूच नये, सुरांतून हात पसरून धावत सुटावं. नखं, ओरखडे, सुळे, सारंच टळेल. मुक्त झाल्यासारखं वाटेल.

● **शर्मिला गाडगीळ** ●

**वि**श्वनाथ उठून उभा राहिला. त्यानं मरगळीच्या सुरकुत्या दूर सारून झडझडून आळस दिला. मग जरा सैल होत त्यानं पुढच्या दारातून बाहेर पाहिलं. मग गवतात गुरफटलेल्या आणि थोडचाशाच दिसणाऱ्या क्षितिजाकडे पाहिलं. आभाळ करपू लागलं होतं. पक्षी थव्याथव्यानं सूर्या-वरनं सरकत होते. सहा वाजले असावेत.

विश्वनाथ काऊंटरपाशी येऊन उभा राहिला. त्यानं दुकान बंद केलं असतं, तरी फारसं काही बिघडण्यासारखं नव्हतं. रोजच्या सवयीनं त्यानं दुकान झाडून घेतलं अन् तो वाट पहात असल्यासारखा उभा होता, इतकंच. त्याच्या उभं रहाण्याला किंवा बाहेर पहाण्याला किंवा दुकानात असण्याला कशा-लाच काही प्रयोजन नव्हतं. संदर्भ नव्हता. कोणीही इथे फिरकणार नाही. हे त्याला अनुभवानं माहीत झालं होतं. कोणी इथे फिरकत नाही, याचं त्याला गुप्तपणे बरंच वाटायचं. दुकान आता नावापुरतंच उरलं होतं. काऊंटरच्या फळ्या चिंबून गेलेल्या. भिंतींच्या कोपऱ्यांतून शेवाळ साचलेलं. इथे—तिथे सर्वत्र कबरीतला निर्जीवपणा. काहीच नाही. नष्टांशाचं भलं मोठं शून्य फक्त.

ही काऊंटरमागची जागाच तेवढी त्याला विरंगुळ्याची होती. इतरांपासून दूरात, अलिप्त राहून स्वत:तच वेळ घालवता यायचा. मनातल्या मनात बोलताना किंवा गातानासुद्धा. दुकानात आणि त्यामागच्या राहत्या खोलीत एकदा झाडणी फिरवली, काही तरी उकडलं की विश्वनाथचं काम संपल्यासारखंच व्हायचं. दुपारचं जेवण झाल्यावर उरलेला वेळ कसा घालवायचा, हा नेहमीचा प्रश्न होता. पूर्वी दुकान भरभरा-टीत असताना चोवीस तास कमी पडायचे. पुरातन, ऐतिहासिक महत्त्व असलेल्या वस्तू विकणारं त्याचं दुकान होतं. हिशेब ठेवणं, पैसे वसूल करणं... एक ना दोन हजारो कामं असायची. पण पुढे युद्धात सगळंच कोसळून गेलं. जणू झोळीतलं आभाळ फाटलं. कित्येकांची आयुष्यं मोडीत निघाली. वडिलांनी दुकानातला बराचसा माल विकून दुकान गहाण टाकून कसंबसं तगवलं. पण या अतिश्रमांचा ताण त्यांच्या मनावर पडल्या-शिवाय राहिला नाही. एके दिवशी ते झोपले आणि एका मुक्या—बहिऱ्या जगात निघून गेले. कायमचे. दुकानामागच्या एकुलत्या खोलीत ते खाटेवर गुडघे उंच करून शून्यपणे बसलेले असायचे. ताठरल्या डोळ्यांनी गूढपणे अज्ञातात पहात. भुतासारखे. मंत्रतंत्र निष्फळ ठरल्यावर शेजारच्या गावातल्या डॉक्टरना बोलावलं गेलं. तर ते तपासून झाल्यावर तिऱ्हाईत मख्खपणे म्हणाले,

'कॅटॅरीनिया आहे. शहरात उपचार करायला हवेत. पहा परवडलं तर.'

इतकंच.

त्यांचे पैसे घेऊन ते निघून गेले. पण त्यांनी जे काही सांगितलं, ते परवडण्यासारखं नव्हतंच. निदान विश्वनाथला तरी नव्हतं. वडिलांचे रोज खोल जात जणू कवटीत रुतणारे डोळे तो हताशपणे पाहात होता. मनगटं चावत बसून होता फक्त. जणू संवादच संपले. जणू शब्दांचे विषयच गोठले. वडिलांच्या लेखी तर अवघ्या अवकाशात एक भयाण पोकळी उतरून आली होती. काही बोलायचं नाही. काही विचारायचं नाही. नुसतं प्राक्तनाच्या पात्याखाली निमूट बळी जायचं.

अर्धवट अंधार-प्रकाशात तो दूर क्षितिजा-पलीकडे पहात राहिला. त्याचे विचार जिथे कुठे स्थिर झाले होते, तिथे त्याची असहायता पोहोचली नाही. उलट कसलीशी खिन्नताच भरून राहिली मनात. जणू इतके दिवस बुरशीसारखी चढत गेलेली जादू निर्जीव

वर्षं झडून काही नवीनच वर येतय. आतल्या आत डहुळल्यासारखं होतंय आणि अनेक वर्षांची धाण वळशावळशांनी उठतीये. काय वर येतंय समजत नाही. काय स्पष्ट होतंय, उमजत नाही. फक्त जाणवतंय, अज्ञात, अगम्य, असं काही तरी.

त्यानं एकदम उत्कटपणे आपल्या 'दुकानाकडे' पाहिलं. तर आतल्या आतच गदगदू लागला. हलके–हलके स्वतःला आवरण्याच्या प्रयत्नात. उष्ण कढ ओघळू लागले, अंतर्यामी. डोळे मिटून उभा असल्यासारख्या जुनाट कपाटांकडे पहाताना. दोन वेडेवाकडे चषक. भुगा होऊ लागलेलं एक पुस्तक. संपलं सगळं आणि काचांवर, कपाटांवर चिकट, कोळ्यांची जाळी.

हा हवका ओसरल्यावर मात्र तो अंतर्मुख झाला. गंभीर झाला. त्याला वाटलं, ह्या वेदना आणि शरीराचं ओझं घेऊन आपण जगतो, ते कशाकरता? ही दुःखं, हे जावं तिथं फरफटत सोबत येणारं अंग. प्रयोजनहीनतेनं भारून गेलंय सगळं. एकदा हे संपलं, की निदान सुटका तरी होईल आपली. पण तेही साधत नाही. जणू ते भोवती–भोवती तरंगतंय, पण गवसत नाहीये. गावातल्या रंगीत फुलपाखरासारखं. पण एक गोष्ट नक्की. ही अपूर्णता फक्त आपल्यापुरतीच नाही. जन्मतःच काळोखाला सरावलेले डोळे जसे 'ब्रेल' लिपीच्या आधारानं बाहेरचं अंधारणारं–प्रकाशणारं जग पहात असतात, तसं सगळंच चलनवलन चाललंय–काही थांग लागत नाही. कशाचेच काही संदर्भ नाहीत. रोज भिंतींच्या फासळ्यात उठणं. मग प्रातर्विधी. दुपारभर इथे उभं राहणं. जागताना–झोपताना भोवती सतत अमानुष कडं करून असलेल्या भिंती. संध्याकाळी वेळाचं प्रचंड प्रश्नचिन्ह. त्याला तोंड दिल्यावर मग झोपणं. उद्या पुन्हा सगळं तसंच. कशालाच उत्तर नाही. फक्त रोज एकाच सनातन प्रश्नचिन्हावर नारखं कोरत रहायचं. प्रश्नचिन्हाच्या एका गुहेतून दुसऱ्या गुहेत. काही अर्धमुर्ध ज्ञान घेऊन. काही तात्पर्य घेऊन. म्हणजे अर्थही आपलेच. अपूर्णताही आपलीच. काहीच नाही. केवळ एक दरी, अंतर्यामी. असीम आणि अंधारी. ओसाड आणि अथांग. आता आपण एका काठावर उभे आहोत आणि आपलं परिचयाचं, शब्दांचं जग, ते पलीकडच्या काठावर. झेप घ्यायची तर इच्छा आहे पण पलीकडे पोहोचावयाची तर खात्री नाही. नुसतीच मग अस्वस्थता जाणवत राहते. ओढही आहे. असहाय्यताही आहे. सगळ्याचाच नकोपणाही आहे. काय शोधायचंय, कसं शोधायचंय, काहीच माहीत नाही. फक्त एक जाणीव आहे, स्वप्नात स्वप्न पडावी तशी धूसर.

तो हलला, सावकाश. पायऱ्यांवर आला. प्लॅटफॉर्मच्या.

हात पाठीमागे बांधून तो दूरवर पाहू लागला. एक टंगर–स्टेनचं क्षितिज. एका आकाशाचं संथ स्मशान आणि गवत. बेसुमार वाढलेलं. अंगणात. पायऱ्यांभोवती, मनात. त्याचा उग्र वास असहायपणे नको करून सोडणारा. पावसाळ्यात तर हिरवा चिखलच सगळा. त्यावर विखरून उडणारी पिवळी फुलपाखरे. किडे–मकोडे. क्वचित टोळसुद्धा. या सगळ्यातून वाट शोधत त्याच्या दाराची कडी वाजवण्याइतकं त्याच्याबद्दल आतडं उरलं होतं कुणाला? कित्येक वर्षांत कुणी आलं नाही. पुढेही येणार नाही. आलंच कुणी, तर उपचार म्हणून येईल, कोरड्या उत्सुकतेनं आणि आपल्या दगडी पूर्णविरामाभोवती गोल चक्कर टाकून निघून जाईल. पण हे चालायचंच. साऱ्या जगानं सुतक पाळावं, एवढं कोणाचंच दुःख महत्त्वाचं नसतं. मागे आई गेली, तेव्हा आजूबाजूची तुरळक माणसं आली. वडील मात्र शरीराचं गाठोडं करून अगदी कोपऱ्यात बसले होते... दुसऱ्याच कोणाचातरी सोहळा पहात असल्यासारखे सगळं अलिप्तपणे



न्याहाळत होते, फक्त. खालच्या आवाजात बोलत बरेचजण थोड्या वेळान नाहीसे झाले. काही अगदी जवळचे खिन्नसे बसून राहिले आणि पायऱ्यावर बसून शांतपणे विडी ओढत रघुराम [मागच्या पिढीची कहाणी ऐकवत होता. हे असच ! कोणाच्या मरणानंतरचं दुःख, हीदेखील हजारो वर्षांची परंपरा आहे निव्वळ. लोक जमले की, आपण आपले सनातन एकटेपण या निमित्तान त्याच्यात हरवून टाकू पहातो. ते आपल्याला हरवायचं असतं, पण ते हरवल जात नाही उलट सभोवारची, मित्राची, नातेवाईकाची गर्दी वाढत जाते. तसतसे आपण जास्त जास्त एकटे पडत जातो. बहुतेकांना हे कळत नसतं, की दोन माणस एकत्र येण, हे दोन आरसे समोरासमोर येण्यासारख आहे. उद्रेक करणारं.

शेवटी प्रत्येकाला एकट्यानच आपापला डोंगर ओलांडावा लागतो, काठी टेकवत. धाप लागली, श्वास कोंडला, तरी अंतापर्यंत चालत रहायचं. प्रावतनाच गाठोड वागवत. जन्म–मृत्यूचे [आयोजित पर्याय तुडवत. जायचं, जिथे स्वर्ग-नरक आहे असे म्हणतात, जिथे काहीच नाही, असंही म्हणतात पण काही असो–नसो, अटळपणे गेलच पाहिजे. आपली मात्र काठी कुठे पडली आणि गाठोड रिकामं झालं, [तरी डोंगर संपत नाही. या डोंगरात, गर्भातून जाणारं गुप्त भुयारही असावं. वरून रणरणत सत्य आणि भुयारातून संपूर्ण अधार. पण यापैकी काहीच गवसत नाही. जणू मृत्यूची, अताची नाळच तुटली आहे. [नुसताच दोन फाद्यामधला अभाव. अंतराळ. अमर्याद आणि अतहीन.

पायऱ्या उतरून तो खालच्या अंगणात आला.

गवताच्या उग्र वासान त्याला गुदमरल्यासारख झालं. हे गवत कापायला तो कितीतरी दिवस रघुरामची विनवणी करत होता. त्या बदल्यात रघुरामन त्याला दोनदा आश्वासन दिल होतं. पण एकदा पचवीस रुपये, तर एकदा दुकानातला आरसा घेऊन तो गवताच विसरला. विश्वनाथ कधी सलूनमध्ये आलाच, तर जोरजोरात हातवारे करत तो स्वत.मागे असलेल्या कामाचा पसारा विश्वनाथसमोर मांडायचा आणि मासोळीच्या सुळसुळीतपणे स्वत.ची सुटका करून घ्यायचा खर तर त्याला आणि विश्वनाथला, दोघांनाही माहीत झालं होत, की रघुरामची पावल पुन्हा इकडे वळणार नाहीत !

चालता–चालता क्षणभर थबकून त्यान रघुरामच्या सलूनमध्ये एकाग्रतेन पाहिलं. जणू तो दृष्टीपलीकडचं काहीतरी पकडायचा आकातानं प्रयत्न करतो आहे. हा रघुराम आईच्या तेराव्याला हा शांतपणे विडी फुंकत बसला होता, त्यात त्याच्या सबंध आयुष्याचच निर्विकार फुकत रहाणं आपल्याला जाणवलं. ह्या माणसाशी आपण मैत्री ठेवली खरी, पण आपण त्याला काही विश्वासात घेऊन सागणही तो विडीच्या धुरात, वलयात पहावं, तसं ऐकत आला. सतत दूरदूरच राहात आला हा आपण त्याला जस सागोपाग समजावून घेऊ शकलो नाही, तस संबंधाचे परस्पर संदर्भही उमगले नाहीत, नीटसे ह्यान स्वत: स्वत:ला कधीच ओलांडल नाही. इतराना मात्र ओलांडू दिलं.

वडील– रघुराम– आपला हात हातात घेऊन अंथरुणावर निपचित पडलेली आई: या सगळ्याच्या आठवणीच्या सूक्ष्म वलयात तन्मयतेनं पाहत आपण आपल्या आयुष्याची विडी वळली. यातला प्रत्येकजण प्रयोजनपूर्ण आहे. कुठूनतरी कुठेतरी जाणारी, कशाची तरी ओढ असलेली माणस. रघुरामला उभ्या गोगलगाईसारखी काळी चकचकीत का होईना, एक बायको आहे. एक पोर आहे. वडिलाच्या आयुष्यात बरेचजण खोलवर बिळे पोखरत गेले. हे जरी नसते, तरी सगळ्याचाच नाकारलेपण आहे त्यानी या जगातले किरकोळ हिशेबच नाकारलेत आणि हे नाकारण्यात ते यशस्वी झाले आहेत; पण आपल्या वाट्याला मात्र एका जुन्या, चुरडून टाकलेल्या विडीशिवाय काहीच आलं नाही !

तो अस्वस्थ–अस्वस्थ झाला. पण कुठे थांबला नाही. तसाच बेभानपणे चालत रघुरामच्या सलूनपाशी आला. पायऱ्या चढून वर आला, तर रघुराम एका गिऱ्हाईकाच्या सरबराईत मग्न. विश्वनाथ भिंतीशी, एका स्टुलावर बसला. वर भिंतीच्या मधोमध, शंकराची तसबीर होती. कोवळ्या फुलाचा हार होता. उदबत्त्याचा धूर मंद निळसर रंगात वरवर चढत विरून जात होता. इथेही स्तब्धताच होती. पण गाभाऱ्यातल्या काळोखासारखी पवित्र आणि सुभग.

रघुरामच सपेपर्यंत विश्वनाथ आरपार अज्ञातात पहात होता–वाट पहात असल्यासारखा बसून राहिला फक्त रघुरामनंही त्याच्याकडे लक्ष दिल नाही तो सथपणे आपलं काम करत होता. पूर्ण एकाग्रतेन. रगून जाऊन.

सलूनवरच रघुरामच घर होतं, दोन खणाच. लहानसच होत, पण स्वच्छ अन् आटोपशीर. भोवती ताराचं कुंपण होतं. बोगनवेल होती कर्दळ होती, अगदी कोपऱ्यात. कुठे गवत नव्हत. अमरवेल नव्हती. विहिरीतल पाणी नेहमी पारदर्शक असायच. तरीही रघुराम उगाचच दर शनिवारी कोणाकडून तरी सगळ झाडून–पुसून घ्यायचा. विहिरीच्या रहाटाला मोलकरणीन आजच दोर-बादली अडकवली होती, घराच्या– सलूनच्या फरशा व्यवस्थित धुऊन घेतल्या होत्या आणि अंगणात सडाही घातला होता. नतर परसात अगदी कोपऱ्यात बसून हातात भाकरी खाऊन ती निघून गेली होती. काऊंटरच्या आडोशाला उभ राहून विश्वनाथन हे सगळ पाहिल होतं. हे पाहताना त्याला विलक्षण कडवट–कडवट वाटून गेलं होत. जणू आपल्याकडे कोणाच तरी श्राद्ध आहे आणि समोरच जत्रेचा जल्लोष होतो आहे !

गिऱ्हाईक उठल आणि गेलं पाढऱ्याशुभ्र फडक्याला हात पुसता–पुसता रघुरामनं विश्वनाथकडे पाहून हसल्यासारखं केल. मग त्यान तेच फडक झटकल. मग तो निवांतपणे आरसे पुसू लागला

विश्वनाथन मान वाकडी करून समोरच्या आरशातल्या प्रतिबिंबाकडे निरर्थकपणे पाहिल. उदबत्त्याची वलय अस्पष्ट दिसत होती. त्यान विचारलं,

'मग ?'

रघुरामनं त्याच्याकडे विचारपूर्वक पाहिलं. पुन्हा फडकं झटकलं. विचारल,

'कशाच काय ?'

'माझे पचवीस रुपये...'

'हा ! ते !...' रघुराम गप्प झाला. आरसे पुसू लागला. दूरपर्यंत स्तब्धता पसरली विहिरीच्या पाण्याचा आपटता आवाज अस्पष्टसा विरत येत होता सुगधी फवाऱ्यात

हवा ओलावत होती. अबोलपणाचा ताण वाढत चालल्याचा विश्वनाथला जाणवलं. तो पायाच्या नखाकडे पहात, पण अतिमत: म्हणाल्यासारखं म्हणाला,

'काय करतोयस् मग ? दे आताच, जमण्यासारख असल तर.'

'हं.'

रघुराम गप्प झाला स्वत पुरत सगळं सागून झाल्यासारखा चेहरा करून आरसे पुसत राहिला. मग ज़रावेळानं तो सावकाश म्हणाला,

'किंवा असं करता येईल... पुढल्या आठवड्यात पैसे देतो मी. आता जरा गिऱ्हाईक यायला लागलय शिवाय पुढच्या आठवड्यात गोरे लोक येतील, आले तर कमाई होईल. काय ?'

विश्वनाथनं काहीच प्रतिसाद दिला नाही. होही नाही अन् नाहीही नाही पहात राहिला, फक्त समोरच्या आरशात. पुढच्या आठवड्यात म्हणजे आत्ता नाही, इतकच पण पैसे तर हवेतच. घरात हो की नाही, एवढे तादूळ आहेत, तेही संपतील आज–उद्या. शिवाय वडिलाची औषध आहेतच. त्याचा काही उपयोग आहे, असंही नाही, पण काही –काही करत राहायलाच हव. त्यातली निरर्थकता कळूनही त्यात मन पूर्ण चिणूनच गेलं आहे आपल सगळे सस्कार, भावना नेटान उलटून, प्रवाहाबरोबर भरकटत न जाता मधेच एखाद्या खोबणीत अडकून पडण्याइतकी ईर्ष्याच उरली नाही आता. ती हिरवी पानं कधीच गळून पडली ओरबडलेले आपण तेवढे उरलो आहोत आता. त्यान वेदना असह्य झाल्यासारखे डोळे मिटून घेतले जणू डोळे मिटल्यावर दिसतो, त्या काळ्या पड्यामागे तो आपला पराभव दडवतो आहे,

रघुरामन फडक झटकल. विश्वनाथन डोळे उघडले. रघुरामकडे पाहिलं, हताशपणे, थोड निषेधान अस. मग तो म्हणाला,

'पुढच्या आठवड्यात, ते ठीक आहे तुल; पण माझ काय ? ह ? गेले चार दिवस नुसता भात गिळतोय मी. डाळसुद्धा नाही; भोसडीची ! साग मग, काय करू ?'

रघुरामनं हात उडवले फडक्याची चारही टोक ततोतत जुळवून तो एका कोपऱ्यात ठेवला. मग त्यान सदऱ्याच्या खिशातून एक विडी काढली. निवातपणे पेटवली मग तो म्हणाला,

'तू असं कर : माझ्या घरी जा वर तिथून काय हव असेल, ते हिला साग. तेवढं घे नि रात्रीचा प्रश्न मिटव. उद्याचं बघू उद्या.'

रघुराम विडी फुकत मग अर्धवट डोळे मिटून झोपल्यासारखा स्टुलावर बसून राहिला. जणू त्यानं विश्वनाथला नाकारलं आहे. विश्वनाथला उठावच लागलं. उठता–उठता तो स्वत तच काही तरी पुटपुटला, असहाय्यपणे आणि वैतागान. आरशात एक वाईट शिवी दिली. मग एकदम काही तरी नवच आठवल्यासारखं करून त्यानं विचारलं,

'काय रे, हे गोरे लोक उतरतात कुठंसे गावात ?'

'जनाबाईच्या खानावळीत.' रघुराम डोळे किलकिले करून म्हणाला, 'का बर ?'

विश्वनाथन हाताच्या तळव्यान डोकं चोळलं. मग विहिरीच्या पाण्याचा आपटता आवाज ऐकला. सागाव, सागू नये, या सभ्रमात तो थोडावेळ स्तब्ध राहिला नंतर तो म्हणाला,

'तुझ्या इकडेही येतात का ?'

'ह... कधीकधी पण का ते ?'

विश्वनाथन एकवार अर्थपूर्णपणे डोळ्याची उघडमीट केली म्हणाला,

'असच. पण कुणी आलंच, तर माझ्याही दुकानात पाठव, काय ? म्हणजे माग आपण एकाला 'जहागिरी लोटा' विकला होता, तसं काहीतरी '

जुन्या काळातल्या गोष्टी छेडल्यावर रघुराम जरा ताजा, हुशार झाला उत्तेजित झाला त्याच्या सथ चेहऱ्यावर जणू पातळ साय जमली. वातावरणाला वेगळ वळण देण्यासाठी तो म्हणाला,

'खरच, काय दिवस होते, नाही ? काळजी न घेता, कसली डोक्यावर, हुदडलो; बागडलो, पावसात मनभरून भिजलो. कसला ताप नाही डोक्याला. फसवलं आणि फसलो. त्याची सर यायची नाही कशालाच नाही !'

'छे, छे मुळीच नाही '

जवानीतले दिवस विश्वनाथच्या डोळ्यापुढे नाचत आले त्याच्या अवघ्या देहावर एक कोमट थरथर उठली नाकपुड्या फुलू–मिट् लागल्या मग त्याला पुन्हा आई'या श्राद्धाच जाणवल आईचा कोरडा, हडकुळा चेहरा आठवला. 'जयराम–सीताराम ' चे गंभीर उच्चार, भक्कन पेटलेली लाकडं, रात्री–अपरात्री उठून आपल मुरकुतल शरीर हलवत, आवाज न करता, स्वत.शीच रडणारे वडील... जणू वलयं एकमेकात गुतत आहेत. जणू त्याची साखळी तयार होत आहे. जणू ती त्याच्या शरीराभोवती आवळत आहे सगळीकडे अत्ययात्रेची पावल वाजू लागली आहेत.

रघुरामन अग ताणून आळस दिला विडी विझवून खिशात टाकली. अग ढिलं सोडत निरोप दिल्यासारख तो म्हणाला,

'बघू– कोणी आल अस, तर देईन पाठवून '

विश्वनाथन मान हलवली. तो चालू लागला. चालता–चालता त्याला जाणवल, की मनातून काहीतरी वर येण्याचा प्रयत्न करतंय पण नीट उमगत नाहीये. एक विचित्र सवेदनशून्यता, बधिरपणा. जणू ही मनाची खूप लाबलेली रात्र आहे' गडद-गडद अधार या अधारात अनेक आकृत्या चमकून उठताहेत, घगधगीत डोळ्याच्या, दात विचकलेल्या. नीट दिसऱ्या, सवडीनं पाहाता आल्या, तर ओळख पटेल. पण त्याच नुसत्या चमकून विझल्यासारख्या होताहेत. दूरवरून मिरवणुकीतले ताल अस्पष्ट विरत यावेत किंवा धुक्यातन दिसाव्यात तशा धूसर आहेत. तऱ्हतऱ्हेचे भास. दूरातून, दिशाच्या बुरख्याआडून आल्यासारखी वाटणारी हाक.. कोणाची ? ओळखीची वाटते, पण तीही जाणवते आहे आणि फडफडत आभाळात मिटून जाते आहे होय खरोखरच वलयाच्या वेडया शरीरावर करकचल्या आहेत. गुदमरवून टाकत आहेत, असह्य ! पण त्याचही काही वाटेनास झाल आहे कशाचाच निषेध नाही, कशाचीच भीती नाही, ओढ नाही. हे चाललय तरी काय ?

जिना चढून तो रघुरामच्या घरापाशी आला. रघुरामची बायको कपडे वाळत घालत होती खाद्यावरचे पिळे हातात घेत होती, झटकत होती, तारेवर टाकत होती आणि त्यात मन–प्राण मौनावून गढून गेल्यासारखी दिसत होती एक लहान पोर वादलीजवळ साचलेल्या पाण्याच्या थारोळ्यात हात आपटत होत आणि खुशीत आल होत

विश्वनाथ जरा थावला मग त्यानं मोठ्यान, पण उगाचच विचारल,

'काय ? ठीक आहे सगळ ?'

रघुरामची बायको एकदम खाडकन् दचकली. जणू तिला कोणी डाग दिला आहे. स्वत तल्या स्वत.च्या त्या अवकाश–जगातून सक्तीनं ओढल्यासारखी भानावर आली आणि निषेधानं विश्वनाथकडे पाहू लागली. मग तिन भुवया एकमेकात गुंतवल्या आणि विचारलं,

'काय ?'

इतकच

पण विश्वनाथच्या लक्षात आल उच आकाशात उभं राहून ही आपल्याकडे तुच्छ तुच्छ अस पहाते आहे तो खोलवर शरमून गेला. स्वत शीच ओशाळला. मूर्खासारख त्याला क्षणभर काहीच सुचेना. तिनं पुन्हा विचारलं, 'काय ? तशी त्यानं विखुरलेल्या स्वत.च्या अस्तित्वाला शोधल. म्हणाला,

'मला भाजी हवी होती थोडी आणि डाळ. अगदी सपलीये घरातली.'

'हू' ती अनेक अर्थ प्रकट करणारं हुंकारली.

बराच वेळ मग ती उरलेले कपडे वाळत घालत राहिली. सावकाश. काळजीपूर्वक. सथसंथपणे. पुन्हा स्वत च्या दूर कुठल्याशा स्वप्नमयी प्रदेशात हरवून गेली. विश्वनाथ मात्र उभाच होता. तसाच.

सगळं सपल्यावर तिनं पदराला हात पुसले पदरानच चेहऱ्यावरचा घाम पुसला. मग तिन प्रेमळपणान आपल्या पोराच्या सावलीसारख्या केसातून हात फिरवला. त्याला उचलून घेतलं. विश्वनाथला खुणेनच थावायला सागून ती घरात गेली.

¤

पायऱ्या चढून विश्वनाथ दुकानात आला.

एका कोपऱ्यात जाऊन त्यानं बटण दाबल छतातला मद, धुरकट बल्ब पेटला. गवतातून तुरळक वारा सळसळत येत होता जमिनीवरची अस्पष्ट पिवळी चकती खालून वर सरकू लागली, हळूहळू, अशक्तपणे.

विश्वनाथन वर पाहिल. वरच्या अथाग, सथ आभाळाकडे. तर आभाळात अस्फुटसा चद्र, मद डुलणारी गवताची पाती. त्यावरही चद्रप्रकाश.

विश्वनाथ सगळ अस्तित्त्व एकाग्र करून चंद्राकडे पाहू लागला. जणू तो आतून सपूर्ण ढवळून निघतो आहे जणू त्याच्यातल्या त्या प्रचड मोझॅकची पुनर्रचना होते आहे दुसऱ्या क्षणी त्याच्यात सगळ उधळल्यासारख झाल. सगळे विचार, गुंता कुठ तरी विखरून गेला आणि तो ज्यासाठी तळमळत होता, ते साधल गेलं कशानतरी. याक्षणी निव्वळ, नि:शक होऊन, दुसऱ्याच दरडीवर पोचल्यासारख. जणू त्यान अग हलवताच, इतके दिवस गुडाळून राहिलेल वस्त्र सळसळत त्याच्या पायापाशी पडल आहे

हे अस काही जाणवलं, तशी प्रथम तो गोंधळला. नतर स्वत.वरच थक्क झाला. आपल्याला असं काही जाणवलं, यावर त्याचा विश्वास बसेना मान ताणून, तोंड किंचित् उघडं टाकून तो चद्राकडे पाहू लागला. मग जरा ओशाळला

बऱ्याच वेळानं त्याच्या लक्षात आलं, की आपण उभे आहोत, पाहत आहोत त्या चद्राकडे आणि चंद्रही आपल्याकडे पाहातो आहे भोवती वारा आणि मद प्रकाश आहे. होय, हे कसलसं अनाकलनीय स्वप्न असावं आणि ह्या सवेदनाही कुठल्याशा अज्ञात, कदाचित चद्रावरच्या प्रदेशातून उमटत असाव्यात. होय, हे असच असावं. तसंच हे आभाळ आहे तसच हे गवत आहे. हे सगळ, इतक पुरपुर, रक्तात भिनलेल आता कुठे किंचित किंचित जाणवू लागलं आहे आणि जागवूही लागल आहे ठळकपणे, इतका वेळ दूर–अस्पर्श्य असलेलं काही तरी.

तो क्षणभर तसाच उभा राहिला. भावावून. मग स्वत.वरच चिडला. मग त्यान ताडकन् चद्राला दूर फेकल आणि मग तरातरा आवेशान चालत तो मागच्या खोलीत आला.

त्याचे वडील भिंतीला पाठ टेकवून, गुडघ्याभोवती हात वेटोळून बसले होते, नेहमीसारखे. विश्वनाथन दिवा लावला. तशी खोलीभर पिवळा प्रकाश पिसारला. डोळे दिपवणारा प्रकाश धडकताच ते दचकले आणि चुण्या उमटलेल्या चेहऱ्यातल्या खोल डोळ्यानी त्याच्याकडे पाहिले. मग ते ओळखीच वाटणार सुरकुतलेलं हसले पण ते तेवढच. त्याला माहीत होत की, खिडकीच्या गजावर चिमण्या येऊन बसायच्या, तेव्हाही ते असेच हसायचे त्यान त्याच्याकडे पाहिल. पूर्ण एकाग्रतेन जणू ते चाकोरीबाहेरचं काही तरी करणार आहेत. पण ते नुसतेच अलगद स्वत:च्या अनामिक जगात गेले आणि मान हलवून विश्वनाथला विसरले.

विश्वनाथ खिडकीपाशी आला. तेच ते अफाट, रहस्यमय आभाळ. तोच क्षीणसा चद्र. तेच गवत त्याच सावल्याही

एका प्रचड अनाकलनीय काळोखात पाहाताना त्याला जाणवलं, कसलासा धूसर चेहरा आपल्यातून, खोलातून वर येतो आहे. हळूहळू आठवतो आहे, सथसथपणे. ओळख थोडीथोडी पटते आहे, पण नाव आठवत नाही. फक्त आठवतो आहे आणि धूर. पकडायला जाव, तस होतं आहे आपलं.

खिडकी लावून तो मागे वळला जरा वेळान त्यान फराफरा स्टोव्ह पेटवला त्यावर भाताचं काळसर ॲल्युमिनियमचं पातेल ठेवलं. पप मारला. मग भिंतीवरच्या काजळीकडे, थरथरत्या सावल्याकडे पाहात तो बसून राहिला

बद खिडकीमुळे खोली एकदम कुद, भरून आलेल्या आभाळासारखी झाली. उबदारही झाली. आता चावरा वारा जाणवत नव्हता. काळोख जाणवत नव्हता. फक्त अपार स्तब्धता होती, मनात अनाम विश्वास होता.

विश्वनाथनं पातेलं उतरवल दूधभात कालवला मग हाक मारली,

'बावा–'

ते निर्विकार स्थिरपणे त्याच्याकडे पाहू लागले. त्यानं समोर ताट ठेवलं. त्यांनी ते यान्त्रिकपणे उचलल. एकवार बारीक अशक्तस हसल्यासारख करून घास घोळवायला सुरुवात केली अबोलपणे. शांतपणे. चवीन.

जेवणं आटोपल्यावर विश्वनाथ घाईघाईन दुकानात आला. जणू त्याला अदृश्य गळ टाकून कुणी ओढल आहे. त्यानं शटर टाकल. नतर एका कपाटाच दार उघडून जाडजूड वही काढली. उघडली. उभ्या–आडव्या रेघा. निरनिराळ्या अक्षरात गिऱ्हाइकाची नावं–पत्ते. पानामागून पानं. त्यानं सावकाश चाळायला सुरुवात केली. सगळीच नाव परकी. अनोळखी आणि अलिप्त. शेवटी वही घेऊन तो खुर्चीवर बसला. एकेक नाव वाचत चेहरा आठवायचा प्रयत्न करू लागला. हा अमुक–तमुक. व्यवसाय करतो हा–हा. राहतो इथे–इथे. काही आठवले. इतर निष्फळपणे नजरेसमोरून सरकत गेले, क्षणभर. बरेचसे शब्दाच्या बद दारामागे लपून राहिले.

एका नावाकडे मात्र तो बराच वेळ पाहात राहिला. त्याला जाणवल, की आतून, खूप खोलातून कसलीतरी कुजबूज बुडबुड्या-सारखी उठते आहे, ती घुमत घुमत वर येते आहे आणि मनात शब्दाचा स्फोट होतो आहे. हे. हे. हेच ते. हेच ते. भाऊ बर्वे. ठेंगणे, भुर-कट केस, सोनेरी फ्रेमचा चष्मा. शकाच नको. सागलोचा वाडा, तो याचाच चिरेबदी वाडा. जाभई देत असल्यासारखी विहीर. पाणी. पाण्यात पडलेली आंब्याच्या, फण-साच्या झाडाची प्रतिबिंब आब्याच्या फाद्यात सकाळच्यावेळी हलणारं ऊन. पार त्यावरचा फाटक्या सावल्या. शेतातल्या अनेक चाहुली, रानपाखराच्या आणि रात्रीच्या पेंगुळलेल्या दुपारी दूरातून ऐकू येणारा बैलगाड्याचा रटाळ खडखडाट...होय, आपण जे शोधत होतो, ज्यासाठी अस्वस्थ होतो, ते गवसल आहे आपल्यात जस काही अलगद ओतलं गेलं आहे, चषकात ओतल्या जाणाऱ्या मद्या-सारख. आपले संदर्भ एकाएकी सजग होऊन उठले आहेत.

विश्वनाथनं वही मिटवून ठेवून दिली. दिवा मालवून तो खोलीत आला.

विश्वनाथनं वडिलाच्या खाद्याभोवतीच पांघरूण ओझरतसं नीट केल मग तो आपल्या चटईवर येऊन पडला. अस्पष्ट, संदर्भशून्य विचार मनाच्या तळापर्यंत काही पोचू शकत नाहीये सगळच पाचोळ्यासारखं वरवर जमून राहिलेल. पूर्वी काही ऐकल, वाचल की अवघ अस्तित्वच पेटून निघायच. अथाग रात्रीची सळसळ...खिडकीतून पहाटे दिसणारे परके, गूढ डोंगर ... दबलेल्या हुदक्यासारखा मावळता प्रकाश...यातूनच आयुष्य जिवत राहिल. पण आता त्याचाच पाचोळा. जणू आपण आयुष्याच्या परमा-वधीला येऊन पोचलो आहोत. जणू पुढे एक अतिम दरी आहे. अभावाची, आणि अतराळ. पण कशाचच काही वाटत नाही. मृत्यूची भीतीही नाही आणि ओढही नाही. मलाही हे वाटून गेल होतं. पण तेव्हा ते इतक धार-दार, अपरपार नव्हत. अलीकडे आवाजाचाही त्रास होऊ लागला आहे पानाच्या सळसळीचा आवाज. डोंगरावरन वारा विव्हळत येत असल्याचा आवाज. शिवाय आपणच आप-ल्यात सारख हरवत असल्याचा भ्रम. ती हाक. हे फक्त आपल्यालाच जाणवतं.... आपण विकृत तर नाही ? शोधत राहायच. चुकवत राहायच आपण लपलेल्या उत्तराना शोधत आहोत आणि चाहूल लागू नये म्हणून आपणही लपूनच आहोत ! हा लपडाव, इतकच आयुष्य !

त्याला वाटल,

या भाऊ बर्व्यांना एकदा जाऊन भेटावं आणि कोंडलेलं सगळ भडभडा मोकळ कराव. तेच काही मदत करतील. समजून घेतील... पण खरच समजून घेतील का ? कुणाला काही समजत असत का ? माणस एक-मेकाच्या नेमकी किती जवळ येऊ शकतात ? विचार...विचार थावत नाहीत. या विचा-राचा पाचोळा अस्तित्त्वावर जमू लागला आहे मनोदेहानं आपण गाडले जात आहोत. गुदमरल्यासारख होत आहे, असह्य. जणू स्वत.शी असलेला सवादच संपला. स्वगतं गोठली.

त्यानं पांघरूण स्वत.भोवती आवळून घेतलं आणि उबेच सुरक्षित घरटं निर्माण केलं. झोप समातर झालेली. मन एका प्रचड प्रश्नचिन्हावरून गरगरत राहिलेल. काळो-खाचं प्रचड विवर. प्रश्नाच्या पायऱ्या उतरून


हार्दिक शुभचिंतन !

'समृद्धीसाठी सहकार'

# श्री सुवर्ण सहकारी बँक लिमिटेड

७५९।५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे ४११ ००४.

फोन : ५४५२९, ५८१५४, ५३९२५

अन्य शाखा :

❊ जोगेश्वरी – फोन : ४४६५१९ ❊ टिळक रोड – फोन : ४४२६४८

❊ शनिवार पेठ – फोन : ४३६५८० ❊ कर्वे रोड – फोन : ४३३९६९

❊ श्रीपूर – फोन : ५७

कामाच्या वेळा :–

मुख्य कचेरी : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५–३० ते ७–३०

अन्य शाखा : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५ ते ७

बुधवार साप्ताहिक सुट्टी.

रविवारी : सकाळी ९ ते ११

सौजन्यशील सेवा म्हणजेच सुवर्णसेवा

विचार या वासलेल्या भगदाडात अदृश्य होत होते, एका पाठोपाठ एक असे. त्या विहिरीतून येणारी, रघुरामच्या सलूनमधल्या उदबत्त्याची खोल दरवळ. विश्वनाथनं त्या कभिन्न काळोखात वाकून पाहिलं. मग तो आणखी थोडा पुढे वाकला. आणखी पुढे. आणखी आणखी पुढे.

काळोखावरचा पाचोळयाचा थर पुन्हा होता. तसा जमून राहिला.

¤

एका अस्वस्थ, उलट–सुलट रात्रीनंतर विश्वनाथन ठरवल, की जावं. इथेही डोकावून पहावं. इथे पलीकडे कदाचित काहीतरी गवसाव असं वाटणार असेल कदाचित नैराश्य असेल. अनपेक्षित, अगम्य, असं काही असेल. असेना का, सदर्भविहीन प्रवास.

मुख्य प्रश्न वडिलाचाच होता. त्याना इथेही ठेवता येत नव्हत. बरोबरही नेता येत नव्हतं इथे ठेवल, तर कुणी विश्वासानं साभाळेल, याची खात्री नव्हती. कोणापाशी बोलणार? कोणीच त्याच नव्हत रघुरामला सागावं का? पण तेही तो विडीची राख झटकतच ऐकणार. दामूकाका नाही का असाच अचानक दुरावला? ही सगळी जणू वलयच एकदा आपण आईच्या चितेला अग्नी दिला ज्या देहातून जन्म घेतला, त्या देहालाच जाळल, राख केली. काल आपण दोनदा एक गूढ हाक ऐकली आणि हेही एक वलयच कोणी अनपेक्षितपणे जवळ येतं. कुणी हळूहळू, नकळत दूर जातं कुणी अकारण द्वेष करतं कुणी तितकच अकारण प्रेम करतं. कुणी काही हास नाही, भास नाही, कसली कुणकुण नाही, अशी जवळ येतात. पण नेमकी किती जवळ येतात? जवळ आलेल्यापैकी कितीशी खरोखरच जवळ आलेली असतात? जणू वलयामागून वलयं उमटत आहेत आणि विडी वाझ होते आहे

¤

पहाटे उठून त्यानं स्वत च सगळ आवरल. वडिलासमोर चहाचा कप ठेवला मग तो रघुरामकडे जायला निघाला. पायऱ्या उतरताना त्यान आठचा भोंगा, अखड घोष ऐकला. जायचं का नाही? आता नको. पैशाचं झाल्यावर ठरवू. आधी विचार करत राहायची ही घाणेरडी सवय सोडली पाहिजे. कितीदा ठरवलं त्या–त्या क्षणाच्या ऊर्मीप्रमाणे वागायचं तेच तेवढ प्रमाणिक असतं. तेच खऱ्या अर्थान फार खोलवर खरं असावं.

रघुराम पायऱ्या आणि पायऱ्यापुढच अगण झाडत होता. विश्वनाथला पाहून त्यानं नुसत्याच भुवया उचावल्या पण काही बोलला नाही झाडत राहिला. विश्वनाथला स्वत.च्या असहाय्यतेचा अपरिमित सताप आला सगळयाकडून असा सादीत चिरडला जाण्यापुरताच मी आहे की काय? मी या रघुरामसारखा यशस्वी का नाही? हा रघुराम, ह्यान बँकेकडून अठरा टक्क्याना कर्ज घेतल, गावातल्या लोकाना बावीस टक्क्यानी दिल आणि त्यातून हे सलून बाधलं नैतिकतेच्या खुळचट कल्पनानी कधी केस उपटले नाहीत ह्यान. आपण मात्र नुसतच मनगट चावत बसलो. क्षुद्र छोटं राहिलो. पण किती दिवस हे अस चालायचं? जन्मभर आसपासच्या, बरोबरीच्या माणसाच्या आकाश–आकृत्याकडे लाचारपणे पाहात रहायचं का?

आयोजिततेच्या, अपरिहार्यतेच्या खऱ्या–खोटया कल्पनेनं तो अतर्यामी करपून गेला. अस्वस्थ झाला. एकदम चिडक्यासारखा म्हणाला,

'हे बघ.'

रघुरामनं बघितल. झाडू उभा करून ठेवला मग लेंग्याच्या खिशातून रुमाल काढून तो मानेवरन खसाखसा घासला. चेहऱ्यावरून फिरवला. हात पुसले. मग रुमालाची व्यवस्थित घडी करून पुन्हा खिशात ठेवून दिला हाताची घडी घालत त्यानं विचारल.

'आज अगदी सकाळीच?'

'हं...काम आहे एक.'

यानतर विश्वनाथन स्वत.शीच शब्द जुळवले दरम्यान रघुराम हाताची घडी तशीच ठेवून त्याच्याकडे पाहात होता, भुवया एकमेकात गुतवून, थोड सशयान अस मग विश्वनाथन सागायला सुरुवात केली. रघुरामनं अज्ञातात पाहात ते सगळ ऐकलं. नीट मन लावून ऐकलं मग तो अर्धवट वैतागानं, समजावून सागितल्यासारख म्हणाला,

'छट्! अरे वेडा की खुळा तू? औं! हा कोण कुठला भाऊ बर्वे! त्यासाठी तू सागलीला जाणार! काही खर नाही बघ तुझ्या डोक्याच! आणि काय, तो इतकी वर्ष तिथेच असेल? बरं, सागली काय पाच–पंचवीस घराचं गाव आहे?' रघुराम एकदम अनिवार हसू लागला, गमतीनं, थोड उपरोधानं असं. काहीतरी हसवणार आठवल्यासारखा तो थोडा वेळ हसत राहिला. पण विश्वनाथ हसला नाही. अपमानित झाल्यासारखा रघुरामकडे पाहू लागला. रघुराम पुन्हा म्हणाला, 'वा! फारच भन्नाट आयडिया! आख्ख्या सागलीत एका भाऊ बर्व्याला शोधणार!'

विश्वनाथ त्याला थाबवत म्हणाला,

'हसण्यासारख काही नाही यात. शहरात जाऊन नुसत्या नावाच्या भांडवलावर एखाद्याला शोधत बसायला मी काही मूर्ख नाही! पत्ता आहे माझ्याकडे.'

रघुरामनं हसणं थाबवल. मग अगठयानं गाल खाजवला. मग तो विचार करत बोलला.

'असेल की, मी कुठे नाही म्हणतोय? पण मुंगीसारखी मुंगी, तीसुद्धा फार एका जागी राहत नाही. काय समजलं? मग हा तर हाडामांसाचा माणूस! बरं, अलीकडे पत्र–बित्र आलं आहे का तुला त्याचं काही?'

'नाही, पत्र नाहीच. युद्धानंतर येणंजाण वगैरे राहिलंच नव्हत. आधी मात्र खूपच देवाणघेवाण होती. पण युद्धानतर...'

रघुरामन नेमकी मान झटकली, त्याच मुद्द्याकडे निर्देश केल्यासारखी. एक अर्थपूर्ण; लावलचक 'हं ऽ' केलं, तो म्हणाला.

'मग झालं तर.'

विश्वनाथनं हाताच्या पंजान डोकं चोळलं. गवताची सळसळ, वारा ऐकला. खूप वरून एक टिटवी मनावर ओरखडा काढणारं 'टिव–टिव' ओरडत गेली कशानं तरी भिऊन दूर क्षितिजावरच्या नदीवर शुभ्र पक्ष्याचा गदारोळ उठला. तो म्हणाला,

'मग झाल तर... इतक सोपय का ते? इथ गळयाला तात लागायची वेळ आली साल, कुणी समजूनच घेत नाही! आता मी असं करतो, दुकानासकट सगळ जाळतो आणि फाशी जातो! तेच राहिलंय आता!

रघुरामन सुस्कारा सोडला. निष्फळपणे हात उडवले. जरा वेळ तो वरच्या आभाळा-

कडे, सरकणाऱ्या पक्ष्याकडे पाहात राहिला. मग म्हणाला,

'असं काही बोललं की झाल का ? हं ? झाल का ? मी जे काही सागतो, ते तुझ्या तोटचाच सागतो कधी ? आहे का असं काही ? माणसानं आपल-आपलच बघायचं असत आता माझे गुडघे रोज इतके दुखतात. मी कुठ तक्रार करायची ? आहे जागा ? हे सगळं सवय होण्यावर असत. सवय व्हावी लागते सुरक्षित वाटून घेण्याची. कुठलं सुरक्षित-जिण्याइतकं असुरक्षित दुसर काही नाही. काय समजलास ?'

विश्वनाथ गप्पच राहिला. दूरवरच्या शुभ्र पक्ष्यांकडे पाहू लागला. खरं तर त्याला हे सगळं माहीत होतं. त्याला स्वत:चीच विलक्षण चीड आली मनातली ती चिरंतन तार तांबडीभडक झाली. पेटून. त्याचा प्रकाश सबध डोक्यात घुमू लागला. डोळ्यातून पाझरू लागला. ओढघासारखा. तांबडा-तावडा प्रकाश, त्यापलीकडचा अंधारही तावडाच. पण तो परमावधीच्या सहनशीलतेनं फक्त म्हणाला,

'ते काही असो. मी जाणारच. पत्र नसेना का अलीकडे, पूर्वी आमचे मित्र होते ते. चांगला घरोबा होता. नक्की मदत करतील बघ ते. अगदी वाया जाणार नाही. तेवढ करून बघायच, नाही तर सरळ परत यायचं ठरवूनच राहिलोय मी'

'हं ? आणि काकाच काय ?'

'त्यांच काय ? सकाळच जेवण ठेवीन त्याच्यासमोर. तेवढं आपणहून घेऊन खातात ते. रात्री शक्य झालं, तर ठीकच आहे.'

रघुरामनं खिशातून किल्ल्याचा जुडगा काढला. कुलूप उघडल. दार उघडता-उघडता त्यान विचारलं,

'निघणार कधी तू ? उद्या ?'

'नाही, आजच जाईन म्हणतो आता कुठ आठ वाजलेत. लवकर आवरून निघेन आणि रात्रीच्या गाडीनं परतेन. नाहीच जमलं तर उद्या सकाळी.'

रघुरामन उदबत्त्या लावल्या. सुगधी रगाचा धूर दोघाभोवती तरळू लागला, हवा त्यानं भरून गेली. कुठूनसा एक पक्षी हाक मारल्यासारखा ओरडत गेला. डोगरावरनं अचानक भरमसाट वारा घसरू लागला आणि पाचोळा विखुरला. रघुरामनं आरपार एक वाईट शिवी दिली मग असहाय्य झाल्यासारखी विडी पेटवली, नाईलाजानं टोकाचं निरीक्षण करत विचारल,

'आणि माझ्याकडून काय हव तुला ? ते पंचवीस रुपये हवे असतील.'

'हं.'

रघुरामन कृत्रिमसुद्धा कसली हालचाल केली नाही, विडीच्या टोकाकडे पाहात राहिला तसाच. मग थोडा वेळ पांढऱ्या छतात पारदर्शक पहात राहिला. मग जरा त्रासिकपणे म्हणाला,

'पंचवीस इतके काही नाहीत माझ्याकडे. पंधराच्या एवढे असतील. बघ चालतील का. पुरवून वापरलेस तर पुरतील. काय ?'

'दे काय असतील ते.'

रघुरामनं एकदम काही हालचाल केली नाही. धुराची वलयं जरा रेंगाळू दिली. त्या वलयात पाहात राहिला, तन्मयतेनं. नतर त्यानं थोटुक दुकानाबाहेर भिरकावलं. सदऱ्याच्या आतल्या कुठल्या तरी खिशात सराईतपणे लपवलेल्या नोटा काढल्या. त्या विश्वनाथसमोर टाकत तो अलिप्तपणे म्हणाला,

'बघ किती भरतात.'

विश्वनाथनं नोटांची काळजीपूर्वक घडी केली. खिशात ठेवली. मग तो इतकंच म्हणाला,

'निघतो.'

हिरवी अडगळ ओलाडून तो दुकानात आला. शटर टाकलं. तशी आकाश हळूहळू मिटत गेलं. जसे मनातले विचार. आत आल्यावर त्यान एकेक काम आटपायला सुरुवात केली. आदल्या दिवशीचा उरलेला भात कालवून कॉटसमोर ठेवला. खिडकी उघडली. इकडे-तिकडे काही तुरळक-तुरळक केलं आणि हाताभोवती एक लहान कापडी पिशवी गुडाळून तो खोलीबाहेर आला. दार ओढलं. अनेक वर्षं न हलवल्यामुळे वर मातीची आणि वाळवीचीही एक अनिर्बंध रेषा तयार झाली होती. हिसका बसल्यावर ती लपालपा खाली पडली. इतक्या दिवसांचा अस्पर्शितपणा घरंगळल्यासारखा.

तो मुख्य रस्त्यावर आला, तेव्हा सूर्य क्षितिजाच्या हातभर वर आला होता. हळूहळू चटके बसू लागले होते. रस्त्यावर नजर खिळवून तो चट्‌चट् चालू लागला. पण नाही म्हटलं, तरी तो जरा गोंधळला होता. जणू तो एखाद्या अधाऱ्या गुहेतून अचानक पटागणावर आला आहे, प्रकाशानं फुललेल्या. जवळपास तीन-एक वर्षांत, वडिलांचा आजार बळावल्यापासून तो घर आणि रघुरामचं दुकान, यापलीकडे फिरकलाच नव्हता. दरम्यान गावात अनेक बदल झाले होते. गाव तर उरलच नव्हतं. जणू रागतं मूल प्रौढ झालं आहे. रघुरामच्या पलीकडे पूर्वी बेहेऱ्याचा डळमळता वाडा होता. एकमजलीच, पण रुंद. अगणात दोन मोठाली आंब्याची झाडं होती. माळ्याची काठी चुकवत तिथनं कैऱ्या पळवण्याची जणू प्रथाच पडली होती, विश्वनाथच्या लहानपणापासून. पुढे बेहेरे वारले, तेव्हा ती झाड तोडून विकली गेली. अंगण सताड झालं. वाडा सुन्न-भकास होऊन गेला. आता तर वाडाही गेला. त्याजागी, वाड्याच्या कबरीसारखी वाटणारी पाढरी, चार मजली इमारत उभी होती. नतर तिकडे माईंची खानावळ होती. सबोधनात खानावळ, पण प्रत्यक्षात एकाच घरात पंगत बसल्यासारखी. आता काऊंटरवर कुणी जनाबाई उभी होती आणि समोरच्या किडकिडीत नोकरावरचं आकाश व्यापत काहीतरी बजावत होती, धंदेवाईक सथपणानं. आसपास कापडदुकानं, डाबरी रस्ता, किरमिजी प्रकाशाचे दिवे होतेच. सकाळ झाली तरी रस्त्यावर अतराअंतरानं पसाभर प्रकाश सांडला होता. जणू तो रेशमी घडीवरून चालतो आहे.

जरा वेळानं तो बसस्टँडपाशी आला. खऱ्या अर्थानं बसस्टँड असा नव्हताच. अंतराअतरानं काही खावावर पिवळ्या पाट्या अडकवल्या होत्या. त्यामागे कट्टा होता. निळा गुलमोहोर होता. त्याच्या फुलाचं लहानसं तळ साचून राहिलं होतं. कट्ट्यावर काहीजण बसले होते केवळ, अज्ञातात पाहात. वाट पाहात. विश्वनाथला जागा करून देत मग एकानं विचारल,

'कसं काय ? ठीक ?'

'ठीकच.'

'मधूकाका ?...'

'ठीक आहेत.'

'कुठं आज ?'

'सागलीला. काम आहे.'

मग दोघही गप्प झाले इतराच्या नजरा त्याच्यावर जरा वेळ स्थिरावून राहिल्या. त्या इतक्या व्यापक होऊन त्याच्याजवळ येत होत्या, की तो अस्वस्थ–अस्वस्थ झाला. अंग चोरून, बारकं होऊन स्वत.तच बसून राहिला. त्याला विलक्षण कोदल्यासारख झालं. क्षुद्र, लहान झाल्यासारखं. सताप आला. होय, मी जातोय बाहेरगावी, वडिलाना एकट ठेवून ! तुमची परवानगी किंवा सहानुभूती नकोय मला. तुमच्या पैशान जात नाहीये मी. हलकट साले ! टोच्या मारायला टपलेले कावळे ! मरा लेको ! विचारत कोण खेटर तुम्हाला ? मरा !

बऱ्याच वेळान बस आली. गदारोळ झाला.

¤

भाऊ वर्ध्यांचा पत्ता त्याच्यापाशी होता. घर मात्र काही केल्या सापडेना. अनेक रस्ते हिंडून शेवटी तो एका गुऱ्हाळात आला. बाकड्यावर बसला. रस मागवला. दरम्यान रुमालान मान, चेहरा खसखसा पुसला. मग तोही अतर्मुख, एखाद ओझं तात्पुरतं दूर ठेवल्यासारखा सैलसर बसला. बसून राहिला.

आणि काही हास नाही, भास नाही, अतर्यामी कसली कुणकुण नाही, असं त्याला एकाएकी घरच आठवायला लागलं. जणू घर म्हणजे काय, हे त्याला नव्यानंच उमगतं आहे. दुकान. दुकानामागची खोली. काजोळलेल्या भिंती. वडील. तिथं आपलं घर आहे. मनान अपगसे वडील आहेत. ऊसाचा रस पिता पिता त्याला पूर्वीच आठवू लागळं, अकारण. पहिल्यादा सगळा उत्साह भरून जेव्हा तो उभा राहिला होता घर चालवायचं, कुठेही उणीव भासू द्यायची नाही, वडिलाना पुन्हा उभं करायचं. एक हेतू होता, ध्येयवाद घेऊन जगल्यासारखं. मग दिवस जात राहिले. वडिलाना मनच उरलेलं नाही, हेही तो विसरून गेला, रहदारीच्या रस्त्यान रोज ये–जा करत असल्यासारखं. दोघाच आयुष्य आखीव–रेखीव होऊन गेल. आपापल्या भूमिका ठरून गेल्या. कुणाचेच कुणाशी संदर्भ नाहीत. भूमिकाच म्हटल्यावर ती वठवण्यापलीकडे काही उरलच नाही.

वडिलाचं जग सगळ्यापासून निराळ होतं, देठ खुडल्यासारख अलिप्त. शब्द, स्वर नसूनही यापैकी कशाची गरज नसल्यासारखं. लाववरच आणि पलीकडच. मग दोघानी विलक्षण समजसपणा दाखवला. तोही अबोलपणेच. एकमेकाचे संदर्भ एकमेकाच्या आयुष्यात येऊ द्यायचे नाहीत.

कुठूनसा वारा आला आणि शेजारच्या गुलमोहोराची रक्तलाल फुलं अचानक बेसुमार गळू लागली. टेबलावर पडली. ग्लासात पडली. आसपास त्यानी रगून गेला. तरी तो हलला नाही, डुलला नाही, ग्लासातल्या रसात एक अगदी लहानस फूल हळूहळू गिरक्या घेत होत. पण तो दुर्लक्ष करून प्रीत राहिला.

आणि त्यानंतरची इतकी वर्षं ? पहिल्यादा वडिलाबद्दल सहानुभूती, कीव, अस काहीतरी फोलकट वाटण्याचे दिवस. मग राग. मग स्वत.चीच चीड. मग शेवटी अटळ ते स्वीकारताना येतो, तो हताशपणा. आता यापलीकडे काय आहे, नेहमी वाटायचं. कान जीभ याची कसलीही साक्ष नसलेली दरी... प्रश्न आणि उत्तरही. वडिलाचाच राग यायला लागला. त्याच आरपार पाहाणं, निरर्थक हसण सहन होईनास झालं. टाळावसं वाटूनही टाळता येईना. ओशाळं–ओशाळं वाटायला लागल. एक अनाम खेद कुरतडायला लागला. इथे सपूर्ण वेगळं वाटत होतं. पाचोळ्यावरच एक फार हवस जग. भिंतीवरची काजळी, वडिलाचा असह्य सहवास, रिकामी कपाट, गवत, सगळ्यापासून अलिप्तस. वडिलाचा आजार बरा होण्यासारखा नाही, निदान त्यावरचे उपचार आपल्याला परवडण्यासारखे नाहीत, हे त्याला कळून चुकलं. जणू दोघामधले सगळे धागेच तुटले आहेत. एक दूरवरचं, दुर्बोध जग. एक पलीकडचे वडील. त्याना इथल्या नेहमीच्या वेदनाशी काही कर्तव्य नाही. जणू ते एकच अखड, अतिम वेदना अनुभवत आहेत. सगळं लहान होऊन जाव, इतके दिवस न जाणवलेलं अस्पर्श्य जग एकदम अगावर चालून याव.

कदाचित तोच वडिलाना समजून घेऊ शकला असता. पण प्रवेशणच नको झाल. मग त्यान अनेक भिंती, अडसर मुद्दाम रचले. यात खेद करण्यासारखं काही नसावंही, पण एक खत त्याच्या अस्तित्वाची मुळ कुरतडायला लागली. मूलभूत प्रश्न पडायला लागले. सगळच असह्यपणे नकोस झालं. जणू हे उत्तर–आयुष्य त्याच नव्हेच. हे दूर कुठल्याशा वेदनामयी प्रदेशातून फडफडत येऊन त्याच्यावर पंख मिटून स्थिरावलं आहे.

गुलमोहोराची फुल फारच गळू लागली. रस सपवून तो उठला. गुऱ्हाळासमोरचा परिसर जखम झाल्यासारखा दिसत होता. पलीकडे खुर्चीवर बसून मालक काऊंटरवर पडलेली फुल टिचकीन उडवत होता.

विश्वनाथन आठ आणे काऊंटरवर टाकले. जरावेळ तो मान ताणून वर पहात राहिला. वरच्या प्रचड, भव्य गुलमोहोराकडे. मग त्यान विचारलं,

'हा पत्ता माहीत आहे ?'

त्यानं एक कागद ठेवला, मालकासमोर. मालकान तो उचलला. उलट–सुलट निरखला. वाचला त्याच्याकडे न पाहाता विचारल,

'कुठचे तुम्ही ?'

'हरिपूर.'

'हं'

'खूप वर्षं झाली सांगलीत येऊन गेल्याला. आता पूर्वीच काही उरलं नाही. बराच वेळ हिंडलो, शेवटी टेकलो इथे येऊन म्हटलं इथच राहाणाऱ्याला विचाराव.'

'चागल केलत. नाही, म्हणजे खरच चागल केलत इतक्या वर्षांनतर, गावाचं शहर झालेल्या ठिकाणी कुठं सापडतोय असा पत्ता. कळत नाही पण हे लोकाना. येतात, स्वतःला शहाणे समजतात आणि शेवटी पोचतात जाऊन नरसोबाच्या वाडीत' आपल्या बोलण्यावर आणि विनोदावर मालक अतिशय खुश झाला. आत्मसतुष्टतेनं हसला. त्याला वाईट वाटू नये म्हणून विश्वनाथही हसला, नादशून्य. मग तो म्हणाला,

'जवळपासच आहे का हे ?'

'थोडंफार. इथून असच अगदी सरळ जा. काय ? एकदा डावीकडे, एकदा उजवीकडे, मग पुन्हा थोड सरळ. मैलभर तरी आहे. चट्चट् जा. दुपारी जाळ पेटतो, उन्हाचा.'

¤

विश्वनाथ वाड्याजवळ आला, तेव्हा दुपार होत आलेली. दिवस पेटू लागलेला. अकरा वाजले असावेत.

फाटक ढकलून तो आत आला. वाड्यात काही फरक नव्हता. तो तसाच चिरेबदी

उभा होता. आब्याची, फणसाची झाड होती. झालच, तर विहीर होती. एक वृद्धसा माणूस बेलाच्या झाडाची पाने खुडत होता. पूर्ण एकाग्रतेन लयदारपणे.

विश्वनाथच अस्तित्व त्या माणसाला जाणवलं असावं. तो चाचपडत–चाचपडत मागे वळला. एका हातात बेलाची पान गच्च धरून दुसऱ्या हातान हवा चाचपू लागला. 'कोण...कोण' करू लागला.

विश्वनाथच्या एकदम लक्षात आलं. तो खाली वाकला जमिनीवर पडलेली काठी त्यानं त्या माणसाला उचलून दिली. एकमेकाच्यातलं वातावरण जरा स्थिर होऊ दिलं. शातता निर्माण होऊ दिली. मग तो म्हणाला,

'मी विश्वनाथ मधुकाकाचा मुलगा. भाऊ बर्वे– आमच्या घराचे जुने मित्र. त्याना भेटायच होत.'

त्या वृद्धानं काठी घेतली. बेलाची पान आणखीनच गच्च धरली जरा वेळ स्तब्ध राहिला, काचेचे डोळे दूर क्षितिजापलीकडे स्थिरावून. मग मरगळलेल्या, म्हाताऱ्या आवाजात म्हणाला,

'मी भाऊ बर्वे.'

विश्वनाथला प्रचंड धक्का बसला. एक असीम पोकळी उतरून आली, अतर्यामी. शब्द सुचेनासे झाले आत–बाहेर काळोख जाणवू लागला. जणू अस्तित्वाचा हेतूच गळून पडला आहे.

भाऊ बर्व्यांना तो गप्प झालेला जाणवला. वातावरणातली अवाक् स्तब्धता त्यानी थोडा वेळ तशीच राहू दिली. डोळे सोडून अवघ्या देहान सताड काही–काही जाणवत राहिले. त्याच्या निर्जीव डोळ्यात एक जखमी भाव आला आणि खतावल्यासारखे दिसू लागले. नंतर ते म्हणाले,

'ऊन चढलंय आत जायला हवं.'

इतकच

मग ते वळले. चालू लागले. खेचल्यासारखा विश्वनाथही चालू लागला. चालता चालता तो आणखीनच करुण झाला. भाऊच्या पाठमोऱ्या कृश आकृतीकडे पाहू लागला. खिन्न–विदीर्ण असं. त्याला पूर्वीचे भाऊ आठवले–जाणवले. घराशी इतके जुळून गेलेले. जेवणानतर पत्त्याचा अड्डा, त्याचाही कटाळा आला, की गप्पा अगदी पहाटेपर्यंत. अंधार कसा सरला, क्वचितच समजायचं. कधी ते पोराच्या गराड्यात गोष्ट सागायचे. पण ती राजे–राण्याची, महालांची नसायची. डेझरटेड व्हिलेज, लॉस्ट होरायझन, उष:काल, याची ती कथानकं असायची. म्हणजे त्यातले रहस्य–घोडदौड मुलांसाठी होती. अर्थ त्याच्या स्वत:साठी होता. त्याची थरथर, लवलव पिताना रात्र सपायची. पहाट व्हायची. सहा वाजता भाऊ न चुकता पूजेला बसायचे. देव्हाऱ्यासमोर सगळा सरंजाम. हात जोडलेले; मस्तक नम्र झुकलेल, मन–प्राण मौनावलेले. जणू त्याच्यातून गूढ अस काही प्रकाशित होतं आहे...पानावर पिवळ्या पडले भिक्षापात्र...अँड सॉरो, गिल्ट अँड पेन बाय टर्न्स डिस्मेड...लाँग ट्रँक्विलिटिज ड्युरिंग विच यु विल ऑब्झर्व्ह अ सनसेट अँज मेन इन द आऊटर वर्ल्ड हिअर द स्ट्राय किंग ऑफ अ क्लॉक... हा देह तुझा–पण देहातील तू कोण... तत्त्ववेत्ता राजाला म्हणाला, 'सुखी माणसाचा अगरखा शोध शोधत रहा...'

दगडी, मोठ्या पायऱ्या ओलाडून तो दिंडी दरवाज्यातून आत आला आणि एकदम फार जुने वास, आवाज त्याच्यावर घरंगळत आले. हे सगळ. रक्तात भिनलेलं इतकं पुरंपुरं. कसं विसरलो होतो आपण? त्या रुंद वाड्याच्या चौकात तो उभा होता. भोवती सगळीकडे एकटेपणाची अडगळ साचलेल्या खोल्या–मागून खोल्या. किती वर्षं! त्याला एकदम लहान झाल्यासारखं वाटलं. अडगळीची खोली आवरताना आईच्या साडीचा जुना बोळा मिळावा. सगळी मीपणाची जाणीवच त्यात विरघळल्यासारखी.

चौकात एका खाबाला टेकून तो उभा राहिला. शरीरातून आतआतून कसल्यातरी ऊर्मी उसळून पसरत होत्या. इथे खेळलेलं–शिकलेल–ऐकलेल आठवलं. फार वर्षांपूर्वी इथून परतताना विहिरीत टाकलेल कर्दळीचं फूल, लालभडक. पाण्यावर उठलेले दोन तरंग जणू अजूनही जाणवतायत्, इथे–तिथे, आयुष्यात घुमतायत आणि इतर काहीच ऐकू येत नाही आता.

भाऊ एकटेच थोडं पुढे चालत गेले मग थावले. मग स्वयंपाकघराकडे तोंड करून ओरडले

'अहो–पहा कोण आलंय...'

आक्का पदरान धाम पुसत बाहेर आल्या. विश्वनाथला त्या विरलेल्या जीर्णशा वाटल्या पण चेहरा पधरा वर्षांपूर्वीचाच उत्साही होता. चौकाच्या मधोमध येऊन त्यानी विश्वनाथकडे निरखून पाहिलं. पाहातच राहिल्या. कितीतरी वेळ. मग त्याच्या डोळ्यांत चद्रोदय झाला. कसल्यातरी विलक्षण आनदान चेहरा उजळून गेला. त्या निथळणाऱ्या स्वरात म्हणाल्या.

'विसू... विसूच ना?' त्यांचा चेहरा मृदू झाला. दवात भिजलेल्या मोगऱ्यासारखा दिसू लागला. त्याला संपूर्ण न्याहाळत त्यानी विचारलं.

'नि मधुकाका नाही आले? बरे आहेत ना?'

विश्वनाथ चपापला. स्वत:शीच शरमून गेला. मग चाचरत–चाचरत म्हणाला.

'नाही–म्हणजे घरीच ठेवाव लागलं त्याना तुम्हाला काहीच माहीत नाही, नाही का? केव्हातरी सविस्तर सांगीन. एक मनाचा आजार...म्हणजे आठवण पार गेलीये त्याची.'

'काय सांगतोस?'

तिघेही खिन्नसे उभे राहिले, काही वेळ, नि शब्दपणे. जणू बोलण्यासारखं काही उरलेलच नाही. अशब्दातूनही सगळ जाणवतं. त्याला भयानक गुदमरल्यासारखं झालं. वाटलं, बागेच फाटक उघडून धूम पळत सुटावं. गर्दीत विरघळून जाव. जीवघेणा पाठलाग टाळल्यासारख वाटेल.

आक्का किंचित हलल्या. स्तब्ध–शांततेत त्यांची हालचाल तिघापर्यंत पोहोचली. त्या मग विषण्णपणे म्हणाल्या.

'कोणाला काय होईल, याचा काही नेमच नाही हल्ली'

दोघानी एकमेकांकडे पाहिलं. भाऊकडे पाहिल. भाऊना ते जाणवलं असाव. अंग आकसून घेत, अवघडत ते इतकंच म्हणाले,

'हो ना.'

पुन्हा तिघे नुसते उभे राहिले जरा वेळानं आक्काच म्हणाल्या.

'तू बैस बैठकीत आधी हातपाय धुवून घे न्हाणीत. मी चहा टाकते'

हातपाय धुवून विश्वनाथ भाऊच्या मागोमाग बैठकीत आला खिडक्यांवरच्या पातळ

पडद्यांतून ऊन गाळून खोलीभर पसरलं होतं. सगळीकडे ऊन होतंच पण इथे गाभाऱ्यातल्या काळोखासारखं निर्मळ आणि सुभग. गधगार आणि मदसर.

'बस...बस.' भाऊ म्हणाले.

विश्वनाथ बसला. त्याला एकाएकी सुखद शांत वाटलं. घर, जबाबदारी, वडील, सगळंच खूप कुठेतरी मागे ठेवून आल्यासारखं. इथली–तिथली बंधनं, ओझी फक्त ऋणाच्या पायरीवर मापून स्वीकारली जातात. मनात आणलं तर हे कोणीही नाकारू शकतं. कोणीही. अगदी त्याच्यासारख्या चिरडलेला, पराभूत माणूससुद्धा. पण चिरडलेला, पराभूत हे परस्पर-सबंधातले संदर्भच आहेत शेवटी. आणि सगळे सदर्भच जर तो मागे सोडून आला होता, तर तुलना करण्याजोगं काही उरलंच नाही. आता भ्यायचं कशाला? तो अगदी आतआतून निर्मळ, शुद्ध झाला आहे जणू

'किती वर्षं झाली, नाही?' तो म्हणाला, 'इथेच मी पहिल्यादा रामरक्षा शिकलो होतो. खोली अजून तश्शीच आहे काही फरक नाही.'

'हं–आठवतं मला.'

'प्राजक्ता दिसत नाही कुठं?'

'छे एवढ्यात कुठली ती घरी यायला. नोकरी करते हल्ली. पाच–साडेपाचला येईल. चहा आला वाटत... घे, चहा घे.'

विश्वनाथनं तत्परतेन उठून आक्काच्या हातून चहा घेतला. भाऊनाही दिला. मग चहा पिता–पिता विचारल,

भाऊ एकदम काही बोलले नाहीत. चवीचवीन चहा पीत राहिले, तन्मयतेन. मग जरा ओढलेल्या स्वरात म्हणाले,

'काय करणार? युद्ध जाताना डोळेही बरोबर घेऊन गेल, कुठ जाणं–येण, भेटणं सगळच सपल. कित्येक वर्षांत रस्त्यानं चाललो नाहीये मी. तुमचं गाव तर कोण लाव. कसा येणार? काही खर नाही! आपल्या हातात काहीही नसत. स्वत बद्दलच घडत असताना सिनेमा पाहिल्यासारख पाहात रहायच नुसत.'

'खरय.'

भाऊनी चहा सपवला. कप आक्काकडे दिला. मग काठीच्या मुठीवर दोन्ही हात दाबून ते बसून राहिले. विश्वनाथनही चहा सपवला. आक्काकडे पाहिलं. कप ठेवला, टीपॉयवर. आक्कांनी कप ठेवला. पुन्हा कोणाला शब्द सुचेनात. वातावरणात एक अनाम ओझ जाणवू लागलं. जणू शब्दांचे विषयच सपले. काही बोलायच नाही, विचारायच नाही. जणू संवाद तुटला.

अज्ञातात पहात तिघे गप्पसे बसून होते, बराच वेळ. मग काही तरी आठवल्यासारखा चेहरा करून भाऊनी विचारलं,

'दुकान कसं काय चाललंय? झुवड उडत असेल.'

विश्वनाथ एकदम खाडकन् चमकला. त्याला वाऱ्यानं हलणारी पिवळट प्रकाशाची चकती आठवली. रिकामी कपाटं आठवली. पुन्हा एक पोकळी जाणवू लागली, आतआतून जणू वारुळ कोसळवून किडे–मुग्या आधळेपणानं धावताहेत. तो पार खोल गेला. पण अनिच्छा परतवीत खोट्या मनमोकळेपणानं म्हणाला,

'अगदी पूर्वीसारखी नाही. पण गर्दी असतेच. मदतीला कोणी नाही. त्यामुळे व्याप फार. हिशेबांचं वगैरे बघायचं असतंच. उसत नाही–तरी आलोच आज ठरवून. म्हटलं जाऊन पाहायचं, तुम्ही जागा बदलली वगैरे असलीत, तर सरळ परत यायच.

भाऊनी सुन्नपणे मान हलवली. सरळ समोर पहात म्हणाले,

'या सगळ्या गदारोळात एकच गोष्ट चांगली झाली. मी ज्या अनेक अँटिक्स जमवल्या होत्या, त्याला दिल्लीच्या प्रदर्शनात पारितोषिक मिळालं अँटिक्स म्हणजे पुष्कळ जुनी जुनी चित्रं आहेत सगळी. राजा रविवर्मा वगैरे. छदाचा फायदा झाला म्हणायचा. तर काय सागत होतो, त्यातली बरीचशी चित्र मी तुमच्याच दुकानात विकत घेतली होती. एक–दोन तर क्लासिक्स निघाली. आज सध्याकाळी तू पाहशील का हे कलेक्शन?'

विश्वनाथ काही बोलणार, इतक्यात आक्का मध्येच म्हणाल्या,

'पाहील हो, पाहील तो. आत्ताच तर आलाय प्रवासातून. त्याला जरा जेवू दे, सध्याकाळी फिरून बिरून येऊ दे. मग सावकाश दाखवता येईल, काय दाखवायचय ते.'

'हो, रात्रीच, आता नव्हेच.' भाऊ जरा त्रासिकपणे म्हणाले.

'आता जेवणाला बसू. बारा वाजले असावेत.' आक्का उठत म्हणाल्या.

भाऊंनी उगाचच मान हलवली, श्रांतपणे आणि म्हणाले,

'तुम्ही बसा. प्राजक्ता मधल्या वेळेत येईल, तेव्हा बसेन मी. चहाही झालाच आहे आत्ता.'

त्यानी खुर्चीच्या पाठीवर डोकं टेकलं. डोळे मिटले. दोघ बाहेर आली. न बोलता चौक पार करू लागली. चालता–चालता आक्कानी एकवार त्याच्याकडे पाहिलं. त्याना काही बोलायच असावं, पण बोलल्या नाहीत. चालत राहिल्या तशाच.

दोघ स्वयपाकघरात आली. पाट माडताना आक्का दवलेल्या आवाजात म्हणाल्या,

'सध्याकाळी तू आणि प्राजक्ता नदीवर जा, काय? तुला महत्त्वाच काहीतरी सागायचय पण ह्याच्यासमोर नाही. तुझी हरकत नाही ना?'

'छे छे, मुळीच नाही.'

तो स्वत.वरच थक्क झाला, पण निमूटपणे जेवत होता.

आक्का म्हणाल्या, 'आत्ता काही विचारू नकोस. प्राजक्ताच सागेल.'

'ठीक आहे.'

जेवण सपवून तो चौकात आला, तर ऊन चागलंच चढलेल उग्र, कठोर झालेल. चौक चट्चट् पार करून तो वैठकीत आला. भाऊना तो जाणवला. त्यानी विचारलं.

'झाल जेवण?'

'हो.'

त्यानी स्वत.शीच मान हलवली. विश्वनाथ म्हणाला,

'जरा पडावं म्हणतो. चटई आहे एखादी?'

भाऊ उठले. सावकाश सावकाश चालत एका कपाटापाशी आले दार उघडले एक चादर विश्वनाथला देत म्हणाले.

'मग दिवाणावरच पड की ही चादर घे, हवी तर कुणीसुद्धा येणार नाही इथ.'

नतर पडल्या–पडल्या तो प्राजक्ताला सपूर्ण डोळ्यासमोर उमटवण्याचा प्रयत्न करू लागला खिडकीतून वारा आला. हलकाच आणि पडद्यावरची घुगर मदपणे रवत शीच किणकिणू लागली. हसू लागली. काय सागत

असतील हे चांदीचे स्वर? काय गात असतील? इथे संपून, तुटून गेलेल्या आयुष्यांची गाणी? दुःखात गुदमरलेली त्यांची तकलुपी सुखं? कशासाठी हे स्वतःशीच हसणं? हसायला लावण्याइतकी अंतिम दुःखं घडून गेली आहेत इथे?

बैलगाड्यांचा कंटाळवाणा खडखडाट ऐकत त्याला कधीतरी झोप लागली.

¤

ऊन विरळ– विरळ, मंद होत चाललं होतं.

दोघं निःशब्दपणे चालत होती, परकेपणे. कृष्णा नदी जवळ येऊ लागली, तसतसा वारा थंडगार, ओलसर होत चालला. त्या भरारत्या वाऱ्यानं कसल्यातरी ऊर्मी शरीरभर पसरल्यासारख्या वाटत होत्या. एक प्रकारचं स्फुरण चढल्याचं जाणवत होतं. येऊ दे. आणखी वाटेल तितक्या भिंती, मर्यादा आडव्या येऊ देत. त्यांना आडवं येऊनच पाहू दे. सगळ्यांना कोसळवून तो निव्वळ निःशंक नग्न निघून जाईल.

नदीवरच्या वाऱ्यानं केस भुरभुरत होते. डोळे मजेदारपणे चुरचुरत होते. आपण जगतोहोत. पुन्हा या क्षणी. आपण सगळं समजून राहिलोय आणि ह्या समजण्यात–उमजण्यात आपण यशस्वी झालोय. इतके दिवस जे काही सांगितलं जात होतं, ते हळूहळू पोहोचू लागलंय, आतपर्यंत सगळंच. नाही; पण किंचित–किंचित काहीतरी जाणवतंय.

नदीकाठी तो उभा राहिला. त्याचं अवघं शरीर स्वतःच एक चिंतन झाल्यासारखं स्तब्ध होतं. त्याच्या स्तब्धतेत कारुण्यच अधिक होतं. व्यथा होती.

विझणारा प्रकाश पाण्यावर पसरला होता. पाणी तलवारीच्या पात्यासारखं चमकत होतं. नदीपर्यंत दगडी पायऱ्या उतरत गेल्या होत्या. काही पाण्याखाली बुडाल्या होत्या. थरथरत्या, अस्पष्टशा दिसत होत्या. त्या बाजूला रुंद कठडा होता. तो हलला. सावकाश कठड्यावर बसला. नदीच्या समोर प्राजक्ता बसली. दोघं समोरासमोर बसून राहिले. दुरात–अलिप्त असे. भोवताली निवांत संध्याकाळ होती. गर्दीचा शब्द दूर मागे राहिला होता. इथे फक्त नदीवरून वाहणाऱ्या वाळक्या काटक्या-पानं होती आणि सुकलेले गजरे होते.

'कसा वाटला परिसर?' प्राजक्तानं विचारलं.

'शांत आहे. गजबजाटापासून लांब बरं वाटतं.'

तिनं लहान–लहान खडे पाण्यात मारायला सुरुवात केली. थरकत उठणाऱ्या लहरी निरखू लागली. मग म्हणाली,

'मला आवडतं इथं फिरायला यायला. रोज पहाटे यायची मी पूर्वी–पूर्वी. आता नाहीच जमत, ठरवलं तरी.'

तिचा शेवटचा खडा उंच उडाला आणि पाण्यात नाहिसा झाला. मग तिनं उदास डोळ्यांनी विश्वनाथकडे पाहिलं, चेहरा उचलून. मग पाण्यात आरपार पाहिलं. तशीच पहात ती एकदम म्हणाली.

'आपण इथे का आलो आहोत, याची आईनं काही कल्पना दिली?'

'नाही.'

तिनं अस्वस्थपणे दगडाच्या फटीत साचलेल्या शेवाळावरून रेघोट्या ओढायला सुरुवात केली. बराच वेळ रेघोट्या ओढत राहिली. मग तिनं हातांची घडी घातली व देवळाकडे पाहू लागली. मग हताशपणे, थोडं खिन्नपणे, असं म्हणाली.

'म्हणजे आता सगळं सांगणं माझ्यावरच पडलं.'

'काय सांगायचंय एवढं? सांगून टाक. अशी घाबरल्यासारखं का करतीयेस?'

ती बोलली नाही.

'मला आठवतं, पूर्वी तू इतकी बोलकी होतीस. काही विचारायलाच लागायचं नाही. इथलं-तिथलं सगळं तू भाऊंना सांगायचीस. मधा तू त्यांच्यासमोर दडपण घेऊन वावरत होतीस. उत्तरं देत होतीस फक्त. का ग?'

ती म्हणाली,

'न सांगताही समजून घेता येतं. संवाद म्हणजे काही संभाषण नव्हे. हल्ली–हल्ली



मला भाऊचे डोळे सहनच होत नाहीत. त्यांच्यासमोर उलगडून पसरल्यासारखं वाटतं. कस वाचायचं, तेच समजत नाही.

'हे समर्थन तू देतीयेस... म्हणजे तुला कशाबद्दल तरी अपराधी वाटतय का ?

'तसं काही नाही...' प्राजक्ताचा आवाज अगदी क्षीण झाला होता. काही श्वासच नव्हता. विश्वनाथन इथवर तिला जाणलं होतं की यापलीकडे काही सांगायची तिलाच इच्छा नव्हती ?

'नक्कीच.' तो म्हणाला, 'नाही तर ज्यापासून वाचावं... काय आहे असं ? तू माझ्यासमोर आहेस, ती खरी तू नाहीयेस. काही तरी तुला आतून झोबतय. आता, ते शमवण्यासाठी तू नेहमीच सारखी पाण्यातच रहाणार का ?'

'म्हणजे मी ढोंग करते अस...' ती हळूहळू थरथरू लागली.

'तस मला मुळीच म्हणायच नाहीये. तुला आतूनच काही तरी होतय. खचून, कोलमडून गेलीयेस तू. मला इतकच विचारायचय हे आहे काय सगळं ? पूर्वी मी तुमच्याकडे यायचो, तेव्हा असं नव्हतं. तुम्ही सगळे जिण्यावद्दलच इतके उत्साही होतात. आता काय झालय ? विचारल, की तितकच बोलण... मला समजतच नाही. की मीच चुकतोय ?'

'प्लीज विश्वनाथ...' ती पुन्हा अस्वस्थपणे रेघोटया ओढू लागली मग त्याच्याकडे न पाहताच म्हणाली, अशक्तपणे म्हणाल्यासारख,

'तुझ्याजवळ एक लहानशी मागणी आहे. आज रात्री भाऊ त्याचं कलेक्शन दाखवतील. आणि तो संग्रह... त्याच्या सग्रहातल फारच अगदीच थोडं उरलंय... म्हणजे...' ती अपंगपणे थावली जणू तिच्यातले शब्द कुणी हिसकावून घेतले आहेत. रेघोटया ओढत राहिली. स्वत.शीच बऱ्याच वेळान म्हणाली,

'तू म्हणत होतास, ते खरय. पण आम्ही पाण्यात नाही, वणव्यात आहोत. हे सगळ जवळजवळ नाटक आहे. आम्ही करतोहोत... मी नि आई.'

विश्वनाथनं ताडकन् तिच्याकडे पाहिलं. त्याला काही तरी बोलायच होतं, पण आतआतच सगळ गोठून गेलं. ओठ हलेचनात. एक अनाम अस्वस्थता त्याला कोंडत गेली. मग त्यानं नुसताच दुसरीकडे चेहरा केला. तीही शेवाळाकडे पाहू लागली, एकाग्रतेनं. मग सगळ्याच भावना दूर सारल्यासारखा चेहरा करून म्हणाली,

'मला जरा स्पष्टपणे बोलायला हव. पासष्ट साली भाऊंचे डोळे गेले. त्याआधीही एका डोळ्यात मोतीबिंदू पिकलाच होता. डोळे गेल्यापास्न त्यांना या सग्रहाशिवाय कशातच रस उरला नाही. आधी त्याना अनेक छद होते. म्हणजे काय, बागकाम, शेती वगैरे. डोळे गेल्यापासून ते फार हळवे झाले आहेत रोज आपलं कलेक्शन काढून ते जाणवत राहतात. आता इतक्या वर्षांवर्षांनंतर चित्रांवरच्या खाणाखुणा त्याना ओळखीच्या झाल्या आहेत. रोज हाच कार्यक्रम. चित्रं काढायची, त्यावरन हात फिरवायचा, स्वत शीच हसायचं. कधी कधी ते मला वर्तमानपत्रातल्या लिलावाच्या जाहिरातीही वाचून दाखवायला सागतात, मग म्हणतात, बघ आहे कोणाकडे माझ्याइतकी चागली कलेक्शन ? मला याबरून नेहमी एक गोष्ट आठवते. राजाच्या अगरख्याची. तो कशाचाच नसलेला अगरखा ! राजा उघडा चाललाय आपला ! सर्वांत सुदर, तलम अंगरखा !'

ती एकाएकी धारदार, पण वेदनामय असं हसू लागली. बराच वेळ हसत राहिली, काही तरी हसवणार आठवल्यासारखं पण विश्वनाथ हसला नाही. गभीरपणे त्यान इतकच विचारलं,

'मग ?'

ती गप्प झाली. जणू भिऊन शेवाळाकडे पाहू लागली. तिन हात मागे ओढला. झटकला. मग तिन रुमालान चेहरा पुसला. हात पुसले. रुमाल ठेवून दिला. मग ती म्हणाली, करुणशी,

'भयकर आहे सगळ ! जन्मभर ओझी वाहा, धडपडा–ठेचाळा, पायच सरकेनासे झाले की सपून जा... प्रश्न तसेच मागे ठेवून काही अर्धीमुर्धी जाणीव घेऊन...'

तिच्या अवघ्या देहावर एक कोमट थरथर उठली. ओठ वेडेवाकडे हसू लागले. जणू प्रचंड ताकदीनं तिनं आर्त सुस्कारा सोडला अर्धवट अंधार-प्रकाशात तो सुस्कारा दूर दूर सरकत गेला. जरा वेळानं श्वास सावरल्यावर ती म्हणाली,

'भाऊंच पेन्शन किती हास्यास्पद आहे, माहिताय ? दीडशे–फक्त दीडशे रुपये. आता यात एक भरलं घर कसं चालायच, साग तूच. आमचंच नाही, मावशी नि तिचा लहान मुलगाही आहे. त्यानाही दर महिन्याला काही पैसे पाठवावे लागतात कशात भागवणार हे सगळ ? शक्यच नव्हत. शक्य तितके खर्च आम्ही कमी केले. पण तरीही... दात कोरून पोट कसं भरणार ? हं ? त्याच्या कलेक्शनला हातही न लावता आम्ही किरकोळ दागिने वगैरे विकले. मी तेव्हा कॉलेजात होते. नोकरी वगैरे नव्हतीच. पारितोषिकं म्हणून मिळालेली पुस्तकंसुद्धा विकली गेली. तस फारस नव्हतच, घरात भाऊंनी अगदी खरवडून–खरवडून सगळं कलेक्शनमध्ये घातलं होत. मग असा प्रश्न आला की भुकेपोटी जायच किंवा सग्रह विकायचा. भाऊंना विचारून उपयोग नव्हता. रुपयात किलोभर तादूळ मिळण्याच्या काळात जगतायत ते. दोष त्याचा नाही, आमचा आहे भडकलेल्या किमतीच्या जड झालेल्या जिण्याची आच आम्ही पोचूच दिली नव्हती त्याच्यापर्यंत. आता तू तरी काय केलं असतस अशा परिस्थितीत, साग मला. कुठे बसवायची तत्त्व–विस्व–आहे जागा ?'

दूर कुठल्याशा देवळातून हरे राम–हरे कृष्णचा मंद थरथरता नाद विरत विरत आला, एखाद्या प्रचड पोकळीतून कष्टानं पोचल्यासारखा. समोरच्या नदीवरही पसरला. इतर कुठे आवाजाची चुणी नव्हती. शाततच सगळीकडे, फक्त, फळाचे घोस लगडल्यासारखी आणि अपरपार वेदना. विश्वनाथला ते जाणवलं ते सगळच जाणवल. प्राजक्तालाही जाणवलं असावं अपरिहार्यपणे, जणू बसल्याजागी चुळबूळ करत ती म्हणाली,

'आम्ही पहिल चित्र विकल, ते खूप दुर्मिळ होतं डीलरनं बरेच पैसे दिले त्याचे, म्हणजे जवळपास दहा हजार रुपये. तेव्हा कॉलेजमध्ये होते मी. म्हणजे डिग्रीशिवाय नोकरी नाही आणि नोकरी हवी, तर शिक्षणाचा खर्च आलाच. असं त्रागड बघ सगळ! आवश्यक त्या गरजा भागवून बाकीचे पैसे बँकेत ठेवले. पाच महिन्यात ते संपलेच. महागाई काय, लाचलुचपत काय, साध रेशनकार्ड काढायला गेल, तर तिथल्या कार-

कुनाला दहा–एक रुपये द्यावे लागतात कसं जगायच आमच्यासारख्या माणसांनी ? अशी एकापाठोपाठ चित्रं गेली. आता तर चार–सहाच उरलीयेत्. नोकरी लागेपर्यंत तेवढीच उरली. आणखी काय ?'

ती गप्प झाली. तोही शात, एखादी पानगळ भोगल्यासारखा होऊन अतर्मुख झाला. नदीवरून पाचोळा वाहातच होता. ती म्हणाली,

' इतकच. आणखी काही नाहीच, सागण्यासारख. तुला हे माहीत नव्हत, म्हणजे भाडच फुटलं असत. आई इतकी अस्वस्थ झाली. काय आहे, की प्रत्येक चित्र विकल्यावर आम्ही त्या फ्रेममध्ये तेवढ्याच आकाराचा नि जाडीचा पुठ्ठ्यासारखा कागद बसवून घेतला भाऊ या फ्रेम्स ' पाहातात '–स्पर्शान, तेव्हा काही फरक जाणवत नाही त्याना. हा सग्रह ते क्वचितच कोणाला दाखवतात. असाच साताठ वर्षांपूर्वी त्याच्या ओळखीचा, मित्र म्हण, आला होता. त्याला हेच सागितलं खूप समजूतदार होता. साभाळून घेतलंन. नाहीतर... जखम झाली म्हणून कुणी याव आणि डॉक्टरानी दुखरी जागाच तीन–तीनदा दाबून पहावी. कठीण माणस असतात अशीही काही काही. नाही ?'

' असतातच '

' आम्ही कदाचित.... विश्वासघातही केला असेल, त्याचा. पण दुसरा पर्याय काय होता का ? मावशी आणि तिची दोन मुल, आम्हीच फक्त त्याचे जगायला, जगवायला हव. त्यात सगळा लादलेपणाच– स्वातत्र्य नाही. रगातल्या माणसापेक्षा हाडामासाची माणस महत्त्वाची. त्याना आधार वगैरे द्यायचा. त्याच्या मोळचा आपण उचलायच्या, आहोत, तसेच मरण्यासाठी, इच्छा नसताना पोटाचं भाडं द्यायचं. उबगवाणा प्रकार आहे सगळाच ! नको वाटतं. सगळच '

' खरंय '

विश्वनाथनं बोटान भुवई चोळली. हरे राम–हरे कृष्णचा घोष, लयदार गजर ऐकला. त्याला वाटलं, मघा प्रतिसादाची, प्रश्नाची ईर्षा होती. हे चागल, हे वाईट, असं खात्रीपूर्वक सागता येत होतं. आता कसलासा काळोख, प्रचड सभ्रम सर्वत्र उतरून आला आहे. जणू फळाचे घोस जाऊन काळोखच पुजक्यानी गच्च होऊन राहिला आहे काळोखाची पानं, फुलही काळोखाचीच, जाभळी–गडदलाल. उलट–सुलट भाले एकमेकावर आपटताहेत नि त्यातून रक्तजाभळी फळं ठिबकताहेत. तो खणखणाट घुमतोय, असह्य आणि इतर काही ऐकू येत नाही आता. आतून पोखरलेल्या अगातून सहस्र कीटकानी आवाज सुरू केला आहे, एकच, सनातन. समोर रिकामा काठ आणि सथ नदी आहे स्थितप्रज्ञ झाडं आहेत. ओकाबोका पाचोळा आहे

त्याला फार छोट छोटं वाटू लागल, क्षुद्र-क्षुद्र सगळ कोसळवून त्याला पलीकडे जायचं होतं; पण ते असीम होतं अपरिमित आणि अपरपार त्याच्यावर सगळीकडन वाकून घुसमटवून टाकत होत, भयानक आकडे खोचत जात होतं ठिबकणाऱ्या थेंबासाठी. तेवढच जाणवत होत हृदयाची धडपड जाणवत होती. अप्रतिहत.

आणि पाचोळा घेऊन, मावळतीची पान, फुल घेऊन नदी वाहात होती. तशीच.

¤

सध्याकाळ क्षितिजापलीकडे गेली, अधार अवाढव्य झाला, तशी दोघं उठले आणि चालू लागले. कुठूनतरी कुठेतरी जाणारी, कशाची तरी ओढ असलेली दोन माणसं. इतरापेक्षा वेगळी, विसगतच जवळजवळ. तरीही आखीव–ठरीव आणि तरीही निराळी. कमीत कमी त्यांच्या भोवतालच्या साऱ्यापेक्षा वेगळी आणि विसगत.

नदी मागे पडली. शहर जणू त्याच्यावर चालून आलं तऱ्हतऱ्हेचे आवाज गाण्याचे, वाहनाचे, माणसाचे, झाडाचे तीव्र–सौम्य, लहान–मोठे, अनेक प्रकारचे. वाद्याचा अहकार पिसाळलेला तारा उन्मादलेल्या. गीतं द्रुत झालेली. त्या नादावर फेसाळत येणारे चेहरे. उभे, आडवे, चौकोनी, गोल, षट्कोनी. त्यावर वैफल्य, नैराश्य, राग, क्वचितच आनंद पसरून राहिलेले, पण सगळीकडे एक वैश्विक कारुण्य, फारच जाणवणार. जणू ह्या सगळ्यानीच काहीकाही अटळपणे जाणलंय आयुष्याची सुन्न करणारी व्यापकता; संबधाच लादलेपण; अपरिहार्य शोकात जीवनाला असणारी भीषण सौंदर्याची किनार त्यानी जाणलीयं. तीच हे चेहरे सागतायत. तीच गीतं सागतायत जणू एकच प्रचड अश्वत्थ सळसळतोय, काही सागू पाहातोय आर्तपणे, भयानक व्याकुळता. हृदय फाटून जाईल त्यानच. कधी वाटत, हे चेहरे नाहीतच हे सूरही नाहीतच हे फक्त परार्ध वर्षांच्या परपरा आहेत त्या परपराच ओझ आहे. सुराचे धागे या अनेक–अनेक, पण सगळ्याच चेहऱ्यावर चिकटून राहिले आहेत जळमटांसारखे. अजगरासारखे सर्वांना वेटोळून राहिले आहेत. परार्ध वर्षांकरता. परार्ध. परार्ध वर्षांचा काळोख, असीम आणि सुस्त. अपरिमित आणि स्थिर

दिंडीदरवाजा ओलाडून ते आत आले.

खोल्याखोल्यातून मद बल्ब उजळले होते. देवघरातून उदबत्त्याचा मद सुगध पसरत पसरत येत होता. स्वयपाकघरात भांड्याचा खणखणाट चालला होता. चौकात मूठभर पिवळा प्रकाश, पिवळ्याच सावल्या थरथरत होत्या दोघे जरा थाबले. प्रयोजनहीन उभे राहिले.

' कोण, विसू का रे ?' पावलाची चाहूल लागून भाऊ बैठकीच्या दारात आले.

' किती उशीर. मी केव्हापासून वाट पहात होतो. प्राजक्तीला बोलाव ग खोलीतून. सदा वाचत बसलेली असते.'

आक्कानी हाक मारल्यासारखं केलं. मग सर्व बैठकीत आले. दिवाणाशेजारी एक लहान टेबल ओढून भाऊनी त्यावर पोर्टफोलिओ माडून ठेवले होते. काही दिवाणावर होते. काही चौकटी होत्या. शुभ्र आणि कोऱ्यापरक्या आणि अनामिक

भाऊ दिवाणावर बसले. विश्वनाथ खुर्चीवर बसला भाऊनी एक फ्रेम हातात घेतली. खुषीन मान वाकडी करीत चित्राकडे जण ' पाहिलं ' आणि म्हणाले,

' राजा रविवर्माची निवडक चार चित्र आहेत माझ्याकडे एकापेक्षा एक सरस. घे. हातात घेऊन बघ.'

त्यान ती फ्रेम हातात धरली. मूर्खासारखं त्याला काहीच सुचेना हातात कोरा कागद धरून तो नुसताच अज्ञातात पाहू लागला. वाटल, बोलण्यासारख काही उरलेलच नाही, केवळ अस्तित्वावरून भाऊना सगळ जाणवतं. उमजत. आता इथ थाबूच नये सुरातून हात पसरून धावत सुटाव नखं, ओरखडे, सुळे सारच टळेल. मुक्त झाल्यासारख वाटेल.

त्याला प्रचंड कोंदल्यासारख झाल, असह्य पणे नको झाल्यासारख. भाऊ त्याच्याकडे एकटक पाहात होते, अपेक्षेन, खूपशा उत्साहान. मग अगदी न राहवून ते म्हणाले,

' आहे की नाही उत्तम ? रेषा किती स्पष्ट आहेत प्रत्येक तपशील स्वच्छ, सूर्यप्रकाशाइतका. मागे मी माझ्या आणि एका दुसऱ्याची तुलना करून पाहिली. तेही ठीक होत, पण फारच अस्पष्ट फक्त माझ्याकडेच ही इतकी चांगली चीज आहे '

तो प्रचड ताकदीन म्हणाला,

'होय, फारच सुरेख आहे.'

'इथल्या म्युझियमला हे हवं होत. पण मी नाहीच म्हटलं. इतक शरीर झिजवल, ते कलेक्शनच विकायचं म्हटल्यावर काय राहिलं?'

त्यान एकदम दचकून प्राजक्ताकडे पाहिलं. ती मान खाली घालून एका खुर्चीवर बसली होती. हाताची नख चाचपत होती.

भाऊनी दुसरी चौकट उचलली. रेषावरून बोट फिरवली, काहीतरी दाखवत असल्यासारखी विश्वनाथ अभावितपणे पुढे वाकला. जणू काही–काही पाहू लागला. मग हेच क्षणभरानं लक्षात आल्यावर आतल्या आत थरकून गेला भाऊ म्हणाले,

'हे 'शकुंतला' पत्रलेखन किती जिवत वाटतं. आजकालचे फोटो पेन्शनीत काढेल! हे शकुतलाचे डोळे बघ, निरागस आणि विचारीही–'

ते गप्प झाले आणि अपेक्षेने रेंगाळले. विश्वनाथ जरा सावरला, त्यान स्वत च्या विखुरलेल्या अस्तित्त्वाला शोधल. मग तो म्हणाला,

'ही चित्र मी पूर्वी फोटोत पाहिली. पण ती इतकी प्रभावी वाटली नव्हती, त्या लहानशा फोटोत. ही खरच उत्तम आहेत. रविवर्माची दोन, मला वाटतं तुम्ही आमच्याकडेच विकत घेतली होतीत?'

'होय. मधूनच निवडून दिली होती. ही चित्रं हाताळताना मला नेहमी मधूची आठवण येते. काय रे, आठवण गेली म्हणजे कुणालाच ओळखत नाही तो?'

विश्वनाथन खिन्नपणे मान हलवली, असहाय्यपणे अशी. तो म्हणाला,

'नाही ना त्याना हलवल, कानापाशी तोड नेऊन ओरडल, तरी जाणवत नाही त्यांना हात उचलून अधातरी ठेवला, तर अधातरीच राहातो. जेवण दिल, तर खातील नाहीतर दिवसभर अथरुणावर नुसतेच बसून राहतील आतली उमेदच सपून गेल्यासारखी'

'आता घरी एकटाच आहे तो?'

'छे, छे! एकटे नाहीत' विश्वनाथ गडबडून म्हणाला, 'एकटे कुठले? मी ठेवीन का? शेजारी वगैरे आहेत करायला, बघायला–'

भाऊंनी स्वत शीच मान हलवली थोडा वेळ ते स्वत तच गढून गेले. काहीतरी पुटपुटले, तेही स्वत तच दूर कुठल्याशा अधारमयी प्रदेशात हरवून गेले

आक्का उठल्या वाहेर गेल्या प्राजक्ताही वाहेर गेली जरा वेळ दोघं समोरासमोर बसून राहिले, खिळवलेल्या मेणवत्त्यासारखे. अबोलपणे मग चहा घेऊन आक्का आल्या, तशी आसपास जरा सैल झालं. मोकळं झालं. प्रत्येकजण तन्मयतेन चहा पिऊ लागला, रगून जाऊन.

चहा झाल्यावर भाऊनी एक चित्र अलगद काढल, जणू हळवेपणानं. त्यावर टिचकी मारून ते उत्साहान म्हणाले,

'हे माझ्या कलेक्शनच रत्न–पॅशन. कुठे एक भेग नाही फार जपल मी ह्याला. स्वतःच्या मुलासारख जपल. आज बाजारात याची किंमत पन्नास हजाराच्या आसपास असेल. अन् हे बघ...' त्याच्या बोटाना परिचित असं काहीतरी जाणवलं नसावं. त्या जागेवरून त्यानी दोनतीनदा हात फिरवला मग फटीएवढे डोळे करून विश्वनाथकडे पाहिल. मग उतावीळ अपेक्षेन, थोडं भिऊन विचारल,

'पॅशनच आहे ना हे? फ्रेमवर तर तीच अक्षर आहेत. मग? झालय काय?'

विश्वनाथला थरथरल्यासारख झाल– वरच्यावर लटकल्यासारख आणि भयानक भयानक काहीतरी अतर्यामी तो गोठून गेला. जणू तो सगळीकडन उलगडून भाऊसमोर पसरतो आहे. आता कुठे जायचं? कस नाकारायच? आतापर्यंत जे सोसत आणलं, ते कुठून तरी फुटून फेसाळत उसळतयस वाटल.

जणू अदृश्य गळान ओढल्यासारखा तो धडपडत उठला. भाऊपाशी गेला. खूप ताण देऊन आठवायचा प्रयत्न करत म्हणाला,

'पॅशनच आहे हे. आता, हे पहा रग आणि हे...इथे तुम्ही शोधत होतात, तो उचवटा. नतर इथे...'

जरा वेळ तो तुरळक–तुरळक सागत राहिला. भाऊ आक्काना म्हणाले,

'बघ, बघ– ऐकून ठेव! माझ्या ह्या 'उधळेपणावर' तू सारखी रागवायचीस, होय की नाही? माझ्यानंतर तुम्ही विका हे कलेक्शन. विकाच. सोन्याचे दिवे लावता येतील बघ वाड्यातून पेन्शनमध्ये नाहीच भागणं शक्य'

विश्वनाथ एकाएकी आक्रसून गेला. अवघडून गेला. तसेच सरळ समोर पाहात भाऊ म्हणाले,

'विसू, एक सागू? माझ एक लहानस काम आहे.' ते अदाज घेत थांवले आपल्याला अमूक हवं अस कधीही न सागणारे भाऊ आता काय मागणार, त्याला प्रश्न पडला त्यान 'हूं' केल, तशी भाऊ म्हणाले,

'तुझ दुकान-विकान आहे शिवाय चागलं चाललय. म्हणून सागतो, या सग्रहाच्या विक्रीच वगैरे तू बघशील का?'

तो क्षणभर थिजलाच. नुसता विट्‌विट पाहात राहिला, भाऊंकडे, प्राजक्ताकडे. एक असह्य दडपण जाणवू लागलं, अतर्बाह्य काळोखात बेसावधपणे चालत असताना वीज चमकावी आणि अगदी पावलापाशी उलगडत जाणारी खोल दरी दिसावी. अवघ्या देहालाच आतआतून प्रचड हिसका बसल्यासारखा.

'मला माहीत आहे, हे ज़रा खर्चाच काम आहे.' तो गप्प झालेला जाणवताच भाऊ म्हणाले, 'पण एवढं करच माझ्यासाठी. इथे कोणी फारस ओळखीच नाही, विश्वासानं करेल, आस्थेनं पाहील. तू हो म्हणालास तर फार आधार मिळेल बघ.'

विश्वनाथ इतकच म्हणाला,

'तुम्ही काही काळजी करू नका.'

भाऊचा चेहरा उजळला. त्यानी निःश्वास सोडला, जणू अपार कृतज्ञतेनं. क्षणभर ते आत्ममग्न असे बसून राहिले. मग म्हणाले,

'तू नाही म्हणणार नाहीस, याची खात्रीच होती मला माझ झालं दाखवून. तू जेवून घे आता. मी तुमच्यावरोबरच बसेन आज.'

ते उठले. हळूहळू एकेक चित्र गोळा करून ठेवू लागले, सयसथपणे. त्याचा चेहरा कसल्यातरी विलक्षण आनदान उजळून गेला होता. डोळ्यात जणू दिवे लागले होते आणि चेहऱ्यावर स्नेहभाव निथळत होता.

विश्वनाथ क्षणभर तळमळीनं पहात राहिला; जणू कळवळून गेला. मग सावकाश सावकाश बाहेर आला. बागेत आला. मागून प्राजक्ता हाका मारत होती. पानं माडल्याचे आवाज येत होते, पण तो ऐकत नव्हता. एक विचित्र बधिरता. सवेदनशून्यता. काही काही समजत नाही, उमजत नाही. फक्त असख्य प्रश्न, अगम्य, अबोध.

त्यान विहिरीत वाकून पाहिलं. विटाच्या कडाना शेवाळाच्या रेषा होत्या. स्वच्छ, सथ पाणी होत. त्याहीखाली थरथरता तळ होता. एखादं मोठ पान, फूल, थोड थोडं हेलकावत होत.

कुठुनसा एक कावळा रानवटपणे ओरडत आला आणि विहिरीच्या काठावर बसला. पंख मिटत, मान वाकडी करत. त्यान विश्वनाथला जागवलं मग तो जरा पुढे सरकला. इकडे–तिकडे पडलेल्या काड्यातली एक छोटी काडी त्यान प्रास्ताविक हालचालीन पुढे ओढली चोचीत धरली. मग त्यान पख पसरले, काळेशार, आणि तो आंब्याच्या फादीवर जाऊन बसला पुन्हा ओरडला ओरडत राहिला, जणू अभिमानानं.

त्याच्या चोचीतली काडी भरकटत पुन्हा विहिरीच्या काठावर येऊन पडली. पण ह्याची जाणीवही न होऊन कावळा समाधानानं ओरडत होता

# देशातील लाखो लोक रोज रात्री डासांना

# गुड नाइट

# करून सुखद निद्रेचा आनंद घेतात.



## आणि तुम्ही ?

**डासांवर मात करण्याचा सुरक्षित आणि विश्वासाचा मार्ग.**

गुड नाइट देशभरातील लाखांहून अधिक लोकांनी वापरुन आणि पारखून पाहिली आहे. डासांना पळवून लावणारे ते सर्वात सुरक्षित आणि अत्यंत विश्वसनीय साधन म्हणून सिद्ध झाले आहे.

**ना आरोग्याला धोका, ना घाण पसारा.**

ना घुसमटून टाकणारा धूर, ना राख, ना क्रीम. बस्स एक हळुवार सुगंध जो डासांना दूर ठेवतो. रोज रात्री. वर्षानुवर्षे.

**वापरायला सोपी**

गुड नाइट वापरायला अगदी सोपी. बस्स, एक गुड नाइट मॅट हीटर प्लेटवर सरकवा, प्लग लावा आणि बटन दाबा... डासांची झालीच भागमभाग. उत्तम प्रभाव पडण्यासाठी दारं आणि खिडक्या थोडा वेळ बंद ठेवा.

**खास प्रक्रियेच्या गुड नाइट मॅट्स**

उत्तम प्रभावासाठी तुमच्या युनिटमध्ये केवळ गुड नाइट मॅट्सच वापरा. इम्पोर्टेड जपानी रसायने घेऊन आमच्या स्वतःच्या प्रयोगशाळेतच आम्ही त्या काळजीपूर्वक बनवितो. म्हणून त्या रात्रभर प्रभावी राहतात.




**सुमिटोमोचे जपानी तंत्रज्ञान**

गुड नाइट हे जपानच्या सुमिटोमो केमिकल्स लि.चे जगप्रसिद्ध तंत्रज्ञान आणि सर्वोत्तम यंत्रभाग वापरून तयार केलेले डासांना पळवून लावणारे खास साधन आहे.

आणि म्हणून गुड नाइट हे देशामध्ये सर्वात जास्त खपणारे डासांना पळवून लावणारे इलेक्ट्रिकल साधन आहे यात आश्चर्य ते काय? अहो, त्याचे फायदेच इतके आहेत की प्रत्येकालाच ते हवेहवेसे वाटते.

## गुड नाइट

**स्विच दाबा. डास हटवा. सुखाने झोपा.**

सुखद स्वप्नांची सोबत
गुड नाइट दोस्त

निर्माते : **ट्रान्सइलेक्ट्रा डोमेस्टिक प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड**

१२६, क्रिएटिव्ह इंडस्ट्रियल बिल्डिंग, सुंदर नगर, कालीना, मुंबई ४०० ०९८. तार : GOODKNIGHT, फोन : ६१४४६६१, ६१४०६२७.

*Creative Unit 6562 Mar.R*

# मी परत येईन...



दक्षिण आफ्रिकेतल्या वंशद्वेष्टच्या गोऱ्या सरकारला विरोध करणाऱ्या चळवळीचं प्रतीक म्हणून नेल्सन मंडेला यांच्याकडं आज पाहिलं जात आहे. १९६८ पासून गोऱ्या सरकारच्या तुरुंगात ते आहेत. या वर्षी त्यांना सत्तरावं वर्ष लागलं. त्यानिमित्तानं त्यांना सशर्त सोडण्याची द. आफ्रिका सरकारनं तयारी दाखवली होती. पण मंडेला यांना ते नको आहे. आपली मुक्तता व कृष्णवर्णीयांचं स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी एकत्रच त्यांना हव्या आहेत. तुरुंगाबाहेर अनेक अडचणींतही मंडेला यांचं काम पुढे चालू ठेवणाऱ्या त्यांच्या पत्नी विन्नी मंडेला हे देखील असंच धीरोदात्त व्यक्तित्त्व. तुरुंगात व तुरुंगाबाहेर अशा द्वैतातून काळ्या अस्मितेसाठी धडपडणाऱ्या या दांपत्याची कहाणी.

**● सौ. वीणा गवाणकर ●**

'दक्षिण आफ्रिकेत काय घडत आहे याच मी जिवंत प्रतीक आहे. गोऱ्याना तर माझ्या नावाचाही धाक वाटतो. त्याना माझ्याबद्दल केवढी दहशत वाटते याची कल्पना मी ब्रँड फोर्टला येईपर्यंत मला नव्हती...

एक व्यक्ती म्हणून मला आता अस्तित्व उरलेलं नाही. ज्या आदर्शासाठी, ज्या राजकीय ध्येयासाठी मी ठाम उभी राहिले तेच आदर्श नि तीच ध्येय या देशातल्या आम जनतेची आहेत. जनता आता ती ध्येय विसरू शकत नाही...ते (राज्यकर्ते) जेव्हा जेव्हा म्हणून मला हद्दपार करतात, स्थानबद्ध करतात, एकातवासाची शिक्षा फर्मावतात तेव्हा त्यांनी ती कृती मी एक व्यक्ती म्हणून केलेली नसते. त्याना वाटत असं केल्याने माझ्याबरोबरच आमच्या विचारानाही, राजकीय ध्येयानाही हद्दपार करता येईल.
पण आता ते शक्य नाही....

त्याना जे हद्दपार करायचय त्याचीच मी प्रतीक आहे...हाच माझा गौरव आहे.'

**—विन्नी मंडेला**

दक्षिण आफ्रिकेतील गौरेतर जनतेच्या भाव भावनाचे विचार, ध्येयांच प्रतीक— विन्नी आणि नेल्सन मंडेला. विन्नीचे झोसा भाषेतल नाव आहे नॉमझँमो. म्हणजे जिला अनेक परीक्षातून जावं लागत, झगडाव लागतं ती. नेल्सनचं झोसा भाषेतलं नाव आहे रोलीहलाहला. म्हणजे सकटाला आमंत्रण देणारा.

१९६० पासून १९८८ पर्यंतच्या काळात आफ्रिकन सरकारने आपल्याला कितीदा आणि कशासाठी अटक केली, नजरकैदेत ठेवल आणि मनाई हुकूम लावले याचा हिशेब ठेवणं विन्नीनं कधीच सोडलय. '...हा देशच जर एक मोठा तुरुग असेल तर गजाच्या आड राहिल काय नि बाहेर राहिलं काय, काय फरक पडतो...!

'हा देश सोडून तू स्वाझीलँडला जा किंवा ट्रान्स्केई मूलस्थानात जा असं ते मला म्हणतात...हे...हे फॅसिस्ट, वशद्वेष्टे, उपरे... अल्पसख्याक राज्यकर्ते! यानी माझा देश माझ्यापासून हिसकावून घेतला आणि तोच तू सोडून जा असं म्हणतात...हा उलटा न्याय मला समजत नाही...

हा देशच जर कोणी सोडावा अस असेल तर तो त्यानी. मी नव्हे.'

□

नेल्सन मंडेला हा ट्रान्स्केई येथील झोसा आफ्रिकन जमातीच्या 'थेंबू' नायक घराण्यातला. १८ जुलै १९१८ रोजी याचा जन्म अमटाटा इथे झाला

तो चौदा वर्षांचा असतानाच त्याचे वडील वारले त्याचा प्रतिपाळ नामक घराण्याच्या दुसऱ्या पत्नीन केला.

लहानपण गेल खेड्यात, रात्रीच्या वेळी शेकोटी भोवती वसून वृद्धाच्या तोंडून 'काफीर लढाया', झोसाचे शूर पूर्वज याच्या कथा ऐकण्यात.

शाळेत शिकू लागल्यावर मात्र इथे इतिहास 'वेगळा' शिकवतात, झोसाना रानटी जगली ठरवतात, हे त्याच्या लक्षात आल. आमचे कळप, आमच्या जमिनी बळकावणारेच साव झालेत हे त्याला जाणवल.

१९३५–३६ च्या सुमारास नेल्सनने मॅट्रिक्युलेशनची परीक्षा दिली आणि कॉलेजात प्रवेश घेण्यासाठी तो आधी केप टाउनला आणि नंतर जोहान्सबर्गला गेला. तिथं नोकरी करत शिकू लागला. शिकत असतानाच त्याची गाठ वॉल्टर सिसूलूशी पडली. यान नेल्सनला खूप आधार दिला. कपड्यालत्त्याची मदत केली. पत्रद्वारे बी. ए. ची पदवी घ्यायला प्रोत्साहन दिल. आर्थिक मदतही दिली. विद्यार्थी दशेतच नेल्सननं एका परिचारिकेशी लग्न केलं. तिनही त्याच्या शिक्षणाला हातभार लावला.

जोहान्सबर्गच्या नैर्ऋत्येला दहा मैलावर ऑरलाडो ही काळ्यांसाठी राखीव वसाहत आहे. तिच्यातल एक घर नेल्सनला मिळालं. नेल्सनचा संसार तिथे सुरू झाला. शेजाराला सिसूलू आणि टांबो दांपत्य. ऑलिव्हर टाबो हा त्याचा कॉलेजजीवनापासूनचा मित्र.

एकीकडे नोकरी, दुसरीकडे घर आणि तिसरीकडे कायद्याच्या पदवी अभ्यासक्रमाचे वर्ग या त्रिस्थळी यात्रेत सारा वेळ जायचा. पुन्हा काळ्या लोकानी रात्री ११ वाजल्यानतर घराबाहेर असता नये हा कायदा. सर्व मर्यादा सांभाळताना नेल्सनला तारेवरची कसरत करावी लागे.

### संघटना आंदोलन

जोहान्सबर्गला आल्यापासून गोरे काळ्यांना कशी वागणूक देतात हे तो पाहात होता. राजकीय बाबतीतही त्याची जाण वाढत होती वॉल्टर सिसूलू हा आधीपासूनच आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेस (ANC) चा सदस्य. त्याच्याशी त्याची चर्चा चाले.

नेल्सनच बालपण आडवळणावरच्या खेड्यात गेल होत. गरिबीत गेल होतं तरी तिथे माणसाला माणूस म्हणून किंमत होती प्रतिष्ठा होती इथे शहरात काळ्याला 'रावणाऱ्या यंत्रा' पलीकडे काही किंमत नव्हती. स्वतंत्र व्यक्ती म्हणून तर अजिबात अस्तित्व नव्हतं. हे त्याच्या अनुभवाला आलं.

नेल्सन मात्र आता स्वतःला केवळ 'थेंबू' म्हणून वेगळा समजत नव्हता. आफ्रिकन राष्ट्रीयत्वाच्या दिशेन त्याचे विचार धावू लागले. त्यान १९४० साली ANC चं सदस्यत्व घेतलं आणि तो तिच्या चळवळीत उतरला. यावेळी ANC चं नेतृत्व करत होते डॉ. ए. बी. क्झुमा.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या काळात आशिया आणि आफ्रिका खंडातील वसाहतीतून स्वातंत्र्यासाठी उठाव झाले. डॉ. क्झुमा आणि त्याच्या सहकाऱ्यांनी वाशिक वर्चस्व, अन्याय्य कायदे याच्याविरुद्ध

निषेध नोदवून नागरिकाच्या मूलभूत हक्काच्या मागण्या पुन्हा एकवार मांडल्या. द. आफ्रिकेतल्या इतर संघटनाशी हातमिळवणी करून 'परवाना पत्रका' विरुद्ध प्रचड निदर्शन घडवली. कम्युनिस्ट पक्ष आणि दक्षिण आफ्रिकन इंडियन⌑ काँग्रेसही यात सहभागी होते.

नेल्सनला मात्र कोणत्याही बाबतीत कम्युनिस्टाशी हातमिळवणी नको होती. त्यांच्यामुळे वर्ग लढ्यावर जोर दिला जाईल आणि सर्व आफ्रिकन जनतेला एकत्र आणण्यात अडथळा येईल अस वाटे. कम्युनिस्ट पार्टीचे काही लोक ANC मध्ये काम करू लागले. तेव्हा, त्यांनी आधी कम्युनिस्ट पार्टीचा राजीनामा द्यावा असा आग्रह नेल्सननं धरला.

१९४२ साली शेती व खाणीत राबणारे मजूर वगळून अन्य सर्व कामगार वर्गाला वेतनवाढीचा आणि महागाई भत्त्याचा लाभ घडला. याविरुद्ध खाण कामगार संघटनेने आवाज उठवला. सपाची हाक दिली. दाम नाही तर काम नाही अशा घोषणा देऊन दणाणून सोडले. एक लाख वीस हजार खाण कामगाराचा संप ही द आफ्रिकेच्या इतिहासातील अभुतपूर्व घटना.

आठवडाभरातच आफ्रिकेतर सरकारने पोलिसाच्या बळावर हा सप साफ मोडून काढला. कामगार संघटना उद्‌ध्वस्त केल्या कामगाराच्या जमातीनुसार विभागणी करून वेगवेगळ्या वस्त्यावर ठेवलं. ही घटना १९४६ मधली. तत्पूर्वी दोन वर्षे, १९४४ मध्ये, नेल्सन मडेला, सिसूलू, टाबो यानी विचार–विनिमय करून, ANC च्या चळवळीला जोर आणण्याच्या दृष्टीनं 'यूथ लीग'ची स्थापना केली. ANC ची एक शाखा म्हणून त्यानी नव्या उपक्रमाना सुरुवात केली. राजकीय जाणिवा वाढवण्याच्या दृष्टीन सभा, बैठका जोराने सुरू केल्या. सभासद संख्याही वाढू लागली. स्वातंत्र्य चळवळीला जोर आला. यूथ लीगच्या नेत्यांना कामगार संपाच्या निमित्तानं लोकशक्तीचे दर्शन घडले. चळवळीत आम जनतेला ओढल्याखेरीज तिला पुरेसा जोर येणार नाही याची जाणीव प्रकर्षाने झाली. सभासद नोंदणीत अधिक जोर धरला.

१९४८ साली आफ्रिकानर नॅशनल पार्टी सत्तेवर आली आणि नवे अन्यायकारक कायदे पास करून वंशवर्चस्वावर शिक्कामोर्तब केल.

पॉप्युलेशन रजिस्ट्रेशन ॲक्ट

ग्रूप ॲरिया ॲक्ट

मिक्सड मॅरेज ॲक्ट

आणि हे तीन कायदे कमी पडले म्हणून की काय १९५० मध्ये 'सप्रेशन ऑफ कम्युनिझम ॲक्ट' अस्तित्वात आला. त्याला सकटाशी मुकाबला करण्यासाठी हे हत्यार तयार झालं सरकारविरुद्धची कोणतीही कृती या ॲक्टान्वये वाद ठरवून माणस तुरुंगात डाबायचीही सोय झाली.

हिटलरशाही नष्ट करण्यासाठी, मानवी मूल्याच रक्षण करण्यासाठी दुसर युद्ध झालं...आणि नंतरच्या काही वर्षातच मानवी मूल्य पायदळी तुडवणाऱ्या 'अपार्टहेट' व्यवस्थेविषयी नाराजी व्यक्त करत करत ब्रिटन–अमेरिका आदी पाश्चात्त्य देशानी दक्षिण आफ्रिकेत आर्थिक गुंतवणूक वाढवायला सुरुवात केली. त्यामुळे अपार्टहेट सरकार अधिकाधिक बळकट बनत गेल.

या अन्यायाविरुद्ध उग्र आदोलन सुरू करायचा निर्णय मंडेला आणि त्याच्या साथीदारानी घेतला. २६ जून १९५० ही तारीख निश्चित झाली.

त्यानी यूथ लीग, कम्युनिस्ट पार्टी, इंडियन काँग्रेस आणि इतर सघटनाच्या सहकार्याने देशव्यापी हरताळ पाळण्याची योजना आखली. जुलमी राजवटीला विरोध दर्शवताना कुठेही हिंसाचार, घातपात घडू नयेत याविषयी सतत आग्रह धरला. स्वयसेवकाची त्यादृष्टीने बौद्धिक घेतली.

छोट्या छोट्या सभातून प्रार्थनाही झाल्या. ANC च्या ध्वजाचे रग सर्वत्र झळकू लागले. हिरवा इथल्या भूमीचा. काळा इथल्या लोकाचा आणि पिवळा इथल्या सुवर्ण सपत्तीचा. ANC चे राष्ट्रगीत म्हटल्याखेरीज सभा सपत नसे. 'Nkosi Sikelel i Afrıka' 'देवा तुझी कृपा आफ्रिकेवर असो.'

हा हरताळ काही ठिकाणी पूर्णतः तर काही ठिकाणी अशतः यशस्वी झाला या सपाच्या निमित्तानं नेल्सनला साऊथ आफ्रिकन इंडियन काँग्रेसच्या कार्यकर्त्यांच्या क्षमतेच, संघटनाचातुर्याचं, निधी उभा करण्याच्या कसबाचं दर्शन घडलं. यानिमित्तानं त्यानं भारतीय स्वातंत्र्य–चळवळीचा–गांधी प्रणीत अहिंसक आदोलन पद्धतीचा, कायदेभंग चळवळीचा अभ्यास केला. सा. आ. इं. काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते त्याचे जिवलग साथी झाले.

हरताळाच्या निमित्ताने नेल्सनने अटकेचा अनुभव प्रथमच घेतला. रात्री ११ पूर्वी घरी परतण्याचा नियम मोडला त्या कारणाखाली त्याची रवानगी तुरुगात झाली.

दुसऱ्या दिवशी तो मुक्त झाला.

हरताळाच्या निमित्ताने समाजाच्या सर्व थरातले आणि भिन्नभिन्न वश–गटाचे लोक एकत्र आलेले पाहायला मिळाले. लोकानी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जेल भरो आदोलनासारखे प्रकार घडले.

३० जुलै १९५० रोजी पोलिसानी धरपकड सुरू केली. तीस-पस्तीस नेते मडळीना अटक झाली.

आदोलनाच्या शेवटच्या टप्प्यात नेल्सनन आम जनतेला सहभागी होण्याचं आवाहन केलं.

'युरोपिअनासाठी राखीव' अशी पाटी असलेल्या प्रत्येक ठिकाणी लोकानी उत्स्फूर्तपणे १८ ऑक्टोबर रोजी प्रथमच पाय लावले. समुद्रकिनारा, हॉटेल, पोस्ट ऑफिस, रेल्वेस्टेशन, रस्ता... ज्या ज्या ठिकाणी त्याना मज्जाव होता त्या त्या ठिकाणी त्यानी प्रवेश केला.

ऑक्टोबर अखेरीपर्यंत अडीच हजार लोकाना अटक झाली आणि नतर सबळ पुराव्याअभावी सुटकाही झाली. विदेशी वृत्तपत्रानी या आदोलनाची दखल घेतली. सयुक्त राष्ट्रसंघाने अपार्टहेटविषयी नाराजी व्यक्त केली यामुळे ANC आणि तिच्या सहकारी सघटनांना स्फूर्ती मिळाली

या आदोलनाची महत्त्वाची फलश्रुती म्हणजे आमजनतेची राजकीय जाणीव वाढली. ANC च्या १९५० च्या वार्षिक सभेत ट्रान्सवाल ANC च्या अध्यक्षपदी नेल्सनची निवड झाली.

१९५२ च्या डिसेंबरमध्ये ANC च्या अध्यक्षपदी अल्बर्ट लुटुली

⌑ द. आ. इंडियन काँग्रेस : गांधीजीनी १८९४ साली साऊथ आफ्रिकन इंडियन काँग्रेसची स्थापना केली.

आणि उपाध्यक्षपदी नेल्सन मंडेलाची निवड झाली.

लवकरच आफ्रिकानर[१] सरकारनं 'सप्रेशन ऑफ कम्युनिझम'[१] कायद्याच्या आधाराने लुटूली, मंडेला आदी शंभर जणावर बंदीहुकूम बजावला. आता त्याना कोणत्याही सभेस उपस्थित राहाता येणार नव्हतं. मडेलाने तर पुढच्या सहा महिन्यात जोहान्सबर्ग बाहेर पाऊलही टाकायच नव्हतं.

कुठल्याही कायद्याचं उल्लघन केल्यास तो गभीर गुन्हा समजून तीन ते पाच वर्षांची शिक्षा आणि भरपूर दण्ड देणारं नवं कलम जाहीर झालं.

ANC प्रणीत आदोलन चिरडून काढण्यासाठी कायद्याचा वरंवटा अधिकाधिक जोमदार होऊ लागला.

आफ्रिकानर– दक्षिण आफ्रिकेतील गोरे.

## जनतेची वकिली

ऑलिव्हर टाबोला वकिलीची सनद मिळालेली होती. तो आणि मडेला यांनी मिळून जोहान्सबर्गमध्ये वकिली सुरू केली होती. जगात सर्वांत जास्त कैद्यांची सख्या दक्षिण आफ्रिकेत आहे. किरकोळ कारणासाठी तुरुंगात टाकणाऱ्या कायद्यामुळे तिथले तुरुंग कायम भरलेले असतात. त्यात कृष्णवर्णीय बहुसख्येनं. नेमून दिलेल्या वसतिस्थानात राहिला नाही म्हणून, रात्री ११ वाजल्यापूर्वी घरी परतला नाही म्हणून, कर्जाचा हप्ता भरला नाही म्हणून, न सागता कामावरून घरी राहिला म्हणून...कोणतही क्षुल्लक कारण पुरे. असे हजारो खटले दप्तरी पडून असायचे. याना कायदेशीर सल्ला देण्याचं, वेळप्रसगी जामीन राहून मुक्त करण्याचं काम हे दोघ पार पाडत.

नेल्सन म्हणायचा, 'आम्ही कितीही हुशारी दाखवली, कायद्यात कितीही पारगत झालो तरी आम्ही फिर्यादी, न्यायाधीश म्हणून कधीच नेमले जाणार नव्हतो.'

या आरोपीचे वकील म्हणून खटले चालवता चालवताच मडेलाला सरकारी कायद्याचे भीषण दुष्परिणाम अधिक खोलवर जाणवू लागले. तो अधिकाधिक अस्वस्थ होऊ लागला. बदी हुकूम असतानाही, गुप्तपणे सभा, बैठका, चर्चासत्र घेऊन वैचारिक जागृती करू लागला. अभ्यासवर्ग स्थापून मार्गदर्शन करू लागला.

६ एप्रिल १९५२ ला गोऱ्याचे पाय आफ्रिकेला लागल्याला तीनशे वर्षं पूर्ण होत होती याचा समारभ सरकारी पातळीवर करण्याच घाटत होतं. हाच मुहूर्त धरून ANC ने कार्यक्रम हाती घेतला. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर स्वयसेवक नोदणी झाली.

मानवी जीवनाची प्रतिष्ठा, समता, स्वातंत्र्य याचा लाभ प्रत्येक आफ्रिकन व्यक्तीला घडावा, जुलुमी कायद्याचं उच्चाटन व्हाव याचा आग्रह धरण्यासाठी शांततापूर्ण अहिसक आदोलनाची तयारी सुरू झाली.

सहा एप्रिलला केपटाऊनमध्ये त्रिशतक महोत्सवी सरकारी समारंभ चालू होता. त्याचवेळी केपटाउनच्या पूर्व भागात दहा हजार आफ्रिकन स्वातत्र्यासाठी प्रार्थना करायला एकत्र जमले. सर्व थरातले लोक या ठिकाणी उपस्थित होते. याही वेळी पोलिसांनी मोठी धरपकड केलीच.

१९७३ साली नेल्सन आणि त्याच्या साथीदारांवरचा बदीहुकूम उठला. लागलीच सिलूलू, नेल्सन, फादर हडलस्टोन यानी मोठी जाहीर सभा घेतली.

सोफियाटाउनमधले अठ्ठावन्न हजार काळे लोक ग्रूप एरिया ॲक्टान्वये हलवले जाणार होते. सोफियाटाऊन ही वसाहत आधी काळ्यासाठी राखीव म्हणून जाहीर झालेली. परंतु जवळच्या गोऱ्या वसाहतीला जागा कमी पडू लागल्यानं ही काळी वस्ती उठवली जात होती. याचा निषेध करण्यासाठी ही प्रचड सभा होती.

पोलिसानी गोळीबार करून ही सभा उधळण्याचा प्रयत्न केला. पण लोकानी त्याला भीक न घालता, गडबड–गोधळ होऊ न देता स्वातंत्र्याची गाणी म्हणत सभा पार पाडली.

या प्रकरणान नेल्सनवर पुन्हा बदीहुकूम लादला गेला. पुढील दोन वर्षं कोणत्याही प्रकारच्या सभासमेलनाला त्यान उपस्थित राहायचं नाही, जोहान्सबर्ग सोडायचं नाही, ANC वा इतर सघटनाशी सबंध ठेवायचे नाहीत, अशी बधने पडली.

एवढे सारे बदी हुकूम असूनही ट्रान्सवाल ANC च्या सभात त्याच अध्यक्षीय भाषण वाचल जायचच गुप्त मसलती, बैठका व्हायच्याच. डाव्या विचारसरणीच्या 'लिबरेशन' नियत, कालिकात त्याचे लेख प्रकाशित व्हायचे. '...लोकाच जीवनमान अगदी खालावलं आहे...क्रयशक्तीही कमी होत चालली आहे... महागाई वाढते आहे...बेकाराना कसलाही आधार, संरक्षण नाही... वृद्ध व मुलं याचे हाल होताहेत...विपन्नावस्था व अनारोग्य याने जनता पोखरली जाते...नेटिव लेबर विलामुळे टाळेबदी, हरताळ, संप हे मार्ग खुटलेत...मजूर नि शस्त्र झालेत...'

१९५५ साली त्यानं परवाना पत्रक, बाटुस्थाननिर्मिती, मजुरांचे स्थानातर यामुळे आफ्रिकन जनतेची कशी वाताहात होते, यावर झोड उठवली '...मुल, माता एकमेकाना दुरावताहेत; आफ्रिकन लोकाची कुटुवं उद्ध्वस्त होताहेत...खाणीत आणि शेतावर स्वस्तात मजूर उपलब्ध करून देण्यासाठी त्याचे जथे इकडून तिकडे हलवले जातात. अशा परिस्थितीत आफ्रिकन हुशार तरुण मुलाचे भवितव्य काय ? त्याची बुद्धिमत्ता, त्याची हुशारी देशाच्या उपयोगी पडू शकत नाहीए. पण म्हणून ते वटाटे उकडायला किंवा गटारं साफ करायला राजी होतील असही नाही...हे सरकार लक्षात का घेत नाही ?'

१९५३ पासून या मुलाना बाटू शिक्षण धोरणाच बळी व्हावं लागलं.

---

१ आफ्रिकानर : दक्षिण आफ्रिकेतील गोरे

१ **सप्रेशन ऑफ कम्युनिझम ॲक्ट हाच नंतर अंतर्गत सुरक्षा कायदा.** साम्यवादाची कोणत्याही प्रकारे तरफदारी करणं, बाजू घेणं वा तो रुजवण्यासाठी प्रयत्न करण वा प्रोत्साहन देण या कृतीला विरोध करण्यासाठी हा कायदा अस्तित्वात आला. याअन्वये द. आफ्रिकेत कोणत्याही प्रकारचा राजकीय, सामाजिक, औद्योगिक वा आर्थिक बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने केलेला प्रयत्न हा साम्यवाद स्थापण्यासाठी केलेला प्रयत्न ठरवला गेला. याच कायद्याचं नवं स्वरूप अतर्गत सुरक्षा कायदा

विना चौकशी तुरुंगात टाकणं, प्रतिबंधक स्थानबद्धता लादणं याच्या निषेधार्थ कोणीही न्यायालयात धाव घेऊ शकत नाही. या कायद्यान्वये व्यक्ती, सस्था, वृत्तपत्रं याच्यावर मर्यादा घातली जाते.

काळयांच गोऱ्या व्यवस्थेत कायम दुय्यम स्थान राहाव; गोरे सर्वार्थाने वरचढ राहावेत यासाठी हे धोरण. या धोरणानुसार आफ्रिकन लोकाना गोऱ्याच्या बरोबरीन, गोऱ्याच्या तोडीचं शिक्षण मिळणं बंद झाल. हे धोरण जाहीर करताना पंतप्रधान फेरवर्ड म्हणाले : 'सरकारच्या ध्येयधोरणाशी जुळणारी शिक्षणपद्धती अमलात येत आहे...त्यानुसार नेटिवाना शिक्षण दिल जाईल. दक्षिण आफ्रिकेतल्या कोणत्याही नेटिवाला, आपण शिकून-सवरून गोऱ्याच्या बरोबरीनं समान हक्क उपभोगू अस वाटत असेल तर तो त्याचा भ्रम आहे ... त्याला युरोपियन समाजात मजुरापलीकडे स्थान नाही...'

या शिक्षण पद्धतीमुळे नेटिवाचं स्थान मजूर एवढच उरलं. यापुढे त्यानी प्राथमिक शिक्षण देशी भाषातूनच घ्यायचं. त्याच्यासाठी अभ्यासक्रमही वेगळा. बागकाम, सुतारकाम, शारीरिक मेहनतीवर भर देणारा. भावी कष्टाळू मजूर तयार करणारा. गोऱ्याच स्वामित्व राखणारा.

या बाटू शिक्षण मंत्रालयान लवकरच महाविद्यालयही सुरू केली. या महाविद्यालयाचा मुख्य उद्देश कृष्णवर्णीयाच्या गुणवत्तेला वाव देणं हा नसून गोऱ्याचा राजकीय आदर्शवाद त्याच्या गळी उतरवणे, त्यानी मनानं आणि बुद्धीन गोऱ्याचं स्वामित्व स्वीकारण हाच होता.

## वंश वर्चस्वप्रणाली अर्थात्

१६५२ साली प्रथमच डचाचे पाढरे पाय दक्षिण आफ्रिकेच्या केपटाऊनला लागले. आपल्या कळपासाठी चराऊ कुरणं शोधत ते पूर्वेकडे आणि उत्तरेकडे सरकू लागले. १८ व्या शतकाच्या अखेरीस आत्ताच्या पूर्व केप भागात त्याची सख्या बरीच झाली डच पूर्वेकडे सरकत होते त्याच वेळी मूळ आफ्रिकन टोळया पश्चिमेकडे सरकत होत्या. यातच १८०६ साली इग्रजही केपटाऊनला पायउतार झाले. या प्रदेशावर आपला कब्जा ठेवण्यासाठी त्यानी मनुष्यबळ वाढवायला सुरुवात केली १८२० साली पाच हजार इग्रज एक गठ्ठा आले येताना आपल्यावरोबर कार्यक्षम शासन आणि थोडासा उदारमतवादही आणला.

डच (बोअर) कृष्णवर्णीयाना समानतेची वागणूक देत नाहीत, त्याना गुलामासारखं वागवतात, याविषयी इग्रजांची नाराजी होती त्यानी १८३४ साली कायद्याने गुलामगिरी सपवली. तिथली डच भाषाही सपवायच्या मागे लागले...तशात आफ्रिकन टोळयाचेही हल्ले वाढले. मग डच नव्या जमिनीच्या शोधात नाताळ भूप्रदेशाकडे सरकले त्याच्या मागावर झुलू टोळया आणि मग इग्रजही गेले मग डच आणखी उत्तरेकडे ऑरेंज फ्रीस्टेट, ट्रान्सवालकडे सरकले. या आपल्या दोन सुभ्यात डचानी आफ्रिकन लोकाना 'चर्च आणि राज्यसत्ता' यापासून साफ दूर ठेवलं. सर्व प्रकारची समानता नाकारली. दरम्यान आफ्रिकन लोकांचं पशुधन आणि त्याच्या जमिनी बळकावण्यासाठी डचाच्या त्याच्याशी छोटया-मोठया लढाया चालू होत्याच. याच 'काफीर लढाया.' गोरे लोक काळया आफ्रिकन लोकाना आधी काफीर, नेटीव, मग बाटू म्हणायचे. पण आता कृष्णवर्णीय स्वतःला 'काळे' म्हणतात. या टोळयाना डचाच्या आधुनिक शस्त्रांपुढे हार खावी लागली. या लढयात त्याच्या बऱ्याचशा जमिनी गोऱ्यानी बळकावल्या.

इग्रजव्याप्त केप आणि नाताळ प्रदेशात वंशभेदाचा अडसर न ठेवता आधी सर्वांना मताधिकार होता. पण नंतर हे धोरण बदलल.

१८६० साली नाताळच्या ऊस मळयात राबण्यासाठी हिंदी लोकाचा एक मोठा लोढा आला. आणि मग तियेही १८७० पासून फक्त गोऱ्या सुसंस्कृतापुरताच मताधिकार मर्यादित झाला.

१८७०-८० या काळात किंबरले (ऑरेंज फ्री स्टेट) आणि ट्रान्सवालमध्ये हिऱ्याच्या आणि सोन्याच्या खाणीचा शोध लागला... आजवर शेतीवर विसबून असणार अर्थशास्त्र खाणीवर विसंबल...ब्रिटिशांनी ट्रान्सवालवरही कब्जा मिळवला.

सोन आणि हिऱ्याच्या मिषान मोठया संख्येन युरोपियन दक्षिण आफ्रिकेत आले. त्यांची व्यवस्था पाहण्यासाठी स्वस्त मजुराची गरज निर्माण झाली. ती भागवली गेली स्थानिक आफ्रिकन लोकांतून. गोऱ्या सरकारनं भरमसाट कर लावले. त्याची पूर्तता करण्यासाठी आफ्रिकन मजूर म्हणून राबू लागले. कर भरता आला नाही म्हणून जमिनीही घालवून बसले कायद्याचं अज्ञान, प्राचीन कालबाह्य शस्त्र, मताधिकार नाही, आर्थिक गुलामगिरी, राज्यसत्तेत प्रतिनिधित्व नाही या सर्वांचा परिणाम म्हणजे आफ्रिकन मनुष्य राबणारं यंत्र होऊन बसला. कितीतरी निर्बंध त्याच्यावर लादले गेले.

तसा १७६० सालापासूनच तो 'परवाना पत्रक कायद्याचा' (पास लॉ) बळी आहे. माणसाच्या सचार-स्वातत्र्यावर मर्यादा घालणारा हा कायदा. काळया मजुरानी आपलं ठिकाण किंवा सरकारनं नेमून दिलेलं ठिकाण, वसतिस्थान सोडून अन्यत्र फिरकू नये म्हणून घातलेलं बधन. या कायद्यानुसार आजही आफ्रिकन मजूर हव्या त्या ठिकाणी हवे तेव्हा पाठवण्याची सोय आहे. त्यात त्याच्या राजीखुषीचा प्रश्नच नाही. वर्षातून दहा-अकरा महिने त्याना कुटुंबापासून दूर राहाव लागतं.

¤

केप, नाताळ, ऑरेंज फ्री स्टेट आणि ट्रान्सवाल ही राज्य गेली काही दशक एकमेकाच्या शेजारात फारशी सुखान जगत नव्हती आपण एक व्हाव, एकसध असाव अशा दृष्टीने काही प्रयत्न झाले. पण ते वाया गेले.

१८९९-१९०२ च्या अँग्लो-बोअर (डच) युद्धात ब्रिटनचे वर्चस्व सिद्ध झाले आणि चारही वसाहती ब्रिटिशाच्या आधिपत्याखाली आल्या. या युद्धानतर या वसाहतीना सघटित होण्याची, एकसध होण्याची गरज जाणवली.

१९१० साली युनियन ऑफ साऊथ

नेल्सननं या शैक्षणिक धोरणाविरुद्ध नाना प्रयत्नानी जागृती सुरू केली तेव्हा सरकारनं त्याच्यावर पुन्हा बंदी हुकूम लादला

'... कायद्याच्या नावाखाली मला माझ्या साथीदारापासून अलग करतात...माझ्यावर सतत पहारा ठेवतात...कायद्याने मला गुन्हेगार ठरवलय ते मी काय कृती केलीय यासाठी नव्हे तर ज्या विचाराचा मी पाठपुरावा करतोय त्यासाठी.'

सरकारने कितीही दडपणे आणली तरी नेल्सन, टावो, सिसुलू याचे कार्य थाबले नव्हतच लोकानाही आता वश, टोळी, जात-जमात सार बाजूला ठेवून एक होण्याची जाणीव प्रकर्षानं होऊ लागली

जनतेचा ससार सावरता सावरता नेल्सन स्वत चा ससार मात्र हरवून बसला. त्याची पत्नी त्याच्यापासून विभक्त झाली ¤

१९५५ साली ANC ने एक मोठी मोहीम हाती घेतली. सर्व राजकीय सघटनाना एक पत्रक पाठवून स्वातत्र्याची सनद तयार करण्याच्या दृष्टीने विचार मागवले. उत्तर आल्यावर स्वातंत्र्य सनदेचा आराखडा तयार झाला.

२५ जून १९५५ रोजी ANC ने बैठकीसाठी सर्व सघटनाना आवाहन केले जोहान्सबर्गच्या नैर्ऋत्येला क्लिपटाउन खेड्यात

## अपार्टहेट किंवा अपार्थेड

आफ्रिका अस्तित्वात आली ब्रिटनने युनियनच्या ताब्यात सत्ता दिली. चार पैकी दोन वसाहतीत गौरेतराना मतदानाचा हक्कच नव्हता. आणि उरलेल्या दोघीत अगदी नाममात्र होता. थोडक्यात गोऱ्याचं मताधिक्य. मूठभर गोऱ्याच्या हातात दक्षिण आफ्रिकेतील तमाम गौरेतराच भवितव्य गेलं.

१९१० पासून वाशिक सापत्नभाव कायदेशीर ठरला. त्याला सस्थागत रूप मिळालं.

या सापत्नभावाला विरोध करण्यासाठी १९१२ साली काही सुज्ञ आफ्रिकन सुशिक्षितानी आफ्रिकन नॅशनल कॉंग्रेसची (ANC) स्थापना केली. हिच मूळच नाव साऊथ आफ्रिकन नेटिव नॅशनल कॉंग्रेस. ANC चं ध्येय धोरण हे 'गोऱ्या वशाला विरोध' अस नव्हतं. तर गोऱ्या वर्चस्वाला होत किंवहुना वशभेदाला थारा न देता समभावाने सर्व जनतेला प्रतिनिधित्व मिळाव, मताधिकार असावा, आफ्रिकन टोळयानी सवतासुभा न ठेवता एक व्हाव अस आवाहन करणार होत ANC वेळोवेळी निषेध मोर्चे, सभा, अहिंसात्मक आदोलन, निवेदन, पत्रकं याद्वारा अन्यायाविरुद्ध आवाज उठवायची. पण उत्तर मिळायच ते बदुकीच्या नळीतून. १९१३ च्या 'नेटिव लॅंड अॅक्ट'द्वारे हजारो आफ्रिकन लोक त्याच्या भूप्रदेशावरून हलवून त्याच्यासाठी 'राखून' ठेवलेल्या जमिनीवर ठेवण्यात आले परिणामत. आज एकूण जमिनीच्या १२.७ टक्के जमीन ऐंशी लाख आफ्रिकनासाठी तर ८७ टक्के जमीन वीस लाख गोऱ्यासाठी अशी स्थिती आहे.

परवाना पत्रकाचा कायदाही चारही राज्यांना लागू करण्यात आला.

१९१० पासून १९३६ पर्यंत वेळोवेळी जुलमी कायदे केले गेले वशभेदाला खतपाणी घालणारे, सापत्नभाव रुजवणारे असे एकूण छत्तीस कायदे या पचवीस, वर्षाच्या कालखडात अमलात आले.

१९४८ साली नतर लागोपाठ तीन महत्त्वाचे कायदे समत झाले ते कायदे गोऱ्या वशाच वर्चस्व निर्विवादपणे वैध ठरवणारे आहेत 'अपार्टहेट' व्यवस्थेला मजबुती देणारे हे तीन कायदे.

### पॉप्युलेशन रजिस्ट्रेशन अॅक्ट

प्रत्येक व्यक्तीच वाशिक वर्गीकरण केलं जात कोणत्याही प्रकारच्या ओळखपत्रावर वशाची नोद आवश्यक ठरवली आहे एका वश गटातून दुसऱ्या वश गटात जाणाऱ्या व्यक्तीवर यामुळे बदी घालता येते.

### इम्मॉरॅलिटी अॅक्ट / मिक्स्ड मॅरेज अॅक्ट

१६८५ सालीच 'इम्मॉरॅलिटी अॅक्ट' अस्तित्वात आला गोरे आणि गौरेतरात विवाह सबध टाळण्यासाठी हा कायदा. १९४८ साली या कायद्याचे नूतनीकरण 'मिक्स्ड् मरेज अॅक्ट' नावाने झाले. १९८५ साली हा कायदा कागदावरून गेला. तरीही 'ग्रूप अॅरियाज अॅक्ट' आणि 'पॉप्युलेशन रजिस्ट्रेशन अॅक्ट' आजही अस्तित्वात असल्याने मिश्र विवाह झाले तरी ते टिकवता येत नाहीत दोन भिन्न वशाच्या लोकाना एकत्र राहाता येत नाही.

### ग्रुप अॅरियाज अॅक्ट

प्रत्येक वशाच्या लोकाना भूखड-विशेषत. शहरी विभागात-नेमून दिलेला असतो. तिथेच त्यांनी वास्तव्य करायच. (१९८४ पर्यंत अशा प्रकारचे ८९९ भूविभाग जाहीर करण्यात आलेत. पैकी ४५१ भूविभाग गोऱ्यासाठी (एकूण भूप्रदेशाच्या ८३ ६%) ३२७ म्हणजे १० ६% कलर्डसाठी, १२२ भूविभाग (म्हणजे ५ ६%) हिंदी लोकासाठी. भूविभाग निश्चित केल्यानतर त्यानुसार लोकाची विभागणी करण्यात आली यावेळी २% गोऱ्याना, ३२% हिंदोना आणि ६६% आफ्रिकन लोकाना स्थानातर करावं लागलं.)

या अपार्टहेट व्यवस्थेला बळकटी मिळाली ती तिथल्या अर्थव्यवस्थेने काळे मजूर स्वस्तात उपलब्ध आहेत आणि ते प्रचड प्रमाणावर आहेत. त्यामुळे इथल्या उद्योगधद्यात नफ्याच प्रमाणही प्रचड आहे परदेशी कपन्यानी इथे गुतवणूक वाढवलीय. उद्योगधद्याचा विस्तार वाढलाय. कामगाराचे शोषण वाढलेय. ट्रेड युनियन्स, सघ यावर बदी आहे.

१९१२ पासूनच ANC हे सर्व कायदे रद्द करावेत, वशभेद निपटून टाकावेत, नागरिकत्वाचे हक्क, सक्तीचं शिक्षण हे व यासारख्या विषयाना प्राधान्य देऊन प्रस्थापित राज्यसत्तेला विरोध दर्शवत आलीय लोकमत जागृत करत आलीय. नेल्सन मडेला १९४० साली ANC चे सदस्य झाले. ¤

सभेचे आयोजन होते. तीन हजार प्रतिनिधीनी उपस्थिती लावली. सर्व धर्माचे, सर्व वशाचे, सर्व सामाजिक थराचे आणि वर्गांचे प्रतिनिधी तिथे होते.

स्वातत्र्याची सनद सेलोथो, झोला या स्थानिक भाषात आणि नंतर इंग्रजीत वाचली गेली. उपस्थित प्रतिनिधीनी तिला एकमताने मान्यता दिली.

दुसऱ्या दिवशी रविवारी दुपारी प्रतिनिधी बैठकीस बसले होते. आणि अचानक पोलिसाची धाड पडली. प्रत्येक कागद जप्त झाला. अगदी भोजनाची व्यवस्था सागणारा 'शाकाहारी', 'मांसाहारी' फलकही... तिकडे दुर्लक्ष करून प्रतिनिधीनी बैठक सपवली. राष्ट्रगीत झालं.

¤

एकमुखाने खालील सनद मान्य झाली ही लक्षणीय घटना. या घटनेनतर तीस वर्षांनी 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' स्थापन झाली. तिलाही ही सनदच आधारभूत ठरली. सर्व राजकीय सघटनानी 'बायबल' म्हणून स्वीकारली.

नेल्सनवरील बदीहुकूम त्या वर्षाअखेरीस सपत होता. पोलिसांनी तत्परतेने नवा बंदीहुकूम ५ वर्षांसाठी लागू केला.

¤

१९५५ पासून परवानापत्रकाचा कायदा स्त्रियावरही लागू करण्यात येत असल्याच जाहीर झाल. आणि सर्वत्र एकच उद्रेक झाला. हजारो परवाना पत्रकाची होळी झाली निषेध पत्रकाच्या थप्प्यानी सरकारी कार्यालय व्यापली.

सरकारन धरपकड सुरू केली. नेल्सन आणि त्याच्या सहकाऱ्यांसकट दीड–दोनशे लोकाना अटक झाली. राजद्रोहाच्या आरोपाखाली त्याच्यावर खटला भरला.

हा खटला चालवण्यासाठी लोकानी उत्स्फूर्तपणे निधी उभारायला सुरुवात केली लोकाना आता आपल्या शक्तीची जाणीव होत होती. आरोपीची जामिनावर मुक्तता झाली.

लळत लोबकळत खटल्याची तपासणी सुरू झाली. सरकारला घाई नव्हती, पैशाची अडचण नव्हती. खटला आरामात चालू–

नेल्सन मडेला आणि ऑलिव्हर टांबो आपली वकिली साभाळून एकीकडे निधी उभा करण्यासाठी धावपळ करत होते. दुसरीकडे बचावाची बाजू कशी माडायची याची तयारी करत होते. याच सुमारास ऑलिव्हर टांबोचं लग्न ठरलं. त्याची नियोजित वधू अॅडेलेट. अॅडेलेट बाराग्वानाथ रुग्णालयात परिचारिका होती. त्याच रुग्णालयात वैद्यकीय समाज–सेविकेच्या पदावर काम करणारी विन्नी माडीकीझेला ही तिची जिवलग मैत्रीण. त्या दोघी राहायच्याही एकाच वसतिगृहात अॅडेलेडमुळे विन्नीचा ऑलिव्हरशी आणि ऑलिव्हरमुळे नेल्सन मडेलाचा विन्नीशी परिचय झाला.

नेल्सनने विन्नीला प्रथम भेटीतच विचारल– 'राजद्रोहाचा खटला चालवण्यासाठी निधी उभा करतोय; त्यात हातभार लावशील'?

विन्नीन हो म्हटल.

हा होकार दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासानं अधोरेखित केला.

## स्वातंत्र्याची सनद : काही कलमे

- दक्षिण आफ्रिकेत राहाणाऱ्या लोकाच्या इच्छेविरुद्ध कोणतेही सरकार सत्तेवर येणार नाही.
- लोकाचे राज्य असेल.
- वशभेदास वाव न ठेवता सर्व राष्ट्रीय घटकाना समान हक्क असेल.
- राष्ट्रीय सपत्तीवर जनतेचा हक्क राहील.
- कसेल त्याला जमीन.
- समान कायदा– समान न्याय
- समान मानवी मूलभूत हक्क.
- इच्छेनुसार कार्यक्षेत्र निवडण्याच स्वातत्र्य.
- कामगाराचे हित आणि सुरक्षितता
- बेकारीविरुद्ध सुरक्षितता इ.

## संकटाशी लग्न

नॉमझॅमो विन्नीफ्रेड माडीकीझेला ही देखील झोसा जमातीतली. ट्रान्स्केईमध्ये एका प्राथमिक शिक्षकाच्या पोटी जन्मलेली. तिचे वडीलही झोसा जमातीच्या एका नायक कुळीतले. शिक्षणाशिवाय या देशाची परिस्थिती सुधारणार नाही म्हणून शिक्षणाला त्यानी वाहून घेतले. विन्नीचे प्राथमिक शिक्षण त्याच्याच शाळेत झाले शेजारच्याच गावात वसतिगृहात तिन पुढचं शिक्षण घेतल. तिला आठ भावडं. वडिलाचा पगार बेताचा, शेती उत्पन्न बेताचच. त्यामुळे बालपण कष्टातच गेल.

वडिलाची इच्छा विन्नीने प्रशिक्षित समाजसेविका व्हावं, आपल्या लोकाची सेवा करावी.

विन्नीने कॉलेज प्रवेश परीक्षा दिली आणि काळ्याना समाज–सेवेचं प्रशिक्षण देणाऱ्या कॉलेजात प्रवेश घेतला. हे कॉलेज होतं जोहान्सबर्गमध्ये. 'हॉफमेयर स्कूल ऑफ सोशल वर्क' तिथे तिच्या राहाण्याची सोय काळ्या मुलींसाठी असलेल्या वसतिगृहात झाली.

विद्यार्थिदशेतच विन्नीचा ANC च्या आणि युवासंघटनेच्या कार्याशी परिचय झाला.

१९५२ मध्ये ANC ने देशव्यापी असहकार पुकारून मोठ्या प्रमाणावर आदोलन आयोजलं. त्यावेळी विन्नी जोहान्सबर्गलाच शिकत होती. तिच्या वसतिगृहातील आणि कॉलेजातील बहुतेक सारे विद्यार्थी ANC चे कार्यकर्ते, सभासद आहेत हे तिला समजलं. या विद्यार्थ्यांत आपसात राजकीय घडामोडीची चर्चा चाले. वादविवाद होत त्याची राजकारणातली समजूत विन्नीला थक्क करी. आपणही कुठे कमी पडू नये म्हणून विन्नीने वाचन वाढवले. जुलमी कायदे मोडू पाहाणाऱ्या, पूर्ण नागरिकत्व, पूर्ण लोकशाही यासाठी झगडणाऱ्या या सघटनेत सामील व्हावं, चळवळीत उतरावे असे विन्नीला वाटायचे. पण वडिलानी आपल्या शिक्षणासाठी घेतलेले कष्ट पाहून विन्नीने ठरवले आधी शिक्षण पुर करायच.

सर्व तरुणाच्या मुखी वॉल्टर सिसुलू, नेल्सन मडेला, ऑलिव्हर टांबो वगैरे तरुण कार्यकर्त्यांची नावं नाचत असत. बऱ्याच जणानी त्याना प्रत्यक्ष पाहिलेलही नव्हत. तरी ही नाव जपमाळेसारखी वारवार तोडात फिरत.

हॉफमेयर शिक्षण सस्थेतून समाजसेवेची पदविका मिळवणारी विन्नी ही पहिली आणि शेवटची झोसा विद्यार्थिनी. १९५४ साली

'बांटु शिक्षण पद्धती' सुरू झाली आणि ही संस्था सरकारने बंद केली.

विन्नी पदविका परीक्षा उत्तम तऱ्हेने पास झाली. तिच्या या यशामुळे पुढील अभ्यासासाठी एक अमेरिकन शिष्यवृत्तीही चालून आली. त्याच वेळी जोहान्सबर्गमधीलच बाराग्वानाथ रुग्णालयाने वैद्यकीय समाजसेविकेची नोकरीही देऊ केली. हे रुग्णालय केवळ आफ्रिकन लोकांसाठी होते. विन्नीने शिष्यवृत्तीचा मोह टाळून नोकरी पत्करली. वैद्यकीय समाज–सेविकेचे काम करणारी विन्नी ही पहिली काळी स्त्री.

प्रशिक्षणाच्या काळात विन्नी अनेकदा सोवेटो* वस्त्यातून जात असे. तिथलं अज्ञान, आरोग्याविषयीची अनास्था, दुःस्थिती सारे तिनं पाहिलं होतं. या नोकरीच्या माध्यमातून आपण त्यांची सेवा करू असा विचार करून विन्नीने नोकरीचा निर्णय घेतला.

तिच्या या निर्णयाने तिच्या वडिलांना आनंदच झाला.

या रुग्णालयात विन्नी नोकरी करू लागल्यावर थोड्याच दिवसांत नेल्सन मंडेलाशी परिचय होण्याचा योग आला. नेल्सनबद्दल विन्नी ऐकून होती. एवढ्या मोठ्या व्यक्तीशी प्रत्यक्ष बोलताना आधी ती जरा बावरलीच. गंमत म्हणजे दुसऱ्या दिवशीच नेल्सननं तिला भोजनाचे निमंत्रण दिलं. तिला न्यायला नेल्सनचा एक मित्र आला.

...तो रविवार होता... पण नेल्सनला सर्वच दिवस सारखे. कामाला खळ म्हणून नाही. मी त्याच्या मित्राबरोबर कार्यालयात गेले तर तो आपला फायलींच्या ढिगाऱ्यात बुडालेला... मग आम्ही एका हिंदी भोजनगृहात गेलो... मी प्रथमच हिंदी भोजनाची चव घेतली... भारी तिखट... सारखं पाणी पीत होते... नेल्सनला मात्र हिंदी भोजन फार प्रिय. पण एक घास सरळ म्हणून काही मुखात गेला नसेल. प्रत्येक घासागणिक त्याला कोणी ना कोणी येऊन भेटायचा. सल्ला–मसलत करायचा... मी शेजारी असून नसल्यासारखी. जेवण झाल्यावर टेबलापासून त्याच्या गाडीपर्यंत पोचायला अर्धा तास लागला. पावलागणिक माणूस आडवा. असा हा पहिल्यापासूनच माझा असून माझा नसलेला.'

सकाळी कामं उरकून दोघं गावाबाहेर फिरायला गेली. तिथं नेल्सननं विन्नीला विचारलं– 'राजद्रोहाचा खटला लढवण्यासाठी निधी उभारतोय. त्यात हातभार लावशील?' विन्नीची राजकीय मतं काय, तिचा कल कुठे वगैरे विचारण्याच्या भानगडीत न पडता त्यानं तिला आपलं काम सांगितलं.

विन्नीनं हो म्हटलं.

नंतरच्या एका भेटीत त्यानं तिला विवाहाचा पोषाख शिवायला टाकायला सांगितला. 'माझ्याशी तो लग्न करणार आहे, हे त्यानं मला असं सांगितलं... मी ही वार्ता वडिलांच्या कानावर घालण्यासाठी गावी गेले... त्यांना तर आश्चर्याचा धक्काच बसला. नेल्सन मंडेला आता नेतेपदी होता. सारी द. आफ्रिका त्याला ओळखत होती. मान देत होती. कोलंबसला आपल्या मुलीचे कौतुक वाटले.

* सोवेटो : South Western Townships : Soweto

जोहान्सबर्गच्या नैर्ऋत्येला दहा मैलांवर आफ्रिकन लोकांसाठी राखीव जागा.



विन्नी मंडेला : भारतीय पोषाखात

पण बापाचं हृदय. म्हणाला–'पोरी सांभाळ. संकटांशी लग्न करतेस. पदरात वादळ घेतेस...'

१४ जून १९५८ रोजी नेल्सन–विन्नीचा विवाह बिझानाच्या मेथॉडिस्ट चर्चमध्ये पार पडला. राजद्रोहाचा खटला चालू होता आणि जोहान्सबर्गबाहेर जाण्यावर बंदी होती म्हणून चार दिवसांची खास सवलत घेऊन नेल्सन आपल्या विवाहास उपस्थित होता.

नवविवाहित मंडेला दांपत्य जोहान्सबर्गच्या सोवेटातील ऑरलांडो वसाहतीत ८११५ क्रमांकाच्या घरात राहू लागले. काळ्या वसाहतीतलं घर. त्यामुळे खास पत्ता असा काही नाहीच. मात्र हा घर क्रमांक पोलिसांना चांगलाच तोंडपाठ. रात्री–अपरात्री तिथे त्यांच्या

फेऱ्या असायच्या. तासन्तास, दिवसेंदिवस पाळत असायची. कधी हा नियमबाह्य वागतो आणि कधी आपण त्याला पकडतो यासाठी ते सदैव दक्ष. त्यामुळे हा घरकमाक ते झोपेतही सांगू शकत.

...'आमचा संसार सुरू झाला तो काही चारचौघासारखा नव्हे. रोज पहाटे उठून नेल्सन चाळीस मैल प्रवास करून प्रिटोरियाला जायचा. राजद्रोहाच्या खटल्यात गुतलेल्याची सुटका करण्यासाठी अनेक वकील जुपले होते. त्याच्यासमवेत हा तिथे बराच वेळ असे... घरी आला की घाईने स्नान-भोजन उरकायचा... भोजन कसल, तोंडाकडे घास नेतो न नेतो तोच फोन खणखणायचा. कोणासाठी जामीन राहायचं असे किंवा कोणी तरी सल्ला मागत असे... भोजन उरकलं की तो ANC च्या कार्यालयात. तिथे तो गेला तरी लोकाची रीघ घरी असेच. कोणाचा ना कोणाचा नातेवाईक पकडलेला असे... त्याला सोडविण्यासाठी त्याने नेल्सनकडे धाव घेतलेली असे... एकूण नव्या नवतीचा संसार वगैरे असला काही प्रकार नव्हताच.'

आपल्या वैवाहिक जीवनात रंगीत स्वप्नाची बरसात नसणार याची तिला पूर्ण कल्पना होती. 'पण म्हणून नववधूने घटका दोन घटका आपल्या पतीच्या सहवासात घालवू नयेत अस कुठय ?'

नेल्सनला त्याच्या लोकापासून, त्याच्या कामापासून अलग करणे शक्यच नसे. देश प्रथम-बाकी सारं दुय्यम. 'त्याने तन-मन-धनाने आपल्या कार्याला वाहून घेतलं होत हे खर... पण तरीही एक खर, जे काही क्षण आम्ही एकत्र असू मी त्याच्या प्रेमात न्हाऊन निघत असे.

अर्थार्जनासाठी वकिली करणं त्यान केव्हाच सोडले. अन्यायी कायद्याशी झुजण्यासाठी त्याची वृद्धी राबत होती. विन्नीच्या नोकरीवर घर चाले. त्यातही पुन्हा नेल्सन कधी जेवायला एकटा येत नसे. आठ-दहा साथी सोबत असायचे 'विन्नी तुझ्या हाताची चव घ्यायला आलेत...' घरातल असल नसल फस्त व्हायच. मग काही बाही खाऊन मी माझी भूक भागवायची

बँकेत खातं वगैरे नव्हतच एखादा आफ्रिकन बाधव काही विकण्याचा उद्योग करताना आढळला तर ती वस्तू नको असली तरी त्याला प्रोत्साहन म्हणून हा ती विकत घ्यायचा नतर ती वस्तू कोपऱ्यात पडून राहायची.

लग्नानतर काही दिवस गेले असतील-नसतील तोच एके दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास मंडेलाच्या दारावर थाप पडली. पोलिसानी छापा घातला. शेजारीपाजारीसुद्धा झोपेतून दचकून उठावेत असा गोंधळ घालून ते गेले. काही म्हणून हाताळायच शिल्लक ठेवलं नव्हतं. पुस्तक, कपाट, कपडे, फायली, पत्र, बिछान्यावरच्या चादरी... सार काही उलथपालथ करून झाल आणि तेही मिटल्या तोंडाने नव्हे, 'काफीरां'ना, 'काळ्याना' शिवीगाळ करत.

पोलिस गेल्यावर मंडेला दापत्यान घराची आवराआवर केली. 'आता अशा धाडीची सवय ठेव बर !' अशी विन्नीशी कानगोष्ट करून मग नेल्सनने बिछान्यावर पाठ टेकवली.

नेल्सनच्या घरावर अशा धाडी पडत असतात असं विन्नी ऐकून होती, पण तो प्रकार किती भयानक आहे हे प्रथमच अनुभवत होती

¤

विन्नीनं आदोलनात उतरायच म्हटल असत तर नोकरीवर पाणी सोडावं लागलं असतं. आणि मग खायचं काय ?

पण असं असूनही विन्नी एका आदोलनात उतरलीच.

तिन ANC च्या स्त्री शाखेच सदस्यत्व घेतलं. तसच, फेडरेशन ऑफ साऊथ आफ्रिकन वुमेन या बहुवांशिक सघटनेचही सदस्यत्व घेतल. या सघटनेत तिला हेलन जोसेफ, लिलियन एन्गोची, आल्बर्टिना सिसुलू आदी स्त्रियाच्या सहवासाचा लाभ घडला.

स्त्रियावर परवानापत्रक कायदा लादल्याच्या निषेध मोर्च्यात ती सहभागी झाली. त्यात तिला अटक झाली... आणि तिची नोकरी सुटली.

या प्रकरणात बाराशेजणी तुरुगात गेल्या. पोलिस गाड्यातून त्याची रवानगी झाली.

विन्नीच्या आयुष्यातला हा पहिलाच तुरुंगवास. १९५८ सालच्या ऑक्टोबर महिन्यातली ही घटना.

तुरुगात तर सगळ्याच गोष्टीची अनास्था होती. पाण्याचं दुर्भिक्ष्य. मलमूत्र विसर्जनाची गैरसोय, शौचालयाचा पत्ताच नाही. घाणीचा बुजबुजाट. उवा, झुरळाचा सुळसुळाट. विन्नी त्यावेळी गर्भवती. तिला ही दुर्गंधी, घाण असह्य व्हायची. त्यात पुन्हा पोलिसी हडेलहप्पी. या साऱ्याचा ताण तिला सहन झाला नाही. रक्तस्राव सुरू झाला. गर्भपात होतोय की काय अशी वेळ आली. आल्बर्टिना सिसुलू विन्नीबरोबर होती. आल्बर्टिना प्रशिक्षित परिचारिका, विन्नीची स्थिती तिच्या लक्षात यायला वेळ लागला नाही तिन तातडीन तिथल्या तिथे जमवाजमव करून विन्नीला विश्रांती मिळेल अशी सोय केली. त्या तशा तुरुगात तशा अवस्थेत पधरा दिवस काढल्यावर विन्नीची सुटका झाली.

नोकरीवरून काढून टाकल्याचे विन्नीला वाईट वाटले या वाईट वाटण्यामागे आर्थिक अडचणीपेक्षा समाजसेवेची एक चागली संधी गेली हा भाग अधिक होता. वैद्यकीय समाजसेविकेच्या कामात विन्नीला विलक्षण रस. या पदावर असताना कामाच्या निमित्ताने ती सोवेटोच्या घराघरातून गेली. त्याच्या अडचणी समजून घेऊन उपाय सुचवले. आता हे काम पुढे कोण चालवणार ?

कृष्णवर्णीयाच्या वृत्तपत्रातून विन्नीच्या वडतर्फीचा गवगवा झालाच त्या रुग्णालयान तिला पुन्हा नोकरीवर घेतल नाही, पण 'चाईल्ड वेलफेअर सोसायटी'ने तिला समाजसेविका म्हणून नेमल.

हीदेखील नोकरी तिला मानवली लहान मुलाच्या समस्या समजून घेताना तिचा अनेकाशी सपर्क यायचा. सोवेटोतील सेवेमुळे तिचा तिथे आदराने उल्लेख होऊ लागला. ती केवळ नेल्सन मंडेलाची पत्नी नाही, त्याहीपेक्षा अधिक काही आहे, याची जाणीव त्याना होऊ लागली

¤

१९५५ साली परवाना पत्रक जाळल्यावर सरकारन नेल्सनसकट दीडदोनशे लोकांवर राजद्रोहाचा खटला भरला होता. नेल्सन आणि त्याच्या सहकारी मित्रानी त्यापैकी साठ लोकाची मुक्तता करण्यात यश मिळवल. अजून तीस बाकी होते त्या तिसात बहुतेक सर्व नेते मडळी होती.

नेल्सनची ही धावपळ चालू होती. त्याच्यावर सरकारी बधनही होती. ती चलाखीन साभाळत ANC च्या बैठकाही चालू असायच्या.

विन्नीचं पहिलं बाळतपण... काळजी घ्यायला म्हणून घरात

कोणी नाही. तिला प्रसववेदना सुरू झाल्या तेव्हा ती शेजाऱ्यांच्या मदतीनं प्रसूतिगृहात पोचली.

नेल्सन दुसऱ्या दिवशी पहाटे परतला तेव्हा रुग्णालयात बाळ–बाळंतीण खुशाल असल्याचं समजलं. विन्नीच्या अडचणीच्या वेळी धीर द्यायला, तिच्या मनावरचा ताण हलका करायला आपण घरी नव्हतो हे नाही म्हटलं तरी त्याच्या मनाला लागलंच.

मुलीचं नाव ठेवलं झेनानी.

विन्नी बाळंतपणातनं उठली आणि पुन्हा पहिल्यासारखी ANC च्या कामाला लागली. नेलसनचं कामही फार वाढलं होतं. त्याला मदत करू लागली. त्याच्या गैरहजेरीत तिनं कोणती खबरदारी घ्यावी, कोणती पावलं उचलावीत या दृष्टीने तो तिला तयार करू लागला.

आताशा ANC मध्ये वैचारिक ताण–तणाव वाढले होते. युवा संघटनेचा असंतोष जाणवू लागला. ANC चे उपक्रम त्यांना मवाळ आणि म्हणून प्रभावहीन वाटू लागले. शिवाय कोणत्याही गोऱ्या संघटनेशी आणि कम्युनिस्टांशी हातमिळवणी करणं त्यांना मान्य नव्हते. काहीतरी ठोस कृती स्वतंत्रपणे करून दाखवावी, यासाठी ते उतावीळ झाले.

नेल्सन युवा संघटनेचा अध्यक्ष होता तरी ANC मध्ये जहाल–मवाळ गट पडून दुफळी व्हावी हे त्याला पटत नव्हतं. तासन् तास बैठका घेऊन त्यानं सर्वांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. पण तो यशस्वी झाला नाही. शेवटी एप्रिल १९५९ मध्ये जहाल गट फुटून बाहेर पडला आणि त्यानं पॅन आफ्रिकन काँग्रेस (PAC) स्थापली. ¤

परवाना पत्रकाचा कायदा हा कायम धुमसत असणारा विषय. हाच विषय हाती घ्यायचं ANC ने ठरवलं.

ANC प्रमुख लुटूली आणि ऑलिव्हर टांबो यांनी देशभर दौरा आखला. ठिकठिकाणी सभा घेतल्या. सरकारला तर या लुटूलींचा विलक्षण धाक. त्यांच्या स्वागताला नि सभेला एका एका वेळी तीस तीस हजारांची उपस्थिती असे. विशेष म्हणजे गोरेही त्यांच्या भाषणानं प्रभावित व्हायचे. त्यामुळे सरकारचा त्यांच्यावर कायम दात. कितीदा बंदी हुकूम लावले कितीदा स्थानबद्ध केलं हे त्यांनाच काय पण सरकारलाही आठवत नसावं.

१९६० मध्ये अनेक आफ्रिकी राष्ट्रं स्वतंत्र झाली. त्यामुळे द. आफ्रिकेत उत्साहाचं वारं वाहू लागलं. तशात लुटुलींनी द. आफ्रिका सरकारची आर्थिक कोंडी करा म्हणूनही हाकाटी सुरू केली.

परवाना पत्रकदहन मोहिमेत ANC बरोबरीने आणखी तेरा निरनिराळ्या संघटना पुढे सरसावल्या.

पुन्हा एकदा परवाना पत्रक जाहीरपणे दहन करण्याची राष्ट्रव्यापी मोहीम आखली. ३१ मार्च १९६० ही तारीख ठरली. नेल्सनचं घर क्रमांक ८११५, ऑर लँडो, माणसांनी ते गजबजून गेलं. विन्नी तर या कामात डोक्यापर्यंत बुडाली. तिच्या नेतृत्वाचा, संघटना चातुर्याचा अंदाज साऱ्यांनाच आला.

सर्व काही व्यवस्थित जुळवलं जात असतानाच PAC नं घोटाळा केला. ANC नं जाहीर केलेल्या तारखेच्या दहा दिवस आधीच दहन दिन जाहीर केला. ही चाल आततायीपणाची आहे, पुरेशी पूर्व तयारी न करता केलेली आहे हे नेलसनच्या लक्षात आलं पण त्यानं विरोध दर्शवून मोडता घातला नाही. मात्र त्याला या मोहिमेचं उत्तरदायित्व घ्यावं लागलंच.

शार्पविले वसाहतीत मोठीच दुर्घटना घडून आली. 'लोकांची स्वातंत्र्येच्छा फार काळ दाबून ठेवता येणार नाही' असा इशारा नेलसननं १९५२ साली सरकारला दिला होता, त्याचं प्रत्यंतर आलं.

शार्पविले पोलिस स्टेशनबाहेर पाच हजारांचा जमाव जमला होता. अत्यंत शिस्तीनं आणि शांततेनं निदर्शनं चालू होती... सरकारच्या हवाईदलाची विमानं खालवर उतरून सर्व पाहणी करून गेली–

दुपारी पोलिसदलाच्या गाड्या आल्या. सरकार आता काय जाहीर करतंय याची लोक आतुरतेनं वाट पाहू लागले. आपसात गप्पा-गोष्टी, हास्य-विनोद चालू होते... आणि एकाएकी गोळीबार सुरू झाला. दंगल, गोंधळ-रेटारेटी. मृत कलेवरं पायी तुडवून लोक सैरावैरा धावू लागले, ६९ माणसं ठार झाली. त्यात ८ स्त्रिया नि १० लहान मुलंही होती. बहुतेक सर्वांना पाठीत गोळ्या बसल्या होत्या. आपल्याकडच्या 'जालियनवाला बाग हत्याकांडा'ची आठवण यावी असा प्रकार.

दरम्यान केपटाऊनमधील दोन कृष्ण वसाहती–लांगा आणि न्यांगा–यात उद्रेक झाला. तिथले रस्ते आठवडाभर निदर्शकांनी व्यापले होते.


कष्टाचं चांदणं व्हावं,
उत्साहाला बहर यावा,
आनंदाची फुले वेचत
प्रत्येक क्षण तृप्त व्हावा

• दीपावली शुभेच्छा!

डी.एस. कुलकर्णी अॅण्ड कंपनी

प्रमोटर्स अॅण्ड बिल्डर्स

११८७/६०, जंगली महाराज रोड,
मॉडर्न हायस्कूलजवळ, शिवाजीनगर,
पुणे - ४११ ००५.
फोन : ५६४४६, ५४८३०, ५९८७७

मुंबई ऑफीस : ५, 'उपासना', दुसरा मजला,
दादरच्या कोहिनूर मिल शोरूमजवळ,
माहीम, मुंबई-४०००१६. फोन : ४३० १८ ८३

DSK

घराला घरपण देणारी माणसं

अनेक कामगार, मजूर यानी घरी बसून असहकार दर्शवला. हे लोक लांगात एकत्र जमले तेव्हा त्यांच्यावरही पोलिसानी गोळीबार केला. १४ व्यक्ती ठार झाल्या अनेकजण जखमी झाले.

AFC चे अध्यक्ष लुटुली यानी देशव्यापी दुखवटा पाळण्याचं आवाहन केलं. कर्मचाऱ्यानी घरीच राहाव असं सांगितलं. त्याच्या या आवाहनामुळ ANC आणि PAC याच्यातल्या मतभेदाची धार कमी झाली.

या हरताळानं सरकार पिसाळल. चिडून सूडसत्र सुरू केलं. मोठ्या प्रमाणावर धरपकड होणार याचा अदाज असल्यानं ANC च्या नेत्यानी आपला एक खबीर प्रतिनिधी देशाबाहेर पाठवायच ठरवलं. या नेत्यान देशाबाहेर राहून चळवळीला दिशा देण्याचं आणि इतर देशापुढं आपली भूमिका माडण्याच काम करायच होत.

ऑलिव्हर टाबो यांची एकमतान या कामी निवड झाली. ते शिताफीनं देशाबाहेर निसटले. लडनला पोचले. आजही देशाबाहेरच आहेत. तिथूनच ते चळवळीला दिशा देत असतात.

हरताळ शाततेनं, अहिंसात्मक पद्धतीनं पाळावा अस ANC नं कितीही आवाहन केलं तरी लोकमत एवढ प्रक्षुब्ध होत की दगली, जाळपोळ, दगडफेक या घटना घडल्याच... दोन दिवसात सरकारनं आणीबाणी जाहीर केली.

१ एप्रिल १९६० रोजी नेल्सन मडेला आणि त्याच्या इतर सहकाऱ्याची तुरुगात रवानगी झाली. ANC आणि PAC याच्यावर सरकारन 'सप्रेशन ऑफ कम्युनिझम ॲक्ट'खाली बदी घातली

देशभर एकूण दोन हजार लोक तुरुगात गेले

नेल्सन तुरुगात गेल्यानतर विन्नी ANC च्या व्यापात अधिकच गुंतत गेली. यावेळी ती दुसऱ्यादा गर्भवती होती. राजद्रोहाच्या खटल्यातील आरोपीच्या बचावासाठी वकीलाची फळी उभी राहिली होती, ती आणीबाणी सुरू झाल्यावर मोडली. सद्य परिस्थितीत सरकारशी राजकीय कारणास्तव झगडण अशक्य आहे अस म्हणून अनेकानी माघार घेतली. मग नेल्सन आणि दुसरा वकील नाक्वे यानी ती जबाबदारी अगावर घेतली स्वत बदिस्त असूनही इतराच्या सुटकेसाठी धडपडू लागले.

तुरुगात तर सारी दु स्थितीच होती. आणीबाणीला भीक न घालता नेल्सननं कोर्टासमोर वस्तुस्थिती टेवली आणि जमतील तेवढ्या सोयी पदरात पाडून घेतल्या. अन्नाचा दर्जा सुधारायला लावला.

बदी नेल्सन मडेला राजद्रोहाच्या आरोपाविरुद्ध आपली बाजू माडायला कोर्टात उभा राहिला.

त्याचं निवेदन, उलट तपासणी मिळून एकूण ४४१ पृष्ठाचा ऐवज झाला. त्याची तर्कशुद्ध मुद्देसूद माडणी, कारण-मीमासा करण्याची पद्धत, हेतूचे स्पष्टीकरण याची देशात आणि देशाबाहेर वाखाणणी झाली

सपूर्ण ऑगस्ट महिना हा खटला चालू होता. याच सुमारास आणीबाणी रद्द झाली. पाच महिने तुरुंगवास भोगून नेल्सन बाहेर पडला

या पाच महिन्यात विन्नी सर्व लढाया लढत होती. झेनानी उर्फ झेनीची देखभाल, स्वत: गर्भवती, नेल्सनची काळजी, 'चाईल्ड वेल्फेअर'चं काम, ANC च काम...

नेल्सन मुक्त झाल्यावरही त्याच्या रोज जोहान्सबर्ग ते प्रिटोरिया खेपा चालू होत्याच. कारण खटला प्रिटोरियात चालू होता.

डिसेंबर महिन्यात विन्नीन दुसऱ्या कन्येला-झिङ्झीस्वा हिला जन्म दिला. आता तर विन्नीच्या लढायात आणखीनच भर पडली. पण पॉल आणि ॲडेलेड जोसेफ या हिंदी दापत्यानं बालसगोपनात विन्नीला खूपच मदत केली. त्याच्या जिवावर मुलीना सोडून विन्नी आपल्या लढाया लढायला मोकळी व्हायची. तिची धावपळ कमी व्हावी म्हणून याच सुमारास नेल्सननं तिला एक गाडी भेट दिली. तिचा तिला फार उपयोग व्हायचा: मधूनमधून खटला ऐकायला ती प्रिटोरियालाही चक्कर टाकून यायची.

मार्च १९६१ मध्ये खटल्याचा निकाल लागला. नेल्सन आणि त्याचे सर्व सहकारी निर्दोष ठरले. गेली चार वर्षं चाललेला हा खटला नेल्सनच्या अनेक गुणावर, पैलूवर प्रकाश टाकून गेला.

या खटल्याचा निर्णय जाहीर होताच लोकानी आपल्या नेत्याना खाद्यावर उचलूनच कोर्टाच्या बाहेर आणलं. नाच-गाण्यानी आसमंत भरून गेला. राष्ट्रगीतान दाही दिशा व्यापल्या. हा आनदोत्सव चालू असतानाच नेल्सनचा ज्येष्ठ सहकारी, विश्वासू मित्र वॉल्टर सिसुलू यानं विन्नीला बाजूला काढल घरी जाऊन नेल्सनची बॅग तयार ठवायला सागितली.

विन्नीनं का म्हणून विचारल नाही

विन्नी घरी आली. तिथे तर मोठा जमाव नेल्सनची वाट पाहत खोळबला होता. कोणालाही सशय येऊ न देता विन्नीन नेल्सनची बॅग भरली. अभिनदनाचा, आनदाचा जल्लोष चालू असताना वॉल्टर सिसुलू बॅग घेऊन सटकला.

नेल्सन त्याच दिवशी भूमिगत झाला. गेली दहा वर्षे नेल्सनवर संचार मनाई लादलेली होती. सभेलाही त्याला उपस्थित राहाता येत नसे. या बधनाची मुदत नुकतीच सपत होती. त्याची जाग येऊन पुन्हा बदी लादली जाण्यापूर्वी जेवढ काही स्वातत्र्य मिळेल त्याचा पुरेपूर लाभ त्याला घ्यायचा होता.

प्रिटोरियातून भूमिगत झाल्यावर नेल्सन एकदम उगवला तो नाताळच्या राजधानीत. पिटरमारिझबर्गमध्ये. देशभरातून १४०० प्रतिनिधी तिथे जमले होते. 'ऑल इन आफ्रिकन कॉन्फरन्स' भरत होती. दहा वर्षांच्या कालावधीनतर 'मनाई' बधनातून मोकळा होऊन नेल्सन सभेच्या ठिकाणी आला.

तो व्यासपीठावर चढला तोच अनवाणी पायांनी बहुजन समाजाचा एक प्रतिनिधी म्हणून.

आणीबाणी उठताच सर्व राजकीय सघटनानी नव्या राष्ट्रीय परिषदेची मागणी केली होती. वश, वर्ण, जात, जमात आदीचा अडसर न ठेवता सर्व स्त्री-पुरुषाना प्रौढ मतदानाचा हक्क मिळावा. त्यानी निवडलेल्या प्रतिनिधीची मिळून राष्ट्रीय परिषद तयार करावी ही परिषद लोकशाहीचा पुरस्कार करणारी घटना तयार करील अशी ती मागणी होती.

आता या सभेतही त्या मागणीचा पुनरुच्चार झाला. नेल्सनच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय पातळीवरची एक कृति-समिती तयार झाली. या कृति-समितीनं सरकारपुढे मागण्या ठेवायच्या आणि सरकारने

कसलाही प्रतिसाद दिला नाहीच तर तीन दिवसाचा देशव्यापी सप घडवून आणायचा अस ठरलं

ANC, PAC याच्यावर बदी घातल्यानं आफ्रिकन लोकाची निदर्शन मोडीत निघतील, आणीबाणीनंतर सर्व सुतासारखे सरळ होतील अशी सरकारची कल्पना होती. पण तुरुगात असतानाच मडेला आणि इतर नेत्यानी नवी धोरण आखली. तुरुगातून बाहेर आल्यावर भूमिगत होऊन ANC च्या कार्याला सुरुवात केली. त्याची फलश्रुती म्हणजे 'ऑल इन आफ्रिका कॉन्फरन्स'ला विविध सघटनाचे मिळून चौदाशे प्रतिनिधी उपस्थित होते.

मे महिन्यात नव रिपब्लिकन सरकार सत्तेवर यायचं होतं. तोवर सरकारनं आपल्याला प्रतिसाद दिला नाही तर तीन दिवसाचा सप पुकारायचा होता.

सभा सपताच नेल्सन भूमिगत झाला वेषातर करून देशभर सचार केला कानाकोपऱ्यात गेला

नेल्सन उच-निच तगडा, तुरुंगात असताना पहाटेचा व्यायाम कधी चुकला नाही पुन्हा प्रसिद्ध व्यक्ती. कितीही वेषातर केलं तरी पोलिसाच्या नजरेतून निसटणं कठीणच. पण तो धोका पत्करूनही नेल्सनचा संचार चालू होताच

विन्नीचं आता रोजच पहिलं काम म्हणजे वृत्तपत्र वाचण. नेल्सनला पकडल्याची बातमी आहे की नाही ते पाहून पुढचा कार्यक्रम ठरवण. कधी तरी तो तिला एखाद्या गाडीचा शोफर म्हणून दिसायचा तर कधी कुठे मेकॅनिक म्हणून आढळायचा. डोळ्याच्या कोपऱ्यातून ओळख दाखवून ते एकमेकाना अनोळखी व्हायचे...सुरक्षा पोलिस आपल्या पातळीवर असणार, आपल्याला तो भेटत असणारच याची त्याना खात्री असणार हे तीही जाणून होती म्हणूनच तो वारवार भेटावा अशी इच्छा असूनही विन्नी त्याला जाळ्यात अडकू देण्याइतकी गाफील नव्हती.

नेल्सन भूमिगत होण्याआधी काही दिवस विन्नीला त्याचे कपडे धुताना त्याच्या शर्टच्या खिशात एक पावती सापडली घराचं सहा-महिन्याच भाडे आगाऊ भरल होत. गाडीही ठाकठीक करून घेतली होती. गेले काही दिवस तो अबोल होता. आपल्या विचारात गढल्या-सारखा असे '... त्याच्यावरच प्रेम व्यक्त करायला कधी वेळच मिळाला नाही त्याच्या सहवासाचे जे काही क्षण मिळाले तेच आजवर मला टिकवून आहेत ...तो काही देवदूत नाही. मला त्याची नीट ओळख व्हायला सवड मिळाली असती तर त्याच्यातले अनेक दोष माझ्या नजरेत भरले असतेही...पण मी तर त्याच्यासाठी कायम आसुसलेली असायची...'

त्याच्या भेटी व्हायच्या त्याही मजेशीरच कोणीतरी गाडी घेऊन दारात यायचा मुलीना घेऊन गाडीत बस म्हणायचा विन्नी काय ते समजायची मग टप्प्या-टप्प्यावर मोटार बदलली जायची. अस किमान दहावेळा तरी व्हायच शेवटी गाडी एखाद्या घरासमोर उभी राहायची ते घर बहुतेक वेळा एखाद्या गोऱ्याचच असे. घरातली मंडळी जाणून बुजून 'नेमकी' कुठंतरी गेलेली असायची घटका दोन घटका मडेला कुटुब एकमेकाच्या सहवासात न्हाऊन निघायच

¤

नेल्सननं पत्रक काढून विद्यार्थी वर्गालाही आदोलनात सहभागी होण्यासाठी आवाहन केल. बाटु शिक्षण पद्धतीचे कोणते दुष्परिणाम होत आहेत याची जाणीव करून दिली. नॅशनल पार्टीला सत्तेवरून खेचलं नाही तर तुमच भवितव्य फार धोक्यात आहे, याचा इशारा दिला.

यावेळी शार्पविलेची पुनरावृत्ती घडू नये या दृष्टीने त्यानं काळजी घेतली. राष्ट्रीय कृती-समितीच्या वतीन पतप्रधानाना लेखी निवेदन दिले. मागण्या मान्य केल्या नाहीत तर संभाव्य निदर्शनाला तयार राहा म्हणून इशारा दिला. '...तुमच सरकार याला प्रतिकार करण्यासाठी कोणती पावलं उचलेल याविषयी आम्हाला पूर्ण जाणीव आहे... गेले बारा महिने आम्ही हुकूमशाहीचा अनुभव घेत आहोतच ...हिंसेच्या सत्तेच्या धाकाने आम्ही माघार घेणार नाही...'

पतप्रधानाकडून कोणत्याही प्रकारच उत्तर आल नाही.

प्रमुख विरोधी पक्ष युनायटेड पार्टी या पक्षाच्या नेत्यानाही नेल्सनने पत्र पाठवलं. '...तुमच्या पक्षाकडूनही राष्ट्रीय परिषदेची मागणी झाली तर या देशाच्या इतिहासाला वळण देणारी ती निर्णायक घटना ठरेल... तुमच्या निर्णयामुळे नॅशनॅलिस्ट सरकार एकाकी पडेल...'

इथूनही प्रतिसाद आला नाही.

हरताळासाठी २९ मे ही तारीख निश्चित झाली होती. त्या आधी तीन दिवस पोलिसानी धरपकडीच सत्र सुरू केल. हेलिकॉप्टर्स काळ्या वस्तीवर घिरट्या घालून टेहळणी करू लागली. ठिकठिकाणी पोलिस चौक्या उभ्या राहिल्या सोवेटोत प्रखर उजेडाचे दिवे लावले गेले... रजेवर असलेल्या पोलिसाच्या रजा रद्द करून त्याना हजर व्हायला सागितल... गावात गस्त घालत सुसज्ज पोलिस गाड्या फिरू लागल्या; जे कामगार कामावर न जाता घरी बसतील त्याना बडतर्फ केल जाईल असं ध्वनिक्षेपकावरून जाहीर करू लागल्या... आणि सर्वांत वरकडी केली ती पंतप्रधानाच्या घोषणेन. 'राष्ट्रीय परिषदेच्या प्रस्तावाला बळकटी आणणारी कृती वा उक्ती कम्युनिस्ट प्रणीत प्रयत्न समजला जाईल....' एक प्रकारची छुपी आणीबाणीच सुरू झाली दहा हजार व्यक्ती परवाना पत्रकाचा कायदा मोडल्याच्या आरोपाखाली कैद झाल्या.

PAC न ऐन वेळेस संपातून माघार जाहीर केली. सपाला विरोध दर्शवला.

ठरल्याप्रमाण २९ मे रोजी नियोजित तीन दिवसाच्या सपाला सुरुवात झाली. नोकरी जाण्याचा धोका पत्करून हजारो कामगार कामावर न जाता घरीच राहिले पण तरीही एकूण सपाचा जोर निराशाजनकच होता. नेल्सनन दुसऱ्या दिवशी सप मागे घेतला.

लडनहून खास आलेल्या वार्ताहरान त्याला सपाची फलश्रुती विचारली. त्याला उत्तर देताना नेल्सन म्हणाला-'हा सप चिरडून काढण्यासाठी सरकारने जी उपाययोजना केली ती पाहता सपाला प्रचड यश मिळाल अस म्हणायला हरकत नाही .. आमच्या अहिंसात्मक आदोलनास सरकार सर्व सामर्थ्यानिशी अस क्रूरपणे चिरडून टाकणार असेल तर आम्हाला आमच्या डावपेचाविषयी पुर्नविचार करावा लागल. आमच अहिंसात्मक धोरण बाजूला ठवाव लागल.'

भूमिगत असतानाच, २६ जूनला एक पत्रक काढून आपल धोरण

नेल्सननं जाहीर केलं. पुढचं पाऊल कोणत ते घोषित केलं.

असहकार !

आफ्रिकन जनतेच्या लाखो विदेशी हितचिंतकानी आफ्रिकानर सरकारवर आर्थिक, राजकीय बहिष्कार टाकावा, त्याला एकटं पाडाव यासाठी आफ्रिकन जनतेन प्रयत्न करावा. 'मी भूमिगत राहून कार्य चालू ठेवीनच विजय मिळेपर्यंत लढा चालूच राहाणार. तुम्ही काय ठरवलं आहे ? सरकारला सहकार्य देऊन आपल्याच लोकांचं अहित साधणार आहात ? आपल्याच लोकाचा जीवन–मरणाचा प्रश्न उद्भवला असताना शात–तटस्थ राहाणार आहात ? माझ्यापुरता मी निर्णय घेतलाय– मी शरणही येणार नाही. माझा देशही त्यागणार नाही. मी तुमच्या खांद्याला खादा भिडवून सरकारशी झगडेन...'

### घातपात संघटना

डिसेंबर १९६१ मध्ये ANC नव वळण घेत असतानाच एक महत्त्वाची घटना घडली. ANC प्रमुख आल्बर्ट लुटूली यांना नोबेल पुरस्कार मिळाला शाततेच नोबेल पारितोषिक.

आणि या घटनेनतर आठवडाभरातच ANC ने आपल शांततामय आदोलनाच धोरण बदलल.

जुलमी सरकार खिळखिळ करण्यासाठी नेल्सनच्या नेतृत्वाखाली घातपात संघटना उभी राहिली.

घातपात, दहशत, गनिमी कावा आणि क्राती यापैकी घातपात तंत्राचा वापर करायच ठरलं. कोणत्याही प्रकारे जीवित हानी घडू न देता घातपात तंत्रान सरकारला दमवावं या विचारानं १६ डिसेंबर १९६१ रोजी Umkhonto we Sizwe (Spear of the Nation) उर्फ MK ह्या सघटनेचा उदय झाला. हिच काम नेल्सनन पाहायचं आणि ANC च काम सिसुलून गुप्तपण चालू ठेवायच असं ठरल. MK सघटनेत ANC आणि कम्युनिस्ट पार्टी यातील काही सदस्य निवडले गेले रिवोनिया उपनगराबाहेरचे लिलिज्लिफ फार्म हे तिच छुपं कार्यालय म्हणून नेमस्त झालं.

आपल्या जाहीरनाम्यात नेल्सनन म्हटल– 'शरणागती पत्करायची की लढा देण्यासाठी तुटून पडायचं यातील पर्याय निवडण्याचा निर्णायक क्षण प्रत्येक देशाच्या आयुष्यात येत असतो. दक्षिण आफ्रिकेच्या आयुष्यातही तो निर्णायक क्षण येऊन ठेपलाय आम्ही हार मानणार नाही. आमच्या लोकाच्या सरक्षणासाठी सर्व ताकदीनिशी प्रतिघात करण्याखेरीज गत्यतर उरलेल नाही आमची शाततामय आदोलनं हे आमच्या दुबळेपणाच लक्षण अस सरकारला वाटत. आमच अहिंसात्मक धोरण म्हणजे आपल्या मुक्त हिंसाचाराला मोकळीक अशी त्यानी समजूत करून घेतलीय... आमच्या लोकाच्या मुक्ततेसाठी आम्ही नवा मार्ग चोखाळत आहोत...'

मग नेल्सनची धावपळ सुरू झाली. देशभर सचार... सेल तयार करणं... ठिकठिकाणी सघटना उभी करण... एक ठिकाण दुसऱ्याहून शेकडो मैल दूर... टेलिफोनवर संपर्क साधायची सोय नव्हती. त्यामुळं नेल्सनला सर्वत्र जातीने जावे लागे त्याच्या योजना M–Plan नावाने इष्ट ठिकाणी पोचू लागल्या.

घातपाती कारवायाना सुरुवात झाली. सरकारी कार्यालयं, विद्युत-केंद्रं, पोलिस चौक्या उद्ध्वस्त होऊ लागल्या. नेल्सनला जाळ्यात पकडण्यासाठी पोलिस यंत्रणा सज्ज झाली. पण सगळ्यांच्या हातावर तुरी देऊन नेल्सन सटकायचा. गोऱ्या पोलिसाइतकेच काळे पोलिसही होते काळ्या पोलिसाना तो दिसायचाच नाही आणि दिसला तरी ओळखू यायचा नाही. वेषातर करून सचार करता करता त्यानं देशातरही केल. १९६२ सालच्या जानेवारी महिन्यात तो निसटला. इथोपिया, आदिसअबाबा, पूर्व आफ्रिका, मध्य आफ्रिका, दक्षिणेकडील इतर देश, ट्युनिशिया, लिबिया, अल्जेरिया करत शेवटी तो लंडनला पोचला. आल्बर्ट टांबोने त्याच्या प्रवासाचा मार्ग आखून त्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारीही करून ठेवली होती.

आदिस अबाबात पॅन आफ्रिकन फ्रीडम कॉन्फरन्स चालू होती टाबोने तिथे त्याच्या व्याख्यानाचा योग जुळवून आणला.

या सभेपुढील भाषणात तो म्हणाला–

'...गेल्या दहा वर्षांत आफ्रिकन जनतेन आपल्या स्वातंत्र्यासाठी अनेक लढे दिले. असहकार, सप, निदर्शने, निषेध मोर्चे, बहिष्कार या सारख्या अहिंसक मार्गाने सरकारशी झगडण्याचा प्रयत्न केला... पण द. आफ्रिकेत सरकार प्रतिसाद देते ते बंदुकीच्या गोळीतून... सरकार त्याच्या लष्कराची, हवाईदलाची, नौदलाची ताकद वाढवण्याच्यामागे आहे. दारूगोळ्याचे कारखानेही वाढताहेत... शाततापूर्ण वाटाघाटीचा मार्ग आम्हाला बद झालाय... सरकारच्या जुलमी कारवायाना विरोध दर्शवण्याचं स्वातत्र्य आफ्रिकन जनतेला नाही...

आपल्या बोथटलेल्या राजकीय हत्याराला धार लावायला नेतृत्व कचरल तर तो त्यानं जनतेच्या बाबतीत केलेला गुन्हा ठरतो...'

या सर्व देशात काळे नि गोरे खाद्याला खादा लावून बरोबरीने वावरताना, समान संधी, समान हक्क भोगताना त्याने पाहिले. या अनुभवाने तो भारावला. स्वातंत्र्य म्हणजे काय याचा तो हृद्य अनुभव

झिंबाव्वे, मोझांबिक देशात त्यानं आपल्याकडील तरुणाना लष्करी, प्रशासकीय, नागरी व्यवस्थापन वगैरे बाबतीत प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याविषयी बोलणी केली.

अल्जेरियात त्यानं घातपात तंत्राच, शस्त्रास्त्रे वापरण्याचे प्रशिक्षण घेतलं. मग तो परतीच्या प्रवासाला लागला.

तत्पूर्वी तो ज्युलीअस न्यरेरे, केनेथ कोडा आणि इतर आफ्रिकी नेत्याना भेटला.

### अखेर अटक

तो परतत आहे याची खबर लागताच सीमेवर बंदोबस्त वाढला; पण त्या साऱ्याना हुलकावणी देऊन नेल्सन सरहद्द ओलांडून मायदेशी आला. एका हिंदी मित्राच्या मोटारीतून पुढचा प्रवास केला. जोहान्सबर्गला पोचला. आसरा घेतला तो पोलिस स्टेशनच्या थेट नाकासमोरच्या घरात. एका हिंदी कुटुंबात 'पोलिस स्टेशनच्या जितकं जवळ तितक निर्धास्त !'

पण आता पोलिस विलक्षण सावध होते मजबूत जाळं विणल होतं. तरीही नेल्सन त्यात सापडत नव्हता. शेवटी सरकारनं ब्रिटनच्या सुरक्षा दलाच्या प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली मोहीम आखली.

५ ऑगस्ट १९६२ रोजी नेल्सन त्याच्या जाळ्यात अडकला.

सतरा महिन्याच भूमिगत जीवन सपलं.

ती शेवटची भेट विन्नीच्या चांगलीच स्मरणात आहे. जोहान्सबर्गमध्ये चांगला कडेकोट पोलिस बदोबस्त होता. विन्नी आपल्या दोन्ही मुलीना घेऊन त्याच्या भेटीसाठी सकेतस्थळी निघाली... ती निघाली होती एका रुग्णवाहिकेतून. आसन्नप्रसवा स्त्रीच सोग घेऊन ती प्रसूती वेदनानी तळमळत होतो. बरोबर तिच्या दोन्ही मुली दीनवाण्या चेहऱ्याने बसलेल्या. सोबत पाढऱ्या वेषात एक डॉक्टर आणि एक परिचारिका. ही रुग्णवाहिका पोलिस चौक्याचे अडथळे ओलाडून लिलिज्लिफ फार्मवर पोचली.

मडेला कुटुंबाची गळाभेट झाली आणि तीन गाड्या भरून सशस्त्र पोलिस आले त्यानी मडेलाना वेढल

¤

आता तुरुगवासातून नेल्सनची निर्दोष मुक्तता होणं कठीणच होतं.

आफ्रिकन कामगारांना कामावर जाऊ नका अशी मार्च १९६१ मध्ये चिथावणी दिली आणि अधिकृत पारपत्र हाती नसताना देशातर केलं या दोन आरोपाखाली अटक करून त्याच्यावर सरकारनं खटला भरला. MK सघटनेच्या घातपाताशी त्याचा सबध मात्र सरकारला जोडता आला नाही. कोर्टात स्वत तर्फे वकील न देता नेल्सनन स्वत च बचावाचं काम करायच ठरवल. जोहान्सबर्गमध्ये नेल्सनच्या मुक्ततेसाठी लोकाची निदर्शनं वाढू लागली तिथे कोर्टात त्याच्या चाहत्याची गर्दी होणार म्हणून सरकारनं खटला प्रिटोरिया कोर्टात उभा केला. आणि खटला चालू असेपर्यंत मडेलाच्या अटकेच्या निषेधार्थ सभा घेण, मोर्चा काढण यावर नवा बदीहुकूम जारी झाला. विनापरवाना शस्त्र बाळगण, बंदी घातलेल्या माणसाशी संपर्क ठेवण, किंवा बदी घातलेल्या व्यक्तीनं काही प्रकाशित करण अशा गुन्ह्याना जबरदस्त शिक्षा जाहीर झाल्या.

२२ ऑक्टोबरला खटला सुरू झाला विन्नी पहिल्या दिवशी कोर्टात आली तीच मुळी थेंबू नायक घराण्याच्या पोषाखात. तिला तशा पोषाखात पाहून न्याय खात्याचा मत्री भडकला अशा पोषाखात कोर्टात उपस्थित राहण्यावर बदी घातली.

नेल्सन कोर्टात प्रवेशला. तेव्हा साऱ्यानी त्याला उत्थापना दिली. वार्ताहर कक्षातील लोकही उठून उभे राहिले. नेल्सननं थेंबू नायक घराण्याचा पोषाख परिधान केला होता दमदार पावल टाकत तो चौकशीच्या पिंजऱ्यात गेला मग वळलेली मूठ उगारून घोषणा दिली Amandla (Power) लोकांनी एकमुखाने प्रतिसाद दिला. Ngawethu ! (To the People)

नेल्सननं आपली बाजू माडायला सुरुवात केली—

'...ज्या सरकारात माझा प्रतिनिधी नाही त्या सरकारचा कायदा मानण्याच नैतिक वा कायदेशीर बधन माझ्यावर नाही... ज्या सरकारचा वशवर्चस्वावर विश्वास आहे, वशश्रेष्ठत्व प्रणालीवर जे सरकार भर देत त्या सरकारकडून मी नि पक्षपाती न्यायदानाची अपेक्षा कशी करणार...? वशाधारित सापत्न—भाव मला मान्य नाही. मी त्याविरुद्ध सतत लढत आलोय आणि शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहीन...'

गोऱ्या सरकारच्या धोरणावर टीका करताना तो म्हणाला—

'त्यानी आमची ईर्षा, महत्त्वाकाक्षा मारून टाकलीय, स्वातत्र्याकडे नेणारा रस्ता रोखलाय ...आयुष्य सपन्न नि समृद्ध करणाऱ्या गोष्टी गोऱ्यांसाठी राखल्या जातात आणि काळ्याच्या वाटेला उरत उच्छिष्ट. हा गोऱ्यांच्या न्यायाचा आणि सौजन्याचा दर्जा! ही त्याची नीतितत्त्व !...'

नेल्सनचा शब्द न् शब्द झेलायला श्रोते उत्सुक होते. नेल्सन बोलत असताना कोणी खोकायचा—खाकरायचाही नाही की कुजबुजायचा नाही. एकही शब्द खाली पडू द्यायची त्याची तयारी नव्हती.

कोर्टात उपस्थित राहायचे असेल तर सरकारी अट मान्य करायला हवी म्हणून विन्नी दुसऱ्या दिवशी नेहमीच्या पोषाखात आली, पण दुसऱ्या दिवशी कोर्ट फुलून निघाल ते ANC च्या रगानी. समस्त महिला वर्ग काळ्या, पिवळ्या, हिरव्या रगाचे पोषाख लेवून आला होता.

सरकारनं १९६१ सालातला सप किती निर्दयपणे चिरडून टाकला याविषयी दु ख व्यक्त करताना नेल्सन म्हणाला—

'...शांततापूर्ण, शिस्तबद्ध पद्धतीन, लोकशाहीच्या मार्गानं आपले विचार व्यक्त करणाऱ्या आपल्याच जनतेवर कोणतंही सुसंस्कृत सरकार अशा तऱ्हेन उपाय योजायला धजावणार नाही...'

या खटल्याच्या सुनावणीचा काय निकाल लागणार आणि कोणती भयानक शिक्षा भोगावी लागणार याची मला अजिबात भीती वाटत नाही. मी यापूर्वीही तुरुंगवास भोगलाय आणि तिथल्या दु स्थितीची मला पूर्ण कल्पना आहे.

...तुरुगवासातील कैद्यातही काळा गोरा भेद आहेच. आफ्रिकनांना तिथे फारच घृणास्पद रीतीने वागवलं जातं... पण त्या भीतीपोटी

Diwali Greetings

**M/s. KUMAR & GAIKWAD**

**Promoters & Builders**

783, Bhavani Peth
Opp. Nishat Talkies
Pune 411 002.

Phone : 23895 * 24140

मी माझ्या मार्गावरून विचलित होणार नाही... मला तुरुगात काय भोगाव लागणार आहे यापेक्षाही माझ्या लोकाना या देशात काय भोगावं लागतय याचा विचार माझ्या मनात त्वेष निर्माण करतो... आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनातील अन्यायाच, पाशवी वृत्तीच उच्चाटन झाल्याखेरीज माझ्या मनातील त्वेष विरणार नाही.'

'मला कोणतीही शिक्षा भोगावी लागो. ती भोगून होताच मी माझ्या विवेकबुद्धीवर विसबून पुढच्या कार्याला लागेन... अन्याय्य कायद्याचे उच्चाटन होईपर्यंत माझा झगडा चालूच राहील...'

७ नोव्हेंबरला खटल्याचा निकाल लागला. दोन्ही गुन्ह्यासाठी मिळून नेल्सनला पाच वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा झाली.

शिक्षा ऐकल्यावर नेल्सनने Amandla ची घोषणा दिली लोकांच्या प्रतिसादान वातावरण दुमदुमलं.

पोलिसांची गाडी मडेलाला घेऊन गेली. निदर्शन, मोर्च्यावर बंदी असूनही लोक कोर्टाच्या आवारात नाचगाणी म्हणत 'आगे वढो, मडेला!' चा घोष करत राहिले. मग सगळयानी ANC चं राष्ट्रगीत सुरू केले. विन्नीने आपल्या दोन्ही मुली सावरीत आपला सूर त्यात मिसळला.

## दुसरा खटला

नेल्सनची रवानगी केपटाउन जवळच्या रोबेन बेटावर* झाली. हे ठिकाण जोहान्सबर्गहून हजार मैलावर केपटाउनच्या किनाऱ्यापासून समुद्रात सात मैल आत. या बेटाभोवतीच्या मैलभर परिघात बोटीना यायला बंदी होती शिवाय त्या बेटाभोवतून सागरी प्रवाह वेगानं वाहातात. पुन्हा पोलिसांचा कडेकोट बदोबस्त कैद्याला पलायनाला वावच नाही.

नेल्सन खर तर राजकीय कैदी. त्याला 'अ' वर्गाची वागणूक मिळायची. पण त्याला 'ड' वर्गात टाकून चुन्याच्या खाणीत काम दिल तो तिकडे तुरुंगवास भोगू लागला आणि इकडे बाहेर मोठ्या प्रमाणावर धरपकड सुरू झाली शेकडो लोक तुरुंगात विनाचौकशी नव्वद दिवस अडकवून ठेवण्याची सोय असलेला नवा कायदा अमलात आला होता. आपल्याला हवा तसा कबुलीजबाब मिळेपर्यंत कैद वाढवण्याची सोय सरकारन त्यात ठेवली होती. हा जबाब मिळवण्यासाठी शारीरिक पीडा देणारे उपायही वापरायला सुरुवात झाली.

२० एप्रिल १९६३ रोजी वॉल्टर सिसुलू आणि त्याच्या आठ साथीदाराना घातपाती MK सघटनेच्या सदर्भात अटक झाली त्यांची प्रिटोरियाच्या तुरुंगात रवानगी झाली.

नेल्सनलाही सरकारन रोबेन बेटावरून उचलून प्रिटोरियात आणल. असं का आणल हे सिसुलू त्या तुरुगात भेटल्यावर नेल्सनला समजलं. विन्नीवर बरेच मनाई हुकूम लादले गेलेत हेही समजल. जोहान्सबर्गबाहेर पडायच नाही. कोणत्याही शैक्षणिक सस्थेला भेट द्यायची नाही. मुलीसुद्धा स्वत: शाळेत पोचवायच्या नाहीत. सभा–समेलनात भाग घ्यायचा नाही. एकावेळी दोन व्यक्तीपेक्षा अधिक व्यक्तीना भेटायच नाही. ही बधन दोन वर्षं पाळायची.

या साऱ्या मनाई हुकूमानी भागलं नव्हत म्हणून की काय तिच्या घरावर छापा घालून पोलिसांनी टोळधाडीसारख सार उद्ध्वस्त केल. तिच्यावरच्या मनाईमुळं ती प्रिटोरियाला येऊन नेल्सनला भेटू शकली नव्हती.

तीन डिसेंबरला खटला उभा राहिला. नेल्सन, सिसुलू आणि त्यांच्या साथीदारावर २२२ घातपाती घटनाचे आरोप सरकारने ठेवले. हिंसात्मक क्रातीसाठी माणस तयार करणं, त्यासाठी परदेशी लष्कराची मदत घेण या व अशा आरोपावर खटला आधारला.

घातपाती कृतीचं समर्थन करताना नेल्सन म्हणाला– '... मला हिंसात्मक मार्गाविषयी जराही आस्था नाही...गोऱ्या सरकारनं गेली अनेक वर्षं आम्हा काळयाच शोषण केलं, आमच्यावर जुलूम जबरदस्ती केली त्याची ती प्रतिक्रिया होती ... १९१२ पासून ANC अहिंसात्मक मार्गाने वशभेदाच्या राजकारणाविरुद्ध लढा देत आलीय. पण त्या मार्गाचा उपयोग होत नाहीस दिसल्यावर...या मार्गावरचा विश्वास आमच्या कार्यकर्त्यांना वाटेना ..ते लोक दहशतवादाकड वळण्याचा धोका होता. आणि एकदा हिंसाचाराला सुरुवात झाली की परिस्थिती विकट झाली असती. यादवी माजली असती. हिंसाचार टाळण्यासाठीच Umkhonto we sizwe (MK) ची स्थापना झाली...सर्व गोऱ्याना सक्तीन लष्करी शिक्षण घ्यावं लागतं. आफ्रिकनाना ती सवलत नाही...घातपात किंवा गनिमी कावा याचा अवलब करायचा ठरवला तर प्रशिक्षित नेतृत्व हव...' आफ्रिकन राष्ट्रीयत्वासाठी ANC झगडत आलीय. याचा अर्थ तिला गोऱ्याना समुद्रात ढकलून द्यायचय असा मात्र नाही....आफ्रिकन लोकाना त्याच्याच भूमीवर स्वातत्र्य आणि स्वास्थ्य उपभोगण्याचा हक्क या राष्ट्रीयत्वान मिळावा हे ANC ला अभिप्रेत आहे ... ANC च मुख्य ध्येय राजकीय हक्क मिळवण आणि एकता प्रस्थापित करणं हे आहे...त्यासाठी गोऱ्या वर्चस्वाला शह द्यायला ती उभी राहिली... स्वातत्र्याची सनद तयार करण्यात कम्युनिस्ट पार्टीच सहकार्य तिन घेतलं ते गोऱ्याच्या वर्चस्वाला हादरा द्यायचा याविषयी आमच्यात एकमत होतं म्हणून...कम्युनिस्ट पार्टीच मुख्य ध्येय आहे– भाडवलशाही नष्ट करून कामगार वर्गाचं राज्य आणायचं वर्ग लढ्यावर तिचा जोर आहे. ANC ला मात्र वर्गभेद मान्य नाहीत, तिला सामंजस्य, एकतानतेची ओढ आहे...हिटलरचा पाडाव करण्यासाठी इंग्लडनं आणि अमेरिकेने सोवियत युनियनशी हातमिळवणी केली. याचा अर्थ इंग्लड आणि अमेरिकेला कम्युनिस्ट राजवट आणायची होती असा कोणी लावू धजावणार नाही...या टप्प्यावर तरी दडपशाहीला विरोध करत असताना तात्त्विक मतभेदावर खोळबण आम्हाला परवडणार नाही...राजकीय हक्क मिळवण्याच्या आमच्या लढ्यात आज तोच एक पक्ष आमच्या बाजूने उभा आहे...आपल्या धोरणाच्या विरोधात जाणाऱ्या सर्व बाबीवर सरकार कम्युनिझमचा शिक्का मारतं. 'सप्रेशन ऑफ कम्युनिझम ॲक्ट' खाली त्यावर बदी घालतं...वशविग्रहाला प्राधान्य देणाऱ्या या सरकारबाबत उभ्या

* रोबेन बेटाला 'मकाना बेट' असही म्हणतात. गोऱ्या सत्तेला विरोध करणाऱ्या मकाना या झुलू आफ्रिकन योद्धाला याचबरोबर ब्रिटिशानी तुरुंगात टाकले. तिथून त्याने पलायन करण्याचा प्रयत्न केला. पण तो पाण्यात बुडून जिवाला मुकला ही घटना १८१९ मधली.

जगात निषेधाचे सूर उमटत असले तर त्यात कम्युनिस्टांचा आवाज मोठा आहे...अशा परिस्थितीत आमची तरुण पिढी त्यांना शत्रू कसं म्हणेल ?...

एक खरं की मार्क्सच्या विचारांचा प्रभाव माझ्यावर आहे. नव्यानंच स्वतंत्र झालेल्या देशांचे पुढारी–गांधी, नेहरू, नक्रूमा, नासेर–हेही त्या विचाराचा प्रभाव मान्य करतात...समाजवाद मान्य केला तर लगेच मार्क्सिस्ट का ठरवता ?

दक्षिण आफ्रिकेची भूमी हिरे, सोनं आणि तेल यांनी समृद्ध. पण त्यांचा लाभ घडतो गोऱ्यांना.

'गोरे अतिउच्च रहाणीमान भोगतात. काळे दारिद्र्यात अन् दुःखात खितपत पडलेत. आमच्या पदरी दारिद्र्य पडलंय, मानवी अप्रतिष्ठेचे आम्ही बळी आहोत हे आम्हाला कम्युनिस्टांनीच कशाला सांगायला हवंय !'

आपल्या लायकीनुसार, कुवतीनुसार काम मिळावं असं आफ्रिकन लोकांना वाटतं. सरकारनं नेमून दिलेलंच काम करणं त्यांना मान्य नाही...त्यांना स्वतःचं घर हवंय, स्वतःची जमीन हवीय...आम जनतेचे घटक म्हणून आम्हाला जगायचंय, बंदिस्त घेट्टोतील रहिवासी म्हणून नव्हे...आई, बाप, मुलं यांची फारकत करणारी व्यवस्था त्यांना मान्य नाही.

'समान राजकीय हक्क मिळाल्याखेरीज या उणिवा दूर होणाऱ्या नाहीत. ही मागणी या देशातील गोऱ्यांना क्रांतिकारी वाटेल. कारण असं झालं तर आफ्रिकन लोकांचं मताधिक्य होईल. यासाठीच तर त्यांना लोकशाही नकोय.

आणि ANC चा लढा तर जगण्याचा हक्क मिळवण्यासाठी आहे. समान हक्क भोगत सामंजस्यानं या देशातील सर्वांना जगता यावं हे माझ्या आयुष्याचं ध्येय आहे. त्यासाठी मी माझे प्राणही द्यायला तयार आहे.'

नेल्सन मंडेला सलग चार तास बोलत होता.

हा तुरुंगवास भोगत असतानाच नेल्सन लंडन विद्यापीठाची कायद्याची परीक्षा देण्याची तयारी करत होता. १९६४च्या जून महिन्यात त्यानं पेपर लिहून पाठवले. पुढे ही पदवी त्याला मिळालीही.

मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली गेली तर त्यावर अपील करायचं नाही असा नेल्सन आणि त्याच्या साथीदारांनी निर्णय घेतला.

नेल्सनला गजाआड केल्यावर पोलिसांनी विन्नीच्या मागे ससेमिरा लावला होता.

मोठी मुलगी झेनी बालवाडीत जायच्या वयाची झाली. विन्नी स्वतः शैक्षणिक संस्थांत जाऊ शकत नव्हती. स्नेही मंडळींनी झेनीसाठी शाळेत प्रवेश मिळवला. पण नेल्सन मंडेलाच्या मुलीला कोणत्याही शाळेत थाराच मिळू द्यायचा नाही असं पोलिसांनी ठरवलं होतं. चार दिवस झाले की 'तुमच्या मुलीचं शाळेतून नाव काढून टाकलंय' असे विन्नीला निरोप यायचे. शेवटी विन्नीनं तिला हिंदी लोकांनी चालवलेल्या बालवाडीत दाखल केलं.

'मुलाचा हात धरून त्याला शाळेत दाखल करणं हा प्रत्येक मातेच्या आयुष्यातला उत्कट आनंदाचा क्षण... पण तो क्षण मला कधीच लाभला नाही. मुलांच्या शालेय जीवनात आईबापांनी सहभाग घेण्याचे किती तरी प्रसंग असतात. खेळ, संमेलन, पालक–शिक्षक

WITH BEST COMPLIMENTS
FROM :

**RENUKA SAFE DEPOSIT VAULTS**

(A DIVISION OF RENUKA CONSTRUCTION CO.)

MARK OF QUALITY
THE RELIABLE PEOPLE

1170/1, Shivajinagar, Jangli Maharaj Road, Branch
PUNE 411 005.

TEL. : 53783 • 56161 • 56621

दिन। कितीतरी...' पण यात विन्नी सहभागी होऊ शकत नव्हती. 'हे क्षण आपण वेचू शकलो नाही याची एक सल कायमची राहून गेलीय...'

नेल्सनचा खटला चालू होता तेव्हा विन्नीची धावपळ फार व्हायची.

पहाटेच उठून घरकाम आवरायचं. मुलींची सारी तयारी करून हिंदी स्नेह्याच्या घरी– जोसेफ दापत्याकडे– पोचवायचं. मोठी शाळेत जायची. धाकटी जोसेफच्या घरी राहायची... तिथून मग विन्नी कामावर जायची. संधी मिळाली तर प्रिटोरियाला जाऊन खटला ऐकायला बसायचं. दिवसभरात नेल्सनशी दोन शब्द बोलायची संधी मिळाली तर मिळाली, नाहीतर त्यानं नुसतं हसून हात हलवला तरी तो नजरेत साठवून घ्यायचा. घरी परतताना जोसेफकडून मुलींना घ्यायचं. घरी परतल्यावर साऱ्या वस्तू ठिकाणावर असल्या तर ठीक. उसकाउसक झालेली दिसली की समजायचं पोलिसांची धाड येऊन गेली. मग सारं पुन्हा ठिकाणी नीट लावायचं.

१२ जूनला खटल्याचा निकाल लागायचा होता. विन्नी दोन्ही मुलींना बरोबर घेऊन कोर्टात आली. यावेळी नेल्सन सुटणं कठीण आहे. जन्मठेप किंवा मृत्युदंड ऐकायला लागणार अशी मनाची तयारी करूनच ती आली.

रस्त्यावर, कोर्टाच्या परिसरात कडेकोट बंदोबस्त होता. एवढी गर्दी होती पण कसला गोंगाट, गोंधळ नव्हता. स्त्रियांनी आपल्या हातातले फलक उंच धरून ठेवले होते–

'आमच्या नेत्याचा आम्हाला अभिमान वाटतो.'

'अश्रू नकोत. आमचं भवितव्य उज्ज्वल आहे.'

'धीरगंभीर चेहऱ्यानं नेल्सन, सिसुलू आणि इतर साथीदार कोर्टाच्या पिंजऱ्यात बसले.

कोर्टाने निकाल जाहीर केला 'जन्मठेप.'

पोलिसांच्या गाडीत चढण्यापूर्वी नेल्सन आणि त्याच्या साथीदारांनी उपस्थितांना स्मितहास्यानं अभिवादन केलं. नेल्सनने मूठ उगारून ANC सलाम केला Amandla ! Ngawethu चा गजर झाला.

विन्नी आणि तिच्या मुली गर्दीत उभ्या होत्या. विन्नी त्याला नजरेत साठवायला धडपडत होती. गर्दी एवढी प्रचंड की तिला त्याच्यापर्यंत पोचताही आलं नाही.

नेल्सन त्यावेळी सेहेचाळीस वर्षांचा होता. विन्नी तिशीची. झेनानी पाच वर्षांची आणि झिंड्झीस्वा ४ वर्षांची.

¤

नेल्सनला जन्मठेप झाल्याने स्वातंत्र्य चळवळीला धक्का बसला... विन्नीला तर तो जास्तच बसला '...त्या धक्क्यातून मी सावरले. जे काही म्हणून कौटुंबिक आयुष्य होतं ते आता संपलं हे लक्षात आलं. अपवाद म्हणून माझ्याच बाबतीत हे घडलं नव्हतं. आमच्या लाखो कुटुंबात हेच घडलंय... त्याला पकडलं त्या दिवशीच माझ्या काळजाचा एक तुकडा त्याच्याबरोबर गेला...'

¤

सर्व कैद्यांची रवानगी रोबेन बेटावरच्या तुरुंगात झाली. तिथे प्रत्येकाला वेगळ्या कोठडीत बंद केलं. एकांतवासाची शिक्षा या तुरुंग व्यवस्थेतही वंशभेदानुरूप रचना होती. खाण्यात, कपड्यात, स्वच्छतेच्या सवलतीत भेदाभेद होतेच. तुरुंगाच्या गणवेषात, हाता पायात बेड्या अडकवून हे कैदी चुन्याच्या खाणीवर नेले जायचे. तिथे त्यांनी एकमेकांशी न बोलता काम करायचं. कधी पोस्टाच्या थैल्या शीव. कधी खडीफोड, असली कामं.

नेल्सनने वरचेवर तक्रार नोंदवून साखळदंड रद्द करायला लावले. उपयुक्त काम द्यावं असा त्याचा आग्रह; पण तो मानला गेलेला नाही.

## रात्री तर किती प्रदीर्घ

सहा महिन्यातून ५०० शब्दांचं एक पत्र पाठवायची आणि एक भेट घ्यायची सवलत या कैद्यांना होती. मात्र भेटीत फक्त घरगुतीच विषय असतील आणि कुटुंबापलीकडे कोणाचे उल्लेख होणार नाहीत याचं बंधन पाळायचं होतं.

विन्नी !

तिला तर आता नेल्सनच्या विरहाचं दुःख करायलाही उसंत नव्हती. मुलींचं हिंदी लोकांच्या बालवाड्यातलं शिक्षण संपलं. आता त्यांना पुढच्या शिक्षणासाठी चांगली शाळा शोधणं भाग होतं. नेल्सनच्या गैरहजेरीत त्याची कामं खोळंबून पडली ती पुढं चालू ठेवायची हे ही मोठं काम आणि नोकरी तर केलीच पाहिजे अशी परिस्थिती.

सारी कामं पार पाडता पाडता तिला दिवस कधी संपायचा समजत नसे...' पण रात्री तर किती प्रदीर्घ !'

सर्व मनाई हुकूम पाळून विन्नी दिवसभर हिंडू फिरू शके. कामावरही जाऊ शके. पण आता सुरक्षा पोलिसांनी तिच्यावर नवंच बंधन घातलं. सोवेटोमधील इतर वस्तीत वावरण्यावर बंदी घातली. म्हणजे आता तिनं फक्त ओरलँडो वस्तीत फिरायचं. थोडक्यात आता समाजसेविका म्हणून ती आपलं काम पाहू शकत नव्हती.

विन्नीची नोकरी संपली.

ही नोकरी सोडताना विन्नीला समजलं– तिचा पगार संस्था स्वतःच्या फंडातून देत होती. या संस्थेच्या इतर कर्मचाऱ्यांच्या समाज सेवकांच्या– पगाराचा काही भाग सरकार देत असे. विन्नीचा पगार द्यायला सरकारनं नकार दिला.

विन्नीनं नोकरी सोडताना आपली कृतज्ञता संस्थेकडे व्यक्त केली.

नोकरी सुटल्यावर खायचं काय, घर चालवायचं कसं हा विन्नीपुढे प्रश्न होता. कुठेही नोकरी लागली की महिन्या-दोन महिन्यात तिला काढलं जायचं. पोलिसांच्या धाकामुळं तिला कोणी नोकरीवर टिकू देत नसे. फर्निचरच्या दुकानात, लाँड्रीत, बूट दुरुस्त करण्याच्या दुकानात... मिळेल तिथं काम करून विन्नी स्वतःला नि मुलींना जगवत होती.

काही गोरे – काळे हितचिंतक तुरुंगात बंदिस्त असलेल्यांच्या कुटुंबियांसाठी निधी जमा करत. विन्नी त्यातून आपला वाटा उचलत नसे. काहींच्या घरी किती हलाखीची स्थिती आहे याची तिला कल्पना होती.

या अत्यंत अडचणीच्या काळात तिला तयार पाव विकत घेणं परवडेना. मग ती घरीच पाव भाजायला शिकली. हळू हळू ती त्यात तरबेजही झाली.

नेल्सनची रोबेन बेटावर रवानगी झाल्यावर दोन महिन्यानी विन्नीला भेटीची परवानगी दिली.

हे हजार मैलाचं अंतर कापाव कस हा विन्नीपुढे प्रश्न ! आगगाडीन जाव तर सरकार परवानगी देत नव्हते. कारण या प्रवासाला अवधी जास्त लागणार. तेवढा काळ ती ओरलँडोबाहेर राहणार. त्याचं म्हणण तिनं विमानानं जावं. विमानाचं भाड कोणी नि कसं भरायच ? पण विन्नीची ही अडचण समजताच तिला अनेकानी मदत केली.

विन्नी विमानाने केपटाऊनला आली एकटीच. कारण सोळा वर्षाखालच्या मुलाना भेटीची परवानगी नव्हती. म्हणून मुलीना नेता आल नाही

कैद्यांना भेटण्यासाठी जुजबी बाधकाम उभारलेलं होतं. त्या खोलीत मध्यभागी काचेची खिडकी असलेलं पार्टीशन. दोन्ही अंगाला टेलिफोन त्यातून पलीकडची व्यक्ती डोक्यापासून कमरेपर्यंतच दिसे. दोन्ही बाजूला तीन तीन दक्ष पोलिस. एका बाजूला टेपरेकॉर्डर चालू. कैदी आणि त्याच्या भेटीसाठी आलेला याचं संभाषण शब्द न शब्द टिपण्याची सोय केलेली. आणि एवढा सारा खटाटोप फक्त तीस मिनिटाच्या भेटीसाठी.

'एवढ्या कडेकोट बंदोबस्तातही आम्ही आमचे विचार एकमेकांजवळ पोचवण्याचं तंत्र शिकलो...'

भेट घेऊन विन्नी ऑरलँडोला परतली तेव्हा पोलिसानी तिचं घर साफ करून ठेवलं होत. सारे कागदपत्र, फायली नाहीशा झाल्या होत्या.

मुलीना अशा असुरक्षित, अनिश्चित वातावरणापासून दूर ठेवण्याचा निर्णय विन्नीने घेतला.

एका स्नेह्याच्या मदतीनं तिन त्याची रवानगी स्वाझिलँडच्या शाळेत केली, त्या शाळेत वसतिगृहाची सोय होती त्यामुळे त्यांच्या वास्तव्याचा प्रश्न मिटला.

नवरा तुरुंगात, मुली दुसरीकडे वसतिगृहात म्हणून विन्नी उदास होऊन आपल्याचा दु:खात गुरफटुन बसली नाही. ती नव्या उद्योगाला लागली.

ठिकठिकाणच्या तुरुंगात अनेक राजकैदी होते. कोण कुठल्या तुरुंगात आहे, कोणावर कसला आरोप आहे, किती दिवसांची कैद आहे याचा मागमूस लागत नव्हता. विन्नीनं मोठी खटपट करून त्या कैद्यांचा ठावठिकाणा लावला. त्यांच्या नातेवाईकाचे पत्ते मिळवले. सोविटोमधील स्त्रियाच्या मदतीने त्याचे पत्रव्यवहार सुरू करून दिले.

रात्री अपरात्री पडणाऱ्या धाडी, नेल्सनची जन्मठेप, मुलीचा विरह...जाताना त्यानी केलेली रडारड या साऱ्याचा नाही म्हटला तरी विन्नीवर ताण पडला. तिला हृदयविकाराचा झटका आला.

त्यातूनही विन्नी सावरली.

मग ती नव्या कामाला लागली. नेल्सन आणि त्याच्या साथीदाराना कैद भोगता भोगता काही शिक्षणाची सोय व्हावी म्हणून युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ आफ्रिका (UNISA) मधील पत्रद्वारे अभ्यासक्रमासाठी तिची धावपळ सुरू झाली.

तुरुंगात अडकलेल्या मुलाच नीतिधैर्य टिकवणं आवश्यक होतं. म्हणून भूक, हडताळ, धिमे काम वगैरे मागांनी नेल्सन आणि त्याच्या साथीदारानी पत्रद्वारे अभ्यासक्रमाची सवलत मिळवली.

विन्नीची ही धावपळ, हे काम हळूहळू सोवेटोतील लोकांना समजलं. जाणवू लागल. ते तिला गुप्तपणे मदत देऊ लागले.

¤

अलीकडे विन्नीला छोटचा छोटचा कारणावरूनही अटक व्हायची. दोनचार दिवसानी सुटून बाहेर पडली की पुन्हा आपल्या कामाला लागायची.

अचानक आपल्याला पकडून नेलं की आपल्या गरजेच्या वस्तू—कपडे, कंगवा, ब्रश, पेस्ट वगैरे आपल्यापर्यंत पोचवण्यासाठी, त्यासाठी आपला पत्ता शोधण्यासाठी आपल्या हितसंबधीना फार त्रास होतो. तो वाचावा म्हणून विन्नीनं एक सूटकेस तयार करून कायमची दाराजवळ ठेवलेली असे. पोलिसानी 'चल' म्हटले की ती सूटकेस उचलून चालू पडे.

आईनं तुरुंगात असणं हे तिच्या मुलीच्या इतक्या सवयीचं झालं की मुली शालेय सुट्टीत घरी येताना वर्तमानपत्रात आपल्या आईच्या धरपकडीविषयी काही बातमी आहे का ते पाहून येत. कित्येकदा तर त्याचे हेडमास्तर त्याना आपल्या कार्यालयात बोलावून हळूवार आवाजात धीर देत. नंतर नतर तर 'तुझ्या आईला पकडून नेलं' असं कोणी म्हटलं की 'बरं! मग ?' एवढीच प्रतिक्रिया व्यक्त करायच्या.

१२ मे १९६९ रोजी विन्नीला पकडायला पोलिस आले त्या सुमारास त्या शालेय सुट्टी घालवायला आल्या होत्या...९ वर्षाची झेनीआणि १० वर्षाची झिंडझी आईच्या कुशीत झोपत होत्या....मध्यरात्रीनतर दारावर थाप पडली. ते आले ! विन्नीनं ओळखलं. नेहमीप्रमाणे सगळी उसकाउसक करून झाली. कपाटं—फडताळ उसकटून झाली. मग दहशतवादी कृत्य केल्याच्या आरोपावरून 'टेररिझम अॅक्ट' खाली तिला अटक केली.

रात्री दोन वाजण्याच्या सुमारास एका पोलिसानं मुलीना त्यांच्या मावशीच्या ताब्यात दिलं.

पुढं दोन वर्षं विन्नी तुरुंगात होती. तिच्याबरोबर आणखी बीस—बावीसजणाना पकडलं होतं.

विन्नीला भेटायची कोणालाही परवानगी नव्हती. तिला वकीलही देता येत नव्हता. नेल्सनला याचा सुगावा लागला तेव्हा त्यानं आपल्या वकील मित्रामार्फत तिचा शोध घेण्याचा, तिच्या अटकेचं कारण शोधण्याचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही.

---

## टेररिझम अॅक्ट : १९६७

कायदा व सुरक्षा याना बाधा आणणारी कृती वा कृत्यासाठी दिलेले प्रोत्साहन या कायद्यान्वये गुन्हा ठरते.

दक्षिण आफ्रिका सरकारविरुद्ध असणारी व्यक्ती विनावॉरंट, विनाचौकशी तुरुंगात चौकशीच्या नावाखाली टाकता येते. या कायद्यान्वये एकांतवासाची, तीही हवीतर बेमुदत, शिक्षा ठोठावता येते. वकील वा नातेवाईक याना अशा अटकेत असलेल्या व्यक्तीशी संपर्क साधता येत नाही. यात मुलानाही अपवाद धरले जात नाही.

---

## हे राष्ट्रमाते !

प्रिटोरियाच्या तुरुंगात विन्नी ४९१ दिवस होती. त्यातले पहिले २०० दिवस एकांतवासात होती.

'प्रत्येक दिवस नि रात्र मी माझ्याशीच बोलत असे... एकटं राहावं लागणं ही केवढी भयंकर शिक्षा...तुमचं काय करावं हे तुम्हालाच समजत नाही. तुम्ही उभं राहून बघता. बसून बघता. आडवं, तिरकं, सरळ, उताणं, पालथं झोपून बघता...सिमेंटच्या लादीवर झोपल्यानं शरीरावर ओरखडे उठतात.

एकदा मला दोन मुंग्या दिसल्या तेव्हा मला किती आनंद झाला. दिवसभर मी त्यांना माझ्या हातावर, बोटांवर खेळवत होते.

...मग मी पांघरायला दिलेली घोंगडी उसवून काढली...पुन्हा विणली...'

तुरुंगात झोपण्यासाठी तिला काथ्याची सतरंजी होती आणि पांघरायला दोन कांबळ्या. त्यांना मुताची घाण मारायची. एक प्लॅस्टिकची बाटली दिली होती पाण्यासाठी. एक लिटरभर पाणी मावेल एवढी. कोठीच्या कोपऱ्यात मलमूत्र विसर्जनासाठी बादली. विन्नीला तर स्वच्छतेचा रोग.

वॉर्डर ही बादली दिवसातून एकदा बाहेर काढून रिकामी करून आणायची. ती नीट साफ झालेली नसेच. तीच उपडी करून तिच्यावर जेवणाचं ताट ठेवून वॉर्डर दारातनंच पायाने आत ढकलायची. विन्नीचा घास तोंडातल्या तोंडात फिरायचा. विलक्षण उमासे यायचे. ...जेवणातले पदार्थही निःसत्त्व नि बेचव...याचा परिणाम विन्नीच्या तब्येतीवर न होता तर नवल...

अटक झाल्यानंतर दोन आठवड्यांनी रीतसर चौकशीला सुरुवात झाली.

विन्नी उभी. तिच्या डोक्यावर प्रखर दिवा टांगलेला. सलग पाच दिवस नि पाच रात्र तिच्यावर प्रश्नांचा भडीमार चालू होता. आपल्या गुप्त कारवायांची, हालचालींची यांना माहिती आहे हे विन्नीच्या लक्षात आलं. पण त्यांना आणखी माहिती हवी होती. 'घातपाताच्या कारवाईत अटक झालेल्यांनी माझ्या आदेशावरून ते कृत्य केलं असा त्यांना जबाब हवा होता...माझी सहनशीलता संपली की मला चक्कर यायची. शारीरिक वेदनेतून निसर्गच माझी थोडा वेळ सुटका करायचा. शुद्धीवर आले की पुन्हा त्यांचा भडीमार सुरू व्हायचा...मग रक्तस्राव सुरू झाला....वारंवार बेहोष होऊ लागले. ...पाचव्या दिवशी मी हार मानली...त्यांनी हवं ते वदवून घेतलं.'

नेल्सन आणि विन्नी तुरुंगात असतानाच एक दुःखद बातमी ऐकावी लागली.

नेल्सनच्या प्रथम पत्नीपासूनचा मुलगा थेंबी मोटार अपघातात


ज्योत दिव्याची मंद तेवते देवघरातील देवापाशी
प्रसन्न होऊनी वरदहस्त ठेविते दीपलक्ष्मी सर्वांवरती



दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
-आपुलकीनं वागणारी माणसं !
हेड ऑफीस : पवई नाका, सातारा

PARKERSON 88/114

गेला. दोघानाही मनस्वी दु:ख झालं. तो केपटाऊनला राहात असे. कधी जोहान्सबर्गला आला की विन्नीकडे राहायचा. झेनी, झिंडझीना सांभाळायचा त्याचा चेहरामोहरा, रंगरूप नेल्सनसारखं. विन्नीच्या मुलीना त्याच्यात पित्याचं रूप दिसे. त्याच्या बालपणाच्या स्मृतीत रम्य आठवणीचा गंध कोणाचा असेल तर तो त्याच्या या मोठ्या सावत्र भावाचा.

तुरुंगाच्या त्या बंदिस्त एकान्त कोठडीत विन्नीला सहप्रवासिनी कैदी स्त्रियाकडून सांत्वनाचा संदेश आला, मलमूत्राच्या बादलीच्या तळाशी सिगरेट पाकीटातल्या चांदीत बारीकशा कागदावर संदेश होता. बादली रिकामी होऊन परत आली त्यात तो होता.

'हे राष्ट्रमाते ! आम्ही तुझ्या दु:खात सहभागी आहोत.'

विन्नी त्यावेळी पस्तिशीची होती. राष्ट्रमाता विन्नीच्या हाती उत्तरादाखल दोन शब्द लिहिण्यासाठी कागद–पेन्सिल नव्हती. म्हणून मग तिने पिनने चांदीवर टोचून भोक पाडत पाडत एक एक अक्षर कोरलं. त्याची गुडाळी करून ती सापडली त्याच ठिकाणी म्हणजे त्या बादलीच्या तळाशी ठेवली.

संपर्क सुरू झाला.

विन्नी आता एकाकी नव्हती. सहप्रवासिनी झोला भाषेत गाणी म्हणत. त्या गाण्यात बाहेरची खबर असे

नेल्सनच्या वकिलाने सुप्रीम कोर्टात विनती अर्ज केल्यानतर विन्नीला किमान सुविधा मिळाल्या. २०० दिवसानंतर स्नान लाभलं. विन्नी माणसात आली.

विन्नी आफ्रिकन भाषेत न बोलता नेहमी शुद्ध इंग्रजीत बोलते आणि याचा राग आफ्रिकानर अधिकाऱ्याना फार येतो. 'त्याचं इग्रजी धड नाही. त्यामुळे बरेचदा ते मला समजत नसे असं झालं की ते माझ्यावर चिडायचे, आपल्या अशुद्ध अनगड भाषेच्या न्यूनत्वाने आफ्रिकानर पछाडलेला आहे. तुम्ही त्याची (आफ्रिकानर) बोली वापरली नाहीत तर ते तो आपला अपमान समजतात.'

विन्नीवर एकूण २१ आरोप ठेवले होते. त्यात मुख्य आरोप होता– नेल्सनच्या आदेशानुसार ती ANC चं पुनरुज्जीवन करत आहे हा.

विन्नीवरचे आरोप सिद्ध करण्यासाठी ऐंशी जणाच्या साक्षी घेतल्या त्यातले बहुतेक सारे कैदी किंवा पोलिस होते कैद्यानी तर विन्नीविरुद्ध साक्ष देण्यासाठी आपला कसा छळ केला हेच साक्षीत सागितलं.

विन्नीच्या बरोबरीने पकडलेल्या वीस जणाच्याही साक्षी झाल्या. त्यात शाती नायडू होत्या. या साऊथ आफ्रिकन इडियन काँग्रेसच्या कार्यकर्त्या. नेल्सन आणि विन्नीशी नायडू कुटुंबाचा घरोबा. शाती नायडूनी विन्नीविरुद्ध साक्ष द्यावी म्हणून त्यांच्यावर खूप दडपण आल. त्यानी नकार दिला त्यामुळे त्याच्या शिक्षेत वाढ झाली. शेवटी १६ फेब्रु १९७० रोजी सर्वांची निर्दोष म्हणून सुटका झाली. बंधनमुक्ततेचा आनद क्षणकालच होता. कोर्टाच्या बाहेर पडतात न पडतात तोच साऱ्याना पुन्हा अटक झाली ध्वनिक्षेपकावरून इतर लोकाना बाजूला व्हायला सागितल. सर्वांची रवानगी पुन्हा कोठडीत झाली

पुन्हा एकदा खटला... साक्षी... जाबजबाब सारं पार पडलं.

पुन्हा सर्वांची निर्दोष म्हणून मुक्तता झाली.

विन्नी आणि इतर सहचारी यानी एकूण ४९१ दिवस एकातवासाची शिक्षा भोगली. त्याचा परिणाम विन्नीच्या मन:स्थितीवर झालाच. निर्दोष म्हणून सुटका झाल्यावरही ती पोलिसाच्या दिशेने चालू लागली तिच्या वकिलानं तिला हाताला धरून तिला अडवलं.

शेकडो आफ्रिकन लोक कोर्टाबाहेर हसत होते, रडत होते. आनदाश्रूना वाट करून देत होते.

तुरुगवास भोगत असतानाच विन्नीवरच्या 'मनाई' हुकुमाची मुदत सपली विन्नी तुरुगाबाहेर आल्यावर दोन आठवड्यानी पोलिसानी पुन्हा तिच्यावर बधनं घातली. पण तेवढ्या त्या दोन आठवड्यात विन्नीन बरच फिरून घेतल. मुख्य म्हणजे ती तिच्या वडिलाना भेटून आली ते आता खूप थकले होते. १९६० पासून बापलेकीत वैचारिक आणि त्यामुळे मानसिक दुरावा आला होता तो गेला. बाटुस्तान निर्मिती स्वीकारून स्वायत्त सरकार तयार करून आपण स्वातंत्र्याच्या जवळ पोचू, आपल्या राज्यात तरी आपण जनतेला काही सुखसोयी देऊ या त्याच्या स्वप्नाला लवकरच तडा गेला. आपली फसवणूक झाली याचं शल्य त्याच्या उरी बसल. बाटुस्तान निर्माण करून देशाचे तुकडे करण्याला विन्नीचा प्रथमपासूनच विरोध होता.

ही त्याची शेवटची भेट.

ट्रान्स्केईहून विन्नी परतली आणि तिच्यावर स्थानबद्धतेचा हुकूम बजावला गेला. आता सध्याकाळी सहा ते सकाळी सहा या काळात घर सोडण्यावर बंदी आली. रविवारी, सुट्टीच्या इतर दिवशीही तिन घरीच राहायच आणि हे कमी म्हणून की काय दिवसातून चार चार वेळा पोलिस घरात घुसून तपास करू लागले. तिला खाजगी आयुष्य म्हणून उरल नाही.

द. आफ्रिकेच्या तुरुग कायद्यानुसार कैद्यासंबधी कोणतंही वृत्त छापण्यावर बंदी आहे. त्यामुळे तिला कशा प्रकारची वागणूक मिळते हे बाहेर समजत नसे पण तरीही बाहेर समजायच ते समजलच. तिला आताशी नेल्सनची भेटही नाकारली जातेय याचाही सुगावा लागला. ही सूडाची वागणूक थाबवावी म्हणून धर्मसंस्थेच्या काही लोकानी, राजकीय पुढाऱ्यानी निदर्शन केली.

लोकमताची तीव्रता पाहून अखेरीस सरकारने तिला नेल्सनला भेटण्याची परवानगी दिली. दुसऱ्याच दिवशी विन्नी विमानाने केपटाऊनला पोचली या वेळचा खर्च इग्लडमधील हितचितकानी उचलला.

दोन वर्षांनी विन्नी नेल्सनला भेटत होती. थेंबीच्या मृत्यूनतरची दोघांची ही पहिली भेट भावनावेग आवरण्यातच बराच वेळ गेला. फारसं बोलण झालच नाही

नतरच्या तीन वर्षांत विन्नीला या ना त्या आरोपात गुतवण्याचे अनेक प्रकार झाले आपल्या धोरणाविरुद्ध वागणाऱ्याच्या हालचालीवर, आचार स्वातंत्र्यावर मर्यादा घालण्यासाठी सरकार एकामागे एक नवे कायदे, नवी कलमं तयार करत होते त्याने त्याचा आता गोंधळ होऊ लागला 'का होणार नाही गोंधळ ? दोन कोटी लोकाच्या मागे चोवीस तास हाती कायदा घेऊन लागलात तर तुमच्या डोक्यात गोंधळ होणारच मला अटक करण्याच्या दृष्टीने माझ्यावर ठेवलेले काही आरोप तर एवढे बालिश होते ! ...'

आता तर ते तिच्या जिवावरच उठले कधी कोणी मारेकरी घातलेला असायचा. तर कधी घराशेजारी बॉंबस्फोट व्हायचा. तिची गाडीही बॉम्बस्फोटाने उडवली. तिच्या सावधपणामुळे, शेजाऱ्याच्या पाळतीमुळे ती अनेकदा जिवानिशी वाचली. गमत म्हणजे विन्नी या प्रकाराबद्दल अर्ज करून कुठे दाद मागू शकत नव्हती कारण आफ्रिकन स्त्री कायद्यासमोर 'अज्ञान' आहे. लग्न झाल्यावर तर तिला कसलाच हक्क उरत नाही.

या काळात माझ घर म्हणजे पोलिस स्टेशनचाच एक भाग होऊन बसला होता... मुलीही वैतागायच्या. मला विचारायच्या, 'खरच तू आमची आई आहेस की आम्हाला साभाळायला ठेवलेली बाई आहेस...' या माझ्या मुली लहानाच्या मोठ्या कशा झाल्या ते मला अनुभवायला मिळालच नाही आई म्हणून माझा त्यात काही सहभाग नाहीच... त्याना शिकवणाऱ्या, वळण लावणाऱ्या, त्याच्यावर संस्कार करणाऱ्या शिक्षकाना मला कधी भेटताही आल नाही. या माझ्या मुलीना आपल्या मैत्रिणीना कधी घरीही आणता आल नाही.'

मडेला कुटुबाशी कोणी ओळखदेख ठेवली की लगेच पोलिस चौकशीसाठी त्याला पकडायचे. लहान मुलही त्यातून सुटायची नाहीत.

कोर्टात विन्नीला वर्षभराच्या तुरुगवासाची शिक्षा सुनावली गेली त्यावेळी झिड्झीच्या डोळ्यात पाणी आल. न्यायाधीश उठून बाहेर गेल्यावर विन्नी तिच्यावर कडाडली. 'पुन्हा म्हणून गोऱ्या शिपायासमोर डोळ्यातून पाणी काढून त्याला समाधान देऊ नकोस...'

झिड्झी त्यावेळी १२ वर्षांची होती. तिनं सयुक्त राष्ट्रसंघाकडे अर्ज करून दाद मागितली आईच्या सुरक्षिततेविषयी चिंता व्यक्त केली संयुक्त राष्ट्रसघ आणि आतरराष्ट्रीय रेडक्रॉस सघटना यानी या प्रकाराची दखल घेतली.

१९७३ साल सपत आल. सरकारने नेल्सन मडेला आणि त्याच्या साथीदाराना पर्याय दिला—ट्रान्स्केईच्या बाटुस्तानात जाऊन वास्तव्य करत असाल तर मोकळ करतो.

विन्नीलाही त्यानी हा पर्याय दिला दोघानीही तो अमान्य केला.

## काळ्या अस्मितेचा अंगार

१९७५ साली आफ्रिका खडातले अगोला आणि मोझाबिक हे दोन देश पोतुगीज सत्तेखालून मुक्त झाले तिथे कृष्णवर्णीय बहुसख्याकाची सरकार आली. १९७२ मध्ये द आफ्रिकेत काळ्या लोकाची परिषद (Black People's Convention) स्थापन झाली. त्यानी 'काळे तेवढे एक' या झेंड्याखाली समस्त गौरेतराना संघटित करण्याचा प्रयत्न केला. गौरेतरानी वेगवेगळे अस्तित्व सोडून स्वत.ला काळे म्हणायला सुरुवात केली.

सर्व बदी—मनाई—हुकुमाचे काच पाळून विन्नीचेही यासाठी प्रयत्न चालू होतेच ·अगोला आणि मोझाबिक याच्या उदाहरणामुळं काळ्याचा आत्मविश्वास वाढला. 'काळ्याची अस्मिता' (Black Consciousness) जागवण्याच काम तिनं हाती घेतलं.

'या देशात गोरे आले ते एका हातात बायबल आणि दुसऱ्या हातात बंदूक घेऊन. काळ्यांच्या हाती बायबल देऊन त्याच्या जमिन काढून घेतल्या... या गोऱ्यानी आमची काळी सस्कृती उद्ध्वस्त केली... या बाबतीत खरे दोषी आहेत मिशनरी त्यानी आमच्या पूर्वजाबद्दलचा अभिमान अनीश्वरवादी ठरवला. आमच्या पूर्वजाना जगली ठरवल इथेच त्याचं चुकल... माझी संस्कृती, माझे पूर्वज जगली ठरवून मला आदर्शवत् वाटणाऱ्या गोष्टी तुच्छ ठरवतात. माझ्या व्यक्तिमत्त्वावर, अस्मितेवर प्रहार करतात... एकातवासाची शिक्षा भोगण्यापूर्वीची मी आणि नतरची मी यांत जमीन—अस्मानाचा फरक पडलाय... त्यानीच मला द्वेष करायला शिकवलं. मी मुळातली समाजसेविका. मानवता जपणं हे माझ काम... पण आता मी माझी तत्त्व जपण्यासाठी हाती बदूकही घेईन... हा बदल कोणी घडवून आणला?... त्याना आमची भाषा समजत नसेल तर आता त्याच्याच भाषेत त्याना समजावून देऊ. आता सवाद साधून सामोपचाराने तोड काढण्याचे दिवस सपले. १२ जून १९६४ रोजी आमच्या नेत्याना त्यानी गजाआड केल तेव्हाच ते संपले...'

'आम्ही सहन करत आहोत तो पक्षपात, तो अन्याय आमच्या पुढच्या पिढीला भोगावा लागू नये म्हणून पडेल ती जबरदस्त किंमत मोजून आम्ही अन्याय निपटून काढायचा निश्चय केलाय...'

दक्षिण आफ्रिकेतील शाळा—कॉलेजातील मुलानी बांटू शिक्षण पद्धतीविरुद्ध उग्र निदर्शन करायच योजल. गोऱ्याच वर्चस्व आणि काळ्याची असमर्थता वाढवणारी ही योजना उद्ध्वस्त करण्यासाठी तरुण पिढी त्वेषान पेटून उठली. शहरातील विद्यार्थ्यांचा यात मोठा पुढाकार. शैक्षणिक क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी विद्यार्थी वर्ग एक झाला.

माजी पतप्रधान फेरवर्ड यानं ही योजना सुरू करताना म्हटलं होतं— बाटूना युरोपियन समाजात एका विशिष्ट मर्यादेपलीकडे स्थान नाही बाटूना युरोपियनाशी बरोबरीने वागता येणार नाही हे त्याना बालपणापासूनच शिकवलं जाईल. ज्याचा समानतेवर विश्वास आहे ते कृष्णवर्णीय (बाटू) शिक्षक होण्यास पात्र नाहीत.'

इग्रजी माध्यमातून न शिकता आफ्रिकन भाषा माध्यमातून शिकण्याची सक्ती झाली तेव्हापासूनच विद्यार्थ्यांत असतोष पसरू लागला होता दिवसेदिवस तो उग्र बनत गेला.

विन्नीच्या घरी राहून काही मुल शिकत होती. त्याच्या बोलण्यातून विद्यार्थिवर्गात काही शिजत आहे याचा वास तिला लागला. यापूर्वी वेळोवेळी पत्र पाठवून तिन शिक्षणखात्याला बाटू शिक्षण योजनेच्या बाबतीत निषेध नोदवला. होता त्या योजनेतील धोके, दोष कळवले होते.

पालकांनाही आपली मुलं काही कट आखताहेत याचा सुगावा लागला. बहुसख्य पालक अडाणी. ते विन्नीकडे सल्ला मागू लागले. सात—सात, आठ—आठ वर्षाची मुल वर्गावर बहिष्कार टाकून घरी बसू लागली. बहुतेकाच्या माता मोलकरणी. त्याना शैक्षणिक धोरणातल बारीट काही समजत नव्हत. एकच समजत होतं. आपल्या मुलानी शिकाव...आता तीच मुलं निषेध व्यक्त करायला घरी बसली तर त्याना शिक्षण तरी कस मिळणार म्हणून त्या माता धास्तावल्या.

विन्नीवरचा 'मनाई' हुकूम उठलेला असल्याने ती सोवेटो वसाहतीत ठिकठिकाणी गेली. विद्यार्थ्यांच्या मनाचा कानोसा घेतला. काही तज्ज्ञ मित्राचा सल्ला घेतला आणि मे १९७६ मध्ये तिने सोवेटो

पालक सघ (SPA) स्थापला.

मग विन्नी शाळा–शाळातून शैक्षणिक धोरणविषयक विचार माडू लागली. विन्नीच्या ह्या हालचालीनं सरकार डिवचल गेलं.

पालक सघाच्या स्थापनेनतर दोनच आठवड्यानी एका शाळेच्या इमारतीत सुरक्षा पोलिस गेले आणि इनॉस नावाच्या विद्यार्थी नेत्याला ताब्यात द्या म्हणू लागले. विद्यार्थ्यांनी हेडमास्तराना विनंती केली – 'आधी या पोलिसाना शाळेच्या आवाराबाहेर जायला सागा. मग हव्या तेवढ्या विद्यार्थ्यांना पकडा म्हणाव'

पोलिसानी नकार दिला. मुलं चिडली. त्यानी पोलिसाची गाडी जाळली. त्या दोन पोलिसाना बेदम चोप दिला. ही बातमी दाबण्याचा पोलिसानी प्रयत्न केला. पण ती वाऱ्यासारखी पसरली. या बातमीन सारी दक्षिण आफ्रिका ढवळून निघाली...

पालकानाही पत्ता लागू न देता विद्यार्थ्यांनी सोवेटो स्टुडटस् रिप्रेझेटेटिव्ह कौन्सिल (SSRC) ही संघटना उभारली. हजारो विद्यार्थ्यांनी मिळून एकाच दिवशी प्रचड मोर्चा काढायचं ठरवलं. त्यादिवशी लहान शालेय मुलाची अडचण व्हायला नको म्हणून प्राथमिक शाळांना सुट्टी द्यायला लावायची हेही ठरल. पण त्या छोट्या मुलांनी ही गोष्ट धुडकावून लावली. सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या गणवेषात या मोर्चात सहभागी व्हायच होत.

१६ जून १९७६.

गौरेतर शाळातील सर्व मुल रस्त्यावर आली. स्वातंत्र्यगीत म्हणत मोर्चे निघाले.

कोणताही घातपात करणार नाही. शाततेने मोर्चा काढू अशी खात्री SSRC ने विन्नीला दिलेली होती म्हणून ती निर्धास्तपणं आपल्या कामावर जायला निघाली.

'याची परिणती कशात होणार आहे याची पुसटशी जरी कल्पना आमच्यापैकी कोणाला असती तर आम्ही सर्वजण कामावर न जाता घरीच राहिलो असतो.'

पोलिसानी मोर्चा अडवण्याचा प्रयत्न केला. मुलं ऐकेनात म्हणून त्याच्यावर कुत्री सोडली. तरीही मुल आवरेनात.

मग त्यानी सरळ गोळीबार सुरू केला. सोवेटोतील डॉक्टर दिवसभर मुलाच्या शरीरातल्या गोळ्या किंवा धातूचे तुकडे काढत होते. परिसराला युद्धभूमीची कळा आली. रस्त्या–रस्त्यावर पोलिस आणि विद्यार्थी याच्यात धुमश्चक्री चालू होती. पोलिसाच्या हातात बंदुका, अश्रुधूर, कुत्रे...सार काही होतं. मुलाच्या हाती दगड. मुल बेभान झाली तुफान दगडफेक केली. आपल्या मुलावर गोळीबार होतोय याची खबर मिळताच सर्व पालक मडळी सोवेटोकडे धावली. ...रस्त्यावर खेळणारी सहा सहा वर्षांची मुलगी पोलिसानी पाठीमागून गोळी मारून टिपलेली दिसली तेव्हा अवघा पालक वर्ग एकमताने विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभा राहिला.

हे लोण जोहान्सबर्गबाहेरही पसरल या उद्रेकात बारा वर्षांखालची एक हजार मुलं जीवाला मुकली चार हजार जखमी झाली, हजारो पकडली गेली

सरकारने पकडलेल्याची रवानगी रोबेन बेटावर केली. पण त्याना मंडेला, सिसुलू याच्या प्रभावापासून अलग ठेवलं.

हजारो मुलं शेजारच्या देशांत निसटली. शेकडो पालकाना आपल्या मुलाचं पुढ काय झाल ते शेवटपर्यंत समजल नाही.

१९७६ च्या शार्पव्हिले प्रकरणात अटक झालेल्या अनेक विद्यार्थि नेत्याची रवानगी बेटावरच्या तुरुंगात झाली. त्याच शिक्षण अपुर राहू नये म्हणून मडेला प्रयत्नशील होते अनेक विद्यार्थ्यांनी पत्रद्वारे अभ्यासक्रम योजनेतून पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. लोक या रोबेन बेटावरच्या तुरुगाला गमतीने मडेला विद्यापीठ म्हणायचे.

या त्याच्या उपक्रमाला मदत म्हणून हितचिंतकानी चौदा हजार रँडचा चेकही दिला.

## घेट्टोमध्ये हद्दपार

या उद्रेकात विन्नीचा हात आहे या सबबीखाली विन्नीला पाच महिने तुरुंगात अडकवल. पाच महिन्यानी सुटून घरी आल्यावर लगलीच 'मनाई' हुकूम जारी केला.

विन्नीची कटकट कायमची काढून टाकण्यासाठी सरकारने नवाच डाव टाकला. एका मध्यरात्री तिला तिच्या सामानासुमानासकट उचलल आणि ऑरेंज फ्री स्टेटमधल्या ब्रँडफोर्ट या आडगावात नेऊन टाकल–हद्दपार केलं.

विन्नीन उभ्या जन्मात या गावाच नावही ऐकलेलं नव्हत. तो प्रदेश वेगळा. तिथली आफ्रिकन बोली वेगळी. विन्नीला कोणाशी सपर्क साधता येऊ नये, भाषेचा अडसर तिच्या मार्गात यावा, तिचा कोणावर प्रभाव पडू नये यासाठी ही सारी खटपट होती.

हे घडल ती रात्र १५ मे १९७७ ची. झिंड्झी आईकडे सुट्टीसाठी आली होती. तीही आईबरोबर हट्टाने ब्रँडफोर्ट घेट्टोत आली.

ब्रँडफोर्टमधल्या कृष्णवस्तीत हजारभर घरं आहेत. खोक्याच्या आकाराची. पिवळट राखाडी रंगाची धुळीच साम्राज्य. वीज नाही. रस्त्यावर दिवा नाही. एक शाळा. एक दुकान. एक बिअर हाऊस. एक पोस्ट ऑफिस. घेट्टोच्या अलीकडे एक इमारत. तिच्या वरच्या मजल्यावर बाटू प्रशासनाच कार्यालय. तिथून सर्व घेट्टोचं नियत्रण होतं. घेट्टोन जाणाऱ्या–येणाऱ्यावर लक्ष ठेवल जात. ब्रँडफोर्टच्या एका भागात गोऱ्याची वस्ती आहे. तिथे सर्व सुविधा आहेत.

या घेट्टोत विन्नीला एक काडेपेटीएवढ घर वस्तीसाठी मिळालं. घरक्रमाक ८०२.

इथं आणून सोडल्यावर सरकारन दरमहा शभर रँड मदत, घरभाड आणि उदरनिर्वाहासाठी देऊ केली पण विन्नीने ती झिडकारली.

पहिल्या दिवशीच्या सूर्यप्रकाशात विन्नीला ब्रँडफोर्टचं दर्शन घडल तेव्हा ती शहारलीच. मलमूत्र–विसर्जनाचे खड्डे भरून वाहताहेत. कचऱ्याचे ढीगच्या ढीग लागलेत. सार्वजनिक नळावर पाण्यासाठी रागा. कमालीची अस्वच्छता...उदास वातावरण.

विन्नी इथे राहायला आल्यावर तिच्याशी सपर्क साधायला, ओळख करून घ्यायला कोणी पुढे येईना. तिला पाहून जो तो नजर चुकवायचा. भाषेची अडचण म्हणून विन्नीचाही नाईलाज झाला.

घरातल सामान लावून झाल्यातर विन्नी किराणा आणायला दुकानात गली. तिथ दुकानाच्या खिडकीखाली काळ लोक सामानासाठी उभे होते. दरवाजा फक्त गोऱ्यासाठी होता

विन्नी दुकानाच्या पायऱ्या चढून वर गेली. गोऱ्याच्या प्रवेशद्वारातून आत शिरली. विक्रेतीने आरडाओरडा केला आतली गोरी

माणस तातडीने बाहेर आली. विन्नीनं शांतपणे आपल्याला हव ते सामान घेतल पैसे चुकते करून बाहेर आली. तर बाहेर तोबा गर्दी. पोलिसही धावून आले.

'आता काळे गोरे एकाच दाराने जा–ये करतात....हीच तर मोठी गंमत आहे. इतरत्र जी घटना सहज समजली जाते तिला आमच्या देशात राजकीय रंग येतो...शौचालयात जाणं ही किती सामान्य घटना ! पण काळे लोक पाढऱ्याशुभ्र शौचालयात गेले की ती राजकीय चर्चेची बाब ठरते. राजकीय परिवर्तन ठरतं...'

सोथो आणि त्स्वाना या इथल्या आफ्रिकन लोकाच्या बोलीभाषा. विन्नीची भाषा झोसा. पण तिन सोथो आणि त्स्वाना शिकायला सुरुवात केली. त्यासाठी तिने लहान मुलाशी दोस्ती केली.

तिच्या लक्षात आलं इथला काळा समाज जवळजवळ एकभुक्त आहे. मुलाच्या बाबतीत आरोग्य नावाचा प्रकारच नाही. बालमृत्यूचं प्रमाणही अधिक आहे इथल्या शाळेत शिकण्यासाठी दूरदूरहून मुलं येतात. पण ती येतात ती उपाशीपोटी.

हिऱ्याच्या, सोन्याच्या खाणी असणारा हा देश. '... इथं आल्यावर एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली–आफ्रिकानर सरकार काळयांना माणूस म्हणून जगायला द्यायला तयार नाही. काळयाच्या अस्तित्वाची त्याला फिकीर नाही'

विन्नीची स्थानिक भाषेतील गती वाढू लागली तेव्हा एका रहस्याचा तिला उलगडा झाला. इथल्या बाटू प्रशासनानं घेट्टोतील रहिवाशाना आधीच तबी देऊन ठेवली होती. 'विन्नी नावाची एक कम्युनिस्ट बाई इथे राहाणारं आहे. तिच्याशी कोणी मैत्री करायची नाही. संबध ठेवायचा नाही.'

पण हळूहळू घेट्टोच्या लोकाना तिची भीती वाटेनाशी झाली नळावर पाणी भरताना एखाद्या दुसऱ्या शब्दाची देवाण–घेवाण होऊ लागली.

गोऱ्या लोकाबरोबर आपल्यातली एक काळी स्त्री ताठ मानेने वागतेय, ठणकावून आपला हक्क वसूल करतेय हे पाहिल्यावर तेही तिचं अनुकरण करू लागले

विन्नी हाडाची समाजसेविका. तिनं हळूहळू सगळ बदलायला घेतलं. लोकाना अंगणात भाजीपाला, कादे–बटाटे लावायला शिकवल. फळाच्या बिया रूजवून रोपवाटिका तयार केली. साडपाण्यावर झाडं वाढवायला शिकवली. शे–दीडशे मुलासाठी सकस आहार योजना सुरू केली. लहान मुलासाठी तिथल्या चर्चच्या मदतीने पाळणाघर सुरू केलं. स्त्रियाना विणकाम, शिवणकाम शिकवल. वस्तीत आठनऊ शिवणयत्र आली, मुलाचे गणवेष शिवण्याचा उद्योग सुरू झाला. त्या स्त्रिया घरी पाव भाजायला शिकल्या.

एकावेळी एकालाच भेटता येईल, सध्याकाळी ६ वाजल्यापासून सकाळी ६ वाजेपर्यंत घर सोडता येणार नाही वगैरे सर्व बधन पाळून तिन हे घडवून आणलं अर्थात विन्नीच्या मित्रमंडळाचा, हितचिंतकाचा यात मोठाच हातभार.

विन्नीला ब्रॅन्डफोर्टमध्ये ठेवलंय ही बातमी बाहेर फुटताच तिला भेटायला ठिकठिकाणाहून लोक यायचे. मदतीचा हात पुढे करायचे. या लोकांनी केलेली मदत विन्नी वसाहतीतल्या लोकापर्यंत पोचवायची. विन्नीचं कुटुंब विशाल. तिनं कशाचं संचित केल नाही. हातचं राखलं नाही. त्या घेट्टोची ती 'आई'च झाली.

वैद्यकीय समाजसेविकेचं ज्ञान इथेही कामी आलं. तिच्या दारापुढे कायम रांग असे. मित्राच्या मदतीतून तिने एक सेकंडहॅंड मोटार घेतली आणि फिरता दवाखानाही सुरू केला. हीच त्या वसाहतीची रुग्णवाहिकाही.

तिचा समाजसेवेचा झपाटा आणि तिथल्या लोकांवरील वाढता प्रभाव पाहून तिथल्या गोऱ्यांनी शासनाला विनती केली, हिला इथून हलवा. पण सरकारपुढे प्रश्न पडला, यापेक्षा वाईट जागा आता शोधायची तरी कुठे ?

## बाप आणि मुलगी

मुली १६ वर्षांच्या झाल्यावर त्याना वडिलाना भेटायची परवानगी मिळाली.

'काय विचित्र प्रसग... मला त्याची ओळख करून द्यावी लागली... जन्मठेप भोगत असलेल्या आपल्या बापाला भेटताना मुलाची काय प्रतिक्रिया होईल ? अभिमान वाटेल की शरम वाटेल ?... समाज कशाला गुन्हा समजतो ? कशासाठी तुरुंगात टाकल जातं ? स्वातंत्र्यासाठी लढण हा गुन्हा समजणाऱ्या समाजात मुलांवर काय संस्कार होत असतील ?'

विन्नीची ही चिंता सपली. झिड्झी तर वडिलांच्याच वळणावर गेलीय.

झेनी पहिल्या भेटीची आठवण सागताना म्हणते– 'आम्हा दोघाच्यामध्ये काचेच्या तावदानाची खिडकी होती. आमचं बोलणं टेलिफोनद्वारा झालं. त्याना मी सपूर्ण दिसत नव्हते. म्हणून त्यानी खिडकीपासून जरा मागे सरकायला सागितल... अशी वळ, तशी वळ सागितल. मी कोणता स्कर्ट घातलाय हेही त्याना पाहायच होतं... त्याना भेटायला जाताना मी नेहमी टापटीप जाते. केसात मणी ओवण्याचा पारपरिक प्रकार त्याना आवडतो.'

पहिल्या भेटीनंतर मात्र झेनी आईबरोबर पुन्हा कधी गेली नाही. 'ते दोघ एकमेकांकडे टक लावून बघत बसतात... म्हणून मी एकटीने भेटी घ्यायच्या असं ठरवल. म्हणजे मग त्यांचं पूर्ण लक्ष माझ्याकडे राहील...'

आणि खरंच, तुरुगात असूनही मुलीच्या मानसिक आणि भावनिक ताणतणावाकडे त्याचं लक्ष असतं. पत्रातून त्याना आधार देण्याचा त्याचा प्रयत्न असतो. झिड्झीने त्याना आपल्या मित्राच्या 'निवडी'-बद्दल कळवल आणि त्यांचा सल्ला मागितला तेव्हा अत्यत हळुवारपणे त्यानी तिला समजूत दिली '...दोघांचं एकमेकांवर खरोखरीच प्रेम असण हे महत्त्वाचं. बाकी प्रश्न उरतो तो समजुतीचा नि प्रभावाचा...एक मात्र लक्षात ठेव, तू कोणावरही कितीही खोलवर प्रेमात गुंतली असशील तरी त्याला तुझ्यावर दादागिरी करायला देऊ नकोस... तसं झालं तर मात्र मला फार वाईट वाटेल.'

ब्रॅंडफोर्टमधील अनुभवानी झिड्झीची मन.स्थिती ढासळायची वेळ आली. विन्नीने वेळीच मानसोपचार तज्ज्ञाची मदत घेतली. त्यानंतर झिड्झी सावरली. ती शाळेत असतानाच गिटार वाजवायला शिकली. तिच्या तालावर ती कविता करून आपली भावना व्यक्त करू लागली. विशीतच तिचा पहिला कवितासंग्रह I Am अमेरिकेत प्रकाशित झाला. त्याला पारितोषिकही मिळालं.

आपल्या लेकीनं हाती लेखणी घेऊन वेगळा मार्ग निवडला,

वेगळ्या क्षेत्रात प्रवेश केला याचा आनंद विन्नी आणि नेल्सन मंडेलांना वाटतो.

हा वेगळा छंद झिङ्झी जोपासत असली तरी तिने वडिलाप्रमाणे कायद्याचा अभ्यास केला. तीही चळवळीत उतरलीय.

झेनीचा विवाह स्वाझीलॅंडच्या युवराजाशी–थुबुमुझीशी झाला. ती राजघराण्यातील स्त्री झाल्याने वडिलाच्या भेटीसाठी तिला सवलती मिळाल्या. ती आणि थुबुमुझी नेल्सनला वरचेवर भेटू शकतात.

### गोऱ्यांची धोरणी पावलं

१९७८ सालात बऱ्याच घडामोडी घडल्या. नेल्सन साठीचा झाला. न्यूयॉर्कटाइम्सने त्याच्या संबधात लेख दिला. लंडनमध्ये हाऊस ऑफ कॉमन्सने त्याच्या सन्मानार्थ सभा घेतली.

१९७८ मध्येच बोथा सरकारची राजवट सुरू झाली. नुसत्या सैन्याच्या बळावर परिस्थितीवर काबू ठेवता येणार नाही हे लक्षात आल्यान त्याने वेगळ्या डावपेचाना सुरुवात केली.

शहरातील कृष्णवर्णीय मध्यम वर्गाला थोडया अधिक आर्थिक सवलती वाढवून त्याच्या विरोधाची धार कमी करायची आणि त्याचा उपयोग ढालीसारखा करायचा असे धोरण ठरवलं.

बडया उद्योगपतीनी, व्यापाऱ्यानी या धोरणाला पाठिंबा दिला. यानुसार शहरी भागातील काळयाच्या वसाहतीत वीज आली. हॉटेल, दुकानं, चालू करायची परवानगी दिली. व्यापार–उदिमात थोडया सवलती दिल्या. शैक्षणिक क्षेत्रातही तांत्रिक शिक्षणाचे दरवाजे थोडे किलकिले केले. काही भूखंड नव्याण्णव वर्षाच्या करारावर घर–उभारणीसाठी दिले. काळयात शहरी आणि ग्रामीण असे वर्ग तयार करण्याच्या खटपटीला बोथा लागला. बाटू प्रशासनानं आता 'सहकार आणि सुधारणा' खात्याचा मुखवटा घेतला. यालाच नंतर 'सुखी शेजारधर्म' असंही म्हणू लागले. असा शेजारधर्म पाळताना शहरातला गरीब काळा वर्ग ग्रामीण भागात हलवला. दहा मूलस्थानं* तयार करून आफ्रिकनाची विभागणी केली. आता ही विभागणी तरी कशी करायची? कारण काही काही आफ्रिकन तीन-चार पिढ्यापूर्वी मूलस्थानातून हलवलेले. आताच्या पिढीने ते ऐकलेलं नाही की बघितलेलही नाही. मग मूलस्थान ठरवायचं कसं? त्याच्या नावावरून. कुळीवरून. मग जिथे चार पिढ्या काढलेल्या असतात तिथून पाचसहाशे मैल अंतरावरच्या मूलस्थानावर त्याना जावं लागत. लाखो आफ्रिकन असे हलवलेत. आणखी लाखो असे हलवले जाणार आहेत.

या मूलस्थानापैकी काही ठिकाणी स्वायत्त सरकार आहे पण त्या सर्वांवर आर्थिक नियत्रण आहे, बोथा सरकारच.

१९७८ मध्ये सोन्याचा भाव एकदम कडाडला आणि द. आफ्रिकेचं नशीब फळफळल. सरकारची भरभराट झाली. अँग्लो–अमेरिकन कॉर्पोरेशनमधील सुवर्ण खाणकामगाराचे पगार वाढले. पण त्या वाढीतही वशानुरूप तफावत होती गोऱ्याचं वेतन काळयाच्या पाचपट होतं. काळया मजुराची सख्या चार लाख. त्यांनी कॉर्पोरेशनकडे ख्रिसमसनिमित्त बोनस मागितला, तो त्यांनी नाकारला. आणि याच वेळी बाहेरच्या गोऱ्यानी द. आफ्रिकेत यावं म्हणून बोथा

*आफ्रिकन टोळयांची मूळ वसतिस्थाने.


## दीपावली शुभचिंतन!
## १९८८

**तिमिराचा नाश करू....**
**तेजोमय वाट धरू....**

अज्ञान, दारिद्र्य, संकुचित विचार
विद्रोह, असहिष्णुता अन् हिंसाचार
ही सारी तिमिराचीच रूपे!

हा तिमिर दूर सारण्यासाठी
आंतरिक ऐक्य, एकात्मभाव,
प्रेम आणि सौहार्द ह्यांची
तेजोमय कवाडे उघडू या!

अंतरीचे मांगल्य अन् शुचिता
ठायीठायी पसरून
महाराष्ट्र शक्तिशाली बनवू या!

महापुरुषांच्या कर्तृत्वशाली
वारशाच्या प्रकाशात
सर्वंकष विकासाची वाट चोखळीत
राष्ट्राची प्रतिमा उंचावू या!

## कृतिशील शासन : महाराष्ट्र शासन

(डीजीआयपीआर)

सरकार प्रलोभन दाखवू लागलं. हजारो नोकऱ्या उपलब्ध केल्या. नागरिकत्व देण्याची लालूच दाखवली. हे पाहून काळ्यांच्या पोटात राग खदखदू लागला. बिशप टूटू म्हणाले– १९७६ साली लोकाचा राग डोक्यातून निर्माण झाला होता. आता तो आतड्यातून बाहेर पडतोय. सावधान.

बोथा सरकारात ढवळाढवळ करणार नाही या अटीवर नेल्सनची मुक्तता करण्याची तयारी सरकारन दाखवली. त्याच्या जमातीतील पुढाऱ्याना त्याच्या भेटीसाठी, मतपरिवर्तनासाठी पाठवल नेल्सनने झिडकारल– 'देशाचे तुकडे पाडून मुक्ती नकोय.'

## मुक्तीसाठी जागतिक मोहीम

९ मार्च १९८० साली आफ्रिकन लोकाच्या 'सडे पोस्ट' या वृत्तपत्राने मडेलाला मुक्त करा अशी मोठी हेडलाईन देऊन मोहिमेला सुरुवात केली. आमचे सर्व पुढारी, राजकीय नेते मुक्त करा, हद्दपार केलेल्याना परत येऊ द्या, ANC, PAC वरील बदी उठवा अशी मागणी आफ्रिकन जनतेन सुरू केली. त्यासाठी सारे गौरेतर, 'अवघे काळे तेवढे एक' झाले.

वीस वर्षांनंतर पुन्हा राष्ट्रीय परिषदेचा विचार उसळून वर आला आणि विशेष म्हणजे काही गोरी वृत्तपत्रं, काही गोऱ्या विद्यार्थी संघटना या परिषदेच्या बाजूने बोलू लागल्या.

नेल्सन आणि विन्नी याना हा बदल लक्षणीय वाटतो. त्यांनी आजही आपली भूमिका सोडलेली नाही. 'आमचा लढा गोऱ्याशी नाही. वंशवर्चस्वाच्या वृत्तीशी आहे आफ्रिकन राष्ट्रीयत्वाचा लाभ सर्वांनाच घडावा...'

त्याची धाकटी मुलगी झिड्झी हीही नेल्सन मुक्ती मोहिमेत सामील झाली. डिसेंबर १९८० च्या एका सभेपुढे ती म्हणाली–'ते माझे वडील आहेत म्हणून, मुलगी या नात्याने मी या लढ्यात उतरले नाही. साधसुधं कौटुंबिक जीवन कसं असतं हे आमच्या पिढीला अनुभवता आल नाही. त्या पिढीची मी प्रतिनिधी आहे...' आई, वडील, बहीण, भाऊ कोणी ना कोणी तुरुगवास भोगलेल्या कुटुंबाचं दुःख तिच्या तोडून बाहेर पडलं. 'त्याच्या हाती सत्ता आहे म्हणून ते आमच्या प्रियजनाना मन मानेल तेव्हा खेचून, घराबाहेर काढतात... आमच्या मातापित्यानी, आप्तजनानी मानवी जीवनाची प्रतिष्ठा राखण्याच्या लढ्यात सर्व सुखाचा होम केला... ज्या स्वातत्र्यासाठी त्यानी त्याग केला ते मात्र दिवसेदिवस दुरावत चाललय.'

दक्षिण आफ्रिकेच्या काही चर्चनीही नेल्सन मडेलाच्या मुक्ति–मोहिमात सहभाग घ्यायला सुरुवात केलीय. बिशप टूटू तर त्या सर्वांच्या अग्रणी आहेत.

MK घातपाती सघटनेने १९८० साली गनिमी काव्याने पहिलाच हल्ला चढवला तो जोहान्सबर्गच्या तेल साठ्यावर. नंतर प्रिटोरियाच्या बँकेत घुसून तिथले अधिकारी ओलीस धरून मडेला मुक्तीची मागणी केली. या झटापटीत तीन पुरुष, दोन स्त्रिया पोलिसाच्या गोळीबाराला बळी पडल्या. त्याच्या अत्ययात्रेला वीस हजार लोक रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. त्याच्या सगळ्याच्या दृष्टीने ते शूर वीर, योद्धे होते. सरकारात बदल घडवून आणण्यासाठी जीवावर उदार झालेले लढवय्ये होते.

मडेला मुक्ती मोहिमेचा जोर या घटनेनतर अधिक वाढला. 'रक्तपात थाबवायचे असतील, हिंसाचाराला आळा घालायचा असेल तर त्याला पर्याय एकच– मडेलाची मुक्तता ! जनतेने पर्याय दिला.

नेल्सन मुक्ती मोहिमेत अनेक सघटना सामील झाल्यात. हजारो सह्याची निवेदने सरकारकडे पाठवली. सयुक्त राष्ट्र सघानेही नेल्सन आणि त्याच्या सहकाऱ्याना मुक्त करा म्हणून द. आफ्रिका सरकारला आवाहन केल. पण बोथा सरकारनं तिकडे दुर्लक्ष केलं. आजही 'मडेला कडवा साम्यवादी आहे' हे एक नेहमीच उत्तर दिलं आणि त्याच वेळी ब्युरो ऑफ स्टेट सिक्युरिटी ( Boss ) चा माजी प्रमुख, याच्याच कारकिर्दीत मडेला तुरुगवासी झाले, ज. वान डेनबर्ग जाहीरपणे म्हणाला, 'मडेला कधीच कम्युनिस्ट नव्हता.'

आतरराष्ट्रीय दडपण आणि देशातील वातावरण याचा परिणाम म्हणून बोथा सरकारनं नेल्सन मडेला आणि त्याच्या निकटच्या सहकाऱ्याना एप्रिल १९८२ मध्ये बेटावरच्या तुरुगातून काढून केपटाउन जवळच्या पॉल्समूर तुरुगात आणून ठेवल. अगदी तितक्याच कडेकोट बदोबस्तात. इथे त्याना ब वर्ग मिळालाय हे लिहीत असतानाही ते त्याच तुरुंगात आहेत.

आता त्याना तिथे बातम्या ऐकायला मिळतात. इंग्रजी भाषेतील वृत्तपत्रही मिळतात. कारावासातली सक्तमजुरी सपलीय. लेखन-साहित्य मिळाल. एक टेबल, एक खुर्चीही मिळालीय. त्यांच स्वत.चं पुस्तकांचं शेल्फ आहे. त्यावर दोन्ही मुली, विन्नी, नातवंडं याचे फोटो आहेत. ते वरचेवर पुसून साफ ठेवायचे हे एक त्याच्या विरगुळ्याचं काम झालय.

या तुरुगात हजारो कैदी आहेत, त्याची वंशवार विभागणी करून त्याना अलग अलग ठेवलेल आहे. मडेला आणि त्याचे चार सहकारी याना तिसऱ्या मजल्यावर सर्वांपासून अलग ठेवलंय.

मार्च १९८३ च्या भेटीत नेल्सन मंडेलानी सर्व नियम झुगारून विन्नीला तुरुग अधिकाऱ्याच्या देखत तुरुगातील दुःस्थिती सागितली. इथ उघड्यावर फिरायला मिळत नाही. गवताच हिरवं पान म्हणून नजरेला पडत नाही. पाचजण एकाच कोठडीत आहेत. त्यामुळे ज्याला काही अभ्यास करायचाय त्याची अडचण होते शिवाय कोठडीच्या भिंतीना ओल आहे आणि सर्वांवर ताण म्हणजे मापाने लहान असणारा बूट वापरण्याची सक्ती झाल्याने अंगठ्याला इजा झालीय. विन्नी म्हणते, 'त्याही स्थितीत मला हसू आल. काचेच्या खिडकीतून त्याने मला पायाचा अगठा दाखवला... एकवीस वर्षांनी मला त्याच्या अगठ्याच दर्शन घडल.'

विन्नीने ही वस्तुस्थिती परदेशी वृत्तपत्राना कळवण्याची सोय केली. पॉल्समूर तुरुगातील या कैद्याबद्दल प्रथमच बाहेरच्या जगाला समजल.

आता इथे त्याना भेटायला, त्याच्या मुलाखती घ्यायला देशोदेशीच्या व्यक्ती येतात, वृत्तपत्रकार येतात, आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस सघटनेचे लोक येत असतात. त्यामुळे त्याची आता नीट व्यवस्था ठेवतात

तुरुगात वीसबावीस वर्षं काढल्यानतरही नेल्सन मडेला यांच्या बुद्धीची, विचाराची धार जराही कमी झालेली नाही. देशातल्या, जगातल्या राजकीय सामाजिक घडामोडीची अद्ययावत माहिती त्याना

असते. रोजचा व्यायाम चुकलेला नाही. मी कधीतरी या तुरुंगातून सुटेन आणि पुन्हा कामाला लागेन ही त्याची जिद्द कायम आहे. याचा अनुभव त्याची मुलाखत घेणाऱ्या व्यक्तींना येतो.

१९८३ साली United Democratic Front (UDF) संघटनेन जन्म घेतला. हिच्या छत्राखाली संपूर्ण द. आफ्रिकेतल्या मिळून सहाशे संघटना एकत्र आल्या. सर्वांनी मिळून पदाधिकारी निवडले. 'स्वातंत्र्य–सनद' हा या संघटनेचा मुख्य आधार.

UDF च्या ऑगस्ट १९८३ च्या पहिल्या राष्ट्रीय परिषदेसाठी सर्वांनी एकमुखाने नेल्सन मंडेलाना 'आधारस्तंभ' म्हणून मान्यता दिली. या परिषदेसाठी त्याचा खास संदेश वाचला गेला त्यावेळी सर्वांनी उभं राहून त्याच्याविषयी आदर व्यक्त केला.

UDF ने मंडेला मुक्तीसाठी जोरदार मोहीम हाती घेतली.

¤

झेनी आणि तिचा लहान मुलगा याच्यासह विन्नी नेल्सन मंडेलाना भेटायला गेली. तुरुंगाच्या कार्यालयाजवळ जाताच तिथल्या अधिकाऱ्याने त्याना आपल्या खोलीत बोलवून घेतल. विन्नी आणि झेनी धास्तावल्या. नेल्सन मंडेलाचं काही वर–वाईट तर झालं नाही ना या शकेने *व्याकुळ झाल्या. अधिकाऱ्याने अत्यंत* हळुवार शब्दात विन्नीला सागितलं की आजपासून त्याना प्रत्यक्ष भेटीची परवानगी मिळालीय. विन्नीला आनदातिशयाचा धक्का बसू नये म्हणून त्याने ती खबरदारी घेतली.

बावीस वर्षांनतर प्रथमच ते एकमेकाचा स्पर्श अनुभवणार होते.

नेल्सन मंडेलानी नातवाला उचलून छातीशी धरल. ते सर्वजण कितीतरी वेळ एकमेकाच्या मिठीत होते. 'ही सवलत देऊन सरकारने आमच्यावर उपकार नाही केलेत. 'अ' वर्गाच्या राजकीय कैद्याला तो हक्क असतोच. आम्हाला मात्र त्यासाठी झगडाव लागतं...' विन्नीने सरकारवर ताशेरा ओढला.

¤

१९८४ साली बोथा सरकार पुन्हा निवडून आलं. सत्तेवर येताच त्यानं त्रिस्तरीय (tricameval) संसद रचना केली. हिंदी, आफ्रिकन वगळून इतर कृष्णवर्णीयाना गोऱ्यांच्या बरोबरीने प्रतिनिधित्व दिलं. मात्र त्या प्रतिनिधींचा अधिकार गोऱ्यांच्या मर्जीवर अवलंबून ठेवला. काळ्यांचा अधिकार बांटुस्तान आणि अर्बन कौन्सिल याच्यापुरताच मर्यादित ठेवला

या त्रिस्तरीय संसदरचनेविरुद्ध सर्वच गौरेतरानी आक्षेप घेतला. आम्ही वर्णवर्चस्वपद्धती चालवत आहोत, असं जगाला सागत असतानाच ती पद्धती टिकवण्याच्या दृष्टीने बोथा सरकारने ही चाल केली; असा आरोप केला

## आपलं स्वातंत्र्य अलग नाही

३१ जाने. १९८५ ला अध्यक्ष बोथा यानी नेल्सन मंडेलांना सशर्त सुटका देऊ केली. राजकारणात ढवळाढवळ करण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे कट–कारस्थान, हिंसा करणार नाही व तसे करण्यास प्रोत्साहन देणार नाही या अटीवर मुक्तता करतो अस कळवल.

अध्यक्ष बोथा यांना उत्तर देण्याच्या निमित्ताने मंडेलांनी आपल्या बांधवानाही निवेदन केलं. ते झिंड्झीने सोवेटोमधील सभेत जाहीरपणे वाचून दाखवल–

'...मला माझं स्वातंत्र्य प्रिय आहे पण त्याहीपेक्षा मी तुमच्या स्वातंत्र्याला अधिक महत्त्व देतो.'

'अनेक जणानी स्वातंत्र्य–प्राप्तीसाठी यातना सहन केल्या. मी त्या मुलाना, विधवाना, माता–पित्यांना स्वातंत्र्य देणं लागतो... मला माझं आयुष्य प्रिय आहे पण त्यासाठी मी माझा, माझ्या लोकाचा जन्मसिद्ध हक्क विकणार नाही. मी आज लोकाचा प्रतिनिधी, ANC चा प्रतिनिधी म्हणून तुरुंगात आहे... परवाना पत्रकाचा कायदा मोडला म्हणून तुरुंगात टाकल जाणार असेल तर मला कोणतं स्वातंत्र्य ते देऊ करताहेत ? ब्रँडफोर्टमध्ये माझ्या पत्नीला हद्दपार केलंय तिच्या त्या अवस्थेत आम्ही ससार करणं हे कोणत्या स्वातंत्र्यात अभिप्रेत आहे ? शहरी विभागात राहण्यासाठी मला परवानगी घ्यावी लागणार असेल तर मला कोणतं स्वातंत्र्य देऊ करताहेत ? माझ्या दक्षिण आफ्रिकी नागरिकत्वाचाच जर मान राखला जात नाहीए तर मला स्वातंत्र्य तरी कशाचं देताहेत ? ...जोपर्यंत तुम्ही आणि मी स्वतंत्र होत नाही तोपर्यंत मी कोणतीही हमी देणार नाही.

तुमच्या स्वातंत्र्याहून माझं स्वातंत्र्य अलग करता येणार नाही.

मी परत येईन.'

## हिंसाचार व मानभावीपणा

२१ मार्चला 'शार्पव्हिले'चा पचविसावा स्मृतिदिन साजरा करण्यासाठी लोक जमले होते. निःशस्त्र आफ्रिकन लोकाचा तो *जमाव पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. स्त्री–पुरुष मिळून वीसजण* ठार झाले. त्यातल्या सतरा जणांना पाठीमागून गोळ्या बसल्या होत्या.

*लोकाच्या सतापानं उग्ररूप धारण केलं. दगडफेक झाली. सरकारी* खुणा सांगणाऱ्या वास्तूवर, वस्तूवर त्यानी राग व्यक्त करायला सुरुवात केली.

जुलै २२ पासून सरकारन आणीबाणी जाहीर केली

पोलिस आणि लष्कर शिकारीसाठी गावात घुसले. माणसं–मुलं टिपू लागले. हजारोंना तुरुगात बंद केल. त्यात बहुतेक सर्व नेते मंडळी, पुढारी गजाआड गेले. त्याच्या अभावी जाळपोळ वाढली... त्यात लक्ष्य ठरले ते काळे पोलिस, कौन्सिलर्स, मेयर्स... सशयित खबऱ्ये. एकतर ते गोऱ्यांच्या अगणातले म्हणून आणि दुसर म्हणजे ते सापडायला सोपे... दूरदर्शनवर सेन्सॉरशिप. त्यामुळे काळे काळ्याना मारताहेत याचीच दृश्य. गोरे आपले या संघर्षापासून मनाने खूप दूर. सुरक्षित.

एका एका प्रेतयात्रेला हजारोंच्या संख्येने उपस्थिती. एका खेड्यातली स्त्री म्हणाली–आम्ही पूर्वीसारखे कधीच होऊ शकणार नाही... यानी आमच्यात बदल केला. आम्ही शातताप्रिय लोक. यांनी आम्हाला हिंसाचार शिकवला.'

प्रत्येक दफनानतर ANC चा ध्वज थडग्यावर लागायचा. राष्ट्रगीत व्हायचं.

या प्रेतयात्राही पोलिसांच्या लक्ष्यातून सुटल्या नाहीत. मृतांची संख्या वाढतच गेली. २१ महिन्यात ९०० लोक मेले.

देशातून आणि परदेशातून बोथावर दडपण येऊ लागलं. मंडेलाला मुक्त करा. त्याच्याशी चर्चा करा.

पण ही संधीदेखील बोथाने घालवली.

त्याचा परिणाम रँडचे कमालीचे अवमूल्यन झाले.

बोथा मग नवी चाल खेळला.

वर्णवर्चस्वपद्धती मोडीत काढण्यासाठी एक 'सुधार' योजना आखली.

डच, इंग्रज, ग्रीक, जर्मन आदी सर्व गोरे तेवढे एक आणि आफ्रिकन लोकांचे जमातीनुसार, टोळीनुसार विभाजन केले. त्यामुळे सत्तेत सहभाग घेताना गोरे बहुसंख्य झाले आणि इतर अल्पसंख्याक ठरले. बाकी इतर कायदे आपण रद्द करत आहोत अशी भलावण सुरू ठेवली.

बोथाच्या या डावपेचामुळे, आणीबाणी उठवण्यास नकार दिल्यामुळे दक्षिण आफ्रिकेची आर्थिक कोंडी करावी अशी मोहीम इतर राष्ट्रांनी सुरू केली.

पण यात ब्रिटन हातमिळवणी करायला तयार नव्हतं. द. आफ्रिका ब्रिटनच्या व्यापारातला हुकुमी एक्का. त्याला असं तोडून कसं चालणार म्हणून मार्गारेट थॅचरना आफ्रिकन गरीब जनतेची दया आली. अशी आर्थिक कोंडी केली तर त्यांचं कसं होणार म्हणून त्याना चिंता पडली. ही चिंता विन्नीच्या कानी गेली. तेव्हा विन्नी कडाडली...

'मार्गारेट थॅचरने असं म्हणावं! रस्त्यावरून आपल्या मुलांची प्रेतं गोळा करणाऱ्या मातांबद्दल इतकं निर्दय, असहिष्णू असावं!'

इतर देशानी द. आफ्रिकेवर बहिष्कार घालावा, तिची आर्थिक कोंडी करावी म्हणजे मग सरकार शुद्धीवर येईल असं आवाहन नेल्सन मंडेला करतात. पण असं केलं तर आफ्रिकन लोकांना त्याची झळ सोसावी लागेल या युक्तिवादाला त्यांच्याकडे उत्तर आहे– 'आम्ही आमची पोटं आवळलीत. स्वातंत्र्यासाठी त्याग करावा लागतोच.'

विन्नी परदेशी कंपन्यांना फटकारते– 'परदेशी कंपन्या या देशात नसत्या तर राजकीय दृष्ट्या आज आम्ही जे भोगतोय ते भोगावं लागलं नसतं... नोकऱ्या मिळाल्याने आपण सुस्थित, सुरक्षित आहोत असं आम्हा काळ्यांना वाटतं... सामाजिक परिस्थितीचा काच जाणवत नाही... उदासीनता येते... पण हे सुख फार फसवं आहे... म्हणूनच या कंपन्या जायला हव्यात. परराष्ट्रानी आमच्या सरकारची आर्थिक कोंडी केली तरच त्यांच्या नाड्या आखडतील... आज या कंपन्यांमुळेच सरकार पोसलं जातंय...जुलमी सत्ता वाढतेय...'

¤

द. आफ्रिकेची आर्थिक कोंडी करण्याची मोहीम आतरराष्ट्रीय पातळीवर आखली जात आहे असं लक्षात येताच परदेशी बँकानी हात आखडता घेतला. रँड कोसळला. काळ्यांची बेकारी बेसुमार वाढली तरीही ७७% लोक आर्थिक कोंडीच्या बाजूचे होते.

द. आफ्रिकेच्या सरहद्दीवरची आफ्रिकी राष्ट्र– अंगोला, बोट्स्वाना मोझांबिक, टाझानिया, झांबिया आदींनी द. आफ्रिकी सरकारवर दडपण आणायला सुरुवात केली.

झांबिया, टांझानिया इथे ANCनं आपलं कार्यालय थाटलंय आदिस अबाबात ANCचं रेडियो केंद्र आहे. त्यावरून MK संघटनेच्या नेत्यानं आफ्रिकन जनतेला घरगुती बॉम्ब, दारूगोळा, बंदुका बनवण्याचे धडे देणं सुरू केले आणि बोथा सरकारच्या पोलिसांकडून बंदुका हस्तगत करा म्हणून संदेश दिला. हे प्रकरण फारच पुढे चाललंय. राजकीय आणि आर्थिक स्थैर्य धोक्यात येऊ लागलंय म्हणून मग द. आफ्रिकेच्या व्यापारी जगतानं सरकारकडे काळ्या पुढाऱ्यांशी बोलणी करा असा हेका लावला. काही गोऱ्या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी आणि चर्चेसनीही ANC शी बोला असा हेका सरकारकडे धरला पण बोथा आपल्या भूमिकेवर अढळ आहे. आणि त्याचे पोलिस त्याच्याहीपेक्षा दोन पावलं पुढं आहेत.

विन्नी १९८५ च्या ऑगस्टमध्ये दुखऱ्या पायावर इलाज करवून घेण्यासाठी जोहान्सबर्गला गेली होती. ब्रँडफोर्टमधील विद्यार्थी शिक्षण पद्धतीविरुद्ध निदर्शन करीत रस्त्यावर उभे होते. त्यांच्यावर पोलिसानी अश्रुधूर सोडला. लाठीमार केला. त्यातली बरीचशी मुलं विन्नीच्या आश्रयाने राहात होती. तिच्या गैरहजेरीत तिची धाकटी बहीण त्यांची देखभाल करत होती. तिलाही त्यानी तुरुंगात टाकलं. एवढं कमी म्हणून की काय आठवड्याभरात ब्रँडफोर्टला तिच्या घरात पेट्रोल बॉम्ब फुटला. त्या स्फोटात तिचा छोटा दवाखाना, छोटं ग्रंथालय, शिवणयंत्र, नेल्सन मंडेलांना मिळालेले पुरस्कार, पत्रं सारं सारं नष्ट झालं.

विन्नी बंदी हुकूम, स्थानबद्धता, सारे मनाई हुकूम तोडून जोहान्सबर्गच्या ओरलँडोत राहायला गेलीय. माझा तुरुंग होता तसा करून दिल्याशिवाय मी परत जाणार नाही असं तिनं जाहीर केलं.

या स्फोटाची उभ्या जगाने निर्भर्त्सना केली.

¤

१९८५ साली जोहान्सबर्गमध्ये नेल्सन मंडेला यांचा सदुसष्टावा वाढदिवस साजरा करण्याची लोकानी तयारी सुरू केली. गायक, कवी हेही उपस्थिती लावणार होते. पण त्यावर सरकारने बंदी घातली.

मग काहीनी आपल्या भावना प्रत्यक्ष मंडेलापर्यंत पोचवण्यासाठी पदयात्रा काढायचे योजले.

या प्रकारातही अनेकांची धरपकड झाली. २८ लोक जीवाला मुकले. २०० जखमी झाले. इतिहासात प्रथमच काळ्यांच्या वसाहतीतून गोऱ्यांच्या वसाहतीत मोर्चा शिरला. २५५ जणाना अटक झाली.

५ ऑगस्टला चार हजाराचा जमाव पॉलसमूर तुरुंगाच्या दिशेने चालत होता. हजारो विद्यार्थ्यांनी शाळेवर बहिष्कार टाकला. पोलिसानी लाठीमार केला. अश्रुधूर सोडला या सर्व अडसरातून चोवीस जण शिताफीने पार झाले. पोलिसानी पकडण्यापूर्वी तुरुंगाच्या प्रवेशद्वाराशी पोचले मंडेलाना देण्यासाठी तयार केलेलं पत्र त्यानी नंतर वृत्तपत्रातून प्रसिद्ध केलं. 'तुम्ही आमचे खरे नेते आहात. तुमची मुक्तता होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही... तुम्ही तुमच्या लोकांसाठी केलेला त्याग जाहीर आहे दक्षिण आफ्रिका स्वतंत्र करून लोकांचे सरकार आणण्यासाठी आम्ही नव्याने प्रयत्नाला लागत आहोत...'

## 'मी घरी येईन'

नेल्सन मंडेलानी विन्नीला पाठवलेल्या पत्रात आपलं मन उघड केलय–

'...तुझं प्रेम आणि सहकार्य. सोन्यासारखी मुलं... तू जिंकलेले मित्र... या साऱ्याच्या प्रेमाची, मायेची ऊब पुन्हा अनुभवायला मिळणार ही आशाच माझ आयुष्य आहे, आनंद आहे.'

'मी सुटून घरी येईन. तेव्हा तू घरी नसलीस तर तुला शोधून काढीन. आधी तुला बातमी देईन कारण तो फक्त... फक्त तुझा मान आहे... तुझा फोटो आत्ता माझ्याशेजारी आहे मी रोज तो पुसतो. तस करताना तुला स्पर्श केल्याच सुख अनुभवतो...'

विन्नीनं उत्तरात लिहिल–

'...गेल्या काही वर्षांच्या विरहात मी अनेक मोलाच्या गोष्टी हरवून बसलेय... तू (बोथाला) पाठवलेल्या उत्तरामुळे मला तुझा अभिमानच वाटतो.

पण आम्ही जे काही हरवून बसलोय त्याने मृत्यूची शान राखली गेलीय...'

नेल्सन मंडेलानी सशर्त मुक्तता नाकारली तेव्हा त्याच विन्नीन अभिनदन केल. पण ती त्याच्या येण्याची वाट पाहातेय–

'...असं वाटतं, तो सुटून येईल. मग आम्ही विवाहिताच जीवन जगू... घर उभं करू... आम्ही पतीपत्नीचं नात अनुभवू शकू असा एखादा दिवस उगवेल?... तो पहाटे चारलाच उठेल. धावायला जाईल... मग मी त्याला फळाच्या रसाचा ग्लास देईन. अशा साध्या साध्या छोटया छोटया गोष्टी... पण मानवी सहजीवनात किती अर्थपूर्ण! मला माहीत आहे– तुरुगातून सुटका झाल्यावर त्याला आपल्या गावी जायचय. तिथल्या लोकाना भेटायचंय. त्याच त्याच्यावर प्रेम आहे... तो येणार आहे.

१९८५ मध्ये नेल्सन मंडेलाना प्रोस्टेट ग्रंथीचा त्रास होऊ लागला. शस्त्रक्रिया करावी लागली. विन्नी सर्व मनाई हुकूम धुडकावून रुग्णालयाजवळच्या हॉटेलात थांबली दररोज पचेचाळीस मिनिटाची भेट मिळे.

या शस्त्रक्रियेनतर तरी सुटका होईल अस लोकाना वाटत होतं, पण तसं घडल नाही

विन्नीन अजूनही सुटकेची आशा सोडलेली नाही. त्याची सुटका व्हायलाच हवी. कारण त्याच्या लग्नातला एक विधी व्हायचा अजून बाकी आहे.

झोसा जमातीच्या विवाहपद्धतीत मुलीच्या घरी लग्न लागतं लग्नानतर वरात वधूच्या माहेरचा केक घेऊन वराच्या घरी जाते. आणि लग्नविधी पूर्ण होतो विन्नीने माहेरून आणलेला केक नेल्सनच्या घरी जायची वाट बघतोय. नेल्सनच्या धावपळीत ते काम राहून गेलय...नेल्सन सुटायलाच हवा.

विन्नीच झोसा भाषेतलं नाव आहे नॉमझमो. म्हणजे जिला अनेक परीक्षातून जाव लागत झगडाव लागतं ती.

नेल्सनच झोसा भाषेतल नाव आहे रोलीहलाहला. रोलीहलाहला म्हणजे सकटाला आमत्रण देणारा.

¤

## आजही

आजही द. आफ्रिकेत आणीबाणी चालू आहे आर्चबिशप डेस्मड टुटू आणीबाणी उठवा, सर्व राजकीय बदीना मुक्त करा, तरुणाना विनाचौकशी गजाआड केलय त्याना मुक्त करा, ANC सकट एकूण अठरा संघटनावर बदी आहे ती उठवा अशा मागण्या करताहेत अस झाल नाही तर द. आफ्रिकेचे 'लेबॉनन' व्हायला वेळ लागणार नाही असा इशाराही दिलाय. पण आजही नेल्सन मंडेला आणि त्याचे सहकारी बदिवासातच आहेत त्यापैकी सिसुलू हे तर ७६ वर्षांचे आहेत. आजही ऑलिवर टाबो देशाबाहेर–झाबियात राहून नेल्सन-मुक्तीसाठी, ANC ची चळवळ पुढे चालू ठेवण्यासाठी प्रयत्नशील आहेत त्यानीही सत्तरी ओलाडलीय.

मार्च १९८५ मध्ये सयुक्त राष्ट्रसघटनेच्या सिक्युरिटी कौन्सिलपुढे आतरराष्ट्रीय स्तरावर द. आफ्रिकेची आर्थिक कोंडी करावी असा प्रस्ताव आला. चौतीस राष्ट्रानी प्रस्ताव उचलून धरला यावेळी ब्रिटन आणि अमेरिकेने नकाराधिकार वापरला

मार्गारेट थॅचर तर आजही (५–९–८८) म्हणतात– 'आर्थिक नाकेबदी म्हणजे काळ्याची उपासमार!'

गेल्या पावशतकात बदी मंडेलाना अनेक आतरराष्ट्रीय पुरस्कार, मानद सदस्यत्व, पदव्या, किताब प्राप्त झालेत. कित्येक शहरानी त्याना आपले नागरिकत्व बहाल केलय. हजारो महापौरानी त्याच्या मुक्ततेसाठी बोथा सरकारला आवाहन केले. लाखो सह्याचे विनती अर्ज सयुक्त राष्ट्रसघटनेकडे जाताहेत–मंडेला मुक्तीसाठी प्रयत्न करा, दडपण आणा म्हणून मागणी करताहेत. आजही मंडेला आणि त्याचे सहकारी बधनातच आहेत.

नेल्सन मंडेला आज एक व्यक्ती म्हणून उरलेले नाहीत. दडपशाही झुगारणाऱ्या, मानवी जीवनाची प्रतिष्ठा राखण्यासाठी धडपडणाऱ्या स्वातंत्र्येच्छेचे ते जिवत प्रतीक आहेत त्यामुळेच ते आज कोणतीही अट पाळून मुक्त व्हायला तयार नाहीत. त्याना विनाअट मुक्त करायचं म्हणजे बोथा सरकारन काळ्याच्या हाती सत्ता सोपवायची. याला बोथा तयार नाहीत. एकदा मंडेला मुक्त झाले तर काय घडून येईल याची त्याना पूर्ण कल्पना आहे. त्यामुळेच सयुक्त राष्ट्रसघटनेच्या आवाहनाला ते जुमानत नाहीत.

१८ जुलै १९८८ रोजी नेल्सन मंडेलांचा सत्तरावा वाढदिवस अवघ्या जगाने साजरा केला हद्दपार ANC कार्यकर्त्यांनी 'सत्तराव्या वर्षी स्वातत्र्य' मोहिमेच्या स्वरूपात तो सर्वत्र साजरा केला. पण खुद्द दक्षिण आफ्रिकेत मात्र त्या दिवशी मंडेला वाढदिवसाचा कोणताही सार्वजनिक समारभ घडून आला नाही बोथा सरकारनं त्यावर बदी घातली होती.

सध्या नेल्सन मंडेलाना रुग्णालयात दाखल केलेल आहे त्याना क्षयाची बाधा झालेली असल्याने त्याच्यावर कडेकोट बदोबस्तात उपचार चालू आहेत.

लवकरच मंडेलाना मुक्त करत आहोत असं बोथा सरकारनं जाहीर केलय.

२६ ऑक्टोबर १९८८ रोजी द आफ्रिकेत निवडणुका होऊ घातल्यात. आर्चबिशप टुटू यानी त्यावर बहिष्कार घालावा असं मतदाराना आवाहन केलय. आणीबाणी चालू असताना असं आवाहन म्हणजे दहा वर्षांच्या तुरुंगवासाला आमंत्रण. पण तो धोका पत्करूनही आर्चबिशप टुटू आपला विरोध जाहीरपणे व्यक्त करताहेत.

एप्रिल १९८० साली नेहरू पुरस्कार स्वीकारण्यासाठी नेल्सन मंडेलाच्या वतीने ऑलिव्हर टाबो आले होते. मंडेलाना वाटलं होत विन्नीला भारतात जायला मिळेल पण बोथा सरकारन पारपत्र नाकारले. मंडेला आपल मनोगत ऑलिव्हर टाबोपर्यंत पोचवण्यात यशस्वी झाले त्याच ते पत्र टाबोनी पुरस्कार वितरण समारभात वाचून दाखवल–

'... जगातल्या कोणत्याही एका भागावर जरी परकीयाची सत्ता असेल तरी अन्य भागातील बाधव खऱ्या अर्थाने मुक्त आहेत असे म्हणता येणार नाही...' त्या अर्थाने आपणही बंदिवासातच आहोत.

# "मारा/साद"



## एक आधुनिक अभिजात नाटयकृती

: १ :

पडदा उघडला जातो तेव्हा रंगमंचावर स्नानगृहाचं दृश्य दिसतं. हे शारेंतां मनोरुग्णालयातील स्नानगृह आहे. पांढऱ्या टाइल्स लावलेल्या भिंती. बाथटब, शॉवर्स, बाकं आणि मसाजटेबल्स. रुग्णांच्या स्नानांसाठी जागा. समोर वर्तुळाकार रंगपीठ. उजव्या बाजूला एक डायस, त्यावर बाथटब डाव्या बाजूच्या डायसवर खुर्ची. डावीकडे, उजवीकडे उंचवटयावर काही आसनं. नाटक या स्नानगृहात व्हायचं आहे. मागे प्लॅटफॉर्मवर रुग्ण बसलेले किंवा पहुडलेले आहेत. परिचारक मसाजच्या आणि स्नानाच्या तयारीत मग्न आहेत. मनोरुग्णालयातील या स्नानगृहात ज्या नाटकाचा प्रयोग व्हायचा आहे, त्याचा लेखक आणि दिग्दर्शक मार्क्विस द साद नाटक सुरू होण्यापूर्वीच्या तयारीत मग्न आहे. साद खूण करतो तेव्हा मागच्या दारातून पात्रं येऊ लागतात. रुग्णालयाचा संचालक कोलमीअ, त्याची बायको आणि मुलगी, सिस्टर्स, पुरुषपरिचारक, पांढरं कापड गुंडाळलेला मारा, सिमोन, कोर्डे, दुपेरे, रू अशी पात्रं येतात. चार गायक येतात. चुण्याचुण्यांचा सैल झगा घातलेला आणि हातात दंड घेतलेला अग्रदूत येतो. त्याच्या टोपीला घंटया आणि टिकल्या लावलेल्या आहेत. वेगवेगळा आवाज काढता येईल अशी काही साधनं त्याच्या झग्यावर लटकवलेली आहेत, घंटा घणघणते आहे. आता रंगमंचावर आलेली सारी पात्रं त्या मनोरुग्णालयातील रुग्ण आहेत आणि त्यांनी रुग्णालयाचा पांढरा पोषाख केलेला आहे. त्यावर भूमिकेनुसार इतर पोषाख चढवलेला आहे. सादनं लिहिलेलं नाटक या स्नानगृहात हे मनोरुग्ण सादर करणार आहेत. त्यापूर्वी रुग्णालयाचा संचालक प्रेक्षकांचं स्वागत करतो, नाटककाराचे आभार मानतो आणि रंगमंचावर उभ्या राहणाऱ्या या नवख्या नटमंडळीकडे कृपादृष्टीनं बघावं अशी विनंती करतो. हे सारे मनोरुग्ण जे नाटक आता सादर करणार आहेत ते आहे– 'ज्यां पॉल मारा याचा छळ आणि त्याची हत्या.'

पिटर वाइसच्या 'मार्क्विस द साद' यांच्या दिग्दर्शनाखाली शारेंता मनोरुग्णालयातील परिजनांनी सादर केलेला ज्यां पॉल मारा यांचा 'छळ आणि हत्या 'संक्षिप्त– 'मारा–साद' या नाटकाची ही सुरुवात आहे. जागतिक रंगभूमीवर गाजलेलं, कोनरॅड स्विनारस्की, पिटर ब्रुक अशा विख्यात दिग्दर्शकांनी बसवलेलं, ब्रेश्त आणि आर्तो यांच्या रंगमंचविषयक विचारसरणीचा समन्वय असलेलं, रंगमंच आणि नाटक यातील नव्या शक्यतांचा शोध घेणारं, चर्चात्मक आणि चर्चेला प्रेरित करणारं असं हे नाटक आहे. या नाटकाचा लेखक पीटर वाइस हा मूळ जर्मन लेखक. नाझींच्या ज्यूविरोधी कारवायांमुळे त्याला १९३४ मध्ये देश सोडून परागंदा व्हावं लागलं. १९३९ पासून तो स्वीडनमध्ये राहू लागला. १९१६ ते

१७८९ मध्ये फ्रेंच राज्यक्रांती झाली. ' स्वातंत्र्य, समता, बंधुता ' या तीन मूल्यांचा जयघोष सर्वत्र ऐकू येऊ लागला. फ्रेंच राज्यक्रांतीचे जगाच्या इतिहासावर दूरगामी परिणाम झाले. या घटनेला पुढच्या वर्षी–म्हणजे १९८९ मध्ये–२०० वर्षे पूर्ण होतील.

राज्यसत्ता उलथून टाकली खरी, पण क्रांतीनंतरही सर्वसामान्य जनता उपाशी, दरिद्रीच राहिली. राजकारणी, सेनाधिकारी स्वतःच्या तुंबड्या भरण्यात मग्न होते. देशभर प्रचंड हत्त्याकांड सुरू झाले. इतर माणसे आपला जीव घेणार तर आपणच त्यांचा जीव आधी का घेऊ नये...अशी चहूकडे भावना.

या राज्यक्रांतीच्या काळातील मारा आणि साद हे दोन विचारवंत. लेखनावर आणि कृतीवर विश्वास असणारा मारा आणि विकृत, व्यभिचारी तरीही तत्त्ववेत्ता, कशावरही विश्वास नसलेला साद यांच्या विचारांतील भेद हा या नाटकाचा संघर्षात्मक गाभा आहे.

नाटकाची पार्श्वभूमी फ्रेंच राज्यक्रांतीची जरी असली तरी हे नाटक कोणत्याही राजकीय, सामाजिक स्थितीचे चित्रण ठरू शकते, हे या नाटकाचे मोठेपण....

**● वसंत आबाजी डहाके ●**

१९८३ हा त्याचा जीवनकाल. वाइसनं साहित्य, चित्रकला, चित्रपट अशा विविध क्षेत्रात काम केल. नाटककार म्हणून त्याची ख्याती अधिक आहे आणि जर्मनीतच त्याला सर्वप्रथम नाटककार म्हणून मान्यता मिळाली. ' नाइट विथ गेस्टस् ', १९६३ यानंतर १९६४ मध्ये त्यान ' मारा–साद ' हे नाटक लिहिलं. जर्मनीतल्या या प्रयोगाच दिग्दर्शन स्विनारस्कीन केलेल होत. रगमचावरील नेपथ्य स्वतः वाइसन उभ केलेलं होतं आणि पात्राची वेषभूषा वाइसच्या पत्नीन (नेपथ्य आणि वेषभूषेसाठी करड्या राखाडी रगा-कडून पाढऱ्या रगाकडे झुकणारी रगसगती योजिलेली होती. डोळ्यासमोर मनोरुग्णा-लयातील स्नानगृह जसच्या तसं साकार व्हाव हा उद्देश होता.) ' मारा–साद 'नतर ' दि इन्व्हेस्टिगेशन ', ' डिस्कोर्स ऑन विएतनाम ', ' ट्रॉट्स्की इन एक्झाइल ', ' होल्डरलिन ' ही त्याची नाटकं इग्रजीत आलेली आहेत. वाइसची बहुतेक नाटक मुक्तछंदसदृश शैलीत लिहिलेली, चर्चात्मक आहेत. परतु दृश्यात्मकतेकडे त्यान दुर्लक्ष केलेल नाही मूकाभिनय, मुद्राभिनय, देह-विभ्रम, विविधागी आविर्भाव, हालचाली या साऱ्याचा त्यानं कुशलतेन उपयोग केलेला आहे. तसच रगमचावर असलेल्या पात्रानी प्रसगामध्यं सहभागी असणं, घटिताचा भाग बनण हे त्याच्या नाट्यकृतीच लक्षणीय वैशिष्ट्य आहे. मारा, साद, ट्रॉट्स्की, होल्डरलिन या लेखकाविषयी वाइसला विशेष आकर्षण आहे अस दिसनं या चारही ऐति-हासिक व्यक्तीवर त्यानं लिहिलेली नाटक लेखक आणि जग, कल्पना आणि प्रत्यक्ष याच्यातील द्वद्व साकार करणारी आहेत ' मारा–साद 'मध्यं ज्या पॉल मारा आणि मार्क्विस द साद हे दोन फ्रान्सच्या राज्य-क्रातीच्या काळातले विचारवत समोरासमोर आणलेले आहेत. या दोघाच्या विचारातील भेद हा नाटकाचा सघर्षात्मक गाभा आहे. मारा शारेंताच्या मनोरुग्णालयात कधीही नव्हता. परतु त्वचारोगाच्या असह्य पीडेमुळे त्याला सतत बाथटबमध्ये बसून राहावं लागत असे. तसा तो बसलेला असतानाच त्याचा खून झाला ही ऐतिहासिक घटना. दुसरी गोष्ट म्हणजे माराच्या हयातीत मार्क्विस द सादची आणि त्याची ओळख होती किंवा नाही याविषयी माहिती नाही. परंतु १७९३ मध्ये माराची हत्या झाल्या-नतर त्याच्या शोकसभेत सादन भाषण केल होतं ही देखील ऐतिहासिक वस्तुस्थिती. मात्र साद शारेंताच्या मनोरुग्णालयात होता आणि १८०१ ते १८१४ पर्यंतच्या वास्त-व्यात त्यान तेथे नाटकं बसविली होती. प्रस्तुत नाटक सादच्या त्या वास्तव्याच्या काळातच १३ जुलै १८०८ रोजी त्या शारेंता रुग्णालयात मनोरुग्णाच्या सहकार्यान साकार केल जात आहे अशी कल्पना पीटर वाइसन केलेली आहे. नाटकात नाटक आहे. फ्रान्सच्या राज्यक्रातीचं वातावरण मनोरुग्ण साकार करताहेत. या साऱ्या व्यक्ती मानसिक

रुग्ण आहेत आणि त्या कोणती तरी भूमिका करीत आहेत. मनोरुग्णालयाचं हे रूपक वापरून वाइसनं अनेक गोष्टी साधलेल्या आहेत.

## : २ :

अग्रदूत पात्राचा परिचय करून देतो. माराच्या महत्त्वाच्या भूमिकेसाठी जल-चिकित्सेचा प्रयोग सुरू असलेल्या रोग्याला निवडलं आहे. माराची हत्या करणाऱ्या कोर्डेची भूमिका निद्राव्याधी आणि खेदोन्माद जडलेल्या मुलीन केली आहे ती मुलगी मध्येच आपली भूमिका विसरणार तर नाही अशी अग्रदूताला काळजी रुग्णाचा आणि त्यावरोबरच ते ज्या भूमिका करताहेत त्याचाही परिचय अग्रदूत करून देतो आहे हे नाटक आहे, आपण समोर चाललेल्या गोष्टीकडे नाटक म्हणून बघायच आहे हे भान बाळगत असतानाच ह्या भूमिका करणारी माणसं मात्र मनोरुग्ण आहेत हीही जाणीव ठेवायची आहे रू या माजी धर्मोपदेशक व जहाल समाजवादी, माराच्या अनुयायाची भूमिका करणाऱ्या रुग्णाचे हात समोर बाधलेले आहेत. त्याला हाताच्या हालचाली करता येत नाहीत शेवटी नाटकाचा लेखक आणि दिग्दर्शक साद याचा परिचय. 'कुप्रसिद्धीचा काळा तारा माथ्यावर घेऊन आलेला' साद

दोनातिए अल्फॉन्स फ्रान्स्वा, मार्क्विस द साद इतिहासातील एक चमत्कारिक मनुष्य, विकृत म्हणून ओळखला गेलेला, अश्लील पुस्तकं लिहिणारा, नीतिभ्रष्ट आणि वेडा इसम. तो तत्त्ववेत्ताही होता 'सॅडिझम' ही सज्ञा त्याच्या नावावरूनच तयार झालेली. यातना देऊन लैंगिक सुख मिळवण्याच्या लैंगिक विकृतीला 'सॅडिझम' हे नाव आहे सादन आपल्या जीवनात आणि वाङ्मयात अशा लैंगिक विकृतीच दर्शन घडवल आहे. साद क्रौर्य हा वाङ्मयाचा विषय बनवणारा पहिला लेखक. तो अनीतीचा, विकृतीचा, दुर्गुणाचा तत्त्ववेत्ता होता. त्यान स्वत च्या अनुभवातून आणि निरीक्षणातून आपल्या काळातील विकृतीचं चित्रण केलेलं आहे. महान क्रांतीच्या काळातील फ्रान्समधील मूल्यहीन जीवनाचं वैशिष्टयपूर्ण चित्रण त्यान केलेलं आहे न. चिं. केळकर याच्या 'फ्रेंच राज्यक्रांती' या पुस्तकात १७९३ मधील हत्याकाडाविषयी माहिती दिलेली आहे ते म्हणतात, 'रानटी समाजाच्या काळाप्रमाणे यावेळी फ्रान्सची स्थिती झाली होती. जो भेटेल तो शत्रू आणि तो जर आपला जीव घेणार तर आपणच त्याचा जीव आधी का घेऊ नये... देशाचे किंवा स्वातत्र्याचे नाव घेऊन मग काय वाटेल ते दुष्कृत्य करावे, असा तो काळ येऊन गेला खरा. शिरच्छेदाची नेहमीची साधने अपुरी पडू लागली म्हणून 'गिलोटीन' नावाचे डोकी तोडण्याचे यत्र तयार करण्यात आले. चौकशी कमिटी आणि हे शिरच्छेदाचे यंत्र याचे भयकर कार्य सतत चौदा महिने सुरू होते... १७९३ च्या नोव्हेंबरपासून १७९४ मार्चपर्यंत दर महिन्यास सरासरी ६५. पहिल्या बावीस दिवसात ३८१ व पुढील ४७ दिवसात १३६६. पॅरिसमधील सॅमसन नावाच्या एकट्या मारेकऱ्याने आपल्या हाताने दोन हजार सहाशेपचवीस लोकाची कत्तल केली. सादच्या पुस्तकातून व्यक्त होणार क्रौर्य आणि फ्रान्सच्या जनजीवनातून व्यक्त झालेल क्रौर्य याच्यातील परस्परसबंधाचं चित्रण 'मारा/साद'मध्ये झालेलं आहे. साद जे जगला तेच त्यान आपल्या लेखनातून आविष्कृत केलेल आहे १७९० मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर सादला न्यायाधीशाच्या जागेवर काही काळ काम कराव लागल होत. त्यावेळचा त्याचा अनुभव या नाटकातून व्यक्त झालेला आहे · 'ते होतं अमानुष, ते होत कुरूप आणि चमत्कारिकपणे तत्रकुशल.'

सादचा जन्म १७४० मधला तर माराचा १७४३ मधला. दोघेही समकालीन होते साद सरदार घराण्यातला, देखणा वयाच्या तेविसाव्या वर्षी त्याच लग्न करून देण्यात आल. पण त्याला बायकोपेक्षा मेव्हणी अधिक आकर्षक वाटली इथूनच त्याच्या लैंगिक विकृतीच्या चाळयाना सुरुवात झाली. तो वेश्यावस्तीत जाऊ लागला, मुलीना भाड्यानं घेऊन त्याच्या निर्वस्त्र शरीरावर तो आसूडाचे फटकारे ओढायचा. या प्रकाराबाबत त्याला पहिला तुरुगवास घडला तो १७६३ मध्ये. नंतर १७६८ मध्ये दुसऱ्यांदा तुरुंगवास. नतर १७७८ ते १७८९ पर्यंत व्हिन्सेनीज आणि बॅस्टिलच्या तुरुगात, एप्रिल १७९० पर्यंत शारेतॉंच्या मनोरुग्णालयात तो होता. राज्यक्रातीच्या गोंधळात तो सुटला. बारा वर्षांच्या या तुरुंगवासात त्यान कादबऱ्या, निबध इत्यादी साहित्य लिहिलं, सतरा नाटकं लिहिली. १८०१ मध्ये नेपोलियनविरुद्ध लेखन केल्यामुळे त्याला परत तुरुंगात धाडण्यात आल. दोन वर्षांनी त्याला शारेंतॉंच्या मनोरुग्णालयात हलवण्यात आल आयुष्यातली अखेरची अकरा वर्षं त्यानं तिथ काढली १८१४ मध्ये तो मरण पावला.

माराचे वडील डॉक्टर होते. प्रॉटेस्टंट पथाची दीक्षा घेतल्यानं त्याना फ्रान्स सोडून स्वित्झलॅंडमध्ये जावं लागलं. मारा सोळाव्या वर्षी वैद्यकीय शिक्षणासाठी फ्रान्समध्ये आला. १७६२ मध्ये तो इग्लडला गेला. तेथे त्यान स्वखर्चान स्वत ची 'मनुष्याविषयी निबध' आणि 'गुलामीच्या बेड्या' ही पुस्तक छापून प्रसिद्ध केली. १७७६ मध्ये तो पॅरिसमध्ये परत आला कोम्त द आर्तोईकडे तो वैद्यकीय सल्लागार म्हणून नोकरीस होता. १७८३ मध्ये त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आलं. 'लोकमित्र' नावाचं वृत्तपत्र त्यान काढल त्यात राजवटीविरुद्ध कडक टीका असल्यानं त्याच्या पकडीसाठी हुकूम निघत. माराला लपूनछपून वावरावं लागत असे. त्यातच त्याला त्वचारोग जडला. साद आणि मारा या दोघांनाही बराच काळ एकातवासात काढावा लागला हे या दोघाच्या आयुष्यातील साम्य. प्रस्तुत नाटकात दोन भिन्न प्रवृत्तीचे लेखक समोरासमोर आलेले आहेत. शारीरिक व आत्मिक यातनाच्या कोठडीत अडकलेला साद आणि सर्व प्रकारच्या कोठड्या विचारानी व कृतीनी नष्ट करू इच्छिणारा मारा

## : ३ :

क्रातीनतर चार वर्षांनी म्हणजे १७९३ मध्ये या नाटकातली केंद्रवर्ती घटना म्हणजे माराची हत्या घडते प्रस्तुत नाटकात या चार वर्षांतली आणि माराच्या हत्येनंतर नाटकाच्या प्रयोगकाळापर्यंतची म्हणजे १८०८

पर्यंतची स्थिती निवेदनातून व्यक्त होते. *अग्रदूत हा सूत्रधार भाष्य करतो, कथानकाचा* दुवा जोडून घेतो, पात्राला त्याच्या वाक्याचं स्मरण करून देतो आणि चार गायक व रुग्ण वृद्धाची भूमिका करतात. हा वृद्ध निवेदन करतो आणि दृश्यातील जनतेचा भागही बनतो. मारा, रू, कोर्डे, दुपेरे, सिमोनी ही नाटय-कथेतली पात्रं साद हा निर्माता, दिग्दर्शक, प्रेक्षक आणि एक पात्र म्हणूनही त्याचा सह-भाग. ३३ दृश्यातून ही नाटयकृती साकार होते. वाइसन पात्राच्या तोंडी असलेल्या शब्दानाच नव्हे तर आवाज, मुद्राभिनय, हावभाव, शारीरिक हालचाली, रंगभूषा, शिरोभूषा, वेषभूषा, आवश्यक वस्तू, नेपथ्य, प्रकाश, संगीत या साऱ्यानाच महत्त्व दिलेल आहे नाटकाच्या आरभी पात्राचा परिचय करून देताना वाइसनं त्याची वैशिष्टयं नोंद-वलेली आहेत. उदा. साद, दमेकऱ्यासारख्या जड हालचाली, कष्टान श्वास घेतो. सिमोन-विषयी : तिच्या शरीराची ठेवण वक्र, हाल-चाली विचित्र आणि जखडल्यासारख्या. कोर्डे झोपेत चालणाऱ्या माणसासारखी हालचाल करते इत्यादी.

पात्राचा परिचय झाल्यानतर व नाटकाचं मुख्य सूत्र सागितल्यानतर सारी पात्रं आपापल्या जागावर स्तब्ध बसलेली असतात. चार गायक पुढे येतात आणि १७८९ च्या क्रातीनंतरचं वातावरण उभ करतात. हे चार गायक व रुग्णाचा एक समूह तयार होतो. ही पॅरिसमधली जनता आहे. क्रातीनंतर अजूनही दरिद्री आणि अभावग्रस्त राहिलेली ही जनता माराकडे आदराने आणि विश्वा-सान पाहाते आहे.

'मारा आम्ही खोदणार नाही आता आमचीच नतद्रष्ट थडगी.

मारा आम्हाला वस्त्र पाहिजे, अन्न पाहिजे.

मारा आम्ही कटाळलोय गुलामासारखं राबून वेठकोडगी

मारा आम्हाला स्वस्त भाकरी मिळालीच पाहिजे'

ही जनतेची मागणी आहे आणि या जनतेनं माराला आपला नेता म्हणून निवडलं आहे

'क्रांती आली आणि क्राती गेली

असतोषान अशातीची जागा घेतली'

क्रातीमुळे काहीही साध्य झालेल नाही गरीब गरीबच राहिलेले आहेत.

'*आम्हाला पाहिजे आमची क्राती. आत्ता, नंतर नाही*' हा जनतेचा आग्रह आहे. मारा या चार वर्षांत जनतेच्या हक्कासाठी लढतो आहे-पाढरपेशांशी, पुरोहिताशी, व्यापाऱ्याशी, सैनिकी अधिकाऱ्याशी. मारा कधी न्याया-लयात, मारा कधी भूमिगत अशी त्याची स्थिती आहे. नवे राज्यकर्ते स्वत.चा स्वार्थ साधण्यात मग्न आहेत. ते अधिकाराविषयी बोलतात, पण त्याची भाषा कुणालाही कळत नाही. जनतेला अधिकार मिळाले आहेत ते उपासमारीन मरण्याचे, आणि काम मिळाल आहे कामासाठी वाट पाहाण्याचं. माराकडे आपलं गाऱ्हाणं सांगणारी मडळी आहेत, तशीच माराच्या लेखनानं, त्याच्या विचार-सरणीनं दुखावलेली मडळीही आहेत. कोर्डे—शार्लट कोर्डे ही जिरोदिन पक्षातली मुलगी माराची हत्या करणार आहे. तिला वाटतं, मारा लोकांना खून करण्यासाठी आणि लुटण्यासाठी उद्युक्त करतो आहे. त्या माराचा खून करून सारी मानवजात मुक्त करण्याचं स्वप्न ती पाहाते आहे. कोर्डेची भूमिका करणारी रुग्ण मुलगी सदैव झोपेत असल्याप्रमाणे हालचाल करते, बोलते. मधूनच तिला जाग येते, काही वेळा तिला जागं करावं लागतं. तिन असं झोपेत असणं, जागं होणं स्वप्नातून वास्तवात येण्यासारखं आहे. प्रत्यक्षातल्या कोर्डेची कृती, माराची हत्या हीदेखील एक स्वप्नसदृश कृती आहे. मठात जोगीण असलेली ही साधीसरळ मुलगी बायबलमधल्या ज्युडियचं स्वप्न मनात बाळगून क्रातीच्या या लाटेत सामील झाली आहे. माराचा खून करण्यासाठी म्हणून जेव्हा ती पॅरिसमध्ये येते तेव्हा तिला काय दिसतं याच अत्यत भेदक चित्रण दहाव्या भागात आलेलं आहे. तिला या शहरात मुडक्याचे, धडाचे, कापलेल्या अवयवांचे ढीग दिसतात. लोक किंचाळताहेत, उड्या मारताहेत, भाडताहेत. लोक अस का वागताहेत ते तिला कळत नाही. या दहाव्या दृश्यात मूका-भिनयाच्या द्वारे रस्त्यावरील विविध दृश्यं साकार केली जातात. कोर्डे कटयार घेण्या-साठी हिंडते आहे. वेगवेगळे दुकानदार, वेग-वेगळया वस्तू. एक मूक मिरवणूक येते. घोडागाडीत अपराधी उभे आहेत, पुरोहित मंत्र म्हणतो आहे. गिलोटीन साकार केलं जातं. फाशीची शिक्षा विद्रूप तपशिलासह *अमलात आणली जाते*. कोर्डे पॅरिसमधलं हे वातावरण पाहाते, गळून जाते ती म्हणते :

'लवकरच हे सारे चेहरे मला घेरून टाकतील.

हे डोळे आणि ही तोंडं मला त्यांच्यात येण्यासाठी हाक मारतील.'

फाशीचं हे दृश्य अकराव्या दृश्यातही पुढे सुरू आहे. हात तोडणं, डोकं उडवणं, डोकं खाली पडल्यावर त्याचा चेंडू करून खेळण, विजयोन्मादानं किंकाळ्या फोडणं अशा विविध हावभावासह फाशीच, शिर-च्छेदाचं दृश्य साकार होत राहतं. क्रातीनंतरच हिंसेचं थैमान या हालचालीतून व्यक्त होतं. कोर्डेचं झोपेत चालणं, हळूहळू बोलणं आणि त्याच्या अगदी विरुद्ध समूहातल्या लोकांच्या उन्मादनिदर्शक हालचाली, अंगाला पिळे देण, फेफरं आल्यासारखं झटके देणं, ही ही हसणं, कण्हणं असा विरोध तयार होतो.

क्रूरतेच्या या पार्श्वभूमीवर मारा आणि साद यांचा सवाद सुरू होतो.

## : ४ :

दृश्य बाराव. जीवन आणि मृत्यू यासबंधी सवाद. मारा सादला उद्देशून म्हणतो :

'मी वाचल आहे साद तुझ्या पुस्तकात.

की साऱ्या जीवनाचा पाया आहे मृत्यू'

यावर साद जे बोलतो त्यातून त्याचं तत्त्वज्ञान व्यक्त झालं आहे त्याच्या मते, कुठलही मरणारं जनावर, रोपटं किंवा मनुष्य हे निसर्गाच्या दृष्टीन खत आहे. या खताशिवाय काही वाढू शकल नसतं. मृत्यू जीवनाच्या प्रक्रियेतला एक भाग केवळ आहे आणि निसर्ग मृत्यूविषयी अगदी उदासीन आहे. सपूर्ण मानवजात नष्ट करून टाकली तरी निसर्ग निश्चलपणे पाहात राहील. पॅरिसमध्ये अहोरात्र चालत असलेल हे गिलोटीन किती दयाळू आहे अस त्याला वाटतं पण याचबरोबर त्यात काही भावना नाही, थरार नाही अशी त्याची तक्रारही आहे. यात्रिकपणे हे हत्यासत्र सुरू आहे. पधराव्या लुईचा खून करण्याचा अयशस्वी

प्रयत्न करणाऱ्या डेमिअन्सच्या हत्येचं तो वर्णन करतो. डेमिअन्सची छाती, बाहू, मांड्या चिरून उघड्या केल्या आणि त्यात उकळतं तेल, डांबर, लाख, गंधक ओतलं. नंतर त्याचे हातपाय जखडून चार घोड्यांना त्याला बांधलं आणि त्या घोड्यांना चार दिशांनी हाकललं. आणि नंतर त्याचा एकेक अवयव कापला. वाइसनं लिहिलं आहे :

'आणि शेवटी त्याचं रक्ताळलेलं धड
हलत्या डोक्याचं लटकत राहिलं
कण्हत आणि टक लावून पाहात क्रूसाकडे,
एका धर्मोपदेशकानं त्याच्यासमोर धरून ठेवलेल्या.'

सादच्या मते तो खरा उत्सव होता. हत्येचा उत्सव. आजचे उत्सव हे निव्वळ यांत्रिक आहेत. भावनाच नाहीत क्रांतीनंतरच्या हत्यांमध्ये. क्रांतीनंतरच्या वेडसर, अतर्क्य हत्यांवरचं हे भाष्य अतिशय प्रखर आहे. त्याआधी डेमिअन्सच्या हत्येत आनंद घेणाऱ्या जनसमूहाची मनोविकृती साद उघडी करतो. पंधराव्या दृश्यात माणसाच्या बेभरवशी वृत्तीबद्दल सादनं आपला एक अनुभव सांगितला आहे. लोक एकाएकी बदलतात, निराळेच होऊन जातात आणि अनाकलनीय कृत्यं करू लागतात. एक सभ्य, सुसंस्कृत, तत्त्वचर्चेची आवड असणारा शिंपी एका शस्त्रसज्ज माणसाला खलास करतो आणि नंतर त्याची छाती फाडून त्याचं अजून धपापणारं हृदय गिळून टाकतो. साद मनुष्याला उघडं करून त्यातल्या भयावह क्रूरतेचं दर्शन घडवतो.

सादचं हे बोलणं सुरूच असताना एक रुग्ण एक एक पाऊल टाकत येतो. कोलमीअकडे पाहात म्हणू लागतो :

'पागल जनावर
माणूस आहे एक पागल जनावर.'

फ्रान्समधल्या त्यावेळच्या हत्याकांडाविषयीच नव्हे तर केव्हाही कोणत्याही काळी जगात होत असलेल्या हत्याकांडाविषयीचं वाइसचं हे भाष्य आहे.

माराला सादचे विचार मान्य नाहीत.

'निसर्गाच्या स्तब्धतेविरुद्ध मी कृती वापरतो.
असीम उदासीनतेत मी अर्थ शोधत असतो.
मी अविचलित नुस्ता पाहात राहात नाही. मी मध्यं पडतो.
आणि सांगतो हे आणि हे चुकीचे आहे.'

ही त्याची भूमिका आहे. तेराव्या दृश्यात मारा जनतेचं शोषण कसं चालत होतं हे सांगतो. राजे हे आमचे मायबाप आहेत असं गिरवलं जायचं आणि पुरोहित प्रेषिताचं चित्र उभे करायचे. गरिबांचं शोषण करणारे हे पुरोहित उपासमारीनं हैराण झालेल्यांना म्हणत :

'सहन करा
सहन करा जसं त्यानं सहन केलं क्रूसावर.'

मारा ही वाक्यं उच्चारताना रुग्णांचा समूहस्वर ही वाक्यं उच्चारतो. रंगमंचावर गरीब, पीडित, अज्ञानी जनता साकार होते. तसंच चार गायक चर्चच्या अधिकारी गणांचं चित्रण करतात. झाडूंचा क्रॉस, बादली धुपाटण्याप्रमाणे हलवणं वगैरे. यातूनच चर्चचा पुरोहितशाहीचा उपहास साधलेला आहे. मुक्तछंदातील स्वगतांना अशी दृश्यांची जोड मिळाल्यामुळे नाटक निव्वळ शब्दप्रधान राहत नाही, मारा आणि साद यांच्यातल्या चर्चेचं केवळ राहत नाही. या दोन व्यक्तींच्या आसपास क्रांतीनंतरच्या काळातली जनता आहे याचं भान रुग्णांचा समूह करून देत असतो.

सादचं क्रांतीविषयीचं भाष्य अठराव्या दृश्यात येतं.

'फ्रान्सच्या सन्मानासाठी ते सगळे मरायला तयार आहेत.
जहाल आणि मवाळ
त्या सगळ्यांना रक्ताची चव पाहायची आहे.'

सादच्या मते त्यांची देशभक्ती म्हणजे निव्वळ पिसाटपण आहे. सादचा कशावरही विश्वास नाही तो म्हणतो : 'मी या देशाची मुळीच पर्वा करीत नाही.' त्याचा कुठल्याही त्यागावर विश्वास नाही. विसाव्या दृश्यात साद म्हणतो :

'आधी मला दिसली क्रांतीमध्ये एक संधी
सूडाच्या भयंकर उद्रेकाची
माझ्या स्वप्नांहून कितीतरी भयंकर'

न्यायाधीश म्हणून सादची नेमणूक झाली तेव्हा त्याला फाशीची शिक्षा ठोठावणं जमलं नाही याची तो कबुली देतो. भोवताली सुरू असलेल्या भीषण हत्याकांडांचं चित्रण तो करतो आणि म्हणतो :

'पातं खाली यायचं, वर उचललं जायचं
रहाटासारखं पुन्हा खाली यायचं.
सारा अर्थच निघून गेला त्या सूडातला
ती बनली निव्वळ एक यांत्रिक प्रक्रिया !'

साद क्रांतीविषयी हे बोलत असताना त्याच्याच इच्छेनुसार कोर्डे त्याच्या उघड्या पाठीवर आसूडाचे फटके ओढत असते. साद जणू काही स्वतःमधल्या गुन्हेगाराला शिक्षा देतो आहे. साद या ठिकाणी गुन्हे करणाऱ्या माणसांचं प्रतिनिधित्व करतो. त्याच्या पात्रांच्या यातना स्वतः भोगणारा तो लेखक आहे. तो म्हणतो :

'गुन्हेगारांच्या समाजात


सर्वोत्तमसेवा
वृद्ध-जर्जर रोगी, मंदबुद्धीची मुले
कुमारी माता, मोती बिंदू आणि
इतर रुग्ण, वांझ जोडपी, दत्तक मुले,
दुर्बिणीतून नसबंदी करीता संपर्क साधा
पर्ल सेंटर
सेनापती बापट मार्ग, मुंबई-२८
दादर वेस्टर्न रेल्वे
टेली. ४३०१७९६-४३०३९५२
गर्भपात रू. 100

शाखा :
**पापा हॉस्पिटल** :— शांती नगर, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम)
**बालाजी हॉस्पिटल** :— बदलापूर, रेल्वे स्टेशन, (पश्चिम)
**निराळा हॉस्पिटल** :— नेरळ
योग्य दरात आरोग्य सेवा–प्रतिदिन रुपये ९० मध्ये शस्त्रक्रिया, गुंगी, रुग्णसेवा आणि एका नातेवाईकाची भोजनाची आणि रहाण्याची सोय. दहा दिवसांनंतर रुग्णसेवेकरिता प्रतिदिन तीन रुपये मात्र.
शुल्काचा आकार खालीलप्रमाणे–

| | | | |
|---|---|---|---|
| गर्भपात | १ दिवस | रुपये | ९० |
| मोतीबिंदू | ५ दिवस | रुपये | ४५० |
| इतर शस्त्रक्रीया | १० दिवस | रुपये | ९०० |

मोफत आरोग्य तपासणी दर रविवारी ११ वाजता.

मी खणून काढला गुन्हेगार माझ्यातून बाहेर
म्हणून मी समजू शकलो माझ्यातल्या गुन्हेगाराला आणि समजू शकलो
हा काळ ज्यात आपण जगतो आहोत '

साद हा विकृत, नीतिभ्रष्ट, क्रेडसर इसम असा इथे राहत नाही तर अत्यंत सवेदनशील लेखक म्हणून व्यक्त होत राहतो. साद क्रांतीची चेष्टा करतो.

'त्याना दाढदुखी आहे'
आणि त्याच्या दाढा त्याना उपटून हव्या आहेत
त्याचा रस्सा करपला;
की ते ओरडतात चागल्या रश्शासाठी '

कुणाला वाटतं तिचा नवरा ठेंगणा आहे, तिला उच हवाय तर एखाद्याला गुबगुबीत बायको हवी आहे. एकाला स्वत चा जोडा चावतो, पण शेजाऱ्याचा चागला बसतो.

'आणि मग ते क्रातीमध्ये सामील होतात
त्याना वाटतं की क्रातीदेखील सार काही'

पण क्रातीन त्याना काहीही दिलेलं नाही. ते होते तसेच आहेत, तसेच राहाणार आहेत.

## : ५ :

मारा सादच्या विचारसरणीला विरोध करतो पॅरिसमधल्या हत्याकाडाविषयी मारा म्हणतो :

'लोकाना सवय होती सार काही सहन करण्याची
आता ते घेताहेत त्याचा सूड '

तुम्ही तो सूड पाहाताहात आणि तुम्हीच त्याना सूडात ओढल आहे आता निषेधाला काही अर्थ नाही माराच्या मते जनतेन साडलेल्या रक्ताच्या तुलनेत अमीर-उमरावाचं रक्त विशेष मोलाचं नाही मात्र क्रांती भरकटत चालली आहे याची तीव्र जाणीव माराला आहे.

'आम्ही शोधून काढली क्राती
पण ती कशी चालू ठेवावी हे आम्हाला ठाऊक नाही '

लोक अजूनही भूतकाळातील गोष्टी जपताहेत. स्वत पुरतं पाहाताहेत. 'प्रत्येकजण स्वत.पुरता लक्षाधीश ' होण्याच्या प्रयत्नात मग्न आहे.

'आम्ही आहोत अिथच उभे अधिकच
अन्यायाच्या ओझ्याखाली दबलेले
आरभी होतो त्याहून
आणि त्याना वाटत की क्रातीचा विजय झाला आहे.'

माराला भान आहे की 'आता त्या राज्यकर्त्यांच्या जागा दुसऱ्या राज्यकर्त्यांनी घेतल्या आहेत' आणि 'क्रांती लढली गेली ती व्यापारी आणि दुकानदार याच्यासाठी' माराच्या या स्वगत भाषणासोबत चार गायक आणि रुग्ण शोषित जनतेचं चित्र उभे करतात जेक्स रू हा माराचा कट्टर अनुयायी. माराच्या संयत आत्मस्वीकृतीनतर जेक्स रूचा चेतवणारा, चिथावणी देणारा स्वर उमटू लागतो.

'उचला तुमची हत्यारं
झगडा तुमच्या हक्कासाठी
हिसकावून घ्या जे तुम्हाला हवं आहे
आणि हिसकावून घ्या आताच !'

जेक्स रू या पात्राची निर्मिती ही या नाटकातली एक लक्षणीय गोष्ट आहे. ज्या रुग्णानं ही भूमिका केलेली आहे त्याचे हात समोरच्या बाजूनं बाधलेले आहेत. त्या तशा जखडलेल्या हातानीच तो रुग्ण नाटकभर वावरतो. त्याचं वेड अधिक हिंस्र, उन्माद अधिक भयानक. जेक्स रू हा माजी धर्मोपदेशक, नंतर जहाल समाजवादी जनतेवर होणाऱ्या अन्यायाचा तो तीव्र निषेध करतो. नव्या राज्यकर्त्यांचा कडवट शब्दात उपहास करतो. जनतेच्या भावना भडकतील अशी भाषणं तो करतो. रूच भाषण चालू असताना परिचारक त्याला खेचत असतात. परतु तो त्याना न जुमानता आक्रमक असं बोलत राहतो. त्याचवेळी रंगमंचावर असलेले चार गायक परस्पराकडे बाटली फिरवत आहेत. थट्टामस्करी करताहेत. रुग्णालयाचा संचालक रूच्या भाषणानं अस्वस्थ होतो. परतु अग्रदूत आणि साद स्वस्थ आहेत. 'पायघोळ झगा घालून क्रांतीचा प्रचार करण' हे बरंच झालंय असं साद म्हणतो. रू आग ओकणारी भाषणं करतो पण कृतिशून्य आहे हे अग्रदूताचं मत आहे.

शेवटी परिचारक रूला बाकाला बाधून ठेवण्यात यशस्वी होतात. रूचं बोलणं तरी थाबत नाही. तो माराला आवाहन करतो :

'मारा
तुझा काळ आला आहे
आता प्रकट कर मारा स्वत.ला
ये बाहेर आणि लोकाच नेतृत्व कर
ते वाट पाहाताहेत तुझी '

रूच्या या आवाहनावर सादची प्रतिक्रिया आहे :

'मारा, आज त्याना तुझी गरज आहे, कारण तू दुःख भोगणार आहेस त्याच्या, साठी ' आणि गरज सपली की ते विचारतील- 'मारा, कोण होता मारा ?'

माराची वैचारिक अनिश्चितता एकविसाव्या दृश्यात व्यक्त होते. त्याला 'अधार साकळून आल्यासारखं वाटतय', 'आपण मरणप्राय गोठतो आहे की जळतो आहे.'


# गोरी बायको हवी

आजकाल सर्व तरुणाना गोरी बायको हवी असते मुलीनाही ( शक्यतो ) गोरा नवराच जास्त पसत पडतो. असतात गोष्टी योगायोगाच्याच ! पण पुष्कळदा सावळ्या रगाची मुले–मुली चेहऱ्यावरील मुरमे व तेलकटपणामुळे निस्तेज आणि काळी वाटू लागतात. अशा तरुण–तरुणीना 'स्वरूप लेप' वरदान वाटेल बेळगाव येथील 'अमृत फार्मास्युटिकल्स' या प्रसिद्ध आयुर्वेदिक औषधाच्या कारखानदारांनी हा 'स्वरूप लेप' तयार केला आहे. रात्री हा लेप पाण्यात कालवून चेहऱ्यावर लावल्यास चेहरा अगदी स्वच्छ होतो. मुरमे–पिंपल्स नाहीसे होतात. चेहरा तरतरीत दिसू लागतो. आत्मविश्वास वाढतो. रग उजळतो. नेहमी लावल्यास मुरमे–पिंपल्स, चेहऱ्यावरील तेलकटपणा नाहीसा होतो. 'स्वरूप लेप' सर्व केमिस्ट व जनरल स्टोअर्सकडे उपलब्ध.

हे त्याला सांगता येत नाही. त्याच्या समोरचे कागद त्याला दिसत नाहीत, लेखणी कुठं आहे हे तो सिमोनला विचारतो. 'इतका काळोख कसा झालाय' हे तो विचारतो सिमोनच यावरच उत्तर आहे 'एखादा ढग सूर्यावर आला असेल–अथवा कदाचित धूर–ते जाळताहेत प्रेतं,' शहरभर चालू असलेल्या वेडसर हत्याकाडाचा हा सूचक सदर्भ अत्यत अर्थपूर्ण होऊन जातो, हे हत्येचं नाटक आहे. केवळ माराच्या हत्येच नाही. क्रातिकाळातील अमीरउमरावाच्या, क्रातिकारकाच्या, सामान्य मनुष्यांच्या हत्येचही ते आहे. क्रौर्य हिंसा, मनुष्यहत्या हा यातल्या पात्राचा चिंतनविषय आहे. साद मृत्यूविषयी उदासीन, मारा जनतेच्या सूडासबधी उदासीन, जेक्स रू जनतेच्या बदल्याच्या भावनेला भडकावणारा, कोर्डे पॅरिसमधल्या हत्याकाडान अस्वस्थ, पण माराच्या हत्येसाठी उद्युक्त झालेली असा परस्परविरोधी ताणांचा पट येथे विणलेला आहे.

मारा बाथटबमध्ये बसलेला आहे. तेथेच त्याची हत्या व्हावयाची आहे. तो बाथटब नसून मृत्यूचा सापळा आहे. त्याची शवपेटी आहे. माराचा सर्वत्र शोध घेतला जात जाहे. त्याचा छापखाना जाळून टाकला. आता त्याच्या घराचा, त्याच्या लपण्याच्या जागेचा शोध घेताहेत. मारा टबात बसून लिहिण्यात मग्न आहे. तो मधूनच अस्वस्थ होतो, थकून जातो. त्याच्या डोळ्यासमोर त्याचं स्वत चं आयुष्य तरळतं. 'माराचे चेहरे' या भागात माराच गतायुष्य, त्याच्याविषयीच्या इतरांच्या प्रतिक्रिया आलेल्या आहेत. एक पुरुष व एक स्त्री गाडी ओढत येतात. ते माराचे आईवडील. गाडीत विज्ञान, धर्म, सैन्य, नवश्रीमत याच प्रतिनिधित्व करणारी माणसं. मारा टबात बसून स्वत.च्या आतरिक विश्वात हरवलेला आहे. तेथे ही सारी माणस त्याला दिसताहेत, त्याचं बोलण त्याला ऐकू येतं आहे. त्यातल्या बहुतेकांना माराविषयी यत्किंचितही आदर नाही. शाळामास्तर येतो आणि निंदाव्यंजक आवाजात बोलतो: 'लहानपणापासून हा मारा मित्राच्या टोळ्या जमवायचा आणि आरडाओरड करीत ते धावून जायचे एकमेकाच्या अगावर.' माराची आई तक्रार करते की, 'अन्न खायचा नाही धड, दिवसदिवस पडून राह्यचा–काही बोलायचा नाही, तळघरात कोंडून घातलं, पण काही उपयोग झाला नाही.' वडील म्हणतात, 'मी जेव्हा चावलो त्याला, तो उलट मला चावला.' माराला ताप चढला आहे आणि त्या भ्रमात तो बरळतो आहे अस सिमोनला वाटतं. माराला दिसणारं त्याच आयुष्य असं हे दृश्य योजून, मारा हा कुणालाच नीटसा समजलेला नव्हता हे वाइस दाखवू पाहात आहे. त्याचं लेखन, त्याच कार्य याविषयी गैरसमज आहेत. तो जहाल क्रांतिकारक आहे रक्तपिपासू आहे, अस त्याच एक चित्र इतिहासात उभ राहिलेलं आहे; परंतु वास्तवात माराची तळमळ काय होती, त्याचा ध्यास काय होता. त्याच आतरिक द्वद्व काय होत हे वाइस स्पष्ट करू इच्छितो. मारान स्वत चे पैसे खर्च करून छापलेल्या पुस्तकाविषयी शाळामास्तराचा अभिप्राय आहे. 'चोरलेले विचार, वेडेचार, शिवीगाळ.' लष्करी प्रतिनिधीला वाटतं की मारा मानमरातबांचा लोभी होता. शास्त्रज्ञाच्या मते मारा हा बूर्ज्वा वर्गाचाच प्रतिनिधी होता, श्रीमंतीची सारी सुखं त्याला हवी होती. त्याला सभ्य समाजानं जेव्हा गावढळ म्हणून हाकलून दिलं तेव्हा तो गरिबांची बाजू घेऊन उभा राहिला. त्याची क्रातीची आच खरी नव्हती तर आयुष्यातील वैफल्यामुळे तो क्रातिकारकामध्ये सामील झाला. 'शोषितानी उठलच पाहिजे' माराच्या या घोषणेतील 'शोषित' कोण तर 'मीच आहे शोषित' असच त्याला म्हणायचं होत. समाजातील उच्चभ्रू वर्गातील हे विविध प्रतिनिधी माराच्या लेखनाची, त्याच्या कर्तृत्वाची अशी चेष्टा करतात. पण माराचा अनुयायी जेक्स रू याच मात्र माराविषयी वेगळ मत आहे. तो म्हणतो,

'आणि तू वळलास एके दिवशी क्रातीकडे
कारण तुला झाली होती एक अत्यत विलक्षण जाणीव
की आमच्या भोवतालची स्थिती मुळातच बदलली पाहिजे.'

२६ दृश्याचा पहिला अक इथे सपतो. साद, मारा व रू यांच्या विचारांशी आपला परिचय या अंकातून होतो. तसंच या पहिल्या अंकात कोर्डेने माराला दोनदा ठार करण्याचा प्रयत्न केलेला होता हेही दाखवलं जातं. तिच्या पहिल्या प्रयत्नाच्या शेवटी दिग्दर्शक साद तिला सागतो:

'आत्ताच नाही कोर्डे
तुला यायच आहे त्याच्या दाराशी तीनदा'

हे प्रत्यक्ष कृतीच अग नसून नाटक आहे याच भान वेळोवेळी दिल जातं. सचालक मधून मधून उठून हा भाग आपण कापला होता, या ओळी गाळल्या होत्या अस सागत असतो. अग्रदूत दाखवलेल्या भागाच समर्थन करतो तर साद सचालकाकडे दुर्लक्ष करतो. यामुळे ब्रेख्तला अभिप्रेत असलेला अलिप्ततापरिणाम साधला जातो.

: ६ :

कोर्डे आणि दुपेरे याच्यातील सभाषणाचे प्रसग पहिल्या अकात आहेत. दुपेरे हा जिरोंदिस्त नेता. जो रुग्ण ही भूमिका करतो आहे तो अेराटोमेनिआन पछाडलेला आहे. कोर्डेचा प्रियकर म्हणून वावरत असताना त्याच्यातली कामुकता झळकत असते. दुपेरे सतत कोर्डेच्या मागेमागे असतो. तिच्या पाठीला हातांचा आधार देत, आलिंगन देत, शृंगारिक हावभाव करीत असतो अग्रदूताला वारंवार हस्तक्षेप करावा लागतो आणि त्या रुग्णाला भूमिकेच भान करून द्याव लागतं. क्रातीच्या, हिंसेच्या, क्रौर्याच्या या वातावरणात दुपेरेची विषयासक्ती एक व्यत्यास साधते. अर्थात दुपेरेचं प्रेमप्रदर्शन आल्हाददायक नसून हास्यास्पद ठरते. आत्ममग्न-जवळजवळ झोपेत असलेली कोर्डे आणि तिला वारवार कवटाळणारा दुपेरे अस हे मिथुन आहे. दुपेरे आणि कोर्डे या प्रेमलीलाना आणखी एक अर्थ आहे. तो म्हणजे काही काळानं याचीही मस्तक धडावरून गळून पडायची आहेत. हिंसेच्या त्या वेडसर उद्रेकात प्रेम, विषयासक्ती या साऱ्याच गोष्टी अत्यंत केविलवाण्या ठरतात. दुपेरेचा आदर्शवादही हास्यास्पद ठरतो.

दुसऱ्या अंकात कोर्डे आणि माराच्या तिसऱ्या भेटीची सिद्धता आणि नतर लगेच तिची तिसरी व अखेरची भेट आहे. पहिल्या अंकात पॅरिसमध्ये प्रवेश केल्यानतर कोर्डेला जाणीव झाली होती की आपल्यालाही कधी-

तरी फाशीच्या तख्तावर उभं राहावं लागणार आहे. ती येथे माराला मारून स्वत: हुतात्मा होण्यासाठीच जणू आलेली आहे. या नाटकात निद्राव्याधी जडलेल्या रुग्णाला माराच्या हत्येचं काम करायचं आहे. तिला जागं ठेवणं, नाटकाचं भान देत राहाणं हे अग्रदूताचं कामच बनतं. परिचारक तिला हलवतात, हाका मारतात, उठवून उभं करतात. डोळे मिटलेले असतानाच ती बोलते. गिलोटीनपुढं माणसानी रांगा लावलेल्या आहेत. एक एक पुढं सरकतो, गुडघे टेकतो, मान खाचेत घालतो, मग पातं सरसरत खाली येतं हे सारं दृश्य तिला आतल्या आत दिसत असतं. 'जेव्हा डोकं वेगळं होतं धडावरून, हात पाठीमागे जखडलेले, पाय बांधलेले, मान उघडी, केस कापलेले, गुडघे फळीवर टेकलेले, डोकं आधीच ठेवलेलं धातूच्या खाचेत, पाहात खाली निथळणाऱ्या टोपलीत...' तिच्या या उद्‌गारानंतर दुपेरे म्हणतो : 'जागी हो तुझ्या दुःस्वप्नातून.' यातला 'दुःस्वप्न' हा शब्द अनेक अर्थ व्यक्त करतो. क्रांती हेच एक दुःस्वप्न आता ठरलेलं आहे. कोर्डेला या शहरात काय दिसलं आहे : 'तुरुंग भरून गेलेले आहेत तुडुंब' आणि पहारेकरी शिरच्छेदाविषयी कोणत्या भाषेत बोलतात, आता ते बोलतात लोकाविषयी जसे माळी बोलतात जाळून टाकायच्या पानाविषयी.' मनुष्याचं अस्तित्व अर्थशून्य झालेलं आहे. लहान लहान मुलं गिलोटीनचं खेळणं बाळगताहेत. छोटी धारदार पाती असलेली छोटी छोटी गिलोटीनं. 'कसली ही मुलं आहेत जी खेळू शकतात असल्या खेळण्याशी...' तिच्या मते माराच या साऱ्या प्रकाराना जबाबदार आहे. याची हत्या केली की सगळं नष्टचर्य संपेल. दुपेरे तिला हत्येपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो. पण तिचा निर्धार ठाम आहे. ती माराची हत्या करण्यासाठी त्याच्या दारात येते मारा टबात बसून लिहितो आहे. ती त्याच्यासमोर उभी राहते. कट्यार उंच करते आणि हळूहळू खाली आणते नाटकात *या ठिकाणी तिची कृती थांबवलेली आहे* माराला त्याच्या हत्येनंतरचा इतिहास ऐकवला *जातो आणि* नंतर हत्येची *कृती* पूर्ण होते.

## : ७ :

दुसऱ्या अंकाच्या आरंभी 'राष्ट्रीय सभा' दाखवली आहे. जिरोंदिस्त आणि जॅकोबाअिटस् बसलेले. ही राष्ट्रीय सभा माराच्या मनातली आहे. त्याच्या मनातच निषेधाचे आणि जयजयकाराचे ध्वनी ऐकू येत आहेत. प्रेक्षकाना उद्देशून त्यानं केलेलं भाषण त्याच्या मनातलं आहे. क्रांतीनंतरच्या राजवटीवर मारा टीका करतो आहे. क्रांतीनंतर सत्तेला आलेलं व्यक्तिवादी, भांडवलवादी वळण तो दाखवतो आहे फ्रान्सचा द्रोह करणाऱ्याची नावं तो घेतो आहे. राजनिष्ठांची, परकीय सत्तेला सामील झालेल्यांची, क्रांतीशी द्रोह करणाऱ्या समकालीनांची नावं तो उच्चारतो. ज्या स्वातंत्र्यासाठी आपण लढलो ते स्वातंत्र्य आपल्याला मिळालेलं नाही. उलट शोषण करणाऱ्याचं फावलं आहे. मारा म्हणतो :

'आपल्याला जनतेच्या खऱ्या प्रतिनिधीची आज गरज आहे
जो असेल भ्रष्टाचाराच्या पलीकडे
ज्याच्यावर आपला विश्वास बसेल.'

परंतु मारा गोंधळलेला आहे, त्याच्या विचारात स्पष्टता नाही, कृती आणि विचार यात समन्वय नाही. काळानं जे आव्हान त्याच्यापुढं उभं केलंय ते कसं स्वीकारावं हे त्याला समजत नाही. माराची ही शोकात्मिका आहे हिंसेच्याविरुद्ध *तो असून नव्या* हिंसेला उत्तेजन देतो हुकूमशाहीच्या तो विरोधात आहे *पण त्याच्या विचारातून त्याला हुकूमशहा व्हायचं नाही* हे स्पष्ट होत *नाही शारीरिक व्याधीनं तो जेरीस आलेला* आहे. मानसिक दृष्ट्याही तो त्रस्त झालेला आहे *त्याच्या विचाराची झेप मोठी आहे*, परंतु ते विचार प्रत्यक्षात कसे आणावे हे *त्याला उमगत नाही.*

'का आहे आता सगळं काही इतकं गोंध*ळून गेलेलं*
सारं काही मी लिहिलेलं अथवा बोललेलं
होतं विचार करून केलेलं आणि खरं
आणि आता
संदेह
का वाटतंय सारं काही अगदी खोटं, भ्रामक'

*माराच्या या उद्‌गारातून त्याची हताश*, स्वत.वरचा विश्वास उडत चालला आहे ही जाणीव व्यक्त होते.

सादला तर माराच्या विचारात किंवा क्रांतीत, कशातही काही अर्थ वाटत नाही. लिहिणं हे त्याच्या दृष्टीनं खरडणं आहे आणि त्यानं काहीही साध्य होत नाही हे त्याचं मत आहे माराच्या दृष्टीनं लिहिणं ही एक पूर्वतयारी होती. 'जेव्हा जेव्हा मी लिहिलं, मी नेहमी लिहिलं कृती मनात ठेवून', 'मी नेहमी लिहिलं एका ज्वरात, कृतीची गर्जना ऐकत.' पण आता कोणतीही आवाहनं व्यर्थ आहेत. माराचा क्रांतीवरचा विश्वास सादला हास्यास्पद वाटतो. तो म्हणतो, 'पाहा या भटकलेल्या क्रांतिकारकाकडे.' रंगमंचावर चार गायक पसरले आहेत, स्वत.ला ओरबाडत, जांभया देत, रिकाम्या बाटलीत एखादा थेंब आहे का पाहात. सादच्या मते, 'साधायचं असतं काय, कुठल्याही क्रांतीमधून', तर, 'सार्वत्रिक मैथुन' आपल्या आतल्या आत्म्याच्या कोठड्या दगडी अंधार कोठड्याहून अधिक भयंकर आहेत आणि त्या जोवर बंद आहेत तोवर सारी क्रांती म्हणजे तुरुंगातलं दडपून टाकलं जाणारं बंड ठरतं. वृंदाचा घोष उमटतो :

'साधायचं असतं काय
कुठल्याही क्रांतीमधून
सार्वत्रिक मैथुन
मैथुन मैथुन मैथुन'

क्रांतीला सार्वत्रिक मैथुनाचं, यांत्रिक प्रक्रियेचं, भावनाहीन सूडाचं रूप आलेलं आहे मैथुन–घोषातच हे नाटक संपतं. रंगमंचावर आरडाओरडा, गोंधळ, धावपळ– एक अराजक माजतं. *या अराजकाला छेद देणारा एक* स्वर उमटतो तो जॅक्स रूचा :

*'कधी तुम्ही शिकाल पाहाण्यासाठी*
कधी तुम्ही शिकाल बाजू घेण्यासाठी'

*त्याचे हात जखडलेले आहेत. तो* उडी मारून पुढे येतो आणि नेपोलियनचा जयघोष करणाऱ्याच्यावर *आवाज चढवून म्हणतो* :
'कधी तुम्ही शिकाल...'

साद आपल्या खुर्चीवर उभा राहून मोठमोठ्यान हसत रंगमंचावर चाललेल्या गोंधळाकडे पाहात असतो. सादचा हा विजय आहे की पराजय हे प्रेक्षकानी ठरवायचं.

हे नाटक म्हणजे फ्रेंच राज्यक्रांतीवरच

प्रखर भाष्य आहे. जग हे मनोरुग्णालय आहे आणि त्यातले मनोरुग्ण वेगवेगळ्या भूमिका करतात. क्रांतिकारकांच्या भूमिकाही हे रुग्ण कधी वठवतात. दुसरा अर्थ म्हणजे क्रांतिकाल हा असा वेडसरपणाचा काळ होता. शारेंतॉं-मध्ये केवळ मनोरुग्णच असत असं नाही तर राजकीय कैदीही असत. ज्यांच्यावर उघड-पणे खटले चालवणं धोक्याचं ठरेल असे प्रचलित राजवट आणि समाजव्यवस्था यांना विरोध करणारे लोक त्यात असत. क्रांती-नंतर तर अशा लोकांची संख्या वाढलीच असेल. शिवाय या काळातून गेलेल्यांची मानसिक स्थिती व्यवस्थित राहिली असेल असं नाही. १८०८ मध्ये म्हणजे क्रांती-नंतरच्या पंधरावीस वर्षांत अनेक उलथा-पालथी पाहिलेले लोक या रुग्णालयात असतील. क्रांतीच्या वेडसर वातावरणाचं चित्रण करायचं तर मनोरुग्णालयाखेरीज अन्य समर्पक रूपक सुचणार नाही. मूळचे हे सारे रुग्णच, वरून त्यांनी क्रांतिकारकांचे कपडे तेवढे घातलेले आहेत. वाइसनं त्या पात्रांना त्यांच्या हॉस्पिटलच्या पोषाखावरच भूमिकांचे कपडे चढवलेले दाखवलेलं आहे. क्रांती म्हणजे मनोरुग्णांच्या दडपलेल्या वासनांचा, विकारांचा, प्रक्षोभांचा अनिर्बंध उद्रेक.

## : ८ :

‘महत्त्वाची गोष्ट म्हणजे तुमचे केस धरून तुम्हाला उचलायचं.

तुम्हाला अंतर्बाह्य बदलून टाकायचं आणि साऱ्या जगाकडे स्वच्छ डोळ्यांनी पाहायला लावायचं.’ माराच्या ओळी देऊन हे नाटक असंच काही कार्य करतं असं पीटर ब्रुक या दिग्दर्शकानं म्हटलं आहे. त्याच्या मते या नाटकात, गंभीर आणि विनोदी, उदात्त आणि सवंग, काव्यात्म आणि ओबडधोबड, बौद्धिक आणि शारीरिक अशा गोष्टी एका-पुढं एक ठेवल्या जातात. इथं अमूर्त गोष्टी रंगमंचीय प्रतिमेनं स्पष्ट केल्या जातात, हिंसात्मकता विचारांच्या शीतल उजेडानं उजळली जाते. अगदी लांबलचक शीर्षका-पासून प्रत्येक गोष्ट प्रेक्षकांना धक्के देणारी ठरते आणि नंतर विचार करायला प्रवृत्त करते. ख्रिस्तोफर इनेसच्या मते या नाटकाचं यश त्याच्या गुंतागुंतीच्या रचनेत आहे. काळ, स्थळ आणि कृती यांना तीन वेग-वेगळ्या पातळ्यांवर ठेवलेलं आहे. १७९३ मधली माराची हत्या आणि १८०८ मधला मारा–साद संवाद, विवाद या दोन गोष्टी एकमेकांपासून वेगळ्या ठेवलेल्या आहेत. तसंच ‘माराची हत्या’ या कथेतली पात्रं आणि रुग्णालयातील मनोरुग्ण या दोहोंचेही भान कायम ठेवलं आहे. संपूर्ण नाटक अलिप्त–परिणाम साधतं ते कोलमीई वाइ-सच्या नाटकातील पात्र म्हणून येतो, तर सादच्या नाटकाबाहेर तो कायम राहतो आणि वारंवार त्या नाटकात तो हस्तक्षेप करतो, त्यामुळे चार्ल्स मारोविझला हे नाटक आंतोनी आर्तोच्या रंगमंचीय विचारसरणीच्या जवळचं वाटलं. कथानक नसलेलं, रंगमंचीय प्रतिमासृष्टीच्या दृष्टीनं संपन्न.

मारा, साद, जेक्स रू, कोर्डे, दुपेरे या व्यक्तिरेखा, मारा आणि साद यांच्यातील वैचारिक द्वंद्व, चार गायक आणि रुग्ण यांनी निर्माण केलेला समूह, वृंद, विचारसंपन्न स्वगत भाषणांच्या समकाल उभी राहिलेली दृश्यात्मकता या साऱ्यांनीच या नाटकाला बळ दिलेलं आहे. त्यामुळे रूढ अर्थानं कथा-नक नसून हे नाटक खिळवून ठेवतं. नाटक-कारानं शब्द, ध्वनी आणि प्रतिमा या तिन्ही गोष्टींचा कलात्मकतेनं उपयोग केलेला आहे. मारा, साद या ऐतिहासिक व्यक्तिरेखा न राहता कोणत्याही काळातील आत्मसंघर्ष अनुभवणाऱ्या व्यक्तिरेखांत त्यांचं रूपांतर होतं, इथला समूह फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातला अभावग्रस्त जनतेचं प्रतिनिधित्व केवळ करीत नाही, तर कोणत्याही राजकीय सामाजिक स्थितीतल्या जनतेचं प्रतिनिधित्व करतो. लेखनावर, कृतींवर विश्वास असलेला मारा आणि कशावरही विश्वास नसलेला साद या मनुष्याच्या मनातल्या दोन प्रवृत्ती आहेत असंही मानता येईल. नाटककारानं कोणत्याही प्रश्नाचं उत्तर दिलेलं नाही. ते वाचक, प्रेक्षकांनी स्वत:च शोधायचं आहे. कुणाची बाजू घ्यायची की नाही, की या बाजू घेण्याच्या गोष्टीत काही अर्थ नाही हे स्वत:च पाहायचं आहे. आधुनिक रंगमंचा-वरली ही एक महत्त्वाची नाट्यकृती आहे हे मात्र नि:संशय म्हणता येईल.


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

WITH BEST COMPLIMENTS FROM

# APTE AMALGAMATIONS LIMITED

**( Fine Chemicals Division )**

199, Churchgate Reclamation, Bombay 400 020.

Tel. : 2049389
2873196 – 97 – 98
Telex : 011–2891–PSW IN

Manufacturers & Exporters of

**SULPHAMETHOXAZOLE I. P. / B. P.**
**TRIMETHOPRIM I. P. / B. P.**

WORKS
J / 7 & J / 8 M. I. D. C. Industrial Area,
Taloja, Tal. Panvel, Dist. Raigad
MAHARASHTRA
Tel. : 226 & 536

# महंमुद

## काही सेन्सिबल काही इन्सेन्सिबल

● भाऊ पाध्ये ●

सुमारे २० वर्षांपूर्वी डॉ. राममनोहर लोहिया, फ्युदोर दोस्तोव्हस्की, वहिदा रेहमान किंवा माझा मित्र अशोक शहाणे, यांच्यापेक्षाही माझ्यावर अधिक प्रभाव ज्या व्यक्तीचा होता तो म्हणजे 'महंमुद'; मेहंमुद असेही त्याला म्हणतात. म्हामुदमिया हे मी ठेवलेले नाव, घरवाल्यांच्या लेखी भाईजान किंवा पडद्यावरील याच्या महेश माजीने मला सपाटले होते. मी लिहायला वसत असे तेव्हा जरा मोकळे होऊन लिहावेसे वाटत असे. जरा कुणाचीही पर्वा न करता मनात जसे येईल तसे कागदावर उतरत असे. महंमुदच्या 'फौजी भाईयों' साठी पेश केलेल्या शैलीचे माझ्या लेखणीतून झरझरत उतरत असे. हिंदी चित्रपटाला जायचे म्हणजे क्रेडिट टायटलसमध्ये महंमुदचं नाव आहे की नाही हे वाचल्यानंतर तिकिट काढायचं. एखाद्या 'गुमनाम'सारख्या चित्रपटात घातलेला धुमाकूळ पाहण्यासाठी वरचेवर पैशाची फिकीर करायची नाही. चित्रपट पहायचा म्हणजे सात वेळा काय आणि आठ वेळा काय ! काही निर्माते, मला वाटतं, इंटलेक्च्युअल टीकाकारांच्या (बहुतेक ते अंग्रेजी अखबारवाले असत, महंमुदच्या विनोदाला ते महंमुदी (दन्) किंवा बकवास जोकस् म्हणत. आमच्यासारख्या फॅन्सना ते फालतूपणा म्हणून मानत असत.) सल्ल्यामुळे त्याची भूमिका कापत तेव्हा, तो चित्रपट मी पाहणे अर्ध्यावर सोडून देत असे. सिनेसमीक्षकांत, लोकसत्तेचे शरद गुर्जर किंवा गुजराती जनशक्तीचे स्व. दर्शन मेहता यांची माझी मैत्री जुळण्याचे एक कारण महंमुदचे आम्ही फॅन्स होतो आणि म. टा. चे वा. य. गाडगीळ यांच्यावर राग असे याचे कारण ते महंमुदवर नको तशी टीका करत. 'वरदान' या चित्रपटातील महंमुदच्या कामावर मी इतका लट्टू झालो होतो की, एका अंग्रेजी अखबाराच्या समीक्षकाला धमकीच दिली होती– 'तू 'वरदान' मधल्या महंमुदच्या अदाकारीवर वाईट लिहून तर पहा...!' त्याने पण मला एकदम कबुली दिली– 'नाही रे बाबा, महंमुदची ही भूमिका मला आवडली आहे. तू उद्या माझं समीक्षण वाच. त्यात महंमुदविषयी मी चांगलं लिहीणार आहे !'

¤

आज माझा मूड बदललेला आहे हे खरंच : कारण आज महंमुदच पडद्यावर नाही आणि हीरो मंडळी कॉमेडी करू लागली आहेत. महंमुदचे एखादे चित्र चुकले तर चुकल्याचुकल्यासारखे होण्याची परिस्थिती नाही. पण, मला महंमुदवर प्रेम केल्याबद्दल मुळीच पश्चात्ताप होत नाहीए. महंमुद मला जणू काही माझाच कोणी लागतो म्हणून पूर्वी वाटत असे, तसेच आजही वाटते. फक्त आता एवढंच वाटतं की स्वत:शीच ठरवावं की, या माणसाने कसलाही संबंध आलेला नसता, कसलीही देवाण–घेवाण, सगेसंबंधी नसताना का आपल्याला आपलेसे केले होते ? त्याच्या विनोदानं काय दिलं ?... एखाद्या दादू इंदुरीकरासारखा तमासगीर विनोद करतो... त्यावेळी तो म्हणतो मी पब्लिकचं रंजन करतो– महंमुद एव्हढंच करत होता का ? तसं रंजन तर कुणीही करू शकतो ! चार्ली

चॅप्लिनप्रमाणे एका डोळ्यात आसू आणि दुसऱ्यात हासू वगैरे तो पेश करत होता का? खरं सांगायचं तर मला महंमुद रडताना (खरेपणाने) कधीच आवडला नाही. मग महंमुद आणि त्याचे विनोद आणि आपली पसंती याची सांगड कशी घालायची? महंमुदचा विनोद हा तसा इन्फेक्शस रोग आहे. दादा कोंडके मला म्हणायचा– की महंमुदच्या विनोदाला लोक हसतात. हिंदी पिक्चरमध्ये दर्द का रिश्ता असतो हे मला ठाऊक होतं पण कॉमेडीका रिश्ता?

¤

'कुंवारा बाप' च्या निमित्ताने शराब न पिणाऱ्या महंमुदने आम्हाला ताजमध्ये शराब पाजली होती त्यावेळी तो स्वतःविषयी एक ग्रेट विधान करून गेला. 'आय ॲम हायली अनएज्युकेटेड मॅन.' (मी फार मोठा अशिक्षित असामी आहे!)* विनोदकार आणि एज्युकेशन याचा तसा काही संबंध नाही, तमासगीर दादु इंदुरीकर, हणुमंत्या, सेवादलातले दादा कोंडके, राम नगरकर, शंकर घाणेकर, महंमुदचे वालिद मुमताज अली, जोग, आणि दामुअण्णा मालवणकर, मा. भगवान ही मंडळी काही कुठल्या विद्यापीठीय शिफारशीमुळे विनोदी नट बनली नव्हती. 'टवाळांना विनोद आवडतो' अशी शिकवण देणाऱ्या आपल्या संस्कृतीला टक्कर देण्यासाठीच ते विनोद करू लागले असावेत. त्यांचा विनोद हा एक प्रकारचा सोशल डिफायन्स होता. सामान्यतः हिंदी चित्रपटातील विनोदी नटांची परंपरा मोठी असली तरी विनोदी नटांची नावे घेऊन बोटे मोजायला सुरुवात केली की तीन नावे घेतल्यानंतर बोटे मोजणे थांबते. किशोरकुमार, महंमुद आणि जॉनी वॉकर. या तिघांच्या पूर्वी भारतीय चार्ली दीक्षित, घोरी, याकूब, आगा, गोप, मा. भगवान, आय. एस. जोहर, सुंदर झाले. केश्तो मुखर्जी, देवेन वर्मा, असरानी, पेंटल, जगदीप, धुमाळ, मोहन चोटी, असित सेन, मारुती हे समकालीन झाले. पण किशोरकुमार, महंमुद आणि जॉनी वॉकर हेच हिंदी चित्रपटांचे पर्मनंट कॉमेडियन्स. किशोरकुमार हा हिरो होता. त्याच्या हिरोगिरीच्या काळात हिरो भोला–भाला नासमझ लडका असायला हवा. तशाच त्याच्या भूमिका असत. कॉमेडीयनची प्रकृती किंवा मुखडा त्याचा नव्हता. तरी तो अव्वल कॉमेडियन झाला. कारण त्याने पेश केलेला पागलपणा. आपल्या भोल्याभाल्या चेहऱ्यामुळे जी आफत त्याच्या अंगावर येत असे. त्यासाठी ती 'डॅनी के' प्रमाणे पागलपणाच ढाल म्हणून वापरायचा. जॉनी वॉकर हाच प्रकृतीने आणि तबियतीने इन्स्टंट (Instant) कॉमेडियन होता. त्याच्या खास हसविण्यासाठी बनलेल्या शारीरिक लकबी होत्या. आवाजही खास हसविण्यासाठी बनलेला, डायलॉगचे टायमिंग साधणारा तो 'मास्टर'च होता. 'मि. ॲंड मिसेस फिफ्टी फाईव्ह'मध्ये स्व. गुरुदत्तला किंवा 'आखरी दाँव' मध्ये शेखरला प्रत्येक अडचणीतून निभावण्यासाठी त्याने पेश केलेले इन्स्टंट विनोद, त्याच्या स्टाईलच्या कॉमेडीची एक खासियत होती. किशोरचे जगदीपने थोडेफार अनुकरण केले. महंमुदचीही कॉपी करणारे निर्माण झाले परंतु जॉनी वॉकर आपल्या स्टाईलमध्ये एकच होता.

¤

दादा कोंडके मला म्हणाला होता ते स्मरून, महंमुदच्या विनोदाला आपली पब्लिक कशी हसते हा एक चित्रपटाच्या संदर्भात कूट प्रश्न आहे. मी एकदा मित्रांबरोबर 'मोहब्बत जिंदगी है' असे चित्र पहावयास गेलो. त्यात महंमुदने कोळशाच्या खाणीतील कामगाराचे काम केले होते. खाणीतून काळा



'मेरे अपने' तील इरसाल पुढारी

¤

* मला वाटतं माझे मित्र इसाक मुजावर यांनी यासंबंधी 'रसरंग' मध्ये लिहिलेलं आहे.

हुस्स होऊन बाहेर आल्यावर महमुद आघोळ करतो. ते दृश्य मजेशीरच होते. ते सपताच मित्र म्हणाला, 'चल उठ, यापुढे आपल्याला काय बघायचय ?' तिकिटाचे पैसेही वसूल होण्यासाठी तो मित्र पिक्चर पाहात थावला नाही.

जॉनी वॉकरप्रमाणे विनोदी नटाची लक्षणं महंमुदमध्ये नाहीत. चेहेरा नाही, अगविक्षेप नाहीत. त्यालाही आपण विनोदी नट म्हणून फिट्ट बसतो की नाही, हे ठाऊक नाही. त्याची डायलॉगची फेक अचूक असते परतु आगाच्या डायलॉगच्या फेकीत जो स्वाभाविकपणा आहे तसा तो नाही.

महंमुदची डायलॉगफेक ही फिरकीबाज होती.

कॉमेडीयन म्हणून मेहमूद दिसतच नाही. ऐन जवानीमध्ये तो 'प्यासा' नि 'सी. आय. डी.'मध्ये खलनायक म्हणून पेश झाला होता. ('कागझ के फूल' मधल्या कोरस गीतात स्मार्टली बागडताना दिसला. दोन दिवसांच्या चित्रीकरणानंतर तिसऱ्या दिवशी तो हजरच झाला नाही म्हणे. गुरुदत्तच्या फिल्मी कुटुंबातच महंमुद आणि त्याची बहीण मिनू मुमताझ मेवर असावेत.) 'चौदवी का चाँद'-मधील 'दिल की कहानी रंग लाई है' हा मुजरा खास लखनवी ठसवयात पेश करून थिएटरच्या पब्लिककडून पैसे वसूल करणाऱ्या मिनूने जणू काही मुजऱ्याच्या अदायकीला चार चाद लावले होते. या मुजऱ्याने आशा भोसलेही गाजली. त्यामुळे 'साहिब–बिवी–गुलाम'मध्ये, गुरुदत्तला पिक्चर थडे जाऊ नये म्हणून मिनूचा मुजरा ठेवणे भाग पडले. मराठीमध्ये मुजऱ्यावर 'रंगलेल्या रात्री'साठी पुन्हा मिनूच... दुसरी कोणी नव्हतीच. तेव्हा महंमुदच्या घरात पैसे येण्याचा सोर्स बहुधा मिनूच असावी. त्याचे वालिद मुमताझ अली एक टँकरच होते. त्यानी आपली कमाई दारूमध्ये फुकून टाकली असावी. महंमुदच्या दारिद्र्याच्या कहाण्या खूप ऐकायला मिळतात. त्याची रोजची कमाई दोन रुपये होती व रोज पेपरावर दोन रुपयाची भेळ पसरून सर्व घर पोट भरत असे. वगैरे. काम न मिळाल्यामुळे महंमुद रेल्वेच्या रूळावर जाऊन बसला होता. पण गाडी दुसऱ्याच रुळावरून निघून गेली असावी. अर्थातच महंमुदसाठी सिनेमावाल्याकडे राजकपूर–नर्गिसच्या रोमॅंटिक पिरिअडमध्ये भूमिका नसावी. महमुद हा थोबडयामुळे स्टार मटिरिअल आहे असं कोणी म्हटल नसतं. त्याला देवयानी म्हणते त्याप्रमाणे खाटकाचा थोबडा होता, असे मी म्हणणार नाही. तरी जवानीमध्ये त्याचा बराचसा पोकर फेस, कॉमेडियन म्हणता येईल, असा होता. देवेन वर्मा या आजच्या कॉमेडियनसारखा. त्याचेही महंमुदसारखे लफडे होते. देवेन वर्माने सुरुवात व्हिलन म्हणून केली आणि आपला पोकर फेस व डायलॉगच्या जोरावर कॉमेडियन बनला.

पण देवेन वर्माचा चेहरा ठोस [होता. महमुद थोबडयामध्ये सहज चाळवाचाळव करायचा, आख उडवूनही तो पब्लिकला हसवायचा. बहुधा धुमाळसारखा सासरा, एखादा खतरनाक कातील, सशस्त्र समोर आला की त्याची दयनीय अवस्था महंमुद तल्लखपणे पेश करत असे. तो मेकप करूनही 'मैं सुंदर (नही) हूं' हे दाखवीत असे. हिटलरी मुशमुळे तो हैदराबादी बवर्जी म्हणूनच फिट बसला होता.

¤

संगीत हे प्रेमिकाचे अन्न असते. राजकपूर-नर्गीस याच्या रोमॅंटिक जमान्यात पब्लिक चित्रपटामधे गाणी ऐकायला जात महमुदचा जमाना आला नि संगीताच्या पुढे विनोद आला. 'मैं रंगीला प्यार का राही' म्हणून महंमुदने शुभा खोटेबरोबर आपल्या विनोदाची ग्वाही फिरवली आणि पब्लिकने दिलखुलास दाद दिली. महंमुद आणि शुभा खोटे म्हणजे हिंदी चित्रपटामधून सुरू झालेला नवा सिलसिला होता. हिंदी चित्रपटच आता महंमुदमय होऊन गेला. सिनेमामध्ये 'गम का फसाना' पेश करणाऱ्या संगीताचे जे राज्य होते त्याची जागा विनोदाने घेतली. याने की 'कॉमेडी इज किंग' असे फर्मान सुटले.

¤

महंमुदची कमाई रुपये २ वरून २००० पर्यंत गेली हे सर्वांनाच ठाऊक आहे. हिंदी चित्रपटाचा महमुद सुपरस्टार बनला. राजेंद्रकुमार, मनोजकुमार, संजयखान, धर्मेंद्र, जितेंद्र, जॉय मुखर्जी या सर्व हिरोना हिरोच ठेवून त्यांच्यावरून महंमुदने उंच झेप मारली होती. त्याचे काम ज्याला रसायनशास्त्रात रासायनिक प्रक्रिया सुलभ करण्यासाठी कॅटेलेटिक एजंट असतात त्याप्रमाणे या प्यार का दुश्मन असलेल्या जमान्यात हिरो आणि हिरॉईन याना एकत्र आणण्याचे असे. त्याच वेळी या दुनियेतील सर्वांत बेरहम प्यार का दुश्मन म्हणजे धुमाळ याच्या मुलीला शुभा खोटेला पटविण्याचे कामही त्याच्यावर सोपविलेले असे.

महमुदचे मी पाहिलेले पहिले चित्र प्रमोद चक्रवर्तीचे 'जिद्दी'. एका आतरराष्ट्रीय कामगार सघटनेच्या अभ्यास मडळाच्या विद्यार्थ्यांबरोबर हे चित्र पाहिले. महमुदने यात 'प्यार के आग में तन बदन जल गया' हे प्यार में ठोकर खाल्लेल्या तरुणाचे गाणे पेश केले आहे. पेश केले आहे म्हणण्यापेक्षा येता जाता मोहब्बतच्या दुनियेत ठोकरे खाणाऱ्या हिरोची जबरदस्त फिरकी ताणली आहे, त्याला जबाब नाही. महमुदबद्दल रवी शास्त्रीप्रमाणे हिंदी चित्रपट दुनियेत 'मेरे मतलब का अदाकार' मला भेटला होता. पूर्वी गुरुदत्त मी पाहिला होता, नूतन पाहिली होती, किशोरकुमार, दिलीपकुमार, अशोककुमार पाहिले होते. नर्गीस, मधुबाला, मीनाकुमारी पाहिली होती. पण महंमुदला पाहिल्यानतर मी ठरवूनच टाकलं होतं, याला आपण पाह्यचच–अटळपणे पाहायच. हा आपला माणूस आहे.

आता महंमुद हिंदी फिल्मी जगतात छाई गया सा झाला होता. अखबारात छापलेल्या जाहिरातीत किंवा पोस्टरवर किंवा आगामी सिनेमाच्या झलकीयांमध्ये अदाकाराच्या खतावणीमध्ये अगदी शेवटले नाव 'अँड महंमुद' असे वाचून खातरजमा झाल्याखेरीज पब्लिक तिकिट काढायला तयार होत नसे. थिएटरमध्ये बसल्यावर स्टोरी सुरू झाल्यापासून चुळबुळही पब्लिक करत असे. पैशासाठी कुणी कुणाचा मर्डर केला, इथून सुरू झालेली गोष्ट, हिरॉइन परागदा होऊन इष्काच्या राज्यात तिचे पडलेले पाऊल आणि हिरोशी छेडछाड होऊन अखेर दिलाची देवाण–घेवाण. इष्काचा मोसम असल्यामुळे एक गाणे. तोपर्यंत 'काही खरे नाही. या पिक्चरचे!' अशा मूडमध्ये असलेला पब्लिक एखाद्या तोडाला काळं फासलेला किंवा अजब 'थ्री इन वन' पेहेराव चढवणाऱ्या हस्यीला पाहून जिवत होत असे

आणि हास्याच्या, समाधानाच्या मूडमध्ये आपले मन मोकळे करत असे– महंमुऽऽद !'

हाच महंमुद होता ज्याचा त्यांना इतजार होता. डोळं तरसले होते ! ... आता तो पेश झालाय ! 'अब्बी देखो उनकी धम्माल !' आज पंचवीस–तीस वर्षांचा कालावधी लोटला आहे. ज्यावेळी थिएटरमध्ये हे कॉमन हॅपनिंग आम्ही अनुभवत असू. आज, अमिताभ, श्रीदेवी आणि विनोद खन्नाच्या युगामध्ये, महंमुदमियाचे 'वारिस' पुन्हा पंचवीस वर्षांनी पाहाताना, आपलं पब्लिक महंमुद बघायलाच थिएटरमध्ये येतो आणि तो पडद्यावर दिसताच जणू तबला नवाज झकीर हुसेननेच ताज चहाचा स्वाद घ्यावा त्याप्रमाणे दाद देतो. 'महंमुद !' हा नॉस्टाल्जियामुळे महंमुदला दाद देण्यासाठी राजी झालेला हा पब्लिक नसतो. आजही त्याच्या डोक्यावर महंमुदचे भूत सवार झालेले असते.

हा. ही गोष्ट आता हिशेबात घ्यायलाच हवी की महमुद इतका का पॉप्युलर होता किंवा आजही आहे.

¤

महमुदचा विनोद कसा होता ?...विनोदी नट म्हणून त्याची जात काय होती...जर ती उच्च नसेल, तर त्याच्या प्रेक्षकाना हसवण्यामागील इल्लम काय होती ? हे सारेच सवाल उभे राहातात.

शारीरिक हालचाली, बॉडी लॅंग्वेजच्या अभावी आणि सर्वसामान्य माणसामध्ये खपून जाईल अशा थोबडयामुळे, महंमुद स्वतःलाही विनोदी नट म्हणा असा आग्रह धरणार नाही. त्याच्या शरीरात ऐन तारुण्यात स्लिकनेस होता. तो आपले अंग कसे हलवू शकत असे हे 'काले है तो क्या हुवा 'मध्ये हेलनसारख्या नर्तिकेबरोबर आपले अग घुसळून काढताना दिसले होते महमुदच्या शारीरिक चापल्याच्या हालचालीच्या संदर्भात 'साधू और सैतान 'मधील टॅक्सीत प्राणचे प्रेत दिसल्यानतर त्याने केलेली अदाकारी मी विसरू शकत नाही. ती एक ग्रेट स्लॅपस्टिक शैलीतील पेशकश होती. काही क्षणांपुरता तरी त्याने आपल्या अदाकारीने चार्ली चॅप्लिन, बस्टर कोरन, हॅरॉल्ड लाईड याच्या पक्तीत बसण्याचा अधिकार सागितला. शाब्दिक विनोद व द्व्यर्थी शब्दयोजना ही महमुदची मर्मस्थाने होती.

बस्टर कोरनप्रमाणे त्याने 'मैं सुंदर हू' सारख्या चित्रपटांमधून पोकर–फेस ॲक्शन्स ही पेश केल्या आहेत. परंतु देवेन वर्मा या प्रकारात अधिक फिट होता. द्व्यर्थी शब्द योजना किंवा शाब्दिक विनोद यासाठी विनोदी नट (किंवा साहित्यिकही) बौद्धिक दृष्ट्या स्मार्ट असावा लागतो. उदाहरणार्थ पु. ल. देशपाडे, दादा कोंडके, शरद तळवलकर वगैरे. महंमुदने मात्र इथे आपली गोची अशी केली आहे की 'आपण ह्यायली अनएज्युकेटेड आहोत' असे कुंवारा बाप या चित्रपटाच्या पार्टीत जाहीर केले आहे. तरीसुद्धा महमुद हिंदी चित्रपटांच्या संदर्भात जे विनोद करतो तेव्हा तो 'गुमनाम' मधल्या बबर्जीइतकाच स्वत.ला गधा म्हणून पेश होणारा बडा सियाना वाटतो.

¤

महंमुदच्या विनोदाची जात आणि राइज ॲन्ड फॉल ऑफ महमुद याबद्दल माझे विचार माडण्यापूर्वी त्याचे निःसशय महान अदाकारीचे काही मिसाल मी पेश करतो. हे अर्थात महंमुद–शुभा खोटे जोडीच्या उदारणाचे नाहीत. प्रथम माझ्यासमोर येतो तो 'मंझील 'मधील पानपट्टीवाला. एका संगीतकारामागे (देव आनद) संगीताच्या आत्मीयतेने उभा रहाणारा. अक्षरशः युनिक कॅरेक्टर. 'प्यार किए जा 'मधील 'वाह–वा' प्रॉडक्शनचा निर्माता. त्याने आपला बाप ओमप्रकाश याला आपल्या हॉरर फिल्मची जी कथा सागितली आहे, तो प्रसंग हिंदी चित्रपट इतिहासातलाच हायलाईट म्हणावा लागेल. 'दिल तेरा दिवाना 'मध्ये त्याने प्रथम मायेफिरू हैद्राबादी नवऱ्याची भूमिका पेश केली व ती 'गुमनाम 'मध्ये बबर्जीच्या भूमिकेत अजरामर केली. 'हमजोली 'मधील कपूर मंडळींचे तिहेरी दर्शन टॉप ! (हिंदी चित्रपटाचा पीटर्स सेलर्सच !) 'वारिस' मधील तिहेरी भूमिकेसाठी त्याला पारितोषिकही मिळाले आहे. 'नया जमाना'मधील हिप्पी, बिरादरीमधला दूधवाला, 'पारस' मधला फईऽऽऽऽ करून रडणारा जवान, 'पडोसन 'मधला मद्रासी गायक, मस्तानामधला पोलिस, 'मेरे अपने 'मधील चारसोंबीस पुढारी, 'प्रीतम 'मधला वालकार्टसिग न्हावी, 'मै सुंदर हू 'मध्ये अदाकार बनण्यासाठी तरसणारा हॉटेलचा कुरूप पोऱ्या. यानतर उतरत्या काळामध्ये त्याने एक लाजवाब अदाकारी केली होती ती म्हणजे 'वरदान 'मधील एक विक्षिप्त बनिया–बोर्डिंग हाऊसच्या मालकाची.

'माय फेअर लेडी 'च्या 'मनपसंत' या हिंदी आवृत्तीमध्ये मि. डुलिटलची भूमिका त्याने इतकी अव्वल केली की त्याच्या कामावर शरद गुर्जरही चिडला. स्वतःविषयी घृणा निर्माण करण्याचे त्याचे काम होते. ते त्याने इतके सचोटीने बजावले.

¤

महंमुद आपल्या विनोदाचे मर्म आपण पाहिलेल्या चित्र–विचित्र माणसाच्या कॅरेक्टर्सच्या नकलामध्ये आहे असे सागतो. 'मैं जो कॅरेक्टर्स देखता हूं, उनको आपनमें ढालता हूँ' तो म्हणाला होता. असेच अनेक अदाकार म्हणतात उदाहरणार्थ प्राणही हेच म्हणतो. अर्थातच अदाकाराची निरीक्षणशक्ती, त्याने पेश केलेल्या कॅरेक्टर्समध्ये एक वस्तुनिष्ठता निर्माण करू शकते. उदाहरणार्थ 'वरदान' मधला गाठिया खाणारा बोर्डिंगचा मालक. परतु वस्तुनिष्ठता ही कलात्मक अदाकारी नव्हे. कलात्मकतेने वस्तुनिष्ठ अदाकारी उचलायला हवी. (इति सिडने पोशिए) यासाठी महंमुदने 'वरदान 'मध्ये पेश केलेले गाणे पाहायला हवे. महंमुदच्या अदाकारीचे फौंडेशनच सर्वसामान्य माणसाशी एकरूप होण्यात आहे. म्हणूनच मी किंवा भालचंद्र नेमाडे यानी 'भंकस' हा शब्द वापरण्यापूर्वी, महमुदने हिंदी चित्रपटात त्याचा वापर केला होता एकेकाळी महंमुद दिवशी २ रु. कमावून जगत होता, एकदा रेल्वे रूळावर जाऊन बसला होता, शराबी बापामुळे त्याच्या बहिणीला त्याच्या इच्छेविरुद्ध सिनेमाच्या पडद्यावर नुमाईश करावी लागली होती. या दारिद्र्यामुळे बेतलेल्या प्रसंगातूनच निरीक्षणाबरोबरच एक तरल संवेदनशीलताही त्याच्या स्वभावात जागृत होती. तोलाराम जालानीसारखा पहाटेपासून गाठिया खाणारा निर्माता पाहिला होता, कपूर वशावळ पाहिली होती, त्याचप्रमाणे हैद्राबादीही पाहिले होते शरीराला झटके देणे– जे सभ्य इंग्रजी अखबारवाल्याच्या लेखी अश्लील गणले जात असे तेही त्याने सर्वसामान्य पब्लिकमधून उचलून स्वत मध्ये बाणले होते. काही अत्यंत 'मॅड' जोक्सही त्याने पेश केले

आहेत उदाहरणार्थ प्रीतम मधला बालकाट-सिंग न्हावी म्हणतो 'बाल कापणे हासुद्धा फॅमिली प्लॅनिंगचाच भाग नाही काय?' एका चित्रपटात पहारेकऱ्याना गुंगारा देण्यासाठी तो 'बोकुडवाली' आयडिया पेश करतो तीही विलक्षणच! परतु एकूण त्याच्यामध्ये किशोरकुमारचा हा अश कमी आहे आणि थोडाफार आलाच असला तर तो अशोक-किशोर याच्या सहवासाचा परिणाम असावा. एरव्ही कोटीबाजपणा, दुसऱ्याची फिरकी घेण्याची आदत, स्वत ला रिडिक्युलस बनवून हसी घेण्याचा अदाज यासाठी असामी हायली अनएज्युकेटेड, स्मार्ट, व्यवहाराचे ज्ञान, अनुभव हे असायलाच लागते. महमुदला ठाऊक होतं की एज्युकेटेड इटेलेक्चुअरसमध्ये तो लोकप्रिय नाही, आणि त्याने स्वत लाच हायली अनएज्युकेटेड म्हणवून आपला मोठा हुषारीने बचाव केला होता. त्याचा व्यावहारिक शहाणपणा आपल्याला त्याच्या बायकोबद्दलच्या म्हणण्यात छानच दिसतो. तो म्हणतो, 'तिला माझ्या दोन रुपयांच्या कमाईत घर साभाळण मुश्किल होतं, पण माझ्या दोन हजार रुपयाच्या कमाईत घर साभाळणं तिला अशक्यच आहे!'– इथे महंमुदला मानावंच लागेल

मला वाटत, अशी व्यवहार–चतुर माणस स्वत.जवळ विनोदाचा, चुटक्याचा, कोटयांचा स्टॉक करून ठेवतात. १००० जोक्सवाल्या पुस्तकाप्रमाणे त्याचा भंजा असतो. जोक्स, कोटयानी ते मेहफिलीमध्ये जान आणतात. मला वाटत दिलीप वेंगसरकरनेच वगलोरच्या एका सामन्याची आठवण सागितली होती. महमुद भारतीय क्रिकेट सघाच्या ड्रेसिंग रूममध्ये गेला आणि खेळाडूना जोक्स सागू लागला. भारतीय खेळाडूतही महमुदला त्याचा जवाब भेटला होता म्हणे– दिलीप दोशी. असो; सवाल असा असतो, जोपर्यंत त्याच्या भंजातला हा स्टॉक सपत नाही, तोपर्यंत ते हवेतून चालत असतात पण स्टॉक सपल्यावर मात्र त्याची परिस्थिती दीनवाणी होते आपल्या दादा कोडकेच पहा– त्याचा स्टॉक त्याने 'विच्छा' च्या प्रयोगातच संपवला. मग उरले त्याचे सिनेमे अत्यत केविलवाणे! 'कुवारा बाप' नतर महमुदचा पडद्यावरचा अपिअरन्स एक्झॉस्टेड असाच वाटू लागला

अखेर वयही माणसाला गाठत. तीस वर्षांपूर्वीचा शुभा खोटे, मुमताझ व अरुणा इराणी याच्याबरोबर फिल्मी अगणात बागडताना महमुद फ्रेश वाटत असे. परतु आता अस्ताव्यस्त वाटणारा महमुद खरोखरच खाटकासारखा वाटू लागला आहे चार्ली चॅप्लिनला आमचे कवि-मित्र शरद मत्री यानी यथार्थतेने नि.शब्दाचा राजा म्हटले होते, तर महमुदला शब्दाचा राजा म्हणावे लागेल विनोदी आणि विनोद करणारा यात क्रिएटिव्ह ॲक्ट आणि परफॉर्मिंग ॲक्ट एव्हढा फरक आहेच. महंमुद हा प्रामुख्याने विनोद करणारा आहे आपल्याजवळच्या विनोदाच्या स्टॉकमुळे त्याला या सपन्नतेची इपल्सिव्ह जाणीव आहे व श्रीमत माणसाला श्रीमतीची नुमाईश करण्याचा स्वभाव जसा टाळता येत नाही त्याप्रमाणे विनोदकारालाही. तो कधी कधी विनोद बुद्धीचा अभाव असलेल्याना बोचरा वाटू लागतो, जसे आपल्या अग्रेजी (फिल्मी) अखबारवाल्यासारख्या इन्टट इटलेक्चुअल्सनी महमुदशी अश्लील विनोदाबद्दल कडवटपणा धरला होता. आणखी काही काही गोष्टीबाबत महमुदवर लोकाचा राग आहेच. 'हमजोली'मधली कपूर मडळीची नक्कल किंवा 'वारिस'मध्ये बुजुर्ग डेव्हिडला टकलू म्हणणं हे कुणाकुणाला आवडले नाही. तसं पाह्यल तर महमुद अक्कलवाला माणूस होता पण त्याच्याजवळ काळवेळाचा हिशेब नव्हता. त्याने कधीही, कुणाच्याही सदर्भात विनोद केलाच पाहिजे! ती त्याची उबळ असावी, दम्याच्या खोकल्यासारखी. तो जसे जीवन जगत होता तसे तो विनोदात उतरवत होता

¤

एकूण महमुदने पेश केलेल्या विनोदी भूमिकाच्या रेंजमध्ये त्याची सर्वश्रेष्ठ कामगिरी म्हणजे त्याने सिनेमा व्यवसायातील लोकाची केलेली टिंगल होय त्याने त्याच्या नकला केल्या (मैं सुदर हू, हमजोली, वारिस) त्याने त्याची नावे वापरली 'बॉम्बे टू गोवा' मधील त्याने स्वत ला राजेश आणि भाऊ अन्वरला खन्ना बनवून राजेश खन्ना युगातील त्या नावाच्या महिम्याची मस्त टिंगल उडविली सर्वांत म्हणजे सिनेमाच्या वेडाचे त्याने अप्रतिम विडबन 'प्यार किए जा' मध्ये केले आणि नेहमी जरा जादा ॲक्टिंग करण्याबद्दल गुन्हेगार ठरलेल्या महमुदने 'अडर प्ले' करून आपण काही कुणाला 'खात' नाही हे स्पष्ट केले.

महमुदच्या विनोदाचा आणखी एक विशेष त्याची भाषा. ती खरी बम्बैय्या लॅंग्वेज आहे. भाषा ही एक विनोदाचे शस्त्र आहे आणि कम्युनिकेशनचेही. महमुदचा आणि पब्लिकचा विनोदाचा रिश्ता आहे तो भाषेचा, त्याच्या भाषेचा. महंमुद आपली भाषा बोलतो यातले हे समाधान आहे.

त्यावेळी महमुद म्हणजे चित्रपटसृष्टीत अनेक ढगाने आणि अनेक अगाने प्रभावशाली असे व्यक्तिमत्त्व होते, धर्मेंद्र, राजेंद्र हीच मंडळी काय पण राजकपूर, देव, शम्मीकपूर यांच्यावर तो सहज मात करत असे. देवआनंद व शम्मीकपूर त्याच्याशी मुकाबला नको म्हणून फिल्मही टाळत. अनेक चित्रपटाचे निर्माते इटलेच्युअल्सच्या टीकेला घाबरून महमुदच्या अदाकारीला कात्री लावत. परिणामी त्याचा चित्रपट चार दिवसातच खाली उतरत असे. परतु प्रमोद चक्रवर्तीसारखे निर्माते मात्र महमुदला कायम धरून होते. दाक्षिणात्य निर्मात्यानाही महमुदची किंमत ठाऊक होती आणि अनेक अदाकारानाही. उदा. मुमताज 'प्यार किए जा'मध्ये हिरो शशीकपूरने नाही म्हटल्यावर मुमताजला हिरॉईनचा रोल मिळाला नाही. पुढे आपले करिअर वाचविण्यासाठी शशीला हिरॉईन म्हणून मुमताज हवी होती. त्यावेळी तिने सल्ला विचारला, ती म्हणाली, 'भाईजान, तुला काय वाटतं या कपूरच्या छोकऱ्याच्या ढुगणावर लाथ मारू?' महमुदने तिला तसे करू दिले नाही.

¤

महमुद नावाचा घोडा नव्हे गधा सुमारे २५ वर्षापूर्वी म्हणजे राजेश खन्ना युगापूर्वी जरा गडबडला. (मी मुद्दामच महमुदला 'गधा' म्हटलं कारण त्याचे कॅमेरामन व मुबई पालिकेचे नगरसेवक याना महमुदने 'महमुद और गधा' हा चित्रपट काढण्याची ऑफर दिली होती. 'तुम्हारी जिंदगी बन जाएगी' महमुद म्हणाला गोष्ट ऐकल्यावर आपण खूष झालो. महमुदसारखा गधा खुश होऊनही तिकलकर साहेबांना चित्रपट काढण्याची का सुबुद्धी झाली नाही कुणास

ठाऊक ! हल्ली मराठी माणसं बनवाबनवी करून गंमत जमत करतात त्यापेक्षा 'महमुद और गधा' ही स्टोरी मला सरस वाटली) तर महंमुद नावाचा गधा आपली दौड करत असताना एकदाच गडबडला. तो म्हणजे फिल्म इन्स्टिटयूटमधल्या नवीन पोराची टोळी बाहेर पडली तेव्हा ही पोरं जणू जुन्या आणि जाणत्या कलाकाराचे रॅगिंगच करायला निघाली 'महमुद कॉमेडियन म्हणून कसा वाटतो! द्व्यर्थी डायलॉग्ज टाकतो! खरे कॉमेडीअनचे हे काम ?' वगैरे ते नव्या सिने अखबारवाल्याजवळ ठोकत असत एका पार्टीत महमुद आमच्या-जवळ उपहासात्मक बोलला... 'कोण विचारतो आम्हा कॉमेडियन्सना वगैरे...' अखेर लोकानी नव्या कॉमेडियन्सनी पेश केलेले जोहरही पाहिलेय

मला महंमुदला सामोरे जाणे ही गोष्ट क्रिकेटपटू श्रीकातला सुनील गावसकर-सारख्या मुरब्बी माणसाने सामोरे जाण्या-सारखी वाटते. तू असा विनोद का करतोस वगैरे जर त्याला कोणी सवाल केला, तर तोही म्हणेल, 'अखेर सिनेमात काम कशाला करायचं पब्लिकला तीन तास खुर्चीत खिळ-वून ठेवण्यासाठीच ना?' प्रत्येक कॉमेडीयनला पडद्यावर स्वत.चे जीवन पेश करण्याची उबळ येते महंमुदने आपल्या स्टाईलमध्ये प्रयत्न केला 'कुवारा बाप'ची स्टोरी त्याच्या पोलियो झालेल्या मुलाचीच होती. ही दर्द-भरी दास्तान आणि कॉमेडी याचे बेमालूम मिश्रण यशस्वी झाल्याचे उदाहरण कारण, स्वत.चीच स्टोरी पेश करणाऱ्या कॉमेडि-यन्सना कधीही यश मिळाले नाही. किशोरकुमारचे 'शाबास डॅडी' हे त्याचे चागले उदाहरण, 'कुवारा बाप'नतर महंमुदचे प्रयत्न फसले. अखेर मुमताझ अल्लीच्या साहेबजादाच्या लेखी हसविण्याचा धदा हाच खरा होता

¤

बॉम्बे टॉकीजच्या जमान्यात जे पडद्यावर फॅमिली ड्रामा पेश केले जात त्यात नायक बहुधा (अशोककुमार) नायिका (देविकाराणी ते मुमताझ शानी, रेणुका) बाप किंवा व्हिलन (मुबारक) याच्या मेजर सीन्सवर पडदा टाकून जरा पायात चाळ घालून नाचून 'मेरा बम्बईसे बालम आयारे है बाबुजी' असे खटके-बाज गाणाऱ्या मुमताझ अलीने दारू पिऊन मुलासाठी फक्त सिनेमाचा वारसा आणि कर्ज ठेवले होते. मिनू आणि महंमुद यांना जसे जमले तसे त्यानी आपल्या बापाचा वारसा उचलला महंमुदला कदाचित फिल्मी माहोलच्या पाळण्यामध्ये आपले विनोदाचे पाय दिसले नसतील तोपर्यन्त तो धडपडत राहला व्ही शातारामच्या 'नवरग' सारख्या चित्रपटात एका घोडेस्वाराच्या वेशात महमुदला मी स्पॉट केले तेव्हा फारच चकित झालो. वाटलं, याला दिवस फारच वाईट गेले असतील नक्की... आणि आप-ल्याच एखाद्या रोलमधली भूमिका त्याने वठवली. 'अरीऽऽ तू क्यू भूका तडप रहा है. हिलाव अपनी जिंदगी बताव आपना जोहर...'

दिवसा दोन रुपयाचे चणे खात खात दिवसा दोन हजार रुपये कमावू लागला हिरोना झीरो करू लागला एक असा जिंदगी-मध्ये आता मोड आला होता की दुसऱ्याची जिंदगी बनवण्याची पॉवर त्याच्या हाती आली होती. तो निर्माता बनला चित्रपटा-तील महान सगीतकाराचा बेटा एकटाच चार भिंतीच्या कॉम्पाऊडमध्ये खेळताना पाहून त्याला म्हणाला, 'अरी पचम, तू हे किरकिट खेळून काय विजय हजारे नि मर्चंट बनणार आहेस ? मी पिक्चर काढतो आहे. तो आपला बाजा बजाव !'

तो चित्रपट म्हणजे 'छोटे नवाब'. पंचम म्हणजे आजचा एकमेव जुदा धुने देणारा सगीतकार आर. डी आर डी.ला महमुदचा मिडास टच मिळाला म्हणा किंवा परिस मिळाला होता. 'छोटे नबाब'ने अत्यंत उत्कृष्ट सगीत पेश केले त्यातली एक धून ऐकून मी ही 'अनुराधा'मधील रविशकरची धुन अस-ण्याच्या भ्रमात होतो. त्यानतर 'भूत बगला' हाही चित्रपट एक उत्कृष्ट सगीतपट होता त्यात आर. डी. बर्मनने 'प्यार करता जा' आणि किशोरच्या आवाजात 'जागो सोनेवालो' ही अफलातून गाणी दिली. सर्वांत कहर म्हणजे पचमने कामही केले आणि एस्टॅब्लिश झालेल्या महमुदसारख्या विनोदी नटापेक्षाही चागले काम केले. 'शबनम' या कॉश्च्युमपटात त्याने मागे पडलेल्या उषा खन्नाला काम दिले परतु या सर्वांवर कडी म्हणजे 'पडोसन'मध्ये किशोरला घेतले किशोरकुमारची या चित्रपटातील भूमिका दुय्यम असून एक्का ठरली आणि गाण्याने किशोर पुन्हा आपले जोहर दाखवून चमकला.

किशोरला पुढे आणण्याचे क्रेडिट महमूद नेहमी आपल्याकडे घेतो आणि तेही मान्यच करायला हवे त्यानतर अरुणा इराणी शुभा खोटेच लग्न झाल मग मुमताझबरोबर महंमुदची जोडी जमली, पुढे मुमताझला हिरॉइनच्या जागेवर बढती मिळाली आणि अरुणा इराणीशी त्याची जोडी जमली. त्यानी एकमेकावर प्रेमही केल आणि प्रेमाचा कबुली जवाब बोलडली दिला महमुद अरुणा इराणीलाही हिरॉईन पदावर बढती देण्यासाठी धडपडला 'बॉम्बे टू गोवा' या हदी विनोदी चित्रपटामध्ये पहिल्या दहा चित्रपटात ज्याची नोद होईल, या चित्र-पटाची नायिका होती अरुणा आणि नायक होता अमिताभ बच्चन त्यानतर त्याने 'गरम मसाला' हे चित्र काढले. ते बकवास होते, परतु या चित्रपटापासून त्याने स्टार मडळीना पाहुणे कलाकार म्हणून राबवण्यास सुरुवात केली. 'स्टार'मडळी आपल्याला पूर्ण भूमिकेसाठी नकोत. 'एक पडोसनचा अनुभव पुष्कळ झाला' तो म्हणायचा म्हणून मैत्रीखातर त्याने मोठया स्टार्सना लहान भूमिकेत वापरायला सुरुवात केली. नव्या पब्लिकमध्ये त्याने ज्या तिघाशी दोस्ती जमवली ते म्हणजे अमिताभ बच्चन, विनोद मेहरा आणि सगीतकार राजेश रोशन. अमिताभ अन्वरचा मित्र. त्याच्या घरचा पाहुणा. शिवाय महमुदने 'मुत्तु कोडी कवाडी हवा' वाली मनोरमा, श्रीदेवी व जयप्रदा वगैरेंच्या आधी आणली होती, हे कुणाला ठाऊक नाही ! त्या ठसकेबाज बाईला कोण विसरेल ?

आपल्या वालिदला 'कुवारा बाप'मध्ये कित्येक वर्षानतर झळकवले त्याने हिजड्या-नाही प्रथम पडद्यावर आणले बगलोरच्या फार्मवर रेसच्या घोड्याचा हा मालक, लुपेन प्रोलेटारिएटपर्यंत फार आधी म्हणजे नामदेव ढसाळच्याही आधी पोहोचला होता मान लिया. (हिजड्याना पडद्यावर आणण म्हणजे त्याच्या जिंदगीला कुर्निसात करण, हे महं-मुदने केल) हिजड्याची त्यानतर पडद्यावर गाणी आली, पण 'कुवारा बाप' मधल्या

गाण्याची कुणाला सर नाही. 'हाजी' म्हणून त्या हिजड्यानी कोरसमध्ये जी जागा घेतलीय ती ग्रेटच आहे !

¤

मी महंमुदला प्रायोगिक सिनेमावाला म्हणतो त्याचं आणखी एक कारण आहे. महमुदने 'कुवारा बाप'च्या निर्मितीमध्ये 'प्रॉडक्शन मॅनेजरच' उडवला 'काही कामाचा नसतो हा माणूस' महमुदचे म्हणणे एखाद्या प्रायोगिकवाल्याने एखादे दृश्य कसे टिपले म्हणून सांगावे तसे सागत असे.

'एक जमाना त्याने गाजवला'. महमुद हे नाव उच्चारताच कुणाच्याही तोंडून हे शब्द बाहेर पडतात. अर्थात आज जमाना त्याचा राहिला नाही. 'शोले'च्या परपरेतील एका नाटकीय स्टटपटाचा जमाना आल्यामुळे विनोदी नट नावाचे जे आपल्या हिंदी चित्रपटाचे सगीतानतरचे दुसरे मेजर कॉन्ट्रिब्युशन होते, त्यावरही पडदा पडला. त्यानतर निरनिराळ्या मडळीनी या विनोदी चित्रपटाच्या निर्मितीत हात घालण्याचा प्रयत्नही केला आहे उदाहरणार्थ जॉनी वॉकरने मला वाटतं, अलीकडचे निखळ विनोदी चित्रपट म्हणजे 'मि इंडिया' आणि नसिरूद्दीन शहाचा 'जलवा' हे दोनच असावेत महमुद तर आपल्या बंगलोरच्या फार्मवर जाऊन निवृत्तीचा काळ कंठतो आहे. मुमताझ अलीने त्याच्या लेखी जी दुर्दशा माडली होती, त्यामुळे त्याला सघर्ष करावा लागला आणि त्यातून त्याचे गुण निखारले. आता त्याच्या घरात कुणालाही कष्ट करावेसे वाटत नसावेत. त्यामुळे त्याचा वारसा चालवणारे कुणी उरले नाहीत.

'दो फूल'च्या निर्मितीनतर मी त्याच्या अंधेरीच्या बगल्यावर (जिथे महमुदचे ऑफिसच राहिले होते) पोहोचलो होतो. समोरच्या पटांगणावर महमुदने बागला देशच्या युद्धानतर अॅडमिरल नदाचा सत्कार सोहोळा केला होता, त्यावेळी त्याचे अफलातून भाषण आठवत होतो. बगल्यात त्याचे भाई होते–'भाईजान बिझी आहेत–भाईजान ड्रेसिंग करतात' हे सागायला आपले कबख्त भाई कामधद्याला लागावेत म्हणून महमुदने एकेका भावाला कसले तरी ऑफिस कुठेतरी खोलून दिले आहे. प्रत्येक सिनेमावाल्याचा पैसा आल्यावर फर्जच फक्त अन्वर हा एकच भाई काही कामाचा असावा असे दिसत होते. महंमुदलाही चॅप्लिनच्या मुकाबल्यात तेरा–चौदा अपत्ये होती. त्यात एक पोलियो झालेला. मला वाटतं त्याने त्याला दत्तक घेऊन अल्लाकडे पुण्य जमवले असावे पण चार्लीच्या मुकाबल्यात अरुणा इराणीचे प्रकरण सोडूनही अनेक लग्नेही केली. पहिली मीना कुमारीची बहीण. ती सायकिक केस होती चोऱ्या करायची. तिच्यामुळे सत्रस्त झालेल्या महमुदने कुठेतरी मीनाकुमारी आणि कमाल अमरोही याच्या भांडणात कमालची बाजू घेतल्याचे वाचले महमुदने माडलेली भूमिका मला शहाणपणाची वाटली. मी जरी मीनाकुमारीचा पक्षपाती होतो तरी नतर त्याच्या जीवनात ही गोरी ट्रेसी अशीच काही सबंध नसताना आली. खाटिक महमुदवरही प्रेम जडू शकले ! आणि महमुद स्थिरावला. एकच दादाने अलीकडे त्याला चित्रपटात आमत्रण दिले. दादाही मराठी चित्रपटात ठीक होता. हिंदी चित्रपटात तो बुळबुळीत जमिनीवरूनच वाटचाल करतो आहे. परवा त्याने महमुदला मिठी मारल्याचे एक छायाचित्र पाहून मला प्रश्न पडला– इथे कोण कोणाला आधार देतोय ?

आपल्या समाजात स्वभावत च उद्भवणाऱ्या नॉन्–सेन्सिकल आणि निरर्थक घटनांवर विनोद करताना महमुदने अक्षरशः खाद्यावर विनोदाचे ओझेच वाहले आहे अमली पदार्थांचे सेवन करून खाद्यावरचे ओझे साभाळता साभाळता त्याला हृदयविकाराचे झटके आले. एकूण आपली कारकीर्द सपली हे त्याने मजूरच केले. हा शब्दांचा बादशहा एरव्ही सोडावॉटरच्या फुटलेल्या बाटलीप्रमाणे विनोदाने फसफसत धुमाकूळ माडायचा. मागे एका अपूर्ण राहलेल्या चित्रपटात अमली पदार्थाच्या गुगीत मठ्ठासारखा बसून होता... प्रचड राक्षसी चेतनाहीन देह. (महेश भटने त्याचा एका चित्रपटात दिव्याचा राक्षस म्हणून चागला उपयोग करून घेतलाय !) त्याला चित्रीकरणासाठी, उठवण्यासाठी दोन माणसे लागली. फारच केविलवाणे ! अखेर त्याचे आयुष्य काही काळ सेन्सिबल आणि काही काळ इन्सेन्सिबल झाले होते. कुठल्याही विनोदी नटाच्या जीवनासारखे.

¤

किशोरकुमार गेल्याला एक वर्ष पूर्ण झाल आहे. आकाशवाणीवर किशोरकुमारची गाणी वाजताहेत नि किशोरकुमारच्या अनस्तित्वाच्या भावनेने भारावून गेलोय. महमुदने त्याला श्रद्धाजली वाहताना म्हणे, एक दिवस आपलेही नसणे अटळ आणि जवळ असण्याची पब्लिकला अॅडव्हान्स जाणीव दिली होती ! ती जाणीव लक्षात ठेवूनच माझी ही अॅडव्हान्स श्रद्धाजली आपला तरी भरवसा कुठे आहे !


नूतन वर्षाभिनंदन

**रॉय आणि कंपनी**

१७६, शामलदास गांधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट)
मुंबई ४०० ००२.


**के. आर. होमिओ फार्मसी**

• नळ स्टॉप, सुशीला अपार्टमेन्टस, कर्वे रोड, एरंडवणे, पुणे–४११ ००४ व

• चाफेकर स्मारक समोर, चिंचवडगांव, पुणे–४११ ०३३.

**खात्रीलायक होमिओपॅथिक व बाराक्षार (बायोकेमिक) औषधे व पुस्तके मिळण्याची पश्चिम भारतातील लोकप्रिय ठिकाणे.**

# श्री यमुनोत्री, गंगोत्री आणि धर्मभावनेचे मूळ



॥ श्री ॥

चि. अमित आणि सौ. सुषमा,

काही महिन्यांपूर्वीच मधुचंद्राच्या निमित्ताने तुम्ही अमेरिकेचा दौरा करून आलात. तिथल्या बोस्टन ते मेनच्या प्रवासाचं वर्णन– अटलांटिक महासागराच्या बाजूबाजूनं जाणाऱ्या त्या नागमोडी वाटेचे दर्शन शब्दरूपात तुम्ही मला घडवलंत. तेव्हा मी अलीकडेच (३ ते १० सप्टेंबर) अनुभवलेल्या यमुनोत्री–गंगोत्रीच्या यात्रेतल्या सौंदर्याचं शब्दचित्र तुमच्याकरता रेखाटावं असं मला वाटलं म्हणून हे पत्र.

कन्यादानाचं पुण्य मिळवलेला, आयुष्याच्या संध्याकालात शिरत असलेला मी एक बाप; तरी अधिक पुण्य मिळवावं या हेतूनं काही या यात्रेत मी सामील झालो नव्हतो. खरं तर फार पूर्वी– माझं लग्न होण्याच्याही आधी १९५० मध्येच ही यात्रा मी करणार होतो. ऋषिकेशपर्यंत मी गेलोही होतो. पण काही कारणांनी तेथूनच मी परत फिरलो होतो.

खरं तर ऋषिकेशच्या पुढची उत्तरखंडाची ही यात्रा तरुणांनीच नव्हे तर कुमारांनीही करायला हवी. गंगायमुनेच्या उगमाच्या या भागात या दोन्ही नद्या तुम्हाला त्यांच्या लहानपणीच्या–शैशवातल्या स्वरूपात दिसतात. अनिर्बंध धावणाऱ्या, दगडकपाऱ्यांवरून बिनदिक्कत उड्या मारणाऱ्या, कशाचीही तमा न बाळगता पुढे झोकावून देणाऱ्या, सतत गाणाऱ्या, सभोवतालच्या तरुराजींशी अहर्निश टिपऱ्या खेळणाऱ्या, श्रीमहादेवाचं सोंग घेण्यासाठी म्हणून की काय त्याच्यासारखीच राखाडी माती सर्वांगाला लिंपून स्वतःची मूळची धवलता अजाणता मिरवणाऱ्या.

खरं तर या भागात मथुरेची यमुनामाई किंवा कालिया नाग राहू शकणारा खोल डोह कुठे दिसतच नाही. ती यमुना प्रौढ आहे इथं ही यमुना आहे आपल्या अनेक निर्झरसख्यांशी टिपऱ्या खेळत गोफ विणणारी, आई–बापाचं न ऐकता काचा खोवून दौडत हुंदडणारी यमी. इथं ही यमू काठावरच्या कडेकपारींशी झिम्मा खेळते, हिमराजाच्या कुशीत मधेच लपते, तर कधी धवधब्याच्या रूपाने धरतीवर दुग्धकलश ओसांडते. भगवान श्रीकृष्णांच्या बाललीला जशा रांगड्या पण मनोहारी तशाच या यमुनामाईच्या शैशवलीला मनाला भुरळ घालणाऱ्या, उत्साहित करणाऱ्या, खेळायला ये म्हणून आवाहन करणाऱ्या.

श्रीगंगेचेही तसंच. ती गंगामैया बनते हरिद्वारच्या पुढे. गंगोत्रीला ती भागीरथी– भगीरथाची मुलगी आहे. तिला मग अनेक सख्या मिळतात. केदारनाथाहून येणारी मंदाकिनी, बद्रिनाथाहून येणारी अलकनंदा ही काही सर्व परिचित नावं. पण खरं तर या असंख्य सख्या आहेत. उंच उंच हिमशिखरावरून उड्या घेणाऱ्या, हिमराजाच्या अंगाखांद्यावर खेळत भोवतालच्या वनराजीला जीवन देणाऱ्या.

हे बाह्य सौंदर्य आकर्षक आणि आनंददायी आहेच. पण यात्रा करताना मधेच एखाद्या दगडावर बसून तुम्ही डोळे मिटलेत तर अमाप अन्तःसौंदर्यही तुम्हाला भावते. त्याबद्दल नंतर बोलू.

तर या यात्रेत मी सामील झालो– तरुणपणीची एक इच्छा पुरी करण्यासाठी आणि तशी या यात्रेत सामील झालेली सगळीच मंडळी काही माझ्यासारखी वृद्धत्वाकडे झुकलेली नव्हती. तीस वर्षांच्या एका तरुणीपासून बहात्तर वर्षांच्या एका प्रौढापर्यंत निरनिराळ्या वयाची मंडळी होती. एकूण आम्ही सत्तावीस यात्रेकरू–

सहप्रवासी होतो. त्याव्यतिरिक्त ट्रॅव्हल एजन्सीचे प्रमुख व त्याचे सहकारी. माझ्या सहप्रवाश्यापैकी चार जणाना हार्टअॅटॅक येऊन गेला होता. तरीही यमराजाच्या रेड्याला आव्हान देत मंडळी यात्रेला आली होती माझ्यासारख्यांच्या डोळ्याना या सहप्रवाशाच्या शारीरिक रूपरगापेक्षा त्याचे अतरग अधिक आकर्षवीत होते, अर्थात सर्वच प्रवाशाचे अतरग मला दिसू शकले नाही. पण जे दिसले ते प्रेरणादायी

एक सहप्रवासी– त्याना आपण इनामदार म्हणू– खर तर निरीश्वरवादी किंवा अज्ञेयवादी, एका अर्थाने ते मूर्तिभजकच. समाजात आदरणीय मानल्या जाणाऱ्या अनेक व्यक्ती या इनामदारानी जवळून पाहिल्या होत्या. आणि त्यामुळे त्या व्यक्तीचे मातीचे ठिसूळ पायही त्यांनी 'देखिले' होते याच्या पूर्वजांना मर्दुमकी गाजवली म्हणून पेशवेकाळात सातारा जिल्ह्यातली काही गावे इनाम मिळाली ती बहुतेक इनामे–जमीन पुढे कुळकायद्यात वगैरे गेली. पण जी काही थोडी जमीन राहिली होती, त्यात सुदर मळा पिकवावा अशी याच्या वडिलाची इच्छा. ती पुरी करावी म्हणून वडिलाच्या मृत्यूनतर या गृहस्थानी आपली शहरातली सुखाची सरकारी नोकरी सोडली व खेड्यात राहून शेतीचे प्रयोग सुरू केले प्रयोग यशस्वी झाले. पीक चागले येत असे पण गावातल्या भाडणानी, व चोऱ्यानी आर्थिक तोटाच सहन करावा लागला मग तो मळाही विकावा लागला सरकारी नोकरी सोडलेली व आता शेतीही सपली तर असे हे आमचे इनामदार सर्वसाधारण जगाचे नियम लावले तर अनेक बाबतीत अपयशी होते या आमच्या पधरा दिवसाच्या प्रवासात कोणाची एक सुतळीसुद्धा हरवली नाही पण आमच्या इनामदाराची कपड्याची नवी बॅग प्रवासाच्या पहिल्या टप्प्यातच चोरीला गेली. ती बॅग त्याना त्याच्या मुलीच्या मैत्रिणीने खास या प्रवासाकरता दिलेली या प्रसगात इनामदाराचा वेंधळेपणा अजिबात नव्हता. यमुनोत्रीच्या वाटेवर मोटारीने जाण्याचा मार्ग जिथं संपतो त्या हनुमानचट्टीला आमची बस रात्रीच्या अधारात पोहोचली होती. गावात विजेचे दिवे वगैरे नव्हतेच तेव्हा बसवरून सामान काढताना एका हमालाने ती बॅग पळवली होती. इनामदाराच्या हे लगेच लक्षात आले व त्यांनी ट्रॅव्हल एजन्सीच्या प्रमुखाला तसे सागितलेही. पण या प्रमुखाचा तेथील लोकांच्या सच्चेपणावर प्रचड विश्वास. तो म्हणाला की चोरी वगैरे इथ काही होत नाही. तुम्ही बहुधा हरिद्वारलाच ती बॅग विसरला असाल. आपण उद्या हरिद्वारला निरोप पाठवून ती बॅग मिळवू. अर्थात ती बॅग नतर मिळालीच नाही व इनामदाराच्या पदरात आणखी एका अपयशाची भर पडली.

या इनामदाराच्या हातून कोणतेच काम धड होणार नाही अशी समजूत डोळे झाकून जगरहाटीप्रमाणे सरळ चालणाऱ्या त्याच्या अनेक नातलगांचीही झाली होती पण खरं तर हा माणूस स्वत.ची अज्ञता जाणणारा तत्वज्ञ खूप वाचलेले, खूप पाहिलेले– हो सिनेमा नाटकेही खूप पाहिलेली, स्वत.च्या आयुष्यात धोके पत्करूनही अनेक प्रयोग केलेले खूप चिंतन केलेले त्याना या यात्रेत रस होता तो एक अतर्यात्रा म्हणून. देवाच्या विधियुक्त पूजेअर्चेत . त्याना मुळीच रस नव्हता.

या प्रवाशाच्या दुसऱ्या टोकाला एक प्रौढ बाई होत्या. त्याना आपण माई म्हणू. या माईने चार मुलाना मोठ केल होत– एकाला इजिनिअर, दुसरा डॉक्टर, तिसरा फौजेत अधिकारी वगैरे मुलाचा बाप सकाळपासून रात्रीपर्यंत त्याच्या नोकरीत दग. घरातले सारे या माऊलीने पाहिले. नोकरीच्या तुटपुंज्या उत्पन्नात घर साभाळायचे आणि मुलाचा अभ्यास तिन पाह्यचा. त्याच्या आशाआकाक्षा तिनं जोपासायच्या. आता साठी उलटल्यानतर कृतकृत्य होऊन ती यात्रेला बाहेर पडली होती यशाच समाधान आणि प्रचड विश्वासाची शिदोरी घेऊन मुबई ते दिल्लीच्या रेल्वेच्या प्रवासात वा नतरही हरिद्वार ते हनुमानचट्टीच्या बसच्या प्रवासात माझी या माऊलीची ओळख झाली नव्हती पण त्याचा मोठा मुलगा जो इजिनिअर होता, त्याची ओळख झाली होती हा इजिनिअर पूर्णपणे मुबईकर चालण्याची, फिरण्याची अजिबात सवय नसलेला ऑफिसला जाताना गाडी, बायकोमुलाना फिरायला नेण्याकरताही गाडी. तर असा हा तरुण इजिनियर बायकोला घरी सोडून आपल्या आईबरोबर यात्रेला आलाच कसा हा मला प्रश्न पडला होता. नतर माईंची ओळख झाल्यावर तो प्रश्न थोडासा सुटला तर या माईंचा स्वत वरचा विश्वास एवढा दाडगा की त्या हनुमानचट्टीपासून यमुनोत्रीपर्यंतचे १४ किलोमीटर अतर पायी चालून जायला निघाल्या होत्या प्रवास–प्रमुखानी आम्हा सर्वांनाच सल्ला दिला होता की कोणीही चालत जायच्या फदात पडू नये एक डोगर चढायचा तर दुसरा उतरायचा, पुन्हा तिसरा चढायचा, असे सारखे करीत यमुनोत्री गाठायची व त्याच पावली परत यायचे वरती मुक्कामाला थाबायची सोय नाही. बर रस्ता तरी धड! नाही. तोही अतिशय खबदाडीचा, चिंचोळा, बहुतेक ठिकाणी फक्त तीनचार फूट रुंदीचा. दोनचार माणस हातात हात घालून गप्पा मारीत चालतील हे अशक्यच वाटेच्या एका बाजूला खोल दरी व त्यात दरडीवर उड्या मारीत खळाळत जाणारी यमुना तर दुसऱ्या बाजूला वेडावाकडा तुटलेला कडा. फार जवळ जावे तर त्यातल्या एकाद्या कपारीचे टोक लागून शब्दश: कपाळमोक्षच व्हायचा.

तेव्हा बहुतेक सर्वांनी घोडी– म्हणजे खेचरंच करायचे ठरवले काही थोड्या मंडळींनी डोली–पालखीही केली. तेव्हा मग त्या इजिनियर मुलाच्या आग्रहाखातर व इतरही सर्व मंडळींचे मन मोडू नये म्हणून माईंनीही घोड्यावरून जाण्याचे कबूल केले. पालखीत बसणं पूर्ण नामजूर. अर्ध्या वाटेवर माईंचा घोडा पुढल्या घोड्यावर अडखळून खाली पडला. चूक खर तर घोडेवाल्याचीच होती त्यानं त्या घोड्याला पुढ्याकडून मारल होतं. पण घोड्याला जोरात चालायला वावच नव्हता जोरात पुढे जाण्याच्या प्रयत्नात असतानाच पुढच्या घोड्यामुळ तो अडखळला व खाली पडला अर्थात माईही घोड्यावरून खाली पडल्या. नशीब एवढंच की दरीच्या बाजूला पडल्या नाहीत घोडाही बचावला होता तो उभा राहिला तेव्हा माईही उठल्या व पुन्हा त्याच घोड्यावर आरूढ झाल्या दुसरी एखादी बाई, नव्हे पुरुषही असता तर हबकलाच असता व पुढे चढण्याच्या भानगडीत न पडता मागे मुक्कामाला गेला असता. पण माईंचे मनोधैर्यच विलक्षण यमुनोत्रीला पायी चढायला मिळाल नाही त्याची कसरही

त्यानी पुढे केदारनाथ पायी उतरून भरून काढली. या माई अतिशय सश्रद्ध. जैन धर्मातले सारे विधीउपचार त्या पाळीत, पण म्हणून इतराच्या उपचाराबद्दल त्याना मुळीच अनादर नव्हता. हिंदू धर्मातल्या 'विविधतामें एकता' या विषयावर त्याना व्याख्यान देता आले नसते पण ते तत्त्व त्याच्या आचरणात ओसडत होते.

इनामदार व माई-या दोन टोकाच्यामध्ये बहुतेक इतर सारी मंडळी होती. एक माझे जुने परिचित-त्याना आपण भाई म्हणू. हे इंजिनियर, नंतर सेनाविमान दलात होते. माझ्यासारखेच काही वर्षांपूर्वी निवृत्त झालेले. मेघालय, अरुणाचल वगैरे प्रदेशातल्या हिमनगाचे अनाघ्रात सौंदर्यही त्यांनी पाहिलेले व पाश्चात्त्य देशातल्या रात्रीही रंगवलेल्या तरहे भाई इनामदाराच्या जवळचे. याच्या घरी त्यांची पत्नी पूजेचे सोपस्कार यथासाग पार पाडते. त्याला याचा विरोध नसतो. पण याच्या मनात प्रश्न असतो की खरंच या फाफटपसाऱ्याची गरज आहे का ? तर दुसऱ्या टोकाला-माईंच्या बाजूला एक सश्रद्ध कर्तृत्ववान गृहस्थ होते. त्यांना आपण नाना म्हणू हे देवताच्या पूजाअर्चेचे काही नियम काटेकोरपणे पाळीत सोमवारच्या उपवासाच्या दिवशी प्रवासात असतानाही दुसऱ्याने शिजवलेले अन्न-चहासुद्धा- न घेणारे, स्नान झाल्याशिवाय तोडात पाणीही न घेणारे, स्वत च्या पायावर उभं राहून अत्यंत दारिद्र्यातून वर आलेले, स्वतःच्या कर्तृत्वाचा गर्व नाही पण प्रचंड आत्मविश्वास असलेले, सर्वांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करणारे, जीवनातल्या व्यवसायातून कधीच निवृत्त न होऊ शकणारे पण वार्धक्याने आपल्याला सावधान म्हटल आहे तेव्हा आपल्याला काही बरवाईट झाल तर त्याचा त्रास इतराना नको म्हणून पालखीत बसून यात्रा करण्यात कमीपणा न मानणारे. या नानानी या यात्रेत एखाद्या मोठ्या भावाच्या मायेने मला साभाळले यात्रेतल्या बऱ्याच मुक्कामाच्या गावी एखाद्या धर्मशाळेच्या मोठ्या खोलीत बऱ्याचशा यात्रेकरूना झोपावे लागे. ऐसपैस पसरायला जागा कमी पडे, तेव्हा मग मी माझा वेगळा बिछाना न घालता या नानाच्याच बिछान्यात झोपी जाई. मला जेवायला वेळ लागतो, तर हे नाना त्याचे जेवण संपले व पगतीतली इतर मडळी उठून गेली तरी माझ्याकरता बसून राहात.

आणि या प्रवासी मडळीत एक अण्णाही होते. हे व्यवसायाने डॉक्टर. अत्यत लोकप्रिय. औषध दिलं नाही-नुसतंच प्रिस्क्रिप्शन दिल तर पैसे न घेणारे आलेल्या पेशटला कधीकधी 'अरे माझ्या औषधाऐवजी तुझ्या आजीनं सांगितलेला काढा तू घेतला असतास तर लौकर बरा झाला असतास' असं सुनावणारे. पैशाची पर्वा न करता माणुसकीला जपणारे. पाश्चात्त्य देशातली नवलाई चोखंदळपणे चाखणारे आणि तरीही हिमालयाच्या सावलीत विसावू पहाणारे. या भाई, नाना अण्णासारख्याच अक्का, ताईही होत्या प्रौढ अक्काचा सूर साधारणमानाने मुख्याध्यापकासारखा हुकुमी आवाजात लागे व त्या दमात भोवतालच्या वस्तूचे अक्का मूल्यमापन करीत तर ताई मृदू स्वरात कोणाला काही दुखलं खुपलं का त्याची चौकशी करीत. या ताईही डॉक्टर होत्या. त्याच्याबरोबर औषधांच्या गोळ्या वगैरे होत्याच पण माझ्यासारख्याला द्यायला बदाम, बेदाणे, खजूर असा खुराकही होता.

आणि हो, संसारातल्या अनत काळज्यानी ज्यांची आयुष्य कोमेजली होती आणि या यात्रेत जी उमलू म्हणत होती अशीही काही मडळी, काका, काकी, आत्या या आमच्या यात्रागणात होत्या. आणि वैमानिकाच्या क्षेत्रातून निवृत्त झाल्यानंतर कायद्याच्या नव्या क्षेत्रात भरारी मारणारे राजेही होते.

हे आणि असे अनेक अतरंग. इद्रधनुष्याचे सातच रंग आपल्याला दिसतात. इथ तर या रगाच्या अनेक छटा विलसत होत्या. त्या पाहाता पाहाता माझे डोळे पाणावले किती ही अनत रूपे, किती हे अनत आकार हे सारे त्या परमेश्वराचेच अवतार का ?

पण असा कोणी परमेश्वर आहे का ? मला वाटतं प्रत्येक यात्रेकरू आपापल्या पद्धतीने या प्रश्नाचा शोध घेत होता निरनिराळ्या प्रवाशांसमोर निरनिराळ्या शब्दात हा प्रश्न उभा राहिला होता मग एका रात्री या प्रश्नाला वाचा फुटली. यमुनोत्री-गगोत्रीचे दर्शन घेऊन केदारनाथच्या वाटेवर उत्तरकाशीला आमचा एक दिवस मुक्काम होता. विश्रांतीचा दिवस. स्वच्छ आघोळी, कपडे धुणे वगैरे कार्यक्रम झाले. प्रवासप्रमुखांनी त्या दिवशी आम्हाला भजीही खायला घातली. उत्तरकाशी हे जिल्ह्याचे ठिकाण तेव्हा जरा शहरी वातावरण त्यामुळे पुण्यामुबईची आठवण जरा जोरदार घरच्या मंडळींना बहुतेकानी त्या दिवशी पत्रेही लिहिली. तेव्हा त्या रात्री मडळींना गप्पा मारायची हुक्की आली. अशा मूडमध्ये गप्पा मारायच्या म्हणजे मुंबईच्या चौपाटीवर भेळ खाण्यासारखेच. जिभेला थोडे अधिक स्वातंत्र्य द्यावेच लागते. तेव्हा आमच्या गटात इनामदारांचा घोडा चौफेर धावू लागला. महाराष्ट्रातल्या अनेक मान्यवर मानलेल्याच्या काळोखातल्या कारवाया त्यानी आम्हाला ऐकवल्या. गीतेचा थोर प्रवचनकार म्हणून महाराष्ट्रात ज्याचा गाजावाजा आहे अशा एका सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञाने मोठेपणा स्वत लाच मिळायला हवा या स्वार्थापायी एका उमलत्या शास्त्रज्ञाला हा देश सोडून परागंदा व्हायला कसे लावले त्याची कथा इनामदारांनी आम्हाला ऐकवली. भाईंनीही धर्माच्या नावाखाली चाललेली अनेक ढोंगे पाहिली होती पण इतरांच्या ढोंगाबाबत बोलत असतानाच मंडळी हळूहळू अतर्मुख होत होती. उत्तरकाशीच्या त्या ज्ञानभूमीवर मग प्रश्न साकार झाला की, आपण धर्म का पाळतो, का पाळावा ?

बहुतेकाना हे कळून चुकले होते की, प्रत्येक नवस फळाला येतोच असे नाही होय, काहीनी आपल्या मुलामुलीची लग्ने देवाला कौल लावून केली होती आणि तरी त्याच्याही आयुष्यात दुखद घटना घडल्याच होत्या. अनत पापाचा धनी असलेला एखादा वरदा गणपती उपासक बनून वा एखादा मस्तान हाजची यात्रा करून अमाप संपत्ती मिळवतो हे त्यानी पाहिले होते या अशा विचित्र आणि विरोधी घटनाचा अर्थ बहुतेकाना लागत नव्हता आणि म्हणून या घटनाचा नियामक कोणी हर किंवा हरी आहे का-असल्यास त्याचे स्वरूप काय असा प्रश्न प्रत्येकजण आपल्या मनाशी शोधत होता. खोलवर कुठतरी आमच्या मनातला तत्त्वचिंतक जागा होत होता

अर्थात त्या एकाच रात्री सारे विचारमथन पुरे होऊन अमृत हाती लागणार नव्हतेच पण उत्तरकाशीच्या त्या रात्रीने माझ्या मनात अगोदरच सुरू झालेली घुस-

ळण अधिक तीव्र केली होती.

खरच आपण धार्मिक आहोत, आपण धर्म पाळतो, आपण देवाला मानतो म्हणजे काय ?

माणसाच्या मनातल्या धर्मभावनेचे एक मुख्य कारण म्हणजे भीती आमची चर्चा रंगात आली असतानाच एक सहप्रवासी म्हणाला होता की मी नित्यनियमाने देवळात जातो. तिथल्या पेटीत पैसे टाकतो, देवाला फुले वाहतो, देवाला सांगतो की माझ्या मुलाला परीक्षेत वरचा क्रमाक मिळू दे, त्याला आजारातून बरा कर—नवस पुरा केलास तर देवळात घंटा बाधीन नाहीतर आणि काही देईन या सर्वांचा अर्थ देवाला लाच देऊन मला हवे ते त्याला काही करायला लावणे असाच होत नाही का ? पावसाचा गडगडाट, विजेचा कडकडाट किंवा वादळी वाऱ्याची आरोळी प्रथम जेव्हा मानवी मनानी ऐकली असेल त्यावेळी तो लहान बालकासारखाच घाबरला असणार. आणि म्हणून त्याने वरुण, इंद्र आदी देवांच्या पूजा करायला सुरवात केली असणार. आताही आम्ही आमच्या मुलामुलींची लग्ने चागल्या घरात व्हावीत याकरता देवाला साकडे घालतो, मुलगा, नातू आजारी झाले तर नवस करतो, उपासतापास करतो तेही त्याच भीतीपोटी ना !

अज्ञाताची भीती ही मानवी मनाची एक सहज प्रेरणा आहे साऱ्याच प्राण्याना ही भीती असते. किंबहुना ही सहजप्रेरणा प्रत्येक प्राण्याच्या सरक्षणाकरता, आत्मरक्षणाकरता आवश्यकच आहे. ही अज्ञाताची भीती शक्तीच्या आदराची दुसरी बाजू असते. लहान मुलाला बापाची भीती आणि आदर दोन्ही वाटतो हा त्या सहजप्रेरणेचाच एक आविष्कार. या पर्जन्यवृष्टीमुळे माझे घरटेच वाहून जाईल या सूर्यामुळे माझे रोपटेच जळून जाईल ही जशी भीती आदिमानवाला वाटली त्याचवेळी त्या पावसाच्या पाण्याने माझी तहान भागते, नवजीवन हिरवळते, त्या प्रकाशाने घरटे उजळते याचाही अनुभव त्याला मिळाला. त्यातून या महाभूतांच्या शक्तीबद्दल त्याचा आदर वाढला. त्या भीतियुक्त आदरातून महाभूताची किंवा त्यानंतर त्याचाही जो कोणी नियामक असेल त्याची, निर्माण करणाऱ्या, स्थिर राखणाऱ्या आणि सहार करणाऱ्या देवाची सकल्पना आली त्यानतर ब्रह्मा, विष्णू, महेश व आदिमाता काली, शांतादुर्गा आदी कल्पना आल्या

या भीतियुक्त आदराच्या धर्मभावनेलाच दुसरा एक प्रवाह मिळाला तो सघभावनेचा, प्रेमभावनेचा माणसे एकत्र राहात होती एकमेकाना मदत करण्यातला आनद लुटत होती. आईबाप मुलाच्या भविष्यात स्वत.ला विसरत होती. तेव्हा मग कोणा कवीने सूर्याला मित्र म्हटले आणि वृक्षवल्लीना सोयरेधायरे मानले मग काहीनी साऱ्या विश्वाशीच आपले नाते जोडले. आदिमानवाच्या शिकारी भटक्या अवस्थेतून समाज जेव्हा शेतीच्या, स्थिर नगरांच्या अवस्थेत आला त्यावेळी हा सघभावनेचा प्रवाह अधिक जोरदार झाला. स्वसरक्षणालाही ते आवश्यकच होते त्यातून प्रजेच्या सुखात आपले सुख मानणारा रामराजा आला वाल्मिकीचा राम हा नगरवासी, सघाचा नेता. तर श्रीकृष्ण द्वारकेची नवी नगरी वसवणारा, मथुरेच्या नगरराज्याला जरासघाच्या पाशवी साम्राज्यवादापासून वाचवणारा आणि शक्य झाले तर धर्माचे साम्राज्य आणू पाहाणारा त्याने गोकुळात आणि नतरही सर्वांत स्वतःला पाहिले. संघातल्या अनेकतेत आत्म्याची एकता—प्रेममयता पाहिली. भगवान बुद्धाने पचमहाभूताकरता केलेले यज्ञयाग मानले नाहीत. श्रीकृष्णानेही इद्राची पूजा वद केली होतीच. पण बुद्धाने 'सघम् शरणम् गच्छामि' अशी प्रार्थना करून सघभावना, प्रेमभावना वाढवली. ही सघभावना व प्रेमभावना एकाच सहजप्रेरणेचे आविष्कार. आईला लहान मूल चिकटते व आई त्याला दूध पाजते हाही त्या सहजप्रेरणेचाच अविष्कार. तरुणपणीही गटागटाने गप्पा मारण्यात व आपल्या आवडत्या मित्राबरोबर/मैत्रिणीबरोबर असताना इतर साऱ्या विश्वालाच नव्हे तर स्वत लाही विसरण्यात मजा असते त्याचेही कारण ही सहजप्रेरणाच. प्राणी पातळीवरची (Biological level) शारीरिक ओढ हीच मानवी पातळीवरची (Psychological level) प्रेमभावना व तीच दैविक पातळीवरची (Spiritual level) आत्मभावना किंवा विश्व हेचि माझे घर ही वैश्विक सघभावना.

धर्मभावनेचे हे दोन प्रवाह यमुना आणि भागिरथीसारखे ते बहुतेक सर्वांना ठाऊक आहेत भाई, नाना, अक्का, ताई, माई या यात्रेत सामील होतात, त्याचे कारण मला वाटते त्यांच्या मनातले हे दोन धर्मप्रवाह. कोणी ससारातल्या काळजीच्या ओझ्याने नतमस्तक झालेला असतो 'बा देवा सोडव रे मला या अडचणीतून, या यातनांतून. माझ्या मुला-नातवाना चागले दिवस दाखीव. माझ्याकडून काही आगळीक झाली असली तर क्षमा कर' अशी किंवा यासारखी प्रार्थना आम्ही बहुतेकजण करीत असतो. तर कोणी एखादा अण्णा स्वतःची चिंता न करता विश्वाची चिंता करावी म्हणतो. इनामदार, एखादाच असतो की ज्याला या प्रार्थनेतून काही निष्पन्न होईल का याची शंका असते आम्ही बहुतेकजण या यमुना-भागिरथीच्या ओघात पूर्वसस्काराने वा भोवतालच्या इतरेजनाच्या रेट्याने वाहात असतो.

धर्मभावनेच्या गगेत या यमुना—भागिरथी—बरोबरच तिसराही एक प्रवाह, सरस्वतीचा प्रवाह असतो. पण त्या प्रवाहाचे स्पष्ट दर्शन अनेकाना होत नाही. त्याकरता या उत्तरखडातल्या भ्रमतीची आवश्यकता असते.

काय दिसते या भटकतीत? उत्तुग पर्वत, आकाशाला गवसणी घालू पाहणारे देवदार वृक्ष आणि त्याही पलीकडचे ते अमर्याद निळे आकाश. तुकारामाचा एक सुदर अभग आहे.' अणुरणिया थोकडा, तुका आकाशाएवढा' तुकाराम अणूसारखा लहान आहे आणि तो आकाशाएवढा मोठा आहे—नव्हे त्याहीपेक्षा मोठा आहे, तुकारामाच्या, ज्ञानेश्वराच्या, आद्यशंकराचार्यांच्या गाण्यांतून ही तिसरी धर्मभावना, उत्तुगतेची, सौंदर्याची, अमर्याद विस्ताराची प्रकटपणे ऐकता येते. ही भावनाही सहजप्रेरणाच आहे. मॅक्लीलॅन्ड (हार्वर्डचा मानसशास्त्राचा प्राध्यापक) त्याच्याच एका अगाला अॅचिव्हमेंट मोटिव्हेशन (Achievement motivation) म्हणतो. अधिक अधिक मोठे व्हावे, पर्वतशिखरे चढावीत अस वाटण, सुदर मी होणार अशा विश्वासान झटणं, एक्सेलसिआर म्हणत उत्तुगाचा पाठलाग सतत करणं हाही मानवाचा स्वभावधर्मच आहे. हनुमानान जन्मताच सूर्यबिंब पकडण्यासाठी उच उडी मारली म्हणून एक कथा आहे.

पण खरतर प्रत्येक मूलच असे सूर्यबिंब पकडण्यासाठी वर उडी मारू इच्छित, आई-बापाच्या मोठ्या चपला घालून घराबाहेर फिरू म्हणत, इतर अनेक मोठ्या माणसाच्या भूमिका घेऊन त्याच्या रूपाबाबच नाटक करत. दोन-चार वर्षांचा मुलगा रस्त्यावरती मोटार अडवणारा पोलिस होऊ म्हणतो आणि किशोरवयात आपण बलदंड व्हावं असं त्याला वाटत, हाही या सहजप्रेरणेचाच आविष्कार पण आपण आईबाप त्याची ही प्रेरणा दाबून टाकतो उंच उडी मारू नकोस, पडशील, धावू नकोस, अडखळशील. नवीन शिखरं चढू नकोस, धडपडशील जणू भोवतालची सारी सृष्टी, सारा समाज तुझा पराभव करण्यासाठी टपूनच बसले आहेत, तू जरा उठण्याचा प्रयत्न केलास की लगेच ते तुला दडपणार आहेत असे अनेक भीतीने भरलेले उपदेश करून मुलाची उत्तुगतेकडे जाणारी सहजप्रेरणा आपण मारून टाकतो. एखादा रवींद्रनाथ या जाळयातून सुटतो. तो शाळेतच जात नाही आणि गीतांजली लिहितो. नोबेल प्राईझ मिळवतो एखादा आइनस्टाईन स्वत च्या कुटुंबियाना टाळून आणि शिक्षकानी केलेली अवहेलना अव्हेरून आल्पस् पर्वतात हिंडतो आणि जगाचे रहस्य शोधून काढण्याचा प्रयत्न करतो.

सर्वसाधारण जनाना मात्र धर्मगंगेतली ही सरस्वती दिसतच नाही. तिच्या दुधावरती त्याच मन पोसलं जातच नाही. नव्या युगाला जो धर्म हवा आहे त्यात निसर्गाबद्दलची भीती कमी असेल, आदर असेल पण दरारा नसेल. त्याच्या उत्तुगतेला भिडायची ओढ असेल, त्याच्या विशालत्वाला, अमर्यादत्वाला द्यायचा प्रतिसाद अधिक व्यापक व तीव्र असेल धर्मभावनेचा दुसरा प्रवाह– ती सध– वा प्रेमभावनेची भागिरथी– तिचा प्रवाह अखंड वाहायलाच हवा नवीन युगातही त्याची आवश्यकता आहे. पण या यमुना-भागिरथीच्या जोडीला उत्तुगतेच्या ओढीची, सौंदर्याच्या ध्यासाची सरस्वतीही प्रकटपणे धावेल

श्रीगीता हा आमचा एक प्रमुख धर्मग्रथ. त्याचे अनेक अर्थ अनेकानी लावले. आद्य शंकराचार्यांनी त्यात ज्ञानयोग पाहिला. ज्ञानेश्वरानी त्यात चिद्विलासवाद आणि भक्तियोग पाहिला, लोकमान्य टिळकानी त्यात कर्मयोग पाहिला, तर महात्मा गाधीनी त्यातल्या अनासक्तियोगावर अधिक भर दिला आणि हे सारे द्रष्टे त्या त्या काळातले महान योगीच होते. त्या त्या काळात श्री-गीतेचा त्यांनी लावलेला अर्थ योग्यच होता. आजच्या आणि उद्याच्या काळात श्रीगीतेचा अर्थ काय लावायचा ? सतानी सागितल्या-प्रमाणे श्रीगीता हा अनेक रत्ने सामावलेला महासागर आहे त्यातली एक तरी ओवी अनुभवावी अशी ज्ञानेशाची सूचना आहे. तेव्हा मी त्यातली कोणती ओवी अनुभवावी? यमुनोत्री-गंगोत्रीच्या यात्रेत मला गीतेचा कोणता श्लोक प्रतीत होत होता ?

श्रीगीतेच्या दहाव्या अध्यायात भगवान म्हणतात की, ते पर्वतामधले हिमालय आहेत (स्थावराणा हिमालय ) आणि नद्यामधली गगा आहेत (स्रोतसाम् अस्मि जान्हवी) आणि ते असेही म्हणतात की तेच सूर्य आहेत, वरुण आहेत, महासागर आहेत. इतकेच नव्हे तर ते हत्तीमधले गजेन्द्र आहेत, पक्ष्यांमधले गरुड आहेत, सापामधले वासुकी आहेत, पशूमधले सिंह आहेत. या सगळ्याचा एकत्र अर्थ काय लावायचा ?

या अध्यायाच्याच ४१ व्या श्लोकात या साऱ्या आविष्काराना साधणारे तत्त्व दिले आहे. 'यत्यत् विभूतिमत् सत्वम् श्रीमत् ऊर्जितम् एव वा ।

तत्तत् एव अवगच्छ त्वम् मम तेजोंश सभवम् ।। ४१ ।।

या विश्वात जे जे उत्कृष्ट आहे, उत्तुग आहे, अतीव सुदर आहे ते सारे मीच आहे मग मला भेटायचे असेल, माझे दर्शन घ्यायचे असेल, माझ्यात मिसळायचे असेल तर या उत्तुगाला तू भिडले पाहिजेस. या सौंदर्यात तू सामाविले पाहिजेस. तू काही पापाचा अश नाही आहेस. तू माझा अश आहेस. तेव्हा तूही मरुतपुत्र हनुमानासारखी उच उडी मारू शकतोस, धवल गौरीशकराला, नील-कंठाला मिठी मारू शकतोस. अशा वेळी सावरकराची ती ओजस्वी कविता आठवते. 'स्वतंत्रते भगवति त्वाम् अहम् यशोयुता वन्दे ।' त्या कवितेत कवीचे विजिगिषू मन म्हणते, 'जे जे उत्तम, उदात्त, उन्नत' ते सारे हे भगवती तू आहेस. आणि तुला मिळ-वण्याकरता सारे समर्पण करायला मी सिद्ध आहे.

रोजच्या जीवनातल्या धडपडीने आम्ही सारे खुजे, भेकड बनतो. मी म्हणजे माझा देह–तोही अपग देह असे मानायला लागतो. भोवतालच्या मातीच्या ढिगाऱ्यानाच आम्ही पर्वत मानून भीतीने डोळे झाकून घेतो आणि पहाटेचे सूर्यबिंब पाहायचेसुद्धा नाकारतो.

रोजच्या जीवनाच्या मर्यादेत स्वत:ला कोंडून घेऊन, स्वत:ला सामान्य म्हणजे दुर्बळ मानून मी जे मलाच अपग, आधळे, लगडे केले आहे त्यातून बाहेर पडायला हवे. त्या-साठी मला या गगायमुनेचे दर्शन हवे. यमु-नोत्रीची–उगमाकडची ही यमुना कड्या-कपारीना न जुमानता पुढल्या प्रवासासाठी, महासागराला मिळण्यासाठी, सारे अग झोकून पुढे उडी मारते, ती भागिरथी पर्वताची राग फोडून, दिशा बदलून अनेकाना दूध देण्या-साठी त्या हिरकणीसारखी प्रचड उच बुरुजा-वरून खाली उडी मारते.


या निर्भयतेची, उत्तुगतेची ओढ मला हवी आहे ती प्रेमभावना झिडकारून नाही. मला भागिरथीचा व सरस्वतीचा सगम हवा आहे. मला रूद्रप्रयाग हवा आहे की जिथं अलकनदा आणि मदाकिनी एकत्र येतात. त्या सगमावर भगवान शंकर अवतरतात आणि नारदाला संगीताची दीक्षा देतात त्या सगमातल्या पाण्याच्या खळाळणाऱ्या ताला-वर सौंदर्य आणि वीरता, भक्ती आणि वैराग्य हातात हात घालून नृत्य करतात. आणि त्या नादब्रह्मात सारे विश्व सगीतमय होते.

तरुणपणी मला हे गाणे स्पष्ट ऐकायला मिळाले नाही. ते मिळाले असते तर माझा जीवनप्रवाह कदाचित वेगळ्या वळणाने गेला असता. पण आता ते गाणे मी ऐकतो आहे आणि या वयातही माझ्या आयुष्याला वेगळे वळण देण्याची मनीषा मी बाधतो आहे. कारण मला कळले आहे की, मी अमर आहे– निर्झराचा बिंदू सागरात सामावला तरी तो जीवनच राहतो तसा.

हे आणि असेच विचार माझ्या सहयात्रि-काच्या मनात आले असतील का ? उत्तर-काशीच्या चर्चेत अशा विचाराचा उद्रेक दिसला नव्हता, पण काही चिन्हे, अरुणाचे अस्पष्ट किरण दिसू लागले होते सारी यात्रा सपल्यावर का होईना आम्हा यात्रेकरूच्या मनात थोडे अधिक उजाळले असेल का ? प्रत्येक यात्रेकरू त्याच्या त्याच्या पद्धतीने या रूद्रप्रयागच्या सगीताला दाद देईल का ? मला या प्रश्नाची उत्तरे होकारार्थी द्यावीशी वाटतात

तुम्ही यमुनोत्री–गगोत्री यात्रा करावी म्हणून हे पत्र तुम्हाला मी लिहिलेले नाही. पण भोवतालच्या सौंदर्याचा, उत्तुगतेचा, उदात्ततेचा शोध तुम्हीही करावा, त्यातली गोडी, त्याचा आनद तुम्हीही अनुभवावा हे सुचवण्यासाठी हे पत्र आणि तशी सधी तुम्हाला मिळावी हा आशीर्वाद

**तुमचा बाबा**



# श्री बद्रिकेदार - एक अंतर्यात्रा

॥ श्री ॥

प्रिय अमित व सौ. सुषमा

श्रीयमुनोत्री-गंगोत्रीचं दर्शन घेऊन आता आम्ही श्री केदारनाथाच्या वाटेला लागलो होतो. (१२ सप्टें.) महाभारत युद्धानंतर अत्यंत व्यथित मनाने पांडव भगवान शंकराच्या दर्शनासाठी या प्रदेशात आले होते. त्यांनीच श्रीकेदारनाथाचे हे देऊळ बांधले अशी कथा. सारा उत्तरखंडच डोंगराच्या रांगांनी भारलेला. भगवान शंकरांच्या गोतावळ्यातले हे गण. त्यांच्या आदरार्थ सतत उभे. साऱ्याच गोतावळ्यावर गंगाजलाचा अभिषेकही सतत चालूच. दऱ्याखोऱ्यांतून मंदाकिनी-अलकनंदाच्या सख्या धावतच असतात. सारं वन हिरव्या सौभाग्यानं नटलेलं असतं.

उत्तरकाशीहून गौरीकुंडापर्यंत मोटार, बसेस जातात. पण नंतर जवळजवळ १४ किलोमीटर पायी किंवा घोड्यावरून वगैरे जायचे. आमच्या सहप्रवाशांपैकी चार जणांनी पायी चढायचे ठरविले. तेव्हा मीही त्यात सामील झालो. पण अप्पा म्हणाले की हा प्रवास तसा एकट्यानेच करायचा असतो. पायवाट रुंद नसतेच त्यामुळे गटागटाने चालताच येत नाही आणि चढणीला लागले की प्रत्येकाला निरनिराळ्या वेळी दम लागतो. बसावेसे वाटते. तेव्हा मी ठरवले की स्वतःशीच विचार करीत डोळ्यांनी मंदाकिनीच्या सख्यांचा खेळ पाहत हळूहळू केदारनाथाच्या पायाशी जावे. चढत असताना सहप्रवासी बरोबर असले तरी फारशी बडबड करताच येत नाही. मग मनातच अनेक विचारांचे मोहोळ माजते.

चालायला सुरुवात केली नि आठवले की याच मार्गाने आदि शंकराचार्य गेले होते. केरळातून आलेल्या या तरुण संन्याशाने हिमालयातली अनेक तीर्थक्षेत्रे पावन केली होती. पुनर्वसित केली होती. ते प्रथम या प्रदेशात आले. (७ वे ८ वे शतक) त्यावेळी १८ एक वर्षांचे होते. व्यासांनी महाभारत लिहिले येथल्या व्यास गुंफेत बसून. तेव्हा शंकराचार्यही व्यासांचा मागोवा घेत इथं आले आणि त्यांची अनेक भाष्ये-विशेषतः ब्रह्मसूत्रभाष्य त्यांनी लिहिले ते याच प्रदेशात हिंडत असताना, सारा भारतवर्ष फिरून आदि शंकराचार्य त्यांच्या ३२ व्या वर्षी पुन्हा याच प्रदेशात आले होते- केदारनाथाच्या पायाशी समाधी घेण्यासाठी. त्यांच्या समाधीच्या जागेबद्दल विद्वानांत एकमत नसले तरी श्रीशंकराचार्य या प्रदेशात हिंडले होते, त्यांनी केदारनाथ व बद्रिनाथाच्या देवालयांनाच नव्हे तर या आसमंतातल्या इतर अनेक क्षेत्रांना पुनरुज्जीवित केले होते याबद्दल दुमत नाही.

याच पुण्यपावन भूमीची धूळ कपाळाला लावून आद्य शंकराचार्यांच्या आधी आणि त्यानंतरही हजारो, लाखो भाविक या वाटेने वर गेले होते, पण हिमालयात भटकणारे सारेच जण भाविक असतात का? संन्यासी असतात का? माझ्याबरोबर पायी येणाऱ्या यात्रेकरूंपैकी रूढार्थाने संन्यासी व भाविक कोणीच नव्हते. डॉक्टर अप्पा चिकित्सक, जिज्ञासू आणि गृहस्थाश्रमी होते. दुसरे एक प्रौढ सहप्रवासी जे या यात्रेला दुसऱ्यांदा आले होते तेही भजनपूजनादि विधीत न गुंतणारे. दुसऱ्यांना मदत करायला तत्पर पण तटस्थ वृत्तीने. दुसऱ्यांच्याबद्दल आदर बाळगायचा पण त्याच्या फार जवळ न जाता. यांनी लग्न केले नव्हते. पण शेजारपाजारच्या व ऑफिसमधल्या अनेक व्यक्तींना काय आवडते त्याचे स्मरण ठेवून त्यानुसार हरिद्वारचा बाजार त्यांनी पिंजून काढला होता. स्वतःबद्दल ते फारसे बोलत नसत. त्या अबोलपणात दुसऱ्याबद्दलची बेपर्वाई नव्हती, गर्वही नव्हता. कुठे तरी खोल दुःख होते. मन व्यथित होतं, पण स्वतःची व्यथा दुसऱ्याला सांगून त्यांचं दुःख वाढवायची यांची बिलकूल इच्छा नव्हती. किंबहुना कोणाकडूनही काही मागावं ही वृत्तीच

नव्हती. उत्तरखडातल्या निसर्गाचा आनद ते घेत होते व आपल्या मुबईतल्या सहकाऱ्या-करता ही अनेक आनदस्थळे आपल्या कॅमेऱ्याने ते टिपत होते

आणखीही एक तरुण सहप्रवासी होते जिज्ञासू धारदार बुद्धीचे. तारुण्याला साजेसे बडखोरही. या त्याच्या बंडखोरीमुळे त्याच्या आसपासची काही माणसे दुखावलीही जात. पण याची बडखोरी इतराना दु ख द्यायचे या इराद्याने नसायची. त्या बडाचा उगम असायचा त्याच्या नचिकेताच्या वृत्तीत. कठउपनिषदात या नचिकेताची गोष्ट आहे. त्याच्या वडिलाना– आरुणि अुद्दालकाला जेव्हा या नचिकेताच्या प्रश्नाचा भडिमार सहन झाला नाही तेव्हा ते म्हणाले, 'तुला मी यमाला दिला आहे' गावठी भाषेत याचा सरळ अर्थ 'मर जा· पोरट्या तिकडे, मला छळू नकोस' तर नचिकेत तडक यमा-कडे–मृत्युदेवाकडे गेला व त्यालाही प्रश्न विचारून भडावून सोडले. आमचे सहप्रवासी नचिकेत माझ्यासारखेच अंतर्यात्रेला निघाले होते. सृष्टीसौदर्याने त्याचेही डोळे भारावले, होते. पण या केदारनाथच्या वाटेवर त्या उत्तुगतेला साक्षी ठेवून स्वत.च्याच मनाला ते प्रश्न विचारू लागले होते.

केदारनाथला आम्ही रात्री मुक्कामालाच होतो. त्यामुळं संध्याकाळी तिथं पोहोचल्या-वर स्वस्थ चित्ताने देवदर्शन केल. पण जास्त वेळ घालवला तो देवळाच्या पाठीमागे असलेल्या बर्फाच्छादित पर्वताचे दर्शन घेत. श्रीशंकराचार्यांची समाधीही तिथच देवा-लयाच्या मागल्या बाजूलाच मदाकिनीच्या काठावर आहे केदारनाथही वर्षातले सहा महिने वर्फाची शाल पाघरून समाधिस्थ होतात त्यावेळी तिथले सारे पुजारी व्यापारी आदी मडळी खाली ज्योतिर्मठाला किंवा उत्तरकाशीला येऊन राहातात. चालून दमल्यामुळे आणि हवेतील थंडाव्यामुळे रात्री छान झोप लागली. पहाटे उठलो तो देवा-लयात सुरू झालेल्या आरतीने. आद्य शंकराचार्यांची स्तोत्रे सुरेल आवाजात म्हटली जात होती. सकाळी देवदर्शनाकरता मोठी राग लागली होती. तेव्हा आमच्या नचिकेताने व मी ठरवले की रागेत उभे राहून आणि नतर देवपूजेचे औपचारिक विधी करण्यात वेळ न घालवता आपण उतरू लागावे. भगवान शंकर देवालया-बाहेरही अनेक रूपानी आम्हाला दर्शन देतोच आहे.

उतरताना मनावरचे दडपण खूपच कमी झाले होते. पोहोणारा नवशिक्या असला तर त्याला पाण्यात खोल बुडी मारून पुन्हा सहजी वरती येता येत नाही. पण सराव झाल्यानतर खूप खोल तळाचा शोध घेऊनही तो सहजतेने वर येतो. तशी काही एक सहजता, तरलता मी अनुभवत होतो. गेली काही वर्षे माझ्या मनाला मी विचारतो आहे की, सन्यास कधी घ्यायचा ? पण या प्रश्नाच्या आधी दुसरा प्रश्न सोडवायला हवा की सन्यास म्हणजे काय ? आदि-शकराचार्यांनी बालवयातच सन्यास घेतला– ८ व्या वर्षी. आणि नतर धर्मसस्थापनेचा प्रचड प्रपच केला. समर्थ रामदासानीही तेच केले. अनेक मठ स्थापून सघटना बाधून हिंदवी स्वराज्याची चळवळ उभारली. मग गीतेतला तो श्लोक आठवला. 'काम्यानां कर्मणा न्यासम् संन्यासम् कवयो विदु·। (१८–२) सन्यासाचा सबध कपड्याच्या भगव्या रगाशी, राखाडीशी किंवा जटाच्या लांबीशी नाही. या केदारनाथाच्या वाटेवर बाह्य उपचारानी रंगलेले शेकडो सन्यासी-बावा मी पाहातो आहे. त्याचे भुकेले डोळे तुम्ही किती पैसे त्याच्या धुनीशेजारी पसर-लेल्या कपड्यावर टाकता यावर केद्रित अस-तात. त्यापेक्षा तो गढवाली वा नेपाळी मजूर अधिक स्वाभिमानी. तो श्रम करतो, तुमचे सामान किंवा जरूर पडली तर तुम्हालाही उचलून नेतो व पैसे मागतो. भिकेचे नव्हे, श्रमाचे. केदारनाथाच्या देवळात त्याला स्थान नसले तरी यात्रेकरूच्या अनेक सेवा– त्याच्या नेण्याआणण्याच्या व्यवस्थेपासून वाटे-तल्या भोजना-राहाण्याच्या व्यवस्थेपर्यत हे मजूरच वा त्याचे कुटुबीय करताहेत. या मजुराची सेवा ही भगवताची सेवा कधी होईल ?

काम्यानाम् कर्मणाम् न्यासः। फळाची आशा ठेवून केलेले जे काम त्याचा त्याग. सेवा करायची, चळवळीचा प्रपंच उभारायचा पण त्याचे फळ मलाच मिळेल ( किंवा माझ्या मुलानातवाना मिळेल ) अशी इच्छा करायची नाही. आंब्याची झाडे लावायची पण त्याची फळे मलाच चाखायची आहेत म्हणून नाही. भविष्यात येणाऱ्या कोणाही वाटसरूने त्याच्या छायेत बसावे, त्याची फळे खावीत म्हणून. ऑफिसात जायचे पण स्वतःचा अधिकार चालवण्यासाठी नव्हे तर आपल्या तरुण सहकाऱ्याना मदत करण्या-साठी–त्याना पुढे आणण्यासाठी. पण जर आपल्या सहकाऱ्यांना किंवा घरात आपल्या मुलानाही आपली अडचण वाटू लागली तर हसतखेळत बाजूला व्हायचे. कित्येकवेळा आपली अडचण इतराना कधी होते आहे तेच कळत नाही. त्याकरता आपल्या सबधात मोकळेपणा हवा आपल्या मुलाना,सहकाऱ्यांना विश्वास द्यायला हवा की, बाबारे थोडीही अडचण वाटत असल्यास साग. मला बाजूला व्हायला आनंदच वाटेल. पण बऱ्याच वेळा असेही होईल की मुलाना/सहकाऱ्याना तुमच्या अस्तित्वाचीच एक सवय जडेल, चटक लागेल. त्यामुळे त्याची वाढ खुरटेल. तेव्हा मग अधूनमधून ते नको म्हणत असता-नाही बाजूला व्हायचे. पूर्णपणे त्या वर्तुळा-बाहेर जायचे आई घरात असली की तरुण मुलगीही स्वयपाकघरात स्वत हून येत नाही. आई करतेच आहे. ती छान स्वयपाक करते. तिच्याच हातचे जेवण सर्वांना आवडते. मग मी स्वयपाकघरात जाऊन कशाला लुडबूड करू ? त्याला उपाय हाच की आईने काही महिन्याकरता तरी पढरपूरला जाणे. काहीना काही निमित्ताने–भाडून नव्हे पण आनदाने बाहेर पडणे व मुलीला स्वत.च्या हाताने स्वयपाक करण्यातला आनद चाखू देणे. संन्यास म्हणजे भोवतालच्या लोकाशी सबध तोडून त्याना शत्रू करणे नव्हे तर घरातल्या चौकटीच्या बाहेरच्या मंडळीशीही मैत्री बाधून त्याना वाढायला मदत करणे आणि ती करताना मदतीच्या फळाची, कृतज्ञतेचीसुद्धा अपेक्षा न धरणे.

आदिशकराचार्यांनी गीतेतल्या या श्लोका-वरच्या भाष्यात आणखीही एक मेख मारून ठेवली आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे, 'काम्यानाम् अश्वमेधादीनाम् कर्मणा न्यासम् परित्यागम्। म्हणजे जी धर्मकृत्ये अश्वमेधा-सारखे यज्ञयाग आहेत, कर्मकाड आहेत त्याचाही त्याग करायचा म्हणजे आता सत्यनारायणाची जी पूजा मी वर्षातून एकदा कधीतरी करतो तीही करायची नाही का ? बाबा रे सत्यनारायणाची पूजा जरूर कर

आप्तस्वकीयाना जरूर बोलव पण सत्यनारायणाला मला सपत्ती दे, माझ्या पुत्रपौत्राना उदड आयुष्य दे असे साकडे घालू नकोस. पूजेच्या फळाची अपेक्षा धरू नकोस गेली कित्येक वर्षे मनाला सवय लावण्याचा मी प्रयत्न करतो आहे की देवाकडे मागायचेच असेल तर सर्वेपि सुखिन' सन्तु सर्वे सन्तु निरामया. । असे मागायचे. कारण कळत न कळत त्यात माझे, माझ्या मुलानातवडाचे सुख आलेच. आता तेही मागायचे नाही. कर्माच्या शास्त्रीय नियमाप्रमाणे प्रत्येक कर्माचा काही ना काही परिणाम होणारच. त्या परिणामाचा साकल्याने विचार करून स्वतःचे कार्य जरूर ठरवावे पण अपेक्षिलेला परिणाम घडला नाही, माझ्या आयुष्यात दिसला नाही म्हणून दुखी व्हायचे नाही किंवा निष्क्रियही व्हायचे नाही

असे काही ना काही विचार मनात येत होते. त्याचवेळी आमच्या नचिकेताने एक प्रश्न विचारला विचारला म्हणण्याऐवजी उभा केला. म्हणजे तो प्रश्न त्यानी मलाच विचारला होता असे नाही. ते स्वत च त्या प्रश्नाचे उत्तर शोधीत 'होते ते म्हणाले, मी अनेक धर्मग्रथाचे पारायण केले ज्ञानेश्वरी तर मला खूपच आवडते परदेशात एकटे राहाण्याची वेळ आली त्यावेळी तिची मी पारायणे केली. काही वेळा ती वाचताना डोळयावाटे मनातली खळबळ धुवून जाई— मलिनता कमी होई आणि एक प्रकारे शातताही जाणवे आणि तरीही मला वाटते की ज्ञानेश्वरीतला उपदेश मला आचरणात आणता येत नाही एक तरी ओवी अनुभवावी असे ज्ञानेश्वर महाराज सागतात, पण तसे जमत नाही सारे वरकरणी होते याकरता कोणी गुरू भेटेल का ? तो कुठे भेटेल ? कधी भेटेल ?

या प्रश्नातल्या आर्ततेने माझेही मन व्याकुळ झाले थोडावेळ आम्ही दोघेही न बोलताच चालत होतो. मग माझ्या मनात येणारा विचार शब्दावाटे प्रगट झाला मला वाटत होते की गुरूची ओढ असावी पण त्याची वाट पहात आपण स्वस्थ बसू नये आपण धडपडत का होईना चालत राहावे, रागत राहावे कदाचित पुढल्याच वळणावर तो आपली परीक्षा घेण्यासाठी दडून बसला असेल. कदाचित तिथही तो नसेल, बहुधा बरीच वळणे मला असे खुरडत रागत जावे लागेल पण माझ्यातही कोणी एकलव्य आहेच ना ! गुरूच्या प्रतिमेच्या साक्षीने मी अभ्यास सुरू केला आणि चालू ठेवला तर ? हा, गुरूच्या आशीर्वादाने अभ्यासात जी सुकरता येते, सहजता येते ती माझ्या अभ्यासात नसेल. पण पूर्व प्राथमिक शाळेतच प्राध्यापक सोनापत दाडेकर वा तत्सम सतगुरू मला भेटला पाहिजे असा आग्रह कशासाठी ? आणि त्यातून नैराश्य, वैफल्य हे अयोग्य व. कोणीतरी माझ्या भोवतालचे काका, मामा मला धुळाक्षरे घालून देतात ती गिरवावीत. मात्र त्यावरच थाबू नये नचिकेतासारखे सतत शोधत राहावे—विचारावे, ऐकावे परिप्रश्नेन सेवया मग यम सुद्धा गुरू होतो.

हा प्रवास मात्र अतिशय कठीण असतो बऱ्याचवेळा शिथिलता येते बाह्य आकर्षणे इतकी जबरदस्त असतात की त्या दरीत पडलात की वरती चढणे कठीण. या केदारनाथच्या वाटेवरही तोच अनुभव आम्ही घेतो आहोत वाट चिंचोळी, दगडाधोंडयांनी भरलेली, मध्येच चिखलाने निसरडी झालेली. एका बाजूने खोल दरी, दुसऱ्या बाजूला कपाळमोक्ष करू शकणाऱ्या कडेकपारी प्रत्येक पाऊल टाकताना नीट पाहून साभाळून टाकले पाहिजे आणि त्यात पुन्हा असख्य वळणे. केदारनाथाच्या देवालयाचे शिखर दर्शन शेवटच्या अर्ध्या किलोमीटरच्या अतरावरच होते मग चालायचे कसे ? केदारनाथाची प्रतिमा मनात साठवून त्याच्या उत्तुगतेचे, भव्यतेचे, वैराग्याचे आणि सौंदर्याचे स्मरण करीत पण चर्मचक्षूनी भोवतालचे दगड नीट न्याहाळीतच पुढे जायचे दूरदृष्टी आणि सूक्ष्मदृष्टी, अन्तर्चक्षू याचे मीलन हवे, त्याची सगत हवी तरच असे प्रवास जमतात निश्चय असला की अडचणी दूर होतात त्या त्या वळणावर ते ते वाटाडे भेटतात कोणी सहप्रवासाची आपली कथा सागतो त्यातूनही शिकायचे.

एक मोठा धोका असतो, ढोंगबाजीच्या आरोपाचा. आपण ज्ञानेश्वरी वाचायला लागलो की बाजूचे शेजारी म्हणतात की काय ढोंगी हो, हा माणूस ज्ञानेश्वरी वाचण्यापूर्वी बायकोला सारी व्यवस्था करायला लावतो, वाचताना पोरे जरा हंसली खिदळली तर त्याच्यावर डाफरतो. कार्यालयात तर हा घुम्यासारखा वागतो नाहीतर इतर सर्व अज्ञानी मूर्ख समजून त्याना उपदेश करायला लागतो. हो हे सार घडत असत आणि एका दिवसात एका वाचनाने वृत्तिबदल होत नाही, चित्तशाति मिळत नाही. 'आनन्दाचे डोहे आनन्द तरग' हा अनुभव येत नाही; पण ज्ञानेश्वराचे काही गुण आपल्यात यावे, आदिशकराचार्यांसारखे किंवा समर्थ रामदासांसारखे काही काम आपल्या हातून घडावे असे नुसते वाटू लागणे हीसुद्धा यात्रेची सुरुवात आहे काशीस जावे नित्य वदावे अशी एक जुनी म्हण आहे. कदाचित मी या जन्मात काशीला पोचणार नाही—फार काय पढरीची वारीही मला करता येणार नाही. पण त्या सुविचाराचे जर स्मरण असेल तर कदाचित, हो कदाचितच मी स्वच्छ आघोळ करायला लागेन आणि त्यावेळी गंगे च यमुनेचैव सारखे मत्र म्हणून कुठेतरी माझ्या भारतीयत्वावरची राख फुकून त्यातला मंद अग्नी प्रज्वलित करेन. गुरू मिळाला नाही म्हणून, लोक ढोंगबाजीचा आरोप करतील म्हणून, आपल्याला मोठी उडी मारता येणारच नाही म्हणून स्वस्थ बसून राहू नये. खुरडत का होईना चालू लागावे— यालाच मुलाचे रागणे म्हणतात आणि हे रागणे तो रखुमादेवीवरू पाहातच आहे ।

उत्तर काशीतल्या मुक्कामात आम्हा सहप्रवाशयाच्या गप्पा रंगल्या होत्या त्यावेळी ताईंनी आठवण करून दिली होती की, अशा यात्रेच्या शेवटी स्वत ला आवडणारी काही ना काही गोष्ट सोडून द्यायची असते— त्याचा त्याग करायचा असतो. कोणी फळ सोडतो, कोणी सिगरेटसारखे व्यसन सोडतो. मी त्यावेळी थट्टेत म्हणालो होतो की, ताई आपण काळजी करण्याचे सोडून दिले तर ! तेव्हा ताई म्हणाल्या होत्या ते तर सर्वात कठीण आम्ही म्हणतो की परमेश्वरावर आमची श्रद्धा आहे. पण खरं तर आमची श्रद्धा बारीकसारीक काळज्याच्या कोळश्याने पार काळवडलेली असते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत, नव्हे झोपेतही आम्ही काळजी करीत असतो. पायाखालच्या बारीकसारीक दगडामुळे आम्ही घसरून पडू म्हणून त्याकरता आम्ही पुढे चालायचेच थांबतो. दुसऱ्यांनाही थाबवतो.

चिंता करायचीच असेल तर 'आई चिंता करतो विश्वाची' असे समर्थ रामदासस्वामी-सारखे मला म्हणता येईल का? ती चिंता करीत समर्थांसारखे भारतभ्रमण करता येईल का? भारताच्या पुनरुज्जीवनाकरता चळवळ करता येईल का? निदान अशा एखाद्या चळवळीच्या वानर सेनेत भाग घेता येईल का? तसे झाले तर प्रचंड विश्वासाने मलाही म्हणता येईल 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे असा सर्व भूमंडळी कोण आहे।'

तर असे विचारांचे चढउतार चालू होते. मधून मधून त्यांचा उच्चार व्हायचा पण बरेच वेळा मौन धरून चालायचे. काही सौंदर्यस्थळे अशी येत की तिथं बसूनच रहावे, उठूच नये असे वाटे. मग डोळे मिटले जात आणि समोरची मदाकिनी मनातच मंदपणे वाहू लागे.

उन्हे कलताकलता गौरीकुंडाला पोहोचलो, तिथल्या गरम पाण्याच्या कुंडात आंघोळ केली. तेव्हा खरोखरीच श्रमपरिहार झाला. मन उल्हसित होतंच पण पायही पुन्हा सचेतन झाले.

मग पुन्हा मोटार बस, सोनप्रयागच्या जवळ रात्रीचा मुक्काम. दुसऱ्या दिवशी पिपल कोटीमार्गे श्री बद्रिनारायणाचा प्रवास सुरू. (१५सप्टेंबर) या बद्रिनाथाच्या प्रवासात एक विलक्षण घटना घडली. बद्रिनाथाच्या अगदी जवळपर्यंत मोटारबस जाते. हा खरं तर पूर्वीचा तिबेटला जाण्याचा धोपटमार्ग पर्वतातूनच वळणावळणाने वर जाणारा. बद्रिनाथाला संध्याकाळपर्यंत पोहोचण्याच्या इराद्याने आम्ही भल्या पहाटेच प्रवासाला सुरुवात केली होती. दुपारचे जेवण वाटेतच झाले आणि आमची बस जयविजय पर्वतांच्या खांद्यावरून धावू लागली. बद्रिनाथाच्या देवालयात पोचण्याकरता आणखी बत्तीस किलोमीटर धावायचे होते. बद्रिनाथाचे जय-विजय पर्वत म्हणजे भालदारचोपदारच. त्यांच्या परवानगीनेच आत जायचे. या भालदारांनी संध्येच्या आगमनाची सूचना दिली. या पर्वतराजीत संध्याकाळ जरा लौकरच भासते. घड्याळात खरंतर चारच वाजले होते. पण भोवताली नीरव शांतता होती. फक्त अलकनंदेच्या झंकाराचीच साद ऐकू येत होती. अशावेळी गोविंद घाटीच्या अलीकडे चार किलोमीटरवर बस आली आणि थांबली. पुढे अनेक मोटारींचा, बसे-सचा ताफा अडकलेला. आम्ही सारे बद्रिनाथाच्या दर्शनाला उत्सुक आणि हा इथे ट्रॅफिक जाम. उतरून चौकशी केली तर कळले की अर्ध्या एक तासापूर्वीच रस्त्यावर दोन मोठ्या दरडी पडल्या आहेत आणि त्या फोडून बाजूला केल्याशिवाय मोटारींना पुढे जाता येणार नाही. मुंबई-पुणे प्रवासात खंडाळ्याच्या घाटातल्या ट्रॅफिक जामची संवय होती. म्हणून प्रथम काही वाटले नाही. येईल कोणीतरी आणि करील दरड बाजूला असे वाटले. पण बराच वेळ झाला तरी मोटारी हालण्याचे काही चिन्ह दिसेना तेव्हा पुढे जाऊन काय प्रकार आहे तो पाहावा असे



Pratibha-HOC/225

ठरवले. चालत अर्धा एक मैल गेल्यावर दिसले– त्या दरडी प्रचड होत्या. माणसाना काय पण बुलडोझरलाही त्या दूर करता येणे शक्य नव्हते. मग कळले की बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनची माणसे येऊन त्यानी सुरुंग लावून त्या दरडी फोडल्याशिवाय रस्ता मोकळा होणार नाही आणि त्याकरता दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत वाट पहावी लागणार. ही बातमी कळताच आमच्या अनेक सहप्रवाश्याच्या पोटात गोळा आला. प्रथमतः या मडळीनी आमची बस जिथं उभी होती त्या बाजूच्या पर्वताकडे पाहिले. पुढे जशी दरड कोसळली होती तशीच एखादी दरड त्याक्षणी आमच्या बसवरही पडू शकली असती. हिमालय पर्वत विष्णुदासासारखा मेणाहून मऊ नसला तरी एकदरीत ठिसूळच त्यातली माती आणि दगड त्याच्या अगाखाद्यावरून वाहणाऱ्या नद्या सारख्या वाहून नेत असतात. कधी त्या नद्यासारखेच ह्या पर्वताचे कडेही ऊचावरून खाली उड्या मारतात. आमच्या ड्रायव्हरला हे नवीन नव्हते. प्रवाश्याना थोडासा दिलासा वाटावा म्हणून त्याने बस जरा त्यातल्या त्यात सुरक्षित बाजूला लावली. पूर्णपणे पाठीमागे फिरणे– रिव्हर्स करणे शक्यच नव्हते. आता सर्व बाजूनी आम्ही सारे जयविजयाच्या मिठीतच होतो. पण आता ही मिठी गजेंद्र शुंडेची तर नाही ना अशी भीती अनेकाना वाटू लागली. ड्रायव्हर मात्र शातपणे मोटारीतून उतरला व कडक्टरबरोबर शेजारच्या एका खेड्यात रात्रीची मजा मारायला निघून गेला प्रवाशाना मात्र आता पुढे काय करायचे, रात्र या जंगलात कशी काढायची या काळजीने ग्रासले. थांबलेल्या मोटारी, बसेसच्या त्या ताफ्यात काही शिखाच्या होत्या. गोविंद घाटीला एक मोठा गुरुद्वारा आहे. तेथूनच पुढे हेमकुडला जाण्याची वाट सुरू होते. हेमकुडला श्री गुरू गोविंदसिगानी तप केले अशी कथा. तेथेही एक मोठा गुरुद्वारा आहेच. शीख प्रवासी या गोविंद घाटीवरून हेमकुंडला जाण्यासाठी आले होते तेव्हा त्यातले बरेचसे पायीपायीच गोविंदघाटीला जायला निघाले. त्यानी आमच्यापैकी काही सहप्रवाश्यांना सागितले की, त्यानीही गोविंदघाटीला चलावे. गुरुद्वारात सर्वांची सोय होईल. लगरमध्ये सर्वांना जेवण मिळेल धर्मशाळेत झोपायला काबळे मिळेल. तेव्हा आमच्या अण्णाच्या नेतृत्वाखाली आमच्या बसमधले पाच प्रवासी गोविंदघाटीला जायला निघाले. बाकीचे बसमध्येच बसून. मग तणाव कमी करण्यासाठी गप्पा, विनोद, गाणी, भेड्या असा कार्यक्रम झाला. प्रवास प्रमुखानी त्या जगलातही कढी–खिचडीचे जेवण तयार केले व वाढले दुसऱ्या दिवशी सकाळी गोविंदघाटीला गेलेले आमचे मित्र परत आले. त्याची तिथल्या गुरुद्वारात छान सोय झाली होती. तिथल्या शीख बाधवानी– त्यात मुबई ठाण्याचे शीखही होते– आमच्या मित्राचे चागले स्वागत केले होते. सकाळी १० च्या मानाने बॉर्डर रोड ऑर्गनायझेशनची मंडळी आली व सुरुग लावून दरडी फोडण्याचे काम सुरू झाले हे स्फोट उडत असतानाच माझा काही शीखबाधवाशी सवाद सुरू झाला. ही मंडळी हेमकुडहून परत जात होती. त्यानी मला विचारले की, मी कोठून आलो मी म्हटले मुबईहून तेव्हा त्यानी विचारले की, मी नादेड पाहिले आहे का? मी म्हटले नाही पण तेथे जाऊन गुरुद्वाराचे दर्शन घ्यायची इच्छा आहे. मग मी त्यांना विचारले की त्याना नामदेव माहीत आहे का? तेव्हा त्याचे डोळे भक्तिभावाने भरलेले दिसले. त्यातल्या एकाला तर नामदेवाचे अनेक अभग पाठ येत होते. मग नामदेवाच्या कार्याविषयी आमचे बोलणे झाले आणि मनोमन पटले की, हा भारत अखड राहणार असेल तर तो या भारतभ्रमण करणाऱ्या नामदेवाच्या, आद्यशंकराचार्यांच्या, गुरुगोविंदसिंगांच्या पुण्याईवरच. या सतानी लोकमानसाला जोडले आहे धर्माला अफू म्हणणाऱ्या लोकानी धर्माच्या या अमृताचाही स्वाद घ्यावा. या संतानी त्याच्या काळातल्या अनेक रूढी बदलल्या. समाजाची वागणूक सुधारेल, लोक एकत्र येतील, अभग राहतील यासाठी जीवाचे रान केले. आद्यशंकराचार्यांनी नरबळीसारख्या प्रथाच बंद केल्या. असे नव्हे तर चाडाळातही शिव आहे हे लोकाच्या प्रत्ययास आणले. शैववैष्णव, देवीचे उपासक आणि गणपतीचे उपासक, कर्मकाडी मीमासक आणि अद्वैती एवढेच नव्हे तर बौद्ध आणि वेदाती याच्यातही मिलाफ त्यांनी घडवून आणला आणि उत्तर–दक्षिण पूर्व–पश्चिम भारत एक केला. नामदेवानीही जातीपातीतल्या भेदापलीकडे जाऊन पढरीच्या वारीत स्त्री–शूद्रांचा मान वाढवला. आजच नव्हे तर पेशवाईतसुद्धा नामदेवाच्या पायरीवर डोके ठेवल्याशिवाय ब्राह्मणांनासुद्धा विठोबाचे दर्शन झाले नाही. ज्ञानदेव आणि नामदेव–ब्राह्मण आणि शिंप्याच्या या जोडीने वारकरी पंथाचे विश्वविद्यालय सुरू केले– त्यात शिकलेल्यानी महाराष्ट्रातच नव्हे तर उत्तर भारतात, कर्नाटकात धार्मिक आणि त्यावर आधारलेली सामाजिक समता आचरणात आणून दाखवली. हिंदू धर्मात विविधतेला विरोध नाही त्यामुळे कधी जातिभेदही निर्माण झाले. त्या विविधतेतली एकता, अंगउपागे त्याच्या त्याच्या गुणकर्मामुळे वेगळी असली तरी ती सर्व एकाच पुरुषाची हे सूक्त, धर्मभावनेची भागिरथी–ती सघभावना, ती प्रेमभावना–ते अद्वैत ते आम्हाला जोपासायला हवे. चदिगढ–अमृतसरमध्ये आज काहीही होत असले तरी शीख मानसातला हा नामदेव, हे सत् श्री अकालाचे स्मरण जोपर्यंत आहे तोपर्यंत त्याचे नाते नादेडशी, महाराष्ट्राशी, भारताशी राहाणार आहे. तो नामदेव पुन्हा जागा कसा करायचा हा खरा प्रश्न आहे.

शेवटी दुपारी बाराच्या मानाने आमच्या बसचा प्रवास पुन्हा सुरू झाला. सायकाळ होण्याच्या आधीच आम्ही बद्रिनाथला पोहोचलो. लगेच जाऊन देवालयाच्या जवळच असलेल्या तप्तकुडावर गरम पाण्याचे स्नान केले. कुडात शिरणे शक्यच नव्हते. बादलीने पाणी वर ओढून थोडे थड करूनच ते अगावर घ्यावे लागले. त्या रात्रीही झोप छान लागली. फक्त एकच आस मनात होती– दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता जाग यावी आणि श्री नीलकठाचे दर्शन व्हावे.

बद्रिनाथाच्या पश्चिमेस पाच मैलावर हा पर्वत आहे. उची जवळजवळ बावीस हजार फूट. त्याच्यावर वर्षभर बर्फ असते. बद्रिनाथहून पहाटेच याचे दर्शन मिळते. कारण नंतर बहुतेक वेळा ढगाने तो झाकला जातो. पहाटे मिळते ते दर्शन मात्र खरेच शिवशकराचे. समाजाच्या रक्षणाकरता स्वतः विष पिऊन ते पचवणाऱ्या नीलकंठाचे. डोक्यावर राखाडी जटा असलेली, गळयात आणि शरीरावर नागाचे विळखे असलेली कर्पूरगौर ध्यानस्थ

शंकराची प्रतिमा ज्या कोणी चित्रकाराने प्रथम चितारली असेल त्याने या नीलकंठ पर्वताचे पहाटेचे दर्शन निश्चितच घेतले असणार.

आद्य शंकराचार्यांनी शैव आणि वैष्णवांना एकत्र आणण्याचा जो यशस्वी प्रयत्न केला त्यातला एक मोठा टप्पा म्हणजे बद्रिनारायणाचे पुनरुज्जीवन. असे सांगतात की नारायणाची–श्रीविष्णूची ही मूर्ती कोणीतरी अलकनंदेत फेकून दिली होती. ती या तरुण संन्याशाने पुन्हा वर काढली व तिची प्रतिष्ठापना केली. केदारनाथाचे ज्योतिर्लिंग– शिवाच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रमुख आणि हा बद्रिनारायण. या दोन्ही ठिकाणी श्रीशंकराचार्यांनी वास्तव्य केले, दोन्ही देवालयांची व्यवस्था लावून दिली. बद्रिनारायण तीर्थाच्या ठिकाणी त्यांच्या चार मठांपैकी एक प्रमुख मठ स्थापन केला. ( इतर तीन मठ तीन दिशेला. पश्चिमेला द्वारका, पूर्वेला जगन्नाथपुरी व दक्षिणेला श्रृंगेरी) तर केदारनाथला स्वत:च समाधी घेतली.

दुसरीही एक कथा सांगतात. बद्रिनारायणाची ही मूर्ती बुद्धाच्या मूर्तीसारखीच पद्मासनातली आहे. त्यामुळे ती बुद्धाची असावी असा एक तर्क. कदाचित आद्य शंकराचार्यांनी बौद्ध आणि वेदांती यांच्या एकतेच्या प्रयत्नात तिबेटच्या या वाटेवर हाही एक साधर्म्याचा–धर्मप्रवाहाचा संगम करण्याचा प्रयत्न केला असेल. बद्रिनाथाच्या देवळाची आणखीही एक विशेषता आहे. हे देऊळ ज्या पर्वताच्या रांगेत आहे त्यांना नरनारायणाचे पर्वत म्हणून ओळखतात. देवालयातही एक नराची व दुसरी नारायणाची मूर्ती आहे. मुख्य मूर्ती अर्थात वेगळी– त्या पद्मासनातल्या श्रीविष्णूची. त्यांच्या शेजारी लक्ष्मी–देवी व शंकराची दोन्ही मुले गणेश व कुबेरही आहेत. नरनारायणाची ही संकल्पना मोठी प्रभावी आहे. नरनारायण ही भिन्नतत्त्वे नाहीत तर कोणताही नर– प्रत्येक माणूस नारायणच आहे–नारायण बनू शकतो, तो देवस्वरूपच आहे. आद्य शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वज्ञानाचा भारतीय मनावर जो कायमचा ठसा उमटला तो या अनेक दृश्य आणि अदृश्य संदेशामुळे बद्रिनारायणाच्या या अद्भुत वातावरणात अलकनंदेच्या तीरावर जर श्राद्ध केले तर पूर्वजांना अपरिमित समाधान होते अशी एक समजूत.

दद्यात् ब्रह्मकपालेऽस्मिन्
*पिण्डं पुत्रोऽथवा परः ।*
नाम्ना यस्य स वै ब्रह्मलोक
याति सनातनम् ।।

मुलाने वा इतर कोणीही या ब्रह्मकपालावर अलकनंदेच्या तीरावर असलेल्या या खडकावर ज्याच्या नावाने पिंड दिला–श्राद्ध केले तो कायमचा ब्रह्मलोकाला जातो अशी कल्पना. आणि श्राद्ध करायचे म्हणजे तरी काय ? तसा तो एक अगदी साधा व सुटसुटीत विधी आहे.

देशे कालेच पात्रेच श्रद्धया विधिनाच यत्।
पितृन् उद्दिश्य विप्रेभ्यो दत्तम् श्राद्धम्
उदाहृतम् ।।

आपल्या आईवडिलांचे, आजीआजोबांचे वा इतरही नातेवाईकांचे स्मरण करून त्यांच्या नावे ब्राह्मणाला देशकालातील परिस्थिती लक्षात घेऊन आपल्याला जमेल तसे *श्रद्धेने भक्तियुक्त अंत:करणाने काही द्यायचे* म्हणजे श्राद्ध. विप्र हा शब्दही खरेतर जातीवाचक ब्राह्मण असा नाही. ज्याच्या ज्याच्या मेंदूत काही तरल स्पंदने होतात–जो जो कोणी विचार करतो तो विप्र. मग एखाद्या *गरीब विद्यार्थ्याला किंवा अर्भकालयासारख्या* संस्था चालवणाऱ्या नि:स्वार्थी संघटकाला काही दिले तरी ते श्राद्धच. पण बद्रिनाथाला असे श्राद्ध केले तर ते पुन्हा दरवर्षी करावे लागत नाही अशी समजूत. माझ्याकडून दरवर्षी काही पूर्वजांच्या श्राद्धाचा विधी होत नाही. त्या निमित्ताने काही संस्थांना मी मदत करतो एवढेच. तेव्हा इथं ब्रह्मकपालावर बसून श्राद्धाच्या त्या स्वत:च्या मनालाच पावन करणाऱ्या विधीचाही अनुभव घ्यावा असे वाटले. दुसरेही एक गमतीचे कारण या मागे होते. बद्रिनाथाला भेट देऊन आलेल्या माझ्या एका मित्राने मला सांगितले होते की या ब्रह्मकपालावर स्वत:चेही श्राद्ध घालता येते. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा ' या भावनेचा आनंद लुटता येतो. खरेतर मरणाची भीती गेली अनेक वर्षे मला सोडून गेली आहे. माझ्या जाण्याने जगाचेच काय पण माझ्या कुटुंबियांपैकीही कोणाचे गाडे अडणार नाही अशी व्यवस्था झालेली आहे. त्यादृष्टीने आम्ही पतीपत्नींनी मृत्युपत्रही लिहून ठेवले आहे. तेव्हा तिसऱ्या अंकाच्या समाप्तीची भीती नाही. हो, काळजी वाटते ती मरणापूर्वी होणाऱ्या एखाद्या दुर्धर रोगाची वा हतबल करणाऱ्या अपघाताची. तेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा स्वत:च ठरवून देहत्याग करावा अशी इच्छा. पण त्याकरता कोणती वेळ योग्य ते ठरवणारी स्वच्छ बुद्धी व देहत्याग आचरणात आणण्याकरता लागणारे मनोधैर्य शेवटच्या क्षणापर्यंत टिकेल याकरता अभ्यास करायला हवा. या अभ्यासाचा एक भाग म्हणून मला माझे श्राद्ध करायचे होते.

माझ्याप्रमाणेच इतरही काही सहप्रवाशांना भाई, नाना एवढेच नव्हे तर इनामदारांनाही आपापल्या पितरांना उद्देशून श्राद्ध करायचे होते. मग दुसऱ्या दिवशी सकाळी कुंडात स्नान वगैरे करून आम्ही सारेजण श्राद्धविधीला बसलो. ब्राह्मणांनी मंत्र म्हणायला सुरुवात केली. प्रथम देवांना, नंतर ऋषींना त्यानंतर आईवडील व त्या दोघांच्याही बाजूचे आजीआजोबा, पणजी–पणजोबा अशा तीन किंवा त्याहीमागच्या पिढ्यांना उद्देशून तर्पण केले. मग ब्राह्मणाने सांगितले की, या ना त्या व्यतिरिक्तही तुम्हाला कोणाच्या नावे तर्पण करायचे असेल, बांधव व अबांधव सुद्धा तर ते तुम्ही करू शकता. मला प्रथम आठवण झाली माझ्या मावशी–आजीची. ही खरतर माझ्या आईची मावशी. तिला स्वत:ला मूलबाळं नव्हते तेव्हा तिनेच माझी आई गेल्यानंतर आम्हा भावंडांना मोठे केले होते. रूढीप्रमाणे तिचे श्राद्ध करायचा मला अधिकार नव्हता. पण या ब्रह्मकपालावरच्या श्राद्धात मला तिचे स्मरण करता येत होते. ब्राह्मणांनी सांगितले की या ब्रह्मकपालावर ज्याचे आपले रक्ताचे नाते नाही त्याच्याही नावे आपण श्राद्ध करू शकतो. हा फार थोर विचार होता माणसे बांधली जातात ती काही केवळ रक्ताच्या नात्यांनी नव्हेत, ती एकत्र येतात भावनांच्या आधारावर. प्रेमभावनेने, सद्भावनेने ती जोडली जातात. तर हा श्राद्धविधी मनाला मोठं करायला. देहापलीकडच्या आत्म्याच अस्तित्व जाणवून घ्यायला एक उत्तम निमित्त होता.

या विचारात मी गुंग असतानाच ब्राह्मणाने तो श्राद्धविधी संपल्याचे सांगितले. तेव्हा मी त्याला म्हटले की, मला माझेच श्राद्ध करायचे आहे. तेव्हा तो हसला, व म्हणाला 'तुम्हाला मुलगा आहे का ?' मी म्हटले आहे. तेव्हा तो म्हणाला की, मी त्या मुलाची परवानगी घेतली आहे का ? मी म्हटले नाही. मग त्यांनी मला सांगितले की त्या मुलाचा श्राद्धाचा हक्क– पितृ स्मरणाचा अधिकार त्याला विचारल्याशिवाय मला हिरावून घेता येणार नाही : मला ते पटले

तेव्हा स्वतच्या श्राद्धाचा आग्रह मी सोडून दिला.

श्राद्धविधी चालू असताना मला एक प्रश्न मधूनमधून डुसण्या देत होता– इनामदार शातपणे– कोणताही आडवातिडवा प्रश्न ब्राह्मणाला न विचारता या श्राद्धविधीत कसा काय भाग घेताहेत ? खरे तर ते अज्ञेयवादी पूजेबिजेसारख्या विधीच्या फापटपसाऱ्यात स्वतला अडकवून न घेणारे. मग रात्रीच्या गप्पात त्यानीच या प्रश्नाची उकल केली– त्यातून त्याच्या मनातली एक व्यथा उमजली आणि त्याच्या उदार मनाचेही दर्शन झाले. त्यानी सागितले की, ते त्याच्या वडिलाचे एकमेव पुत्र. त्याना एक बहीणही आहे. वडील निवंतले तेव्हा या बहिणीच्या व इतरेजनाच्या समाधानासाठी त्यानी वडिलाचे तेरावे घातले. पण त्यावेळी पिडाला कावळा काही शिवेना. सर्वजण म्हणू लागले की, वडिलाची काही इच्छा अपूर्ण राहिली असणार तेव्हा इनामदाराचे मनही हेलावले त्याना वाटले की, वडील सरकारी नोकरीतल्या त्याच्या निवृत्तीनतर शहरातल्या सुखसोयी विसरून खेडेगावात जाऊन राहिले होते. एकाच उद्देशाने की तेथली इनामात मिळालेली शेतीवाडी सुधारावी, मळा फुलवावा. ते त्याचे काम अपुरे राहिले होते. तर आपण ते काम पुरे करावे तेव्हा इनामदारानी तसे शब्द उच्चारले. पण तरी कावळा शिवेना. तणाव कमी करण्यासाठी मग इनामदार म्हणाले, की वडिलाचा जिवतपणीही माझ्या शब्दावर त्याचा कधी विश्वास बसला नाही तर ते आता तरी कसा ठेवणार ? पण हे त्याचे बोलणे इतरेजनाना व बहिणीलाही थट्टेचे वाटले अशा दुखद प्रसगीही आपला भाऊ विनोद करतो याचा तिला राग आला. त्याची खत इनामदाराच्या मनात अनेक वर्षे सलत होती. आता ब्रह्मकपालावरच्या श्राद्धविधीत कावळ्याच्या सहभागाची आवश्यकता नव्हती. वडिलाना तर ते मानीतच होते. त्याचे आदरपूर्वक स्मरण ते अनेकवेळा करीत असत. तेव्हा जर एकदा विधिपूर्वक श्राद्ध केल्यामुळे बहिणीचे व इतरेजनाचे समाधान होणार असेल तर ते त्याना द्यावे या हेतूने इनामदारानी या श्राद्धविधीत भाग घेतला होता.

दुसऱ्या दिवशी (१६ सप्टेंबर) पुन्हा बसचा उतरतीचा प्रवास. यावेळी पिपलकोटीला रात्रीचा मुक्काम आणि त्यानतर पुन्हा पहाटे निघून ऋषिकेश-हरिद्वार, पिपलकोटीच्या वाटेवरच ज्योतिर्मठ किंवा जोशी मठ पाहिला. येथे शंकराचार्यांचा आश्रम आहे बद्रिनाथ बर्फामुळे बद होते त्यावेळी तिथला रावळही इकडेच येतो. सध्याचा रावळही केरळीय आहे. या मठात आज शकराचार्यांच्या मूर्तीचे दर्शन होते पण त्याच्या विद्वत्तेचे, समाज उभारायच्या विजिगीषु वृत्तीचे प्रतीक म्हणून या मठात काही जाणवले नाही.

ऋषिकेश, हरिद्वार पूर्वी पाहिलेले होते. बाह्यसृष्टीतल्या सौदर्याच्या उधळणीत वा मानवी व्यापाराच्या दगलीत भाग घ्यायला आता मन तयार नव्हते तेव्हा या दोन दिवसात मी जरा एकलकोडाच झालो होतो. तो एकलकोंडेपणा घालवला दिल्ली ते मुबईच्या प्रवासात भेटलेल्या एका सिंधी व्यापाऱ्याने. आगगाडीमध्ये जरा गर्दीच होती. आमची तिकिटे आधीच राखीव होती तेव्हा आम्हाला बसायला जागा मिळाली होती. पण माणसे खेटाखेटीने बसली होती, काही उभीही होती. अगाला अग लागले की एकतर शिळोप्याच्या गप्पा सुरू होतात नाहीतर भाडणे होतात. तेव्हा माझ्या सहयात्रेकरूबरोबर समोरच बसलेला हा व्यापारी बोलू लागला. त्याना प्रश्न विचारू लागला. मी प्राध्यापक बेलसरे याचे अतर्यात्रा हे पुस्तक वाचण्याचा प्रयत्न करीत होतो. पण जेव्हा त्या व्यापाऱ्याला कळले की, आम्ही मडळी बद्रिकेदारची यात्रा करून परत जात आहोत तेव्हा त्याने माझ्यावर सरळच हल्ला चढवला. 'काय हो काय मिळाल तुम्हाला ही यात्रा करून ? कशासाठी हा खटाटोप तुम्ही केलात ?'

उत्तर देण कठीण होत आणि मलाही त्यावेळी वादविवाद नको होता. पण मौन पाळण हा अनादर झाला असता तेव्हा मी सौम्यपणे त्याला प्रतिप्रश्न केला की, बाबा रे, तुझे या बाबतीत काय मत आहे ? अशी यात्रा कोणी करावी की करू नये ? मग तो बराच वेळ बोलत होता. त्याच्या जीवनातल्या व्यथा तो तृतीय पुरुषी उल्लेखाने सागत होता 'माणसे ढोगी असतात. यात्रेला जाऊन पुण्य मिळवू म्हणतात पण दररोजच्या आचरणात अनेक पापे करतात त्यापेक्षा आपल्या कर्मभूमीत राहावे सत्सग करावा. परमेश्वराचे स्मरण अवश्य करावे पण त्याकरता हिमालयात वगैरे जाण्याचे कारण नाही.'

भारताची फाळणी झाली त्यावेळी त्याच्या कुटुबावर व त्याच्या स्वतवरही झालेले आघात या माणसाने पचवले होते त्या राखेतून पुन्हा उभे राहून त्याने त्याच्या कुटुबियानाही मोठे केले होते हताश न होता लढायचे– 'माम् अनुस्मर युद्धच' हे तत्त्वज्ञान त्याने अनुभवले होते.

हे ऐकत असताना मला आठवण झाली सावतामाळ्याची. याचं गाव आळदी पढरपूरच्यामध्ये पढरपूरपासून फार दूर नाही. सारे वारकरी टाळ वाजवीत विठोबाची पालखी याच्या गावावरून पुढे न्यायचे. पण हा कधीच वारीला गेला नाही. कारण वारीचे दिवस म्हणजे शेतीचा–विशेषत. भाजीपाल्याचा मोसम. वारीतल्या साधुसताना– नव्हे साऱ्यानाच तो भोजन घाली. पढरपूरच्या विठोबाला भाजी पाठवी पढरपूरला जाणाऱ्या कोणाही पथिकाला तो विठ्ठलाच्या स्वरुपात पाही व त्याची पूजा करे

बद्रिकेदार यात्रेतून निर्माण झालेला, आपण काहीतरी खास मिळवले असा अहंकार त्या सिंधी व्यापाऱ्याने आता धुळीला मिळवला होता त्याकरता त्याला मी मनातल्या मनात वदन केले

पण शहरी अहकारानी आणि पोकळ पदव्यानी ताठ झालेल्या माझ्या शरीराची मान जेवढी वाकायला हवी होती तेवढी वाकली नाही. करट्या एकलकोंडेपणाला मात्र तडा गेला होता रेल्वेच्या प्रवासातील ती रात्र दोलायमान अवस्थेतच गेली. दुसरा दिवस उजाडला गुजराथच्या खेड्यामधल्या स्वच्छ वातावरणात. पुन्हा निरभ्र आकाशाच्या दर्शनाने जरा मोकळेसे वाटले. मग मी माझ्या जागेवरून उठलो आणि सगळ्या यात्रेकरू सहप्रवाश्याच्या जागी जाऊन त्याना भेटलो प्रवासात काही उणेदुणे बोललो असल्यास, वागलो असल्यास त्याची क्षमा मागितली व पुन्हा सहप्रवासाच्या आनदाचा, सहवासाचा योग यावा अशी प्रार्थना केली.

तर अशी ही माझी अतर्यात्रा. तीर्थक्षेत्राच्या दर्शनामुळे–त्या निमित्ताने झाली. माणसाच्या मनात अनेक चागले विचार येत असतात. पण त्यानुसार आचरण व्हायला एक दृढसकल्प लागतो तीर्थक्षेत्राच्या दर्शनाने त्यावेळी होणाऱ्या साधुसताच्या स्मरणाने, सहयात्रेकरूच्या समागमाने आणि अबाधवांच्याही मिळणाऱ्या सहानुभूतीने तत्कालिक विचाराचा दृढ सकल्प व्हायला मदत होते एवढच पण अतर्यात्रा या बाह्य निमित्तावर अवलबून राहू नये. ती चालूच राहावी आणि तश्या अतर्यात्रेचे फलित आपण आपल्या प्रियजनासह भोगावे त्या सहभोगासाठी, त्या आनदाचा वाटा तुम्हाला देण्यासाठी हे पत्र.

हा नराचा नारायण होण्याचा बद्रीकेदारचा प्रवास तुम्हालाही घडो हा आशीर्वाद.

तुमचा
बाबा

**या दोन्ही पत्राचे लेखक**
**प्रा. शरद कुलकर्णी**

# हिंदू सारा एक

जीवन विषयक श्रेष्ठ तत्वज्ञान...
ते जगून दाखविणारे महात्मे
त्याचा जगभर प्रसार करणारे थोर पुरूष
आणि अशा तत्वज्ञानावर आधारित समाजजीवन
प्रत्यक्षात आणू पाहाणारे वीराग्रणी...
अशा परंपरेची पार्श्वभूमी असूनही
हा देश शेंकडो वर्षे पारतंत्र्यात
पिचत का राहिला?
ह्या देशाच्या सुखदुःखाशी एकरूप असलेला
'हिंदू' समाज विघटित झाला.
जाति, भाषा, प्रांत भेदांनी पोखरला गेला.
समाज म्हणून संपुष्टात आला, दुबळा झाला!

आपल्या ह्या प्रिय भारत देशाच्या दैन्यावस्थेचे
अचूक निदान करणारा एक महामानव
१00 वर्षापूर्वी जन्माला आला.

**डॉ. केशव बळिराम हेडगेवार.**

विजयादशमी- १९२५....
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली.
केवळ संघटित होण्याने हा समाज
पुन्हा विश्ववंद्य होऊ शकेल असा दुर्दम्य विश्वास
डॉक्टरांनी समाजाला दिला.
त्यासाठी आवश्यक गुणांनीं युक्त अशा
लक्षावधी स्वयंसेवकांना घडविले.
कणाकणाने शरीर झिजविले.....
क्षणाक्षणाने जीवन संपविले.
त्यावेळी प्रज्वलित केलेल्या ज्योतीचा प्रकाश
आज साऱ्या समाजाला उजळून टाकण्याच्या
क्षमतेचा झालेला दिसत आहे.
संघटनेचा महामंत्र देऊन,
हिंदू समाजाला जगद्विजयाचा मार्ग दाखविणाऱ्या
त्या द्रष्ट्या पुरुषास
शत शत अभिवादन!!!




**डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी
समारोह समिती द्वारा-
मुंबई / महाराष्ट्र**

*तुझे तेज अंगी शतांशे जरीही
उजळून देऊ दिशा दाहि दाही*

—एक शुभचिंतक

# भारतीय स्टेट बँकेकडून कर्ज घ्या, मनात भरलेल्या वस्तू घरी घेऊन या!




चला, घेऊन या कार, व्ही सी आर किंवा शिलाई मशीन, आजच! आता नको काटकसर की नको बचत. नको महिनोन् महिने नि वर्षानुवर्षे प्रतीक्षा करायला! हवं ते तुम्ही आत्ताच घेऊ शकता... मोठी खरेदी योजनेच्या सहाय्याने.

मोठी खरेदी योजना म्हणजे 'आज खरेदी करा, नंतर पैसे भरा' योजना. या द्वारे तुम्हाला स्कूटर, एअर-कंडीशनर, टीव्ही, कुकिंग रेंज, वॉशिंग मशीन इ. सारख्या उपभोग्य वस्तू खरेदी करायला नि आपली मालमत्ता वाढवायला मदत होईल.

**★ एक लाखापर्यंत कर्ज घ्या. हव्यात त्या वस्तू घेऊन या.**

मोठी खरेदी योजनेच्या अंतर्गत तुम्हाला किमान रु. 5,000/- पासून कमाल रु. 1 लाखापर्यंत किंवा तुमच्या निव्वळ मासिक उत्पन्नाच्या/पगाराच्या आठपट (जे कमी असेल ते) कर्ज मिळेल. ते तुम्ही ३ ते ५ वर्षात सुलभ मासिक हप्त्यात फेडू शकाल.

**★ पगारदारांनो, तुमच्यासाठी**

तुम्ही जर सरकारचे किंवा सरकारी वा खाजगी क्षेत्रातील कंपनीचे कायम कर्मचारी असाल आणि तुमची किमान 5 वर्षे सेवा झाली असेल तर मोठी खरेदी योजना तुमचीच आहे. किंवा तुम्ही किमान 5 वर्षांपासून व्यावसायिक किंवा स्वयं-रोजगारित व्यक्ती असाल तर मोठी खरेदी योजना तुमच्यासाठीही खुली आहे.


**★ तर, झटपट या-पैसे घेऊन जा!**

चला, भारतीय स्टेट बँकेच्या नजीकच्या शाखेत त्वरेने या आणि मोठी खरेदी योजनेत सहभागी व्हा. आणि आतापर्यंत तुम्हाला हुलकावणी देणाऱ्या त्या साऱ्या गोष्टी घेऊन या!

**स्टेट बँक**

CHAITRA-B SBI 1534 MAR



NELCO
BLACK DIAMOND

**Features**

- ☐ Multi-channel turret tuner
- ☐ Direct recording jack for recording TV sound
- ☐ 10cm high quality speaker

# Saxonia Watch Co.

*Dealers in :*

All Type of watches • Calculators • Automatic Push Button Telephones/ Dialiers • Colour T. V. & Video • Other Electronic Items.

27-A, Kermani Bldg, Sir P. M. Road, Fort Bombay-400 001. Tel No. 204 28 49 / 204 37 16



## दीपावली शुभचिंतन

मुंबै बँक

## दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

मुंबै बँक भवन, २०७ डी. एन. रोड, फोर्ट, मुंबई नं. ४०० ००१
(तार : मुंबै बँक) दूरध्वनी क्रमांक : २६७१५४ ते ५९

| एस. ए. घोसाळकर | एस. व्हि. कुलकर्णी | एस. एस. कदम |
|---|---|---|
| प्र. व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

"दीनदुबळ्यांना प्रकाश देती सहकाराच्या सहस्र ज्योती"






AD HOUSE 1122 MAR



**पंचासव :**

पचनशक्ती संरक्षक! धावपळीच्या जीवनातील वेळी-अवेळी खाणे, जेवणे यामुळे पचनक्रियेवर दुष्परिणाम होतात. मुख्यतः तरुण वयात हे जाणवत नाही. परंतु साधारणतः वयाच्या पस्तीसाव्या वर्षानंतर पचनक्रियेची क्षमता हळुहळू क्षीण होत जाते व आरोग्याच्या तक्रारी सुरु होतात. तसं होऊ नये आणि जीवनातील आनंद, उत्साह व शारिरीक क्षमता वाढावी, म्हणून साण्डूचे पंचासव नियमीत घ्या! यातील पिपळ, पिपरामुळ, चित्रक, चाव्य व सुंठ हे पाच घटक पचनक्रियेस, तर द्राक्ष व ज्येष्ठमध हे घटक शक्ती वाढविण्यास मदत करतात. अन्नातील जीवनसत्वे सुलभतेने शरीरात समाविष्ट होऊन प्रकृती सुदृढ राहते. पोटातील गुबारा कमी होतो. आतापासून काळजी घ्या व उद्याचे जीवन सुखकर करा।

**बाळकडू :**

निरागस बालकाचे लोभस हास्य लाखमोलाचे, पण अपचन व पोटाच्या विकारांमुळे ते अचानक लूप्त होते. मूल कोमेजते. तेच जाणून वर्षानुवर्षांच्या अनुभवाने साण्डूने बनविलेले "बाळकडू"– तुमच्या बाळाच्या सुदृढ आरोग्यासाठी! बाळकडू हे पचन व आहाराचा समतोल राखते. पोटदुखी, अपचन, मलावरोध, किरकिर, क्षीण पचनक्रिया यासारख्या तक्रारी त्वरेने दूर करते.



**वासा सिरप:**

सर्दी-खोकल्याच्या लपंडावाला बरेच वैतागलात ना? श्वास घ्यायला त्रास होतो, म्हणून हैराण झालात नां? मग वासा सिरप घ्या, अन् सर्दी-खोकला दूर सारा! निर्विघ्न, स्वच्छ श्वास अनुभवा. वासा सिरप- सर्दी खोकल्यावर उत्तम! ओल्या खोकल्यापासून त्वरित आराम देते, घशातील खवखव कमी करते. श्वसनमार्गाच्या रोगावरील विश्वासार्ह उपाय!



**च्यवनप्राश :**

निसर्गाने बहाल केला मोती व चांदीचा ठेवा। तोच आम्ही च्यवनप्राशमधून तुमच्या हाती दिला. साण्डू च्यवनप्राश म्हणजे मोती अन् चांदी यांच्या गुणधर्माचे मौल्यवान घटक असलेले एकमेव च्यवनप्राश! त्याने रक्तपेशी तर वाढतातच, पण शरीराची झीजसुद्धा भरुन निघते व हृदयही दमदार होते.



**साण्डू औषधि**

**शरीर स्वास्थ्यम् सेवामहे।**

द.कृ. साण्डू ब्रदर्स (चेम्बूर) प्रा.लि.
साण्डू वाडी, साण्डूमार्ग, चेम्बूर, मुंबई-४०० ०७१
विशुद्धता • गुणकारकता • विश्वसनीयता.......
९ दशकांच्या सिद्ध अनुभव.

## साण्डू उत्पादने- प्राचीन, नैसर्गिक सौंदर्याचे मुर्तीमंत प्रतीक

Diwali Greetings !

*Sound of Music*
*Comes to You*
*From—*

**Friend's Music Centre**

1526, Sadashiv Peth
Pune 411 030.


## पूर्णत्वाचे प्रवासी

**लेखक : प्रा. शरद कुलकर्णी**

**मूल्य : पन्नास रुपये**


महाराष्ट्रीयांच्या व प्रत्येक भारतीयाच्या घरी या पुस्तकाची चिकित्सकबुद्धीने व भावनेने पारायणे व्हावीत अशी त्याची योग्यता आहे.

—आनंद यादव



**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०


समृद्धिची पणती
आपल्या जीवनात
लखलख डिविडंडचा
प्रकाश आणो.
आपल्या परिवाराकरिता उज्ज्वल भविष्य घेवून येणारी गुंतवणुक-योजना.
* वाढत जाणरे डिविडंड.
* आपल्या गुंतवणुकीला पूर्ण संरक्षण
* करांमध्ये सवलतीचा लाभ
* सहज वटवून घेता येतात.
युनिटासंबंधी विनामूल्य माहितीसाठी युनिट ट्रस्टच्या कोणत्याही कार्यालयात किंवा प्रमुख प्रतिनिधी, एजन्ट याच्याकडे, किंवा निवडक हिन्दुस्तान पेट्रोलियमच्या पेट्रोल पंपावर चौकशी करा.
किंवा हे कूपन युनिट ट्रस्टच्या खाली दिलेल्या कोणत्याही कार्याल डे पाठवा.
UNIT TRUST OF INDIA
भारतीय युनिट ट्रस्ट
(सार्वजनिक क्षेत्रातील अर्थविषयक संस्था)
APEX 68509
कृपया युनिटसंबंधी माहिती देणाऱ्या विनामूल्य पुस्तिका मला पाठवाव्या.
नाव :
पता :
मुंबई- 400 पोस्ट बॅग : 11410 टेली : 2863767

आधी लावले एक झाड
मग लावले दुसरे.

आणि मग एक एक अशी खूप.
काही लाखात काही कोटीत.

वनशेतीची ही चळवळ
येथेच थांबणार नाही.
यातूनच ग्रामीण विकासाची
नवनवीन क्षेत्रे, उदयाला येतील.

हाच उद्याच्या पर्यावरणाला इष्ट वळण
लावण्याचा उपाय आहे.

# 'वनशेती-एक किफायतशीर शेती'

अधिक माहितीसाठी संपर्क,

**नाशिक जिल्हा**
**निलगिरी उत्पादक**
**सहकारी संस्था लि.**
**नाशिक**

संदीप अपार्टमेन्ट
त्रिंबक रोड, नाशिक ४२२००२

नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी संस्था लि. नाशिक

MANOOS ( Marathi Weekly ) (Licensed to post without prepayment of postage No. 11) Regd. No. PNC-W 28

